भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात अभिजात मराठी भाषेचा अभ्यास

भारतीय ज्ञान परंपरा के संदर्भ में अभिजात मराठी भाषा का अध्ययन



संशोधन अहवाल

PAC : 23.16

वर्ष : 2025-26





मुख्य संशोधक

डॉ. व्यंकट बाबूराव सूर्यवंशी

सहायक प्राध्यापक, मराठी

सामाजिक विज्ञान एवं मानविकी शिक्षा विभाग

Department of Education in Social Science and Humanities

क्षेत्रीय शिक्षा संस्थान, भोपाल

(राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान एवं प्रशिक्षण परिषद, एनसीईआरटी, नई दिल्ली)

श्यामला हिल्स भोपाल- 462002 (म.प्र.)

मऱ्हाटी भाषासुंदरी

जैसी दीपांमाझि दिवटी। कां तिथींमाझि पूर्णिमा गोमटी।
तैसी भाषांमध्ये मऱ्हाटी। सर्वोत्तम।।१।।

जैसी सरितांमध्ये गोदावरी। कां पूर्वतांमध्ये रत्नागिरी।
तैसी भाषांमध्ये साजरी। मऱ्हाटी पैं. ।।२।।

हरळांमध्ये रत्नकिळा। पुष्पांमध्ये कमळ।
तैसी भाषा सोज्वळ। शोभिवंत दिसे।।३।।

दुर्गावरि शोभे चरी। कां मुक्ताफळें शोभती हारी।
तैसी शोभे भाषांमाझारी मऱ्हाटी पैं।।४।।

तीर्थांमध्ये काशी। व्रतांमध्ये एकादशी ।।
भाषांमध्ये तैशी। मऱ्हाटी शोभिवंत।।५।।

परिमळांमध्ये कस्तुरी। कां अंबरामध्ये शंबरारी।
तैसी मऱ्हाटी सुंदरी। भाषांमध्ये।।६।।

ऐसी मऱ्हाटी सुंदरी। ते संस्कृता शोधु करी।
शटिक बैसवी हृदयमंदिरी । अज्ञानाची।।७।।

मूर्ख हृदयातें बोधी। विविध अर्थातें शोधी।
अज्ञानाची बोधी। मऱ्हाटी पैं।।८।।

मूर्खांशि चतुरा करी। साधु दावी सारासारी।
ज्ञातव्य वाखाणी संसारी। मऱ्हाटी हे।।९।।

बहुत संस्कृती अनुरागु । सर्वशास्त्री विचारु चांगु।
परि मऱ्हाटी वाचूनी पांगु। कवण फेडी।।१०।।

मऱ्हाटी बोलतां बरवी। सर्वत्र जाणीव मिरवी।
दूर्जनांकरवी सांडवी। पाषांड हे।।११।।

ऐसिया मऱ्हाटिया पवित्रा । लेणें करीत अध्यात्मशास्त्रा।
बहुतां लोकांसि पवित्रा । करविया ।।१२।।

– संत ज्ञानेश्वर
योगवासिष्ठ (१–२९४ ते ३०७)

विद्यया ऽमतमश्नुते

एन सी ई आर टी
NCERT

ACCREDITED WITH GRADE A++ NAAC

क्षेत्रीय शिक्षा संस्थान, भोपाल
Regional Institute of Education, Bhopal

भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात अभिजात मराठी भाषेचा अभ्यास

(भारतीय ज्ञान परंपरा के संदर्भ में अभिजात मराठी भाषा का अध्ययन)

संशोधन अहवाल

(PAC: 23.16)

वर्ष : 2025-26

मुख्य संशोधक

डॉ. व्यंकट बाबूराव सूर्यवंशी

सहायक प्राध्यापक, मराठी

सामाजिक विज्ञान एवं मानविकी शिक्षा विभाग


Department of Education in Social Science and Humanities

क्षेत्रीय शिक्षा संस्थान, भोपाल

(राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान एवं प्रशिक्षण परिषद, एनसीईआरटी, नई दिल्ली)

श्यामला हिल्स भोपाल- 462002 (म.प्र.)

प्राचार्य संदेश



भारतीय ज्ञान परंपरा एक समृद्ध परंपरा है। यह सिर्फ़ बौद्धिक विकास तक सीमित नहीं है, बल्कि जीवन जीने के तरीके को समग्र नज़रिए से देखती है। यह ज्ञान परंपरा व्यक्ति के शारीरिक, भावनात्मक, आध्यात्मिक और नैतिक विकास पर ज़ोर देती है। व्यक्ति के सर्वांगीण विकास के लिए भारतीय ज्ञान परंपरा ज़रूरी है। इसलिए, इस ज्ञान परंपरा को समझना ज़रूरी है। भारतीय ज्ञान परंपरा में, ज्ञान का उद्देश सिर्फ़ शारीरिक विकास ही नहीं, बल्कि चेतना के सबसे ऊँचे स्तर तक पहुँचना भी है। ज्ञान परंपरा के माध्यम से छात्र शैक्षिक ज्ञान के साथ-साथ प्रात्यक्षिक कौशल्य, नैतिक मूल्य और जागरूकता भी सीखता है।

अभिजात मराठी भाषा के अभ्यास से भारतीय सांस्कृतिक विरासत, परंपराओं, जीवन मूल्यों और दर्शन की गहरी समझ बनती है। भाषा को समृद्ध बनाना, संस्कृति को बचाकर रखना और प्राचीन ज्ञान परंपरा की विरासत कोअगली पीढ़ियों तक पहुँचाना संभव होता है। इसलिए, "भारतीय ज्ञान परंपरा के संदर्भ में अभिजात मराठी भाषा का अध्ययन" ज़रूरी माना है।

राष्ट्रीय शिक्षा नीति-२०२० में सुचित है कि, "छोटे बच्चे कठीन पाठ को अपनी घरेलू भाषा, यानी मातृभाषा में ज़्यादा तेज़ी से समझते हैं। यह शोध के उपरांत सिध्द हुआ है। घरेलू भाषा और मातृभाषा अक्सर एक ही होती है या यह स्थानीय समुदाय में बोली जाने वाली भाषा होती है। लेकिन कई भाषाएँ बोलने वाले घरों में कभी-कभी परिवार के दूसरे सदस्यों की बोली जाने वाली भाषा, मातृभाषा या लोकल भाषा से अलग हो सकती है" आज के आधुनिक युग में, भारतीय ज्ञान परंपरा की पढ़ाई और अभिजात मराठी भाषा का संवर्धन करना ज़रूरी है। उम्मीद है कि विद्यार्थी इस परंपरा का अभ्यास करके अपनी मराठी तथा भारतीय संस्कृति पर गर्व करेंगे और इसके जीवन मूल्यों को अपनी ज़िंदगी में अपनाएँगे।

राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान एवं प्रशिक्षण परिषद (NCERT)भारत के शिक्षा क्षेत्र में एक अहम भूमिका निभा रहा है। यह पायाभूत स्तर से माध्यमिक स्तरअभ्यासक्रम, रचना,पाठ्यपुस्तक, संदर्भ साधन और प्रशिक्षण कार्यक्रम,अनुसंधान की और बढ़ाने के लिए लगातार काम कर रहा है। क्षेत्रीय शिक्षा संस्थान, भोपाल भारतीय ज्ञान परंपरा को संरक्षण करके मानवता विकास के लिए भाषा में अनुसंधानकीलगातार कोशिश कर रहा है और उसे बढ़ावा दे रहा है। जो एक प्रशंसनीय और ज़रूरी पहल है। यह अनुसंधान भारतीय ज्ञान परंपरा को बचाने के लिए बहुत ज़रूरी होगा। इस कार्यक्रम के समन्वयक डॉ. व्यंकट बाबूराव सूर्यवंशी ने मराठी भाषा के माध्यम से भारतीय ज्ञान परंपराका जतन एवं संवर्धन करने का प्रयास किया है। यह शोध कार्य महाराष्ट्र और देश के नई पीढ़ी को काम आएगा। उसके लिए मैं सभी शोध तजज्ञो एवं सदस्यो का भी धन्यवाद करता हूँ और शुभकामनाएँ देता हूँ।

प्रो. शिव कुमार गुप्ता
प्राचार्य,
क्षेत्रीय शिक्षा संस्थान, भोपाळ

ऋणनिर्देश



प्रस्तुत संशोधन राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद दिल्ली चे क्षेत्रीय शिक्षा संस्थान, भोपाळ येथून 'भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात अभिजात मराठी भाषेचा अभ्यास या विषयावर संशोधन कार्य सादर करताना मला मनस्वी आनंद होत आहे. प्रत्येक महत्वाच्या कार्याच्या सफलतेमागे त्या व्यक्तिस साथ देणारे अनेक हात गुंफलेले असतात. सदर विषयाचे संशोधन करताना मला ज्यांनी-ज्यानी संशोधन कार्यास मदत केली. संदर्भसाधने पुरविली, संशोधना विषयी मार्गदर्शन केले त्या सर्वांचे ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजतो.

आमचे मुख्य प्रेरणा स्त्रोत आणि आधारस्तभ राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, दिल्लीचे संचालक **प्रो. दिनेश प्रसाद सकलानी** यांनी प्रस्तुत विषयावर संशोधन करण्यास परवानगी दिल्याबद्दल त्यांचे मन:पासून धन्यवाद. संशोधनाबद्दल विचारणा करून मार्गदर्शन करणारे, प्रभावी नेतृत्वशील क्षेत्रीय शिक्षा संस्थांनचे प्राचार्य **प्रो. शिव कुमार गुप्ता** व संस्थानचे अधिष्ठाता **प्रो. जयदीप मंडल** यांच्या अमुल्य मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

त्यासोबतच संशोधन पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती कार्यालयीन मदत करणारे विस्तार शिक्षा विभागप्रमुख प्रो. रत्नमाला आर्या, प्रो. एन. सी. ओझा शिक्षा विभागप्रमुख, प्रो. अश्विनिकुमार गर्ग विभागप्रमुख, प्रो. चित्रा सिंह, प्रो. रश्मी सिंघाई, यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल आभार.

संशोधन विषय निवडीपासून ते सादर होईपर्यंत मला प्रोत्साहित करणारे, सहकार्यशील, शिस्तबध्द, उत्साही, आदरणीय विभागप्रमुख. डॉ. सुरेश मकवाना सरांच्या ऋणातच राहणे पसंत करतो. तसेच माझे सहकारी मित्र डॉ. कुलवीर सिंह चौहान, डॉ. अरुणाभ सौरभ, डॉ. अलका सिंह, डॉ. प्रद्युमनसिंह लखावत, प्रा. डॉ. गंगा महतो, डॉ. श्रुती त्रिपाठी, डॉ. संगीता पाठीया, डॉ. सोयुनलो सेबू व डॉ. रूपेश कौशिक यांनी मला प्रत्येक कार्यात मार्गदर्शनाबरोबरच अंतर्गत विषयतज्ञ म्हणूनही सहकार्य केले. याबद्दल सर्वानी वेळोवेळी केलेल्या सहकार्याची जाण माझ्या मनात सदैव राहील.

या संशोधनास विषयतज्ञ म्हणून उपस्थित राहून सहकार्य केले ते आदरणीय प्रा. डॉ. रमेश वरखेडे, प्रा. डॉ. मंगला वरखेडे, प्रा. डॉ. राजेंद्र नाईकवाडे, प्रो. नंदकुमार मोरे, प्रा. डॉ. सुधीर मोरे, मुकुंद कुळे, डॉ. नितीन रिंढे, प्रो. आनंद काटीकर, डॉ. नागनाथ बळते, डॉ. ऋषिबाबा शिंदे, डॉ. सचिन अहिरे, डॉ. प्रविण सोलनकर याच्यासोबतच अंतर्गत विषयतज्ञ डॉ. संजयकुमार पंडागले, डॉ.विशाल पाजणकर डॉ. साईनाथ कबाडे यांनी संशोधन कार्य अंतिम करण्याच्या दृष्टीने अचुक मार्गदर्शन करून योग्य ठिकाणी सूचना व अनमोल मार्गदर्शन केले. त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.

संसोधनासाठी संदर्भसाधने उपलब्ध होण्याचे ठिकाण म्हणजे सावित्रीबाई फुले विद्यापीठीचे जयकर ग्रंथालय, फर्ग्युसन महाविद्यालयाचे बाई जेरबाई वाडीया ग्रंथालय, भारतीय भाषा संस्थानचे पश्चिम क्षेत्रीय भाषा केंद्र, पुणे, डेक्कन कॉलेज, पुणे, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन केंद्र, पुणे, पुणे नगर वाचन मंदीर, पुणे, येथील

ग्रंथालयातील ग्रंथपालांनी संशोधन संदर्भ उपलब्ध करून दिल्यामुळे आम्हाला संशोधनासाठी मोलाचे सहकार्य लाभले आहे. त्यामळे ग्रंथालयाचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी त्यांच्या ऋणात राहणे पसंत करतो. तसेच क्षेत्रीय शिक्षा संस्थानच्या ग्रंथालयाचे उप ग्रंथपाल डॉ. पी. के. त्रिपाठी यांनी आवश्यक ती ग्रंथसंपदा व संदर्भ साधने उपलब्ध करून दिली त्याबद्दल त्यांच्या ऋणी आहे.

सदर संशोधनात प्रमाणिकपणे आपले योगदान देणारे कनिष्ठ प्रकल्प सहाय्यक अविनाश गोपनारायण त्यांचे मनापासून आभार मानतो.

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परीषद महाराष्ट्र, पुणे चे सचालक, सहसंचालक, उपसंचालक, सर्व विभागप्रमुख यांनी संशोधन कार्यात मोलाचे मार्गदर्शन केले आहे. तसेच मला नैतिक पाठबळ दिले असे माझे प्रेरणास्फूर्त कुटुंबिय यांचे संशोधन करण्यासाठी पाठबळ, प्रेरणा व प्रोत्साहन सर्वतोपरी लाभलेले आहे. यांचे आभार मानण्यापेक्षा मी त्यांच्या आयुष्यभर ऋणातच राहू इच्छितो.

क्षेत्रीय शिक्षा संस्थान, भोपाळ येथील सर्व विभागातील शिक्षक, प्रशासन अधिकारी श्री. महेश आसुदानी व शिक्षकेतर कर्मचारी, त्यांचे ऋण माझ्या अंत:करणात सदैव राहिल.

शेवटी अनावधानाने काहींचेनामोल्लेख राहिले असल्यास क्षमस्व! त्यांचे ऋण माझ्या अंत:करणात आहे. वरील सर्व वरिष्ठ गुरूजन, कुटुंबीय व मित्रांच्या सहकार्यामुळे मी हे संशोधन कार्य पुर्ण करू शकलो, त्या सर्वांचे पुनश: ऋण व्यक्त करून त्या सर्वांना धन्यवाद देतो.

डॉ. व्यंकट बाबूराव सूर्यवंशी

भूमिका

शिक्षणाचे ध्येय विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आहे. भाषा हे कला आणि सर्जनशीलतेचे एक उत्कृष्ट माध्यम आहे. साहित्य हे केवळ विद्यार्थ्यांचे जीवन, कला आणि सर्जनशीलतेबरोबरच चांगले शिक्षण कौशल्य विकसित करण्यास देखील सक्षम करते. भारतीय ज्ञान परंपरा ही भारतीय संस्कृतीची आणि विचारसंपत्तीची समृद्ध परंपरा आहे. वेद, उपनिषदे, बौद्ध-जैन वाङ्मय, संत साहित्य आणि विविध तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून भारताने जगाला ज्ञान, नैतिक मूल्ये आणि जीवनदृष्टी दिली आहे. या ज्ञानपरंपरेचे जतन आणि प्रसार करण्यामध्ये मराठी भाषेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. संत साहित्य, भक्ती चळवळ, लोकपरंपरा आणि ग्रंथरचना यांमधून मराठीने भारतीय ज्ञान परंपरेतील तत्त्वज्ञान, नैतिक मूल्ये आणि अध्यात्मिक विचार लोकभाषेत मांडले. भारतीय ज्ञान परंपरा ही समृद्ध परंपरा आहे या परंपरेतील विचार मूल्य आणि ज्ञान समाजापर्यंत पोहोचविणे ही या संशोधनाची महत्त्वाची भूमिका आहे. वाचन आणि लेखन कौशल्यांचा विकास, भावनिक, व्यक्तिमत्त्व विकास, विवेक आणि भावनिक अभिव्यक्तीला योग्य दिशा आणि दृष्टी देण्याचे काम साहित्यातून मिळते. भारतीय शिक्षणपद्धतीने जीवनातील नैतिक, भौतिक, आध्यात्मिक आणि बौद्धिक मूल्यांवर लक्ष केंद्रित केले असून. ग्रंथार्जनासोबतच शारीरिक श्रमांचे महत्त्व भारतीय ज्ञानपरंपरेतून अधोरेखित होते.

अभिजात मराठी भाषेच्या अभ्यासामुळे भारतीय सांस्कृतिक वारसा, परंपरा, जीवनमूल्ये आणि तत्त्वज्ञान यांचे सखोल आकलन होते. या अभ्यासातून भाषा समृद्धी, सांस्कृतिक जतन आणि ज्ञानपरंपरेचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे शक्य होते. त्यामुळे भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात अभिजात मराठी भाषेचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. अभिजात मराठी भाषेचा अभ्यास केल्यास संत ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ इ. संतांच्या साहित्यातून भारतीय तत्त्वज्ञान, अध्यात्म, नैतिकता आणि समाजप्रबोधन यांचे दर्शन घडते. अभंग, ओवी, भारूड,गवळण, भूपाळी, श्लोक या साहित्यप्रकारांमधून भारतीय ज्ञान परंपरेतील तत्वे सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचली. त्यामुळे मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून भारतीय ज्ञानपरंपरेचे संवर्धन व प्रसार करणारे प्रभावी माध्यम ठरली. अभिजात मराठी भाषा, साहित्य संस्कृती, लोककला, संत साहित्य, स्थानिक बोली, मातृभाषा, बहुभाषिकता, भारतीय भाषा, भारतीय अभिजात भाषेला प्राधान्य देण्यावर भर देण्यात आला आहे. (राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०)

भारतीय ज्ञान परंपरेची उद्दीष्टामध्ये भारतीय ज्ञानाचा, स्थानीय ज्ञानाचा प्रचार, बहु-आयामी ज्ञानाचा विकास, संशोधनाना चालना, व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे, स्वतःला ओळखणे, स्वीकारणे आणि सुधारणे हाच खरा व्यक्तिमत्त्व विकास होय. पंचकोश विकास भारतीय परंपरेतील योजना या परंपरेतील विचार, मूल्ये आणि ज्ञान समाजापर्यंत पोहोचविण्यामध्ये मराठी भाषेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

वारकरी संप्रदायाच्या संतानी अभंग साहित्याची रचना आपल्या मराठी मातृभाषा तसेच सामान्य माणसाच्या बोलीभाषेतून विकसित केली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० (४:११) मध्ये मातृभाषा किंवा स्थानिक भाषेद्वारे ज्ञान संपादन करण्याची कल्पना आहे. संतांनी सामाजिक भाषेत आपले काम केले आहे. वारकरी संप्रदायाने सामाजिक अभिमुखता स्वीकारली होती. भारतीय ज्ञानपरंपरेत मराठी भाषेला महत्त्वाचे स्थान आहे. आपल्या मातृभाषेचा अभिमान व्यक्त करताना संत ज्ञानेश्वर म्हणतात,

"माझा मराठीची बोलू कौतुके ।
परी अमृतातेही पैजा जिंके।

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाने आपल्याला परंपरा आणि रीतिरिवाजांच्या बंधनातून मुक्त करून ज्ञानाचा मार्ग दाखवण्याचे काम केले आहे. म्हणूनच, भारतीय ज्ञान परंपरेत मराठी भाषेची भूमिका यशस्वी झाली

आहे. (NEP-४.१७)

महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात मध्ययुगीन काळातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थिती, भारतीय ज्ञान परंपरेतील चळवळ, तत्वज्ञान मराठी भाषेतून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत गाडगोबाबा, संत तुकडोजी महाराज व इतरा संतानी मांडले आहे. मराठी संत नामदेवांचे हिंदी आणि मराठी अभंग (बहुभाषिकता) (NEP-१.११) व महानुभाव पंथ आणि पंडित पंथात मराठी भाषेचे योगदानाचा अभ्यास करणे महत्त्वाचा हे. भारतीय ज्ञान परंपरेतील प्रमुख मराठी भाषिक व्यक्तींचे विचार, ज्ञान मिळवणे, नैतिक मूल्यांचा विस्तार करून जागतिक मूल्यांची निर्मिती, जीवनाच्या तत्वज्ञानाचा विकास, नवीन पिढीला पारंपारिक विधी, संस्कृती, तत्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र यांची जाणीव करून देण, दृष्टिकोन आणि मूल्ये यांचा अभ्यास गरजेचा वाटतो.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये भारतीय ज्ञान परंपरा आणि भारतीय भाषा, मातृभाषा व बोलीभाषेला महत्त्व देण्यात आले आहे.मराठी संतांनी साहित्य मराठी भाषेत लिहिल्यामुळे मराठी टिकून आणि विकसित होत राहिली. संत नामदेव हे उत्तर भारतातील संत परंपरेचे प्रवर्तक होते. मराठी भाषिक संतांनी त्यांच्या लेखनातून मानवता, पर्यावरण, सार्वजनिक शिक्षण, सामाजिक जाणीव, मानवी मन, अंधश्रद्धा, पारंपारिक चालीरीती, एकता, समता, लोकशाही, समानता, जात निर्मूलन, स्थानिक भाषेचा गौरव, ज्ञान, भक्ती, चळवळ, उत्सव, कला, जनजागृती, स्त्री-पुरुष समानता, आक्रमणाला विरोध, परोपकार, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जीवन, तत्वज्ञान, कुटुंब व्यवस्था, दिनचर्या, तत्वज्ञान, धर्म, सांस्कृतिक जीवन, सामाजिक विचारसरणी, नैतिक मूल्यांचे शिक्षण हे आजच्या काळात महत्त्वाचे आहे. (NEP-४.२७)

विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणात भारतीय ज्ञान परंपरा समाविष्ट करून त्यांना सांस्कृतिक वारसा समजून घेण्याची आणि जतन करण्याची संधी प्रदान करेल. जे भविष्यात संपूर्ण देशाला प्रेरणा देऊ शकेल आणि विकसित भारत होण्यास मदत होईल.

डॉ. व्यंकट बाबूराव सूर्यवंशी
सहायक प्राध्यापक, मराठी
सामाजिक विज्ञान एवं मानविकी शिक्षा विभाग
क्षेत्रीय शिक्षा संस्थान, भोपाळ

अनुक्रमणिका

प्रकरण	तपशील		पृष्ठ क्र.
पहिले		**भूमिका**	**१-२८**
		प्रास्ताविक	
१.१		राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०	
१.२		राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व भारतीय ज्ञान परंपरा	
१.३		पंचकोश विकास भारतीय परंपरेतील योजना	
	१.३.१	शारीरिक विकास व प्राणिक विकास	
	१.३.२	मानसिक विकास	
	१.३.३	बौद्धिक विकास	
	१.३.४	अध्यात्मिक विकास	
१.४		नेतृत्वगुणांचा विकास	
	१.४.१	स्वतःवर नियंत्रण	
	१.४.२	आत्मविश्वास	
	१.४.३	दूरदृष्टी व ध्येय स्पष्टता	
	१.४.४	नैतिक मुल्ये व प्रामाणिकपणा	
	१.४.५	संवादकौशल्य	
	१.४.६	निर्णयक्षमता	
	१.४.७	सद्भावना	
	१.४.८	सहकार्य	
	१.४.९	समस्या सोडवण्याची क्षमता	
	१.४.१०	स्व-अनुशासन व सातत्य	
१.५		राष्ट्रीय अभ्यासक्रमा आराखडा	
	१.५.१	राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण	
	१.५.२	राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा आणि भारतीय शिक्षणाचा दृष्टिकोन	
१.६		संशोधन विषय	
१.७		संशोधन विषयाच्या कार्यात्मक व्याख्या	
१.८		संशोधनाची उद्दिष्टे	

१.९		संशोधन पूर्वाभ्यास व संबंधित साहित्याचे समालोचन	
१.१०		संशोधनाची व्याप्ती	
१.११		संशोधनाची मर्यादा	
१.१२		संशोधन अभ्यासाची गरज	
१.१३		संशोधनाच्या पद्धती	
१.१४		संशोधनासाठी वापरलेले साधने	
	१.१४.१	शिलालेख	
	१.१४.२	ताम्रपट	
	१.१४.३	दुर्मिळ संदर्भ ग्रंथ	
	१.१४.४	वस्तुसंग्रहालय	
	१.१४.५	ग्रंथालय	
	१.१४.६	क्षेत्रभेट	
१.१५		समारोप	
		संदर्भ	
दुसरे		**भारतीय ज्ञान परंपरा संकल्पना, स्वरूप व वाटचाल**	**२९ - ११०**
		प्रास्ताविक	
२.१		संकल्पना	
२.२		भारतीय ज्ञान परंपरेची गरज	
२.३		भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्व	
२.४		भारतीय ज्ञान परंपरेचे स्वरूप	
२.५		वेद	
२.६		उपवेद	
	२.६.१	आयुर्वेद	
	२.६.२	धनुर्वेद	
	२.६.३	गंधर्ववेद	
	२.६.४	शिल्पवेद	
२.७		दर्शनशास्त्र	
	२.७.१	आस्तिक दर्शन	
	२.७.२	नास्तिक दर्शन	
२.८		उपनिषद	
२.९		पुराणे	

२.१०		नैसर्गिक	
२.११		प्राचीन भारतातील कला, साहित्य, शास्त्र व तंत्रज्ञान	
	२.११.१	नाट्यशास्त्र	
	२.११.२	सौंदर्यशास्त्र	
	२.११.३	वास्तुशास्त्र	
	२.११.४	वैद्यकशास्त्र	
	२.११.५	गणित	
२.१२		भारतीय तत्वज्ञानाची वैशिष्ट्ये	
२.१३		भारतीय आणि महाराष्ट्रीय संकल्पना व परंपरा	
२.१४		भारतीय संस्कृतीचा संबोध	
२.१५		भारतीय ज्ञान परंपरेत मराठीचा वाटा	
	२.१५.१	संतांची तीर्थस्थळे आश्रम आणि पाठशाळा व शिक्षण संस्था	
	२.१५.२	गुरु-शिष्य परंपरेचे मुख्य पैलू	
	२.१५.३	गुरू आणि आचार्य	
	२.१५.४	गुरू आणि शिक्षक	
	२.१५.५	धर्मशास्त्र म्हणजे काय	
	२.१५.६	तर्कशास्त्र वादविद्येचा गाभा	
	२.१५.७	पाखंडी विचारप्रणाली	
	२.१५.८	विचारस्वातंत्र्य कायम राहिले	
२.१६		समारोप	
		संदर्भ ग्रंथ	
तिसरे		**अभिजात भाषा: संकल्पना, स्वरूप व वाटचाल**	**१११ ते १७६**
		प्रास्ताविक	
३.१		अभिजात मराठीचे आद्यस्रोत	
३.२		भाषा: व्याख्या, संकल्पना व व्याप्ती	
	३.२.१	भाषा शास्त्रीय अभ्यासाची बैठक	
	३.२.२	बोलीभाषा विज्ञान	
	३.२.३	स्थानिक भाषा	
	३.२.४	मातृभाषा	
	३.२.५	अभिजात भाषा	

३.३		अकरा कोटी लोकांची मराठी	
३.४		भारतीय अभिजात भाषा	
३.५		मराठी भाषेची जडणघडण	
	३.५.१	मराठी भाषेची उत्पत्ती विविध मतप्रवाह	
३.६		अभिजात भाषेचे निकष	
३.७		अभिजात मराठीची वाटचाल	
३.८		बृहन्महाराष्ट्रातील मराठीचे प्राचीन संदर्भ	
३.९		भाषा शिक्षण आणि अनुदेशन पद्धती	
	३.९.१	बहुभाषिकता	
	३.९.२	संवादक्षमता	
	३.९.३	सर्जनशीलता	
	३.९.४	तार्किक युक्तिवाद कौशल्य	
३.१०		समारोप	
		संदर्भ ग्रंथ	
चौथे		**भारतीय ज्ञान परंपरा आणि मराठी लोकसाहित्य**	**१७७ ते २४६**
		प्रास्ताविक	
४.१		लोकसाहित्याची संकल्पना	
४.२		लोकसाहित्याच्या व्याख्या	
४.३		लोकसाहित्याचे स्वरूप	
४.४		लोकसाहित्याची व्याप्ती	
	४.४.१	मौखिक आविष्कार	
	४.४.२	भौतिक संस्कृती	
	४.४.३	लोकरूढी, परंपरा, समजुती, विधी इत्यादी	
	४.४.४	प्रयोगसिद्ध लोककला	
४.५		लोकसाहित्याची लक्षणे	
४.६		लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्व	
४.७		मराठी लोकसाहित्यातील लोककला	
४.८		लोककला	
४.९		लोककलांची वैशिष्ट्ये	
४.१०		निवडक लोककला	
	४.१०.१	कीर्तन	
	४.१०.२	लळित	

	४.१०.३	तमाशा	
	४.१०.४	पोवाडा	
	४.१०.५	दशावतार	
	४.१०.६	गोंधळ	
	४.१०.७	लंगर विधी	
	४.१०.८	लावणी	
	४.१०.९	जात्यावरील गाणी	
	४.१०.१०	पोतराज आणि कडकलक्ष्मी	
	४.१०.११	वासुदेव	
	४.१०.१२	भारूड	
	४.१०.१३	कळसुत्री बाहुल्या	
	४.१०.१४	बहुरूपी	
	४.१०.१५	गजगिते	
४.११		लोकगीते	
	४.११.१	अभंग	
	४.११.२	भजन	
	४.११.३	पोवाडा	
	४.११.४	लावणी	
	४.११.५	भावगीते	
	४.११.६	भारूड	
	४.११.७	दिंडी गीते	
	४.११.८	लग्नगीते	
	४.११.९	नागपंचमीची गाणी	
	४.११.१०	गौराईची गाणी	
	४.११.११	भोंडला	
४.१२		लोककथा	
४.१३		लोकनृत्ये	
४.१४		वाक्प्रचार	
४.१५		म्हणी	
४.१६		उखाणे	
४.१७		हुमान	
४.१८		समारोप	
		संदर्भ ग्रंथ	

पाचवे		**भारतीय ज्ञान परंपरा आणि प्राचीन व मध्ययुगीन साहित्य**	**२४७ ते ३१८**
		प्रास्ताविक	
५.१		प्राचीन भारतीय ज्ञान स्त्रोतांचा परिचय	
	५.१.१	वेद	
	५.१.२	उपनिषद	
	५.१.३	महाकाव्य	
	५.१.४	पौरणिक वाङ्मय	
	५.१.५	बौद्ध वाङ्मय	
	५.१.६	जैन वाङ्मय	
	५.१.७	अन्य भारतीय भाषेतील अभिजात साहित्य	
५.२		भारतीय ज्ञान परंपरा आणि मध्ययुगीन मराठी साहित्य	
	५.२.१	भारतीय ज्ञान परंपरेची संकल्पना	
	५.२.२	बिजकथा	
	५.२.३	आदिबंध	
	५.२.४	कथा	
	५.२.५	गोष्ट	
	५.२.६	कायनी (कोडे)	
५.३		महानुभव साहित्य	
	५.३.१	लिप्यांचा विकास	
	५.३.२	लिळाचरित्र	
	५.३.३	महानुभावीय इतर वाङ्मयीन ग्रंथ	
५.४		संत साहित्य	
	५.४.१	आख्यान काव्य	
	५.४.२	ओवी	
	५.४.३	अभंग	
	५.४.४	भारुड	
५.५		पंडिती साहित्य	
५.६		शाहिरी वाङ्मय	
	५.६.१	लावणी	
	५.६.२	पोवाडा	
	५.६.३	बखर गद्य	

५.७		समारोप	
		संदर्भ ग्रंथ	
सहावे		**भारतीय ज्ञान परंपरा आणि आधुनिक मराठी साहित्य**	**३१९ ते ३४८**
		प्रास्ताविक	
६.१		भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्व	
६.२		भारतीय ज्ञान परंपरेची वैशिष्ट्ये	
६.३		भारतीय प्राचीन वेद	
६.४		भारतीय ज्ञान परंपरेतील बृहतकथांचे महत्त्व	
६.५		भारतीय ज्ञान परंपरेतील स्थान	
	६.५.१	कथा सरीत्सागर	
	६.५.२	वेदोक्त कथा	
	६.५.३	पंचतंत्र	
	६.५.४	वेताळ पंचविशी	
६.६		आधुनिक संदर्भात भारतीय ज्ञान परंपरेची भूमिका	
	६.६.१	भारतीय ज्ञान परंपरा	
	६.६.२	आधुनिक मराठी निबंध	
	६.६.३	आधुनिक मराठी कविता	
	६.६.४	आधुनिक मराठी कथा	
	६.६.५	आधुनिक मराठी नाटक	
	६.६.६	आधुनिक मराठी कादंबरी	
६.७		साठोत्तरी साहित्य प्रवाह	
६.८		समारोप	
		संदर्भ	
सातवे		**उपसंहार**	**३४९ ते ३६२**
७.१		निष्कर्ष	
७.२		शिफारशी	
७.३		पुढील संशोधनासाठी दिशा	
		संदर्भग्रंथ सूची	
		नियतकालिक	

		संकेतस्थळ	
		परिशिष्ट्ये	**३६३ ते ३९६**
		परिशिष्ट- १ शिलालेख	
		परिशिष्ट- २ कार्यशाळा अहवाल	
		परिशिष्ट- ३ विषय तज्ञ	
		परिशिष्ट- ४ छायाचित्र	

प्रकरण -१

भूमिका

प्रास्ताविक

१.१ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

१.२ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व भारतीय ज्ञान परंपरा

१.३ पंचकोश विकास भारतीय परंपरेतील योजना

- १.३.१ शारीरिक विकास व प्राणिक विकास
- १.३.२ मानसिक विकास
- १.३.३ बौद्धिक विकास
- १.३.४ अध्यात्मिक विकास

१.४ नेतृत्वगुणांचा विकास

- १.४.१ स्वतःवर नियंत्रण
- १.४.२ आत्मविश्वास
- १.४.३ दूरदृष्टी व ध्येय स्पष्टता
- १.४.४ नैतिक मूल्ये व प्रामाणिकपणा
- १.४.५ संवादकौशल्य
- १.४.६ निर्णयक्षमता
- १.४.७ सद्भावना
- १.४.८ सहकार्य
- १.४.९ समस्या सोडवण्याची क्षमता
- १.४.१० स्व-अनुशासन व सातत्य

१.५ राष्ट्रीय अभ्यासक्रमा आराखडा

- १.५.१ राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण
- १.५.२ राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा आणि भारतीय शिक्षणाचा दृष्टिकोन

१.६ संशोधन विषय

१.७ संशोधन विषयाच्या कार्यात्मक व्याख्या

१.८ संशोधनाची उद्दिष्टे

१.९ संशोधन पूर्वाभ्यास व संबंधित साहित्याचे समालोचन

१.१० संशोधनाची व्याप्ती
१.११ संशोधनाची मर्यादा
१.१२ संशोधन अभ्यासाची गरज
१.१३ संशोधन पद्धती
१.१४ संशोधनासाठी वापरलेली साधने
१.१४.१ शिलालेख
१.१४.२ ताम्रपट
१.१४.३ दुर्मिळ संदर्भ ग्रंथ
१.१४.४ वस्तुसंग्रहालय
१.१४.५ ग्रंथालय
१.१४.६ क्षेत्रभेट
१.१५ समारोप
संदर्भ

प्रकरण १

भूमिका

प्रास्ताविक

भारतीय ज्ञान परंपरा ही हजारो वर्षांची समृद्ध परंपरा आहे. भारतीय ज्ञानपरंपरा केवळ बौद्धिक विकासापुरती मर्यादित नसून जीवनाकडे समग्र दृष्टिकोनाने पाहते. ही ज्ञानपरंपरा व्यक्तीच्या शारीरिक, भावनिक, आध्यात्मिक आणि नैतिक विकासावरही भर देते. ज्ञानाचा हेतू केवळ भौतिक सुखासाठी नसून चेतनेच्या उच्चतम अवस्थेपर्यंत पोहोचणे हा आहे. या ज्ञान परंपरेत शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक स्वास्थ्य यांचा एकत्रित विचार केला जातो. गुरुकुल पद्धतीत शैक्षणिक ज्ञानाबरोबरच व्यावहारिक कौशल्ये, नैतिक मूल्ये आणि आध्यात्मिक जागरूकता शिकत असत. शिक्षणात पुरुषार्थ (धर्म, अर्थ, काम, मोक्ष) आणि सामाजिक जबाबदारी यांना महत्त्व दिले गेल्यामुळे व्यक्ती समाजाशी सुसंगत आणि नैतिकदृष्ट्या प्रबुद्ध बनत असे. विद्यार्थ्यांना सत्य, अहिंसा, करुणा आणि विश्वातील त्यांचे स्थान यांचा शोध घेण्यास प्रोत्साहित केले जाई. 'सर्वे भवन्तु सुखिनः' ही संकल्पना या प्रणालीचा गाभा आहे.

प्राचीन काळी गुरूंना सर्वश्रेष्ठ समजले जात असे. विद्यार्थी हा गुरु जवळ जाऊन ज्ञानग्रहण करत असे. गुरु हा सर्वगुण संपन्न राहत असे. गुरुकडूनही निस्वार्थ त्याग व सर्वज्ञानी असण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आलेली आहे. भारतीय शिक्षण व्यवस्थेचे जगभरात जे स्थान प्राचीन काळात होते, तेच मिळवण्यासाठी नवे शैक्षणिक धोरण प्रयत्नशील आहे. प्राचीन काळापासूनच भारतीय शिक्षण पद्धतीने जीवनातील नैतिक, भौतिक, आध्यात्मिक आणि बौद्धिक इत्यादी मूल्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. ज्ञानासोबतच शारीरिक श्रमाचे महत्त्व भारतीय ज्ञान परंपरेतून अधोरेखित केलेले दिसत आहे.

भारतात अनेक जगप्रसिद्ध विद्यापीठे होती. त्यात तक्षशीला, नालंदा, विक्रमशीला, वल्लभी व पुष्यगीरी विद्यापीठ महत्त्वपुर्ण आहेत. या विद्यापीठामध्ये आयुर्वेद, दर्शनशास्त्र, गणित, वेद, संस्कृत, साहित्य इत्यादी विषय वैज्ञानिक पद्धतीनुसार अभ्यासले गेले. हे विद्यापीठे तत्वज्ञान, योग, आयुर्वेद व विज्ञानाची प्रयोगशाळा म्हणून ही केंद्रे प्रसिद्ध झाली. भारताने जगाला अध्यात्मिक ज्ञान, योग आणि आयुर्वेदाचे ज्ञान दिले आहे. ज्याचे अनुकरण आजही जगात दिसत आहे.

प्राचीन काळी आपल्याकडे तक्षशिला, नालंदा, विक्रमशिला यासारखी विश्वविद्यालये होती. इ. स. ४५० मध्ये गुप्त राजवंशातील कुमारगुप्त यांनी स्थापन केलेले नालंदा विद्यापीठ हे आंतरराष्ट्रीय शिक्षण केंद्र होते. प्राचीन भारताच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक समृद्धीचे ते गौरवशाली प्रतीक आहे. येथे कोरिया, जपान, चीन आणि तिबेट यांसारख्या अनेक देशांतील विद्यार्थी ज्ञानार्जनासाठी येथे येत असत. या विद्यापीठातून धर्म, तत्त्वज्ञान, व्याकरण, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र यांसारख्या विविध विषयांचे शिक्षण दिले जात होते. प्राचीन शिक्षण ज्ञान परंपरा आणि प्रथा या मानवतेला पोषक होत्या. भारतातील तक्षशिला, नालंदा, विक्रमशीला, इत्यादी ठिकाणी शिक्षण आणि संशोधन करण्यासाठीची जगप्रसिद्ध केंद्र सुद्धा होती. या विद्यापीठाने जगाला ज्ञानाची जी देणगी दिली, ती आजही प्रेरणा देत आहे.

प्राचीन काळी अध्यापन मुख्यतः मौखिक असायचे विद्यार्थी वर्गात शिकवले जाणारे विषय लक्षात ठेवत. या अध्यापनातून नम्रता, सत्यता, शिस्त, स्वालंबन आणि सर्वांसाठी आदर इत्यादी मूल्ये पाळले जायचे. ह्या मूल्यांचे अधिष्ठान भारतीय ज्ञान परंपरेला आहे. मानव, प्राणी आणि निसर्ग यांच्यातील समतोल राखण्यासाठी भारतीय ज्ञान परंपरा विद्यार्थ्यांना शिकवणे आत्ताच्या काळामध्ये आवश्यक आहे.

१.१ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२०

लहान मुलांना मातृभाषेत संकल्पना लवकर समजतात. घरातील भाषा आणि मातृभाषा बऱ्याचदा एकच असते किंवा ती स्थानिक समुदायात बोलली जाणारी भाषा असते. पण कधीकधी अनेक भाषा बोलणाऱ्या घरांमध्ये, कुटुंबातील इतर सदस्यांकडून बोलली जाणारी भाषा मातृभाषा किंवा स्थानिक भाषेपेक्षा वेगळी असू शकते.

"किमान ५ वी ते ८ वी पर्यंत शिक्षणाचे माध्यम मातृभाषा / स्थानिक भाषा/ प्रादेशिक भाषा असले पाहिजे. त्यानंतर जिथे शक्य आहे तिथे घरातील / स्थानिक भाषा एक भाषा म्हणून शिकवली जाणे सुरू राहील. या गोष्टीचे पालन सरकारी आणि खाजगी दोन्ही प्रकारच्या शाळा करतील. विज्ञानासहित सर्व विषयांची उच्च-दर्जाची पाठ्यपुस्तके मातृभाषेत उपलब्ध करून दिली जातील. बालकाकडून बोलली जाणारी यात काही तफावत असेल तर ती लवकरात लवकर भरून काढली जाईल, हे सुनिश्चित करण्यासाठी सुरुवातीलाच सर्व प्रयत्न केले जातील.

मातृभाषेत पाठ्यपुस्तके उपलब्ध नसतील तरीसुद्धा शिक्षक / विद्यार्थी यांच्यातील संवादाची भाषा जिथे शक्य आहे तिथे मातृभाषाच असेल. ज्या मुलांची घरातील भाषा आणि शिक्षणाचे माध्यम वेगवेगळे आहे, त्यांच्यासाठी द्विभाषीय अध्यापन-अध्ययन सामग्रीसह शिक्षकांना द्विभाषा पद्धती वापरण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. सर्व विद्यार्थ्यांना सर्व भाषा उत्तम प्रतीने शिकवल्या जातील. एखादी भाषा शिकवण्यासाठी आणि शिकण्यासाठी ती शिक्षणाचे माध्यम असणे आवश्यक नाही.

संशोधनाने स्पष्टपणे दर्शवले असुन त्याप्रमाणे २ ते ८ वर्षे या वयात मुले भाषा अतिशय लवकर शिकतात आणि या बहुभाषिकत्वाचा लहान मुलांना आकलनासाठी खूपच फायदा होतो. पायाभूत पायरीपासूनच मुलांना सुरुवातीलाच विविध भाषांची ओळख करून दिली जाईल. सर्व भाषा आनंददायक व परस्परसंवादी पद्धतीने शिकवल्या जातील. सुरुवातीच्या वर्षात मातृभाषेचे वाचन व पुढे लेखन शिकवले जाईल. वाचन तसेच लेखन कौशल्य विकसित झाल्यावर इयत्ता ३ री पासून पुढे इतर भाषांचे लेखन व वाचन शिकवले जाईल. विविध भाषा शिकवण्यासाठी आणि भाषा शिक्षण लोकप्रिय करण्यासाठी तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जाईल.

घटनेतील तरतुदी, लोकांच्या, प्रदेशांच्या आणि केंद्र सरकारच्या आकांक्षा, आणि बहुभाषावाद तसेच राष्ट्रीय एकात्मकतेला प्रोत्साहन देण्याची गरज या गोष्टी लक्षात घेऊन त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी करणे सुरूच राहील. मात्र, त्रिभाषा सूत्रात जास्त लवचिकता असेल आणि कोणत्याही राज्यावर कोणतीही भाषा लादली जाणार नाही. मुले ज्या तीन भाषा शिकणार आहेत त्यापैकी किमान दोन भाषा भारतीय असतील तर या भाषांची निवड राज्ये, प्रदेश आणि अर्थातच विद्यार्थी स्वतः करू शकतील. विशेषतः, ज्या विद्यार्थ्यांना ते शिकत असलेल्या तीन भाषांपैकी एक किंवा अधिक भाषा बदलायच्या असतील तर तसे इयत्ता ६ वी किंवा ७ वी मध्ये करता येईल. मात्र त्यासाठी त्यांना माध्यमिक शाळेच्या शेवटी या तीन भाषांमध्ये (एका भारतीय भाषेत साहित्यिक पातळीच्या प्राविण्यासह) मूलभूत प्राविण्य दाखवावे लागेल.

मानवाला आपल्या पूर्ण क्षमता वापरता येण्यासाठी, समान आणि न्याय समाज विकसित करण्यासाठी तसेच राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी शिक्षण हा पाया आहे. भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीसाठी आणि आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि समानता, शास्त्रीय प्रगती,

राष्ट्रीय एकात्मता आणि संस्कृतीचे जतन या क्षेत्रांमध्ये वैश्विक पातळीवर नेतृत्व करण्यासाठी सर्वांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. व्यक्ती, समाज, देश आणि जगाच्या हितासाठी आपल्या देशातील समृद्ध प्रतिभा आणि संसाधनांचा पुरेपूर वापर करण्याकरता उच्च दर्जाचे सार्वभौमिक शिक्षण हा भविष्यासाठी सर्वांत चांगला मार्ग आहे.

भारत विषयक ज्ञान" या विषयामध्ये प्राचीन भारताची माहिती आणि आधुनिक भारत उभारण्यात प्राचीन भारताचे योगदान, त्याचे यश आणि त्याच्यासमोरील आव्हाने याबरोबरच शिक्षण, आरोग्य, पर्यावरण इत्यादींशी संबंधित भारताच्या भविष्यातील अपेक्षांची स्पष्ट जाण हे समाविष्ट असेल. या घटकांचा शाळेच्या संपूर्ण अभ्यासक्रमात प्रसंगोचित ठिकाणी, अचूक आणि वैज्ञानिक पध्दतीने समावेश केला जाईल. विशेषतः आदिवासींची माहिती आणि स्थानिक व पारंपरिक शिकवण्याच्या पध्दतींसह भारतीय ज्ञान प्रणालीचे शिक्षण दिले जाईल.

त्याचा समावेश गणित, खगोलशास्त्र, तत्त्वज्ञान, योग, वास्तुशास्त्र, वैद्यकशास्त्र, शेती, इंजिनिअरिंग, भाषाशास्त्र, साहित्य, क्रीडा, खेळ याबरोबरच शासन, राज्यव्यवस्था, संवर्धन यासारख्या विषयांमध्ये केला जाईल. आदिवासींच्या वांशिक-वैद्यकीय प्रथा, वन व्यवस्थापन, पारंपरिक (सेंद्रिय) शेती, नैसर्गिक शेती इ. साठी विशेष अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जातील. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी, भारतीय ज्ञान परंपरेवर एक अभ्यासक्रमदेखील ऐच्छिक विषय म्हणून उपलब्ध करून दिला जाईल. स्थानिक खेळ आणि मौजमजेच्या माध्यमातून विविध विषय शिकण्याकरता शाळांमधून स्पर्धा घेतल्या जातील.

"जे योग्य आहे ते करण्याचे" महत्त्व विद्यार्थ्यांना लहानपणीच शिकवले जाईल आणि नैतिक निर्णय घेण्यासाठी त्यांना एक तार्किक चौकट उपलब्ध करून दिली जाईल. पुढील वर्षांमध्ये, या चौकटीचा विस्तार करून त्यामध्ये फसवणूक, हिंसाचार, वाद्ययचौर्य, कचरा करणे, सहिष्णुता, समानता, सहानुभूती यासारख्या विषयांचा समावेश केला जाईल. आपले आयुष्य जगताना नैतिक मूल्यांचा स्वीकार करणे तसेच एखाद्या नैतिक मुद्यावर वेगवेगळ्या दृष्टिकोनातून विचार करून आपली भूमिका/युक्तिवाद तयार करणे आणि सर्व कामांमध्ये नैतिक पध्दतींचा अवलंब करणे, या सर्वांसाठी मुलांना सक्षम बनवणे हा यामागचा उद्देश आहे.

अशा प्रकारच्या मूलभूत नैतिक युक्तिवादाचा परिणाम म्हणजे सर्व विद्यार्थ्यांमध्ये भारतीय पारंपरिक मूल्ये आणि सर्व मूलभूत मानवीय व घटनात्मक मूल्ये (उदा. सेवा, अहिंसा, स्वच्छता, सत्य, निष्काम कर्म, शांती, त्याग, सहिष्णुता, विविधता, बहुसत्तावाद, नैतिक आचरण, लैंगिक संवेदनशीलता, वडीलधाऱ्यांचा आदर करणे, लोकांची पार्श्वभूमी कोणतीही असली तरीही त्यांचा आणि त्यांच्यातील अंगभूत क्षमतेचा आदर करणे, पर्यावरणाचा आदर करणे, मदत करणे, शिष्टाचार, सहनशीलता, क्षमाशीलता, सहानुभूती, करूणा, देशभक्ती, लोकतांत्रिक दृष्टिकोन, अखंडता, जबाबदारी, न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्व) विकसित केली जातील. पंचतंत्र, जातककथा, हितोपदेश यामधील मूळ गोष्टी, इतर मजेदार दंतकथा तसेच भारतीय परंपरेतील प्रेरणादायी गोष्टी वाचण्याची आणि त्यातून शिकण्याची संधी मुलांना मिळेल आणि जागतिक साहित्यावर या गोष्टींचा पडलेला प्रभावदेखील मुलांना जाणून घेता येईल."[१]

१.२ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व भारतीय ज्ञान परंपरा

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भारतीय ज्ञान परंपरेचे उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

- **भारतीय ज्ञानाचा समावेश :-** विद्यार्थ्यांच्या शिक्षणात भारतीय ज्ञान परंपरा, शास्त्र कला आणि संस्कृती यांचा समावेश करणे, जेपीकरून त्यांना आपल्या देशाच्या समृद्ध सांस्कृतिक वारश्याची ओळख होईल.
- **स्थानीय ज्ञानाचा प्रचार :-** भारतीय ज्ञान प्रणालीद्वारे स्थानिक जान, कौशल्ये, आणि कला यांना प्रोत्साहन देणे, आणि त्यांचा प्रभावी वापर करून समाजालीन विविध क्षेत्रांमध्ये सुधारणा करणे.
- **बहु-आयामी ज्ञानाचा विकास :-** भारतीय ज्ञान प्रणालीचा उपयोग करुन विद्यार्थ्यांना बहु-आयामी दृष्टिकोन प्रदान करणे ज्यामुळे ते विविध शास्त्रीय, तांत्रिक, आणि कलात्मक क्षेत्रांमध्ये पारंगत होऊ शकतील.
- **संशोधनाना चालना देणे :-** भारतीय ज्ञान प्रणालीवर आधारित संशोधनकार्याला प्रोत्साहन देणे.


- **व्यक्तिमत्त्वाचा विकास**

व्यक्तिमत्त्वाचा विकास म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या विचार, वर्तन, भावना, दृष्टिकोन आणि कौशल्यांमध्ये सुधारणा करण्याची प्रक्रिया होय. ज्याद्वारे व्यक्ती स्वतःची क्षमता ओळखते, आव्हानांना सामोरे जाते आणि आयुष्यातील वैयक्तिक व व्यावसायिक यशासाठी तयार होते. व्यक्तिमत्त्व विकास हा केवळ बाह्य दृष्ट्या आकर्षक दिसण्याऐवजी आतून बदल घडवून आणण्याची प्रक्रिया आहे. हा प्रवास आयुष्यभर चालू असतो आणि प्रत्येक टप्प्यात नवीन शिक्षण मिळते. "व्यक्तिमत्त्व म्हणजे तुमची ओळख नाही, तर तुमची दृश्यमान प्रतिमा आहे." हे लक्षात ठेवून, सातत्याने स्वतःवर काम करणे गरजेचे आहे. स्वतःला ओळखणे, स्वीकारणे आणि सुधारणे हाच खरा व्यक्तिमत्त्व विकास होय."[२]

१.३ पंचकोश विकास भारतीय परंपरेतील योजना

"राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा- शालेय शिक्षण २०२३ मध्ये पंचकोष विकासावर सविस्तरपणे चर्चा करण्यात आलेली आहे. ती पुढालप्रमाणे देण्यात आलेली आहे.

पंचकोष विकास



"भारतीय परंपरेनुसार मानवाच्या विकासाच्या कल्पनेमध्ये पंचकोष विकास हा मैलाचा दगड ठरणारी विचारप्रक्रिया आहे. मूल हे पंचकोष म्हणजेच पाच आवरणे असलेले संपूर्ण अस्तित्व आहे.

ती पाच आवरणे म्हणजे अन्नमय कोष (शारीरिक आवरण), प्राणमय कोष (जीवनशक्ती ऊर्जा आवरण), मनोमय कोष (मनाचे आवरण) विज्ञानमय कोष (बौद्धिक आवरण) आणि आनंदमय कोष (आंतरिक स्व). प्रत्येक आवरण त्याचे भिन्न गुणधर्म दर्शविते. बालकाच्या समग्र विकासामध्ये या पाच आवरणांच्या संगोपनाचा व संवर्धनाचा विचार केला जातो.

या प्रत्येक कोषाच्या विकासासाठी विशिष्ट प्रकारच्या कृतींची योजना केली आहे. तरीही या कृतींची रचना करताना सर्व कोष एकमेकांशी संबंधित आहेत हे ध्यानात घेतले आहे आणि म्हणून मुख्यतः एका कोषावर केंद्रित होणाऱ्या कृतीद्वारे इतर कोषांचाही विकास होतो. उदा. योग्य वयामध्ये संतुलित आहार, पारंपरिक खेळ, पुरेसा व्यायाम आणि योगासनातून शारीरिक विकास होतो. याद्वारे स्थूल व सूक्ष्म या दोन्ही कारक कौशल्यांचाही विकास होतो. संपूर्ण शरीरासाठी आवश्यक असणारा ऑक्सिजनचा पुरवठा होईल अशा रीतीने श्वास घ्यायला शिकणे महत्त्वाचे आहे आणि त्यामुळे आवाज तर नियंत्रित होतोच शिवाय आत्मविश्वास निर्माण होऊन आत्मज्ञान येण्याकडे पावले टाकली जातात.

विविध प्रकारच्या गोष्टी, गाणी, अंगाईगीते, कविता, प्रार्थना यांमुळे मुलांचा सांस्कृतिकदृष्ट्या विकास होतो व त्यांच्यात मूल्ये रुजवली जातात. याचे भाषा विकासामध्ये जास्त योगदान मिळते. याची सुरुवात ऐकणे किंवा श्रवणाने तसेच लक्ष केंद्रित करणे व एकाग्रतेच्या क्षमतेने होते. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यामध्ये नमूद केलेल्या पंचकोषाची संकल्पना व कल्पनाशक्ती यांचे महत्त्व आहे.

१.३.१ शारीरिक विकास व प्राणिक विकास

वयानुरूप संतुलित शारीरिक विकास, शारीरिक तंदुरुस्ती, लवचिकता, मजबुती आणि सहनशीलता, इंद्रिय विकास, पोषण, स्वच्छता, वैयक्तिक आरोग्य, शारीरिक क्षमतांचा विस्तार हे सर्व मानवाला शंभर वर्षे आरोग्यमय जीवन जगता यावे यासाठी आवश्यक आहे. शरीर तसेच शरीरसौष्ठव सवयी, ऊर्जा संतुलन व रक्षण, सकारात्मक ऊर्जा व उत्साह, अनुकंपी व परानुकंपी चेतासंस्था कार्यान्वित करून महत्त्वाच्या सर्व संस्थांचे सुरळीत चालणारे कार्य (उदा. पचन, श्वसन, अभिसरण आणि चेतासंस्था) हे देखील महत्त्वाचे आहे. शारीरिक शिक्षण आणि आरोग्य यांचा अभ्यासक्रमात समावेश असणे हे या भूमिकेतूनच महत्त्वाचे आहे.

१.३.२ मानसिक विकास

एकाग्रता, शांती, इच्छा व इच्छाशक्ती, धैर्य, नकारात्मक भावनांना हाताळणे, मूल्यांचे वर्धन; कार्य, समाज व परिस्थितीशी जोडून किंवा तोडून घेण्याची इच्छा; आनंद, दृश्य व प्रायोगिक कला, संस्कृती आणि साहित्य इत्यादींचा समावेश असलेल्या सामाजिक-भावनिक विकासाच्या पैलूंबाबत सर्व अभ्यासक्रमाच्या क्षेत्रांमध्ये विशेषतः कला आणि व्यावसायिक शिक्षणावर भर देणे आवश्यक आहे.

१.३.३ बौद्धिक विकास

निरीक्षण, प्रयोग, व विश्लेषक क्षमता, अमूर्त आणि बहुदिश विचार प्रक्रिया, मंथन, एकत्रीकरण, संश्लेषक क्षमता, तार्किक कारणमीमांसा, भाषिक कौशल्ये, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता, भेदभाव सामान्यीकरण आणि अमूर्तता यांची ताकद समजणे या क्षमतांचा विकास म्हणजेच बौद्धिक विकास होय. अभ्यासक्रमाच्या सर्वच क्षेत्रांत विकसित झालेल्या ज्ञान व ग्रहणशक्तीमुळे विस्तृत व सखोल बौद्धिक विकास होतो.

१.३.४ अध्यात्मिक विकास

जागरूकतेला अंतर्मनाकडे वळवण्याचा प्रवास हा आनंद, प्रेम आणि करुणा, उस्फूर्तता, स्वातंत्र्य, सौंदर्यविषयक जाणीव यातून होतो. योग्य भावनिक संतुलन व सखोल ज्ञान असलेले निरोगी शरीर लाभलेला मानव या विश्वाच्या आश्चर्यांचा शोधाची अभिलाषा बाळगू शकतो. एखाद्या व्यक्तीचे खरे स्वरूप त्याच्यातील नम्रता व जिज्ञासेने समोर येते. या विश्वातील तो एक आध्यात्मिक अनुभव असतो.

शरीर व मन यांच्या समन्वयाने मानवाचे आकलन व अनुभव परिपूर्ण होतात, हे प्राचीन पंचकोषाद्वारे स्पष्ट केले आहे. मानवी विकासाचा हा अविभाज्य दृष्टिकोन आपल्याला अर्थपूर्ण शिक्षणाकडे नेण्याची स्पष्ट दिशा आणि मार्ग दाखवतो. पंचकोषाच्या संकल्पनेतून प्रेरणा घेऊन NCF चा हा अभ्यासक्रम घेऊन हा अभ्यासक्रम आराखडा आठ अभ्यासक्रम क्षेत्रांमध्ये अधिक समग्र शिक्षणाची प्रेरणा देऊ शकतो.”[३]

१.४ नेतृत्वगुणांचा विकास

नेतृत्वगुणांचा विकास म्हणजे व्यक्तीमध्ये प्रभावीपणे मार्गदर्शन करण्याची, निर्णय घेण्याची व लोकांना प्रेरित करण्याची क्षमता घडवणे होय.

१.४.१ स्वतःवर नियंत्रण

स्वतःवर नियंत्रण म्हणजे आपल्या विचारांवर, भावनांवर आणि वर्तनावर जाणीवपूर्वक ताबा ठेवण्याची क्षमता होय. हा गुण व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि नेतृत्वासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. स्वतःवर नियंत्रण असलेल्या व्यक्तीला राग, भीती, लोभ किंवा निराशा यांवर मात करतो. ती व्यक्ती घाईघाईने निर्णय न घेता शांतपणे विचार करून योग्य कृती करते. अशा नियंत्रणामुळे मन स्थिर राहते आणि कार्यक्षमता वाढते. कठीण परिस्थितीत संयम राखणे, नियमांचे पालन करणे व स्वतःच्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडणे हे स्वतःवर नियंत्रणाचे लक्षण आहे. महात्मा गांधी, बुद्ध यांसारख्या थोर व्यक्तींनी आत्मसंयमाला जीवनात सर्वोच्च स्थान दिले.

१.४.२ आत्मविश्वास

आत्मविश्वास म्हणजे स्वतःच्या क्षमतांवर, विचारांवर आणि निर्णयांवर असलेला दृढ विश्वास होय. आत्मविश्वास असलेली व्यक्ती अडचणींना घाबरत नाही, तर त्यांना सामोरे जाऊन उपाय शोधते. आत्मविश्वासामुळे व्यक्ती स्पष्टपणे आपले मत मांडू शकते आणि योग्य निर्णय घेऊ शकते. अपयश आले तरी ती निराश न होता त्यातून शिकण्याचा प्रयत्न करते. सतत प्रयत्न, सकारात्मक विचार, स्वतःची ताकद ओळखणे आणि अनुभवातून शिकणे यांमुळे आत्मविश्वास वाढतो. नेतृत्वगुणांच्या विकासात आत्मविश्वासाला विशेष महत्त्व आहे, कारण आत्मविश्वासी व्यक्ती इतरांनाही प्रेरणा देते.

१.४.३ दूरदृष्टी व ध्येय स्पष्टता

दूरदृष्टी व ध्येय स्पष्टता हा नेतृत्वगुणांचा अत्यंत महत्त्वाचा पैलू आहे. दूरदृष्टी म्हणजे भविष्यातील परिणाम ओळखून आजचे निर्णय घेण्याची क्षमता होय, तर ध्येय स्पष्टता म्हणजे आपल्याला नेमके काय साध्य करायचे आहे याची ठाम जाणीव असणे. दूरदृष्टी असलेली व्यक्ती तात्काळ फायद्यापेक्षा दीर्घकालीन हिताचा विचार करते. स्पष्ट ध्येय असल्यामुळे कार्याला दिशा मिळते आणि प्रयत्न विखुरले जात नाहीत. अशा व्यक्तीचे नियोजन ठोस असते व निर्णय अधिक

प्रभावी ठरतात. संघाला मार्गदर्शन करताना दूरदृष्टी व ध्येय स्पष्टता यांमुळे विश्वास निर्माण होतो. महात्मा गांधींचे स्वातंत्र्याचे ध्येय हे दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण आहे.

१.४.४ नैतिक मूल्ये व प्रामाणिकपणा

नैतिक मूल्ये व प्रामाणिकपणा हे सुदृढ व्यक्तिमत्त्व आणि प्रभावी नेतृत्वाचे आधारस्तंभ आहेत. नैतिक मूल्ये म्हणजे सत्य, न्याय, करुणा, जबाबदारी आणि सदाचार यांचे पालन होय, तर प्रामाणिकपणा म्हणजे विचार, शब्द आणि कृती यांत एकरूपता ठेवणे. नैतिक मूल्ये अंगीकारलेल्या व्यक्तीचे वर्तन विश्वासार्ह असते. ती स्वार्थापेक्षा समाजहिताला प्राधान्य देते. प्रामाणिक व्यक्ती कठीण परिस्थितीतही सत्याचा मार्ग सोडत नाही. त्यामुळे तिच्यावर लोकांचा विश्वास बसतो आणि नेतृत्व स्वीकारणे सोपे जाते. महात्मा गांधींचे सत्य व अहिंसेचे आचरण हे नैतिक मूल्ये आणि प्रामाणिकपणाचे सर्वोत्तम उदाहरण आहे.

१.४.५ संवादकौशल्य

संवादकौशल्य हे नेतृत्वाच्या मूलभूत आधारस्तंभ आहे, जे स्पष्टता, सक्रिय श्रवण आणि सहानुभूती यावर अवलंबून असते. नेतृत्व विकासाच्या संदर्भात हे कौशल्य संघविश्वास वाढवते आणि प्रभावी संवाद साधण्यास मदत करते. स्पष्टता, विचार थेट आणि सोप्या भाषेत मांडता येते. संवाद कौशल्यामुळे समोरच्याच्या बोलण्यावर पूर्ण लक्ष देऊन आणि प्रश्न विचारणे.

१.४.६ निर्णयक्षमता

"निर्णयक्षमता म्हणजे योग्य वेळी, योग्य परिस्थितीत आणि योग्य मार्गाने निर्णय घेण्याची क्षमता होय" नेतृत्वगुण व्यक्तीच्या यशासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. निर्णयक्षम व्यक्ती परिस्थितीचे शांतपणे विश्लेषण करते, उपलब्ध पर्यायांचा विचार करते आणि परिणामांची जाणीव ठेवून निर्णय घेते. ती भीती, दबाव किंवा भावनांच्या आहारी न जाता विवेकबुद्धीने वागते. चुकीचा निर्णय झाला तरी त्याची जबाबदारी स्वीकारून त्यातून शिकण्याची तयारी ठेवते. निर्णयक्षमतेमुळे व्यक्तीमध्ये आत्मविश्वास वाढतो आणि इतरांचा विश्वासही संपादन करता येतो.

१.४.७ सद्भावना

सद्भावना म्हणजे इतरांविषयी आपुलकी, सहानुभूती आणि कल्याणाची भावना ठेवणे होय. ही भावना व्यक्तीच्या विचारांमध्ये, बोलण्यात आणि कृतीतून प्रकट होते. सद्भावना असलेली व्यक्ती

भेदभाव न करता सर्वांशी समजूतदारपणे वागते. ती मतभेदांमध्येही शांतता, संवाद आणि समन्वय साधण्याचा प्रयत्न करते. समाजात ऐक्य, सहकार्य व विश्वास निर्माण करण्यासाठी सद्भावना अत्यंत आवश्यक असते. नेतृत्वाच्या भूमिकेत असलेल्या व्यक्तीसाठी सद्भावना हा गुण लोकांना जोडणारा आणि प्रेरणा देणारा ठरतो. गौतम बुद्ध यांचे जीवन सद्भावनेचे श्रेष्ठ उदाहरण आहे.

१.४.८ सहकार्य

सहकार्य म्हणजे समान उद्दिष्ट साध्य करण्यासाठी एकमेकांना मदत करणे, समन्वय साधणे आणि संघभावनेने काम करणे होय. हा गुण व्यक्तीच्या सामाजिक व नेतृत्वविकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. सहकार्यामुळे कार्य अधिक प्रभावी व सुलभ होते. प्रत्येकाची क्षमता ओळखून त्याचा योग्य वापर केल्यास संघ यशस्वी होतो. सहकार्य करणारी व्यक्ती इतरांचे मत ऐकते, मतभेद स्वीकारते आणि एकत्रित निर्णयाला प्राधान्य देते. नेतृत्वाच्या दृष्टीने सहकार्य महत्त्वाचे आहे, कारण ते विश्वास, एकता आणि सकारात्मक वातावरण निर्माण करते.

१.४.९ समस्या सोडवण्याची क्षमता

समस्या सोडवण्याची क्षमता म्हणजे येणाऱ्या अडचणी ओळखून त्यांचे योग्य व शाश्वत उपाय शोधण्याची बुद्धिमत्ता व कौशल्य होय. हा गुण व्यक्तीच्या वैयक्तिक विकासासाठी आणि नेतृत्वासाठी फार महत्त्वाचा असतो. समस्या सोडवणारी व्यक्ती घाबरत नाही, तर परिस्थितीचे शांतपणे विश्लेषण करते. ती समस्येची कारणे शोधते, पर्यायांचा विचार करते आणि योग्य निर्णय घेते. अशा क्षमतेमुळे अडचणी संधींमध्ये रूपांतरित होतात. नेतृत्वाच्या भूमिकेत असलेल्या व्यक्तीसाठी समस्या सोडवण्याची क्षमता संघाला योग्य दिशा देणारी ठरते.

१.४.१० स्व-अनुशासन व सातत्य

स्व-अनुशासन व सातत्य हे व्यक्तिमत्त्व विकासाचे आणि यशस्वी नेतृत्वाचे अत्यंत महत्त्वाचे गुण आहेत. स्व-अनुशासन आणि सातत्य हे यशस्वी जीवनाचे आधारस्तंभ आहेत. स्व-अनुशासन म्हणजे स्वतःच्या विचारांवर, वर्तनावर आणि इच्छांवर नियंत्रण ठेवणे, तर सातत्य म्हणजे नियमितपणे छोट्या पावलांनी पुढे जाणे. स्व-अनुशासन म्हणजे स्वतःच्या वर्तनावर, सवयींवर आणि वेळेवर नियंत्रण ठेवणे, तर सातत्य म्हणजे ठरवलेल्या उद्दिष्टासाठी अखंड प्रयत्न करत राहणे. स्व-अनुशासित व्यक्ती नियमांचे पालन करते, जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडते आणि मोहांना बळी

पडत नाही. सातत्यामुळे अपयश, अडचणी किंवा अडथळे आले तरीही प्रयत्न थांबत नाहीत. या दोन्ही गुणांमुळे व्यक्तीमध्ये संयम, आत्मविश्वास आणि कार्यक्षमता वाढते. महात्मा गांधींचे जीवन हे स्व-अनुशासन व सातत्याचे उत्तम उदाहरण आहे.

१.५ राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा

भारताला समृद्ध, सांस्कृतिक आणि प्राचीन संस्कृतीचा वारसा आहे. भारतातील स्थानिक समुदायांमध्येही विविध परंपरा आहेत. समकालीन भारतही तितकाच चैतन्यमय असून विश्वात आपले स्थान टिकवून आहे. त्यामुळे भारताला देदीप्यमान वारसा लाभलेला आहे. या चैतन्यमय वारशाचा आणि त्या वातावरणाचा, (जिथे आपण राहतो) विचार करणे, बोलणे, काम करणे, खाणे, कपडे घालणे (राहणीमान) त्याचप्रमाणे निसर्गाशी आणि एकमेकांशी संवाद साधणे या सगळ्यांवर प्रभाव पडतो. तद्वतच वेळेचे नियोजन, वाचन, लेखन, अध्ययन यांवरही प्रभाव पडतो. आपल्या देशात भाषेपासून गणित, तत्त्वज्ञान, कला, व्याकरण, खगोलशास्त्र, पर्यावरणशास्त्र, वैद्यकशास्त्र, स्थापत्यशास्त्र, शेती, नीतिशास्त्र, प्रशासन, हस्तकला, तंत्रज्ञान, मानसशास्त्र, राजकरण, साहित्य, संगीत, अर्थशास्त्र, शिक्षण या विविध विषयांमध्ये सखोल ज्ञान आणि समृद्ध परंपरा आहे.

विद्यार्थ्यांचे शिक्षण हे जास्त सापेक्ष, संबंधित, मनोरंजक आणि परिणामकारक होण्यासाठी सर्व अभ्यासक्रम आणि अध्यापन पद्धतींची रचना पायाभूत स्तरापासूनच भारतीय आणि स्थानिक संदर्भाशी जोडलेली असावी. भारतीय आणि स्थानिक संदर्भातील संस्कृतीतील गुणवैशिष्ट्ये, परंपरा, वारसा, चालीरिती, भाषा, तत्त्वज्ञान, भूगोल, प्राचीन आणि समकालीन ज्ञान सामाजिक आणि वैज्ञानिक गरजा स्वदेशी आणि पारंपरिक अध्ययन पद्धती लक्षात घेतल्या जाव्यात. त्यासाठी भारतीय आणि स्थानिक संदर्भात समाविष्ट असणाऱ्या कथा, कला, खेळ, क्रीडा, उदाहरणे, समस्या आणि इतर बरेच काही निवडावे. अशा प्रकारच्या शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकांमध्ये कल्पना, अमूर्तता आणि सर्जनशीलता उत्तमप्रकारे विकसित होतात.

१.५.१ राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण

अशा प्रकारे भारतीय साहित्यात आणि विचारसंपदेत राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याची उद्दीष्टे रुजलेली आहेत.

अ) शिक्षणाची समग्रदृष्टी आणि त्याची ध्येये ही भारताच्या प्राचीन वारशापासून ते आधुनिक विचारवंतांपर्यंत दृढपणे रुजलेली आहेत.

ब) भारतीय विचारधारांचा ज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन चैतन्यदायी आहे.

क) गुरू-शिष्य परंपरेचा गाभा हा मुख्यत्वे शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील नातेसंबंधांच्या केंद्रस्थानी असल्यास प्रभावी अध्ययन होते. ज्ञान व माहिती प्राप्त करण्यासाठी त्यांच्यातील संवाद व वादविवादाची परंपरा हा उत्तम मार्ग आहे.

ड) स्थानिक संसाधनांचा शिकण्यासाठी वापर. उदा. भाषा, पद्धती, तज्ज्ञ, इतिहास, पर्यावरण, घटना अभ्यास आणि इतर साधने ही शिकण्यासाठी समृद्ध साधने आहेत.

इ) शिक्षणात पालक व समाज यांच्या सहभागाचे महत्त्व आहे.

फ) शैक्षणिक आशय जसे कथा, कला, क्रीडा, खेळ, नमुने, उदाहरणे आणि समस्या या भारतीय स्थानिक आणि भौगोलिक संदर्भातून निवडल्यास सर्जनशीलता, आकलनक्षमता, सापेक्षता, प्रासंगिकता आणि कल्पनेची समृद्धता या गोष्टी वर्गामधून विस्तृतपणे विकसित होतात.

ग) भारतीयांचा विविध क्षेत्रातील योगदानाचा समृद्ध इतिहास ज्ञानपरंपरा अभ्यासक्रमात अंतर्भूत केल्यास तो इतिहास फक्त अभिमान आणि आत्मविश्वास वाढवत नाही तर त्या क्षेत्रातील अध्ययन समृद्ध करतो. उदा. गणित विषयाच्या अध्यापनात 'शून्याचा शोध' बहुविद्याशाखीय कथा ही अंतर्भूत केल्यास ते शिक्षण समृद्ध होते. यामध्ये तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, खगोलशास्त्र, बीजगणित यांचा समावेश होतो.

भारतातील निसर्गसंवर्धन परंपरेतून पर्यावरण शिक्षण समृद्ध करता येईल. मूल्ये आणि नीतिमत्तेची संकल्पना ही रुजलेल्या भारतीय संकल्पनेतून आणि पद्धतीतून समृद्ध करता येईल. जसे सहमानवांबद्दल आदर आणि करूणा, विविधतेचा स्वीकार, सेवाभाव आणि स्वच्छतेची मनोवृत्ती.

१.५.२ राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा आणि भारतीय शिक्षणाचा दृष्टिकोन :

भारतीय शिक्षणाचा दृष्टिकोन व्यापक आणि सखोल आहे. ज्यामध्ये शिक्षणाने आंतरिक आणि बाह्य विकासाला चालना दिली गेली पाहिजे, या विचारांचा समावेश आहे. शिकणे म्हणजे केवळ माहिती गोळा करणे नव्हे; तर तो एक आत्मशोध आणि आत्मविकास आहे, इतरांशी असलेले आपले संबंध, ज्ञानाच्या विविध प्रकारांमध्ये भेद करण्याची क्षमता असणे, व्यक्ती आणि

समाजाच्या फायद्यासाठी जे शिकले आहे ते फलदायीपणे लागू करण्यास सक्षम असणे म्हणजे शिकणे होय.

प्राचीन शाश्वत भारतीय ज्ञान आणि विचारांचा समृद्ध वारसा हा NCF साठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे. प्राचीन भारतीय ज्ञानप्रणालीत ज्ञान, शहाणपण (प्रज्ञा) आणि सत्य यांचा शोध हे विचार आणि तत्त्वज्ञानात सर्वोच्च मानवी ध्येय मानले गेले आहे. प्राचीन भारतातील शिक्षणाचे उिद्दष्ट केवळ या जगात किंवा जीवनातील जगण्याची तयारी म्हणून ज्ञान संपादन करणे हे नव्हते, तर शालेय शिक्षणाच्या पलीकडे स्वतःच्या पूर्ण प्राप्तीसाठी आणि मुक्तीसाठी ज्ञानसंस्कार देणे हे आहे. भारतीय शिक्षणव्यवस्थेने चरक, सुश्रुत, आर्यभट्ट, वराहमिहिर, भास्कराचार्य, ब्रह्मगुप्त, चाणक्य, चक्रपाणि, दत्त, माधव, पाणिनी, पतंजली, नागार्जुन, गौतम, पिंगला, शंकरदेव, मैत्रेयी, गार्गी आणि थिरुवल्लु यांसारखे महान विद्वान निर्माण केले आहेत. त्यांनी जागतिक ज्ञानात महत्त्वपूर्ण योगदान दिले. जसे की, गणित, खगोलशास्त्र, धातुशास्त्र, वैदयकशास्त्र, विज्ञान आणि शस्त्रक्रिया, नागरी अभियांत्रिकी, स्थापत्य, जहाज बांधणी आणि नौकानयनशास्त्र, योग, ललितकला, बुद्धिबळ इ. भारतीय संस्कृती आणि तत्त्वज्ञानाचा जगावर मजबूत प्रभाव होता आणि आजही आहे.

"जागतिक वारशाचा हा समृद्ध वारसा केवळ भावी पिढ्यांसाठी जोपासला आणि जतन केला पाहिजे असे नाही, तर आपल्या वंशजांसाठी शिक्षणव्यवस्थेद्वारे हे संशोधन वर्धित आणि नव्याने उपयोगातही आणले पाहिजे. भारतातील ज्ञान आणि त्याच्या विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि तांत्रिक गरजा, त्याच्या अतुलनीय कलात्मक, भाषा आणि ज्ञान, तरुण पिढीमध्ये रुजवण्यासाठी नैतिकता, राष्ट्रीय अभिमान, आत्मविश्वास, आत्मज्ञान सहकार्य आणि एकात्मता या हेतूंसाठी या गोष्टी महत्त्वपूर्ण मानल्या जातात.

ज्ञानाचे समग्र विकसन करणारी आणि ते ज्ञानाचे प्रसारण करणारी गुरू-शिष्यांच्या परस्पर संबंधांवर आधारित भारतीय शिक्षणप्रणाली ही जगातील एक प्राचीन शिक्षणप्रणाली आहे. शिक्षण आणि मूल्यमापन यांच्या वादविवाद आणि चर्चा या अगदी पाथमिक पद्धती असत. वरिष्ठ विद्यार्थी हे शिक्षकांचे बरेचदा सहाय्यक असत. हे मोठे विद्यार्थी त्यांच्या शिक्षणात प्रगत असत. ते लहान किंवा नवीन विद्यार्थ्यांना बरेचदा शिकवत असत. एकत्रित शिक्षण आणि समवयस्कांकडून शिक्षण याला प्रोत्साहन असे.

भारतीय शिक्षण विनम्रता, नम्रता, सत्यनिठा, शिस्त, स्वावलंबन, सर्वांचा आदर या मूल्यांवर भर देणारे आहे. ते जीवनाच्या नैतिक, शारीरिक, आध्यात्मिक बौद्धिक पैलूंवर केंद्रित होते. त्यात मनुष्य आणि निसर्ग यांच्यातील संतुलनाचा पुरस्कार करण्यावर भर होता. व्यक्तीचे कल्याण हे सभोवतालच्या जगाच्या कल्याणावर अवलंबून असते, याची जाणीव होती. भाषा आणि व्याकरण, तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, इतिहास, स्थापत्य, वाणिज्य, प्रशासन, शेती, व्यापार, धनुर्विद्या अशा विविध विषयांतून भारतीय शिक्षणाचे स्रोत काढले गेले. सर्जनशील कलांनी जीवनाच्या सर्व पैलूंमधील सौंदर्यशास्त्र लक्षात घेऊन सौंदर्यशास्त्र आणि संवेदनशीलतेची जाणीव विकसित केली. त्याचप्रमाणे खेळ, युद्ध कौशल्य आणि योगासनाच्या माध्यमातून शारीरिक शिक्षण आणि निरामयता हे महत्त्वाचे अभ्यासक्रमाचे क्षेत्र होते, त्यामुळे संपूर्ण शिक्षणात शरीराला स्थान होते.

अशा प्रकारे भारतीय शिक्षणाकडे पंचकोशाची आपल्या अस्तित्वाचे पाच स्तर किंवा भाग संपूर्ण वाढ म्हणून पाहिले जात असे. मानवी अनुभव आणि आकलनामध्ये शरीर आणि मनाच्या जटिलतेचे स्पष्टीकरण देते. प्राचीन भारतीय संकल्पना हा एक प्रख्यात व्यावहारिक दृष्टिकोनही आहे, जो जीवन जगण्यासाठी साध्य करण्यायोग्य आणि जीवनाला पूरक आहे. चांगले शारीरिक आरोग्य, तसेच सामाजिक व भावनिक कौशल्ये विकसित करणे, विचार करण्याची क्षमता विकसित करणे, जीवनात नैतिक आणि तर्कशुद्ध गोष्टींची निवड करणे आणि निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे हे सर्वसमावेशक पद्धतीने घडले पाहिजे.

एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात सावित्रीबाई आणि जोतिबा फुले, रवींद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, अरबिंदो आणि जे. कृष्णमूर्ती यांसारख्या अनेक महान आधुनिक भारतीय विचारवंत आणि व्यक्तिमत्त्वांनी भारताच्या बौद्धिक आणि कलात्मक वारसा असलेली स्वतःची 'राष्ट्रीय शिक्षणप्रणाली' विकसित करण्यावर भर दिला. इतकेच नाही, तर विज्ञान आणि तंत्रज्ञानातील समकालीन विकासाच्या महत्त्वाच्या पैलूंवरही भर दिला आहे."[२]

"भारतीय ज्ञानप्रणालीमधील आदिवासी ज्ञान, स्थानिक आणि पारंपरिक शिक्षणपद्धतींसह, गणित, खगोलशास्त्र, तत्त्वज्ञान, वास्तुकला, योग, वैदयकशास्त्र, कृषी, अभियांत्रिकी, भाषाशास्त्र, साहित्य, क्रीडा, खेळ, प्रशासन, राजकारण आणि संवर्धन यांचा समावेश या अभ्यासक्रमामध्ये केला जाईल. जिथे ते संबंधित आहे तिथे शिक्षण समृद्ध करते. आदिवासी वांशिक औषधी पद्धती,

वनव्यवस्थापन, पारंपरिक (सेंद्रिय) पीक लागवड, नैसर्गिक शेती यांचाही समावेश अभ्यासक्रमामध्ये असणार आहे. अशा प्रकारे, भारतीय ज्ञानप्रणाली येथे विकसित केलेल्या ज्ञानाच्या शाखांचा पद्धतशीर संदर्भ देते. भारतातील सर्व ज्ञानपरंपरा आणि प्रथा भारतातील विविध समुदायांनी विकसित, परिष्कृत आणि जतनही केल्या आहेत."[३]

१.६ संशोधन विषय

" भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात अभिजात मराठी भाषेचा अभ्यास "

१.७ संशोधन विषयाच्या कार्यात्मक व्याख्या

- **भारत**

"भारत हा बहुभाषिक देश आहे."

- **ज्ञान परंपरा**

"ज्ञान म्हणजे सद्गुण, जे सदगुण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला दिल्या जातात त्याला ज्ञान परंपरा असे म्हणतात."

- **अभिजात**

"अभिजात भाषा म्हणजे अशी भाषा जी अत्यंत प्राचीन, साहित्यिकदृष्ट्या समृद्ध, मौलिक ग्रंथपरंपरेने युक्त, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठेवा जपणारी असते."

- **मराठी**

"मराठी ही महाराष्ट्रातील लोकांची मातृभाषा असून ती अभिजात प्रादेशिक, साहित्यसमृद्ध व सांस्कृतिक परंपरेने नटलेली एक प्रमुख भाषा आहे."

- **भाषा**

१) "मनातील विचार, कल्पना व्यक्त करण्यासाठी मुखावाटे निघालेल्या ध्वनींचा सार्थ समूह म्हणजे भाषा." - डॉ. प्र. न. जोशी.

२) "संकेतबध्द शब्दाची किंवा चिन्हांची व्यवस्था म्हणजे भाषा होय." - डॉ. रमेश धोगडे.

१.८ संशोधनाची उद्दिष्टे

१) महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात मध्ययुगीन काळातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) मराठी भाषा तत्वज्ञान: भारतीय ज्ञान परंपरेतील चळवळीचा अभ्यास.

३) संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत गाडगे बाबा, संत तुकडोजी महाराज इत्यादी भारतीय ज्ञान परंपरेतील प्रमुख संतांचे मराठी भाषेबद्दलचे विचार जाणून घेणे.

४) संत नामदेवांचे हिंदी आणि मराठी अभंग (बहुभाषिकता) मराठीत अभ्यासणे.

५) महानुभाव पंथ आणि पंडित पंथ यांचे मराठी भाषेतील योगदान अभ्यासणे.

६) भारतीय ज्ञान परंपरेतील प्रमुख मराठी भाषिक व्यक्तींचे विचार, दृष्टिकोन आणि नैतिक मूल्यांचा अभ्यास करणे.

१.९ संशोधन पूर्वाभ्यास व संबंधित साहित्याचे समालोचन

संशोधन विषयाशी निगडीत उपलब्ध असणाऱ्या सर्व प्रकारच्या अभ्यास साहित्याची माहिती प्राप्त करून घेण्यासाठी संबंधित साहित्याचे परीक्षण अथवा पूर्वाभ्यास संशोधकाला करावा लागतो. संबंधित साहित्याचे परीक्षण हा संशोधन प्रक्रियेचा अंगभूत भाग आहे. संबंधित साहित्याच्या अभ्यासामुळे संशोधनाला सैद्धांतिक पार्श्वभूमी प्राप्त होते. आपण करीत असलेले संशोधन आणि यापूर्वी संबंधित विषयावर झालेले संशोधन कार्य याबाबत परिपूर्ण माहिती या प्रकारच्या अभ्यासामुळे प्राप्त होते.

अभिजात साहित्याची उपलब्धी, अभिजात संदर्भ विषयक नोंदी, ग्रंथाच्या संपादनांमध्ये संकीर्ण स्वरूपात उपलब्ध आहेत. महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषेच्या अभिजात अहवालात या संदर्भाचे सु-सूत्रीकरण व एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे परंतु भारतीय ज्ञान प्रणाली आणि अभिजात मराठी यांच्या परस्पर संबंधांचा शोध घेणारा त्यांचा अंतर्गत संरचनेची मांडणी करण्याचा साकल्याने प्रयत्न झाला नाही तो या संशोधनाच्या रूपाने पहिल्यांदाच दृष्टीपथात येत आहे. या संदर्भातील सविस्तर अहवाल महाराष्ट्र शासनाने "अभिजात मराठीची गौरवगाथा" या ग्रंथात मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी प्रकाशित केलेल्या ग्रंथात तसेच महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

संशोधन करताना तात्त्विक बाबीचे मार्गदर्शनासाठी संदर्भ पुस्तकांचा वापर केला गेला आहे

१) संबंधित साहित्य व संशोधनाच्या अभ्यासामुळे अनावश्यक पुनरावृत्ती टाळता आली.

२) संशोधन विषयाच्या मर्यादा निश्चित करण्यास मदत झाली.

३) संशोधन कार्याला दिशा प्राप्त झाली.

संशोधकाने निर्धारित केलेल्या संशोधन विषयासंबंधी संदर्भ बदलाचा आधार घेऊन अथवा मुख्य विषयाशी निगडित घटक अथवा उपघटकावर वेगळ्या संदर्भाने पूर्वी संशोधन झालेले असेल तर अशा प्रकारच्या संशोधनाचा आधार संशोधकाला घेता येतो. किंबहुना संदर्भित संशोधनासाठी वापरलेली संशोधन पद्धती, प्राप्त झालेले निष्कर्ष या बाबींचा आधार नवीन संशोधन करताना मार्गदर्शक म्हणून घेता येतो.

१.१० संशोधनाची व्याप्ती

संशोधन कोणत्या भौगोलिक भागाशी संबंधित आहे त्यातील कोणत्या लोकांशी संबंधित आहे. कोणत्या कालखंडाशी संबंधित आहे व या संशोधनाचे निष्कर्ष कोणाला लागू पडतील याची अचूकपणे माहिती देणे म्हणजे संशोधनाची व्याप्ती स्पष्ट करणे होय.

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती खालील प्रमाणे

१) प्रस्तुत संशोधनात भारतातील महाराष्ट्र राज्याच्या अभिजात मराठी भाषा समावेश करण्यात आला आहे.

२) प्रस्तुत संशोधनात महाराष्ट्रातील मराठी भाषेचा समावेश केला आहे.

३) प्रस्तुत संशोधन सन २०२५-२६ या कालावधीत पूर्ण करण्यात आले आहे.

४) प्रस्तुत संशोधनात अभिजात मराठी भाषेची परंपरा आणि भारतीय ज्ञान परंपरा दर्शविली आहे.

५) प्रस्तुत संशोधनात लोककला, प्राचीन आणि मध्ययुगीन साहित्य अभ्यासण्यात आले आहे.

१.११ संशोधनाची मर्यादा

"संशोधनात ज्या घटकावर संशोधकाचे नियंत्रण नसते व जे घटक संशोधनाच्या निष्कर्षांना मर्यादा घालत असतात त्यांचा उल्लेख करणे म्हणजे संशोधनाच्या मर्यादा सांगणे होय." सदर संशोधनाच्या अनुषंगाने त्या त्या ठिकाणी संदर्भासहित आढावा घेण्याचा प्रयत्न संशोधकाने केलेला आहे. हा घेतलेला आढावा व्यापकच असेल किंवा विस्तृत असेल असा संशोधकाचा दावा नाही

परंतु अभ्यासाच्या सोयीसाठी काही मर्यादा लक्षात घेणे अत्यंत गरजेचे आहे. त्या अनुषंगाने या अभ्यासाला काही मर्यादा देखील आहेत याची जाण सदर संशोधकास आहे. या विषयावर जेव्हा अभ्यास करण्यात येईल तेव्हा त्याची व्यापक भूमिका त्या त्या प्रसंगी विस्तृत स्वरूपाने मांडण्यासाठी संशोधक तयार असेल.

प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा खालील प्रमाणे

१) प्रस्तुत संशोधन हे मराठी भाषेपूरते मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन हे भारतीय ज्ञान परंपरा व अभिजात मराठी भाषेच्या अभ्यासापूरते मर्यादित आहे.

३) प्रस्तुत संशोधन विषय हा भारतीय ज्ञान परंपरा आणि अभिजात मराठी भाषा असा असला तरी दोन्ही अभ्यास शाखांची व्याप्ती खूप मोठी आहे. त्यामुळे या अभ्यास शाखांचा समग्र आवाका या अभ्यासात कवेत घेतला नाही. दोन्ही अभ्यास शाखांचा सखोल अभ्यास करणे शक्य नसल्यामुळे केवळ प्राथमिक व सूत्र रूपाने चर्चा केली आहे.

४) आधुनिक मराठी साहित्यातील समग्र भारतीय ज्ञान परंपरा हा स्वतंत्र विषय असल्यामुळे त्याची त्रोटक मांडणी केली आहे. आधुनिक मराठी साहित्याची चर्चा सारांशरूपाने करण्यात आली आहे.

५) प्रस्तुत संशोधनात भारतीय ज्ञान परंपरेचा आलेख काढला असल्यामुळे अधिक सखोल चर्चा न करता विषयांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला आहे.

७) संशोधकाने संशोधन करताना आवश्यक ठिकाणी मराठी विश्वकोशाची नोंदीची जशास तशी तर काही ठिकाणी आवश्यक माहिती घेतली असून त्याचा संदर्भ देण्यात आला आहे.

१.१२ संशोधन अभ्यासाची गरज

राष्ट्रीय शिक्षण धोरण -२०२० अनुभवात्मक शिक्षणावर भर देते. मातृभाषा आणि स्थानिक बोलीभाषेला प्राधान्य देते. भारतीय ज्ञान परंपरेतील संतांनी लेखन मातृभाषा आणि बोलीभाषेतून केलेले आहे. संतांनी जे काही सांगितले आहे ते त्यांच्या अनुभवावर आधारित आहे. संतानी जागरूकता आणि ज्ञान जागृत करून समाजाला आनंदी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतलेली दिसते. संतानी तिच्या ज्ञानाचे, समाजाचे, सुसंवादाचे, सहकार्याचे, भक्तीचे ज्ञानाचे, परंपरांचे, संस्कृतीचे, सनातन दृष्टिकोनाचे आणि आजच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थितीतही संतांच्या अभंगाचे ज्ञान आधुनिक समाजासाठी उपयुक्त ठरेल. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या

विकासामुळे आपल्याला माणूस भौतिक सुखाच्या मागे धावताना दिसतो. परंतु आपल्याला त्यात मानवी मूल्ये आढळत नाहीत. म्हणूनच, मुलांनी सांगितलेल्या कल्पना आत्मसात केल्याने तुमचे जीवन आनंदी आणि अर्थपूर्ण होण्यास निश्चितच मदत होईल. म्हणूनच, भारतीय ज्ञान परंपरेत वारकरी संप्रदायाची भूमिका अजूनही महत्त्वाची आहे. भारतीय ज्ञान परंपरेत, ज्याप्रमाणे पुरुष संतांनी त्यांच्या अभंगांद्वारे समाज घडवण्याचे काम केले, तेच काम महिला संतांनी केलेले दिसते. म्हणूनच, भारतीय ज्ञान परंपरेत त्यांचे योगदान अमूल्य आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यामध्ये भारतीय ज्ञान परंपरेचा समावेश आहे. या ज्ञान परंपराद्वारे संतांनी त्यांच्या अभंगाद्वारे स्थानिक ज्ञान आणि परंपरा सादर केल्या आहेत. भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये विद्यार्थ्यांचा सामाजिक-भावनिक, बौद्धिक, आध्यात्मिक विकास आणि मूल्य विकास यांचा समावेश आहे. संतांनी त्यांच्या लेखनात वरील सर्व घटकांचा एकात्मिक रचनेत विचार केला आहे.

भारतीय ज्ञानपरंपरेत, आपल्याला भूतकाळातील सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थितीचे चित्रण मराठी भाषेत पहायला मिळते. महाराष्ट्रातील संतांनी गीतेवर मराठी भाषेत भाष्ये सादर केली. त्यामुळे या पंथाचा अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. या विषयावर संशोधन करताना, महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायाचा पंथांचा प्रामुख्याने विचार करावा लागेल.

भारतीय ज्ञान परंपरेतील वरील वारकरी संप्रदायाचे महत्त्व आणि त्यांची भूमिका, तत्वज्ञान, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व, मानवी समाज जीवनावरील परिणाम, भक्ती चळवळ, ज्ञान मिळवण्याचे साधन यावर संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत यांच्यासह चर्चा केली जाईल.

वारकरी संप्रदायातील संतानी अभंग साहित्याची रचना केली. या रचनेमुळे आपली मराठी मातृभाषा तसेच सामान्य माणसाची बोली विकसित झाली आहे हे आपणास दिसत. राष्ट्रीय शिक्षण धोरण- २०२० (४.११) मध्ये मातृभाषेद्वारे किंवा स्थानिक भाषेद्वारे ज्ञान संपादन करण्याची कल्पना आहे. वारकरी संप्रदायाच्या ज्ञान परंपरेशिवाय आपण मराठी भाषा आणि संस्कृतीचा विचारही करू शकत नाही. संतांनी सामाजिक भाषेत आपले काम केले आहे. वारकरी संप्रदायाने सामाजिक अभिमुखता स्वीकारली होती. म्हणूनच, भारतीय ज्ञान परंपरेत मराठी भाषेला महत्त्वाचे स्थान आहे. आपल्या मातृभाषेबद्दल अभिमान व्यक्त करताना संत ज्ञानेश्वर म्हणतात.

"माझा मराठीची बोलू कौतुके ।
परी अमृतातेही पैजा जिंके।
ऐशी अक्षरे रसिके। मेळविन ।"

संत तुकाराम म्हणतात,

"आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने."

वारकरी संप्रदायाने आपल्याला परंपरा आणि रीतिरिवाजांच्या बंधनातून मुक्त करून ज्ञानाचा मार्ग दाखवण्याचे काम केले आहे. म्हणूनच भारतीय ज्ञान परंपरेत मराठी भाषेची भूमिका यशस्वी झाली आहे. (NEP-४.१७)

१.१३ संशोधन पद्धती

संशोधन पध्दती म्हणजे एखाद्या विषयाचा शास्त्रीय, पध्दतशीर आणि तर्कशुध्द रीतीने अभ्यास करुन नवीन ज्ञान मिळविण्याची प्रक्रिया होय. संशोधक त्याचे संशोधन कसे करणार आहे हे स्पष्ट करणारी प्रक्रिया होय. संशोधन करताना माहिती गोळा करणे, तिचे विश्लेषण करणे आणि निष्कर्ष काढणे यासाठी ज्या पध्दतींचा वापर केला जातो त्यास संशोधन पध्दती असे म्हणतात.

१. प्रायोगिक पद्धती

प्रायोगिक पद्धती म्हणजे एखाद्या संकल्पनेचे, तत्त्वाचे किंवा नियमाचे प्रत्यक्ष प्रयोगांच्या माध्यमातून परीक्षण व सत्यापन करण्याची प्रक्रिया म्हणजे प्रायोगिक संशोधन पद्धती होय.

प्रायोगिक पद्धती ही संशोधनातील एक वैज्ञानिक तंत्र आहे, ज्यामध्ये संशोधक स्वतंत्र चलांमध्ये (independent variables) नियंत्रित बदल करून अवलंबी चलांवर (dependent variables) होणाऱ्या परिणामांचे निरीक्षण आणि विश्लेषण करतो.

२. ऐतिहासिक पद्धती

ऐतिहासिक संशोधनाचे प्रमुख उद्दिष्ट वर्तमान घटनांचा अर्थ लावण्याच्या दृष्टीने संदर्भ म्हणून भूतकाळातील घटनांचा मागवा घेणे होय. पी.व्ही.यंग नुसार, "भूतकाळात सामाजिक शक्ती व प्रभावाने रूपांतरण घडवीत वर्तमानाला जो आकृतीबंध दिला त्यास कारणीभूत ठरलेल्या नियमांचा शोध घेण्यासाठी इतिहासात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला जातो."

३. वर्णनात्मक पद्धती

वर्णनात्मक पद्धती म्हणजे एखादी घटना, व्यक्ती, वस्तू, स्थळ किंवा संकल्पना तपशीलवार, क्रमबद्ध आणि स्पष्ट शब्दांत मांडण्याची पद्धत होय. एखाद्या घटना किंवा समस्येचे वर्तमान स्वरूप वर्णन करते.

४. विश्लेषणात्मक पद्धती

ज्या पद्धतीत संपूर्ण विषयाचे घटकांमध्ये विभाजन करून त्यांचे सखोल विश्लेषण केले जाते, ती विश्लेषणात्मक पद्धती म्हणतात. विश्लेषणात्मक पद्धती म्हणजे एखादा विषय, संकल्पना किंवा मजकूर सूक्ष्म भागांत विभागून, त्या भागांचा सखोल अभ्यास करून अर्थ लावण्याची अध्यापन/अभ्यास पद्धत होय. विश्लेषणात्मक पद्धती ही संशोधनातील एक प्रमुख तंत्र आहे, जी विद्यमान माहितीचे सखोल विश्लेषण करून कारण-परिणाम संबंध, तुलना आणि व्याख्या शोधण्यावर केंद्रित असते.

५. सर्वेक्षण पद्धती

प्रश्नावली, मुलाखत, निरीक्षण किंवा नमुना यांच्या साहाय्याने माहिती संकलित करून अभ्यास करण्याची पद्धत म्हणजे सर्वेक्षण पद्धती होय. सर्वेक्षण पद्धती म्हणजे एखाद्या समाजघटकाबाबत, शैक्षणिक समस्या किंवा अभ्यासविषयाबाबत माहिती गोळा करून तिचे विश्लेषण व निष्कर्ष काढण्याची संशोधन पद्धत होय.

१.१४ संशोधनासाठी वापरलेली साधने

संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या माहितीचे साधने म्हणजे माहिती संकलन, मोजमाप आणि विश्लेषन करण्यासाठी वापरली जाणारी पध्दती होय. संशोधन योग्य आणि विश्वसनीय करण्यासाठी ही साधने महत्वाची असतात.

विविध भाषिक लोकांच्या संपर्कातून संकरित भाषा जन्मास येते. ती संयुक्त भाषा कालांतराने स्थिरावते व तिचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण होते. कोणत्याही भाषेचा उगम या क्रमाने होतो. याचबरोबर इ. स. ८ व्या शतकात 'महाराष्ट्री' या अपभ्रंश भाषेपासून 'मरहट्ठ' लोकांची 'महऱ्हाटी बोली' अस्तित्वात आली. महऱ्हाटी बोलीचे हे नवे स्वरूप कशाप्रकारे अस्तित्वात आले. या संदर्भात ऐतिहासिक साधनांचा आधार घ्यावा लागतो. या साधनांद्वारे भाषेचा उत्पत्तीकाळ

शोधण्यासाठी मदत होते. सदर संशोधन करताना खालील साधनांच्या आधारे मराठी भाषेचा उत्पत्तीकाळ शोधण्यासाठी भक्कम आधार प्राप्त होतो.

संशोधनासाठी वापरलेले संदर्भ साहित्य

संशोधन करताना जी प्रमुख साधने व सहाय्यभूत ग्रंथ वापरले त्यांचा थोडक्यात आढावा.

१.१४.१ शिलालेख

शिलालेखांच्या अभ्यासाने आपल्याला मराठीचा उत्पत्तीकाळ शोधता येतो. त्यावरून भाषिक रूपांबरोबरच राजवट, कालनिर्देश, दानपत्रपद्धती, लिपी, व्यक्तिस्थळनामे इ. गोष्टींचीही माहिती मिळते.

१.१४.२ ताम्रपट

ताम्रपट म्हणजे तांब्याच्या पत्र्यावर कोरलेला शिलालेख किंवा अधिकृत दस्ताऐवज होय. प्राचीन काळात राजे, सरदार किंवा प्रशासक यांनी दिलेली आज्ञा, दानपत्रे, जमीनवाटप, करमाफी इत्यादी तांब्याच्या पट्ट्यावर कोरुन जतन केली जात असे त्याला ताम्रपट म्हणतात.

प्रस्तुत संशोधनात खालील ताम्रपटाचा समावेश केलेला आहे.

मराठीचा उत्पत्तीकाळ अभ्यासण्यासाठी 'दिवे आगरचा ताम्रपट' सर्वात प्राचीन मराठी ताम्रपट असल्याचे मत अभ्यासकांनी नोंदवले आहे. इ. स. १०६० मधील हा ताम्रपट मराठीतील आद्य ताम्रलेख, असून यात मराठीचे शब्दरूपे, शब्दयोगी अव्यये, सर्वनामे, विभक्तीरूपे इ. उल्लेख आढळून येतो.

"इ. स. १२९० मधील मैलंगीच्या शिलालेखावरून तामीळनाडूत मराठी शिकण्याची सोय होती असे अभ्यासकांनी संशोधनाअंती सांगितले आहे. त्याचप्रमाणे इ. स. ६९९ मधील चिकुर्डे येथील ताम्रपटात 'आचलित, करवुन, करित' असे मराठी वळणाचे शब्द सापडून आले आहेत. अशाप्रकारे ताम्रपटांच्या अभ्यासाअंती इ. स. १००० या काळात मराठी भाषा आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून होती, असे सांगता येईल."[४]

१.१४.३ दुर्मिळ संदर्भ ग्रंथ

दुर्मिळ ग्रंथ म्हणजे असे ग्रंथ की जे ग्रंथ अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध असलेले, प्राचीन किंवा ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे असलेले ग्रंथ होय. हे ग्रंथ सहजपणे बाजारात किंवा ग्रंथालयात उपलब्ध नसतात आणि त्यांना विशेस जतन व संरक्षणाची गरज असते.

मराठी भाषेची निर्मिती कशी झाली याचा अभ्यास करताना वेगवेगळ्या प्राचीन दुर्मिळ संदर्भ ग्रंथांचा आधार घेण्यात आला. त्यात प्रमुख्याने १) मानसोल्लास २) जोतिषरत्नमाला ३) कुवलयमाला ४) राजमतीप्रबोध ५) विवेकसिंधु ६) लीळाचरित्र ७) ज्ञानेश्वरी इ.

१.१४.४ वस्तुसंग्रहालय

वस्तुसंग्रहालय (Museum) म्हणजे एक अशी जागा किंवा संस्था जिथे ऐतिहासिक, वैज्ञानिक, कलात्मक किंवा सांस्कृतिक मूल्य असलेल्या वस्तू संग्रहित, संरक्षित आणि प्रदर्शित केल्या जातात.

प्रस्तुत संशोधनात खालील वस्तूसंग्रहालय भेटी देण्यात आलेल्या आहेत.

१.राजा दिनकरराव केडकर वस्तूसंग्रहालय, पुणे

२. कै. रामलिंगप्पा लामतुरे शासकीय वस्तूसंग्रहालय, तेर, धाराशिव

१.१४.५ ग्रंथालय

ग्रंथालय म्हणजे एक अशी जागा जिथे पुस्तकांचा, मासिकांचा, वृत्तपत्रांचा, नकाशांचा, हस्तलिखितांचा व इतर वाचनसामग्रीचा संग्रह केला जातो आणि तो वाचनासाठी, अभ्यासासाठी व संशोधनासाठी लोकांना उपलब्ध करून दिला जातो.या संशोधनाच्या अनुषंगाने वेगवेगळ्या ठिकाणी प्रत्यक्ष ग्रंथालयाला भेटी देण्यात आलेल्या आहेत.

१. जयकर ज्ञान संशोधन केंद्र, सावीत्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. डेक्कन कॉलेज, पुणे.
३. पश्चिम विभागीय भाषा केंद्र, (भारतीय भाषा संस्थान) पुणे.
४. फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे.
५. भांडारकर प्राच्य-विद्या संशोधन मंदिर, पुणे.
६. पुणे नगर वाचन मंदिर, पुणे.

७. भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.

१.१४.६ क्षेत्रभेट

संशोधनासाठी घेतलेल्या क्षेत्रभेटी म्हणजे अभ्यास करत असताना प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन माहिती संकलित करणे, निरीक्षण करणे, सर्वेक्षण, नोंदी घेणे इ. माध्यमातून नवीन ज्ञान संकलित केले आहे.

प्रस्तुत संशोधनात खालील क्षेत्रांना भेटी देण्यात आलेल्या आहेत.

१. कोरवली, सोलापूर.

२. कुडल, सोलापूर.

३. सावरगाव, तुळजापूर.

४. नेवासा, अहिल्यानगर.

५. जुन्नर, पुणे.

१.१५ समारोप

याप्रकरणात विशेषतःराष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२०, भारतीय पंचकोश विकास संकल्पना, नेतृत्वगुणाचा विकास, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तसेच संशोधन विषय, उद्दीष्टे, पध्दती आणि संदर्भ साधने यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. या सर्व घटकाच्या अभ्यासातून भारतीय शिक्षणपध्दतीचा मूलभूत दृष्टिकोन आणि तिचे मूल्यधिष्टित स्वरुप स्पष्ट होते.

भारतीय शिक्षण पध्दतीची मुळे ही भारतीय ज्ञान परंपरेत रुजलेली आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि भारतीय ज्ञान परंपरा यांमधील परस्परसंबंध स्पष्ट करताना शिक्षणाच्या सर्वांगीण दृष्टिकोनावर प्रकाश टाकण्यात आला आहे. पंचकोश विकास संकल्पनेच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. नेतृत्वगुणांच्या विकासासाठी आवश्यक असलेले आत्मविश्वास, नैतिक मूल्ये, संवादकौशल्य, निर्णयक्षमता आणि सहकार्य यांसारख्या गुणांचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याच्या माध्यमातून भारतीय शिक्षणाला भारतीय दृष्टिकोन प्राप्त होतो. भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात शिक्षणव्यवस्थेचा अभ्यास करण्यात आला आहे. एकंदरीत, भारतीय ज्ञान परंपरेच्या आधारे शिक्षणाची मांडणी केल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकतो आणि भारतीय संस्कृती, भाषा व मूल्यव्यवस्था अधिक दृढ होण्यास मदत होते.

संदर्भ ग्रंथ :-

१) राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) – २०२०, पृ. क्रं. १६-१७.

२) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, शालेय शिक्षण.२०२३, पृ. क्रं. ९.

३) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, शालेय शिक्षण.२०२३, पृ. क्रं. ७१ ते ७३.

४) राष्ट्रीय अभ्यासक्रमा आराखडा , शालेय शिक्षण.२०२३, पृ. क्रं. १६९ ते १७२.

५) राष्ट्रीय अभ्यासक्रमा आराखडा , शालेय शिक्षण.२०२३, पृ. क्रं. १७७.

६) महाजन पुरुषोत्तम, मराठीचा भाषिक अभ्यास, २०२१, अर्थव पब्लि., धुळे, पृ. क्र. ८५.

७) पाटील गीतादेवी, शैक्षणिक संशोधन पध्दती, २०१६, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर .

८) वरखेडे रमेश, संशोधनाचे पध्दतिशास्त्र, २०१३, वरखेडे शिक्षण संस्था, नाशिक.

९) तुळपुळे शं. गो., "प्राचीन मराठी कोरीव लेख", १९६३, पुणे विद्यापीठ, पुणे.

१०) राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) – २०२०

११) कुलकर्णी कृ. पा., मराठी भाषा उगम व विकास, २०१७, मेहता पब्लिकेशन, पुणे.

१२) अकोलकर, ग. वि., मराठीचे अध्यापन, व्हीनस प्रकाशन, १९७०., पुणे.

प्रकरण २

भारतीय ज्ञान परंपरा संकल्पना स्वरूप व वाटचाल

प्रास्ताविक

२.१ संकल्पना

२.२ भारतीय ज्ञान परंपरेची गरज

२.३ भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्व

२.४ भारतीय ज्ञान परंपरेचे स्वरूप

२.५ वेद

२.६ उपवेद

- २.६.१ आयुर्वेद
- २.६.२ धनुर्वेद
- २.६.३ गंधर्ववेद
- २.६.४ शिल्पवेद

२.७ दर्शनशास्त्र

- २.७.१ आस्तिक दर्शन
- २.७.२ नास्तिक दर्शन

२.८ उपनिषद

२.९ पुराणे

२.१० नैसर्गिक

२.११ प्राचीन भारतातील कला, साहित्य, शास्त्र व तंत्रज्ञान

- २.११.१ नाट्यशास्त्र
- २.११.२ सौंदर्यशास्त्र
- २.११.३ वास्तुशास्त्र
- २.११.४ वैद्यकशास्त्र
- २.११.५ गणित व भूमिती

२.१२ भारतीय तत्वज्ञानाची वैशिष्ट्ये

२.१३ भारतीय आणि महाराष्ट्रीय संकल्पना व परंपरा

२.१४ भारतीय संस्कृतीचा संबोध

२.१५ भारतीय ज्ञान परंपरेत मराठीचा वाटा

- २.१५.१ संतांची तीर्थस्थळे आश्रम आणि पाठशाळा व शिक्षण संस्था
- २.१५.२ गुरु-शिष्य परंपरेचे मुख्य पैलू

२.१५.३ गुरू आणि आचार्य
२.१५.४ गुरू आणि शिक्षक
२.१५.५ धर्मशास्त्र म्हणजे काय
२.१५.६ तर्कशास्त्र वादविद्येचा गाभा
२.१५.७ पाखंडी विचारप्रणाली
२.१५.८ विचारस्वातंत्र्य कायम राहिले
२.१६ समारोप
संदर्भ ग्रंथ

प्रकरण २

भारतीय ज्ञान परंपरा संकल्पना स्वरूप व वाटचाल

प्रास्ताविक

भारतीय ज्ञान परंपरा ही अत्यंत प्राचीन, समृद्ध आणि बहुआयामी आहे. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, तसेच बौद्ध, जैन, चार्वाक, व दिन्नाग वाङ्मय यामध्ये भारतीय चिंतनाची परंपरा व्यक्त झाली आहे. या परंपरेत अध्यात्म, तत्त्वज्ञान, विज्ञान, गणित, आयुर्वेद, व्याकरण, नीतिशास्त्र, कला आणि साहित्य अशा विविध क्षेत्रांचा समावेश होतो. भारतीय ज्ञान परंपरेची वैशिष्ट्ये म्हणजे आत्मज्ञानाची जागृती, सत्यशोधन, अनुभवाधिष्ठित विचार, गुरु-शिष्य परंपरा आणि नैतिक मूल्यांवर आधारित जीवनदृष्टी. ज्ञान हे केवळ माहिती नसून आत्मविकास, बौद्धिकविकास आणि समाजकल्याण यासाठी उपयुक्त साधन आहे, अशी भारतीय तत्वज्ञानाची भूमिका आहे.

भारतीय ज्ञान परंपरा ही 'वसुधैव कुटुंबकम्' 'अहिंसा', 'सत्य' आणि 'समता' यांसारख्या मूल्यांवर आधारलेली आहे. त्यामुळे भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ भूतकाळातील वारसा नसून आजच्या आधुनिक जीवनालाही दिशा देणारी, आपण सर्व एकच आहोत हा संदेश देणारी, कालातीत आणि सार्वत्रिक अशी परंपरा आहे.

प्राचीन भारतीय संस्कृती आणि परंपरा आजही सामान्य लोकांच्या जीवनात टिकून आहे. भारतीय ज्ञानपरंपरा ही ज्ञान आणि बुद्धीचे प्रतीक आहे. ज्यामध्ये ज्ञान व विज्ञानाचा समन्वय आपल्याला दिसतो. प्राचीन भारतीय संस्कृतीने जीवनातील नैतिक, भौतिक, आध्यात्मिक आणि बौद्धिक मूल्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. भारतीय ज्ञानपरंपरेचा इतिहास हा अत्यंत प्राचीन, विस्तृत आणि बहुविध आहे. ज्ञानाचा विकास केवळ बौद्धिक स्तरावर नसून अध्यात्म, समाज, विज्ञान कला, राजकारण, धर्म आणि व्यावहारिक जीवनाशी एकत्रितपणे घडलेला दिसते. समग्रता, सातत्य, विविधता आणि मानवकेंद्री दृष्टिकोन हे मुख्यतः ज्ञानपरंपरेचे वैशिष्ट्ये आहे. भारतीय ज्ञानपरंपरेचा इतिहास हा फक्त ग्रंथपरंपरेपुरता मर्यादित नसून तो जीवनपद्धती, संस्कृती, नैतिक मूल्ये आणि व्यावहारिक अनुभव यांच्याशी जोडलेला आहे. भारतीय ज्ञानपरंपरा आणि समाज यांचा संबंध अखंड आहे.

२.१ संकल्पना

भारतीय ज्ञान प्रणाली ही प्राचीन काळापासून विविध क्षेत्रांमध्ये प्रगतीशील राहिलेली एक अद्वितीय परंपरा आहे. मानव जीवनाच्या सर्व अंगांचा समावेश असलेल्या या प्रणालीत वेद, उपनिषदे, त्रिपिटक, तत्त्वज्ञान, आयुर्वेद, योग, ज्योतिष, वास्तुशास्त्र, काव्य, आणि विज्ञान अशा

अनेक विषयांचा समावेश आहे. या ज्ञान परंपरेने केवळ भारतालाच नव्हे, तर जगाला ज्ञान, बौद्ध तत्वज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा अमूल्य ठेवा दिला आहे. भारतीय संस्कृतीचा आणि जीवनशैलीचा सार समजून घेण्यासाठी भारतीय ज्ञान प्रणालीचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो.

भारतीय ज्ञान प्रणाली ही हजारो वर्षांच्या प्रगल्भ इतिहासातून विकसित झाली असून, आजच्या काळातही तिचे महत्त्व अबाधित आहे. भारताच्या प्राचीन ऋषी-मुनींनी मानवी जीवन, जग, ब्रह्मांड याबद्दल विचार मांडलेले आहेत. भारतीय ज्ञान परंपरेतील ज्ञान गुरु-शिष्य परंपरेतून मौखिक माध्यमाद्वारे हस्तांतरित झाले आहे. यात भौतिक आणि पारलौकिक म्हणजेच आध्यात्मिक अशा दोन्ही ज्ञानांच्या समावेशामुळे सर्वांगीण विकासाला चालना मिळालेली आपल्याला दिसते.

२.२ भारतीय ज्ञान परंपरेची गरज

भारतीय ज्ञान परंपरा ही आपल्या संस्कृतीची, तत्त्वज्ञानाची आणि जीवनमूल्यांची शाश्वत परंपरा आहे. वेद, उपनिषदे, भगवद्गीता, तसेच बौद्ध आणि जैन साहित्य यातून मानवजातीला जीवनाचे तत्त्वज्ञान मिळाले आहे. आजच्या काळात तिची गरज पुढील कारणांमुळे अधिक महत्त्वाची ठरते.

१) मानसिक स्वास्थ्य

व्यक्तीच्या विचार, भावना व्यक्त करण्याची आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता म्हणजे मानसिक स्वास्थ्य. जसे शारीरिक आरोग्य महत्त्वाचे आहे, तसेच मानसिक आरोग्यही तितकेच आवश्यक आहे. भारतीय ज्ञानपरंपरेत मन:शुद्धी, संयम आणि आत्मनियंत्रण यांना विशेष महत्त्व दिले आहे. त्यामुळे मानसिक स्वास्थ्य जपणे हे आनंदी आणि यशस्वी जीवनासाठी अत्यावश्यक आहे.

२) शारीरिक स्वास्थ्य

शारीरिक स्वास्थ्य हे यशस्वी आणि आनंदी जीवनाचा पाया आहे. निरोगी शरीरातच निरोगी मन वसते, म्हणून आरोग्याची काळजी घेणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. भारतीय परंपरेत आयुर्वेद मध्ये आहार-विहार, दिनचर्या आणि ऋतुचर्या यांवर भर देऊन निरोगी जीवनाचा मार्ग सांगितला आहे.

३) मूल्यशिक्षण

भारतीय ज्ञान परंपरा ही मूल्यशिक्षणावर आधारलेली आहे. ही तत्त्वे आत्मसात करून मानव आणि समाज दोन्हींचा सर्वांगीण विकास साधता येतो. मुल्यशिक्षण म्हणजे व्यक्तीच्या जीवनातील नैतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक मूल्यांची जाणीव निर्माण करणे होय. भारतीय

ज्ञान परंपरेत मूल्यांना महत्त्व दिले आहे. भारतीय तत्वज्ञानातुन सत्य, अहिंसा, कर्तव्यनिष्ठा, संयम, करुणा या मुल्याचा उपदेश मिळतो.

४) नैतिकता

भारतीय ज्ञानपरंपरेत नैतिकतेला महत्त्व असून वेद, उपनिषदे आणि भगवद्गीता यांमध्ये सत्य, धर्म, कर्तव्य आणि आत्मसंयम यांचा उपदेश दिलेला आहे. याबरोबरच सदाचार, करुणा आणि अहिंसा यांचे महत्त्व सांगितले आहे. नैतिकता हा भारतीय ज्ञानपरंपरेचा तो आधारस्तंभ आहे, जो व्यक्तीला मानवतेकडे घेऊन जाण्याचा मार्ग तयार करतो. हा केवळ बौद्धिक विषय नसून जीवनाच्या प्रत्येक आचरण, विचार आणि वर्तन या साधनेत उतरवणे महत्त्वाचे आहे.

५) अध्यात्मिक उन्नती

भारतीय ज्ञानपरंपरेत अध्यात्माला विशेष स्थान आहे. उपनिषदे मध्ये आत्मा आणि ब्रह्म यांचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. अध्यात्मिक उन्नती म्हणजे आत्मज्ञान, मन:शुद्धी आणि उच्च मूल्यांच्या आचरणातून अंतर्मनाचा विकास होणे. ही धार्मिक प्रक्रिया नसून व्यक्तीच्या विचार, भावना आणि आचरण यांचा परिष्कार होय. अध्यात्मिक उन्नतीमुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. आत्मज्ञान आणि नैतिक आचरण यांच्या साहाय्याने जीवन अधिक अर्थपूर्ण व शांततामय बनते.

६) पर्यावरण

भारतीय ज्ञानपरंपरेत पर्यावरणाला पूजनीय स्थान दिले आहे. अथर्ववेद मध्ये पृथ्वीला माता मानले आहे. ऋग्वेद मध्ये निसर्गशक्तींचे स्तवन केले आहे. "वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना संपूर्ण विश्वाला एक कुटुंब मानते. पर्यावरणाचे संरक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. निसर्गाशी संतुलन राखल्यास मानवाचे जीवन निरोगी, सुरक्षित आणि समृद्ध राहते.

७) शाश्वत विकास

भारतीय ज्ञानपरंपरेतही निसर्गाशी संतुलन राखण्याचा संदेश दिला आहे. अथर्ववेद मध्ये पृथ्वीचे रक्षण करण्याचा उपदेश आहे. "वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना संपूर्ण विश्वाला एक कुटुंब मानते, ज्यामुळे शाश्वततेचा विचार बळकट होतो. शाश्वत विकास म्हणजे असा विकास जो वर्तमान पिढीच्या गरजा पूर्ण करतो. शाश्वत विकास हा केवळ आर्थिक प्रगती नसून पर्यावरण व समाजाच्या संतुलनासह सर्वांगीण विकास आहे. वर्तमान आणि भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी शाश्वततेचा मार्ग स्वीकारणे अत्यावश्यक आहे.

८) सर्व समावेशक शिक्षण

भारतीय ज्ञानपरंपरेत "सर्वे भवन्तु सुखिनः" आणि "वसुधैव कुटुंबकम्" या विचारांतून सर्वसमावेशकतेचा संदेश आपल्याला मिळतो. नवीन शैक्षणिक धोरणातही (NEP 2020) सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे. सर्वसमावेशक शिक्षण म्हणजे लिंग, जात, धर्म, भाषा, आर्थिक स्थिती किंवा शारीरिक-मानसिक क्षमतांमध्ये फरक असला तरी प्रत्येक विद्यार्थ्याला समान आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी देणे. शिक्षणापासून कोणत्याही विद्यार्थ्याला वंचित ठेवले जात नाही. सर्वसमावेशक शिक्षण हे न्याय, समताधिष्ठित आणि प्रगत समाजनिर्मितीसाठी आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेला वाव देणे हे शिक्षणाचे ध्येय आहे.

२.३ भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्व

भारतीय ज्ञान प्रणालीचे महत्त्व त्याच्या प्राचीन, व्यापक आणि सर्वसमावश्यक दृष्टिकोनात आहे. जीवनाच्या प्रत्येक अंगांचा समतोल विचार करणारी ही प्रणाली शारीरिक मानसिक सामाजिक नैतिक आणि अध्यात्मिक उन्नतीसाठी मार्गदर्शक ठरते तिचे महत्त्व आपल्याला खालील प्रमाणे सांगता येईल.

१) योग आणि आयुर्वेदाच्या माध्यमातून आरोग्य

भारतीय ज्ञान परंपरेतील योग आणि आयुर्वेद हे दोन महत्त्वाचे घटक आहेत, ज्यांनी शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्व मिळवून दिलेले आहे. योगा केल्याने मन, शरीर आणि मानसिक संतुलन राखण्यास मदत होते, डोक्यावरील तान कमी होतो. झोप सुधारते, मज्जासंस्था शांत होतात, पाचन संस्था आणि ऊर्जा सुधारते. त्याच बरोबर आयुर्वेदामुळे शारीरावर उपचार करता येतो त्यामुळे शरीर निरोगी ठेवण्यास मदत होते. त्यामुळे ही एक शाश्वत आरोग्य प्रणाली आहे.

२) शाश्वत आणि निसर्गाशी संतुलन

भारतीय तत्त्वज्ञान निसर्गाशी समरूप राहून जीवन जगण्यावर भर देते. बुद्धांनी वृक्षतोडीचा विरोध करून पर्यावरण संतुलनाची शिकवण दिलेली आहे. पाली साहित्य आणि जातक कथांमध्ये बोधिसत्व पशुपक्ष्यांच्या स्वरूपात दिसतात त्यामुळे सर्व प्राण्यांप्रती मैत्रीभाव वाढतो. प्रतीत्यसमुत्पाद (कारण - कार्य सिद्धांत) अनुसार सर्व सजीव व निर्जीव घटक परस्परावलंबी आहेत त्यामुळे निसर्गाचा कोणताही घटक नष्ट केल्यास संपूर्ण जीवन चक्रावर परिणाम होतो हा शाश्वतीतेचा मूलभूत विचार प्रतीत्यसमुत्पाद यामध्ये सांगितला आहे.

३) अध्यात्मिकता आणि तत्वज्ञान

भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये अध्यात्मिकता आणि तत्त्वज्ञान ही मानवी विचार प्रणालीची दोन महत्त्वाची अंग आहेत. उपनिषद, वेद, भगवद्गीता आणि इतर तत्त्वज्ञान ग्रंथांमधील शिकवण माणसाला जीवनातील गहन प्रश्नांवर विचार करण्यास आणि जीवनाच्या उद्दिष्टांचा शोध घेण्यास प्रोत्साहित करते. त्याचबरोबर बौद्ध तत्त्वज्ञानाने अध्यात्मिकता आणि तर्कशील विचार यांचा समन्वय साधलेला आहे. बुद्धांनी केवळ तात्विक चर्चा न करता दुःख निवारणाचा व्यवहार्य मार्ग सांगितला आहे.

४) नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी

भारतीय ज्ञान परंपरेने नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी यांचा केवळ सामाजिक संहिता मानले नाही तर अध्यात्मिक प्रगतीचा पाया सामाजिक सुरक्षा आधार आणि मानवी कल्याणाचे साधन मानले आहे.

भारतीय ज्ञान परंपरेत नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी हे केवळ नियम नसून जीवनशैली आणि दृष्टिकोन आहे. "सर्वे भवन्तु सुखिता: सर्वे संतु निरामय:" (सर्व सुखी होत, सर्व रोगमुक्त होवोत) या प्रार्थनेत ही समग्रता सामावलेली आहे आजच्या जगात पर्यावरण सामाजिक न्याय व्यवसाय नीती इत्यादी क्षेत्रात ही तत्वे अत्यंत प्रासंगिक ठरतात.

५) शिक्षण परंपरेचा विकास

भारतीय ज्ञान परंपरेत शिक्षण परंपरेचा विकास हा केवळ औपचारिक ज्ञान प्रसाराचा प्रश्न नव्हता तर संपूर्ण व्यक्तिमत्व विकास, सामाजिक सुव्यवस्था आणि सांस्कृतिक अखंडतेचे रक्षण यांच्याशी निगडित होता. प्राचीन भारतीय विद्यापीठे असुन गुरु जवळ जाऊन ज्ञान घेण्याची परंपरा ही होती. नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला, जेतवन ,मनसर यासारख्या प्राचीन विद्यापीठांना शास्त्र, तत्त्वज्ञान, विज्ञान आणि कलेच्या क्षेत्रात शिक्षण दिले. त्यामुळे आजच्या काळातही भारतीय शिक्षण परंपरेचे हे तत्वज्ञान उपयुक्त ठरत आहे.

६) सांस्कृतिक आणि कलात्मक महत्त्व

भारतीय ज्ञान परंपरेत नाट्यशारत्न, काव्यशास्त्र, चित्रकला, संगीत आणि नृत्य यांचे महत्त्व आहे. भारतीय कला आणि संस्कृतीतून मानवी भावनांचे आणि तत्त्वज्ञानाचे उत्तम दर्शन होते, जे मानवी जीवन समृद्ध करते.

२.४ भारतीय ज्ञानपरंपरेचे स्वरूप

भारतीय ज्ञानपरंपरा ही अत्यंत व्यापक आणि विविधतेने नटलेली आहे. ती जीवनाच्या सर्व अंगाचा विचार करणारी परंपरा आहे. ज्यामध्ये शारीरिक, मानसिक, बौद्धिक, नैतिक आणि अध्यात्मिक उन्नतीचा समावेश आहे. या परंपरेचे स्वरूप विविध शाखांमध्ये विभागलेले आहे.

भारतीय ज्ञान परंपरा ही वेद, उपनिषद, पुराण, विनयपिटक, सुत्तपिटक, अभिधम्मपिटक इत्यादी ग्रंथावर आधारित समृद्ध चिंतनपद्धती आहे. ती तर्कमूलक, मूल्यनिष्ठ, जिज्ञासामूलक आणि आचरणसापेक्ष आहे, जी जीवनाचे अखंड दृष्टिकोन देते. या गुरु-शिष्य परंपरेने संवाद, विवेक आणि नैतिक विकासावर भर दिला जातो. विविध विभागांमध्ये वेदांत, बौद्ध, जैन यांचा समावेश असून संतांद्वारे लोकांपर्यंत प्रसार झालेला आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ने भारतीय ज्ञानपरंपरेचे पुनरुज्जीवन आणि संरक्षणाला प्राधान्य दिले आहे. ही परंपरा व्यक्ति व समाजाच्या सृजनात्मक विकासाला चालना देत असुन लौकिक ज्ञान समन्वय साधन्याचे खास वैशिष्ट्ये आहे. भारतीय ज्ञानपरंपरा जगातील सर्वात प्राचीन व सतत प्रवाही राहिलेली परंपरा आहे. ही परंपरा केवळ आध्यात्मिक नसून ती वैज्ञानिक, तात्त्विक, व्यावहारिक व सांस्कृतिक अशा बहुआयामी स्वरूपाची आहे.

भारतीय ज्ञान परंपरेत वेद, उपनिषदे, त्रिपिटके आणि पुराने यांसारख्या ग्रंथांमध्ये जिवनोपोगी ज्ञान साठवलेले आहे. या परंपरेत आयुर्वेद, धनुर्वेद, गंधर्ववेद, स्थापत्यशास्त्र यांसारख्या उपवेदांतून व्यावहारिक ज्ञानाची विविध अंगे विकसित झाली. आर्यभट्ट, वराहमिहिर, पाणिनी, चरक यांसारख्या विद्वानांनी गणित, खगोलशास्त्र, व्याकरण व वैद्यकशास्त्रात मोलाची भर घातली असुन ज्ञानाचे हे संचित केवळ ग्रंथोपासना न राहता गुरुकुल पद्धतीने व शिष्यपरंपरेने पिढ्यान्पिढ्या हस्तांतरित केले गेले आहे. अशी ही ज्ञानपरंपरा मानवतेच्या कल्याणासाठी जोपासली गेली.

२.५ वेद

'वेद' या शब्दाचा संस्कृत मूळ अर्थ "ज्ञान" (Vid - जाणणे) असा होतो. वेद हे प्राचीन भारतीय संस्कृतीतील महत्त्वपूर्ण धर्मग्रंथ आहेत. यांना अपौरुषेय (मनुष्यकृत नव्हे, तर ऋषींना श्रुती स्वरूपात प्राप्त झालेले) असे मानले जाते. ते हिंदुत्वज्ञान संस्कृती आणि अध्यात्म यांचा पाया आहे आहेत आणि आजही भारतीय विचार आणि पद्धतींवर ते प्रभाव टाकत आहेत. वेद चार प्रकारचे आहेत ते प्राचीन भारतीय ग्रंथ आहेत जे हिंदू धर्माचा मूळ पाया आहेत त्याचबरोबर त्यांना ज्ञान आणि बुद्धीचे व विचारसरणीचे अंतिम स्त्रोत म्हणून मानले जाते वेदांची चार प्रकार पुढीलप्रमाणे ऋग्वेद,यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद

१) **ऋग्वेद**

ऋग्वेद हा चार वेदांपैकी एक ग्रंथ आहे वेदांत ऋग्वेदाला प्रथम स्थान आहे हा प्राचीन भारतीय वैदिक संस्कृतीतील सर्वात जुना ग्रंथ आहे.

ऋग्वेद या संस्कृत शब्दाचा अर्थ 'स्तुतीचा वेद' किंवा 'स्त्रोताचे ज्ञान' असा होतो हा ग्रंथ अंदाजे इ.स. पूर्व १५०० ते इ.स. १२०० लिहिला गेला असावा हा ग्रंथ एकूण 10 मंडळांमध्ये विभागलेला असून तो एक प्राचीन ग्रंथ आहे. ऋग्वेदाची एकूण सूक्त संख्या 1028 असून त्यात १०५८० ऋचा आहेत, १,५३,८२६ शब्द आहेत व ४,३२,००० इतकी अक्षरसंख्या आहे.

भारतात प्राचीन काळी यज्ञ मोठ्या प्रमाणावर केले जायचे यज्ञ करण्यासाठी विशिष्ट विधी तयार झाले ते म्हणण्यासाठी ऋग्वेदात सुक्त शास्त्र तयार झाले

२) यजुर्वेद

यजुर्वेद हा चार वेदापैकी दुसऱ्या क्रमांकाचा वेद ग्रंथ आहे. यजुर्वेद हा संस्कृत शब्द आहे या शब्दाची फोड केल्यास त्याचा अर्थ संस्कृत शब्द 'यजुस + वेद = यजुर्वेद' असा होतो मराठीमध्ये त्याचा अर्थ घेतल्यास 'यज्ञांचा वेध' किंवा 'विधीचे ज्ञान' असा होतो हा ग्रंथ अंदाजे इ.स.पूर्व १२०० ते इ.स. पूर्व १००० मध्ये लिहिला गेला असावा.

यजुर्वेद हा मुख्यता यज्ञांमध्ये (हवनांमध्ये) वापरल्या जाणारे मंत्र आणि त्यांचा आणि त्यांच्या संबंधित संस्कार आणि पूजा-अर्चा यांचे संकलन आहे यामध्ये यज्ञाच्या विधी, नियम, कृती आणि मंत्र यांचा समावेश आहे. यजुर्वेदाचे मुख्य दोन प्रकार पडतात एक शुक्ल यजुर्वेद आणि दुसरा कृष्ण यजुर्वेद असे आहेत शुक्ल यजुर्वेदात यज्ञ कर्म करण्यासाठी स्पष्ट सूचना आणि मंत्र वेगवेगळे दिलेले आहेत. कृष्ण यजुर्वेद मध्ये मंत्र आणि त्यांचा अर्थ एकत्र दिलेला आहे त्याचबरोबर कृष्ण यजुर्वेदाची भाषा थोडी कठीण आहे.

३) सामवेद

सामवेद हा प्राचीन संस्कृतीतील चार वेदांपैकी तिसऱ्या क्रमांकाचा वेद ग्रंथ आहे याला "संगीताचा वेद" असे सुद्धा म्हटले जाते कारण यात ऋग्वेदातील मंत्रांना सूर देऊन गाण्याच्या शैली मांडलेले आहे

सामवेद याचा अर्थ शब्दाची फोड करून पाहिल्यास साम म्हणजे गायन आणि वेद म्हणजे ज्ञान होईल 'साम' हा शब्द 'सा' (ऋचा) + अम् आलम असा तयार होतो एकंदरीत सामवेद या संस्कृत शब्दाचा अर्थ सांगायचा झाल्यास वेदातील ज्या ऋचांवर आलाप घ्यायचा किंवा गायन करायचे त्यांचा संग्रह म्हणजे सामवेद होय असे म्हणता येईल. सामवेदात १८७५ मंत्र आहेत त्यातील

बहुतांश भाग ऋग्वेदातून घेतलेला आहे आजच्या शास्त्रीय संगीताची बीजे याच्यातून घेतलेली आहेत भक्तीभाव, ध्यान आणि गायन यांचा संगम यामध्ये दिसुन येतो.

४) अथर्ववेद

अथर्ववेद हा वेदातील चौथ्या क्रमांकाचा व शेवटचा वेद होय. या वेदाला "लोकजीवनाचा वेद" असेही म्हणतात. यातील बहुसंख्या मंत्रांचा साक्षात्कार अथर्वन नावाच्या ऋषी मुळे वेदास हे नाव प्राप्त झाले असावे असे सांगतात त्याचबरोबर अथर्ववेद हा वेदच नाही असाही एक विचार प्रवाह असल्याचे दिसून येते त्यांच्या मते वर्णन केलेले अनेक विषय जसे यातु विद्या किंवा अभिचार मंत्र हे वैदिक धर्मपरंपरा किंवा संस्कारांचा भाग नाही त्यामुळे अनेक ठिकाणी वेदत्रयी असा उल्लेख आढळतो.

अथर्ववेदामध्ये आरोग्य व औषधी विषयी विस्तृत विवरण केलेले आहे त्यामध्ये रोग निवारणाचे तसेच दीर्घायु होण्याचे मंत्र सुद्धा दिलेले आहेत त्याचप्रमाणे जादू-टोणा, तंत्र-मंत्र, शत्रुनास भूत-प्रेत बाधा पासून सुटका यासाठी मंत्र दिलेले आहेत. अथर्ववेदामध्ये जीवन विषयक विस्तृत मांडणी केलेली आहे जसे विवाह संतान इत्यादींचे विवेचन केलेले आहे यामध्ये औषधीविद्या व रोगोपचार, यज्ञविधी, उपासना व तांत्रिक प्रयोग, अशुभ निवारण व शांतीसूक्ते, ज्योतिष गृहशांती इत्यादी संबंधित सूक्ते तसेच इत्यादी अनेक विषयाचे विवेचन केलेले आहे.

२.६ उपवेद

उपवेद म्हणजे वेदांशी संबंधित उप ज्ञानशाखा. वेदामधील तत्त्वज्ञानाचा व्यवहारात उपयोग कसा करावा याची माहिती उपवेदातून मिळते. उपवेद हे प्राचीन भारतीय चार ग्रंथ असून जे वेदांचे सहायक मानले जातात. हे उपवेद भारतीय ज्ञान परंपरेची अधिकची माहिती दर्शवितात. ज्यामध्ये जीवनाचे विविध पैलू आणि मानवी अनुभव समाविष्ट आहेत.

२.६.१ आयुर्वेद

आयुर्वेद म्हणजे जीवनाचा अभ्यास. यामध्ये एक नैसर्गिक दृष्टिकोन आहे. आरोग्य सेवेची एक प्राचीन भारतीय प्रणाली आहे, जी ५,००० वर्षांपूर्वी उगम पावली. 'आयुर्वेद' या शब्दाचा अर्थ 'जीवनाचे विज्ञान' किंवा 'दीर्घायुष्याचे ज्ञान' असा होतो. विश्व पाच घटकांनी (तत्त्वांनी) बनलेले आहे. पृथ्वी (पृथ्वी), जल (पाणी), अग्नि (अग्नी), वायू (हवा), आकाश (अवकाश) या संकल्पनेवर आधारित आहे. हे घटक प्रत्येक व्यक्तीमध्ये असतात. शारीरिक आणि मानसिक आरोग्य राखण्यासाठी जबाबदार असतात. या घटकांचा समतोल राखणे व शरीर आणि मन यांच्यात सुसंवाद पुनर्संचयित करणे हे आयुर्वेदाचे उद्दिष्ट आहे.

यात वात, पित्त आणि कफ शारीरिक आणि मानसिक प्रक्रियांना नियंत्रित करतात. पंचमहाभूते विश्वाचा आणि मानवी शरीराचा आधार असतात.निसर्गाशी सुसंगत राहून आणि संतुलित जीवनशैलीचा अवलंब करून शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक कल्याण मिळवणे हे आयुर्वेदाचे ध्येय आहे. प्राचीन भारतात, आयुर्वेद ही वैद्यकशास्त्राची एक महत्त्वपूर्ण प्रणाली राहिली आहे. चरक, सुश्रुत आणि वाग्भट यांसारख्या प्रसिद्ध आयुर्वेदिक वैद्यांनी तिच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

"प्राचीन काळी औषधोपचार करण्याच्या पद्ध्तीबद्दल आयुर्वेदात आयुर्वेदिक पद्धती सांगितलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे

१. हर्बल औषध : विविध आजारांवर उपचार करण्यासाठी वनस्पती आणि औषधी वनस्पती वापरणे.

२. आहार आणि पोषण: वैयक्तिक घटना आणि आरोग्य परिस्थितीवर आधारित सानुकूलित आहार योजना.

३. योग आणि ध्यान शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक कल्याण वाढवणे.

४. पंचकर्म : शरीर शुद्धीकरण (डिटॉक्सिफिकेशन) आणि कायाकल्प उपचार.

निसर्गाशी सुसंगत राहून आणि संतुलित जीवनशैलीचा अवलंब करून शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक कल्याण मिळवणे हे आयुर्वेदाचे ध्येय आहे." [१]

२.६.२ धनुर्वेद

धनुर्वेद हे युद्धशास्त्राचे प्राचीन भारतीय विज्ञान आहे, जे वैदिक कालखंडात लिहिले गेले आहे. 'धनुर्वेद' या शब्दाचा अर्थ 'धनुर्विद्येचे शास्त्र' किंवा 'युद्धाचे ज्ञान' असा होतो. धनुर्वेदामध्ये युद्धाच्या विविध पैलूंचा समावेश आहे, ज्यात धनुष्याने बाण मारण्याचे तंत्र (धनुर्विद्या), ज्यात स्वभूमिका, पकड, लक्ष्य धरणे आणि तीर सोडणे समाविष्ट आहे. तसेच हाताने लढाई (मार्शल आर्ट्स), तलवारबाजी व इतर लढाऊ तंत्रे शिकवली जातात. लष्करी डावपेच, लढाया, वेढा आणि युद्धासाठी धोरणे ठरवणे, शस्त्रे, चिलखत आणि तटबंदीची रचना आणि बांधकाम इ. धनुर्वेद हा प्राचीन भारतीय शिक्षणाचा एक आवश्यक भाग होता.

धनुर्वेदात धनुर्वेद संहिता हे धनुर्विद्या आणि युद्धशास्त्रावरील सर्वसमावेशक ग्रंथ तर अगस्त्य शास्त्र हे तिरंदाजी आणि युद्धकलेवरील हे दोन ग्रंथ आहेत. धनुर्विद्या आणि युद्धशास्त्राच्या या प्राचीन विज्ञानापासून प्रेरणा घेत आहेत.

२.६.३ गंधर्ववेद

गंधर्ववेद (संस्कृत: गान्धर्ववेद) हे एक प्राचीन भारतीय कला आणि संगीत, नृत्य आणि सौंदर्यशास्त्र यांचे विज्ञान आहे. जे वैदिक कालखंडातील साधारणतः आहे. 'गंधर्ववेद' या शब्दाचा

अर्थ 'संगीताचे ज्ञान' किंवा 'सौंदर्याचे विज्ञान' असा होतो. गंधर्ववेदाचा वारसा आधुनिक भारतीय शास्त्रीय संगीत आणि नृत्य प्रकारांमध्ये पाहायला मिळतो, गंधर्ववेद हा प्राचीन भारतीय शिक्षणाचा एक आवश्यक भाग होता, विशेषतः गंधर्व (संगीतकार) वर्गासाठी. यात सर्जनशीलता, आत्म-अभिव्यक्ती आणि भावनिक बुद्धिमत्तेवर जोर देण्यात आला होता.

२.६.४ शिल्पवेद

स्थापत्य किंवा अभियांत्रिकी आणि बांधकामाचे प्राचीन भारतीय विज्ञान आहे. वैदिक कालखंडात साधारणतः लिहिले गेले असावे. हे सहा वेदांगांपैकी वेदांच्या सहायक शाखा म्हणून देखील ओळखले जाते. यात प्रामुख्याने इमारती आणि संरचनेचे आराखडे आणि नियोजन करण्याची तत्त्वे सामावलेले आहे. नैसर्गिक साहित्य आणि बांधकाम तंत्रांचा वापर करणे अभियांत्रिकीचा वापर करून पूल, कालवे आणि इतर संरचना बांधण्यासाठी अभियांत्रिकी तत्त्वांचा वापर करणे. मंदिरे आणि इमारतींची बांधकाम करणे हे महत्त्वाचे कार्य आहे. काही महत्त्वाचे ग्रंथ सामावले आहेत. १) स्थानपत्यवेद संहिता: आर्किटेक्चर, अभियांत्रिकी आणि बांधकाम यावरील सर्वसमावेशक ग्रंथ याबाबत. २) मायामतम : स्थापत्य आणि बांधकाम याबाबत ३) मानसरा : स्थापत्य आणि बांधकाम याबाबत ज्ञान दिलेले आहे.

हा प्राचीन भारतीय शिक्षणाचा अत्यावश्यक भाग होता. विशेषतः स्थापत्य (वास्तुविशारद) वर्गासाठी. यात सर्जनशीलता, नावीन्य आणि तपशीलाकडे लक्ष देण्यावर जोर देण्यात आला. अभियांत्रिकीने पूल, कालवे आणि इतर संरचना बांधण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. ज्यात मंदिरे, राजवाडे व त्याची तत्त्वे आणि तंत्रे दर्शविणाऱ्या संरचनांचा समावेश आहे.

२.७ दर्शनशास्त्र

'दर्शन' म्हणजे 'सत्याचे प्रत्यक्ष ज्ञान किंवा जग व जीवनाकडे पाहण्याची दृष्टी होय'. 'शास्त्र' म्हणजे नियमबद्ध ज्ञान होय. दर्शनशास्त्र म्हणजे सत्य, आत्मा, परमात्मा, विश्व आणि जीवन यांचे तात्त्वज्ञानिक चिंतन करणारे शास्त्र होय. दर्शनशास्त्रात प्रामुख्याने दोन प्रकार पडतात. त्यातील एक म्हणजे **आस्तिक दर्शन** आणि दुसरे **नास्तिक दर्शन** होय आस्तिक दर्शन हे वेदांना प्रमाण मानणारे तर नास्तिक दर्शन हे वेदांना प्रमाण न मानणारे आहे.

२.७.१ आस्तिक दर्शन

हे वेदांना प्रमाण मानणारे आहे. त्यामध्ये सहा प्रमुख दर्शने आहेत

१) न्याय दर्शन २) वैशेषिक दर्शन ३) सांख्य दर्शन ४) योगदर्शन ५) मीमांसा दर्शन ६) वेदान्त दर्शन

१) न्याय दर्शन

न्याय दर्शन हे षड्दर्शनांपैकी एक वैदिक दर्शन आहे, ज्याचे प्रवर्तक गौतम ऋषी आहेत आणि ते तर्कशास्त्र म्हणूनही ओळखले जाते. न्यायसूत्र हा त्याचा मूलभूत ग्रंथ असून, न्यायशास्त्रात प्रत्यक्ष, अनुमान, उपमान आणि शब्द ही चार ज्ञानप्राप्तीची साधने सांगितली आहेत. तर्काच्या साहाय्याने मोक्ष प्राप्त करता येतो असे सांगितले जाते.

२) वैशेषिक दर्शन

वैशेषिक दर्शन हे षड्दर्शनांपैकी एक आस्तिक दर्शन आहे, ज्याचे प्रवर्तक कणाद महर्षी आहेत आणि ते परमाणुवादावर आधारित आहे. वैशेषिकसूत्र हा मूलभूत ग्रंथ असून, जगतातील पदार्थांचे (द्रव्य, गुण, कर्म इ.) वैशिष्ट्यपूर्ण विश्लेषण करून मोक्षाचा मार्ग दाखवतो. विश्वाची रचना किंवा विश्वाचे स्पष्टीकरण अणू या संकल्पनेवर आधारित आहे. प्रत्येक वस्तू सूक्ष्म अणूंच्या एकत्रिकरणातून तयार होते.

३) सांख्य दर्शन

सांख्य दर्शन हे भारतीय षड्दर्शनांपैकी प्राचीन आस्तिक दर्शन आहे. ज्याचे प्रवर्तक कपिल मुनी आहेत. सांख्यदर्शनात मुख्य दोन घटक मानले जातात. सांख्यकारिका हा ईश्वरकृष्ण यांचा ग्रंथ मुख्य आधार असून, प्रकृती (भौतिक जग) आणि पुरुष (चेतना) ही दोन मूलतत्त्वे मानून २४ तत्त्वांची गणना करून मोक्षाचा विवेकमार्ग दाखवतो.

४) योगदर्शन

योगदर्शन हे षड्दर्शनांपैकी एक आस्तिक दर्शन आहे. ज्याचे प्रवर्तक महर्षी पतंजली आहेत. योगसूत्र हा त्याचा मूलभूत ग्रंथ आहे. 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः' ह्या सूत्राद्वारे चित्ताच्या चंचल वृत्तींचा निरोध करून कैवल्य (मोक्ष) साध्य करण्याचा मार्ग दाखवला जातो. योगदर्शन सांख्यशास्त्राशी जोडलेले आहे, पण त्यात ध्यान, शारीरिक आणि मानसिक स्थितीवर भर दिला जातो. योगाची आठ अंगे सांगितली आहेत. ती पुढील प्रमाणे यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी ही सांगितली आहे. याबरोबरच योगाच्या शाखाही पुढीलप्रमाणे आलेल्या आहेत.

"१. राजयोग : शाहीमार्ग, जो ध्यान आणि चिंतनावर भर देतो.
२. हठयोग : शारीरिक मार्ग, जो आसन आणि श्वास नियंत्रणावर भर देतो.
३. भक्तियोग : भक्तिमार्ग, जो प्रेम आणि भक्तिवर जोर देतो.
४. कर्मयोग : कृतीचा मार्ग, जो निःस्वार्थ कृतीवर जोर देतो.
५. ज्ञानयोग : ज्ञानाचा मार्ग, जो बौद्धिक आकलनावर भर देतो."[२]

५) मीमांसा दर्शन

मीमांसा दर्शन हे षड्दर्शनांपैकी एक आस्तिकदर्शन आहे. यालाच पूर्वमीमांसा दर्शन म्हणून ओळखले जाते ज्याचे प्रवर्तक जैमिनी मुनी आहेत. पूर्व मीमांसा वेदांच्या कर्मकांडावर आधारित आहे वेदांमध्ये दिलेल्या कर्मकांडांची पूजा, यज्ञ याद्वारे पालन केल्यास मोक्ष प्राप्त होतो वेदांचे प्रामाण्य हे शाश्वत आणि सर्वोच्च मानले जाते.

"वेदांचे प्रामाण्य आणि आत्म्याचे अमरत्व मानणाऱ्या सहा दर्शनांपैकी एक दर्शन. वेदांचे मुख्यतः दोन विषय : धार्मिक कर्म आणि धार्मिक तत्त्वज्ञान. धार्मिक कर्म हा विषय वेदांच्या ज्या पूर्व भागामध्ये प्रतिपादिला आहे त्याची मीमांसा या दर्शनात केली आहे, म्हणून यास पूर्वमीमांसा म्हणतात. आणि वेदांच्या उत्तर भागात म्हणजे अखेरच्या भागात धार्मिक तत्त्वज्ञान प्रतिपादिले आहे. पूर्व भाग फार मोठा आहे आणि उत्तर भाग छोटा आहे. या छोट्या भागास वेदान्त किंवा उपनिषद म्हणतात. वेदान्ताची मीमांसा म्हणजे उत्तरमीमांसा होय.

पाणिनीच्या व्याकरणाप्रमाणे मीमांसा म्हणजे पूजित विचार होय. पूजित म्हणजे तर्कशुद्ध विचार होय. वेद आणि वेदान्त यांतील धार्मिक कर्मांविषयी अथवा धार्मिक तत्त्वज्ञानाविषयी असलेली विधाने इतस्ततः विखुरलेली आहेत. त्यांची सुसंगत मांडणी करण्याच्या बाबतीत संभ्रम उत्पन्न होतो म्हणून वैदिक विधानांमध्ये सुसंगती स्थापन करण्याकरिता वेदवाक्यांची मीमांसा वेदकालाच्या अखेरच्या कालखंडात सुरू झाली व वेदोत्तरकाली विकास पावली. या मीमांसेतून वाक्यमीमांसेचे अनेक सिद्धांत निर्माण झाले. या सिद्धांतांची विषयवारीने मांडणी करून जे शास्त्र तयार झाले, त्यास मीमांसाशास्त्र म्हणतात.

तात्पर्य, वेदार्थांच्या निर्णयाचे शास्त्र म्हणजे मीमांसा होय. वेदवाक्यांच्या अर्थांच्या निर्णयास उपयोगी जे सिद्धांत किंवा नियम तयार झाले त्यांस 'न्याय' अशी संज्ञा आहे. वेदांतील शब्दांचे, वाक्यांचे आणि प्रकरणांचे अर्थ कसे करावेत यांसंबंधाचे नियम म्हणजे हे न्याय होत. मीमांसा हे वाक्यार्थांचे तर्कशास्त्र असून आधुनिक पश्चिमी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने मीमांसा हे भाषेचे, विशेषतः धार्मिक भाषेचे, तत्त्वज्ञान होय. भाषाशास्त्राचे काही आधुनिक तत्त्वज्ञानी भाषेची तात्त्विक चिकित्सा हाच सर्व तत्त्वज्ञानांचा आधार होय, असे मानतात.

या लेखात मीमांसक म्हणजे दोन्ही मीमांसा मानणारे असा अर्थ समजावा आणि पूर्वमीमांसक म्हणजे जे उत्तरमीमांसेचे सिद्धांत न स्वीकारता केवळ पूर्वमीमांसाच प्रमाण धरून चर्चा करतात किंवा उत्तरमीमांसेकडे दुर्लक्ष करून विचार करतात किंवा पूर्वमीमांसेचे सिद्धांत मुख्य धरून त्यांच्याशी सुसंगत असे उत्तरमीमांसेचे व्युत्पादन करतात, ते होत. पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा या शास्त्रांवरील सर्वांत प्राचीन असे दोनच ग्रंथ आज उपलब्ध आहेत. ते म्हणजे

जैमिनीची १२ अध्यायांची पूर्वमीमांसा (इ.स.पू.सु. तिसरे शतक) व बादरायण व्यासाची ४ अध्यायांची उत्तरमीमांसा (इ.स.सु. दुसरे शतक).

जैमिनी व बादरायण यांच्या ह्या ग्रंथांची रचना सूत्रपद्धतीची आहे. सूत्र म्हणजे अल्पाक्षरात मांडलेले, निश्चित, सारभूत, व्यापक अर्थाचे, निर्दोष वाक्य होय. पूर्वमीमांसेस धर्ममीमांसा आणि कर्ममीमांसा असेही म्हणतात. पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा मिळून एकच शास्त्र आहे, असे एक मत प्रथमपासून प्रचलित आहे. उलट या दोन मीमांसा म्हणजे दोन भिन्न शास्त्रे होत, असे आपले स्पष्ट मत आद्य शंकराचार्यांनी आपल्या शारीरकभाष्यनामक उत्तरमीमांसेच्या प्रथम सूत्राच्या भाष्यात आग्रहाने मांडले आहे. परंतु बादरायणाच्या उत्तरमीमांसेत वेदान्त वाक्यांची मीमांसा करीत असताना पूर्वमीमांसेच्या नियमांप्रमाणे ब्रह्मविषयक आध्यात्मिक तत्त्वज्ञान किंवा सत्ताशास्त्र मांडले आहे. जैमिनीच्या पूर्वमीमांसेत आध्यात्मिक तत्त्वज्ञान किंवा सत्ताशास्त्र मांडलेले नाही परंतु धर्माच्या ज्ञानाचे प्रमाण कोणते हे सांगण्याकरिता ज्ञानाच्या साधनांचा म्हणजे प्रमाणांचा संक्षेपाने निर्देश करून शब्दप्रमाण म्हणजे वेद हेच धर्मज्ञानाचे प्रमाण होय, असे सांगितले आहे वेद हेच धर्माचे प्रमाण सांगण्याच्या संदर्भात थोडी ज्ञानमीमांसा हा तत्त्वज्ञानाचा भाग येतो केवळ वेदवाक्यांच्या अर्थाची मीमांसा करून कर्मकांडाची व्यवस्थित मांडणी कशी करावी आणि त्याकरिता शब्दार्थाचे व वाक्यार्थांचे कोणते नियम ध्यानात घ्यावे, हे मुख्यतः पूर्वमीमांसेत सांगितले आहे.

पूर्वमीमांसेचे तत्त्वज्ञान संपूर्णपणे मुख्यतः कुमारिल भट्ट (सु. सातवे-आठवे शतक) व त्यानंतर प्रभाकर भट्ट (सु. सातवे-आठवे शतक) यांनी मांडले आहे. या तत्त्वज्ञानात प्रमाणविद्या आणि वस्तुतत्त्वज्ञान या दोहोंचा समावेश केलेला आहे. प्रमाणविद्या व वस्तुतत्त्वविद्या मिळून पूर्वमीमांसेचे धार्मिक तत्त्वज्ञान निष्पन्न झाले आहे.

पूर्वमीमांसेचे 'अथातो धर्मजिज्ञासा' हे पहिले सूत्र आहे. याचे स्पष्टीकरण असे : '(अथ) वेदाध्ययनानंतर, (अतः) या कारणास्तव, वेदाध्ययन केले असल्यामुळे,(धर्मजिज्ञासा) धर्माचा विचार करणे आवश्यक असते.' दुसरे सूत्र : 'चोदनालक्षणोऽर्थो धर्मः.' लक्षण म्हणजे प्रमाण होय धर्माचे प्रमाण म्हणजे धर्माच्या ज्ञानाचे साधन, चोदना म्हणजे प्रेरक वाक्य होय. प्रेरक वाक्य म्हणजे कर्तव्याचे बोधक वाक्य होय धर्म म्हणजे कर्तव्य. धर्म शब्दाने लक्षणेने कर्तव्य आणि अकर्तव्य वा अधर्म ही दोन्हीही सूचित केलेली आहेत. कर्तव्य हे विधायक वाक्याने आणि अकर्तव्य हे निषेधक वाक्याने कळते. केवळ मानवी बुद्धीने म्हणजे प्रत्यक्ष प्रमाण व अनुमान प्रमाण यांच्या योगाने कर्तव्य व अकर्तव्य यांचा बोध होऊ शकत नसतो. तसा बोध होऊ शकत असल्यास वेदरूपी शब्दप्रमाणाची आवश्यकताच उरणार नाही. प्रत्यक्ष व अनुमान ही मानवी

ज्ञानाची साधने लौकिक प्रमाणे होत. सत्यवादी मनुष्याला स्वर्गप्राप्ती होते आणि हिंसक मनुष्यास नरकप्राप्ती होते ही गोष्ट मानवी बुद्धीला गम्य नाही. म्हणून सत्यभाषण करणे हा धर्म आणि हिंसा हा अधर्म होय, हे कळण्याकरिता अलौकिक प्रमाणच पाहिजे. अलौकिक प्रमाण म्हणजे वेदच.

प्रमाण पदाची मीमांसकांची व्याख्या अशी : जी वस्तू इतर ज्ञानसाधनांनी ज्ञात वा निश्चित होत नाही (अनधिगत), आणि इतर ज्ञानसाधनांनी बाधित होत नाही म्हणजे खोटी ठरत नाही (अबाधित), त्या वस्तूच्या निश्चित व यथार्थ ज्ञानाचे साधन म्हणजे प्रमाण होय. ज्ञान शब्दाने संशय व निर्णय या दोन्हींचा निर्देश होऊ शकतो म्हणून निश्चित हे विशेषण पाहिजे. वेद हे अलौकिक प्रमाणग्रंथ होत ते अपौरुषेय आहेत. पौरुषेय म्हणजे पुरुषाने केलेले पुरुष म्हणजे माणूस वा ईश्वर. वेद माणसांनी केलेले नाहीत. कारण स्वर्गनरकांचा भोग घेणारा देहभिन्न आत्मा, कर्तव्याकर्तव्याचे अदृष्ट परिणाम इ. अतींद्रिय पदार्थांचे ज्ञान माणसांना होऊ शकत नाही. अशा स्थितीत वेद हे अशा अतींद्रिय पदार्थांचे अस्तित्व गृहीत धरूनच धर्मज्ञान देतात म्हणून ते मनुष्यप्रणीत नाहीत. वेद हे ईश्वरप्रणीत आहेत असे काही तत्त्वज्ञाने उदा., न्याय-वैशेषिक, वैष्णव, शैव इ. म्हणतात. मीमांसक हे वेद ईश्वरप्रणीतही नाहीत असे मानतात. कारण ईश्वर आहे याचे निश्चित प्रमाण मानवी बुद्धी असू शकत नाही. मानवी बुद्धी ईश्वराचे अस्तित्व ज्या तर्कवितर्काने ठरविते, म्हणजे अनुमानांनी ठरविते, ते तर्कवितर्क किंवा ती अनुमाने विरुद्ध तर्कवितर्कांनी वा अनुमानांनी सदोष ठरतात. म्हणून ईश्वर आहे हे केवळ वेदांनीच ठरविता येते आणि वेद हे प्रमाण आहेत, हे मानल्याशिवाय ईश्वराचे अस्तित्व निश्चितपणे सिद्ध होत नाही. वेद स्वतःप्रमाण न मानल्यास अन्योन्याश्रय हा तर्कदोष उत्पन्न होतो. म्हणजे असे, की ईश्वर हा वेदांचाप्रणेता मानला, तर वेद हे प्रमाण ठरतात आणि उलट वेद हे प्रमाण मानले तरच ईश्वराचे अस्तित्व सिद्ध होते. वरील अन्योन्याश्रय दोष हा केवळ ईश्वरवादी दार्शनिकांवर येत नाही तर तो बौद्ध व जैन यांच्यावरही येतो. कारण बौद्ध व जैन सृष्टिनिर्माता ईश्वर मानत नसले, तरी त्यांचे धर्मग्रंथ सर्वज्ञ बुद्धादी सिद्धांनी निर्माण केले म्हणून प्रमाण मानतात परंतु मीमांसकांनी म्हटल्याप्रमाणे माणसे असर्वज्ञ असतात, म्हणून त्यांना सर्वज्ञ म्हणजे काय हे सांगता येणार नाही. सर्वज्ञांचे अस्तित्व धर्मग्रंथांनीच सिद्ध होते. ही अन्योन्याश्रयाची अनिष्टापत्ती टाळण्याकरिता पूर्वोत्तर मीमांसकांनी वेद हे अपौरुषेय मानले. नुसते अपौरुषेय मानून भागत नाही, ते नित्य आहेत म्हणजे कधीच निर्माण झाले नाहीत, ते अनादी कालापासून अस्तित्वात आहेत असे मानावे लागते. यावर असा आक्षेप येतो, की वेद हे अनादी, नित्य मानता येत नाहीत. कारण सृष्टीच्या उत्पत्ति-स्थिति-लयांचे चक्र सुरू असते. सृष्टी अगोदर नसते, नंतर उत्पन्न होते, काही काळ राहते आणि काही काळाने लय पावते, हे चक्र सुरू राहते. जेव्हा सृष्टी नसते तेव्हा वेद कुठे असणार? वेद हे गुरूकडून शिष्याकडे

जात असतात. सृष्टी नसताना गुरू आणि शिष्य दोन्ही नसतात. यावर मीमांसकांचे उत्तर असे, की सृष्टीच्या उत्पत्ति-स्थिति-लयांचे चक्र चालू राहते, हा सिद्धांत आम्हास मान्य नाही. उत्पत्ति-स्थिति-लयांचे चक्र हे मर्यादित प्रमाणात चालते, ते सर्व सृष्टीला लागू नाही म्हणून अनादी गुरू-शिष्यपरंपरेने वेद हे सुरक्षित राहतात. उत्तरमीमांसक म्हणजे वेदान्ती. हे सृष्टीच्या उत्पत्ति-स्थिति-लयांचे चक्र चालूच राहते असे मानतात आणि हे चक्र चालू ठेवणाऱ्या ईश्वराचे अस्तित्व मानतात. म्हणून जेव्हा सृष्टी नसते तेव्हा वेद हे ईश्वराच्या बुद्धीत राहतात आणि ईश्वर हा मागील सृष्टी किंवा पुन्हा या सृष्टीत जन्मलेले तपस्वी, योगी वा भक्त अशा ऋषींना प्रसन्न होऊन प्रत्येक सृष्टीच्या प्रारंभी ते वेद शिकवितो. वेद हे ईश्वराने ऋषींना दिलेला प्रसाद आहे. भगवान बुद्ध, महावीर ई. सर्वज्ञसिद्ध यांचे अस्तित्व मानवी बुद्धीने सिद्ध होऊ शकत नाही म्हणून त्यांचे ग्रंथ प्रमाणभूत ठरत नाहीत. वरील अन्योन्याश्रयाचा दोष बायबल, कुराण इ. ग्रंथ मानणाऱ्यांवरही येतो वेद हे अपौरुषेय व नित्य आहेत, असे मानणाऱ्या मीमांसकांवर येत नाही. परंतु वेद नित्य व म्हणून प्रमाण, हे युक्तिवादाने सिद्ध करणे अशक्य आहे. वेद हे प्रमाण आहेत, अशी वैदिक धर्मानुयायांची श्रद्धा आहे. त्या श्रद्धेचे समर्थन करण्याकरिता मीमांसकांनी वेदनित्यत्वाचा युक्तिवाद मांडला आहे. वस्तुतः इतर बौद्ध, जैन, यहुदी, ख्रिस्ती यांचे ग्रंथप्रामाण्यही असेच केवळ श्रद्धेवर आधारलेले आहे. परंतु कोणत्याही धर्माचा युक्तिवाद दुर्बलच असतो. वेद नित्य मानण्यावर असा आक्षेप येतो, की वेद हे शब्द आहेत शब्द हे अनित्य व निर्मिलेले असतात म्हणून वेद अनित्य आहेत, उदा., महाभारत हे व्यासनिर्मित आहे. हा आक्षेप निरस्त करण्याकरिता मीमांसक शब्द म्हणजे वर्ण हे नित्य मानतात. वर्ण नित्य वेद हे वर्णात्मक म्हणून वेद नित्य असे सिद्ध होते. त्यावर पुन्हा आक्षेप असा येतो, की सर्वच सज्जन-दुर्जन बोलतात त्यामुळे त्यांची वाक्येही वेदवत् नित्य म्हणून प्रमाण मानावी लागतील.

वेद म्हणजे श्रुती. मीमांसक आणि इतर सर्व वेद प्रमाण मानणारे भारतीय दार्शनिक हे श्रुतीबरोबर मन्वादिकांच्या स्मृती व सदाचार हीही धर्माची प्रमाणे होत, असे मानतात. मन्वादिकांच्या स्मृती हे वेद नव्हेत, ते ऋषिप्रणीत ग्रंथ आहेत. त्यांचे प्रामाण्य मानायचे कारण, ते ग्रंथ हे वेदमूलक आहेत म्हणून स्वीकारले आहेत. परंतु आज उपलब्ध असलेल्या वेदांमध्ये स्मृतींतील अनेक उपदेश सापडत नाहीत. याचे कारण आपणास स्मृतींना मूलभूत असलेले काही वेद वा वेदभाग आज उपलब्ध होत नाहीत. परंतु स्मृतिकारांना ते उपलब्ध होते ते नष्ट झाले आहेत किंवा आपल्या दृष्टीच्या आड (प्रच्छन्न) झाले आहेत असे कुमारिल भट्ट म्हणतात. प्रभाकर भट्टांच्या मते स्मृतींचे मूलभूत वेदभाग आपणास उपलब्ध होत नसले, तरी ते आहेतच, ते आपणास प्रत्यक्ष कळत नाहीत, त्यांचे स्मृतींवरून अनुमान होते. वेदांवर अनन्य निष्ठा असलेल्या

ऋषींनी स्मृती निर्माण केल्या आहेत म्हणून स्मृती ह्या वेदमूलकच आहेत, असे सर्व मीमांसकांचे मत आहे. सदाचार हे वेदांवर निष्ठा असलेल्या व्यक्तींनी आचरलेले असल्यामुळे ते वेदमूलकच असले पाहिजेत. सदाचार म्हणजे शिष्टांचे आचार होत आणि शिष्ट म्हणजे वेदांचे प्रामाण्य मानणारा. ज्या शिष्टाचारांच्या मुळाशी पारलौकिक हिताचा दृष्टिकोन असतो आणि केवळ ऐहिक हितसंबंधांचा विचार नसतो, तेच सदाचार म्हणून प्रमाण होत.

श्रुती, स्मृती व सदाचार हे तीनही धर्माचे अलौकिक असे प्रमाण होय, असे मीमांसक मानतात. स्मृती या शब्दाने मन्वादिस्मृतींचे ग्रंथ, महाभारत, रामायण, अष्टादशपुराणे, साक्षात वेदविरोधी नसलेले तंत्रागमांचे ग्रंथ आणि उपपुराणे येतात. पूर्वमीमांसेत केवळ वेदवाक्यांचाच अर्थनिर्णय करण्याचे नियम सांगितलेले असले, तरी ते नियम स्मृतींनाही लागू करून त्यांचा सुसंगत अर्थनिर्णय करण्याचा प्रयत्न स्मृतींच्या टीकाकारांनी आणि धर्मशास्त्रनिबंधकारांनी केला आहे, ही गोष्ट सुसंगतच ठरते. वेदवाक्यांचे पृथक्करण मीमांसकांनी केले आहे. मंत्र आणि ब्राह्मण असे हे पहिले पृथक्करण होय. चारही वेदांमध्ये मंत्र आणि ब्राह्मण हे दोन्हीही प्रकार आहेत. काही मंत्र 'ऋक्' (ऋचा) म्हणजे पद्यात्मक, छंदोबद्ध आणि काही मंत्र 'यजुः' म्हणजे गद्यात्मक असतात. ऋग्वेद संहिता, सामवेद संहिता व अथर्ववेद संहिता यांच्यामध्ये असलेले बहुतेक मंत्र पद्यात्मक आहेत. 'ऋतं च सत्यं च' हा मंत्र सोडल्यास ऋग्वेदातील सर्वच मंत्र पद्यात्मक आहेत. यजुर्वेदातील बहुतेक मंत्र गद्यात्मक आहेत. बहुतेक म्हणण्याचे कारण, त्यात काही ऋचा म्हणजे पद्यात्मक मंत्र आहेत. वेदवाक्यांचे विधी, मंत्र, नामधेय, निषेध आणि अर्थवाद असे अर्थदृष्ट्या पाच विभाग होतात. वेदाचा तात्पर्यार्थ या पाची भागांचा एकत्र विचार करूनच ठरतो. कारण सर्वच वेदवाक्यांना अर्थ असतो. यात साधन आणि इष्ट असे साध्य (प्रयोजन) या दोघांचाही अंतर्भाव होतो. शिवाय वेद जे जे सांगतो ते ते सप्रयोजन असते. वेद हा निष्प्रयोजन (अनर्थक) असेल, तर वेदाचे अध्ययन कोणी करणार नाही. माणसांची प्रवृत्ती किंवा निवृत्ती ही काहीतरी प्रयोजनाशिवाय होऊ शकत नाही. नुसते प्रयोजन सांगितले आणि त्या प्रयोजनाचे साधन सांगितले नाही, तरी मनुष्य वेदाध्ययनार्थ प्रवृत्त होणार नाही म्हणून वेद प्रमाण आहे याचा अर्थ मीमांसक असा करतात, की वेदात जे जे सांगितले आहे ते अनधिगत व अबाधित सत्य आहे त्या सत्यात प्रयोजनाचाही अंतर्भाव होतो आणि हे सत्य इतर कोणत्याही प्रमाणाने म्हणजे मानवी बुद्धीने निश्चितपणे समजत नाही केवळ वेदानेच निश्चितपणे समजते म्हणजे वेद हा 'अज्ञातज्ञापक' आहे त्याचप्रमाणे वेद जे जे सांगतो ते इतर कोणत्याही प्रमाणाने म्हणजे मानवी बुद्धीने चुकीचे ठरत नाही म्हणजे ते 'अबाधित' असते. हित आणि अहितनिवारण हे प्रयोजनाचे दोन प्रकार.

विधी व निषेध ही वाक्ये मुख्य म्हणजे केंद्रस्थानी होत. विधिवाक्याने इष्ट प्राप्त होण्याकरिता क्रिया करण्याची आज्ञा दिलेली असते. ही क्रिया करणे, म्हणजे प्रवृत्ती होय आणि निषेध वाक्याने विशिष्ट अनिष्टकारक क्रिया न करण्याची आज्ञा दिलेली असते. क्वचित विधिशब्दाने विधी व निषेध हे दोन्ही सांगितलेले असतात. या दोन्हीं आज्ञा होत. वेदाने सांगितलेली प्रवृत्ती म्हणजे धर्म आणि निवृत्ती अधर्म होय. वेदांचे धर्म व अधर्म हे दोन मुख्य प्रतिपाद्य विषय होत. वेदांत मुख्यतः यज्ञधर्म सांगितले आहेत यज्ञाने इष्टफलप्राप्ती होते आणि निषिद्ध कर्मांपासून निवृत्त झाल्याने अनिष्ट फल प्राप्त होत नाही. इष्ट फले दोन प्रकारची, सुख वा दुःखाभाव हे मुख्य साध्य वा प्रयोजन होय. साधनास प्रयोजन हा शब्द जेव्हा लागतो, तेव्हा तो वाच्यार्थाने लागत नसतो. यज्ञाने सुख आणि सुखसाधने प्राप्त होतात व अधर्मापासून निवृत्ती झाल्याने दुःख होत नाही. निषिद्ध कर्म आचरल्यास त्यापासून उत्पन्न होणाऱ्या पापाच्या नाशाची कर्मे म्हणजे प्रायश्चित्ते विधिवाक्याने सांगितलेली असतात. प्रायश्चित्तांनी पापनाश होऊन दुःखनाश होतो.

विधिवाक्याने यज्ञरूप कर्म, यज्ञकर्मांचे फल आणि कर्माचा फल मिळवू इच्छिणारा अधिकारी सांगितलेला असतो. यज्ञ किंवा याग म्हणजे विशिष्ट देवतेच्या उद्देशाने, विशिष्ट द्रव्याचा त्याग होय. याग हा यज्ञाचाच पर्यायशब्द आहे. उदा., सोमयाग म्हणजे इंद्र इ. देवतांकरिता करावयाचा सोमरसरूप द्रव्याचा त्याग होय. त्याग करून सोमरसाचा अग्नीमध्ये प्रक्षेप होतो म्हणजे सोमरसाची आहुती अग्नीमध्ये टाकली जाते. या प्रक्षेपास होम म्हणतात. देवतेला अर्पण करण्याच्या द्रव्यावरील आपले स्वत्व मनाने काढून घेणे आणि देवतेचे स्वत्व उत्पन्न करणे म्हणजे त्याग होय. त्याग ही मानसिक क्रिया आहे आणि प्रक्षेप ही बाह्य क्रिया आहे. याग किंवा यज्ञ या शब्दाच्या अर्थात त्याग व प्रक्षेप या दोहोंचा अंतर्भाव अनेकदा होतो म्हणून त्यास 'नृसिंहाकार' म्हणतात. द्रव्य, देवता आणि यज्ञाचा अधिकारी-यजमान आणि त्याचप्रमाणे यजमानाला साहाय्यभूक असणारे ऋत्विज ही यज्ञांगे होत. यज्ञकर्मांचे प्रधानकर्म व अंगकर्म असे दोन प्रकार होत. या दोन प्रकारच्या कर्मांची विधिवाक्ये प्रधानविधी व अंगविधी या संज्ञांनी बोधित होतात. विधिवाक्यांचे आणखी उत्पत्तिविधी, विनियोगविधी, प्रयोगविधी व अधिकारविधी असे चार प्रकार होतात. उत्पत्तिविधी म्हणजे कर्मांचेच केवळ स्वरूप दाखविणारा विधी. उदा., 'अग्निहोत्रं जुहोति' या वाक्याने अग्निहोत्र कर्माचा बोध करून दिला आहे. या वाक्याचा अर्थ 'अग्निहोत्र होम करावा' असा आहे. 'जुहोति ' म्हणजे 'जुहुयात्.' कोणतीही आज्ञा म्हणजे विधी सामान्यपणे फलबोधक असतो कारण फलाचे ज्ञान झाल्याशिवाय माणूस कर्मास प्रवृत्त होत नसतो. विधिवाक्य हे प्रवर्तक असते कारण ते प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे

फलबोधक असते. उत्पत्तिविधीमध्ये फल आणि कर्म यांचा संबंध सूचित केलेला असतो. ‘ अग्निहोत्रहोमाने इष्ट फल प्राप्त करून घ्यावे,’ असे वरील वेदवाक्याचे तात्पर्य आहे. दुसरा विनियोगविधी होय. हा विधी अंग व प्रधान यांचा संबंध सांगतो. उदा., ‘दध्ना जुहोति’ – ‘दह्याने होम (अग्निहोत्र) करावा.’ या वाक्याने दधी हे द्रव्य होम या प्रधान कर्माचे अंग आहे, असे सांगितले आहे. तिसरा प्रयोगविधी होय. अंगकर्मे आणि प्रधान कर्मे यांचा क्रम सांगणारा विधी प्रयोगविधी होय. हा क्रम सांगितला, म्हणजे निरनिराळी कर्मे अविलंबाने करता येतात. कर्मांचा क्रम प्रत्यक्ष वाक्यांनी सांगितलेला असतो किंवा एकंदर संदर्भ पाहून तो ध्यानात घ्यावा लागतो. उदा., ‘वेदं कृत्वा वेदिं करोति’ – येथे वेद म्हणजे दर्भांची जुडी ती अगोदर बांधून मग यज्ञवेदी निर्माण करावी, असे तात्पर्य. यात क्रम प्रत्यक्ष दाखविला आहे. काही ठिकाणी निरनिराळी कर्मे क्रमाने सांगितलेली असतात परंतु क्रम काय असावा हे शब्दाने सांगितलेले नसते ते अनुमानांनी ठरवावयाचे असते. चौथा अधिकारविधी होय. फलाचे स्वाम्य सांगणारा अधिकारविधी होय किंवा कर्ता आणि कर्म-फल यांचा संबंध बोधित करणारा विधी म्हणजे अधिकारविधी होय. उदा., ‘ज्योतिष्टोमेन स्वर्गकामो यजेत’ – ‘स्वर्गाची कामना करणाऱ्याने ज्योतिष्टोम यज्ञ करावा.’ या वाक्यात स्वर्गकामना करणारा अधिकारी आणि स्वर्ग हे फल यांचा संबंध बोधित केला आहे. म्हणजे असे ध्यानात येते, की ज्योतिष्टोम यज्ञ करणारा स्वर्गरूप फलाचा स्वामी होतो. ज्याविषयी काय करावे? आणि काय करू नये? या संबंधीचा निर्णय मनुष्याला स्वतःच्या बुद्धीने आणि स्वतःच्या इच्छेनेच करता येतो, त्यासंबंधी वेद विधिनिषेधात्मक आज्ञा देत नसतो. मनुष्याला स्वतःच्या मनाने जे कर्तव्य ठरविता येते त्यास ‘रागतः प्राप्त’ असे म्हणतात. शास्त्र म्हणजे वेद जे ‘रागतः प्राप्त’ नाही, असेच प्रवृत्तिरूप किंवा निवृत्तिरूप कर्तव्य शास्त्र सांगते. हा नियम ध्यानात धरून विधीचे पुन्हा तीन प्रकारांमध्ये वर्गीकरण मीमांसकांनी केले आहे. ते म्हणजे अपूर्वविधी, नियमविधी व परिसंख्याविधी. ‘यजेत स्वर्गकामः ’ – स्वर्गाची कामना असलेल्याने यज्ञ करावा.’ या वाक्यात यज्ञाने स्वर्ग मिळतो, यज्ञाचे फल स्वर्ग आहे, ही गोष्ट मनुष्याला अत्यंत नवीन आहे त्याला हे स्वबुद्धीने निसर्गतः कळू शकत नाही म्हणून हा अपूर्वविधी होय. ‘अपूर्व’ म्हणजे वेदाचे ज्ञान होण्यापूर्वी रागतः प्राप्त न होणारे कर्तव्य, या वाक्यात सांगितले आहे. दुसरा नियमविधी होय. क्रियेचे अनेक पर्याय (पक्ष) प्राप्त असता एकच पर्याय सांगणारा विधी नियमविधी होय. वेदवाक्यांचा अर्थ करत असता लाघवाने अर्थ करावा असा मीमांसासिद्धांत आहे. म्हणजे असे, की वेदवाक्यांचा अर्थ करताना कमीतकमी जेवढा अर्थ संभवतो तोच स्वीकारावयाचा असतो. अडचण दिसली, तरच अधिक अर्थ स्वीकारावा यास लाघवाचा सिद्धांत म्हणतात. या नियमाप्रमाणे यज्ञास उपयुक्त क्रियेचे वा द्रव्याचे अनेक पर्याय माणसास स्वबुद्धीने कळतात

त्यांपैगी एकच पर्याय ज्या वाक्याने सूचित होतो तो नियमविधी होय. उदा., 'व्रीहीन् अवहन्ति' – 'भाताची साळ कांडावी.' 'दर्शपूर्णमास ' नामक यज्ञामध्ये पुरोडाश (एक प्रकारची भाकरी) तयार करण्याकरिता तांदूळाचे पीठ लागते. साळ कांडून तांदूळ घ्यावेत, असे वरील वाक्यावरून लक्षात येते. तांदूळ जसे कांडून काढता येतात, त्याप्रमाणे नखाने किंवा भरडून अथवा इतर प्रकारानेही काढता येतात. हे पर्याय होत अशा पर्यायास 'पक्ष' अशी संज्ञा आहे. यज्ञ करणारा या अनेक पर्यायांपैकी एक वा अनेक पर्याय स्वीकारून तांदूळ मिळवू शकतो. कांडून तांदूळ तयार करावेत, ही गोष्ट माणसाला स्वबुद्धीने एक पर्याय म्हणून ज्ञात (प्राप्त) होऊ शकते अशा स्थितीत अशा विधिवाक्याची आवश्यकता नाही. त्यावर उत्तर असे, की कांडूनच तांदूळ घ्यावे, असा या विधिवाक्याचा अर्थ आहे. अनेक पर्याय असताना हा एकच पर्याय नियमाने का घ्यावा, हे मनुष्याला स्वबुद्धीने सांगता येणार नाही हे शास्त्रच सांगू शकते. कांडणे हा एक पर्याय म्हणजे 'पक्षे प्राप्त' असतो. तिसरा परिसंख्याविधी होय. परिसंख्या म्हणजे मर्यादा सांगणारा विधी. 'पंच पंचनखाः भक्ष्याः ' – 'पाच नखे असणारे पाच प्राणी खावे,' असे स्मृतीत सांगितले आहे. हे पाच नखांचे पाच भक्ष्य प्राणी म्हणजे घोरपड, कासव, ससा, गेंडा आणि साळ (सायाळ) हे होत. माणसांना निसर्गतःच मांसाशन आवडते म्हणजे ते रागतः प्राप्त (अधिगत) आहे त्याकरिता शास्त्रवाक्याची गरज नाही असा आक्षेप उत्पन्न होतो. त्यावर उत्तर असे, की मांसाहार करणाऱ्या माणसांनी वर निर्दिष्ट केलेल्या प्राण्यांशिवाय अन्य पंचनख प्राणी खाऊ नयेत, एवढाच या वाक्याचा अर्थ समजावा. पाच नखांचे पाच प्राणी खावेच, असा याचा अर्थ नाही. नाही खाल्ले तरी चालेल. इतर पंचनख प्राण्यांचा निषेध व वरील पाच पंचनख प्राण्यांपुरती मर्यादा या वाक्याने सूचित होते. विधायक दिसणाऱ्या काही शास्त्रवाक्यांचा असा अन्यनिषेधपर अर्थ करणे आवश्यक असते. काही वाक्य आपाततः विधिवाक्ये दिसतात परंतु त्यांचे तात्पर्य निषेध हेच असते. अशा वाक्यास 'उभयतः प्राप्त' सांगणारे वाक्य म्हणतात. म्हणजे असे, की या वाक्याने पाच पंचनख प्राणी खाण्यास सांगितले आहे हे प्राणी खावे हे (१) रागतः व (२) वाक्यानेही प्राप्त अशी येथे उभयतः प्राप्ती सिद्ध होते. उभयतः प्राप्ती याचा दुसरा अर्थ : वरील पाच पंचनख प्राणी व अन्य पंचनख प्राणी (उभयतः प्राप्त) खावेसे वाटतात म्हणून वरील पाचांपुरती मर्यादा घातली.

वेदांच्या पाच प्रकारच्या वाक्यांपैकी 'मंत्र' हा दुसरा प्रकार. मंत्र हा आज्ञापक नसतो. यज्ञात जे काही करायचे असते, त्याचे किंवा ज्या देवता, द्रव्ये आणि कृती यांचा संबंध यज्ञाशी असतो त्यांचे स्मरण मंत्राने होते कारण त्यांचा मंत्रामध्ये निर्देश असतो. मंत्रांवाचूनही ह्या गोष्टी लक्षात राहतात आणि मंत्रही त्या लक्षात आणून देतात परंतु यज्ञात मंत्र म्हटलेच पाहिजेत अन्यथा मंत्र अनर्थक म्हणजे निरुपयोगी ठरतात. सर्व वेद म्हणजे वेदवाक्ये अर्थयुक्त म्हणजे सप्रयोजन

आहेत या गृहीत कृत्याशी सुसंगत असा, मंत्र म्हटलेच पाहिजेत, हा विचार होय. मंत्राची काही उदाहरणे अशी : 'अग्नेये जुष्टं निर्वपामि' – 'अग्नीला आवडणारे मी वेगळे काढून ठेवतो.' वेगळे काढण्याची कृती हा मंत्र आठवून देतो. 'उरु प्रथस्व इति पुरोडाशं प्रथयति ' – 'चांगला पसर, असे म्हणून पुरोडाश पसरवितो.' 'उरु प्रथस्व ' हा मंत्र म्हणून पुरोडाशाला दाबून त्याचा विस्तार केला जातो. वेदांचा 'नामधेय' हा तिसरा भाग होय. अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, ज्योतिष्टोम, उदभिद्, चित्रा, श्येन, वैश्वदेव इ. यज्ञकर्मांची नावे आहेत. 'निषेधवाक्य ' हा चौथा भाग होय. निषेध नकाराने सांगितलेला असतो. त्याचे पर्युदास व निवृत्ती असे दोन प्रकार असतात. उदा., एकादशीला भोजन करू नये ब्रह्मचाऱ्याने दिवसा झोपू नये अशा तऱ्हेची व्रते सांगणारी निषेधवाक्ये असतात. या निषेधाला 'पर्युदास' असे म्हणतात.

कारण वैदिक समाजास मान्य असलेली अष्टकाश्राद्ध, गुरुशुश्रूषा, तलाव, पाणपोया, उद्याने, मंदिरे, घाट इ. लोकोपकारक कर्मे, शिखाधारण, विष्णू, शिव, गणेश, दुर्गा, हनुमान, भैरव इ. देवतांच्या पूजा, उत्सव, तीर्थयात्रा अशा प्रकारची धार्मिक कर्तव्ये किंवा अन्य प्रकारचे विधिनिषेध श्रुतींमध्ये सांगितलेले नाहीत ते स्मृतींमध्ये सांगितले आहेत."[३]

६) वेदांत दर्शन

वेदांत दर्शन हे षड्दर्शनांपैकी उत्तरमीमांसा म्हणून ओळखले जाते. याचे संस्थापक शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य इत्यादी विविध शाखांचे प्रवर्तक आहेत. ज्याचा आधार वेदांच्या अंतिम भागातील उपनिषदे आहेत. आणि ब्रह्मसूत्र, भगवद्गीता हे प्रस्थानत्रय ग्रंथ आहेत. हे अद्वैत, विशिष्टाद्वैत इ. शाखांत विभागले असून, ब्रह्म (परम सत्य), जीवात्मा आणि मायेचे संबंध स्पष्ट करून मोक्षाचा मार्ग दाखवते.

२.७ .२ नास्तिक दर्शन

नास्तिक दर्शन हे वेदांना प्रमाण न मानणारे आहे. ते खालिल प्रमाणे

१) बौद्ध

२) चार्वाक

३) जैन

४) चार्वाक

५) दिग्नान

१) बौद्ध

बौद्ध ज्ञानपरंपरा ही एक अतिशय समृद्ध, सखोल आणि बहुआयामी परंपरा आहे. ही केवळ एका धर्माची चौकट नसून, ज्ञान प्राप्त करण्याची, सत्य समजून घेण्याची, मनाचे कार्य

जाणून घेण्याची एक वैज्ञानिक पद्धत आहे बौद्ध धम्माने भारतीय संस्कृतीला दिलेली सर्वात मोठी देणगी म्हणजे संस्कृत व पाली भाषेतील बौद्ध साहित्य होय. बौद्ध साहित्यात केवळ बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान नाही तर त्या काळातील सामाजिक, सांस्कृतिक, भोवती आणि धार्मिक परिस्थितीची माहिती मिळते

समाजात नेहमी आपण ऐकत आलो आहोत "जगाला युद्धाची गरज नाही तर बुद्धाची गरज आहे" याचाच अर्थ असा की बुद्धांनी सांगितलेल्या विचाराने मार्गक्रमण करण्याची गरज आहे तथागत गौतम बुद्धांनी समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी पंचशील आणि अष्टांग मार्ग दिला आहे यालाच बौद्ध धर्मात अनन्य साधारण महत्त्व आहे आजही बौद्ध धर्मात लग्नविधी समारंभापासून ते अंत्यविधीपर्यंत पंचशील या तत्त्वाचा उपयोग केला जातो.

पंचशील हे बौद्ध धर्मातील पंचप्राण आहेत ती तत्वे पाली भाषेत म्हटल्या जातात ती पुढील प्रमाणे आपल्याला पाहता येतील.

१) पानातीपाता वेरमणी सिक्खापदं समादियामि ! - हिंसा न करणे

२) अधिन्नदाना वेरमणी सिक्खापदं समादियामि ! - चोरी न करणे

३) कामेसु मिच्छाचारा वेरमणी सिक्खापदं समादियामि ! - व्यभिचार न करणे

४) मुसावादा वेरमणी सिक्खापदं समादियामी ! - खोटे न बोलणे

५) सुरा मेरय मज्ज पमादठ्ठाणा वेरमणी सिक्खापदं समादियामि ! - मद्यपान न करणे

वरील पाच तत्त्वांना पंचशील म्हणतात. हेच पंचशील गृहस्थाला आपल्या जीवनाचा उद्धार करण्यासाठी बौद्ध धर्मात दिल्या जातात. धम्माची शिकवण व धम्मप्रसारासाठी स्थापन केलेला संघ या तीन घटकांचा समावेश बौध्द धम्मात होतो. दुःखाचे कारण सांगत असताना तथागत गौतम बुद्धांनी चार आर्य सत्ये सांगितली आहेत. बुद्धांची ती चार आर्य सत्ये म्हणून जगप्रसिद्ध आहेत. गौतम बुद्धांनी मानवी जीवनातील सर्व व्यवहारांच्या मुळाशी चार सत्ये सांगितली आहेत. त्यांनी 'आर्यसत्य' असे म्हणतात. ते खालील प्रमाणे

१) दुःख - (तृष्णा)

२) दुःख निरोध - (प्रतिपद)

३) मानवी जीवन दुःखमय आहे - (मनुष्याच्या न संपणाऱ्या इच्छा हे दुःखाचे)

४) दुःखाचा अंत करता येतो - (दुःख निवारण्याचा मार्ग)

गौतम बुद्धांनी दुःख निवारण्यासाठी जो मार्ग सांगितला त्याला 'अष्टांग मार्ग' असे म्हणतात. मानवाने आपले दैनंदिन जीवन जगताना कोणत्या तत्त्वाचे पालन करावे. कोणत्या विचारांचा विकास करावा, कोणत्या विचारांपासून व विकारांपासून दूर राहावे, आत्मसंयमन, सदाचार व

सद्विचारांच्या विकासाला कसे प्राधान्य द्यावे. याबद्दलची माहिती 'अष्टांग मार्ग' यामध्ये दिलेली आहे.

अष्टांग मार्ग :-

१) सम्यक दृष्टी - (योग्य दृष्टीकोन) :-

व्यक्तीने दैनंदिन जीवन जगत असताना योग्य दृष्टी कशी ठेवावी, याची माहिती दिलेली आहे. मानवाच्या सद्सद्विवेकबुद्धीचा विकास झाल्यास पाप व पुण्य, योग्य व अयोग्य, सत्य व असत्य यामधील भेद करणे शक्य होते. अहंकारी वृत्ती नष्ट होऊन त्याचे चित्त शुद्ध होते.

२) सम्यक संकल्प - (योग्य विचार) :-

व्यक्तीने दैनंदिन जीवन जगत असताना शुद्ध विचारांचा विकास केल्यास राग, लोभ, द्वेष नष्ट होतात.

३) सम्यक वाचा - (योग्य बोलणे) :-

व्यक्तीने दैनंदिन जीवन जगत असताना व्यवहारी जीवनात सदैव सत्य बोलावे, निंदा करू नये, चांगले संकल्प करावे, वाणी शुद्ध व चांगली ठेवावी त्यामुळे सद्द्यवृत्तीचा विकास होतो.

४) सम्यक कर्मात – (योग्य आचरण) :-

व्यक्तीने कोणत्याही प्रसंगी चोरी, हिंसा व अनैतीक वर्तनापासुन अलिप्त राहुन दैनंदिन जीवनात त्याने चांगली कामे करावीत.

५) सम्यक आजीविका - (योग्य उपजीविका) :-

आपल्या कुटुंबाचे भरन-पोषन करण्यासाठी सदाचार व सन्मार्गानेच पैसा मिळविला पाहिजे.

६) सम्यक व्यायाव - (योग्य प्रयत्न) :-

अकुशल (वाईट) विचार निर्माण होऊ न देणे आणि निर्माण झालेले अकुशल (वाईट) विचार नष्ट करुण सद्विचार वाढवणे.

७) सम्यक स्मृती - (योग्य सजगता) :-

दैनंदिन जीवनातील शुद्ध आचारांच्या विकासासाठी व्यक्तीने मन, विचार आणि कृती यांवर सतत लक्ष ठेवुन संयम व विवेकाद्वारे इंद्रियांवर नियंत्रण ठेवले पाहिजे.

८) सम्यक समाधी - (योग्य एकाग्रता) :-

मनाची एकाग्रता व ध्यान वाढवुन ध्यानाच्या माध्यमातून मन स्थिर ठेवणे. मनाला एकाग्र करून ध्यानाच्या अवस्था प्राप्त करणे, ज्यामुळे मन पूर्णपणे शांत, स्थिर आणि एकाग्र होते.” [४]

हे आठ अष्टांग मार्ग असुन ते एका शिडीसारखे आहेत जे साधकाला हळूहळू दुःखांपासून मुक्ती व ज्ञानप्राप्तीकडे घेवुन जातात.

बौद्ध साहित्य

भारतीय साहित्यात बौद्ध साहित्याचा प्रभाव फार मोठा आहे. भारतातच नाही तर संपूर्ण जगात बौद्ध धर्माचा प्रभाव आहे. त्याचबरोबर बौद्ध ग्रंथनिर्मिती मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. बौध्द साहित्यातून तत्कालीन जीवनपद्धतीचा अभ्यास करण्यास मदत होते. बौद्ध साहित्याच्या अभ्यासातून विविध माहिती कळण्यास मदत होते. बौद्ध साहित्यात विनयपिटक, सुत्तपिटक व अभिधम्म पिटक अशी तीन पिटके आहेत. त्यालाच त्रिपिटक असे म्हणतात. हे ग्रंथ पालीभाषेत लिहिले आहेत. या ग्रंथावरून भगवान गौतम बुद्धाच्या धार्मिक उपदेशाची माहिती होते ते त्रिपिटक खालील प्रमाणे आहेत. याचा सविस्तर आढावा पुढीलप्रमाणे घेतलेला आहे.

१. विनयपिटक

विनयपिटक हा बौद्ध धर्मातील त्रिपिटकांपैकी एक आहे. 'पिटक' म्हणजे 'टोपली' किंवा 'संग्रह' आणि 'विनय' म्हणजे 'शिस्त' किंवा 'नियम' होय. बौद्ध साहित्यातील त्रिपिटकामध्ये विनयपिटकाला अग्रगण्य स्थान प्राप्त झाले आहे. हा ग्रंथ सुत्तपिटकाच्या आधी निर्माण केला गेला आहे.

त्यामुळे विनयपिटक म्हणजे बौद्ध भिक्खू आणि भिक्खुणी यांच्यासाठी बनवलेल्या शिस्तीच्या नियमांचा (आचारसंहितेचा) संग्रह होय. हा ग्रंथ भगवान बुद्धांनी आपल्या शिष्यांसाठी स्थापन केलेल्या नियमांचे आणि कायद्यांचे कोश आहे. यात कोणत्या परिस्थितीत कोणता नियम का बनवला गेला, याची पार्श्वभूमीही सविस्तर देण्यात आली असुन बौद्ध भिक्खू संघाचे जीवन, त्यांची शिस्त आणि त्यांचा इतिहास समजून घेण्यासाठी विनयपिटक हा एक अपरिहार्य ग्रंथ आहे.

२. सुत्तपिटक

या ग्रंथाला उद्देशाची टोपली असे म्हणतात. या ग्रंथामधून भगवान बुद्धांनी दिलेले मौखिक उद्देश मिळतात. या ग्रंथात बुद्धाचे जीवन त्यांचे उपदेश आणि शिष्यांबरोबर झालेल्या संवादाचे तपशीलवार वर्णन आहे. त्याचबरोबर धर्मोपदेशाचे समुच्चय या ग्रंथांमध्ये आहेत. यात ग्रंथांचे उपविभाग पडतात.

अ) दिग्ग निकाय

दिग्ग निकाय हा केवळ धार्मिक ग्रंथ नसून प्राचीन भारतीय विचार, तत्त्वज्ञान आणि संस्कृतीचा एक महान ठेवा आहे बौद्ध धर्माचा प्रारंभिक स्वरूप आणि बुद्धाचे विचार समजून

घेण्यासाठी दिग्ग निकाल अत्यंत महत्त्वाचा आहे या ग्रंथात भगवान बुद्धांनी दिलेले लांब आणि विस्तृत संवाद समाविष्ट आहे यात ३४लांब सुत्ते एकत्रित आहेत. यामध्ये प्रत्येक मतांचे सूक्ष्म वर्णन आहे. दिग्ग नीकाय विषयानुसार तीन विभागात विभागला गेला असुन त्यातील पहिला सिलक्खंद वग्ग (शिलांचा समूह) हा भाग सर्वात मोठा आहे. त्यामध्ये १३ सुत्ते असुन यात प्रामुख्याने शील (नैतिकता) समाधी (एकाग्रता) आणि प्रज्ञा (ज्ञान) या तीन स्तंभावर भर दिला आहे. यातील नावाजलेली सुत्त ब्रह्मजाल सूत्त, समंत्रफल सूत्त व महापरिनिब्बांन सूत्त ही आहेत. दिग्गयाचा विषयानुसार दुसरा भाग महावग्ग होय महावग्ग म्हणजे 'महान भाग' होय या भागात दहा सुत्ते आहेत. त्यात बौद्ध धम्माचा इतिहास, तत्त्वज्ञान आणि पौराणिक कथा यांचा उत्तम संगम यात पाहायला मिळतो. पाथेय वग्ग हा दिग्ग निकायाचा तिसरा आणि अखेरचा भाग आहे.'पाथेय' या शब्दाचा अर्थ 'प्रवासासाठीचे साहित्य' किंवा 'तरतूद' असा होतो. या भागातील बहुतेक सुत्ते (प्रवचने) सामान्य मनुष्याला जीवनरूपी प्रवासात योग्य मार्गदर्शन करणारी असल्याने किंवा सद्धर्मरूपी तरतूद पुरवणारी असल्याने याला 'पाथेय वग्ग' असे नाव देण्यात आले आहे. काही अभ्यासक याचा अर्थ 'मार्गाविषयीचा विभाग' असाही करतात.

ब) मज्झीम निकाय

हा मध्यम आकाराचा व्याख्यान पर संग्रह आहे यात १५२ भाषणे व संवाद आहेत. बौद्ध धर्माच्या विविध सिद्धांतावर व्याख्यान, संवाद व कथा दिलेल्या आहेत मज्झिम निकाय हा बौद्ध सराव करण्यासाठी अमूल्य ग्रंथ आहे. जर दिग्ग निकाय हा बौद्ध धर्माचा 'व्यापक नकाशा' असेल तर हा त्या नकाशावरील 'तपशीलवार मार्गदर्शक' आहे. यामध्ये दैनंदिन जीवनात बौद्ध मार्गाचा अवलंब कसा करावा याचे स्पष्ट आणि सोप्या पद्धतीने वर्णन केलेले आहे यात ध्यान, नीती आणि ज्ञान या तीनही स्तंभावर भर दिला आहे.

क) संयुक्त निकाय

संयुक्त निकाय हे बौद्ध त्रिपिटकातील सुत्तपिटकाचे तिसरे प्रमुख विभाग आहे. हे पाली भाषेतील ग्रंथ असून, बुद्धांच्या उपदेशांचे विषयानुसार वर्गीकरण केलेले यामध्ये २८८९ सुत्तांचे संग्रह आहे. संरचनापाच वग्ग (भाग) आणि ५६ संयुक्त (अध्याय) यांत विभागलेले आहे. सगाथवग्ग: ११ संयुक्त (देवतासूत्र इ.), निगमवग्ग: १० संयुक्त (भिक्खुनीसूत्र इ.), खन्धवग्ग: १३ संयुक्त (स्कंधसूत्र इ.), सळायतनवग्ग: १० संयुक्त व महावग्ग: १२ संयुक्त विषयानुसार सुत्तांचे वर्गीकरण केल्यास धर्म, योन्या, श्रोता, उपदेशक, बोधिपक्ष धर्म, ब्रह्म, लाभसक्कार इ. विषय स्पष्ट करतो. बौद्ध दर्शन, सामाजिक जीवन आणि भूगोलाचे चित्रण यात आढळते.

ख) अंगूत्तर निकाय

अंगूत्तर निकाय या संग्रहात बोधपर वचने असून ती संख्येच्या चढत्या क्रमाने लावली आहेत. यामध्ये सूत्रे ११ प्रकरणात विभक्त केलेली आहेत. या उत्तर निकाय सूत्रे सुद्धा लहान भाषणे व संवादाच्या स्वरूपात आहेत. एका प्रकरणात चंद्र, सूर्य व बौद्ध धर्म या तीन वस्तू प्रत्यक्ष रूपाने प्रकाश देतात.

ग) खुद्दक निकाय

खुद्दक निकायात लहान ग्रंथाचे संकलन केले आहे. या निकायात नेहमी सूत्तपटीकातील पाचवा निकाय म्हणतात. या संग्रहात असलेल्या ग्रंथाचे विषय व त्याचे स्वरूप परस्पर पासून भिन्न आहेत. या संग्रहातील एका सूत्रात बौद्ध संप्रदायावर भविष्यात येणाऱ्या संकटाबद्दलचे भविष्य वर्तवलेले आहे. या संग्रहातील निरनिराळे भाग निरनिराळ्या काळात रचले गेलेले आहेत. या सर्व भागांचा संग्रह नंतर करण्यात आला असला तरी यातील काही भागाची रचना प्राचीन काळातत झालेली आहे या खुद्द निकायात. १. खुद्द कपाठ २. धम्मपद ३. उदान ४. इतिवृत्त ५. सूक्त निपात ६. विमान ७. पंत्रवथू ८. थेरेगाथा ९. थेरी गाथा १०. जातक कथा ११. पटील संभीद्दमग्ग १२. अपदान बुद्ध चरियापीटक असे रचनाग्रंथ आढळतात.

३) अभिधम्मपिटक

'अभि' म्हणजे विशेष / सूक्ष्म आणि 'धम्म' म्हणजे तत्त्व. म्हणजेच धम्माचे सखोल, तात्त्विक व विश्लेषणात्मक विवेचन म्हणजे अभिधम्म होय. अभिधम्मपिटक हा त्रिपिटकातील तिसरा व अत्यंत तात्त्विक ग्रंथसंग्रह आहे. जे थेरवाद परंपरेतील दार्शनिक आणि मनोवैज्ञानिक विश्लेषणाचा संग्रह आहे. हे बुद्धांच्या उपदेशांचे सूक्ष्म विवेचन करून चित्त, धम्म, कर्म आणि निर्वाणाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करते.

बुद्धाच्या उपदेशांचे तात्त्विक व मानसशास्त्रीय विश्लेषण यात केलेले आहे. व्यक्ती, आत्मा याऐवजी चित्त, चेतसिक, रूप व निर्वाण या तत्त्वांचा अभ्यास केला आहे. यात प्रश्नोत्तर, वर्गीकरण, संज्ञा व तर्कशुद्ध मांडणी आढळते. सामान्य उपदेशांपेक्षा हा ग्रंथ विद्वान भिक्षूंकरिता अधिक उपयुक्त आहे.

अभिधम्मपिटकातील सात ग्रंथ

१) धम्मसंगणी – सर्व धर्मांचे वर्गीकरण

२) विभंग – विविध विषयांचे विश्लेषण

३) धातुकथा – धातूंची चर्चा

४) पुग्गलपञ्ञत्ती – व्यक्तींचे प्रकार

५) कथावत्थु – मतभेदांचे खंडन

६) यमक – प्रश्नोत्तरात्मक विवेचन

७) पट्ठान – कारण–कार्य संबंधांचे सखोल विवेचन. अभिधम्मपिटकामुळे बौद्ध तत्त्वज्ञानाला शास्त्रीय, तार्किक व तत्त्वमीमांसात्मक अधिष्ठान प्राप्त झाले. विशेषतः थेरवाद परंपरेत याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे." [५]

२) जैन

जैन ज्ञान परंपरा ही प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाची एक प्रमुख धारा आहे, जी तीर्थंकरांच्या शिकवणींवर आधारित आहे आणि अहिंसा, सत्य, अपरिग्रह यांचा आग्रह करते. ही परंपरा सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान आणि सम्यक चारीत्र या त्रिरत्नांद्वारे मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखवते."[६]

(याची सविस्तर नोंद प्रकरण ५ मध्ये जैन वाङ्मय या शीर्षकाखाली घेण्यात आली आहे)

३) चार्वाक दर्शन

चार्वाक दर्शन हे प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानातील एक नास्तिक दर्शन आहे. "नास्तिक" म्हणजे जे वेदांना प्रमाण मानत नाही किंवा ईश्वर अस्तित्व मानत नाही. आतापर्यंत आपण आस्तिक दर्शनांबद्दल बोलत होतो; चार्वाक मात्र त्याच्या अगदी विरुद्ध टोकाचे तत्त्वज्ञान आहे.

भारतीय दर्शनातील चार्वाक दर्शनाचा अभ्यास आजपर्यंत अनेकदा केला गेला आहे. भारतीय दर्शन समुच्चयामध्ये सहा आस्तिक आणि तीन नास्तिक दर्शने आहेत. त्यातील चार्वाक दर्शन हे बंडखोर तत्त्वज्ञान म्हणून प्रसिद्ध आहे. तसेच नास्तिक दर्शन हे बंडखोर तत्त्वज्ञान म्हणून प्रसिद्ध आहे. त्याने चैतन्यविशिष्ट देहाव्यतिरिक्त वेगळ्या आत्म्याचे अस्तित्व नाकारले आहे. चैतन्य विशिष्ट देहालाच त्याने आत्मा मानले. चार्वाकाने पंचमहाभूतांपैकी पृथ्वी, आप, तेज, वायू ही चारच महाभूते मानली आहेत. त्याने ज्ञानाच्या प्रमाणांपैकी प्रत्यक्ष हे एकच प्रमाण मानले आहे. चार्वाक दर्शन हे अत्यंत सरळ आणि ठोस विचारसरणीवर आधारित आहे. त्याचे काही महत्त्वाचे मुद्दे असे:

१. केवळ प्रत्यक्ष प्रमाण (Perception is King):

चार्वाक फक्त प्रत्यक्ष ज्ञान (जे आपण डोळ्यांनी पाहू शकतो, हाताने स्पर्श करू शकतो) यावरच विश्वास ठेवतो. अनुमान (Inference) आणि शब्दप्रमाण (Testimony) यांना ते फसवे मानतात. उदाहरणार्थ, धुरावरून आग असल्याचे अनुमान बरोबर असलं, तरी आत्मा किंवा स्वर्ग यासारख्या गोष्टी पाहता येत नसल्याने त्यावर विश्वास ठेवू नये, असे त्यांचे म्हणणे.

२. जग फक्त भौतिक आहे:

या जगात फक्त चार भूतं (पृथ्वी, जल, अग्नी, वायू) आहेत. आकाश (Space) हा केवळ भास आहे. शरीर या चार घटकांपासून बनले आहे आणि चैतन्य (जीव/आत्मा) हे या घटकांच्या विशिष्ट रचनेतून निर्माण झालेले एक परिणाम आहे. ज्याप्रमाणे साखर आणि पाणी मिसळून गोड रस तयार होतो, त्याचप्रमाणे शरीरातून चैतन्य निर्माण होते.

३. आत्मा नाही, ईश्वर नाही:

शरीराशिवाय वेगळा कोणी आत्मा नसतो. शरीर नष्ट झाले की चैतन्यही नष्ट होते. ईश्वर कोणी निर्माणकर्ता नाही. जग हे नैसर्गिक पद्धतीने चालले आहे. वेदांमध्ये वर्णन केलेले स्वर्ग, नरक, यज्ञ-कर्मे या सगळ्या फसव्या कल्पना आहेत, ज्या ब्राह्मणांनी स्वतःचा फायदा करून घेण्यासाठी बनवल्या आहेत.

४. भोग हाच परमार्थ: (Eat, Drink and be Merry)

चार्वाक तत्त्वज्ञान सांगते की, मृत्यूनंतर काहीच नाही. त्यामुळे जीवनातील एकमेव उद्देश सुख भोगणे हाच आहे. दुःख टाळा आणि जास्तीत जास्त सुख मिळवा. यज्ञात हवन करून द्रव्य वाया घालवण्यापेक्षा त्या द्रव्याने स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी भोजन करा, असा त्यांचा उपदेश. एक प्रसिद्ध चार्वाक सूक्त आहे: "यावज्जीवेत् सुखं जीवेत्, ऋणं कृत्वा घृतं पिबेत्।" (जोपर्यंत जगायचं आहे तोपर्यंत सुखाने जगा, कर्ज काढून का होईना, तूप प्या.)

“ त्यान्नी फक्त भौतिकवाद, जडवाद मानला आहे. वैदिकांनी त्याला नास्तिक ठरवले; ते मुख्यत्वे करून त्यान्नी वेदांचे प्रामाण्य अमान्य केले आहे. तसेच, त्यान्नी ईश्वराचे अस्तित्वही नाकारले. चार पुरुषार्थांपैकी अर्थ आणि काम हे दोनच पुरुषार्थ त्यान्नी मान्य केले होते. ड 'चार्वाक' म्हणजे गोड बोलणारा, चार्वाक म्हणजे बृहस्पतीचे शिष्य, चार्वाक म्हणजे 'खा-प्या आणि मजा करा' असे उथळ तत्त्वज्ञान मांडणारा एक उथळ माणूस, उथळ शिष्य समुदाय किंवा उथळ असा विचार प्रवाह आहे, असे चित्र वैदिकांनी जाणीवपूर्वक लोकांसमोर ठेवले आहे. अशा चंगळवादी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करत असताना त्याच्या सत्य-असत्याची शहानिशा अभ्यासकांनी कधीही केली नाही. तो नास्तिक आहे. नास्तिकतेचा ठपका त्याच्या माथी मारला. अभ्यासकांचे काम संपले; पण तोही आस्तिक असू शकतो हा विचार कधी कुणाच्याही मनाला शिवला नाही.

चार्वाकाने यज्ञासारखे निरर्थक कर्म नाकारले आहे. नैतिकतेच्या आणि समाज व्यवस्थेच्या दृष्टिकोनातून त्याने आपले विचार मांडले. जीवन आनंदाने जगणे हा अंतिम उद्देश चार्वाकाने मानला. तो म्हणतो, हा उद्देश पूर्ण करण्यासाठी पारलौकिक शक्ती, काल्पनिक,

अतिमानवी शक्तींचा आश्रय घेण्याची गरज वाटत नाही. अनुभवाधिष्ठित जीवन जगावे. मानवाची स्वनिर्मित विवेकनिष्ठ समाजव्यवस्था या उद्देशांची पूर्ती करू शकेल. म्हणून वास्तववादी, जीवनवादी, मानवतावादी दर्शन म्हणून चार्वाकाकडे पाहिले पाहिजे, असे मत चार्वाक दर्शनाचा अभ्यास करणारे विद्वान डॉ. आ. ह. साळुंखे यांनी मांडले आहे."[७]

४) दिन्नाग

"दिग्नाग हे प्राचीन भारतातील विषम तर्कशास्त्रज्ञ आणि ज्ञानशास्त्रज्ञांचा संदर्भ देतात. ज्यांनी वैदिक परंपरेचे पालन केले नाही. उल्लेखनीय गैर-वैदिक दिग्नाग पुढीलप्रमाणे ग्रंथात मांडली आहेत.

१. दिग्नागा (इ.स. ४८०-५४०) : एक बौद्ध तर्कशास्त्रज्ञ आणि ज्ञानशास्त्रज्ञ ज्याने तर्कशास्त्र आणि ज्ञानशास्त्राची बौद्ध प्रणाली विकसित केली. इतर उल्लेखनीय गैर-वैदिक तर्कशास्त्रज्ञ आणि ज्ञानशास्त्रज्ञांमध्ये हे समाविष्ट आहे.

२. धर्मकीर्ती (इ.स. ६१०-६७०): दिग्नागाच्या कार्यावर आधारित बौद्ध तर्कशास्त्रज्ञ आणि ज्ञानशास्त्रज्ञ.

३. धर्मोत्तरा (इ.स. ७४०-८००) : एक बौद्ध तर्कशास्त्रज्ञ आणि ज्ञानशास्त्रज्ञ ज्याने बौद्ध प्रणालीचा आणखी विकास केला.

४. श्रीगर्गा (इ.स. ५००): एक जैन तर्कशास्त्रज्ञ आणि ज्ञानशास्त्रज्ञ ज्याने जैन तर्कशास्त्र प्रणालीवर लिहिले.

५. सिद्धसेन दिवाकर (इ.स. ६००): एक जैन तर्कशास्त्रज्ञ आणि ज्ञानशास्त्रज्ञ ज्याने जैन तर्कशास्त्र प्रणालीवर लिहिले.

या गैर-वैदिक दिग्नागांनी भारतीय तर्कशास्त्र, ज्ञान रचनावाद आणि तत्त्वज्ञानाच्या विकासात, पर्यायी दृष्टीकोन प्रदान करण्यासाठी आणि प्रबळ वैदिक विचारांना आव्हान देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले."[८]

५) आजीवक

अजीविका दर्शन ही प्राचीन भारतातील वैदिक विचारांची शाळा आहे. अजीविका दर्शनाची मुख्य तत्त्वे नियतीवाद , इच्छा स्वातंत्र्य नाकारणे, काळाचे चक्र, पुनर्जन्म, नैतिक आदेश नाही, अधिकार नाकारणे असून अजिविका दर्शन ही प्राचीन भारतातील विचारांची एक वेगळी शाळा म्हणून उदयास आली. ज्याने नशिबाच्या भूमिकेवर जोर दिला आणि इच्छा स्वातंत्र्य आणि नैतिक व्यवस्थेच्या संकल्पना नाकारल्या.

२.८ उपनिषद

'आरण्यक' म्हणजे अरण्यातच ज्या ब्राह्मणभागाचे किंवा वेदभागाचे पठण करावयाचे तो भाग. मुळात उपनिषदे हीच आरण्यके होत. अनेक प्राचीन उपनिषदे वर्तमान आरण्यकांचे भाग आहेत. उपनिषद म्हणजे गुरुसन्निध बसून शिकावयाची अध्यात्मविद्या. उपनिषदाचा हा व्युत्पत्यर्थ असला, तरी उपासना, रहस्य किंवा गूढ ज्ञान असाही त्याचा अर्थ आहे. उपनिषदे व आरण्यके म्हणजेच 'वेदान्त', म्हणजे वेदांचा अखेरचा भाग होय. वेदान्त हा शब्द मुख्यतः उपनिषदांना लागत असला, तरी ब्रह्मसूत्रे व त्यांवरील आचार्यांची भाष्ये, त्याचप्रमाणे स्वतंत्र रीतीने लिहिलेले त्याच विषयावरील ग्रंथ ह्यांनाही लागतो. हा शब्द मुळात वाच्यार्थाने आरण्यके व उपनिषदे यांनाच लागतो व त्यांवरील विवेचनाला आणि तदनुसारी विचारांना तो लक्षणेने लागतो.

सर्व आरण्यके ही ब्राह्मणग्रंथांची अखेरची प्रकरणे होत. आरण्यकांतील तत्त्वज्ञानप्रधान प्रकरणे उपनिषदे म्हणून विशेषतः निर्दिष्ट केली गेली आहेत. अगदी प्राचीन काळी आरण्यक व उपनिषद हे दोन्ही शब्द पर्यायशब्द होते. आज प्रसिद्ध असलेली प्राचीन उपनिषदे ज्या आरण्यकांचे भाग आहेत, त्यांतील उपनिषदांव्यतिरिक्त भागांनाही उपनिषद ही संज्ञा आरण्यकांमध्ये दिलेली दिसते. शतपथ ब्राह्मणाचा भाग असलेले बृहदारण्यक म्हणजे मोठे आरण्यक, हेच बृहदारण्यकोपनिषद म्हणून निर्दिष्ट केले जाते. आज प्रसिद्ध असलेल्या ऐतरेयोपनिषदाच्या पूर्वीचा ऐतरेयारण्यकाचा भागही त्या उपनिषदाचा भाग समजला जात होता त्यावर आद्य शंकराचार्यांनी केलेले भाष्य उपलब्ध आहे. जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणाचा केनोपनिषद हा भाग आहे. जैमिनीय उपनिषद्ब्राह्मण हे आरण्यक आहे व त्यासच उपनिषद ही संज्ञा आहे.

पाणिनी व बुद्ध यांच्यापूर्वी (सु. इ. स. पू. ६ वे शतक) म्हणजे ब्राह्मणकालाच्या अखेरीस आरण्यके व प्राचीन तेरा किंवा चौदा उपनिषदे निर्माण झाली, याबद्दल बहुतेक संशोधकांचे एकमत आहे. वानप्रस्थ व संन्यासी यांनीच ही अरण्यात पठण करावी अशी कल्पना उपनिषत्कालीच निर्माण झाली असली, तरी औपनिषद तत्त्वज्ञानाची किंवा विचारांची चर्चा ग्रामांत व नगरांत होत होती, असे उपनिषदातील चर्चाप्रसंगांच्या वर्णनांवरून लक्षात येते. उदा., जनक राजाने भरविलेल्या वादसभेत झालेल्या अनेक ब्रह्मवेत्त्यांच्या चर्चेचा वृत्तांत व जनकाच्या महालात झालेल्या चर्चांचाही वृत्तांत बृहदारण्यकात (अध्याय ३ व ४) आलेला आहे. अश्वपती कैकेय याच्या राजमहालात झालेली अनेक ब्रह्मवेत्त्यांची आत्मा व ब्रह्म यांची चर्चा छांदोग्योयनिपदात (अध्याय ५) आली आहे.

आज प्रसिद्ध असलेली आरण्यके सहा आहेत. ऋग्वेदाचे ऐतरेयारण्यक व कौषीतकी किंवा शांखायनारण्यक, कृष्णयजुर्वेदाचे तैत्तिरीयारण्यक, शुक्लयजुर्वेदाचे बृहदारण्यक, सामवेदाचे जैमिनीय उपनिषद्ब्राह्मण आणि कृष्णयजुर्वेदाच्या मैत्रायणीय शाखेचे मैत्रायणीयोपनिषद किंवा आरण्यक ही ती होत. मैत्रायणीयोपनिषद फारसे प्राचीन नसावेब्रह्मसूत्रांच्या संदर्भात भाष्यकारांनी

कोठेही त्याचा वचनोद्धार केलेला दिसत नाही त्याचप्रमाणे त्यातील संसार दुःखमय आहे, हा प्रधान विचार व इतरही अनेक भाग बुद्धोत्तरकालीनतेचे निदर्शक आहेत परंतु मॅक्स म्यूलरने याही उपनिषदाचे प्राचीन उपनिषदांच्या बरोबरच भाषांतर केले आहे. ऐतरेयारण्यकात ऐतरेयोपनिषद, शांखायनारण्यकात कौषीतकी उपनिषद, तैत्तिरीयारण्यकात तैत्तिरीय उपनिषद व महानारायणोपनिषद, जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणात केनोपनिषद अंतर्भूत आहेत. परंतु बृहदारण्यकोपनिषद व मैत्रायणीयोपनिषद ही सबंध आरण्यकेच होत. महानारायणोपनिषद हे सूत्रकालाच्या आरंभी तैत्तिरीयारण्यकाला जोडले असावे, असा संशोधकांचा कयास आहे. छांदोग्योपनिषदही तांड्य या सामवेदीय ब्राह्मणाचे आरण्यकच असावे, असे त्याच्या रचनेवरून दिसते. आरण्यक म्हणून निर्दिष्ट असलेली उपनिषदे व इतर आरण्यकसमकालीन प्राचीन उपनिषदे पुढीलप्रमाणे होत : ईशोपनिषद हे शुक्लयजुर्वेद संहितेचा अखेरचा अध्याय होय. ईश व इतर प्राचीन उपनिषदे म्हणजे केन, कठ किंवा काठक, प्रश्न, मुंडक, ऐतरेय, तैत्तिरीय, छांदोग्य, बृहदारण्यक, कौषीतकी व श्वेताश्वतर ही उपनिषदे सर्व उपनिषदांमध्ये प्राचीन अर्थात ब्राह्मणकालीन होत. केन व प्रश्न यांत गद्य व पद्य अशा दोन्ही शैलींचे भाग आहेत. ईश, कठ, मुंडक व श्वेताश्वतर ही उपनिषदे प्रामुख्याने श्लेकात्मक आहेत. पद्यात्मक उपनिषदे प्राचीन उपनिषदांतील गद्यात्मक असलेल्या बाकीच्या उपनिषदांपेक्षा आधुनिक असावीत असे काहींचे मत आहे. गद्यातमक उपनिषदांत काही श्लोकही आले आहेत म्हणून पद्यात्मक उपनिषदे गद्योत्तरकालीन आहेत असे म्हणता येत नाही. श्लोकात्मक म्हणजे छंदोबद्ध रचना ही ऋग्वेदापासून चालत आलेली आहेगद्य आधीचे होय असे म्हणता येत नाही. परंतु वरील पद्यात्मक काही उपनिषदे गद्योत्तरकालीन असण्याची शक्यता नाकारता येत नाही, एवढेच. आद्य शंकराचार्यांचे उपर्युक्त श्वेताश्वतरउपनिषदाशिवाय अन्य उपनिषदांवर भाष्य आहे. त्याशिवाय माण्डूक्योपनिषदावरही त्यांचे भाष्य आहे. माण्डूक्योपनिषदाचा काल निश्चित नाही परंतु त्याच्यावर गौडपादांच्या कारिका असल्यामुळे ते बरचसे प्राचीन असावे. शंकराचार्यांनी जाबालोपनिषदाचा ब्रह्मसूत्रभाष्यात उल्लेख केला आहे त्यावरून तेही प्राचीन उपनिषद असावे असे म्हणता येते. त्याशिवाय परमहंस, सुबाल, गर्भ, अथर्वशिरस, वज्रसूचि व मह हीही उपनिषदे प्राचीन होत, असे काहींचे मत आहे परंतु ब्रह्मसूत्रावरून हे सूचित होत नाही. ही प्राचीन उपनिषदे सोडून सुमारे दोनशे उपनिषदे उपलब्ध आहेत. सर्वसाधारणतः योग, संन्यासविधी, भक्ती, जप, विष्णूचे अवतार, शंकर, गणपती, देवी इत्यादीकांचा महिमा यांचे वर्णन ह्या निरनिराळ्या उपनिषदांत आहे. ह्यांतील बरीच उपनिषदे पौराणिक विषयांना वाहिलेली आहेत, म्हणून ती अर्वाचीन असावीत यात शंका नाही.

ब्राह्मणग्रंथांमध्ये मुख्य भाग हा यज्ञप्रक्रिया सांगणारा आहे व ती प्रक्रिया सांगणारे ब्राह्मणकार पौरोहित्याचा व्यवसाय करणारे होते परंतु आरण्यके व उपनिषदे यांतील विचार सांगणाऱ्यांत पुरोहितांबरोबर इतर व्यवसायी ब्राह्मणेतरही दिसतात. वानप्रस्थ व संन्यास यांचा अधिकार ब्राह्मणेतरांनाही वेदकाली मान्य होता किंबहुना अरण्यवासी लोकांत गृहस्थाश्रम वा

यज्ञकर्म न करणारे असेही लोक प्रमुख होते, असे अनुमान करण्यास फार मोठा आधार आहे. शांखायनारण्यकात असा स्पष्ट उल्लेख आहे, की प्राचीन तपस्वी व चिंतक मुनी प्रजेची व यज्ञाची कामना करीत नव्हते आम्हाला त्याची गरज नाही, असे ते म्हणत होते.

छांदोग्योपनिषदात राजा अश्वपती कैकेय व बृहदारण्यकोपनिषदात सम्राट जनक यांच्याकडे यज्ञकर्ते ब्राह्मण तत्त्वज्ञान शिकण्याकरिता येत असत, असे वर्णिले आहे. छांदोग्योपनिषदात म्हटले आहे, की ही अध्यात्मविद्या क्षत्रियांकडेच असल्यामुळे तिच्या सामर्थ्याने क्षत्रियांचे शासन या जगात स्थापित झाले. यावरून काही जर्मन संशोधकांचे असे मत झाले, की वैदिक यज्ञकर्त्या ब्राह्मणांना उपनिषद तत्त्वज्ञान क्षत्रियांनीच प्रथमतः शिकवले. स्त्रियाही ब्रह्मवेत्त्या होत्या. गार्गी वाचक्नवी ही ब्रह्मवेत्त्यांच्या सभेत तात्त्विक वादविवाद करते, असे बृहदारण्यकात वर्णन आले आहे. चैत्ररथ राजा हा शूद्र होता व तो गाडीवान रैक्वाकडे अध्यात्मविद्या शिकण्याकरिता गेला असे छांदोग्यात म्हटले आहे. सत्यकाम जाबालाला आपले गोत्र काय व पिता कोण हे माहीत नव्हते. तरीही हारिद्रुमत गौतम ऋषीने त्याचे उपनयन करून त्याला ब्रह्मविद्या शिकवली. आरुणेय उद्दालकाचा वेदविद्यासंपन्न पुत्र श्वेतकेतू हा पित्यासह पांचालांच्या समितीत त्यांचा राजा प्रवाहण जैवली याच्याकडे पंचाग्निविद्यानामक अध्यात्मविद्या शिकण्याकरिता गेला, असे छांदोग्यात म्हटले आहे.

आरण्यकांचे वा प्राचीन उपनिषदांचे उपासना व तत्त्वज्ञान हे मुख्य विषय आहेत. उपासना म्हणजे ध्यान होय. या ध्यानाचे मुख्य विषय प्राण, आत्मा वा सगुणब्रह्म हे होत. उदा., ऐतरेयारण्यकात महाव्रत नामक यज्ञाचे स्वरूप व त्यामध्ये म्हणावयाच्या उक्थ किंवा शस्त्रनामक ऋचांचे आध्यात्मिक अर्थ सांगितले आहेत. ते अर्थ ध्यानी घेऊन महाव्रतकर्म केल्याने विशेष फलप्राप्ती होते, असे सांगितले आहे. हे अर्थ ध्यानात घेणे ही कर्मांग उपासना होय. महाव्रतकर्मात शस्त्रसंज्ञक ऋचांचे विविध समुदाय आहेत. त्या भिन्न भिन्न समुदायांना प्रौग, मरुत्वतीय, निष्केवल्य इ. नावे आहेत. निष्केवल्य शस्त्रनामक मंत्रसमुदाय म्हणत असताना तो समुदाय सगुण परमात्मारूप पक्ष्याच्या आकाराचा आहे, असे समजून त्याची उपासना करण्यास सांगितले आहे. ते सर्वच मंत्रसमुदाय सगुण परमात्मा म्हणजे सुवर्णमय पुरुष होय, असे समजूनही ध्यान करावयास सांगितले आहे. या ध्यानाच्या योगाने ध्यानकर्ता परलोकी सुवर्णमय पुरुष (सगुण परमात्मा) बनतो, असे फल सांगितले आहे. हाच मंत्रसमुदाय प्राणरूप आहे, आत्मरूप आहे, अशी ही उपासना सांगितली आहे. आत्मरूप म्हणजे उपासकाचे स्वरूप. त्याचप्रमाणे हा उपासक कालात्मक आणि अग्न्यादी देवतात्मक आहे, अशा प्रकारचे ध्यान विहित केले आहे. शांखायनारण्यकात व तैत्तिरीय उपनिषदात संहितानामक उपासना सांगितल्या आहेत. उदा., अवरपरा संहिता. वाणीचा प्राणाशी, प्राणाचा वायूशी, वायूचा विश्वेदेवांशी, विश्वेदेवांचा स्वर्गलोकाशी व स्वर्गलोकाचा ब्रह्माशी संयोग म्हणजे अवरपरा संहिता आहे. असे ध्यान केले म्हणजे प्रजा, पशू, यश, ब्रह्मवर्चस् व स्वर्गलोक यांच्याशी ध्यानकर्त्याचा संयोग होतो, अशी फलप्राप्ती सांगितली आहे. अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, सोमयाग, अश्वमेध इ. यज्ञकर्मे प्रत्यक्ष न करता

तत्संबंधी विशिष्ट गुणयुक्त ध्यान केल्याने त्या यज्ञांची फले प्राप्त होतात, असे आरण्यकांमध्ये म्हटले आहे. उदा., शांखायनारण्यकात आध्यात्मिक अग्निहोत्र, छांदोग्योपनिषदात आध्यात्मिक सोमयाग आणि बृहदारण्यकात अश्वमेधाची विश्वात्मता उपासनाविषय म्हणून सांगितली आहे. आध्यात्मिक अग्निहोत्र असे : प्राण हा आहवनीय अग्नी, अपान गार्हपत्य अग्नी, व्यान हा अन्वाहार्य पचननामक अग्नी, मन हे धूम, मन्यू म्हणजे अंगार, श्रद्धा ही दूध, वाणी ही समिधा, सत्य ही आहुती, जीवात्मा हा रस. अशा प्रकारची उपासना केल्यास स्वर्गलोक प्राप्त होतो.

कर्मकांडास फाटा देण्याची कल्पना ज्या वैदिकांमध्ये आली त्यांनी कर्मकांडाच्या ऐवजी ध्यानात्मक उपासनेनेच कर्मकांडाची फलनिष्पत्ती होते, असा विचार मांडला, असे आरण्यकातील कर्मकांडविषयक उपासनांवरून सिद्ध होते.

तत्त्वज्ञान :-

ब्रह्म किंवा परमात्मा हा उपनिषदांचा मुख्य विषय. उपनिषदांतील तत्त्वज्ञानात्मक विचारांची पद्धती दोन प्रकारची आहे. एक उपदेशात्मक व दुसरी युक्तिवादात्मक. युक्तिवाद व उपदेश हे काही ठिकाणी एकमेकांत मिसळले आहेत. छांदोग्य उपनिषदात सहाव्या व आठव्या अध्यायांत आणि बृहदारण्यकातील याज्ञवल्क्य-मैत्रेयी संवादात उपदेशाबरोबरच युक्तिवादही सांगितला आहे परंतु कठोपनिषदात आत्मज्ञान तर्काने म्हणजे युक्तिवादाने प्राप्त होत नाही, असे स्पष्टपणे सांगितले आहे. आत्मा किंवा ब्रह्म स्वयंप्रकाश आहे, त्याचा साक्षात्कार होतो, असे बृहदारण्यकात म्हटले आहे. याचा अभिप्राय शंकराचार्य असा सांगतात, की प्रत्यक्षरूप अनुभव म्हणजे प्रत्यक्ष प्रमाण मिळाल्यावर शंका किंवा प्रश्नच शिल्लक राहत नाही. उपनिषदांच्या तत्त्वज्ञानामध्ये विश्वसृष्टीची उत्पत्ती व रचना, जीवात्म्याचे स्वरूप, आत्मतत्त्व व ब्रह्मतत्त्व, जीवात्म्याची गती किंवा पुनर्जन्म व मोक्ष हे विषय येतात. ब्रह्मरूप किंवा आत्मरूप सत्तत्त्वातून सृष्टीची उत्पत्ती क्रमाने सांगितली आहे. छांदोग्य उपनिषदात प्रथम आत्मा म्हणजे सत्तत्त्व. त्यातून क्रमाने तेज, जल व पृथ्वी झाल्याचे सांगितले आहे. तैत्तिरीय उपनिषदात आत्मा प्रथम, नंतर अनुक्रमे आत्म्यातून आकाश, वायू, अग्नी, जल अथवा आपस्, पृथ्वी, ओषधी-वनस्पती, अन्न आणि मनुष्य अशी उत्पत्ती सांगितली आहे. छांदोग्य उपनिषदात तेज, जल व पृथ्वी या तत्त्वांचे विविध मिश्रण होऊन ही दृश्यसृष्टी जन्माला आली आहे, असा निष्कर्ष काढला आहे. अन्यत्रही उपनिषदांत यापेक्षा सृष्टीच्या उत्पत्तीचा अन्य क्रम सांगितला आहे. सृष्ट्युत्पत्ती सांगण्याचे मुख्य प्रयोजन सृष्टीच्या विचाराकडून आत्म्याच्या किंवा ब्रह्माच्या विचाराकडे नेणे हेच असल्यामुळे विकासक्रम कसा आहे याबद्दल विविध मते असू शकतात, असे म्हणता येते.

हे सगळे विश्व परमात्म्याचा किंवा ब्रह्माचाच आविष्कार आहे ब्रह्मरूपाने किंवा परमात्मरूपाने दृश्य विश्व हे एकात्मकच आहे त्याच्या मुळाशी असलेले ब्रह्मतत्त्व व माणसाचा जीवात्मा भिन्न नाहीत असा विचार सर्व प्राचीन उपनिषदांमध्ये सांगितला आहे. ब्रह्म हे मूर्त व अमूर्त, मर्त्य व अमृत या द्विविध रूपांचे आहे. ब्रह्माचे शुद्ध व अंतिम स्वरूप अमर व निर्गुण होय तो केवळ आत्मरूप द्रष्टा, विज्ञाता वा प्रज्ञान होय. हे स्वयंप्रकाश तत्त्वच सत्, चित् व

आनंदस्वरूप आहे. जीवात्म्यास असे स्वरूप साक्षात प्रत्ययास आले म्हणजे जीवात्मा मुक्त होतो. असा प्रत्यय येण्याकरता शम, दम, उपरती, तितिक्षा, एकाग्रता, मुमुक्षता आणि अध्यात्मचिंतन या साधनांची आवश्यकता असते. वित्तैषणा, पुत्रैषणा व लोकैषणा किंवा ऐहिक समृद्धी व स्वर्गादी लोक यांची इच्छा टाकून देऊन केवळ आत्म्याचे श्रवण, मनन व निदिध्यासन केल्याने ब्रह्मसाक्षात्कार किंवा आत्मसाक्षात्कार होतो. उक्त साधन-संपत्तीच्या योगाने चित्त शुद्ध होऊन हा साक्षात्कार प्राप्त होतो.

जे जीवात्मे मनुष्यजन्मात आत्मसाक्षात्काराने मुक्त होत नाहीत, त्यांना पापपुण्यकर्मानुसारे संसारगती प्राप्त होते. पाप व पुण्य समान असल्यास मनुष्यजन्म प्राप्त होतो. पुण्य अधिक असल्यास देव, गंधर्व इ. योनींत ते जन्म घेतात व ज्यांचे पापकर्म अधिक असते ते पशुकीटकादी योनींत जन्म घेतात. मरणोत्तर स्थितीचे आणखी दुसऱ्या प्रकारे वर्णिलेले स्वरूप असे आहे : पुण्यकर्म करणाऱ्यांचा मरणोत्तर प्रवास पितृयाण व देवयान या मार्गांनी होतो. पितृयाण मार्गाने देवताज्ञानरहित अशी पुण्यकर्मे करणारे जातात. ते चंद्रलोकी चिरकाल वास करून पुन्हा मर्त्यलोकी मनुष्यादी जन्म घेतात. देवताज्ञानसहित पुण्यकर्माच्या योगाने देवयानमार्ग प्राप्त होतो. ते देवादी ब्रह्मलोकापर्यंतच्या स्थितीस प्राप्त होतात व पुन्हा मृत्युलोकी परतत नाहीत. देवलोकात असताना, म्हणजे स्वर्गात असतानाच त्यांना ब्रह्मज्ञान प्राप्त होऊन ते मुक्त होतात. अधिक पापकर्मे करणारे मात्र पश्वादी स्थावरान्त योनींत जन्म घेतात वा नरकातही जातात.

श्वेताश्वतरोनिषदात ज्ञानमार्गाबरोबरच भक्तिमार्गाचा प्रथम उल्लेख येतो. कठोपनिषद व श्वेताश्वतरोपनिषद यांमध्ये योगविद्येचाही उपदेश केलेला दिसतो. एकंदर प्राचीन उपनिषदे अद्वैतवादी आहेत मात्र त्यांत मायावादाचा निर्देश नाही. श्वेताश्वतरोपनिषदात माया म्हणजे प्रकृती व मायी म्हणजे परमेश्वर असे म्हटले आहे. द्वैतवादास आधारभूत असलेली काही वाक्ये कठ व श्वेताश्वतर यांमध्ये सापडतात. कठोपनिषदात म्हटले आहे, की दोन सुंदर पक्षी, एक भोक्ता व दुसरा केवल द्रष्टा असे, एकाच वृक्षावर निवास करतात. श्वेताश्वतरात म्हटले आहे, की भोक्ता, भोग्य व प्रेरक असे हे ब्रह्म त्रिविध आहे.

मूळ उपनिषदे ब्रह्मचिंतनपर किंवा आत्मचिंतनपर आहेत. मूळ प्राचीन उपनिषदांना सर्वश्रेष्ठ प्रामाण्य किंवा महिमा प्राचीन भारतीयांत प्राप्त झालेला पाहून शैव, वैष्णव इ. विविध दैवतावादी संप्रदायांनी आपापल्या संप्रदायांची उपनिषदांच्या शैलीत मांडणी केली व तीही उपनिषदे म्हणून मान्य झाली. उदा., कालाग्निरुद्र, कठरुद्र, कृष्ण, गोपालतापनी, दत्तात्रेय, नृसिंहतापनी, पाशुपतब्रह्म, वनदुर्गा, हयग्रीव, नारायणतापनी, त्रिपुरातापनी, रामतापनी, गणपत्यथर्व, गणेशतापनी इत्यादी. वरील तापनी उपनिषदांचे प्रत्येकी दोन भाग असतात, पूर्वतापनी व उत्तरतापनी.

उपनिषदांतून अद्वैत, विशिष्टाद्वैत, शुद्धाद्वैत, द्वैताद्वैत व द्वैत तत्त्वज्ञाने निर्माण झाली. या अद्वैतादी तत्त्वज्ञानांच्या आचार्यांनी उपनिषदे व ब्रह्मसूत्रे ह्यांच्यावर आपापल्या संप्रदायांनुसार भाष्ये वा टीका लिहिल्या. शैव, वैष्णव, शाक्त इ. संप्रदाय मुळात अवैदिक होते परंतु त्यांनी

उपनिषदे व ब्रह्मसूत्रे ह्यांच्यावर भाष्ये लिहून उपनिषदांचा आधार आपापल्या संप्रदायांना घेतला. विशिष्ट द्वैत हे शैव आणि वैष्णव अशा दोन्ही संप्रदायांमध्ये मान्य आहे त्याचप्रमाणे द्वैतही मान्य आहे. केवलाद्वैत म्हणजे शांकरतत्त्वज्ञान हेही शैव, वैष्णव, शाक्त इ. संप्रदायांमधील काही लोकांना मान्य आहे. अद्वैत-द्वैत इत्यादींपैकी कोणतेही तत्त्वज्ञान स्वीकारून शैव, वैष्णव, शाक्त इत्यादिकांनी आपल्या तत्त्वज्ञानाचा आधार उपनिषदे होत, असे दाखवून दिले. याचे तात्पर्य असे, की विविध भक्तिसंप्रदायांना किंवा देवतासंप्रदायांना समाजातील आपले अधिष्ठान दृढ करण्याकरिता उपनिषदांचा म्हणजे वेदान्ताचा आधार आहे, हे दाखवावे लागले. म्हणून शैव, वैष्णव इ. संप्रदायांची तत्त्वज्ञानेसुद्धा 'वेदान्त' ह्या नावानेच मिरवितात. जैन, बौद्ध, न्याय-वैशेषिक ही दर्शने मात्र उपनिषदांचा आधार घेऊन आपली तत्त्वे किंवा सिद्धांत मांडीत नाहीत. जैन व बौद्ध तर उपनिषदांचे प्रामाण्यही स्वीकारीत नाहीत. न्याय-वैशेषिक दर्शनांना उपनिषदे प्रमाण म्हणून मान्य आहेत परंतु ती स्वतःच्या तत्त्वज्ञानाची मांडणी उपनिषदांच्या अधिष्ठानावर करीत नाहीत.

सांख्यदर्शनामध्ये दोन प्रवृती दिसतात. हे दर्शन मुळापासून अखेरपर्यंत न्याय-वैशेषिकांप्रमाणेच उपनिषदांच्या आधारे निर्माण झाले नाही ते युक्तिवादावरच आधारलेले आहे परंतु सांख्यांची विश्वप्रक्रिया अथवा विश्वविद्या औपनिषदिक तत्त्वज्ञानामध्ये समाविष्ट केलेली दिसते. ह्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे भगवद्गीता होय. गीतेतील आत्मविद्या किंवा ब्रह्मविद्या ही औपनिषदिक आहे परंतु सृष्टिप्रक्रिया ही त्रिगुणात्मक प्रकृतीला विश्वाचे मूळ धरून विवरिली आहे. सांख्य आणि औपनिषदिक विचार ह्यांचा संगम किंवा समन्वय हा प्राचीन उपनिषदांनंतरच्या वेदान्त तत्त्वज्ञानाचा विशेष होय.

औरंगजेबाचा भाऊ दारा शुकोह ह्याने सतराव्या शतकात फार्सी भाषेत बऱ्याच प्राचीन

उपनिषदांचे भाषांतर केले. फार्सीमधून एकोणिसाव्या शतकात लॅटिनमध्ये ह्या भाषांतराचे भाषांतर झाले. जर्मन तत्त्वज्ञ शेलिंग आणि शोपेनहौअर ह्यांच्यावर त्याचा फार प्रभाव पडला. शोपेनहौअर म्हणतो, की उपनिषदे ही उच्चतम मानवी प्रज्ञेची निर्मिती आहे. पॉल डॉइसेनने जर्मन भाषेत उपनिषदांच्या तत्त्वज्ञानावर प्रबंध लिहिला आणि मॅक्स म्यूलरने 'सेक्रेड बुक्स ऑफ द ईस्ट' ह्या ग्रंथमालेत प्राचीन बारा उपनिषदांचे इंग्रजी भाषांतर प्रसिद्ध केले आहे. त्यानंतरचे अधिक सुधारलेले इंग्रजी भाषांतर ह्यूमचे आहे"[६]

२.९ पुराणे

महर्षी व्यास यांनी अठरा प्रमुख पुराणांचे संकलन केले होते. ही पुराणे तीन प्रकारात विभागली जातात - सात्त्विक (विष्णूशी संबंधित), राजसिक (ब्रह्माशी संबंधित), आणि तामसिक (शिवाशी संबंधित).

१. सात्त्विक पुराणे (विष्णूशी संबंधित): या पुराणांमध्ये विष्णू आणि त्याच्या विविध अवतारांवर भर दिला जातो.

१. विष्णु पुराण - विष्णू आणि त्याच्या अवतारांवर आधारित.

२. भागवत पुराण - विष्णूचा कृष्ण अवतार आणि भक्तीमागच महत्त्व.

३. नारद पुराण - नारद ऋषीचे धर्म, भक्ती, आणि मोक्ष यावरील उपदेश.

४. गरुड पुराण - मरणोत्तर जीवन, कर्म, आणि मोक्षविषयक माहिती.

५. पद्म पुराण - सृष्टीची निर्मिती, तीर्थक्षेत्र, आणि विष्णूभक्ती.

६. वराह पुराण - वराह अवताराचे वर्णन आणि मोक्षप्राप्तीचे मार्ग.

२. राजसिक पुराणे (ब्रह्माशी संबंधित): या पुराणांमध्ये ब्रह्मदेव आणि विश्वाच्या उत्पत्तीचे महत्त्व आहे.

१. ब्रह्म पुराण - सृष्टीची निर्मिती, तीर्थयात्रा, आणि धर्मशिक्षण.

२. ब्रह्मांड पुराण - ब्रह्मांडाचा विस्तार, पृथ्वीची उत्पत्ती, आणि राजवंशाचे इतिहास.

३. ब्रह्मवैवर्त पुराण - ब्रह्मदेवाचे आणि विश्वाच्या निर्मितीचे वर्णन.

४. मार्कंडेय पुराण - दुर्गासप्तशती आणि देवतांचे महत्त्व.

५. भविष्य पुराण - भविष्यातील घटनांचे वर्णन.

६. वामन पुराण - विष्णूचा वामन अवतार आणि त्याचे कार्य

३. तामसिक पुराणे (शिवाशी संबंधित): या पुराणांमध्ये भगवान शिव आणि त्याच्या विविध रूपांचे वर्णन आहे.

१. शिव पुराण - शिवाच्या विविध रूपांचे, लीलांचे आणि भक्तीचे वर्णन,

२. लिंग पुराण - शिवलिंगाचे महत्व आणि शिवोपासनेचे वर्णन

३. स्कंद पुराण - कार्तिकय (स्कंद) आणि तीर्थयात्रांचे वर्णन

४. अग्नि पुराण - यज्ञ, धर्मकर्म, आणि विविध विद्या

५. मत्स्य पुराण - मत्स्य अवताराचे वर्णन आणि धर्म, मोक्षाचे महत्त्व

६. कुर्म पुराण- विष्णूचा कुर्म अवतार आणि त्याचे महत्व.

पुराणांचे प्रमुख विषय व महत्त्व

पुराणे ही भारतीय समाजाच्या संस्कृती, इतिहास, धार्मिक व सांस्कृतिक परंपरेतील आणि नैतिकतेचे ग्रंथ आहेत. यातून सृष्टीची निर्मिती, देव-देवतांचे चरित्र, वंशावळी, धर्म, नैतिकता आणि जीवनमूल्ये यांचे वर्णन आढळते.

सृष्टीची उत्पत्ती:

पुराणांमध्ये विश्वाची उत्पत्ती आणि त्याच्या विविध युगांचा (सत्ययुग, त्रेतायुग, द्वापरयुग, आणि कलियुग) विस्तृत वर्णन आढळते.

देव-दानव युद्ध:

अनेक पुराणांमध्ये देव आणि दानव यांच्यातील संघर्षाची कथा दिली आहे. यात विशिष्ट दैवतांच्या विजयाची गाथा आहे.

अवतार कथा:

विष्णूच्या दहा प्रमुख अवतारांचे वर्णन भागवत पुराणासह इतर पुराणांमध्ये सविस्तरपणे केले गेले आहे.

धर्मशास्त्र:

पुराणांमध्ये धर्म, अधर्म, नीती, सत्य, अहिंसा, आणि इतर नैतिक तत्त्वांचा प्रचार केला आहे. वेदकालीन धर्माच्या पूरक तत्त्वज्ञानाचा प्रसार केला आहे.

इतिहास:

पुराणांमध्ये राजवंश, सम्राट, आणि त्यांच्या पराक्रमांची माहिती दिली आहे. तसेच भारतातील विविध क्षेत्रांच्या इतिहासाचा उल्लेख आहे.

पुराणांचे महत्त्व:

धार्मिक शिक्षण:

पुराणे धार्मिक आचारधर्माचे शिक्षण देतात. भक्ती, तप, यश, आणि धार्मिक कर्तव्यांचे मार्गदर्शन पुराणांमधून मिळते.

सांस्कृतिक वारसा:

पुराणांनी भारतीय संस्कृती, परंपरा, आणि धार्मिक वारसा जतन करून ठेवला आहे. त्यांच्यातन धार्मिक आणि सांस्कृतिक शिक्षण पिढ्यानपिढ्या दिले

उपपुराणे:

महापुराणांव्यतिरिक्त काही उपपुराणे देखील आहेत, जी कमी प्रसिद्ध असली तरी त्यांचे महत्त्व मोठे आहे. काही प्रसिद्ध उपपुराणे खालीलप्रमाणे आहेतः

१. कूर्म उपपुराण
२. कालीका उपपुराण
३. सौर उपपुराण
४. नृसिंह उपपुराण
५. शिवधर्म उपपुराण
६. अद्भुत उपपुराण
७. दुर्गा उपपुराण

२.१० नैसर्गिक

एक तात्त्विक सिद्धांत. 'निसर्ग' ह्या शब्दाचा अर्थ संदिग्ध आहे. 'निसर्ग' ह्याच्या एका अर्थात निसर्ग आणि माणूस ह्यांच्यामधील भेद अभिप्रेत असतो. उदा., लाकडाची तुळई ही मानवनिर्मित वस्तू आहे, नैसर्गिक वस्तू नव्हे; पण झाड ही एक नैसर्गिक, निसर्गातील वस्तू आहे. दुसऱ्या अर्थाने निसर्ग म्हणजे जे जे काही आहे, ते सर्व, त्या सर्वांचा समुदाय किंवा व्यवस्था. ह्या अर्थाने पाहता निसर्ग म्हणजे विश्व ठरते आणि निसर्गापलीकडे काहीच असू शकत नाही, हे एक तार्किक सत्य ठरते. स्पिनोझाने 'निसर्ग' ह्या अर्थाने वापरलेला आहे. आणखी एका वेगळ्या अर्थाने निसर्ग आणि निसर्गातीत अस्तित्व ह्यांच्यात भेद करण्यात येतो. उदा., ईश्वर किंवा आत्मा (ह्यांना अस्तित्व असले तर) निसर्गातीत पदार्थ ठरतील आणि 'विश्व' ह्याचा 'जे सर्व आहे ते' असा अर्थ घेतला, तर निसर्ग आणि निसर्गातीत पदार्थ ह्यांचे मिळून विश्व बनते, असे म्हणावे लागेल. तत्त्वमीमांसेतील एक दृष्टिकोन, एक तात्त्विक दर्शन म्हणून निसर्गवादाचा मूलभूत सिद्धांत असा की, निसर्गातीत असे पदार्थ नसतात, असे पदार्थ आहेत असे मानायला काही आधार नाही आणि असे पदार्थ आहेत असे मानल्याने काही साधले जात नाही; विश्व हा नैसर्गिक पदार्थांचा एक समुदाय किंवा व्यवस्था आहे.

'निसर्गातीत पदार्थ नसतात' असे जेव्हा म्हटले जाते, तेव्हा नेमके काय नाकारण्यात येत आहे, हे स्पष्ट करण्यासाठी नैसर्गिक पदार्थांचे स्वरूप काय असते, ज्या स्वरूपाच्या पदार्थांचा संपूर्ण समुदाय (किंवा निसर्ग) म्हणजेच विश्व असते असे म्हणण्यात येत आहे ते स्वरूप कोणते, हे स्पष्ट करावे लागते. निसर्गवादाचे ह्याविषयीचे म्हणणे असे आहे की, प्रत्यक्षानुभव आणि तर्क–प्रत्यक्षानुभवाने ज्यांचे निष्कर्ष पारखण्यात येतात अशी अनुमाने–ह्या प्रमाणांनी ज्या वस्तूंच्या अस्तित्वाचे व स्वरूपाचे ज्ञान आपल्याला होते, त्या वस्तू म्हणजे नैसर्गिक वस्तू. ज्ञान प्राप्त करून घेण्याची हीच एकमेव प्रमाण अशी पद्धती आहे आणि विज्ञानात ह्या पद्धतीच्या वापराचा आदर्श नमुना आपल्याला आढळतो. ह्या पद्धतीने प्राप्त करून घेतलेल्या ज्ञानाचे विषय असलेल्या वस्तू म्हणजे नैसर्गिक वस्तू आणि अशा वस्तूंचा निःशेष समुदाय किंवा व्यवस्था म्हणजे निसर्ग. ह्या प्रकारच्या ज्ञानाशिवाय अन्य प्रकारचे ज्ञान, उदा., अतींद्रिय ज्ञान नसते आणि म्हणून अशा अतींद्रिय ज्ञानाचे विषय असलेले असे निसर्गातीत पदार्थ नसतात. निसर्गवादाचे म्हणणे असे आहे की, विश्वात जे काही आहे त्याचे स्वरूप एकजिनसी आहे आणि हा एकजिनसीपणा ज्ञानाच्या एकमेव प्रमाण रीतीवर आधारलेला आहे.

ह्यामुळे निसर्गवाद आणि जडवाद यांच्यात भेद केला पाहिजे. जडवादाच्या सिद्धांताप्रमाणे विश्वात केवळ जड किंवा भौतिक वस्तूंनाच अस्तित्व असते, घडणाऱ्या सर्व घटना

केवळ भौतिक स्वरूपाच्या असतात आणि वेगळ्या स्वरूपाच्या भासणाऱ्या घटना, प्रक्रिया, उदा., जैव किंवा मानसिक प्रक्रिया, ही भौतिक प्रक्रियांचीच अधिक गुंतागुंतीची रूपे असतात. अस्तित्वाचे स्वरूप ह्या प्रकारे एकजिनसी असते, असे निसर्गवादाला मानायचे कारण नाही (अर्थात असे मानायला त्याची आडकाठीही नाही). उदा., मानसिक तत्त्व हे जडतत्त्वाहून भिन्न आणि स्वतंत्र असते, असे एखादा निसर्गवादी मानू शकेल. मात्र ह्या तत्त्वाचे आपल्याला वैज्ञानिक पद्धतीने ज्ञान होत असले पाहिजे आणि त्याचे अस्तित्व व कार्य हे पूर्णपणे निसर्गाच्या व्यवस्थेत समाविष्ट असले पाहिजे.

निसर्गवादाची भूमिका काहीशी विस्तृतपणे अशी मांडता येईल : विश्व ही नैसर्गिक वस्तूंची व्यवस्था आहे. नैसर्गिक वस्तू, उदा., दगड, ग्रहगोल, झाड, माणूस इ. नैसर्गिक कारणांनी अस्तित्वात येतात, टिकून राहतात आणि नाश पावतात. नैसर्गिक कारण म्हणजे नैसर्गिक वस्तूमध्ये किंवा वस्तूंच्या समुदायामध्ये घडलेली अशा स्वरूपाची घटना की, तिच्यामुळे दुसऱ्या कोणत्यातरी नैसर्गिक वस्तूमध्ये बदल घडून येतो. कोणत्याही नैसर्गिक वस्तूमध्ये झालेल्या बदलाचे स्पष्टीकरण त्या वस्तूमध्ये आणि इतर नैसर्गिक वस्तूमध्ये घडलेल्या घटनांच्या साहाय्याने पूर्णपणे करता येते. ही कारणपरंपरा आपण कितीही दूरवर रेखीत नेली, तरी ह्या कारणांचे स्वरूप नैसर्गिक वस्तूमध्ये घडलेल्या घटना असेच असते. निसर्गव्यवस्थेच्या बाहेर असलेल्या कोणत्याही कारणाचा कधी आधार घ्यावा लागत नाही आणि असा आधार कुणी घेतला, तर तो फोल असतो, त्याने कशाचेच स्पष्टीकरण होत नाही. विश्वात केवळ नैसर्गिक घटना घडतात आणि इतर नैसर्गिक घटना ही त्यांची संपूर्ण कारणे असतात. निसर्गातीत घटना नसतात आणि निसर्गातीत कारणेही नसतात.

एखाद्या नैसर्गिक घटनेचा उलगडा करायचा म्हणजे कोणत्या नैसर्गिक कारणांनी ती घडून आली आहे, हे स्पष्ट करायचे. असे स्पष्टीकरण करणे जर शक्य असायचे असेल, तर ह्या कारणांनी नियमितपणे, नियमांना अनुसरून आपापले परिणाम घडवून आणले पाहिजेत. तेव्हा निसर्ग हा नैसर्गिक वस्तूंचा केवळ समुदाय नसतो, निसर्गनियमांना अनुसरून परस्परांवर कार्ये करणाऱ्या नैसर्गिक वस्तूंची ती एक व्यवस्था असते. माणूस आणि मानवी समाज हाही ह्या निसर्गव्यवस्थेचा एक भाग आहे आणि म्हणून सर्व मानवी वर्तनाचे व सामाजिक प्रक्रियांचे वैज्ञानिक पद्धतीला अनुसरून स्पष्टीकरण करता येते, ज्या नियमांना अनुसरून ह्या घटना घडतात, ते शोधून काढता येतात.

आपल्या नेहमीच्या जीवनात, सर्वसामान्य व्यवहारात वस्तूंचे, घटनांचे ज्ञान आपण ज्या रीतीचा अवलंब करून मिळवितो, त्याच रीतीला अधिक सुव्यवस्थित आकार देऊन व तिचा

पद्धतशीरपणे वापर करून आपण वैज्ञानिक ज्ञान कमावतो. तेव्हा एकतर व्यवहारज्ञान आणि विज्ञान यांच्यामध्ये सातत्य असते आणि दुसरी गोष्ट अशी की, आपल्या व्यवहारातील समजुती आणि वैज्ञानिक उपपत्ती यांच्यात जेव्हा संघर्ष येतो, तेव्हा वैज्ञानिक उपपत्ती पसंत करणे योग्य असते; पण कोणत्याही क्षणीचे वैज्ञानिक ज्ञान अंतिम नसते. वैज्ञानिक उपपत्तींची अनुभवाच्या कसोटीवर सतत पारख होत असते. विशिष्ट वैज्ञानिक उपपत्ती कितीही सुस्थिरपणे प्रस्थापित झाली आहे असे आपल्याला वाटत असले, तरीही तिच्याशी विसंवादी असे अनुभव प्राप्त होऊ शकतात आणि ती दुरुस्त करावी, सुधारावी लागते. स्वतःला सदैव सुधारित राहण्याची क्षमता आणि प्रवृत्ती हे वैज्ञानिक ज्ञानाचे लक्षण असते आणि वैज्ञानिक विचारपद्धतीवर ते आधारलेले असते. तेव्हा कोणताही काळ घेतला, तर त्या काळाचे वैज्ञानिक ज्ञान हेच त्या वेळी उपलब्ध असलेले सर्वोत्कृष्ट ज्ञान असते; पण ते अंतिम दृष्टीने सत्य असते असा कुणाचा दावा असत नाही.

वैज्ञानिक ज्ञान हेच निसर्गाचे प्रमाण ज्ञान असले, तरी माणसाचा व निसर्गाचा संबंध केवळ ज्ञानापुरता मर्यादित असतो, असे मानायचे कारण नाही. ज्ञानाशिवाय अन्य प्रकारेही माणसाला निसर्गाचा अनुभव येऊ शकतो. माणसाचे सर्व व्यवहार, मानवी व्यक्तींचे शारीरिक, मानसिक व्यवहार, व्यक्तींच्या गटांचे सामाजिक व्यवहार, मानवी संस्था इ. सर्व निसर्गव्यवस्थेचा एक भाग आहे. मानवी व्यवहाराची इतर प्रकारच्या नैसर्गिक व्यवहाराशी तुलना केली असता त्याचे स्वरूप वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे आढळून येते; हे जितके खरे, तितकेच हा व्यवहार निसर्गव्यवस्थेचा भाग असतो, हेही खरे आहे. मानवी मूल्ये, नीती कोणत्याही निसर्गातीत अस्तित्वावर आधारलेली नसते, तर आपल्या प्रत्यक्ष व्यवहारात आपल्याला जे अनुभव येतात त्यांच्यावर आपली मूल्ये आधारलेली असतात आणि ह्या अनुभवाच्या कसोटीवर आवश्यक तेव्हा त्यांच्यात परिवर्तन करणे योग्य ठरते.

सारांश, एका व्यापक स्वरूपातील वैज्ञानिक विचारपद्धती हीच एकमेव प्रमाण ज्ञानपद्धती आहे. असे असल्यामुळे निसर्गवाद्यांच्या मते भौतिकीसारख्या विशिष्ट विज्ञानांचे जसे एक बरेचसे सुस्पष्ट असे ज्ञानक्षेत्र असते, तसे तत्त्वज्ञानाचे नसते. मानवी ज्ञानाच्या व विशेषतः व्यवहाराच्या वेगवेगळ्या क्षेत्रांत ज्या समस्या निर्माण होतात त्यांच्या स्वरूपावर प्रकाश टाकणे, त्यांची सोडवणूक करण्यासाठी विचार पुढे नेणे, हे तत्त्वज्ञानाचे कार्य असते व विवेकाच्या पद्धतीचा म्हणजेच प्रमाण ज्ञानपद्धतीचा वापर करून तत्त्वज्ञानाने हे कार्य पार पाडायचे असते.

ऐतिहासिक दृष्ट्या पाहता निसर्ग आणि निसर्गातील पदार्थ असे द्वंद्व निर्माण होईपर्यंत तत्त्वज्ञान स्वाभाविकपणे निसर्गवादी असते आणि हे द्वंद्व मुख्यतः धार्मिक व आध्यात्मिक प्रेरणेच्या प्रभावामुळे निर्माण होते. ग्रीक तत्त्वज्ञानाच्या इतिहासात पायथॅगोरस, पार्मेनिडीझ आणि

प्लेटो ह्यांच्या परंपरेतील तत्त्वज्ञान सोडले, तर उरलेले तत्त्वज्ञान निसर्गवादीच होते, असे म्हटले पाहिजे. हे द्वंद्व स्पष्टपणे आणि प्रभावीपणे प्लेटोच्या तत्त्वज्ञानात आढळते आणि त्याचा काहीसा अनुवाद ॲरिस्टॉटलने केला आहे; पण ॲरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानाला एक भक्कम निसर्गवादी बाजू आहे. आधुनिक काळात प्रबोधनकाळापासून निसर्गवादाला चालना मिळाली. जोर्दानो ब्रूनो (१५४८–१६००) आणि बारुक स्पिनोझा (१६३२–७७) ह्यांच्या तत्त्वज्ञानात निसर्गवादाचे सूत्र आढळते. पण वैज्ञानिक ज्ञान आणि वैज्ञानिक पद्धती यांना स्थिरता आणि प्रतिष्ठा प्राप्त झाल्यानंतर निसर्गवाद परत प्रभावी ठरणे स्वाभाविक झाले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात एल. बूख्नर (१८२४–९९) व एर्न्स्ट हेकेल (१८३४–१९१९) ह्या जर्मन वैज्ञानिकांमुळे तत्त्ववेत्त्यांची निसर्गवादी शिकवण बरीच प्रभावी ठरली. १९३० आणि १९४० या दशकांत अमेरिकन विद्यापीठांतही निसर्गवाद मान्यता पावला होता. कार्ल मार्क्स (१८१८–८३) याचे ऐतिहासिक, भौतिकवादाचे तत्त्वज्ञान आणि प्रसिद्ध भारतीय विचारवंत एम. एन. रॉय (१८८७–१९५४) यांचा नवमानवतावाद ही निसर्गवादी तत्त्वज्ञानाची दोन प्रसिद्ध उदाहरणे होत.”[९]

२.११ प्राचीन भारतातील कला, साहित्य, शास्त्र व तंत्रज्ञान

प्राचीन भारतीय सौंदर्यशास्त्र , नाट्यशास्त्र, वैद्यकशास्त्र, गणित-भूमिती याचा इतिहास जाणून घ्यावयाचा आहे.

२.११.१ नाट्यशास्त्र

उपलब्ध नाट्यविषयक वाङ्मयात भरताचे नाट्यशास्त्र हाच प्राचीनतम ग्रंथ ठरतो परंतु पाणिनीच्या अष्टाध्यायीतील शिलाली व कृशाश्व यांच्या नटसूत्रांचा उल्लेख (पा. ४· ३· ११०, १११), सीताबेंगा गुहेत सापडलेले खोदीव उघडे नाट्यगृह (ब्लॉशच्या मते इ. स. पू. तिसरे शतक), खुद्द नाट्यशास्त्रात आढळणारे सूत्ररूप गद्य आणि आनुवंश्य श्लोक इ. गोष्टी नाट्याची, नाट्यप्रयोगाची फार पूर्वीची परंपरा सुचवितात. ग्रंथकर्ता भरत व नाट्यशास्त्राच्या संहितेचे मूळ रूप यांविषयी निश्चित काही सांगता येत नाही, हे खरे पण नटांना व नाट्यप्रयोगाला मार्गदर्शक अशी तत्त्वे, संग्राहक श्लोक या प्राचीन परंपरेत असले पाहिजेत. हे पाहता नाट्यशास्त्रातील काही भाग इ. स. पू. सहाव्या शतकाइतका प्राचीन असण्याचा संभव आहे. या माहितीत वेळोवेळी भर पडत जाऊन आजचे नाट्यशास्त्र तयार झाले असावे. पाणिनीनंतर आणि कालिदासाच्या पूर्वी, साधारणपणे इसवी सनाच्या तिसऱ्या शतकात, हा ग्रंथ बऱ्याच अंशी आजच्या स्वरूपात असावा. भरताचे कार्य बहुधा नाट्यसंग्रहकाचे असावे. त्याचा देव-मानवांचा उभयसंबंध लाक्षणिक म्हटला पाहिजे. दैवी अधिष्ठान देऊन एखाद्या ग्रंथाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याची जी प्राचीन भारतीय पद्धती आहे, तिचेच हे उदाहरण.

नाट्यशास्त्राचे छत्तीस अध्याय असून एकूण श्लोकसंख्या सु. सहा हजार आहे. एकंदर रचनेत तत्त्वे संगृहीत करण्यासाठी किंवा मनावर ठसविण्यासाठी मधूनमधून आनुवंश्य श्लोक आणि आर्या आलेल्या आहेत. काही भाग गद्यामध्ये आहे. या ग्रंथात नाट्यविषयक सर्व गोष्टींचे तपशीलावर विवेचन आहे. सूत्र, भाष्य, संग्रह, कारिका आणि निरुक्त अशी विवेचनाची पद्धती आहे. ग्रंथाचे एकंदर स्वरूप पाहून अभ्यासकांनी नाट्यशास्त्राचे तीन सलग भाग पाडले आहेत: (१) नाट्य, नाट्यतंत्र आणि नाटकप्रकार यांचे विवेचन करणारे अध्याय ६ते २७ यांत पुढे नटवर्गात प्रचलित असलेले श्लोक व आर्या यांची भर पडली (२) संगीताचे विवेचन करणारे अध्याय २८ ते ३४ (३) अखेरच्या संस्करणात जोडलेले अध्याय १ ते ५ व ३६. हा क्रम बहुंताशी संयुक्तिक आहे. पहिला आणि शेवटचा अध्याय उपक्रम-उपसंहारासारखे सरळ दिसतात आणि ते मागून जोडले असले पाहिजेत, हे उघड आहे. थोडी शंका येती ती दुसऱ्या व पाचव्या अध्यायाबद्दल. भरताच्या विवेचनात सैद्धान्तिक आणि वाङ्मयीन तत्त्वप्रतिपादन आणि अभिनयकला यांच्या जोडीने प्रयोगतंत्रालाही महत्त्व आहे. तेव्हा रंगमंच व नाट्यगृह (अध्याय २) व प्रयोगारंभीचा पूर्वरंग (अध्याय ५) हे विषय अखेरच्या संस्करणात जोडले गेले, असे मानणे जरा कठीण आहे. एक खरे, की नाट्यशास्त्राची रचना एका वेळी आणि एकाच हाती झाल्याचे दिसत नाही.

नाट्यशास्त्रातील विषयांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे : सुखदुःखसमन्वित लोकस्वभावाचे अभिनयातून दर्शन म्हणजे नाट्य, अशी भरताची कल्पना आहे. 'लोकवृत्तानुकरण' ते हेच. हे अनुकरण विविध भावांनी उपपन्न असून नाना अवस्थांच्या रूपाचे असते. या अवस्थांतून प्रतीत होणारे भाव समूहालंबनाने ज्या एका अर्थाला रसिकाप्रत संक्रांत करतात व आस्वाद्य बनवितात त्या अर्थाला 'रस' अशी संज्ञा आहे. म्हणून नाट्याला 'रसप्रयोग' असेही म्हणण्यात येते.

नाट्यामध्ये कविगत भाव पात्रांच्या द्वारे रसिकांप्रत अभिनीत होऊन आस्वाद्य बनतो. या संपूर्ण व्यापाराचे विवेचन करताना रस, भाव, अभिनय, धर्मी, वृत्ती व प्रवृत्ती हा क्रम स्वीकारला आहे. रसविवेचनाचा प्रारंभ सहाव्या अध्यायात 'विभावानुभावव्यभिचारिसंयोगाद्रसनिष्पत्तिः।' या प्रसिद्ध सूत्राने होतो. त्यानंतर स्थायी, संचारी आणि सात्त्विक मिळून ४९ भाव आंगिक, वाचिक, सात्त्विक आणि आहार्य असा चतुर्विध अभिनय लोक आणि नाट्य अशा द्विविध धर्मी कैशिकी, सात्त्वती, आरभटी आणि भारती अशा चतुर्विध वृत्ती आवंती, दाक्षिणात्या, पांचाली आणि औड्रमागधी अशा तेवढ्याच प्रवृत्ती आणि दैवी व मानुषी अशा दोन प्रकारच्या सिद्धी या क्रमाने ६ ते २७ अध्यायांतील विवेचन संपते. वाचिकाभिनयाच्या संदर्भात अध्याय १४ ते १८ यांत

छंदोविधान, लक्षण, अलंकार, गुण, दोष, काकुस्वर, पाठ्य आणि नाटक–प्रकरणादी दहा रूपके यांचे विवेचन आले असून हा भाग उत्तरकालीन काव्यचर्चेचा उपजीव्य बनला आहे.

अध्याय २८ ते ३४ यांत नाट्याला आवश्यक अशा संगीताचे, स्वर, ताल, गान आणि वाद्ये ('आतोद्य') यांचे पूर्ण विवेचन आहे. ३५ वा अध्याय परिशिष्टरूप असून कोणत्या भूमिका कशा रंगवाव्या हे त्यांत सांगितले आहे. प्रयोगाच्या दृष्टीने दुसऱ्या अध्यायात रंगमंच आणि नाट्यमंडप, तिसऱ्यात रंगपूजन, चौथ्यात अंगहार, करण आणि रेचक व पाचव्यात नांदीसहित पूर्वरंग यांचे वर्णन आहे.

पहिल्या अध्यायात नाट्याची दैवी उत्पत्ती, प्रयोजन व उद्दिष्टे सांगितली आहेत. नाट्य हे त्रिवर्गाचे साधन असून त्याचे धारण आणि प्रयोग करणारे जितश्रम, विदग्ध, कुशल आणि प्रगल्भ असले पाहिजेत, असे भरताचे म्हणणे आहे. याकडे दुर्लक्ष केले तर नाट्याची आणि नटांची कशी हानी होते, हे नटशापाच्या आख्यायिकेच्या द्वारे शेवटच्या अध्यायात सांगितले आहे. ग्रंथ संपविताना भरताने 'नाट्य हे ईश्वरोपासनेचे साधन आहे नाट्योपासना निष्ठापूर्वक केली तर ईश्वर जेवढा प्रसन्न होईल तेवढा तो गंधमालादिकांनी होणार नाही' अशा आशयाचे उद्‌गार काढले आहेत.

धर्मसूत्रे आणि स्मृतिग्रंथ यांवरून दिसते की, नाट्यकला आणि नटवर्ग यांना सामाजिक प्रतिष्ठा नव्हती. भरताने नाट्याचा त्रिवर्गाशी संबंध जोडून त्याला धर्माचरणाच्या पातळीवर नेऊन ठेविले. नाट्यकलेला ईश्वरोपासनेचे स्वरूप देऊन आणि नाट्यवेद हा सार्ववर्णिक वेद आहे असे सांगून नाटककार, नट आणि नाट्यकला यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली, हा या ग्रंथाचा आगळा विशेष. नटांच्या दृष्टीने नाट्यकला हा त्यांचा धर्मच होय. तीच त्यांची ईश्वरोपासना. नाट्यशास्त्र म्हणजे नटांच्या धर्मानुष्ठानाचा आश्रय, असे अभिनवगुप्तही म्हणतो.

नाट्याची उत्पत्ती 'क्रीडनीयक' म्हणून झाली, असे भरताने म्हटले आहे. नाट्य हे करमणुकीचे साधन तर खरेच. नाट्यप्रयोगातील नेपथ्यादिकांचे रम्य स्वरूप, अभिनयाचे सौंदर्य, काव्य आणि संगीत इ. विशेष मनोरंजन करून आनंद देणारे आहेतच पण आनंदाबरोबर नाट्याच्या द्वारे लोकशिक्षण, उन्नत आचार-विचारांचे दर्शन, जीवनात धीर, दिलासा आणि विश्रांती यांची प्राप्तीही भरताला अभिप्रेत आहे. (नाट्यशास्त्र १· १०९–११६). याचा अर्थ असा, की करमणुकीच्या जोडीने सामाजिक प्रबोधन हेही नाट्याचे उद्दिष्ट होय.

नाट्यशास्त्रातील विवेचन जेवढे सर्वस्पर्शी, तेवढेच मूलग्राही असून त्यात दिसून येणारी ग्रंथकर्त्याची शास्त्रीय बैठक आणि प्रतिभेची झेप एतद्‌विषयक दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत दिसून येत नाही, असा अभ्यासकांचा निर्वाळा आहे. नाट्यशास्त्रावर अनेक टीका झाल्या. त्यांत

अभिनवगुप्ताची अभिनवभारती किंवा नाट्यवेदविवृत्ति अतिशय प्रसिद्ध व महत्त्वाची आहे. भरतानंतर नाट्यशास्त्रावर बरेच ग्रंथ झाले. त्यांत धनंजयाचे दशरूपक, विद्यानाथाचा प्रतापरुद्रीय आणि विश्वनाथाचे साहित्यदर्पण हे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत.”[१०]

२.११.२ सौंदर्यशास्त्र

सौंदर्याचे व कलेचे तत्त्वज्ञान म्हणजे सौंदर्यशास्त्र.यात सौंदर्याविषयी व कलेविषयी सिद्धांतन केले जाते. कला व सौंदर्य यांचे स्वरूप काय, त्यांच्या आवश्यक अटी कोणत्या, त्यांचे काही नियम असतात का, विविध कलांमधील परस्परसंबंध कोणत्या प्रकारचे असतात आणि त्यांतून कलांच्या वर्गीकरणाची व्यवस्था लावता येते का, यांसारख्या प्रश्नांचा विचार करून त्यांच्याविषयी सर्वसामान्य स्वरूपाचा सिद्धांत मांडणे, हे सौंदर्यशास्त्राचे मुख्य कार्य मानले जाते. सौंदर्यशास्त्राच्या एकूण व्याप्तीचा विचार केल्यास येथे दोन पातळ्यांवर विश्लेषण केलेले असते : एक म्हणजे संकल्पनांच्या व विधानांच्या तार्किक वैशिष्ट्यांचे विश्लेषण करणारी आकारिक पातळी, तर दुसरी म्हणजे संकल्पनांचे आशयविषयक विश्लेषण करणारी पातळी. याचा अधिक विचार पुढे येईलच.

अठराव्या शतकातील जर्मन तत्त्वज्ञ अलेक्सांडर बाउमगार्टेन (१७१४-६२) याने ‘ईस्थेटिक्स’ ही संज्ञा वरील अर्थाने अठराव्या शतकात प्रथम वापरली. ‘aisthesis’ (संवेदन) या मूळ ग्रीक शब्दावरून ‘ईस्थेटिक्स’ हा शब्द आला. ‘ईस्थेटिक्स’ हा शब्द बाउमगार्टेनने तत्त्वज्ञानात्मक परिभाषेत समाविष्ट केला. ‘ईस्थेटिक्स’ याचा शब्दशः अर्थ ‘संवेदनशास्त्र’ असा आहे. बाउमगार्टेनने सौंदर्यशास्त्राचा अंतर्भाव संवेदन-शास्त्रात केला. ईस्थेटिक्स या संज्ञेला पर्याय म्हणून आधुनिक मराठीमध्ये सौंदर्यशास्त्र ही संज्ञा सर्वसामान्य वापरात आहे. काही अभ्यासकांनी सौस्थ्यशास्त्र (पु. शि. रेगे), कलास्वरूपशास्त्र (दि. के. बेडेकर) आणि आभिरौचिकी (दि. य. देशपांडे) यांसारखे पर्याय सुचविले असले, तरी ते फारसे प्रचलित नाहीत.

ईस्थेटिक्स किंवा सौंदर्यशास्त्र या संज्ञा आधुनिक असल्या, तरी सौंदर्य व कला यांच्या स्वरूपाचा वेध घेणारी आणि त्यांच्याविषयी सिद्धांतन करणारी परंपरा प्राचीन काळातही होती. संस्कृतमध्ये सौंदर्यशास्त्रीय विचाराची परंपरा निदान भरताच्या नाट्यशास्त्राइतकी प्राचीन आहे (इ. स. पू. सु. २००-इ. स. २००) आणि संस्कृतमध्ये ज्याला काव्यशास्त्र वा साहित्यशास्त्र म्हटले जाते, ती सौंदर्यशास्त्रीय विचाराचीच एक परंपरा आहे. पाश्चात्त्य परंपरेतही कलेचा सैद्धांतिक पातळीवरील विचार प्लेटो (४२८-३४८ इ. स. पू. सु.) व ॲरिस्टॉटल (३८४-३२२ इ. स. पू.) यांच्यापासून चालत आलेला आहे.

आधुनिक पाश्चात्त्य तत्त्वज्ञानामध्ये सौंदर्यशास्त्र हा विषय तत्त्वज्ञानाची एक उपशाखा म्हणून मानला जातो. तर्कशास्त्र, ज्ञानमीमांसा, अतिभौतिकी किंवा तत्त्वमीमांसा (मेटॅफिजिक्स) यांच्याबरोबरच मूल्यविचार ही तत्त्वज्ञानाची शाखा मानली, तर नीतिशास्त्र आणि सौंदर्यशास्त्र या तिच्या उपशाखा मानाव्या लागतील. सौंदर्यशास्त्रामध्ये सौंदर्य या मूल्यवाचक संकल्पनेचा तात्त्विक विचार होतो. सौंदर्य आणि त्याच्याशी संबंधित संकल्पनांचे व विधानांचे तार्किक विश्लेषण करणे व त्यांच्याविषयीच्या सिद्धांतांची सुसंगत मांडणी करणे, हे सौंदर्यशास्त्राचे प्रमुख उद्दिष्ट म्हणता येईल.

सौंदर्यशास्त्रासंबंधीच्या दोन गैरसमजुतींची नोंद येथे घ्यायला हवी. एक म्हणजे, सौंदर्य व शास्त्र या संकल्पना परस्परविरोधी आहेत, असा एक समज बराच रूढ आहे. यामागची तात्त्विक भूमिका शोधायची तर ती पुढीलप्रमाणे मांडता येईल : सौंदर्य ही एक साक्षात अनुभूती असते व त्यामुळे त्याचा केवळ आस्वादच शक्य असतो उलटपक्षी शास्त्र हे तर्क व विश्लेषण यांवर आधारलेले असते व त्यामुळे सौंदर्याचे शास्त्र असू शकत नाही. कलाव्यवहाराच्या बाबतीत ही भूमिका स्वीकारायची म्हटली, तर कलेचे अध्ययन-अध्यापन व एकूणच समीक्षाव्यवहार अशक्य कोटीतला ठरतो कारण अध्ययन-अध्यापन व समीक्षा यांतील कोणतीही गोष्ट शक्य व्हायची असेल, तर संकल्पनांची आवश्यकता आहे आणि संकल्पना आल्या की नियम, व्यवस्था आणि शास्त्र या गोष्टीही अपरिहार्यपणे येतात. तेव्हा कलांचे अध्ययन-अध्यापन आणि समीक्षा या गोष्टी महत्त्वाच्या असतात, हे मान्य केले की, सौंदर्यशास्त्र भक्कम पायावर उभे राहू शकते. खरे म्हणजे त्याचा पायाच संकल्पनायुक्त कलानुभवात असतो मात्र कलाविषयक संकल्पनांची तत्त्वज्ञानात्मक मांडणी करणारे शास्त्र हे विज्ञानाप्रमाणे केवळ वर्णनात्मक वा स्पष्टीकरणात्मक स्वरूपाचे नसून त्याला मूल्यनप्रक्रियेचा, म्हणजेच मूल्यसंकल्पनांचा व निकषांचा वेध घ्यायचा असतो, हे येथे ध्यानात ठेवायला हवे.

पहिल्या गैरसमजुतीशी संबंधित असणारी दुसरी गैरसमजूत म्हणजे कलासमीक्षा व सौंदर्यशास्त्र यांचा कोणत्याही प्रकारचा संबंध नाही, असे मानणे ही होय. या दोहोंचा संबंध नाकारणाऱ्या भूमिकेमागील मुख्य धारणा अनन्यत्वाची आहे मग हे अनन्यत्व कलाकृतीचे असेल, किंवा कलानुभवाचे असेल. कलेच्या संदर्भात केवळ भावनात्मक प्रतिसाद शक्य असतात आणि प्रत्येक भावनात्मक प्रतिसाद हा अनन्य असतो, तेथे सामान्यीकरण वा तार्किक विश्लेषण शक्य नसते, ही आस्वादक समीक्षेमागची धारणा आहे व ती सौंदर्यशास्त्रालाच नव्हे तर समीक्षेलाही नाकारणारी आहे. यापेक्षा काहीशी वेगळी भूमिका म्हणजे कलासमीक्षा ही कलाकृतीच्या अनन्यत्वाचा वेध घेत असते व त्यामुळे सर्वसामान्य स्वरूपाचे सिद्धांत मांडणाऱ्या

सौंदर्यशास्त्राला तेथे स्थान नसते, ही आहे. या टोकाच्या भूमिकांमध्ये खरे म्हणजे कोणत्याच संकल्पनांना स्थान राहत नाही. कारण संकल्पना या सामान्य स्वरूपाच्याच असतात. संकल्पना नाकारून कोणताही मानवी अनुभव वा व्यवहार शक्य होत नाही. कलासमीक्षेत कलानुभवामध्ये अनुस्यूत असणाऱ्या संकल्पनांची व तत्त्वांची संगती लावण्याचा प्रयत्न असतो तर सौंदर्यशास्त्रामध्ये समीक्षाव्यवहारातील संकल्पना, तत्त्वे व निकष यांची–म्हणजेच पर्यायाने प्रत्यक्ष कलानुभवातील संकल्पना, तत्त्वे व निकष यांची–संगती लावण्याचा प्रयत्न असतो. कलासमीक्षेत कलाकृतींचे मूल्यमापन ज्या संकल्पनांच्या व तत्त्वांच्या साहाय्याने होत असते, त्यांचे काटेकोर विश्लेषण सौंदर्यशास्त्र करीत असल्यामुळे ते समीक्षेला व पर्यायाने सुजाण कलानुभवाला उपकारकच ठरते.

सौंदर्यशास्त्रीय सिद्धांतनाचे मुख्यत्वे तीन प्रकार दिसून येतात. आपल्या व्यापक अशा अतिभौतिकीय सिद्धांताचा एक भाग म्हणून सौंदर्यशास्त्रीय विचार मांडणे, हा त्यातील एक प्रकार होय. हा प्रकार इमॅन्युएल कांट (१७२४-१८०४) व विश्वचैतन्यवादी वा केवल चिद्वादी (ॲब्सोल्यूट आयडिॲलिस्ट) तत्त्वज्ञांच्या लेखनात आढळतो. कांटची सौंदर्यमीमांसा त्याच्या क्रिटिक ऑफ जज्मेन्ट (१७९०) या ग्रंथात समाविष्ट आहे. कांटच्या एकूण तत्त्वज्ञानाच्या चौकटीमध्ये ज्ञानमीमांसा (कार्यकारणादी संकल्पनांनी सिद्ध झालेल्या प्राकृतिक सृष्टीच्या ज्ञानाचे विश्लेषण) आणि नीतिमीमांसा (मानवी संकल्पशक्तीच्या स्वातंत्र्यांवर आधारलेल्या नीतिविश्वाचे विश्लेषण) यांतला दुवा म्हणून सौंदर्यशास्त्रीय सिद्धांत वावरतो. विश्वचैतन्यवादी चौकटीमध्ये सर्व विश्व हे एकाच चैतन्याचा आविष्कार मानले जाते आणि त्याचा आविष्कार वेगवेगळ्या माध्यमांत होत असतो इंद्रियगोचर माध्यमातील विश्वचैतन्याचा आविष्कार म्हणजे कला होय. या प्रकारच्या सिद्धांतनामध्ये सर्वंकष असा व्यूह रचताना कलेच्या खास वैशिष्ट्यांकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते.

सौंदर्यशास्त्रीय सिद्धांतनाचा दुसरा प्रकार म्हणजे प्रत्यक्ष कलाव्यवहारातून हाती लागणाऱ्या तत्त्वांचा विचार करून त्यातून कलांचे एकमेव सत्त्व शोधू पाहणारे सिद्धांत होय. उदा., क्लाइव्ह बेल (१८८१-१९६४) याने मुख्यत्वे दृश्यकलांमधील रचनातत्त्वांच्या आधारे सौंदर्यभावनेचा वेध घेऊन 'अर्थपूर्ण रूपबंध' (सिग्निफिकंट फॉर्म) हे सर्व कलांचे सत्त्व सांगू पाहणारे तत्त्व मांडले. सौंदर्यशास्त्रात बेल याने रूपवादी किंवा आकारवादी (फॉर्मलिस्ट) उपपत्तीचा पुरस्कार केला. कलाकृतीचे सौंदर्य केवळ तिच्या आकारात सामावलेले असते किंवा केवळ तिच्या आकारावर अधिष्ठित झालेले असते. तिच्या सौंदर्याचा तिच्या आशयाशी काही संबंध नसतो. ज्या प्रकारच्या आकारात कलाकृतीचे सौंदर्य सामावलेले असते (किंवा ज्या

प्रकारच्या आकारावर कलाकृतीचे सौंदर्य अधिष्ठित असते) त्याला बेलने 'अर्थपूर्ण आकार' वा 'अर्थपूर्ण रूपबंध' म्हटले आहे. ज्या आकारामुळे आपली सौंदर्यभावना जागृत होते, तो आकार म्हणजे अर्थपूर्ण आकार होय. सौंदर्यानुभव हा लौकिक-व्यावहारिक अनुभवापेक्षा वेगळा, अलग व स्वायत्त असा अनुभवाचा प्रांत आहे अशी बेलची भूमिका आहे. हॅरल्ड ऑइब्रन याने संगीतादी साहित्येतर कलांचा आधार घेऊन 'कलाकृती म्हणजे संवेदनांच्या (सेंद्रिय) रचनेची दीर्घकाल टिकणारी शक्यता' अशी कलेचे सत्त्व सांगू पाहणारी व्याख्या केली. त्याच्या थिअरी ऑफ ब्यूटी (१९५२) व ईस्थेटिक्स अँड क्रिटिसिझम (१९५५) या पुस्तकांत त्याचे सौंदर्यशास्त्रीय विवेचन आहे.

आधुनिक काळात अधिक मान्यता पावलेला तिसरा प्रकार म्हणजे कलाव्यवहारातील संकल्पनांचे विश्लेषण व व्यवस्थितीकरण करणारी मांडणी होय. यात कलास्वरूपविषयक संकल्पना, तत्त्वे इत्यादींचे सौंदर्यशास्त्रामधील विश्लेषण हे दोन पातळ्यांवर होत असते. एक, या संकल्पनांची तार्किक वैशिष्ट्ये आणि दुसरी, त्यांचा आशय. 'सौंदर्य' ही संकल्पना व्याख्येय आहे का, 'सुंदर' या संज्ञेने एखादा गुणधर्म निर्देशित केला जातो का, हा गुणधर्म कोणत्या जातीचा (प्राकृतिक की अप्राकृतिक) असतो, या स्वरूपाचे प्रश्न हे तार्किक प्रश्न आहेत, आणि या प्रश्नांच्या चर्चेच्या पातळीला 'अतिसमीक्षे 'ची (मेटॅ-क्रिटिसिझम) पातळी असे म्हणतात. येथे समीक्षा या संकल्पनेमध्ये कलाकृतीची प्रत्यक्ष समीक्षा आणि सैद्धांतिक समीक्षा या दोहोंचा समावेश होतो. दुसरी पातळी म्हणजे सौंदर्याचे निकष कोणते, कोणत्या विशिष्ट गुणधर्मांमुळे वस्तू सुंदर ठरतात, या प्रश्नांच्या चर्चेची पातळी. ही सौंदर्यविषयक संकल्पनांच्या आशयाची पातळी होय.

सौंदर्यशास्त्रीय संकल्पनांच्या आशयाचा विचार करताना कलानिर्मिती, कलाकृती आणि कलानुभव या तीन घटकांचा विचार सौंदर्यशास्त्राला करावा लागतो. निर्मितीच्या प्रक्रियेचे विश्लेषण करताना कलेच्या उत्पत्तीविषयीचे सिद्धांत सौंदर्यशास्त्राला तपासावे लागतात. यामध्ये कलावंताच्या मानसिक प्रक्रिया, सर्जनशीलता, कल्पनाशक्ती यांसारख्या मनोव्यापारात्मक संकल्प-नांचा, त्याचप्रमाणे कलानिर्मितीमागच्या सामाजिक प्रेरणा, कलावंताने अनुभवलेली सामाजिक परिस्थिती यांचा अंतर्भाव होतो. कलाकृतीच्या स्वरूपाचा विचार करताना कलेच्या माध्यमाविषयीचे व घाटाविषयीचे वा रूपाविषयीचे विविध सिद्धांत (उदा., सेंद्रिय एकात्मता, भावलेली संगती, लयतत्त्वे इ.), कलाप्रकारांची संकल्पना, कलांचे परस्परसंबंध, कलाकृतीचे सत्ताशास्त्रीय स्थान यांसारख्या बाबींचा तसेच कलानुभवाविषयी विचार करताना कलात्मक दृष्टिकोन, सौंदर्यभावना, सौंदर्यानंद आदींचा विचार होतो.

कलात्मक मूल्य वा सौंदर्यमूल्य आणि ज्ञान, नीती व उपयुक्तता ही मानवी जीवनातील इतर मूल्ये यांचे परस्परसंबंध काय, हाही सौंदर्यशास्त्रामधील एक केंद्रवर्ती प्रश्न आहे. यासंबंधीच्या भूमिकांची विभागणी स्वायत्ततावादी किंवा केवल-कलावादी भूमिका एका बाजूला आणि लौकिकतावादी भूमिका दुसऱ्या बाजूला अशी झालेली दिसते. ज्ञानात्मक, नैतिक व उपयुक्ततावादी मूल्यांवर कलामूल्य अवलंबून नसते तर ते स्वतंत्र, स्वयंभू, स्वायत्त असते अशी स्वायत्ततावादी भूमिका आहे. अभिजात संगीता-सारख्या 'जीवनार्थविरहित' कलाप्रकारांचा आधार या सिद्धांतामध्ये सामान्यतः घेतला जातो आणि कलेच्या 'विशुद्धते 'च्या तत्त्वावर आधारून कलांची एक श्रेणिव्यवस्थाही मांडली जाते. उदा., वॉल्टर पेटर (१८३९-९४) आणि बा. सी. मर्ढेकर यांच्या भूमिका. वॉल्टर पेटरची 'कलेसाठी कला' या तत्त्वाचे समर्थन करणारी कलावादी भूमिका त्याच्या स्टडीज इन द हिस्टरी ऑफ रेनेसान्स (१८७३) या ग्रंथात व्यक्त झाली आहे. सौंदर्याची अमूर्त, सर्वमान्य व्याख्या देणे नव्हे तर त्याच्या विशिष्ट, मूर्त स्वरूपाची समग्र जाणीव व्यक्त करणे, हे सौंदर्यशास्त्राचे कार्य होय. हे त्याच्या सौंदर्यवादी भूमिकेचे सार होय. बा. सी. मर्ढेकरांनीही कलेची स्वायत्त मूल्ये प्रमाण मानून आपली सौंदर्यशास्त्रीय भूमिका मांडली आहे. याउलट सौंदर्यमूल्य हे कलामूल्यांबरोबरीनेच ज्ञानात्मक, नैतिक व उपयुक्ततावादी मूल्यांनीही निश्चित होते, अशी लौकिकतावादी भूमिका आहे.

हेगेलने केलेली सौंदर्याची व्याख्या अशी : सौंदर्य म्हणजे नियमिततेचा, चैतन्याचा इंद्रियगोचर आविष्कार. संवेदनांच्या विश्वात दिसणारे चैतन्याचे रूप म्हणजे सौंदर्य, हा हेगेलचा सिद्धांत बोझांकेटला मान्य आहे पण हेगेलने केलेला निसर्गसौंदर्याचा अधिक्षेप त्याला मान्य नाही. कारण परमतत्त्वाचा आविष्कार जसा कलेत होतो, तसाच तो निसर्गसौंदर्यातही होतो. त्यामुळे हेगेलचे कलास्वरूपशास्त्र किंवा कलामीमांसा (फिलॉसॉफी ऑफ आर्ट) बोझांकेटच्या लेखनात सौंदर्यशास्त्र बनते. त्याने हेगेलप्रणीत सौंदर्यसिद्धांत तर मांडलाच शिवाय कांटने स्वायत्त सौंदर्य (फ्री ब्यूटी) व परायत्त सौंदर्य (डिपेन्डंट ब्यूटी) हे जे सौंदर्याचे दोन प्रकार मानले, त्यांनाही आपल्या सौंदर्यसिद्धांतात सामावून घेतले. हे सौंदर्याचे दोन प्रकार म्हणजे एकाच तत्त्वाचे दोन आविष्कार आहेत, असे बोझांकेट म्हणतो. ज्याला कांट स्वायत्त सौंदर्य म्हणतो, त्याला बोझांकेटने केवल-चैतन्याविष्कार किंवा केवल-आत्माविष्कार (ॲब्स्ट्रॅक्ट किंवा अ प्रॉयरी एक्स्प्रेशन) असे नाव दिले आहे. बोझांकेटची द हिस्टरी ऑफ ईस्थेटिक (१८९२ पुनर्मुद्रण १९५६) व थ्री लेक्चर्स ऑन ईस्थेटिक (१९१५) ही सौंदर्यशास्त्रावरची पुस्तके महत्त्वाची आहेत. कलावंताला वास्तवाचे केवळ इंद्रियगोचर रूप शोधावयाचे असते. सुंदर गोष्ट इंद्रियगोचर किंवा मनश्चक्षूला दिसणारी अशी असायला हवी, ही सौंदर्यानुभवाची अट आहे. या इंद्रियगोचर रूपाला

सौंदर्यानुभवात फार महत्त्व असते. याला बोझांकेट 'द फंडामेंटल डॉक्ट्रिन ऑफ ईस्थेटिक सेम्बलन्स' असे म्हणतो.

रॉजर फ्रायने आपल्या कलासमीक्षेला सौंदर्यवादी वृत्तीची जोड दिली. कलेतील आकारिक घटकांच्या स्वायत्त मूल्यांवर भर देणारी सौंदर्यवादी भूमिका त्याने मांडली. चित्रातील रंग व अमूर्त आकारांच्या परस्परसंबंधांतून सौंदर्यात्मक प्रतिसाद उत्पन्न होतात चित्राचा वर्ण्य विषय वा त्यातून प्रकट होणारा सांस्कृतिक आशय हा दुय्यम स्वरूपाचाच असतो, हे त्याच्या सौंदर्यमीमांसेचे मुख्य सूत्र होते. त्याची रूपवादी भूमिका क्लाइव्ह बेलच्या अर्थपूर्ण रूपबंध या उपपत्तीशी मिळतीजुळती आहे.

आधुनिक काळातील सौंदर्यशास्त्रज्ञ सुसान लँगर हिने फीलिंग अँड फॉर्म (१९५३) या आपल्या पुस्तकात 'कला ही भावनेच्या घडणीचे प्रतीक असते', हा सिद्धांत मांडला. त्याचा उगम कांटच्या, 'सौंदर्य हे नैतिकतेचे प्रतीक असते, कारण या दोहोंतील घडणीची तत्त्वे समान असतात', या विचारात आढळतो. भावनेला (फीलिंग) जी अंतर्गत घडण (फॉर्म) असते, ती कलाव्यापारामुळे आपल्याला कळते, असा लँगरचा दावा आहे. कलाकृतीचे कार्य भावनेच्या घडणीचे ज्ञान देणे हे आहे. हे ज्ञान मिळाले म्हणजे एका वेगळ्याच भावनेचा अनुभव येतो. या ज्ञानमिश्रित भावनेला 'सौंदर्यभावना', 'सौंदर्यानंद' अशी नावे दिली जातात. लँगरच्या कलासौंदर्यविषयक विवेचनात प्रतीक (सिम्बॉल) या संकल्पनेलाही विशेष महत्त्व आहे. लँगरच्या मते आपल्याला कोरा अनुभव कधी येत नाही. जो अनुभव येतो तोच मुळी प्रतीकांनी संस्कारित होऊन येतो. कला हा प्रतीकांचा आविष्कार करण्याचा मानवाचा एक मार्ग आहे. लँगरच्या मते, कलाकृती हे उपस्थापक (प्रेझेंटेशनल) प्रतीक असून ते विशिष्ट भावना व्यक्त करते. एक विशिष्ट भावना हाच त्या प्रतीकाचा अर्थ. या भावनेला विशिष्ट आकार असतो व तो तिच्या स्वतःत अनुस्यूत असतो, तो तिचा आंतरिक विशिष्ट आकार असतो. या कलास्वरूपविषयक विवेचनात लँगरच्या सौंदर्यसिद्धांताचे मर्म दडले आहे.

गेल्या सु. पंचवीस वर्षांमध्ये उत्तर-संरचनावादी भूमिकांमधून एक प्रकारची तात्त्विक गुंतागुंत निर्माण झालेली आहे, असे म्हणावे लागेल. पारंपरिक तत्त्वज्ञानामध्ये एकसत्त्वतर्काभासाची चर्चा झालेली असली आणि बहुनिकषतावादी भूमिका मांडली गेलेली असली, तरी विविध विद्याशाखांच्या मूलभूत संकल्पनांविषयी आणि सिद्धांतनप्रक्रियेविषयी साधारणपणे एकमत होते. परंतु चिन्हव्यवस्था या मूलतः कमालीच्या अस्थिर असतात असे मानून, तसेच एकसंधता, सलगता, सुसंगतता यांचा संबंध बौद्धिक धुरीणत्वाशी (हेजिमनी) जोडून उत्तर-संरचनावादाने या कल्पनांना विरोध केलेला आहे. मानव्यविद्यांच्या क्षेत्रांमध्ये कोणतीही

अभ्यासशाखा ही सिद्धांतनाच्या दृष्टीने एकसंध राहू शकत नाही, हे उत्तर-संरचनावादाचे एक प्रमुख सूत्र आहे. त्यामुळे तार्किक विश्लेषण, संकल्पनांची व सिद्धांतांची सुसंगत मांडणी, या सर्वच तात्त्विक प्रक्रियांविषयी संभ्रमात टाकणारी परिस्थिती निर्माण झालेली आहे. सौंदर्यशास्त्राच्या बाबतीत हेसुद्धा एक सुसंगत असे शास्त्र असू शकणार नाही, अशी भूमिका उत्तरसंरचनावादामधून सूचित होते. परंतु उत्तर-संरचनावादी भूमिका हीच मुळात आपल्याला कशी आकलन होऊ शकते, असा प्रश्न येथे उपस्थित होतो आणि त्याला समाधानकारक उत्तर या भूमिकेमध्ये आढळत नाही.

मराठीतील सौंदर्यशास्त्रीय विचार: सौंदर्यशास्त्र या विषयासंबंधी मराठीत कुतूहल निर्माण करण्याचे आणि एका महत्त्वाच्या स्वायत्ततावादी रचनातत्त्वाची मांडणी करण्याचे श्रेय बा. सी. मर्ढेकर (१९०९-५६) यांना द्यायला हवे. सौंदर्यविषयक विविध लेखांमधून त्यांनी कलेचे माध्यम, सौंदर्यभावना, सौंदर्यविधान, कलेची फलश्रुती इत्यादींविषयी विचार मांडून मराठीतील सौंदर्यशास्त्रीय चर्चेला प्रारंभ करून दिला. त्यांच्या सौंदर्य आणि साहित्य (१९५५ दुसरी आवृ. १९६०) आणि कला आणि मानव (१९८३ मूळ इंग्रजी–आर्ट्स अँड मॅन, १९३७) या पुस्तकांत त्यांचे साहित्य व सौंदर्यविषयक लेखन समाविष्ट आहे.

मर्ढेकरांनी मराठीत प्रथमच कलासौंदर्यविषयक विचारांना तात्त्विक बैठक देऊन सौंदर्यशास्त्राचा पाया रचण्याचे कार्य केले. मर्ढेकरांच्या मते, कलाकृतीच्या घाटाचे चैतन्यतत्त्व म्हणजेच लयतत्त्व. संवादलय, विरोधलय व समतोललय ही तीन लयतत्त्वे मर्ढेकरांनी विशद केली. या लयतत्त्वांची एकात्म, सेंद्रिय सुसंघटना कलाकृतीच्या घाटात सौंदर्य निर्माण करते. सौंदर्याचे अस्तित्व अनुभूतीवर अवलंबून नाही ते स्वतंत्र, स्वयंभू असते. मर्ढेकरांनी आपल्या सौंदर्यविचारात सौंदर्यभावनेला विशेष महत्त्व दिले आहे. संवेदनांच्या गुणांनी व त्यांच्याच फक्त संवाद-विरोधकात्मक लयीने जी भावना उत्पन्न होते, ती सौंदर्यभावना. हा अनुभव स्वयंपूर्ण असतो. त्याचे महत्त्व केवळ साधनात्मक, जीवशास्त्रीय नसते. सौंदर्यभावना ही लौकिक जीवनव्यवहारातील भावनांपेक्षा (उदा., राग, द्वेष, भीती, प्रेम इ.) सर्वस्वी वेगळी, स्वयंपूर्ण व स्वायत्त असते. संवेदनांच्या केवळ अंगभूत गुणांवर गुंफलेल्या संवेदना आकृतीचा आस्वाद मर्ढेकरांना महत्त्वाचा वाटतो. रेषा, रंग, घनरूप, ध्वनी इ. संवेदनांच्या लयबद्ध रचनांनी वेडावून जाणे त्यांना महत्त्वाचे वाटते. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रीय विचारांचे हे सार म्हणता येईल. मर्ढेकरांनंतरच्या काळात सुरेंद्र बारलिंगे, नरहर कुरुंदकर, प्रभाकर पाध्ये, शरच्चंद्र मुक्तिबोध, माधव आचवल प्रभृतींनी वेगवेगळ्या दृष्टिकोणांतून सौंदर्यशास्त्रीय विचारांच्या तात्त्विक चर्चेत बरीच भर घातली आहे. तसेच अलीकडील यूरोपीय कलाविचारांचा परिचय गंगाधर पाटील यांनी

करून दिला आहे. समीक्षेची नवी रूपे (१९८१) व समीक्षामीमांसा (२०११) ही त्यांची महत्त्वाची पुस्तके होत. मराठीमधील सौंदर्यशास्त्रीय लेखनाचे प्रारंभीच्या टप्प्यांचे आकलन तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोणातून कसे करता येईल, याचे दिग्दर्शन मे. पुं. रेगे यांच्या लेखनामध्ये आढळते. सौंदर्यशास्त्र या विषयाची सांगोपांग आणि समग्र मांडणी करण्याचे कार्य रा. भा. पाटणकर (१९२७ -२००४) यांच्या सौंदर्यमीमांसा (१९७४) या ग्रंथाने केलेले आहे. स्वायत्ततावाद आणि लौकिकतावाद या दोन कलाविषयक संकल्पनाव्यूहांना दोन ध्रुव कल्पून विविध सौंदर्यशास्त्रीय सिद्धांतांची एक सुसंगत व्यवस्था या ग्रंथामध्ये लावलेली आढळते. याखेरीज पाटणकरांचे क्रोचेचे सौंदर्यशास्त्र : एक भाष्य (१९७४) व कांटची सौंदर्यमीमांसा (१९७७) हे ग्रंथही अभ्यासकांसाठी उपयुक्त आहेत.

प्रभाकर पाध्ये (१९०९-८४) यांनी मुख्यत्वे सौंदर्यानुभवाची संकल्पना विकसित केली. त्यांनी मर्ढेकरांच्या आणि रा. भा. पाटणकरांच्या सौंदर्यशास्त्रीय विचारांचे विश्लेषण अनुक्रमे मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा (१९७७) आणि पाटणकरांची सौंदर्यमीमांसा (१९७७) या ग्रंथांतून केले, तसेच मराठीतील कलाविचारांचा ऐतिहासिक दृष्टीने परामर्शही घेतला. पाध्यांनी स्वतःची सौंदर्यशास्त्रीय भूमिका त्यांच्या सौंदर्यानुभव (१९७९) या ग्रंथातून स्पष्ट केली. सौंदर्यास्वाद किंवा कलानुभव यांचा मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून विचार त्यात मांडला आहे. सौंदर्यानुभव हा इतर अनुभवांपेक्षा वेगळा असून त्याचे स्वरूप साक्षात्कारी असते, आणि अनुभवात केवलास्वाद वृत्तीने रमून गेल्यामुळे तो निर्माण होतो. कलानिर्मिती, कलानुभव किंवा सौंदर्यानुभव मानवी मेंदूतील आदिम भागाशी संबंधित असतो, हा अभ्युपगम पाध्ये मांडतात. सौंदर्यानुभव घेण्याची क्षमता प्रतिभेच्या मुक्त अशा विशिष्ट स्वरूपामुळे लाभते. कलाकृतीची निर्मिती आणि आस्वाद या दोहोंचाही आधार ही मुक्त प्रतिभाशक्तीच होय. रसिकाची केवलास्वाद वृत्ती म्हणजेच सौंदर्यदृष्टी ही कलानुभवाची आवश्यक अट आहे. या सौंदर्यवृत्तीमुळे मानवाच्या मनातील आदिम व विशुद्ध ऊर्जेला कलाकृती जाग आणू शकते. पाध्यांचा सौंदर्यविचार थोडक्यात अशा स्वरूपाचा आहे.

अशोक दा. रानडे (१९३७-२०११) यांनी संगीताचे सौंदर्यशास्त्र (१९७१) या ग्रंथात त्यांची भूमिका मांडली आहे. स्ट्रॅविन्स्कीचे सांगीतिक सौंदर्यशास्त्र (१९७५) हे त्यांचे पुस्तकही महत्त्वाचे आहे. स्वर, लय आणि बंदीश (संगीतकृतीचा घाट वा रूपबंध) यांचे मेलन संगीतकृतीत सौंदर्य निर्माण करते. संगीतकृतीत लयबंध हे सौंदर्यतत्त्व असते. लय म्हणजे सर्जक केंद्रांचा नियमित पुनरुद्भव होय, अशी उपपत्ती मांडून रानडे यांनी लयतत्त्वात लवचिक व जिवंत नियमिततेला प्राधान्य दिले आहे.

माधव आचवल (१९२६-८०) यांनी मुख्यत्वे त्यांच्या किमया (१९६१) या पुस्तकात वास्तुकलेच्या अनुषंगाने एकूणच दृश्य-कलांतील सौंदर्यतत्त्वांचा वेध घेतला आहे. त्यांचे विवेचन चित्रकला, शिल्पकला यांनाही लागू पडणारे आहे. त्यांच्या रसास्वाद : वाङ्मय आणि कला (१९७२) व जास्वंद (१९७४) ह्या समीक्षापर पुस्तकांतूनही त्यांच्या सौंदर्यलक्ष्यी कलावादी भूमिकेचा प्रत्यय येतो. विशिष्ट भावपरिपोषाच्या दृष्टीने केलेली कालाची आणि अवकाशाची बंदीश हा जसा संगीतकलेचा तसाच वास्तुकलेचाही प्राण आहे. प्रकाश, पाणी, द्रव्य (मटेरिअल), रंग, रेषा, घनता, अवकाशाला वास्तूने दिलेले आकार आणि या सर्वांच्या संघटनेतून निर्माण झालेले अलौकिक सौंदर्य वास्तुरचनेत महत्त्वाचे आहे. मर्ढेकरांच्या केवळ रूपवादी लयतत्त्वाला आशयसापेक्ष, आशयाविष्कारी कलाविचारांची जोड दिल्याने आचवलांची सौंदर्यमीमांसा अधिक व्यापक वाटते.

रानडे व आचवल यांनी साहित्येतर ललित कलांच्या (संगीत व वास्तुकला) अनुषंगाने सौंदर्यमीमांसा केली असल्याने मराठी सौंदर्यविचारांत तिला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. ललित कलांत सौंदर्य हे मूल्य अभिप्रेत असते आणि कोणत्याही कलाकृतीत सौंदर्य हे लयतत्त्वांच्या आविष्कारातून सिद्ध होते हा या भूमिकेचा सारांश म्हणता येईल.

अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र असा एक नवा विचार दलित साहित्याच्या आविष्कारानंतर जन्मास आला. बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूनंतर उदयाला आलेले हे दलित साहित्य ब्राह्मणी साहित्याशी नाळ तोडणारे पहिले आधुनिक साहित्य असून ब्राह्मणी सौंदर्यशास्त्राविरोधी त्याने विद्रोहाची भूमिका मांडली आहे. साहित्य क्रांतिकारक असते पण ते क्रांतिशास्त्र नसते. साहित्य क्रांती करीत नाही, क्रांतीला उद्युक्त करते असा जीवनवादी, परिवर्तनवादी विचार त्यातून अभिव्यक्त झाला आहे. अब्राह्मणी सौंदर्यशास्त्र भारतीय परंपरेतील सौंदर्यशास्त्राबद्दल आक्षेप नोंदवून मार्क्सवादी व दलित सौंदर्यशास्त्राचे मूलतत्त्व स्पष्ट करते. त्यांच्या मताप्रमाणे विश्व-चैतन्यवादी वा अध्यात्मवादी सौंदर्यशास्त्र हे मूलतःच सर्वोदयवादी वा तथाकथित वर्णजात वर्गातीतवादी आहे. उलट मार्क्सवादी सौंदर्यशास्त्र कलाकृतीचे सौंदर्य वर्गीय वास्तवतेच्या कलात्मक आविष्कारांत, तर दलित आणि मध्यमजातीय सौंदर्यशास्त्रे अनुक्रमे दलित व मध्यमजातीय वास्तवतेच्या कलात्मक आविष्कारांत आहेत. दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र या ग्रंथात शरणकुमार लिंबाळे यांनी सौंदर्यशास्त्रातील सांरचनिक, कलात्मक घटकांपेक्षा सापेक्ष, वास्तववादी, जीवनानुभूतीला स्पर्श करणाऱ्या घटकांना महत्त्व दिले आहे. एकूणच सौंदर्यशास्त्राचा विचार कलासापेक्ष वा शास्त्रसापेक्ष करण्यापेक्षा तो अधिक जीवनसापेक्ष पद्धतीने करण्याचा प्रयत्न अब्राह्मणी साहित्याच्या सौंदर्यशास्त्राच्या निमित्ताने झाला आहे.” [११]

२.११.३ वास्तुशास्त्र

वास्तुकला/वास्तुविज्ञान हे इमारत बांधणीमध्ये असणा-या कलात्मक संरचना आणि तंत्र व त्यासाठी लागणाऱ्या कौशल्याचे शास्त्र आहे. वास्तुकलेच्या व्यावसायिकांना व्यावहारिक आणि अभिव्यक्तीच्या दृष्टिकोनातून, उपयोगिता व सौंदर्य या दोनही बाजूंचा विचार करून संरचना करण्या साठी नेमले जाते. जरी ह्या दोन्ही बाजू भिन्न असल्या तरी त्याना वेगळे करता येत नाही आणि यांचे प्रमाण हे अनेकदा भिन्न भिन्न असू शकते. कारण प्रत्येक समाजाचे (अति प्रगत प्रगत वा कमी प्रगत , स्थिर वा भटका) त्याच्या सभोवताली निसर्गाशी आणि इतर समाजाघटकांशी एक विशिष्ट नाते असते. त्यामुळे तो समाज ज्या इमारत रचना करतो त्यात त्यांचे पर्यावरण (हवामान आणि वातावरण) इतिहास , कलात्मक संवेदनशीलता आणि इतर अनेक दैनंदिन घटक यांचा प्रभाव जाणवतो. वास्तूकलेच्या दृष्टीने निर्माण केलेल्या इमारतींमध्ये इतर मानवनिर्मित इमारातींपेक्षा खाली वेगळे पण आढळते.

१. मानवाच्या सामान्य कामासाठी वापराची उपयोगिता तसेच मानवाच्या एखाद्या विशिष्टकामासाठी समावेषक शक्यता. रचनेच्या बांधकामाची सुस्थीराता आणि टीकाऊपणा संकल्पना आणि अनुभूती च्या माध्यमातून साकारणारी अभिव्यक्ती वरील तीनही मुद्यांची वास्तूकलेमध्ये पूर्तता होणे आवश्यक आहे. त्यांतील दुसरा मुद्दा पूर्णपणे असावा लागतो पहिला आणि तिसरा मुद्दा हे त्या इमारतीच्या सामाजिक गरजेनुसार तैलानिकरीत्या बदलू शकतात. जर वापर उपयोगाप्रधान असेल जसे कारखाना, तर अभिव्यक्ती दुय्यम स्थानी जाऊ शकते. जर कार्य प्रामुख्याने दार्शनिक असेल, उदा. महत्वाचे मोठे स्मारक, तर उपयोगिता कमी महत्वाची होते. मंदीर , चर्च, मध्यवर्ती सभागृह अशा काही इमारातेंमध्ये उपयोगिता आणि अभिव्यक्ती सारखेच महत्वाचे असू शकतात. या विषयाअंतर्गत वास्तूकला, वास्तूविज्ञान त्यांचे विविध प्रकारचे वर्गीकरण, इतिहास आणि त्यासंदर्भात माहिती अशी या विषयाची व्याप्ती आहे.

२.११.४ वैद्यकशास्त्र

वैद्यकशास्त्र ही आरोग्य विज्ञानाची शाखा आहे जिचा संबंध मानवी शरीर निरोगी राखणे याच्याशी येतो. यात असलेल्या औषधी पद्धतींचे ढोबळमानाने वर्गीकरण केल्यास त्यापैकी एकाचे आयुर्वेद वैद्यकशास्त्र म्हणून उल्लेख केला जातो. प्राचीन काळापासून भारतीयांनी वैद्यकीय क्षेत्रात जी उल्लेखनीय प्रगती केली ती म्हणजे, आयुर्वेद वैद्यकशास्त्र होय. वैद्यकशास्त्र म्हणजे आयुर्वेद. आयुर्वे द शब्द संस्कृत भाषेतील असून त्याचा अर्थ आयु म्हणजे जीवन आणि वेद म्हणजे विद्या. अशाप्रकारे जीवनविद्या म्हणून वैद्यकशास्त्र जगाला परिचित झाले. आयुर्वेद आणि त्यासारख्या विद्याशाखांमधून भारताला प्राचीन काळापासून असलेल्या वैद्यकीय ज्ञानाची

कल्पना येते. आयुर्वेदाला सुमारे ३००० किंबहुना त्यापेक्षा जास्त वर्षांपासून चालत आलेली व्यापक व समृद्ध परंपरा आहे. भारतीय उपखंडात जिची पाळेमुळे रुजलेली आहेत, अशी एक पर्यायी औषध प्रणाली म्हणजे आयुर्वेद होय. वैद्यकशास्त्र ज्याप्रमाणे रुग्णांची काळजी, रोगनिदान, प्रतिबंध, उपचार इ. कार्य करते तेच कार्य प्राचीन भारतात आयुर्वेदाने केले. वैद्यकशास्त्राला समकक्ष शब्द आयुर्वेद वापरला जातो. भारतीय परंपरेनुसार आयुर्वेदाची निर्मिती सर्वप्रथम ब्रह्मदेवाने केली. ब्रह्मदेवाने हे ज्ञान प्रजापतीला, प्रजापतीने अश्विनीकुमारांना दिले, नंतर अश्विनीकुमारांनी हे ज्ञान इंद्राला दिले व इंद्राच्या माध्यमातून ते ज्ञान जगभर पसरले. काही विद्वानांच्या मते आयुर्वेद हा ऋग्वेदाचा तर काहींच्या मते अथर्ववेदाचा उपवेद असल्याची मते नोंदविली आहेत.

'चरकसंहिता' या आयुर्वेदातील सर्वात महत्त्वाच्या ग्रंथाबाबत असे मानले जाते की, हा ग्रंथ मुळात पुनर्वसू अत्रेय ऋषी यांचा शिष्य अग्निवेश याने लिहिला होता. चरक ऋषींनी या ग्रंथाचे संस्कृत भाषेत रूपांतर केले. याप्रकारे चरक ऋषींनी चरकसंहिता ग्रंथाच्या माध्यमातून वैद्यकशास्त्रात मोठी भर घातली. यामध्ये शरीररचना, शरीरातील विविध घटकांची कार्ये व अपकार्ये, अनेक व्याधी, त्यांचे निदान-उपचार, औषधे यांचे शास्त्रशुद्ध विवेचन केले आहे. वैद्यकशास्त्राचे वेगवेगळे विभाग वैद्यकांचा दर्जा, त्यांची व्यावसायिक नीती, त्यांनी आकारावयाचे शुल्क, सेवा, सुश्रुषा यांचीही चर्चा अत्रेय ऋषींचा पुत्र पुनर्वसू आणि त्याचा शिष्य अग्निवेश यांनी 'अग्निवेशतंत्र' या ग्रंथात केली व पुढे याच ग्रंथ प्रेरणेतून चरक ऋषींनी संस्कृत भाषेतून 'चरकसंहिता' या नावाने ग्रंथातून वैद्यकशास्त्राच्या ज्ञानाचा प्रसार व प्रचार प्राचीन भारतात केला आणि वैद्यकशास्त्राच्या विकासात मोलाची भूमिका निभावली.

आयुर्वेदातील तीन मोठ्या संहिता ग्रंथांपैकी एक आहे तो 'सुश्रुत संहिता'. सदर ग्रंथाचे लिखाण हे भारतातील एक शल्यविशारद सुश्रुत यांनी केले. या ग्रंथात सुश्रुत यांनी शस्त्रक्रिया कशी करावी, कुठे शस्त्र वापरावे, शस्त्रक्रिया करताना कुठली काळजी घ्यावी आदी बाबींचे सखोल विवेचन केलेले आहे. 'सुश्रुत संहिता' ग्रंथामध्ये ११०० पेक्षा अधिक आजार व ७६० पेक्षा जास्त जडीबुटी, औषधांचे वर्णन केले गेलेले होते, ज्यामध्ये झाडांची मुळे, साल, रस व फुलांचा समावेश केला होता. सुश्रुत यांचे सर्वात मोठे योगदान प्लास्टिक सर्जरी आणि डोळ्यांच्या मोतीबिंदू ऑपरेशन या क्षेत्रात होते. सुश्रुत यांनी सांगितलेला शस्त्रक्रियेचा क्रम आजही अमलात आणलेला आधुनिक युगात दिसून येतो. या सर्वातूनच सुश्रुत यांच्या वैद्यकशास्त्रातील भरीव कामगिरीची प्रचिती येते.

नागार्जुन नावाच्या प्रसिद्ध वैद्यकाने चिकित्साशास्त्रात महत्त्वपूर्ण क्रांती घडवून आणली. त्यांचा महत्त्वाचा शोध म्हणजे सोने, चांदी, तांबे, लोह या धातूंमध्ये रोगनिवारक प्रभावीशक्ती आहे हे त्यांनी लोकांपुढे मांडले. तसेच वाग्भट किंवा वाघभट्ट हे आयुर्वेदातील सर्वात प्रभावशाली लेखकांपैकी होते. आयुर्वेदातील तीन मोठ्या ग्रंथांपैकी एक म्हणजे वाग्भट यांचा 'अष्टांगसंग्रह' होय. ज्याने ६ व्या शतकात वैद्यकशास्त्रात मोठे योगदान दिले. या ग्रंथात खनिजपदार्थ, वनस्पती, लोह आणि पारा यांचा वापर करून विविध भस्मे व अरिष्ट बनविणे याविषयीची माहिती दिली. पाचवा वेद समजला जाणारा आयुर्वेद व त्याचा प्रणेता धन्वंतरी याच काळात होऊन गेला. विविध रोगांवरील अनेक औषधे त्या काळात बनविली जात, ज्यांना परदेशात मागणी होती. वैद्यकशास्त्रातील वैद्यकीय ज्ञानासंबंधी भारतीयांनी संस्कृत ग्रंथातून लिखाण केले. याच ग्रंथाचा वा ज्ञानाचा वापर अरेबियातील अरबांनी विद्याशाखेत केला आणि तिथूनच भारतीय वैद्यकशास्त्र ज्ञानाचा युरोपातदेखील प्रसार झाला होता.

२.११.५ गणित

गणित या शब्दावरून गणनक्रिया कशी करावयाची हे ज्या शास्त्रात शिकविले जाते त्या शास्त्रास हे नाव पडले आहे, हे उघड आहे. मानवी मनाचा परमोच्च आविष्कार म्हणजे गणित अशीही गणिताची व्याख्या केली जाते. त्याचबरोबर गणिताच्या व्यावहारिक उपयोगामुळे– विशेषतः यामिकी (प्रेरणांची वस्तूवर होणारी क्रिया व त्यामुळे निर्माण होणारी गती यांचा अभ्यास करणारे शास्त्र) व अभियांत्रिकी या विषयांत– गणिताचे ज्ञान मूलभूत समजले गेल्यामुळे गणितशास्त्राला फार महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. ज्योतिषशास्त्र, भौतिकी, सांख्यिकी (संख्याशास्त्र) इ. विज्ञानाच्या सर्व मूलभूत शाखांत गणिताचा उपयोग होतो, इतकेच नव्हे तर मानव्य शाखांत आणि कलेच्या क्षेत्रातदेखील गणिताचे महत्त्व मान्यता पावत आहे.

डायोफँटस, आर्किमिडीज, यूक्लिड, पायथॅगोरस इ. प्राचीन गणितज्ञ न्यूटन, गौस, कोशी, फूर्ये, ऑयलर, बेर्नुली कुटुंब, लाप्लास, लझांद्र, देकार्त इ. एकोणिसाव्या शतकापूर्वीचे गणितज्ञ आधुनिक काळातील कँटर, बोल्यॉई, गाल्वा, लबेग, डेडेकिंट, नॉयमान, रीमान इ. गणितज्ञ तसेच आर्यभट, भास्कराचार्य, रामानुजन, महालनोबीस इ. भारतीय गणितज्ञ यांचा यांत समावेश करण्यात आलेला आहे.

गणिताचा इतिहास

प्रास्ताविक : अंकगणित हाच गणितशास्त्राचा पाया होय, अंकगणिताची सुरूवात अंकज्ञानापासून होते. मोजण्याचे तंत्र आज साधे वाटत असले तरी आदिमानवाला ते शोधून काढण्यास किती परिश्रम पडलेले आहेत याची यथार्थ कल्पना जुन्या भाषांच्या किंवा

आदिमानवाच्या अभ्यासकासच येईल. स्वतःच्या– मालकी हक्काच्या– वस्तूंची मोजदाद करावयास आदिमानव कसा स्वाभाविकपणे शिकला असेल, त्याने अंकांकरिता प्रतिके वापरण्याची प्रथा केव्हा पाडली, ती लिहिण्याची कला केव्हा हस्तगत केली हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे. पण ती शोधून किंवा ठरवून ती अ◌ापापल्या भागात प्रस्तुत करण्याचे कार्य त्याने केले हे मात्र निश्चित. यात प्रामुख्याने भारत, चीन, ईजिप्त, बॅबिलोनिया, ग्रीस आणि रोम येथील संस्कृतींनी विशेष उल्लेखिण्यासारखी कामगिरी केलेली आढळते. अंक आणि संख्या दर्शविण्यासाठी निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या पद्धती होत्या. काही देशांत विशिष्ट चिन्हे होती, तर काही देशांत लिपीतील अक्षरांनी अंक व संख्या दर्शवीत. पण संख्या अगणित असल्याकारणाने त्या दर्शविण्यास एवढी असंख्य चिन्हे कोणत्याही लिपीत मिळणे शक्य नव्हते. त्यामुळे पुढील प्रगती झपाट्याने होऊ शकली नाही. पण भारतात शून्याचा शोध लागला व नऊ प्रतीकात्मक अंक ठरविल्यावर व स्थानिक मूल्याची कल्पना निघाल्यावर पुढील संख्या दर्शविणे शक्य झाले आणि दशमान पद्धती जगाला मिळाली. मात्र हे ज्ञान सर्व जगाला होण्यापूर्वी पंधरा शतकांचा कालावधी गेला. संख्या दर्शविण्याच्या दृष्टीने शून्याचा शोध अत्यंत महत्त्वाचा ठरलेला आहे व त्यामुळे संख्या मांडण्याची कला मानवाला मिळाली आणि गणिताच्या प्रगतीचा अडलेला प्रवाह सुरू झाला.

संख्या मांडण्याची ही दशमान पद्धती अरब लोक हिंदूंकडून शिकले व बगदादमधून बाहेर पडलेल्या हिब्रू विद्वानांनी स्पेनमध्ये तिचा प्रसार केला. स्पेनमधून या पद्धतीचा इटलीमध्ये प्रवेश झाला आणि लेओनार्दो फीबोनात्ची नावाच्या इटालिअन गणितज्ञांनी तिचा यूरोपभर प्रसार केला व त्यामुळे पुढील संशोधनाचा मार्ग सुकर झाला.

मानवी संस्कृतीच्या प्रारंभीच्या काळात आणखी दुसरी शाखा प्रगत झाली. ती म्हणजे भूमिती. भूमितीचा पाया वेदकाळात घातला गेला पण तिचे क्षेत्र मापनापुरतेच मर्यादित होते. भूमिती जरी भारतामध्ये प्रगत झाली तरी खऱ्या अर्थाने भूमितीतील मुख्य प्रगती प्राचीन ग्रीक लोकांनी केली, यात शंका नाही. काटकोन त्रिकोणात कर्णावरील चौरसाचे क्षेत्रफळ काटकोन करणाऱ्या दोन बाजूंवरील चौरसांच्या क्षेत्रफळांच्या बेरजेइतके असते, हे पायथॅगोरस यांच्या नावाने ओळखले जाणारे प्रमेय शुल्बसूत्रात प्रथम मांडले गेले. तसेच ज्यांस सध्या पायथॅगोरस संख्या म्हणतात, त्यांस वेदकाली 'सूपलविध संख्या' असे संबोधित असत. भूमितिमध्य कसा काढावयाचा आणि निरनिराळ्या आकारांच्या वेदी कशा बांधावयाच्या या संबंधात समाद्विभुज त्रिकोण, काटकोन त्रिकोण, चौरस, आयत, अणिमत् (समद्विभुज समलंब चौकोन) यांचे गुणधर्म शुल्बसूत्रात सांगितले आहेत. पण भारतात त्या काळात प्रगत झालेली भूमिती क्षेत्रमापात्मक

होती. ग्रीक गणितज्ञांनी दिलेली तर्ककठोर पद्धती हिंदू भूमितीत सापडत नाही. स्वयंसिद्धके (स्वतःच सिद्ध असलेली व सामान्यतः ग्राह्य मानण्यात येणारी तत्त्वे), गृहीत कृत्ये, प्रमेये, प्रतिज्ञा, साध्य, रचना, सिद्धता अशा रीतीची तर्कशुद्ध मांडणी ग्रीक भूमितीकारांनी जगाला दिली. ज्योतिषशास्त्र ही आणखी एक गणिताची शाखा. ही देखील वेदकाली प्रथम जन्माला आली. या शास्त्रात प्रगती करत असतानाच आर्यावर्तात त्रिकोणमिती जन्माला आली.

गणितशास्त्राचे इतिहासाच्या दृष्टीने स्थूलमानाने सतराव्या शतकापूर्वीचे गणित आणि सतराव्या शतकानंतरचे गणित असे दोन कालखंड करणे इष्ट ठरते. या दोन्ही कालखंडांना सांधणाऱ्या मध्यंतरीच्या काळात होऊन गेलेल्या गणितज्ञांचा आणि त्यांच्या कार्यांचा उल्लेख करावा लागेल.

भारत : भारतात गणित हा विषय यज्ञ संस्थेतून जन्माला आला. अग्नीला आहुती देताना मानवाने पहिल्या अंकाची स्थापना केली असणार. जसजशा आहुती जास्त द्यावयास सुरूवात झाली. तसतशा संख्या मोठ्या होऊ लागल्या. तैत्तिरीय संहिता ७· २· ११ मध्ये असे आढळून येते की सम संख्येस युग्म व विषम संख्येस अयुग्म अशा संज्ञा आहेत आणि ४, ५, १०, २० या संख्यांचे पाढे दिले आहेत. वाजसनेयी संहिता १७· २ मध्ये दहाच्या पटी देताना १०१२ पर्यंतच्या संख्यांची नामाभिधाने आहेत व तैत्तिरीय संहितेत तर १०१९ पर्यंतच्या संख्यांची नामाभिधाने दिली आहेत. वेदांग ज्योतिषात अंकगणितात येणारी कृत्ये म्हणजे बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार आणि तद्विषयक परिकर्माष्टकांचा उपयोग सर्रास केलेला असावा, त्याशिवाय त्यात मिळविलेले निष्कर्ष बरोबर कसे आले याचे स्पष्टीकरण देता येत नाही. त्रैराशिकाचाही उपयोग केलेला आहे. वेदांग ज्योतिषातील कालमापक एकके व त्यामधील कोष्टकात दिलेल्या संख्या, वेदकाली अंकगणितात भारताची चांगलीच प्रगती होती हे दर्शवितात.

२.१२ भारतीय तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये

१) आध्यात्मिकता

भारतीय तत्त्वज्ञानाचा मुख्य ओघ आध्यात्मिकतेकडे असून भौतिक जगापेक्षा पुनर्जन्म, आत्मा आणि परमात्मा त्यांच्यावर भर दिला आहे. जीवनाचे अंतिम ध्येय मोक्ष प्राप्ती मानली जाते.

२) समन्वयवाद

समन्वयवाद म्हणजे भिन्न मत, पंथ आणि तत्त्वप्रणाली यांचा परस्पर विरोध न मानता त्यांच्यातील साम्य व पूरकत्व शोधण्याची वृत्ती असुन भारतीय तत्त्वज्ञानात विविध विचारधारा असूनही एकात्मतेचा दृष्टिकोन आढळतो.

३. तर्कशुद्धता

वेद, उपनिषदे यांसारख्या प्राचीन ग्रंथांत तर्कालाही महत्त्वाचे स्थान आहे. न्यायशास्त्राने तर्कशास्त्राचा सूक्ष्म विकास केला. आस्तिक शाळांमध्ये श्रुती (प्रमाण ग्रंथ) आणि युक्ती (तर्क) यांचा संबंध साधलेला दिसतो.

४. मोक्षप्रधानता

बहुविविध भारतीय तत्त्वज्ञान प्रणालींचे अंतिम उद्दिष्ट जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून (संसार) मुक्त होणे, म्हणजेच मोक्ष प्राप्त करणे हे आहे. दुःखापासून मुक्ती आणि शाश्वत आनंदाची प्राप्ती हा या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे मानवी दुःखातून मुक्ती हा मुख्य हेतू आहे. म्हणून तत्त्वज्ञान केवळ सैद्धांतिक नसून मुक्तीचा मार्ग दाखवतो.

५. कर्म आणि पुनर्जन्म

भारतीय तत्त्वज्ञानाचा आणखी एक महत्त्वाचा पाया म्हणजे कर्माचा सिद्धांत. यानुसार, प्रत्येक कृतीचे (कर्म) फळ चांगले किंवा वाईट असते आणि त्या फळाची अनुभूती या जन्मात किंवा पुढच्या जन्मात मिळते. यामुळे आत्मा अनेक जन्म घेतो (पुनर्जन्म), जोपर्यंत त्याची सर्व कर्मे संपुष्टात येत नाहीत आणि त्याला मोक्ष मिळत नाही.

२.१३ भारतीय आणि महाराष्ट्रीय संकल्पना व परंपरा

भारतीय आणि महाराष्ट्रीय या परंपरा मूल्य, संस्कार आणि समाजघडणीसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भारतीय संकल्पना ही सर्वसमावेशक, आध्यात्मिक व वैज्ञानिक दृष्टीकोनावर आधारित आहे. महाराष्ट्रीय परंपरा भारतीय संस्कृतीचा एक समृद्ध आणि वैशिष्ट्यपूर्ण भाग आहे.

भारतीय संकल्पना व परंपरा

भारतीय संकल्पना मुळात विविधतेत एकता या तत्त्वावर आधारलेली आहे या विशाल राष्ट्रात अनेक प्रादेशिक संस्कृतींचा समावेश आहे ज्यात हिंदू, बौद्ध, जैन, इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मांचा समावेश होतो. प्राचीन काळापासून भारताने विविध धर्म, जाती, भाषा आणि संस्कृतींना आपल्या अंगभूत गरजा म्हणून स्वीकारलेल्या आहेत. भारतीय तत्त्वज्ञानाचा मूलाधार 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना आहे याच तत्त्वाने भारताला जगात विशेष स्थान मिळवून दिले आहे.

सहिष्णुता हे भारतीय संस्कतीचे वैशिष्ट्य असल्याने धर्मनिरपेक्षता या तत्त्वाचा भारताने सहज स्वीकार केला आहे. या तत्त्वामुळे भारतात हिंदू, बौद्ध, मुस्लिम, ख्रिश्चन व पारशी या सर्व धर्माचा आदर केला जातो. प्रत्येक धर्मांचे सण, उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.

अहिंसा सत्य आणि करुणा ही भारतीय तत्त्वज्ञानाची आणखी मूलतत्त्वे आहेत. गौतम बुद्धांच्या शांतीच्या संदेशाने संपूर्ण मानव जातीला योग्य दिशा दिलेली आहे. त्यांचा दुःख

निरोधाचा मार्ग अमूल्य आहे त्याचबरोबर योग, आयुर्वेद आणि ध्यान या प्राचीन भारतीय पद्धती जागतिक स्तरावर मान्यता पावल्या आहेत.

महाराष्ट्रीय संकल्पना व परंपरा

महाराष्ट्रीय परंपरा ही भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. महाराष्ट्र ही संताची, शूरवीरांची आणि समाजसुधारकांची भूमी म्हणून ओळखली जाते. येथे धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक परंपरा समृद्ध असून महाराष्ट्राची संस्कृती संतपरंपरेवर उभी आहे. मराठी साहित्यात कीर्तन-परंपरा आणि समाजसुधारकांचे कार्य महत्त्वाचे असून. महाराष्ट्राच्या परंपरेत शिक्षण, स्त्रीशिक्षण हे महत्त्वाचे घटक आहेत. महाराष्ट्रीय संकल्पना ही भक्ती-शक्ती, शौर्य, समता आणि संस्कारांवर आधारलेली आहे. साहित्य, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक ओळख हे महाराष्ट्राचे लोकजीवन व वारसा दर्शवतात.

२.१४ भारतीय संस्कृतीचा संबोध

मनुष्य व्यक्तिश: व समुदायश: जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवन साफल्यार्थ स्वत:वर व बाह्य विश्वावर संस्कार करून जे आविष्कार करतो, ती पद्धती किंवा तो आविष्कार म्हणजे संस्कृती होय. संस्कृती आणि संस्कार हे दोनही शब्द सम् अधिक कृ या एकाच धातूपासून बनलेले आहेत. त्यांचा वाच्यार्थ व्याकरण दृष्टया एकच आहे पण संस्कार हा शब्द धार्मिक क्षेत्रापुरता मर्यादित राहिला. धर्मासह समग्र अंतर्बाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी संस्कृती ही संज्ञा वापरली जाते. तिची व्याप्ती व अर्थ व्यापक असून संस्कृतीची अनेकता, ही वस्तुस्थिती मान्य करावी लागते.

मानवशास्त्रज्ञ, मानवजातिविज्ञ, समाजशास्त्रज्ञ, इतिहासकार आदींनी संस्कृतीच्या अनेकविध व्याख्या केल्या आहेत. त्यांपैकी काही उल्लेखनीय व संस्कृती या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या आहेत त्या व्याख्या .

इरावती कर्वे यांच्या मते ''मनुष्य समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी, पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय. मनोमय संस्कृती वस्तुरूप निर्मितीमुळे दृढरूप व दृढमूल होते आणि मनोमय संस्कृतीचे ज्ञान अथवा कल्पना आल्याशिवाय द्रव्यरूप संस्कृतीचे कार्यच कळणार नाही. संस्कृती नेहमी परंपरागत व म्हणून दिक्काल निर्बंधित अशी असते. संस्कृती समाजाची असते. व्यक्तींमध्ये संस्कृती साकारते, जिवंत होते, नव्याने निर्माण होते किंवा लय पावते पण कोणतीही व्यक्ती कोणत्याही संस्कृतीचे स्वरूप पूर्णांशाने दाखवूच शकत नाही. संस्कृतीला व्यक्तिनिरपेक्ष असे एक निराळेच स्वतंत्र जीवन असते. व्यक्ती जन्माला आल्यापासून एका परंपरागत वस्तुरूप संस्कृतीने

वेढलेली व अव्यक्त पण दृढ अशा सामाजिक परंपरेत गुरफटलेली असते. व्यक्तीच्या जीवन विकासाच्या मर्यादा संस्कृतीच्या या दोन अंगांनी निश्चित केलेल्या असतात ''.

पाश्चात्त्य मानवशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञांपैकी सर एडवर्ड बेर्नेट टायलर याने इ. स. १८७२ मध्ये या संकल्पनेची व्याख्या प्रिमिटिव्ह कल्चर या पुस्तकाच्या प्रारंभीच्या वाक्यात दिली आहे. तो म्हणतो, ''विशालतर मानववंशीय-भौगोलिक दृष्टिकोनातून पाहिल्यास, ज्ञान, धर्मविश्वास, कला, नीती, कायदे, आचार आणि मानवाने समाजाचा सदस्य म्हणून जे संस्कार, समर्थता व सवयी आत्मसात केलेल्या असतात त्या सर्वांचा समग्र व संमिश्र परिपाक म्हणजे 'संस्कृती ऊर्फ सभ्यता होय''. लिंटन म्हणतो, ' संस्कृती म्हणजे सामाजिक आनुवंशिकता होय, तर ' सामाजिक परंपरेचे सामग्य म्हणजे संस्कृती ' असे लोई म्हणतो. या व्याख्यांत संस्कृतीचे घटक कोणते, हे सांगण्यापेक्षा संस्कृतीचे संवाहन कोणत्या पद्धतीने होते, यावरच अधिक भर दिला आहे. अमेरिकन मानवशास्त्रज्ञ फ्रँट्स बोअॅस संस्कृतीचे विवरण पुढीलप्रमाणे करतो. त्याने संस्कृतीच्या तीन बाजू (अॅस्पेक्ट्स) सांगितल्या आहेत. 'संस्कृतीला पुष्कळ बाजू आहेत : (१) माणूस आणि निसर्ग यांच्यातील विविध संबंध अन्ताचे अर्जन आणि रक्षण, आसरा तयार करणे, हत्यारे आणि भांडीकुंडी या स्वरूपात निसर्गातील वस्तू परिवर्तित करून वापरणे पशू, वनस्पती, निरिंद्रिय व सेंद्रिय पदार्थ, ऋतुचक, वातावरण इ. प्रकारच्या परिस्थितीचा उपयोग व नियंत्रण करणे किंवा त्यांच्या योगाने नियंत्रित होण्याचे विविध मार्ग काढणे. (२) माणसामाणसांमधले संबंध, एकाच समाजातील व्यक्तीचे आपापसांतील संबंध आणि भिन्न समाजांतील व्यक्तींचे एकमेकांशी होणारे संबंध, यांचा सांस्कृतिक आविष्कार महत्त्वाचा असतो. कुटुंब, गण, जाती आणि अनेक सामाजिक गट यांची बंधने यात समाविष्ट होतात. दर्जा आणि वजन यांच्यामुळे उत्पन्न होणारी उच्चनीचतेची परंपरा यात येते. लैंगिक व वयोजन्य संबंध यात येतात. राजकीय व धार्मिक संघटना, युद्धकाल व शांतिकाल यांतील सामाजिक गटांचे संबंधही यात येतात. (३) माणूस व निसर्ग यांचे संबंध आणि माणसामाणसांतील संबंध यांच्या योगाने मनुष्याच्या मनात विशिष्ट प्रकारच्या प्रतिक्रिया उत्पन्न होतात. यांचे स्वरूप बौद्धीक व भावनाप्रधान असते. विचार, भावना व क्रिया या रूपांनी ही प्रतिक्रिया प्रकट होते. नैतिक, सौंदर्यविषयक आणि धार्मिक मूल्ये यात येतात. या सगळ्यांचा समुच्चित्तपणे विचार केला, तर संस्कृती व जीवन यांचा संबंध कळून येतो .

संस्कृती हा शब्द दोन अर्थांनी भिन्न प्रसंगी वापरलेला आढळतो. मनुष्याने निर्मिलेले आध्यात्मिक व आधिभौतिक विश्व हे एका अर्थात समाविष्ट होते. तर दुसऱ्या अर्थात माणसाच्या मानसिक उन्नतीचाच समावेश होतो. मनुष्य व भोवतालचे विश्व मिळून निसर्ग होय. या निसर्गामध्ये बदल करून किंवा संस्कार करून मनुष्याची जीवितयात्रा चालत असते. निसर्गावर

विजय मिळविण्याचा क्रम म्हणजे संस्कृती होय. मनुष्य आत्म्यावर व बाह्य विश्ववावर विजय मिळवूनच जीवन सफल करू शकतो. त्याला जीवन यशस्वी करण्याकरिता आत्म्यातील सामर्थ्यांचा विकास व विश्ववातील शक्तींवरील स्वामित्वाची प्राप्ती करून घ्यावी लागते. मनुष्य व त्याच्या भोवतालचे विश्व, असे दोन विभाग विचाराच्या सोयीकरिता कल्पिले आहेत वस्तुतः मनुष्य स्वतः विश्वापासून अलग नाही. आत्मा म्हणजे मनुष्य होय. वैदिक रूढीप्रमाणे आत्म शब्दाने स्थूल शरीर, इंद्रिये, मन व ज्ञानशक्ती यांचा बोध होतो. आत्म्याच्या भोवतालचे विश्व हे बाह्य विश्व होय, बाह्य म्हणजे इंद्रियविषय.

मनुष्य जीवनार्थ बाह्य विश्ववावर संस्कार करून त्यात बदल घडवून आणतो आणि स्वतःवरही संस्कार करून स्वतःमध्ये बदल घडवून आणतो. या दोनही क्रिया एकसमया वच्छेदे करून सुरू असतात. संगमरवरी दगड फोडून-तोडून आणि त्याला आकार देऊन मनुष्य त्याची मूर्ती घडवितो. दगडाची मूर्ती बनविणे म्हणजे बाह्य जगावर संस्कार करणे होय संस्कृतीचा हा भौतिक भाग होय. या भौतिक संस्कृतीच्या अनुषंगाने मनुष्यावरही म्हणजे त्याच्या मनावर संस्कार घडत असतो. हा संस्कार म्हणजे प्रस्तुत उदाहरणात मूर्तिकलेतील प्रावीण्य होय. हा संस्कृतीचा आध्यात्मिक भाग होय. आधिभौतिक व आध्यात्मिक ह्या संस्कृतीच्या दोन बाजू आहेत, त्यांच्यांत पूर्ण पृथकत्व नाही परंतु ज्या मानवी क्रियेने बाह्य विश्ववात बदल करण्यास प्राधान्य असते, तिला भौतिक संस्कृती म्हणण्याची प्रथा पडली आहे आणि ज्या मानवी क्रियेत मानवी निसर्गावर म्हणजे आत्म्यावर संस्कार करून बदल करण्यास प्राधान्य येते, त्यास आध्यात्मिक संस्कृती म्हणण्याची प्रथा पडली आहे. या प्रथेप्रमाणे शेती, पशुपालन, स्थापत्य, धातुकाम, यंत्रनिर्मिती किंवा अर्थोत्पादन यांस भौतिक संस्कृती म्हणतात बाह्य विश्ववाचा उपभोग घेणे किंवा भौतिक प्रगतीस प्राधान्य देणे, यास भौतिक संस्कृती म्हणतात. याच अर्थाने आधुनिक पाश्चात्त्य संस्कृती भौतिक आहे, असे म्हणतात. तिच्यात बाह्य विश्ववावर विजय मिळविण्याच्या प्रवृत्तीला महत्त्व असते परंतु वर सांगितलेल्या संस्कृतीच्या पृथक्करणास अनुसरून आधुनिक पाश्चात्त्य संस्कृतीत सुद्धा आध्यात्मिक व आधिभौतिक असे दोन्ही भाग आहेत.

संस्कृतीच्या आध्यात्मिक भागात धर्म, नीती, कायदा, विदया, कलाप्रावीण्य, वाङ्मय, सर्व प्रकारचे मानवी सद्गुण आणि शिष्टाचार यांचा अंतर्भाव होतो. निसर्गावर विजय मिळविण्याची क्रिया यातही असते. उदा., मनुष्यास युवतीचा व धनाचा अभिलाष उत्पन्न होणे, ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे. मनुष्याने अनेक पिढयांच्या अनुभवाने विवाहसंस्था आणि आर्थिक जीवनाचे नियम निर्माण केले. त्याकरिता मनुष्याला आपल्या नैसर्गिक स्वभावावर विजय मिळविण्याचे मूल्य स्थापन करावे लागले. स्वश्रमार्जित धनावर स्वत्वाची कल्पना आणि

पतिपत्नींच्या मधील दृढ प्रीतीची प्रशंसनीयता ही मूल्ये मनुष्याने निर्मिली. अशाच प्रकारची सर्व आध्यात्मिक मूल्ये माणसाने शोधून काढली किंवा निर्मिली. मनुष्याच्या स्वभावात निसर्गतःच अधोगतीला व प्रगतीला नेणाऱ्या प्रवृत्ती भरलेल्या आहेत. श्रद्धा, सत्यनिष्ठा, मैत्री, सहानुभूती, परिश्रमाची आवड, दया, औदार्य, ज्ञानलालसा, तार्किक चिकित्सा, न्यायबुद्धी इ. सद्‌गुण आणि अंधश्रद्धा, मिथ्यावाद, मत्सर, व्देष, आलस्य, कौर्य, झोपाळूपणा, विदयाविमुखता इ. दुर्गुण मनुष्याच्या स्वभावात बीजरूपाने राहतात. मनुष्याला अनुभवाने, विचाराने आणि रूढींच्या साहाय्याने सत्प्रवृत्तीची निवड करून वाढ करावी लागते, म्हणून उच्च व आध्यात्मिक मूल्ये एका अर्थाने चिरंतन आहेत व दुसऱ्या अर्थाने मानवनिर्मित आहेत. निष्ठायुक्त स्त्रीपुरूषांची जोडपी जीवनसंगामात यशस्वी झालेली पाहिल्यावर माणसास विवाहसंस्थेचा शोध लागला ती त्याने संघटित केली. धर्म, नीती व कला यांतील उच्चतम मूल्ये शाश्वत असूनही माणसात शोध करून निर्माण करावी लागली आहेत. या शोधात त्याला यश व अपयश ही दोन्ही प्राप्त झाली आहेत. वारंवार बदल करावा लागला आहे. हा मूल्य-स्थापनेचा इतिहास म्हणजे मानवजातीचा इतिहास होय. कामकोधादी विकारांचा संयम करून चित्ताची समता साध्य करणे, हा उच्चतम सद्‌गुण शोधण्यासही माणसास युगे घालवावी लागली. तात्पर्य, आध्यात्मिक संस्कृतीला सुद्धा इतिहास आहे. आध्यात्मिक संस्कृतीचे आविष्करण मुख्यतः आत्मकेंद्रित असते. या दृष्टीने गणित व भौतिक विज्ञानेसुद्धा आध्यात्मिक संस्कृतीचे भाग होत. बुद्धीवर संस्कार केल्याशिवाय भौतिक विज्ञान प्राप्त होत नाही. संख्या आणि परिमाण यांच्यासंबंधी मूलभूत शुद्ध कल्पना बुद्धीने घडविलेल्या असतात आणि त्यांचीच वाढ व विवरण म्हणजे गणित-विज्ञान होय. गणित आत्मशक्तीचे अत्यंत विशुद्ध आविष्करण होय. ललितकलासुद्धा प्राधान्याने आत्मनिष्ठ असतात. त्यांचे माध्यम तेवढे भौतिक अथवा बाह्य असते. शब्द, ध्वनी, रंग, मृत्तिका इ. ललितकलेची माध्यमे होत. माध्यम म्हणजे कलेचे संकेतन धारण करणारे साधन होय. शब्द, ध्वनी, रंग, मृत्तिका इ. माध्यमांच्या व्दारे मानवी मनातील संचित अनुभव कलाकारांत जागृत होतात. कलेच्या अनुभूतीची मुख्य सामगी रसिकाच्या हृदयात असते, माध्यम हे विजेच्या बटनासारखे असते, ते हृदयाच्या महालात चैतन्याच्या प्रकाशाचा झोत मोकळा करण्यास उपयोगी पडते. स्थूल पाषाणावर मूर्तिकार अंतःकरणाचे सूक्ष्म भाव व्यक्त करतो लहानशा टीचभर कागदावर चित्रकार महान सागराचे व विशाल आकाशाचे दर्शन घडवितो. पाषाण, कागद व रंग ही माध्यमे होत ती माध्यमे मनुष्याच्या चित्तातील संस्काररूपाने सुप्त असलेल्या अनुभवांना चेतीत करून विशिष्ट पद्धतीने त्यांची संघटना करतात. ललितकला आध्यात्मिक संस्कृतीचे एक उच्च स्वरूप आहे.

संस्कृतीच्या आणखी काही मर्यादित व्याख्या आहेत. 'सुसंस्कृत मनुष्य' या शब्दप्रयोगात ही मर्यादित व्याख्या गृहीत धरलेली असते. 'मानसिक उन्नतीचा दर्शक जीवनक्रम किंवा वर्तनपद्धती' अशी संस्कृतीची दुसरी एक व्याख्या करतात. ज्याची सदसव्दिवेकबुद्धी वाढली आहे, नागरिक या नात्याने प्राप्त होणारी कर्तव्ये जो जाणतो व पाळतो, अशा माणसास या व्याख्येच्या अनुसारे सुसंस्कृत म्हणतात. विदया व सद्‌गुण असलेल्या मनुष्यास याच व्याख्येच्या आधाराने सुसंस्कृत समजतात. उच्च ध्येयवाद व तद्नुसाराने आवश्यक असलेली जीवनपद्धती असे वरील व्याख्यांचे सार म्हणता येईल. संस्कृती ही समाजाच्या अंतर्बाह्य जीवनातून बनत असते. अप्रत्यक्षपणे प्रत्येकजण ती घडवीत असतो. तिच्या परिवर्तनात प्रत्येकाचा हात असतो.

भारतीय संस्कृती :

भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचा आढावा घेतला असता त्यात तीन प्रमुख वैशिष्टये आढळतात : (१) अखंडित परंपरा, (२) राजकीय व धार्मिक सत्तांच्या केंद्रीकरणाचा अभाव आणि (३) संस्कृती संघर्ष टाळून संस्कृति संगम करण्याची भारतीय समाजाची प्रवृत्ती.

इतिहासपूर्वकालीन भारतात प्रथम कोणते मानववंश होते, यांसंबंधी थोडी माहिती मिळते. कमीतकमी लाख वर्षांपूर्वी येथे मानववंश अस्तित्वात होता, हे अलीकडील उत्खननावरून सिद्ध झाले आहे. भारतातील मानववस्ती ही बाहेरून आलेल्या मानववंशाचीच आहे, असा समज आहे व त्या समजाविरूद्ध असलेले प्रमाण अजून उपलब्ध झाले नाही. सिंधू संस्कृतीच्या मोहें-जो-दडो व हडप्पा येथील उत्खनित अवशेषांवरून, विशेषत: तेथील मृत शरीरांच्या पाहणीतून तेथे चार-पाच हजार वर्षांपूर्वीच्या मानववंशासंबंधी काही स्पष्ट अनुमाने बांधता येतात. सिंधू संस्कृतीचा काळ सर्वसाधारणतः इ. स. पू. २७५० ते १७५० असा १४ कार्बनव्दारे निश्चित करण्यात आला आहे. येथील हाडांचे सापळे व कवटया यांवरून कपालमितिशास्त्राप्रमाणे येथील मानववंशाचे चार वर्ग पडतात : (१) पुरा-ऑस्ट्रेलॉइड, (२) भूमध्यसमुद्रीय, (३) मंगोलॉईड आणि (४) ॲल्पनॉईड. रामप्रसाद व जे. एच्. हटन यांनी अधिक संशोधन करून वंश-भाषा-संस्कृती यांसंबंधी १९३३ मध्ये काही आकडेवारी प्रसिद्ध केली. त्यानंतर बी. एस्. गुहा या मानवशास्त्रज्ञाने सर्वेक्षण करून नऊ उप-वंशांसह सहा मुख्य भारतवासी मानववंश निश्चित केले.

वैदिक आर्यांच्या आगमनानंतर आर्य भाषा अंगीकारून सुसंस्कृत द्रविड जनांनी भारताच्या संस्कृतीत मोलाची भर घातली. खुष्कीच्या आणि नदया-समुद्रांच्या सुलभ मार्गांमुळे व सुबत्ता आणि शांती असल्यामुळे आशिया खंडातील दूरदूरचे मानववंश येथे आले असे म्हणता येते. विशिष्ट वंशाची दृश्य शारीरिक लक्षणे ओळखता येतात परंतु त्यांवरून त्यांच्या मानसिक व भावनिक दृष्टीचा वा प्रवृत्तीचा अंदाज येऊ शकत नाही. कारण समाजाकडून व्यक्तीला मिळणारे

वळण व शिक्षण, त्याचप्रमाणे विविध आचारविचारांचे नियमन आणि आर्थिक जीवन यांच्या योगे संस्कृतीला आकार येतो. संस्कृती मुख्यतः भाषिक असते, वांशिक नसते.

सहा वंशभेद असलेला परंतु एकमेकांत वांशिक मिश्रण झालेला भारतीय मानवसमाज होय, असे मानवशास्त्रज्ञांनी निर्णायक प्रमाणांनी सिद्ध केले आहे. या सहा मानववंशांपैकी ज्या भाषांचे अस्तित्व आजतागायत सिद्ध करता येते अशी ऑस्ट्रिक, चिनी-तिबेटी, द्राविड व इंडो-यूरोपियन ही चार भाषाकुले होत. या चार भाषाकुलांनी एकमेकांत देवाण-घेवाण केली व संस्कृतीचा संगम झाला.

भारतात ऑस्ट्रिक व आर्य हे सहवासी म्हणून राहू लागले आणि त्यामुळे आर्य भाषेवर त्यांचा खोल परिणाम झाला. काही ऑस्ट्रिक नावे आर्य व द्रविड यांनी आपल्या भाषेमध्ये समाविष्ट केली. ऑस्ट्रिक भाषा बोलणाऱ्या लोकांची संस्कृती कृषिप्रधान व गामीण होती. भारतात आलेल्या मध्यसमुद्रीय मानववंशांनी त्यानंतर नागरसंस्कृतीची स्थापना केली. हे द्राविड भाषा बोलणारे लोक होत. तमिळ, तेलुगू, कन्नड व मलयाळम् या भाषा द्राविड वंशियांच्या प्रगत भाषा होत. आर्य भाषांवर व आर्य बोलींवर द्राविड संस्कार झालेला दिसतो संस्कृत, पाली, अर्ध-मागधी, अपभंश, पैशाची, माहाराष्ट्री इ. प्राकृत व संस्कृत या आर्य भाषा होत. कर्मकांड, काही मिथ्यकथा, आख्यायिका या वैदिक धर्मात व साहित्यात द्राविड वंशीयांकडून पाप्त झालेल्या निदर्शनास येतात.

योगविदयेची भारतीय परंपरा सिंधू संस्कृतीपर्यंत पोहोचते. योगविदयाही हिंदू धर्मातील श्रेष्ठविदया असून ती बौद्ध व जैन यांच्याही परंपरेत श्रेष्ठ विदया मानली आहे. सिंधू संस्कृतीत याशिवाय मारूतीची मूर्ती वा मुद्राचित्र सापडले. रामावाचून हनुमान भारतभर पूजिला जातो. त्याला महारूद्र म्हणतात. देव, ऋषी व वीर त्याचप्रमाणे कर्मकांड यांसंबंधाच्या पौराणिक कथा द्राविडांपासून वैदिकांनी स्वीकारून त्यांच्यावर संस्कार व बदल करून आत्मसात केल्या असाव्यात. द्रविड व आर्य यांचे वंशमिश्रण होत असताना उत्पन्न होणाऱ्या संततीमार्फत आर्य-द्रविडांचा सांस्कृतिक विनिमय चालत होता, ही गोष्ट पौराणिक वाङ्मयाचे मूळ प्रवक्ते लोमहर्षणादी सूत होते, यावरून अनुमानित होते. सिंधू संस्कृतीपासून विसाव्या शतकापर्यंत विविध देवदेवतांची पूजाअर्चा, पूर्वजांचे गंथ, त्यांचे पोषाख, चालीरीती, तत्त्वज्ञान, नीतिविषयक कल्पना यांविषयी भारतात आपुलकी असून त्यांचे नाते अतूट परंपरेत शोधावे लागते.

अहिंसा सिंद्धांत मूलभूत मानणारे पशुयज्ञविरोधी दोन धर्मसंस्थापक बुद्धव महावीर बिहारमध्ये इ. स. पू. सहाव्या शतकात उदयास आले, ते आर्यवंशीय होते परंतु त्यांच्या भोवतालच्या मानवगणात वैदिक संस्कृतीचा विशेष प्रभाव नव्हता. बौद्धांचे त्रिपिटक म्हणजे

भगवान बुद्धाचा आदेश आहे व जैनांचे आगम गंथ म्हणजे महावीराचा उपदेश होत अशी अनुकमे बौद्धांची व जैनांची श्रद्धा आहे. यहुदी, क्रिस्ती व मुसलमान यांच्या गंथप्रामाण्याच्या कल्पनेसारखीच जैनांची आणि बौद्धांची कल्पना आहे. येवढे मात्र येथे लक्षात ठेवले पाहिजे की, बायबलच्या जुन्या कराराशी क्रिस्ती नव्या कराराचा जसा संबंध आहे, तसाच जैन आगम व विशेषतः बौद्ध त्रिपिटक यांच्याशी वेदांचा संबंध आहे. एका अर्थी वैदिक धर्माची सुधारणा म्हणजेच जैन व बौद्ध धर्म होत. म्हणून सांस्कृतिक दृष्टया हिंदू, बौद्ध व जैन यांची संस्कृती एकच आहे.

हजारो वर्षांपासून हजारो लोक गटागटाने भारतात प्रवेश करून इथे वसले आहेत. या प्रत्येक गटाच्या भिन्न भिन्न संस्कृतींचा इथे दीर्घकालीन संपर्क होत राहिला. असे असूनही या संपर्कातून एका संस्कृतीला पूर्णपणे दडपून टाकून किंवा तिला नष्ट करून दुसरीने जिवंत राहावे, असा तीव्र संस्कृतिसंघर्ष कधीच निर्माण झाला नाही. एका बाजूला जुने एतद्देशीय व दुसऱ्या बाजूला नवे परकीय, यांच्यामध्ये नेहमी सांस्कृतिक तडजोडच किंवा सांस्कृतिक संगमच होत राहिला. त्यामुळे भारतात जी एक समन्वित परंपरा इस्लाम संस्कृतीपूर्वकाळात परिणत झाली, तिच्यात सर्व संस्कृतींची मूलतत्त्वे जिवंत राहिली. यावरून असे निश्चितपणे म्हणता येते की, तडजोड किंवा समन्वय हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. भारतात अनेक देवदैवते व धार्मिक संप्रदाय सर्वत्र आढळतात पण ती विशिष्ट जातिपरत्वे पूजिली जातात किंवा अनुसरली जातात. भारतीय संस्कृतीने त्यात भेदभाव ठेवला नाही. भारतीय संस्कृतीची एकात्मता विविधतेत आहे."[१२]

२.१५ भारतीय ज्ञान परंपरेत मराठीचा वाटा

भारतीय ज्ञानपरंपरेत मराठी भाषेचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. मराठी संतसाहित्यातून आध्यात्मिक व नैतिक विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविल आहेत.भारतीय ज्ञान परंपरेत मराठीचा वाटा खालिल प्रमाणे -

२.१५.१ संतांची तीर्थस्थळे आश्रम आणि पाठशाळा व शिक्षण संस्था

१) वेद पाठशाळा

वेदांचा शास्त्रीय अभ्यास व विद्यार्थ्यांना घनपाटी मंत्र चारण ऋचांचा अभ्यास शिकविला जातो. घनपाटाचा क्रम - १) संहिता पाठ २) परिपाठ ३) क्रमपाठ ४) जटापाठ ५) मालापाठ ६) शिखापाट ७) लेखपाठ ८) दंडपाठ ९) ध्वजपाठ १०) रथपाठ ११)घनपाठ असा घनपाठाचा क्रम आहे. अशा प्रकारचा अभ्यास वेदसाधक विविध पाठशाळेतून करतात भारतात अशा पाठशाळा

श्रीक्षेत्र काशी (वाराणसी), प्रयागराज, आळंदी, वाई, पाथरी (परभणी), केरळ भारतात अनेक ठिकाणी आहेत.

२) वारकरी शिक्षण संस्था

भारतीय ज्ञान परंपरेचा समृद्ध वारसा हा वारकरी संतांनी देखील जोपासला आहे. प्रामुख्याने महाराष्ट्रात श्रीक्षेत्र आळंदी येथे वारकरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून भारतीय ज्ञान परंपरा मोठ्या प्रमाणात जोपासल्या गेली आहे. येथे विद्यार्थी कीर्तन, प्रवचना बरोबरच वेदांत प्रस्थानत्रयी व विचार सागर, पंचीकरण, पंचदशी, तर्कसंग्रह, ज्ञानेश्वरी, गाथा, भागवत आदी ग्रंथांचा अभ्यास केला जातो.

श्रीक्षेत्र आळंदी बरोबरच पैठण, नेवासा, तसेच महाराष्ट्रात अनेक जिल्हयात वारकरी शियाण संख्या मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येतात.

३) भारतीय ज्ञान परंपरा आणि महाराष्ट्राचे अनुबंध संप्रदाय

१) महानुभाव संप्रदाय २) वारकरी संप्रदाय ३) शैव संप्रदाय ४) दत्त संप्रदाय ५) समर्थ संप्रदाय इ या संप्रदायाचे कार्य स्वरूप चैतन्य प्रकाश आनंद या वैशिष्ट्यावर चालते. (वरील संप्रदायाची विस्तृत चर्चा प्रकरण पाच मध्ये करण्यात आलेली आहे.)

४) चरित्र निर्मितीसाठी भारतीय ज्ञान परंपरेचे उपयोजन

भारतीय ज्ञान परंपरा व चारित्र्य निर्मिती, संत , साधू, महापुरुष, महात्मे, इत्यादी उपयोजन व संप्रदायांमध्ये आलेली नवविद्या भक्ती द्वारे आलेले उपयोजन - श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन- वारी परंपरा, दिंडीतून एकात्मतेची भावना ग्रामीण भागात होणारे अखंड हरिनाम सप्ताह, महावैष्णव मेळावे आणि घरोघरी होणारे ज्ञानेश्वरी पठण, गाथा, भगवंताचे पारायण तसेच हरीविजय, भक्तीविजय, पांडवप्रताप, श्रीमद्भागवत आदी ग्रंथांचे भक्ती पूर्वक वाचन, श्रवण, मनन यातून आनंदप्राप्ती, मोक्षप्राप्ती, अर्थप्राप्ती, यशप्राप्ती हे उपयोजन दिसून येते.

५) विविध धर्मातील प्रार्थना

भारतीय ज्ञानपरंपरेतील तत्त्वज्ञानाची ओळख आपण करून घेतली. या सगळ्या तत्त्वज्ञानाचे प्रत्यक्ष उपयोजन होताना गुरुपरंपरेचा विचार करावा लागतो. त्यामुळेच भारतीय ज्ञान परंपरेमध्ये गुरू-शिष्य परंपरा ही पूर्वापार चालत आलेली प्राचीन शिक्षण पद्धत आहे. विविध ऋषींचे गुरुकुल आणि गुरू-शिष्यांची जोडी आपल्याला आजही आठवत राहते. वयाच्या आठव्या वर्षानंतर आपले घर सोडून गुरुगृही जाऊन राहणारा शिष्य, दैनंदिन सुख सुविधांपासून वंचित राहून, समानतेचे मूल्य पाळून, आश्रमात शिक्षण घेत असे. ही सर्व वर्णांसाठी असणारी

शिक्षणव्यवस्था आपल्याला दिसते ज्यात गुरु आपल्या शिष्याला आध्यात्मिक, बौद्धिक आणि व्यावहारिक ज्ञान प्रदान करतात. हे केवळ अभ्यासापुरते मर्यादित नसून, गुरूंवर निस्सीम भक्ती, शिस्त, आज्ञापालन आणि समर्पण यावर आधारित एक पवित्र नाते आहे. ही परंपरा आजही भारतीय समाजात, विशेषतः गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने पाळली जाते.

मराठी साहित्याच्या इतिहासामध्ये मध्ययुगीन काळापासून आजपर्यंत अनेक साहित्यकृतींमध्ये गुरु किंवा शिष्य हेच केंद्रबिंदू आहेत, असं आपल्या लक्षात येते. लीळाचरित्र ग्रंथात गुरूंच्या आठवणी म्हाइंभट यांनी गोळा केल्या आहेत तर गुरुचरित्रात आपल्या गुरूंचे चरित्र सरस्वती गंगाधर यांनी रेखाटले आहे. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या ग्रंथामध्ये गुरुचे आदरपूर्वक स्मरण केले आहे. संत तुकारामांनीही आपल्या काव्यातून गुरूच्या आशीर्वादाविषयी आदर व्यक्त केला आहे. गुरु-शिष्यत्त्वाची ही परंपरा आजही अव्याहत सुरू आहे.

२.१५.२ गुरु-शिष्य परंपरेचे मुख्य पैलू

१) ज्ञानाचे हस्तांतरण: गुरु हे ज्ञानाची मशाल तेवत ठेवणारे माध्यम आहेत, जे आपल्या योग्य शिष्याला ज्ञानाचा वारसा सोपवतात.

२) पवित्र नाते: 'गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु:' या उक्तीनुसार, गुरुला देवाचे स्थान देऊन, शिष्य अज्ञानाचा अंधकार दूर करून परब्रह्माशी मीलनासाठी मार्गदर्शन घेतो.

३) जीवनशैली: प्राचीन काळी गुरुकुलात (आश्रम/मठ) राहून शिष्य सेवाभावाने गुरूंनी दिलेल्या शिक्षणाचा अभ्यास करत असत.

४) अनुग्रह/दीक्षा: गुरुशिष्याला मंत्र किंवा उपदेश देऊन ज्ञान दीक्षा देतात, ज्यामुळे शिष्याच्या अंत:करणातील शक्तीचा विकास होतो.

५) महत्त्व: अध्यात्म, कला, संगीत आणि संस्कृतीचे जतन करण्यासाठी ही परंपरा आजही भारतीय समाजात, विशेषतः गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने, पाळली जाते.

हे नाते केवळ पुस्तकी ज्ञान देत नाही, तर चारित्र्य घडवून शिष्याला सन्मार्गावर नेते.

चाणक्य-चंद्रगुप्त, रामकृष्ण परमहंस-स्वामी विवेकानंद यांसारख्या प्रसिद्ध जोड्यांनी ज्ञान, नीती आणि राष्ट्रप्रेमाचा वारसा चालवला आहे. पौराणिक काळापासून ते आधुनिक काळापर्यंतच्या काही प्रमुख गुरु-शिष्य जोड्या खालीलप्रमाणे आहेत:

ऐतिहासिक आणि पौराणिक गुरु-शिष्य जोड्या:

आर्य चाणक्य - चंद्रगुप्त मौर्य: अखंड भारताची निर्मिती.

संत तुकाराम / समर्थ रामदास स्वामी - छत्रपती शिवाजी महाराज: स्वराज्य स्थापनेची प्रेरणा.

गुरु वशिष्ठ - श्रीराम: आदर्श राज्यकारभाराचे शिक्षण.

महर्षी विश्वामित्र - श्रीराम, लक्ष्मण: अस्त्रांचे ज्ञान.

गुरु द्रोणाचार्य - अर्जुन (कौरव-पांडव): युद्धकला.

भगवान परशुराम - भीष्म, द्रोणाचार्य: अस्त्रविद्या.

सांदीपनी ऋषी - श्रीकृष्ण, बलराम: शिक्षण.

धौम्य ऋषी - आरुणी

गौतम ऋषी - सत्यकाम जाबाली

महर्षी व्यास - शुक, वैशंपायन: ज्ञानदानाचा वारसा.

आध्यात्मिक आणि आधुनिक जोड्या:

रामकृष्ण परमहंस - स्वामी विवेकानंद: आध्यात्मिक ज्ञान आणि मानवता.

गोपाळ कृष्ण गोखले - महात्मा गांधी: राजकीय गुरु.

रमाकांत आचरेकर - सचिन तेंडुलकर: क्रिकेट कौशल्य.

बिरजू महाराज - माधुरी दीक्षित नेने: नृत्यकला.

विष्णू गंगाधर केतकर - अण्णासाहेब खैर: शिक्षण क्षेत्र.

या जोड्यांनी समाजाला योग्य दिशा देण्याचे आणि ज्ञानाचा प्रसार करण्याचे कार्य केले आहे.

२.१५.३ गुरू आणि आचार्य

भारतीय संस्कृतीतील ज्ञानाचे सर्वोच्च मार्गदर्शक आहेत, ज्यात सूक्ष्म फरक आहे. 'आचार्य' हे आचरणातून (स्वतःच्या वर्तनातून) विद्या शिकवतात आणि वेदांचे शिक्षण देतात, तर 'गुरु' (गु=अंधार, रु=प्रकाश) हे आध्यात्मिक ज्ञान देऊन शिष्याच्या जीवनातील अज्ञान दूर करतात व आत्मसाक्षात्कार घडवतात. आचार्य हे धार्मिक मठांचे प्रमुख असू शकतात, तर गुरु हे सर्वभौम आध्यात्मिक मार्गदर्शक असतात.

गुरु आणि आचार्य यांच्यातील मुख्य फरक :

अर्थ: 'आचार्य' म्हणजे 'आचरणातून शिकवणारा' (आचरति इति आचार्यः), जो वेदांचे व शास्त्रांचे सखोल ज्ञान देतो. 'गुरु' म्हणजे जो अज्ञानरूपी अंधकार दूर करतो आणि दीक्षा देतो.

शिकवण्याची पद्धत: आचार्य हे नियमांचे पालन करून आणि आचरणातून शिकवतात. गुरु हे प्रामुख्याने आत्मज्ञान आणि आध्यात्मिक अनुभव देतात.

परिभाषा: "आचार्यः सः शास्त्रज्ञः" (शास्त्र जाणणारा आचार्य). आचार्य हे शिष्याला ज्ञानाचा मार्ग दाखवतात, तर गुरु त्या मार्गावर नेतात.

भूमिका: आचार्य हे प्रामुख्याने ज्ञानाचे प्राध्यापक किंवा धर्मगुरु असू शकतात, तर गुरु हे आत्मज्ञान प्राप्त (Self-Realized) व्यक्ती असतात.

थोडक्यात: आचार्य हे 'विद्या' देतात, तर गुरु 'दीक्षा' देतात.

२.१५.४ गुरू आणि शिक्षक

शिक्षक केवळ अभ्यासक्रम, तांत्रिक ज्ञान आणि पुस्तकी माहिती ठराविक वेळेसाठी शिकवतात, तर गुरु शिष्याच्या जीवनाला आध्यात्मिक उन्नती, आत्मानुभूती आणि आत्मज्ञानाकडे नेण्याचे काम करतात, जे चोवीस तास मार्गदर्शन करतात.

गुरु आणि शिक्षक यांच्यातील प्रमुख फरक:

शिक्षणाचे स्वरूप: शिक्षक बाह्य ज्ञान आणि कौशल्ये शिकवतात, तर गुरु आंतरिक ज्ञान आणि जीवनाचा गाभा शिकवतात.

वेळ आणि व्याप्ती :

शिक्षक ठराविक कालावधीत शिकवतात आणि शिक्षकाचा-विद्यार्थ्याचा संबंध व्यावसायिक असू शकतो. गुरु शिष्याच्या संपूर्ण जीवनावर प्रभाव टाकतात आणि कायमस्वरूपी मार्गदर्शन करतात.

उद्दिष्ट:

शिक्षकाचे लक्ष विद्यार्थ्याला चांगले गुण मिळवून देणे किंवा करिअरमध्ये मदत करणे हे असते. गुरूंचे लक्ष शिष्याचा अहंकार दूर करून आध्यात्मिक विकास साधणे हे असते.

संबंध:

शिक्षक विद्यार्थ्याकडून आज्ञाधारकतेची अपेक्षा करतात, तर गुरु शिष्याकडून विश्वास आणि नम्रता (श्रद्धा) अपेक्षित करतात.

ज्ञानदान:

शिक्षक फक्त शब्द आणि पुस्तकांद्वारे शिकवतात, तर गुरु शब्दांच्या पलीकडे जाऊन अनुभूतीद्वारे मार्गदर्शन करतात. थोडक्यात सांगायचे तर, शिक्षक हे 'पाठ्यविषयात उत्कृष्ट गुण मिळवून देतात', तर गुरु 'आयुष्य कसे जगावे आणि स्वत्वाची जाणीव कशी करावी', हे शिकवतात.

अध्ययनाची पद्धत ही गुरुगृही जाऊन राहून शिकण्याची होती. त्यात स्वावलंबन, स्वाध्याय, सहजीवन, समानता अशी चतु:सूत्री अंतर्भूत होती. आपले शिक्षण पूर्ण झाल्यावर आपल्या विचारांची योग्यता तपासून पाहण्यासाठी, आपल्या सिद्धांताचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी वादसभा भरत. त्यात विविध अभ्यासक सहभाग घेत. कोणत्याही विषयाचा अनेक बाजूंनी अभ्यास केल्याशिवाय विचारांचा विकास होणे अशक्य असते. सत्य ज्ञानासाठी चर्चा व वादविवाद यांची गरज असते. वादविद्या हा भारतीयांचा फार प्राचीन वारसा आहे. मतभेदांना

भिऊन भागत नाही. मतभेदांत सहिष्णुता सुटू नये इतकेच. मतभेद विचारविकासाला सहाय्यर ठरतात.

साधकबाधक चर्चा म्हणजे वाद होय. कोणत्याही विषयाची अनुकूल व प्रतिकूल प्रश्न उपस्थित करून चर्चा केल्याशिवाय त्यातील सत्याचा शोध करणे शक्य होत नसते. एखाद्या सिद्ध व मान्य सिद्धान्ताचा बोध होण्यासही चर्चेची गरज असते. कोणताही विचार स्पष्ट होण्याकरिता त्याबद्दल उलट-सुलट शंका उत्पन्न करणे आवश्यक असते. सिद्धान्त, सत्य किंवा महत्त्वाचा विचार चांगला समजण्याकरिता त्या सिद्धान्ताची, सत्याची किंवा विचाराची उलट बाजूही समजावी लागते. त्रिकालाबाधित म्हणून जी सत्ये प्रसिद्ध असतात त्याबद्दलही वाद उपस्थित केल्याशिवाय त्यात मिसळलेली भ्रामक विधाने बाजूस करून ती सत्ये निवडता येत नाहीत. द्रष्टे, साधु, पंडित व विज्ञानसंशोधक यांच्यात मतभेद आढळतात. जगात मोठमोठ्या धर्मात विश्वाच्या अंतिम सत्याबद्दल म्हणजे ईश्वराच्या रूपाबद्दल मतभेद आहेत, म्हणून तर धर्म भिन्न किंवा परस्परविरोधी आहेत. दोन गोष्ट समाज जीवन व इतिहास यातील मूलभूत व जिव्हाळ्याच्या प्रभाव मतभेदास लागू पडते. न्यायालये, पंडितसभा, विधानसभा, संसद वा वैचारिक परिषदा यांचे अस्तित्व या गोष्टीचीच पुष्टी करते. मानवी विचाराची प्रगतीच मतभेदामुळे होत असते, म्हणून प्राचीन भारतीय म्हणत की, "वादे वादे जायते तत्त्वबोध" म्हणजे नित्य वाद केल्याने तत्त्वाचा उलगडा होत जातो. प्राचीन भारतीयांच्या वादविवादाचा तो हाच मुख्य उद्देश सांगितला आहे.

भारतीय प्राचीन वादविद्या वाढीस लागण्यास प्राचीन भारतीयांच्या अनेक बुद्धिप्रधान विचारांची, दर्शनाची भौतिक शास्त्रांची परिणती कारण झाली. धर्मतत्वाची मीमांसा विश्वाच्या सत्याची चर्चा, सृष्टी रचनेची तपासणी, रोग व आरोग्य यांचे संशोधन, न्यायालयात न्यायनिर्णयाची पद्धती ठरविण्याचा प्रयत्न, भाषेचे शास्त्र म्हणजे व्याकरण अत्यंत खोलपणे मांडण्यात मिळविलेले इत्यादी अनेक बौद्धिक संस्कृतीच्या अंगाची वाढ होत असता, भारतीय वादविद्येचे सिद्धान्त निष्पन्न होऊ लागले. वादविद्या ही बौद्धिक संस्कृतीच्या विकासाचे लक्षण होय. प्राचीन भारतीयांच्या बौद्धिक संस्कृतीचा प्रारंभ उपनिषत्काली झाला. प्रश्नाचे महत्त्व त्या वेळी कळू लागले. थोरांनी सांगावे, लहानांनी मानावे, ही आज्ञाधारक प्रथा शास्त्रवाढीस उपयोगी पडत नाही, हे कळून चुकले.

लहानांनी मोठ्यांना म्हणजे जाणत्यांना प्रश्न किंवा परिप्रश्न विचारावे, अशा विचाराचा महिमा स्थापित झाला. अगदी मूलग्राही प्रश्नांचा मारा लहान माणसे मोठ्या माणसावर म्हणजेच गुरूंवर करताना उपनिषदांत दिसतात. ऋषीचे शिष्य म्हणून ज्यांचा दर्जा समाजात मानला जात होता, त्या क्षत्रिय राजाकडे उलट ऋषीच सत्य समजावून घेण्याकरिता जात आहेत, असा देखावा

उपनिषदांत दिसतो. अजातशत्रु राजापासून किंवा अश्वपती कैकेय राजापासून ऋषी तत्त्वज्ञानाचा धडा घेत आहेत, असे उपनिषदांत दृश्य दिसते. तत्त्वांची चर्चा करण्याकरिता पंडिताच्या सभा भरून अहमहमिकेने वाद उपनिषत्काली होऊ लागले होते. उदा. जनक राजाने मोठमोठ्या तत्त्वदर्शी ऋषींची एक तत्त्वज्ञान परिषद भरविली, मोठा वाद विवाद घडवून आणला व त्यात याज्ञवल्क्य मुनी हे सर्वांत श्रेष्ठ वादपटू ठरले, असे बृहदारण्यक उपनिषदात सांगितले आहे. राजे व ऋषी मोठे दीर्घकालीन यज्ञसमारंभ करीत. त्यात तत्त्वविषयक वादाकरिता स्वतंत्र सभा भरवीत असत, असे महाभारतावरून दिसून येते. ही वादाची परंपरा बुद्धाच्या काली उत्कर्षास पोचली. बुद्धाच्या काली धर्म, ईश्वर, नीती इत्यादीविषयी परस्परविरुद्ध मताचे साठ संप्रदाय अस्तित्वात होते.

२.१५.५ धर्मशास्त्र म्हणजे काय?

सत्याचा वा तत्त्वाचा शोध करावयाचा व तत्त्वांबद्दल किंवा सत्याबद्दल शोध करणाऱ्यांनी एकत्र जमून वाद करून खऱ्या-खोट्याचा निर्णय काढण्याचा प्रयत्न करावयाचा, अशा रीती प्राचीन भारतात रूढ झाल्यामुळे अनेक शास्त्रांची वाढ झाली. शास्त्रांसंबंधी वादसभा होत होत्या. ह्या वादसभांचे वादविषयक नियम चरकसंहितेत सांगितले आहेत. वाद सभेस तद्विद्यसंभाष (परिषद) असे चरक संहितेत म्हटले आहे. तद्विद्य म्हणजे तज्ज्ञ, त्यांची संभाषा म्हणजे वाद. मनु याज्ञवल्क्य, नारद इत्यादीकांच्या धर्मशास्त्रांतही वादांचे शास्त्र सांगितले आहे. कारण धर्म म्हणजे कायदा, कर्ज, जमीन, व्यापार, वारसा, करारमदार, राज्याचा कारभार इत्यादींसंबंधी धर्मशास्त्र किंवा रूढी यांच्याद्वारा जे नियम समाजात अमलांत येत त्यासंबंधी वाद उत्पन्न होई. त्याचा निवाडा न्यायालयात होई. ही न्यायालये एक तर राजाने नेमलेली असत, किंवा गावे नगरे व जमाती यांनी नेमलेली असत. त्यांच्यात वाद होऊन निर्णय लागे. त्याकरिता लागणारे वादाचे व प्रमाणाचे नियम धर्मशास्त्रांत सांगितले आहेत.

२.१५.६ तर्कशास्त्र वादविद्येचा गाभा

तात्पर्य, प्राचीन भारतात तत्त्वदर्शने, धर्मशास्त्रे, व्याकरण, वैद्यक इत्यादी विद्या परिणती पावू लागल्या, त्याचबरोबर वादविद्याही निर्माण झाली. ही वादविद्या प्रथम अक्षपाद गौतम मुनींनी समग्र व विस्तृत स्वरूपात मांडली. वादविद्या ह एक स्वतंत्र दर्शन म्हणून मान्यता पावले. पुराणात एक श्लोक आहे, "गौतमस्य कणादस्य कपिलस्य पतञ्जलेः। व्यासस्य जैमिनेश्चापि दर्शनानि षडेव ही॥" गौतम, कणाद, कपिल, पतंञ्जली, व्यास व जैमिनी यांची सहा दर्शने आहेत, असा या लोकाचा अर्थ. यात प्रथम गौतमाच्या दर्शनाचा निर्देश केला आहे. गौतमाच्या दर्शनास न्यायदर्शन म्हणत. न्याय म्हणजे यथार्थ निर्णय किंवा यथार्थ निर्णय करण्यास उपयुक्त असे नियम.

म्हणजेच वादाचे किंवा चर्चेचे नियम. यथार्थ निर्णय म्हणजे सत्याचा निर्णय किंवा ज्ञान होय. यथार्थ ज्ञानास गौतममुनींनी प्रमा अशी संज्ञा दिली आहे व यथार्थ ज्ञानाच्या असाधारण साधनास प्रमाण अशी संज्ञा दिली आहे. म्हणून गौतममुनींच्या न्याय दर्शनास प्रामाण्यविद्या असे म्हणतात. योग्य पद्धतीचा वाद प्रमाणाचे समग्र व व्यवस्थित ज्ञान असल्याशिवाय करता येत नसतो. प्रमाणाची सविस्तर मांडणी गौतमाच्या न्याय दर्शनात केली आहे. प्रमाणाची म्हणजे विचार तपासण्याच्या साधनाची विद्या गौतमाची न्यायविद्या आहे. प्रमाणाच्या विद्येस तर्कशास्त्र असेही म्हणतात. वादविद्येतूनच तर्कशास्त्र उत्पन्न झाले; तर्कशास्त्र हा वादविद्येचा गाभा होय.

गौतमाचे न्यायदर्शन म्हणजेच न्यायसूत्र होय. या न्यायसूत्रांवर वात्स्यायनाचे भाष्य आहे व या भाष्यावर उद्योतकर आचार्यांची वार्त्तिक नामक टीका आहे. या दर्शनाची वाढ गेल्या शतकापर्यंत होत आली आहे. गेल्या ६०० वर्षांतील न्यायदर्शनाच्या शाखेस नवा न्याय म्हणतात. वात्स्यायनाच्या न्यायभाष्याची भाषा अत्यंत प्रसन्न आहे. वात्स्यायनाने न्यायदर्शनाच्या स्तुतीचा कौटिलीय अर्थशास्त्रातील एक श्लोक उद्धृत केला आहे, त्यावरून प्राचीन भारतीयांमध्ये वादविद्येची किती श्रेष्ठ प्रतिष्ठा होती, हे समजून येते. तो श्लोक असा "प्रदीपः सर्वविद्याना उपायः सर्वकर्मणाम्। आश्रयः सर्वधर्माणा शश्रदान्वीक्षिकी मता।।" 'आन्वीक्षिकी' म्हणजे वादविद्या ही सर्व विद्यांचा प्रदीप, सर्व कामांचा उपाय व सर्व धर्माचा आधार आहे, असे मान्य झाले आहे कौटिल्याने वादविद्येबद्दल आणखी असे म्हटले आहे की, धर्माधर्म सांगणारी वेदविद्या, संपत्ती व दारिद्र्य यांच्याशी संबंध, व्यापार व उद्योग यांची विद्या किंवा बलाबलाचा वा मुत्सद्दीपणाचा विचार सांगणारी राजनीती या सर्व विद्यांची प्रमाणांनी तपासणी करून त्यांची वाढ आन्वीक्षिकी म्हणजे वादविद्या करते. ही विद्या संकटात व उत्कर्षात बुद्धिला स्थिर ठेवते. आणि 'प्रज्ञावाक्यवैशारथंच करोति।' प्रज्ञा व भाषण यात प्रावीण्य आणते.

२.१५.७ पाखंडी विचारप्रणाली

भारतीय वादविद्येच्या नियमांचे स्वरूप केवळ सत्याच्या संशोधनास उपकारक असेच असल्यामुळे प्राचीन काळी भारतीय संस्कृतीत फार मोठे विचारस्वातंत्र्य वा मतस्वातंत्र्य नांदले. भारतात त्यामुळे चार्वाकाचे पाखंडी भौतिकवादी वा नास्तिकदर्शन, वेदांचे प्रामाण्य अमान्य करणारी किंवा ईश्वराचे अस्तित्व खंडित करणारी बौद्ध व जैन दर्शने अस्तित्वात आली. भारतीयांचे संस्कृतमधील दर्शनग्रंथ हे वादपद्धतीने म्हणजे पूर्व पक्षमालिका व उत्तरपक्षमालिका यांची गुंफण करून लिहिले आहेत. ईश्वर नाही, वेद प्रमाण नाहीत, आत्मा नाही, परलोक नाही, अशा प्रकारचे तर्कशुद्ध पूर्वपच विस्ताराने, वेद, ईश्वर, आत्मा व अमरत्व मानणाऱ्या शबरस्वामी, कुमारिलम, शंकराचार्य, उदयनाचार्य, इत्यादी भारतीय आस्तिक व सश्रद्ध आचार्यांच्या ग्रंथात

मांडलेले वाचण्यास मिळतात. प्रखर व सत्यसंशोधनपर असे वादशास्त्रच मूर्तिमंत अवतरलेले सर्व भारतीय आचार्याच्या भाष्य, वार्त्तिक, किंवा टीकाग्रंथांत दृष्टीस पडते. म्हणून "शिष्यादिच्छेत पराजयम्" असा उदार दण्डक भारतीयांच्या गुरु-शिष्यपरंपरेत प्रमाण मानलेला दिसतो. बृहस्पतीचे शिष्य चार्वाक किंवा लोकायत यांचे ग्रंथ सध्या मिळत नाहीत. नास्तिक भौतिकवाद प्राचीन जगातील सर्वसामान्य लोकांना न पचल्यामुळे त्याची अध्ययनपरंपरा बुडाली. बौद्धाचे व जैनांचे ग्रंथ अजून आहेत. बुद्धिवादाचे नमुने त्यात सापडतात. धर्मकीर्तीचा 'प्रमाण-वार्तीक' हा ग्रंथ पं. राहुल सांकृत्यायन यांनी प्रकाशात आणला आहे.

२.१५.८ विचारस्वातंत्र्य कायम राहिले

असे विचारस्वातंत्र्य वादविद्येच्या प्रभावामुळे भारतात त्याकाळी प्रचारात राहिले. राजे लोकही यावेळी भिन्न-भिन्न विचारांच्या पंडिताच्या वादसभा भरवीत अशी गोष्ट सांगतात की, सुप्रसिद्ध मीमांसक कुमारिल भट्टांनी एका बौद्ध आचार्यापाशी वादविद्येचे बौद्धदर्शनाचे अध्ययन गुप्तपणे, गुरूंना स्वतः वेदानुयायी आहो हे न सांगता बारा वर्षे केले. अखेर एका राजसभेत वैदिक धर्माचे समर्थक म्हणून ते प्रकट झाले व ज्या बौद्ध गुरूपाशी अध्ययन केले, त्यांचाच पराभव केला. त्यामुळे गुरुद्रोहाचे पातक लागले. ते पातक चित्ताचा दाह करू लागले. मनाला पश्चात्ताप झाला. त्यांनी प्रायश्चित्त घेण्याचा निश्चय केला. देहान्त प्रायश्चित्ताशिवाय उपाय नव्हता. भाताचा जळता भुसा ठेवून त्यात त्यांनी देह ठेवला. अशा स्थितीत आद्य श्रीशंकराचार्याची गाठ पडली. कुमारिलांनी बौद्धधर्माचा पराभव करण्याचा व वेदोद्धाराचा संदेश शंकराचार्यांस दिला. शंकराचार्यांनी सर्व भारतात पर्यटन करून सर्व राजसभा व पंडितसभा जिंकल्या. वैदिक धर्माचा व वैदिक याचा विस्थापित केला. हा शंकराचार्यांचा दिग्विजय इतिहासात प्रख्यात झाला. वैचारिक दिग्विजयाने निर्माण होणारे वैचारिक साम्राज्य माणसाना बंधनात टाकीत नाही, अज्ञानाच्या बंधनातून सोडविते. शंकराचार्याच्या वाद कौशल्यासंबंधी अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. त्यातील एक सुसंगत विचाराचे उदाहरण म्हणून पक्की ध्यानात ठेवण्यासारखी आहे. एकदा काशीत पंडितांनी शंकराचार्यांचा वाद झाला. शंकराचार्यांनी इंद्रियांनी दिसणारे विश्व कसे आभासमय किंवा भ्रमात्मक किंवा मिथ्या आहे हे सिद्ध करून सत्य आहे असे मानणाऱ्या विरुद्ध पक्षाचा पराजय केला. सभेत उपस्थित असलेल्या राजपुत्राने यावर एक युक्ती योजली. आपला एक गज शंकराचार्य काशीच्या ज्या संकुचित मार्गाने जात होते, त्या मार्गात त्याने सोडला. गज सामोरा धावत येत आहे हे पाहून शंकराचार्य पळू लागले. त्यांस राजपुत्राने अडविले व विचारले की, "गजो मिथ्या हे खरेना, मग का पलायन करता?" आचार्यांनी लगेच उत्तर दिले की, 'गजो

मिथ्या तथा पलायनमपि मिथ्या' - गज जसा खोटा तसेच पलायनही खोटे. राजपुत्राने आचार्यांचे वादिगजसिंहत्व मान्य केले.

गौतमाने न्यायदर्शनात तत्त्वचर्चेचे तीन प्रकार सांगितले आहेत. वाद, जल्प व वितण्डा या तीन प्रकारच्या चर्चेच्या तीन व्याख्या सांगितल्या आहेत. 'तत्त्वबुभुत्सो', वाद कथा पक्ष व प्रतिपक्ष यांच्यात तत्त्वबोधाच्या इच्छेने म्हणजे सत्यसंशोधनाच्या इच्छेने चर्चा होते, त्या चर्चेस वाद म्हणतात. "विजिगीघुकथा जन्यः" पक्ष व प्रतिपक्ष बौद्धिक विजय प्राप्त होण्याच्या इच्छेने म्हणजे सत्यसंशोधनाच्या इच्छेने चर्चा होते, त्या चर्चेस वाद म्हणतात.

"विजिगीषु कथा जल्पः" पक्ष व प्रति पक्ष बौद्धिक विजय प्राप्त होण्याच्या इच्छेने ज्या चर्चेस प्रवृत्त होतात त्या चर्चेस म्हणतात. "स्वपक्षस्थापनाहीनो वितण्डा', स्वतःचे विशिष्ट मत न स्वीकारता जेथे विरुद्ध पच एकमेकांचे म्हणणे खोडण्यास प्रवृत्त होतात, त्यास वितण्डा म्हणतात. 'गुरुशिष्य- सब्रह्मचारिभिः वादः प्रयोक्तव्यः' गुरु-शिष्य व सहाध्यायी यांनी सत्याच्या बोधाकरिता वाद करावा, असे गौतममुनी म्हणतात. युक्तीने किंवा प्रमाणाने काहीच सिद्ध होत नसते, असे मानणारे संशयवादी लोक वितंडा माजवितात. प्रत्यक्षवादी, शून्यवादी किंवा मायावादी हे वितंडावादी असतात, असे शांकर अद्वैतवादाचे समर्थन करणारे पंडित श्रीहर्ष यांनी 'खण्डनखण्डखाद्य' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे. वाद, जल्प किंवा वितंडा या तीन पद्धतीचे नियम व गुणदोष यांची सविस्तर मांडणी गौतमाच्या न्याय दर्शनात केली आहे. या न्यायदर्शनातून म्हणजे वादविचेतून बौद्ध, जैन पूर्वमीमांसक व अद्वैत- द्वैत-विशिष्टाद्वैत इत्यादी वेदान्ती संप्रदाय यांची समृद्ध अशी तर्कशास्त्र निर्माण झाली असे भारतीय वादविद्येचा इतिहास सांगतो. भगवद्गीतेत भगवानांनी ज्या स्वतःच्या दिव्य विभूती सांगितल्या आहेत त्यात 'वादः प्रवदतामहम्' म्हणजे चर्चा करणाऱ्या पद्धतीत वाद अर्थात तत्त्वजिज्ञासेची चर्चा म्हणजे मी दोष असे म्हटले आहे.

मैत्रेयी आणि गार्गी या वैदिक काळातील (सुमारे ३०००-२८०० वर्षांपूर्वी) अत्यंत विदुषी, तत्त्वज्ञानी आणि 'ब्रह्मवादिनी' महिला होत्या, ज्यांनी पुरुषांच्या बरोबरीने आध्यात्मिक ज्ञानाच्या क्षेत्रात योगदान दिले. गार्गीने याज्ञवल्क्याला शास्त्रार्थात आव्हान दिले होते, तर मैत्रेयीने याज्ञवल्क्याची पत्नी म्हणून अमरत्वाच्या ज्ञानावर भर दिला. दोघींनी तत्कालीन पितृसत्ताक समाजव्यवस्थेत महिलांच्या बौद्धिक क्षमतेचे उत्तम उदाहरण मांडले. स्त्रियांचे शिक्षण ही भारतातील नियमित अवस्था होती, हे पण सिद्ध केले.

यातील गार्गी वाचकनवी ही ऋषी वाचक्नूची कन्या होती. मिथिला राज्यात जन्मलेल्या या विदुषीची ओळख मिथिलेचा राजा जनक याच्या दरबारातील एक प्रख्यात तत्त्वज्ञ अशी होती.

तिने ऋषी याज्ञवल्क्यासोबत 'ब्रह्मविद्या' आणि आत्म्याबद्दल संवाद साधून त्यांना कठीण प्रश्न विचारले. ही वेदविदुषी आजीवन ब्रह्मचारी राहिली.

तर मैत्रेयी ही ऋषी मैत्रेयांची कन्या (आणि काही मान्यतांनुसार गार्गीची भाची) होती. बृहदारण्यक उपनिषदात याज्ञवल्क्याची पत्नी म्हणून तिचा उल्लेख होतो. तिला भौतिक संपत्तीपेक्षा 'अमरत्वाच्या' ज्ञानाची इच्छा होती. आत्म-ब्रह्मविद्या आणि अद्वैत तत्त्वज्ञानात पारंगत होती. ऋग्वेदातील १० स्तोत्रे (hymns) तिच्याशी संबंधित आहेत. एकंदर पाहता भारतीय शिक्षणपरंपरेत मैत्रेयी आणि गार्गी या स्त्रियांचे महत्त्वाचे योगदान आहे.

ज्ञानपरंपरेत शिक्षणाचे महत्त्व सर्वाधिक असते. गुरुगृही शिक्षण होताना गुरूंच्या आणि अन्य सहकाऱ्यांच्या वर्तनातून विद्यार्थी शिकत जाई. शिक्षण घेणारा आणि शिक्षण देणारा या दोघांनाही कोणत्याही विशिष्ट जातीत जन्मण्याचे बंधन नव्हते. शिष्य गुरुचा शोध घेत गुरूकडे जाई आणि गुरुदेखील योग्य शिष्यापर्यंतच आपले ज्ञान पोहोचण्यासाठी प्रयत्न करे. वाल्मिकी, विश्वामित्र, सत्यकाम जाबाली इत्यादी अनेक ऋषी यांचे कुळ वेगवेगळे होते. कृष्ण, सुदामा, सत्यकाम इत्यादी अनेक शिष्यांचीही कुळे पण वेगवेगळी होती.

शिक्षण घेण्यासाठी कोणतेही शुल्क नसे मात्र शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शिष्याने गुरुदक्षिणा द्यावी अशी अपेक्षा असे. एखाद्या शिष्याला आपण हवे तसे शिकवू शकलो नाही तर गुरु त्याला दक्षिणा मागत नसे. एकदा एका शिष्याच्या संदर्भात गुरुचा अनुभव असाच होता तेव्हा गुरुने त्याला मला जगातली निरुपयोगी गोष्ट गुरुदक्षिणा म्हणून आणून दे, अशी आज्ञा केली. त्या विद्यार्थ्याने वर्षानुवर्षे शोध घेतला. काही वर्षांनी तो गुरूंना जाऊन भेटला आणि मला एकही निरुपयोगी गोष्ट सापडली नाही, असे उत्तर दिले. याचाच अर्थ तुला आता व्यवस्थित ज्ञान झाले आहे असे उत्तर गुरूंनी दिले आणि हीच माझी गुरुदक्षिणा असे सांगितले. गुरूदक्षिणेसंदर्भात वरतंतु ऋषींना द्यावयाच्या गुरूदक्षिणेसाठी कौत्स या शिष्याने राजा रघुला मदत मागणे आणि मग रघुने कुबेरावर स्वारी करणे अशी अनेक उदाहरणे आपल्यासमोर येतात.

चार आश्रमांची संकल्पना ही देखील भारतीय ज्ञानपरंपरेतील अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. प्रत्येकाने आपल्या आयुष्यामध्ये आपापल्या वाट्याला आलेल्या भूमिका योग्य पद्धतीने बजावाव्या, हीच भारतीयांमध्ये रुजलेली परंपरा आहे. प्रारंभीच्या आयुष्यात ब्रह्मचर्याचे पालन करून विद्याध्ययन करणे सर्वाधिक आवश्यक मानले गेले आहे. त्यानंतर गृहस्थाश्रम स्वीकारून समाजाला स्थैर्य देण्याचे कर्तव्यही प्रत्येकाने पार पाडावे, अशीच इच्छा येथील समाजाची आहे. आयुष्याचा उपभोग घेणे एका विशिष्ट वेळेला संपवणे आणि वानप्रस्थाचा स्वीकार करणे यालाही भारतीय परंपरेमध्ये महत्त्वाचे स्थान आहे. आणि मग आयुष्याच्या उत्तरार्धात ‘तुका म्हणे आता

उरलो उपकारापुरता' अशी भूमिका घेऊन संन्यास आश्रमाचा स्वीकार करणे, हेच भारतीयांना भावते. 'ययाती'सारखी मराठी कादंबरी भारतभर गाजते याचे कारण उपभोगाचे शमन करून संयमाला अधिक महत्त्व ही भारतीय संस्कृतीतली मूल्ये त्यातून संक्रमित झालेली दिसतात.

'शुकासारखे पूर्ण वैराग्य ज्याचे' या मनाच्या श्लोकातून कडक ब्रह्मचर्याश्रमाबद्दल शुक नावाच्या महात्म्याचे केले जाणारे कौतुक प्रकट होते. योग्य वेळेत ब्रह्मचर्य पालन करणे, त्यात अध्ययन करणे, उत्तम आणि पूर्ण पुरुष होण्याच्या दृष्टीने वाटचाल करणे, याला भारतीय संस्कृतीत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

अशा आश्रमांच्या पालनासाठी मनावर संयम असणे आवश्यक आहे. त्यासाठी मनाची शक्ती आपल्या ताब्यात असणे या दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात. समर्थ रामदास यांनी मनाच्या श्लोकातून मनाची हीच शक्ती किती अफाट आहे, याचे वर्णन केले आहे. पाश्चात्य ज्ञानपरंपरा मनाच्या अस्तित्वालाच नकार देत असताना भारतीयांनी मनाच्या विलक्षण ताकदीबद्दल केलेले प्रयोग आणि द्रष्ट्यांनी केलेले मार्गदर्शन याचा विलक्षण प्रत्यय आपल्याला भारतीय साहित्याच्या वाचनातून आणि ज्ञानपरंपरेच्या विकसनातून येताना दिसतो.

यज्ञसंस्कृती ही प्रामुख्याने दान संस्कृती आहे. आपल्या मानसिक दुर्गुणांचा नाश करणे, ज्ञानदानाची परंपरा अखंड पाळणे आणि त्याचबरोबर आपल्या भौतिक संपत्तीचेही दान करणे, ही यज्ञामागची मूळ कल्पना आहे. विविध राजांनी विविध यज्ञ करून समाजाच्या बौद्धिक आणि भौतिक विकासाला चालना दिल्याचे नेहमीच दिसत आले आहे.

भाषेचा अभ्यास ही भारतीय ज्ञानपरंपरेने जगाला दिलेली देणगी आहे. पाणिनीचे भाषिक योगदान भारतीय भाषाविज्ञानाच्या इतिहासात अतिशय क्रांतिकारक मानले जाते.

१) अष्टाध्यायी- संस्कृत व्याकरणाचा पाया – पाणिनीने इ.स.पू. सुमारे ५व्या शतकात अष्टाध्यायी हा ग्रंथ रचला. यात ८ अध्याय, प्रत्येक अध्यायात ४ म्हणजे एकूणात ३२ अध्याय आणि सुमारे ४,००० सूत्रे आहेत. हा ग्रंथ संस्कृत भाषेचे पूर्ण, अचूक आणि शास्त्रीय वर्णन करतो.

२. सूत्रपद्धतीचा अविष्कार- पाणिनीने अत्यंत संक्षिप्त सूत्रशैली विकसित केली. कमी शब्दांत जास्त अर्थ मांडण्याची ही पद्धत आजही भाषाविज्ञानात आदर्श मानली जाते.सूत्राचे लक्षण ही तसेच सांगितले गेले आहे.

अल्पक्षरम् असंदिग्धं सारवत् विश्वतोमुखम्।
अस्तोभम् अनवद्यं च सूत्रं सूत्रविदो विदुः।।

सूत्रांमधील संक्षिप्तता समजून घेण्यासाठी एका प्रसिद्ध सूत्राचे उदाहरण घेता येईल.

इको यणचि (६.१.७७). या सूत्रचा अर्थ असा की कोणताही स्वर पुढे असताना इ, उ, ऋ, ऌ या वर्णांना अनुक्रमे य्, व्, र्, ल् असे आदेश होतात. इतक्या मोठ्या नियमासमोर इको यणचि हे किती संक्षिप्त आहे हे स्पष्टच आहे.

३. वर्णव्यवस्था व ध्वनिशास्त्र - स्वर, व्यंजन, उच्चारस्थान, प्रयत्न यांचे शास्त्रीय वर्गीकरण केले. आजच्या ध्वनिशास्त्राचा (phonetics) पाया पाणिनीच्या विचारांत आढळतो. यासाठी अंतस्थ वर्णांचा विचार करता येईल. य व र ल हे चार अंतस्थ वर्ण आहेत. इको यणचि या सूत्रात आपण पाहिले की इ उ ऋ ऌ स्वरांना य व र ल असे आदेश अनुक्रमे होतात. अर्थात इ ला य हा आदेश होतो. त्याचे कारण म्हणजे हेच ध्वनी अथवा वर्णोच्चारणाचे शास्त्र. इकाराचे स्थान तालु आहे आणि यकाराचे देखील ते आहे. तेव्हा या उच्चारणस्थानाच्या साम्यावरून इ ला इतर आदेश न होता य हाच आदेश होतो. प्रत्युत संप्रसारण ही संकल्पना देखील यावरच आधारित होय. संप्रसारणात व्यंजनांना स्वरांचे रूप प्राप्त होते. यकाराचे संप्रसारण इकार होतो. इथेही इतर कोणता ही स्वर संप्रसारण म्हणून घेता येणार नाही याचे कारण वर्णोच्चारणाचे स्थानसाम्य हेच आहे.

४. शब्दरचना व रूपविज्ञान - शब्दनिर्मिती, प्रत्यय, उपसर्ग, समास, संधी यांचे नियमबद्ध विश्लेषण केले. भाषा ही नियमांवर चालणारी प्रणाली आहे, ही संकल्पना स्पष्ट केली. धातूंना प्रत्यय लावून शब्द निर्माण करण्याच्या प्रक्रियेचे विशद आणि क्रमवार मार्गदर्शन केले आहे. राम या शब्दाची निर्मिती होताना - रमु (धातू) + घञ् (प्रत्यय)

रम् + अ

राम् + अ

राम

असा शब्द तयार होतो. यात धातूला आणि प्रत्ययाला व्याकरणात काही विशेष अर्थ दिलेले आहेत. जसे रम धातूचा रमणे अथवा क्रीडा करणे असा अर्थ होतो आणि घञ् प्रत्ययाचा आधार असा अर्थ होतो. त्यामुळे ज्याच्यात योगी रमतात तो राम असा त्या शब्दाचा वापरात असणारा अर्थ सहज जाणता येतो. असे सुमारे २,००० धातू ani ४५० प्रत्यय पाणिनीने सांगितले आहेत. समासाचे ही सूक्ष्म नियम महर्षी पाणिनीने सांगितले आहेत. उदाहरणार्थ द्वंद्व समासात कोणता शब्द आधी ठेवायचा ह्यासाठी ते सूत्र लिहितात अल्पाच्तरम् (२.२.३४). ज्या शब्दामध्ये कमी स्वर आहेत त्या शब्दाचा पूर्वनिपात होतो. म्हणूनच राम आणि लक्ष्मण ह्या दोन शब्दांचा समास होताना राम शब्दातले कमी असणारे स्वर पाहून रामलक्ष्मणौ असा समास होतो.

५. व्याकरणाची संकल्पना - थोड्या नियमांमधून असंख्य वाक्यांची निर्मिती शक्य आहे, ही कल्पना पाणिनीने मांडली. आधुनिक काळातील नोम चॉम्स्की यांच्या जनरेटिव्ह ग्रामरशी पाणिनीच्या कार्याची तुलना केली जाते. एकाच सूत्राने अथवा एकाच प्रत्ययाने असंख्य शब्दांची निर्मिती करणे हे देखील आचार्य पाणिनीच्या व्याकरणाचे वैशिष्ट्य आहे. जसे की स्त्रियां क्तिन् (३.३.९४) ह्या एका सूत्राने क्तिन् प्रत्ययाचे विधान केले जाते. ह्या एकाच विधानाने मति, गति, धृति, गुप्ति इत्यादी असंख्य शब्द सिद्ध होतात. असेच एकाचे विधान करून असंख्य शब्दांची सिद्धी करण्याचे शास्त्र आचार्याने सांगितले आहे.

६. संगणकीय भाषाविज्ञानावर प्रभाव - पाणिनीची नियमरचना algorithmic स्वरूपाची आहे. त्यामुळे आजच्या Natural Language Processing (NLP) आणि संगणकीय भाषाविज्ञानात त्यांचा मोठा प्रभाव दिसतो.

७. जागतिक भाषाविज्ञानावर प्रभाव - पाणिनीला जगातील पहिला शास्त्रीय व्याकरणकार मानले जाते. पाश्चात्य भाषाविज्ञानावरही त्यांच्या विचारांचा अप्रत्यक्ष प्रभाव आहे.

थोडक्यात सांगायचं तर, पाणिनीने केवळ संस्कृतचे व्याकरण लिहिले नाही, तर भाषा अभ्यासाची शास्त्रीय चौकटच निर्माण केली. पतंजलीचे भाषिक (linguistic) योगदान भारतीय भाषाविज्ञानात अतिशय महत्त्वाचे मानले जाते. त्यांनी पाणिनीच्या परंपरेला पुढे नेऊन तिला तत्त्वज्ञानात्मक व स्पष्टीकरणात्मक खालील प्रमाणे दिली आहे.

१. महाभाष्य — भाषाविज्ञानाचा महान ग्रंथ - पतंजली यांनी पाणिनीच्या अष्टाध्यायी आणि कात्यायनांच्या वार्तिकांवर आधारित महाभाष्य लिहिले. हा ग्रंथ केवळ टीका नसून स्वतंत्र भाषिक चिंतन आहे.

२. व्याकरणाचे तत्त्वज्ञान - पतंजली यांनी व्याकरणाचे उद्दिष्ट स्पष्ट केले: शुद्ध भाषा, अचूक अर्थ आणि सामाजिक व्यवहारातील स्पष्टता. व्याकरणाला त्यांनी धर्म व संस्कृतीचे रक्षण करणारे साधन मानले.

३. शब्द–अर्थ संबंध - शब्द आणि अर्थ यांचा संबंध कसा निर्माण होतो, यावर सखोल चर्चा केली. स्फोट सिद्धांताचा आधार देत शब्दाचा अर्थ एकाच क्षणी प्रकट होतो, ही कल्पना मांडली.

४. व्यवहारातील भाषा (Usage-based approach) - केवळ नियम नव्हे तर लोकप्रयोग (usage) महत्त्वाचा आहे, यावर त्यांनी भर दिला. भाषेचा अभ्यास हा जिवंत वापरावर आधारित असावा, हे प्रतिपादन केले.

५. दोष, शुद्धता आणि अपभ्रंश - शुद्ध-अशुद्ध शब्दांची चर्चा करून भाषिक शुद्धतेची संकल्पना मांडली. अपभ्रंश व प्रादेशिक रूपांचा उल्लेख करून भाषाबदलाचे संकेत दिले.

६. अर्थनिर्णयातील संदर्भ - शब्दाचा अर्थ ठरवताना संदर्भ, वक्ता आणि परिस्थिती यांचे महत्त्व अधोरेखित केले. हा विचार आजच्या प्राग्मॅटिक्स (Pragmatics) शी सुसंगत आहे.

७. भारतीय भाषाविचार परंपरेतील स्थान - पतंजली यांनी पाणिनीच्या नियमांना व्यावहारिक आणि तत्त्वचिंतनात्मक आधार दिला. म्हणून त्यांना भारतीय व्याकरण परंपरेतील महान भाषातज्ज्ञ मानले जाते.

थोडक्यात: पाणिनी = नियमरचना, पतंजली = त्या नियमांचे अर्थ, उपयोग आणि तत्त्वज्ञान.

२.१६ समारोप

भारतीय ज्ञान प्रणाली ही एक समृद्ध आणि वैविध्यपूर्ण परंपरा आहे. ज्यामध्ये तत्त्वज्ञान, अध्यात्म, विज्ञान, कला, साहित्य आणि संस्कृती यासह विविध विषयांचा समावेश आहे. हा हजारो वर्षांचा मोठा इतिहास आहे. विविध संस्कृती आणि संस्कृतींच्या प्रभावाखाली कालांतराने तो विकसित झाला आहे. भारतीय ज्ञान परंपरा अनेक कारणांसाठी महत्त्वपूर्ण असल्याची आपल्याला दिसते. मानवाच्या दृष्टिकोनात शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक पैलू एकत्रित करते. आंतरविषय ज्ञानामध्ये अनेक विषय, उपविषय एकत्र करून प्रासंगिक व प्रात्यक्षिक ज्ञान सांस्कृतिक आणि सामाजिक संदर्भामध्ये समजून घेण्यावर जोर देते. भारतीय ज्ञान परंपरा ही आध्यात्मिक मार्गाद्वारे अनुभवजन्य निरीक्षणे, प्रात्यक्षिके आणि अनुभव यावर आधारित तर्कसंगत, तर्कदृष्टी, तर्कशास्त्र आणि गंभीर विचारांवर जोर देते.

संदर्भ ग्रंथ

१) वाघ शैलेशकुमार, सोनवणे सिद्धार्थ, भारतीय ज्ञान प्रणाली, २०२४, अथर्व पब्लिकेशन, धुळे, पृ. क्र. २८.

२) तत्रैव, पृ. क्र.३६.

३) म. रा. म. विश्वकोष नोंद संकेतस्थळ.

४) कन्नोर सतीलाल, पाटील दिपक, "प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा", २०२४, अर्थव पब्लिकेशन, धुळे, पृ. क्रं. ३९-४०.

५) रंगदळ अजित, भारतीय ज्ञान प्रणाली, प्रभाकर पब्लिकेशन, लातूर, २०२४, पृ. क्र. ४८-५०.

६) म. रा. म. विश्वकोष नोंद संकेतस्थळ.

७) कन्नोर सतीलाल, पाटील दिपक, "प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा", २०२४, अर्थव पब्लिकेशन, धुळे, पृ. क्रं. ४२-४३.

८) वाघ शैलेशकुमार, सोनवणे सिद्धार्थ, "भारतीय ज्ञान प्रणाली", २०२४, अथर्व पब्लिकेशन, धुळे, पृष्ठ क्र. ४४.

९) म. रा. म. विश्वकोष नोंद संकेतस्थळ.

१०) देशपांडे, ग. त्र्यं. म. रा. म. विश्वकोष नोंद संकेतस्थळ.

११) भटकर, जगतानंद, म. रा. म. विश्वकोष नोंद संकेतस्थळ.

१२) म. रा. म. विश्वकोष नोंद संकेतस्थळ.

***

प्रकरण ३

अभिजात भाषा संकल्पना स्वरूप व वाटचाल

प्रास्ताविक

३.१ अभिजात मराठीचे आद्यस्रोत

३.२ भाषा: व्याख्या, संकल्पना व व्याप्ती

- ३.२.१ भाषा शास्त्रीय अभ्यासाची बैठक
- ३.२.२ बोलीभाषा विज्ञान
- ३.२.३ स्थानिक भाषा
- ३.२.४ मातृभाषा
- ३.२.५ अभिजात भाषा

३.३. अकरा कोटी लोकांची मराठी

३.४ भारतीय अभिजात भाषा

३.५ मराठी भाषेची जडणघडण

- ३.५.१ मराठी भाषेची उत्पत्ती विविध मतप्रवाह

३.६ अभिजात भाषेचे निकष

३.७ अभिजात मराठीची वाटचाल

३.८ बृहन्महाराष्ट्रातील मराठीचे प्राचीन संदर्भ

३.९ भाषा शिक्षण आणि अनुदेशन पद्धती

- ३.९.१ बहुभाषिकता
- ३.९.२ संवादक्षमता
- ३.९.३ सर्जनशीलता
- ३.९.४ तार्किक युक्तिवाद कौशल्य

३.१० समारोप

संदर्भग्रंथ

प्रकरण ३

अभिजात भाषा संकल्पना स्वरूप व वाटचाल

प्रास्ताविक

अभिजात भाषा हा भारत सरकारकडून दिला जाणारा मानाचा दर्जा असून तो ठरावीक शास्त्रीय निकषांवर आधारित असतो. संबंधित भाषा प्राचीन, साहित्यदृष्ट्या श्रेष्ठ, किमान दीड ते अडीच हजार वर्षांची, स्वतंत्र व स्वयंभू स्वरूपाची असावी आणि तिच्या प्राचीन व आधुनिक रूपांतील गाभा अखंड राहिलेला असावा. या निकषांवर पात्र ठरणाऱ्या भाषांनाच अभिजात भाषेचा दर्जा दिला जातो. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी अनेक दशके सातत्यपूर्ण अभ्यास, संशोधन आणि शास्त्रीय मांडणी करण्यात आली. या प्रक्रियेत प्रा. रंगनाथ पठारे समितीने महत्त्वाची भूमिका बजावली. मराठी भाषेतील ग्रंथसंपदेचे ठोस पुरावे बाराव्या-तेराव्या शतकापासून उपलब्ध असले तरी मराठीचा इतिहास त्याही पुढे जातो. 'लीळाचरित्र', 'ज्ञानेश्वरी', 'विवेकसिंधू' यांसारखे ग्रंथ मराठीच्या प्राचीन आणि समृद्ध साहित्यपरंपरेचे ठळक द्योतक आहेत. त्याचप्रमाणे नाणेघाट येथील प्राचीन शिलालेख, सातवाहन काळातील भाषिक अवशेष, ताम्रपट, यादवकालीन कागदपत्रे, हस्तलिखिते आणि संतवाङ्मय हे सर्व मराठी भाषेच्या दीर्घकालीन अस्तित्वाचे आणि सातत्याचे ठोस पुरावे देतात.

मराठी भाषा ही केवळ साहित्यिक अभिव्यक्तीची साधनभाषा नाही, तर लोकजीवनाशी घट्ट नाते सांगणारी, समाजाच्या अनुभवांना शब्द देत काळानुसार विकसित होत गेलेली भाषा आहे. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम आणि रामदास यांनी मराठीला आध्यात्मिक आणि तात्त्विक उंची दिली. पुढील काळात, महात्मा फुले, लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, केशवसुत, बालकवी, आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे यांसारख्या साहित्यिकांनी मराठीला आधुनिक संवेदनशीलता, सामाजिक भान आणि वैचारिक व्यापकता प्राप्त करून दिली. सामाजिक, राजकीय, तात्त्विक आणि वैज्ञानिक विचार मांडणारे साहित्य मराठीत विपुल प्रमाणात निर्माण झाले, ही मराठीच्या ज्ञानभाषा म्हणून असलेल्या क्षमतेची साक्ष आहे.

सन २०२४ मध्ये मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला, हा मराठी भाषिक समाजासाठी अभिमानाचा क्षण ठरला. मात्र या अभिजाततेचा अर्थ, तिचे शास्त्रीय निकष आणि तिच्यामागील सांस्कृतिक संदर्भ यांची माहिती अजूनही प्रत्येकापर्यंत पुरेशी पोहोचलेली नाही. ही माहिती समाजाच्या शक्य तिथे पोहोचणे आवश्यक आहे. त्यामुळे मराठीच्या अभिजात परंपरेबद्दल सर्वंकष आणि आत्मविश्वासपूर्ण समज निर्माण होईल.

३.१ अभिजात मराठीचे आद्यस्रोत

माणूस हा सर्जनशील प्राणी आहे. भाषा आणि लिपी हे त्याच्या सर्जनशीलतेचे दोन महत्त्वपूर्ण आविष्कार आहेत. संदेशवहन हे सजीवसृष्टीवरील इतर प्राणीमात्रांचीही गरज असली तरी ध्वनीचिन्ह आणि त्या ध्वनीचिन्हाला दृश्यरूप देणारी लिपीचिन्ह हे मानवी भाषेचे वेगळेपण होय. जगातील सर्व भाषा आधी बोलल्या गेल्या आणि नंतर लिहिल्या गेल्या. त्यासाठी माणसाने जी लीपीचिन्ह शोधली ती लिपीचिन्ह हे माणसाचे सर्जनशील स्थिर आविष्कार आहेत. त्या लिपीचिन्हांच्या आधारे शिलालेख आणि ताम्रपट कोरले गेले. हे म्हणजे अभिजात मराठीचे आद्यस्रोत आहेत.

मराठी भाषा ही केवळ दैनंदिन व्यवहाराची एक सामान्य संवादभाषा नसून ती भारतीय उपखंडातील एक समृद्ध, प्रौढ आणि सातत्यपूर्ण ज्ञानपरंपरा लाभलेली भाषा आहे. आज मराठीला 'अभिजात भाषा' हा दर्जा मिळालेला असताना, त्या अभिजाततेच्या मुळाशी असलेल्या आद्य ज्ञानसाधनांचा शोध घेणे स्वभावतः महत्त्वाचे ठरते. कोणतीही भाषा फक्त प्राचीनतेमुळे अभिजात ठरत नाही. त्यासह प्रस्तुत भाषेतील ज्ञाननिर्मितीची परंपरा आणि सांस्कृतिक सातत्यही तेवढेच महत्त्वाचे ठरते. मराठी भाषेच्या अभिजात परंपरेची पायाभरणी महाराष्ट्री प्राकृत आणि अपभ्रंश या भाषिक स्तरांवर झालेली दिसते. संस्कृत ही ज्ञानाची मुख्य भाषा असलेल्या काळातही लोकभाषा म्हणून मराठीचा वापर आणि वावर कायमच महाराष्ट्रदेशी राहिला आहे. या साधनांचा शोध घेणे हे अभिजात मराठीचे प्राचीनत्व सिद्ध करण्याचा एक प्रयत्न होय.

मराठीतील प्रारंभीची ज्ञानसाधने प्रामुख्याने मौखिक परंपरेतून विकसित झाली. लोककथा, म्हणी, ओव्या, भारुडे, अभंग, गीते आणि कथाकथनाच्या विविध रूपांतून समाजाचे अनुभवज्ञान साठवले गेले आणि पिढी दर पिढी आपल्यापर्यंत पोहचवले. ही मौखिक परंपरा केवळ करमणुकीपुरती मर्यादित नव्हती, ती जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे प्रभावी माध्यम म्हणून कायम राहिली. शेतकरी, कारागीर, स्त्रिया, वारकरी, भटके समाज इत्यादी सर्वांनी आपापल्या अनुभवांतून ज्ञाननिर्मिती केली आणि ती भाषेच्या माध्यमातून पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली. या सांस्कृतिक संक्रमणात, उच्चार आणि शाब्दिक रूपांच्या पातळीवर कालौघाने बदल होणे अपरिहार्य असते. हे झाले असले तरी ही शक्यता कोरीव लेखांच्याबाबत घडत नाही. म्हणून त्या काळाच्या भाषेचे अस्सल रूप शिलालेख-ताम्रपत्रांसारख्या स्थिर स्रोतांमधून पुढे येते.

उपलब्ध पुराव्यांनुसार नवव्या-दहाव्या शतकापासून मराठीतील लेखनपरंपरेला निश्चित स्वरूप प्राप्त होऊ लागले. कागद वा तत्सम साहित्याच्या मर्यादेमुळे कोणत्याही भाषेतील सुरुवातीचे

लेखन हे बव्हंशी कोरीव स्वरूपात आढळते. टिकाऊ स्वरूपाच्या माध्यमांवर कोरून तयार केलेल्या लेखनास सर्वसाधारणपणे कोरीव लेख असे म्हणतात. यांनाच पुराभिलेख असेही संबोधले जाते. प्राचीन काळात सम्राट, धर्मगुरू, भक्त व काही प्रसंगी जनसामान्यही लेख कोरून ठेवत असत. त्यामध्ये राजाज्ञा, धर्मविधाने, स्मरणार्थ लेख, दानपत्रे, प्रशस्तीपर लेख इत्यादींचा समावेश होतो. पुढच्या पिढ्यांसाठी किंवा आपली स्मृती दीर्घकाळ राहावी म्हणून असे कोरीव लेख लिहिण्याची परंपरा जगात सर्वत्र आढळून येते. ही परंपरा आजही काही प्रमाणात चालू दिसते. मोठ्या सार्वजनिक इमारती, स्मारके, धरणे, पूल, पुतळे यांच्या उभारणीवेळी माहितीपर किंवा स्मरणार्थ लेख कोरून बसविण्याची प्रथा अजूनही अस्तित्वात आहे. (अलीकडे 'कोनशीला समारंभ' हा मोठा कार्यक्रम आयोजित केला जातो.) भूर्जपत्र, कातडी आणि पुढे कागदाचा वापर सुरू झाल्यानंतर कोरीव लेखनाची पद्धत तुलनेने कमी झाली; पण दीर्घकाळ टिकणाऱ्या लेखनासाठी आजही हीच पद्धत स्वीकारली जाते.

हे सर्व कोरीव लेख कोणत्या कशावर लिहावेत, याबाबत कोणतेही निश्चित बंधन नव्हते. सोने, चांदी, तांबे, लोखंड यांसारखे धातू; स्फटिक, नीलम इत्यादी रत्ने; अभ्रक, दगड, खापरे, भाजलेली माती, विटा; तसेच लाकूड, भूर्जपत्र, ताडपत्र इत्यादी वनस्पतिजन्य पदार्थ; कापड अथवा रेशमासारखे तंतुमय पदार्थ आणि कातडे व तत्सम प्राणिज पदार्थ या सर्वांवर लेख कोरले जात. लेखन प्रामुख्याने तीक्ष्ण साधनांनी होत असे. काही ठिकाणी विविध प्रकारच्या शाई व रंगांचाही वापर केला जाई. मुद्रा अथवा पट्टिकांसारख्या साधनांमध्ये एकाच प्रकारचे लेखन वारंवार आवश्यक असल्यास, प्रत्येक वेळी स्वतंत्रपणे लिहिण्याऐवजी त्याचे उलटे ठसे तयार केले जात. हे ठसे मऊ चिकणमातीवर किंवा मळलेल्या मातीवर दाबून उमटवले जात. धातूवरील लेखांसाठी धातू वितळवून उलट्या साच्यात ओतली जात किंवा तापवून मऊ केलेल्या पत्र्यावर ठसा उमटवला जाई. अशा रीतीने राजा किंवा अधिकाऱ्यांना आवश्यक असलेल्या मुद्रा, नाणी इत्यादी तयार केली जात. दगड, धातू, अर्धरत्ने, खापरे, मातीची भांडी अशा कठीण माध्यमांवर लेख कोरण्यासाठी प्रथम अक्षर वळणदार व स्पष्ट असलेल्या लेखकाकडून शाईने लेखन करून घेतले जाई. त्यानंतर त्या लिखाणाप्रमाणे कोरण्याचे काम कोरक्यांकडे सोपवले जाई. अशा लेखांतील चुका कधी लेखन करणाऱ्याकडून, तर कधी कोरणाऱ्याकडून झालेल्या आढळतात. हा जरी भाग असला तरी बहुतांश प्रमाणात हे कोरणारे लोक किंवा कारागीर हे कार्य अचूक करण्यावर भर देत असत. त्यामुळे त्यांना महत्त्व दिले जात असे.

याचबरोबर काहीप्रसंगी सोन्याच्या किंवा चांदीच्या पत्र्यांवर लेखन झालेले दिसते. निवडक उदाहरणे सांगायची झाल्यास कनिष्काने बुद्धाचे अवशेष ठेवलेल्या सोन्याच्या पेटिकेवर लेख

कोरून घेतला होता. शाहजहान व गोवळकोंड्याच्या सुलतानांमधील तह सोन्याच्या पत्र्यावर नोंदविला गेला होता. शिवाजी महाराजांनी तत्कालीन विजयानगर सम्राटांच्या वंशजाला पाठवलेले पत्र चांदीच्या पत्र्यावर लिहिलेले आहे. विविध प्रकारची नाणी ही शुद्ध किंवा मिश्र धातूंवर केलेल्या लेखनाचीच प्रतीके आहेत. मात्र त्या लेखनाला स्वभावतः मर्यादा असतात. मोठ्या प्रमाणावर लेखन दगडांवर आणि तांब्याच्या पत्र्यांवर आढळते. दिल्लीजवळील मेहरोली व टोप्रा येथील लेख लोखंडी स्तंभावर कोरलेले आहेत; परंतु बहुसंख्य लेख दगडी स्तंभावर आढळतात. अशोक, महाक्षत्रप रुद्रदामन व खारवेल यांचे लेख मोठ्या शिलाखंडांवर कोरलेले आहेत. देवळे, मठ यांच्या दगडी भिंतींवर किंवा स्वतंत्र शिलाखंडांवर बरेच शिलालेख आढळतात. सिंहाचलम् येथील मंदिराच्या सर्व भिंती लेखांनी भरलेल्या असून त्या देवळात सुमारे सहाशे शिलालेख आहेत. तंजावरच्या बृहदीश्वर मंदिराच्या आवारातील गणपतीच्या देवळाच्या चबुतऱ्यावर भोसले वंशावरील मराठी लेखही प्रचंड मोठा आहे.

सार्वजनिक लोकांसाठी असलेला आणि दीर्घकाळ टिकावा असा मजकूर सामान्यतः दगड किंवा शिलाखंडांवर कोरला जात असे. विशिष्ट व्यक्ती, मंदिर किंवा संस्थेला दिलेल्या दानाची नोंद तांब्याच्या पत्र्यावर केली जाई. अशा लेखांना ताम्रपट किंवा ताम्रशासन म्हणतात. हे बहुधा आयताकृती असत. त्यातील पत्र्यांची संख्या मजकुराच्या लांबीवर किंवा पत्र्यांच्या आकारावर अवलंबून असे. काही ताम्रशासने एकाच पत्र्याची, तर काही अनेक पत्र्यांची असत. चोल राजा पहिला राजेंद्र याच्या एका ताम्रशासनात तब्बल पंचावन्न पत्रे होती. यादव राजा रामचंद्र याचा शके ११९४ चा पैठण ताम्रपट सुमारे वीस किलोग्रॅम वजनाचा आहे. ताम्रशासन एक किंवा दोन कड्यांत ओवलेले असून पत्र्यांच्या डाव्या किंवा वरच्या बाजूस भोके पाडून जोडले जात. लेखन घासून खराब होऊ नये म्हणून पत्र्यांच्या कडा ठोकून उंचावलेल्या असत. त्यामुळे मजकूर बहुतेक वेळा सुरक्षित राहिला आहे. कड्यांची टोके एकत्र आणून दान देणाऱ्या व्यक्तीची नावमुद्रा किंवा कुलचिन्ह असलेली मुद्रा त्यावर उमटवली जाई. कधी केवळ राजाचे नाव, तर कधी प्रशस्तीपर श्लोकही मुद्रेवर कोरलेला असे. काही ताम्रशासनांवर एकात एक ओवलेल्या दोन कड्या आढळतात. असे ताम्रपटाचे स्वरूप होते.

थोडक्यात अभिजात मराठीच्या आद्यस्रोतांचा विचार करीत असताना मौखिक आणि लिखित परंपरा विचारात घेता येईल. लिखित परंपरेमध्ये शिलालेख, ताम्रपट, भूर्जपत्र, ताडपत्रे, नाणी, शिक्के, राजमुद्रा, पट्टिका, मातीची भांडी अशा आद्यस्रोतांचा विचार करता येतो. हे आद्यस्रोत म्हणजेच अभिजात मराठीची ज्ञानसाधने आहेत.

३.२ भाषा : व्याख्या, संकल्पना व व्याप्ती

माणूस हा सर्व प्राण्यांपेक्षा बुद्धिमान प्राणी म्हणून ओळखला जातो त्याचबरोबर त्याची ओळख तो एक भाषिक प्राणी असून भाषेच्या द्वारा विचारांची देवाणघेवाण करणारा प्राणी म्हणूनही होते. मानवी भावनांची समर्थ अभिव्यक्ती भाषेद्वारे साधली जाते. मानवी जीवनात भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे आपली भाषा आपणास लहानपणापासूनच परिचयाचे असल्यामुळे आपल्या भाषेचे वेगळेपण आणि स्वतंत्रता आपल्या लक्षात येत नाही भाषा ही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे आपल्या मनातील विचार भावना अनुभव व्यक्त करण्यासाठी भाषा हे एक समर्थ माध्यम आहे भाषेद्वारेच आपण भाषिक व्यवहार सुकर आणि सुलभतेने करू शकतो जेव्हा भाषाच अस्तित्वात नव्हती तेव्हा आदिमानवाने आप आपापसात व्यवहार कसा केला असेल.? याची फक्त कल्पनाच करता येते भाषा ही मानवाची दीर्घकालीन निर्मिती प्रक्रिया आहे भाषा आत्मसात करण्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता असते असे असले तरी लहान मुले भाषा शिकताना सहजपणे अनुकरणातून आणि निरीक्षणातून शिकतात सुरुवातीला लहान मूल एक शब्द एकेक शब्द उच्चारण शिकते ही सारी भाषा शिकण्याची प्रक्रिया सहजपणे होते त्यातून मुले हळूहळू आपल्या भावना व्यक्त करतात शेवटी एक परिपूर्ण भाषा आत्मसात होते त्यातून मूल भाषिक संदेश व्यवहार सुलभतेने पूर्ण करतात.

भाषा ही प्राण्याच्या वाट्याला न आलेली पण भाषा शक्तीची नैसर्गिक व जन्मजात मानवाला लाभलेली आहे. माणसाच्या मेंदूची रचना ही वैशिष्ट्यपूर्ण असून त्याच्या अंतर्गत विविध शक्ती केंद्रे असून त्यामुळेच तो इतर प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ ठरला आहे. आपला मेंदू हा एक अतिशय सुव्यवस्थित चालणारा कारखानाच आहे मेंदू हा विचार करणारा अवयव बुद्धीचा अवयव असं आपण म्हणतो मात्र आपलं संपूर्ण जीवनच याच्या नियंत्रणात आहे. इथे विविध क्षेत्र आहेत व ती आपापलं काम करण्यात मग्न असतात याबरोबरच त्याच्या श्रेष्ठत्वाला कारणीभूत ठरणारे महत्त्वाचे कारण म्हणजे त्याला लाभलेले स्वरयंत्र! त्याच्या वाचशक्तीचे मूळ त्याच्या स्वरयंत्रात आहे वॉच शक्तीमुळे भुताच्या गोष्टीतून मिळवलेले चांगले वाईट अनुभव त्याला भाषेत शब्द रूपाने जतन करता येऊ लागले आणि जतन केलेले अनुभव एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आपल्या अनुभवांची त्यात भर घालून त्यात अखंड निर्माण झाली आणि हे अनुभवांचे जतन करण्याचे अतिशय महत्त्वाचे साधन म्हणजेच भाषा होय.

भाषा

'भाषा' हा शब्द 'भाष' या संस्कृत धातूपासून आला असून त्याचा अर्थ 'बोलणे' किंवा 'बोलण्याचा व्यवहार करणे' असा आहे भाषा म्हणजे ध्वनींचा समुच्चय, भाषा म्हणजे बोलण्याची विशिष्ट पद्धती अथवा व्यवस्था, माणूस बोलतो म्हणजे तो काय करतो.? तर तो विशिष्ट आवाज काढतो ते आवाज म्हणजेच ध्वनी होत. ध्वनी उत्पन्न करण्याची किमया सर्व प्राणीमात्रात आहे परंतु ध्वनीला अथवा आवाजाला अर्थ प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य मात्र माणसातच आहे या सामर्थ्यामुळेच माणसाचे जीवन इतर प्राण्यांपेक्षा वेगळे झालेले आहे. भाषा मानवी उन्नती व प्रगतीचा मुलाधार आहे. भाषेमुळेच एकमेकांचे विचार समजणे शक्य होते. भावनांचे प्रगटीकरण भाषेशिवाय अशक्य आहे. भाषेच्या प्रगटीकरण अथवा अभिव्यक्तीकरिता त्या युक्त्या-प्रयुक्त्यांचा वापर केला जातो. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात माणूस भाषेच्या माध्यमातून व्यवहार करत असतो. विचारसुध्दा भाषेतच करत असतो.

१. **सांकेतिक भाषा** :- हातवाऱ्यांच्या साहाय्याने अर्थपूर्ण संकेत व्यक्त करणे.
२. **भृकटी** :- भुवयांच्या हालचालींमधून भावना किंवा आशय व्यक्त करणे.
३. **मुखमुद्रा** :- चेहऱ्यावरील भावांद्वारे विविध भावना प्रकट करणे.
४. **नेत्रमुद्रा** :- डोळ्यांच्या हालचाली व खुणांद्वारे भाव व्यक्त करणे.
५. **चिन्हभाषा** :- विशिष्ट चिन्हे किंवा प्रतीके दाखवून संदेश देणे.

भाषेच्या व्याख्या

१. सामान्य व्याख्या :-

"भाषा म्हणजे विचार, भावना, अनुभव व कल्पना व्यक्त करण्याचे साधन होय."

२. डॉ. रमेश धोंगडे :-

"संकेतबद्ध शब्दांची किंवा चिन्हांची व्यवस्था म्हणजे भाषा होय."[१]

३. डॉ. मिलिंद मालशे :-

"भाषा म्हणजे एक आकारिक व संरचित चिन्ह-व्यवस्था होय."[२]

४. कोचे:-

"भाषा म्हणजे अभिव्यक्तीच्या दृष्टीने उच्चारण व ठराविक ध्वनींचे संघटन होय."[३]

५. एडवर्ड सफिर :-

"कल्पना, भावना व इच्छा दुसऱ्याला सांगण्याचे, स्वतःच्या इच्छेवर अवलंबून असणारे मानवी साधन म्हणजे भाषा होय."[४]

३.२.१ भाषा शास्त्रीय अभ्यासाची बैठक

१) व्युत्पत्ती विज्ञान

व्युत्पत्ती विज्ञान म्हणजे शब्दांचा उगम, त्यांची रचना, धातू, प्रत्यय, उपसर्ग, रूपांतर, आणि त्या शब्दाचा कालानुसार झालेला अर्थपरिवर्तन यांचा शास्त्रीय अभ्यास.

मानवाने पहिल्यांदा बोलायला सुरुवात कशी केली आहे याचा अभ्यास उत्पत्ती विज्ञानात केला जातो. याचे काही महत्त्वपूर्ण सिद्धांतांची थोडक्यात माहिती घेणार आहोत.

१) बो-बो सिद्धांत- यामध्ये निसर्गातील आवाजांची नक्कल करून भाषा कशी निर्माण झाली याचा शास्त्रीय अभ्यास केला आहे. उदा. प्राण्यांचे आवाज.

२) पू-पू सिद्धांत - या सिध्दातामध्ये भावना व्यक्त करताना निघालेल्या उद्गारांतून भाषा कशी तयार झाली. उदा. आनंद, भीती, वेदना.

३) डिंग-डोंग सिद्धांत (Ding-Dong Theory)- या सिध्दातमधुन वस्तूंच्या गुणधर्मांशी सुसंगत अशा नादांतून भाषा निर्माण झाली याचा अभ्यास केला गेला. उदा. यंत्राचा आवाज.

४) यो-हे-हो सिद्धांत (Yo-He-Ho Theory)- एकत्र काम करताना लयबद्ध आवाज किंवा हाका देताना एक विशिष्ट आवाज भाषेतीन पुढच्या व्यक्तिला आशय कळतो. यातून भाषेची सुरुवात कशी झाली. उदा. शेतीतील काम.

२) समाजभाषा विज्ञान

समाजभाषा विज्ञान हे भाषेचा सामाजिक वापर, समाजातील विविध घटकांनुसार होणारे भाषिक बदल, बोलीभाषा, वर्ग, लिंग, वय, शिक्षण, व्यवसाय, धर्म, प्रदेश इ. घटकांचा भाषेवर होणारा परिणाम यांचा अभ्यास करणारे भाषाविज्ञानाचे एक महत्त्वाचे शाखा आहे.

सामाजिक भाषाविज्ञान हे भाषाशास्त्राचे एक महत्त्वाचे अंग आहे. या शाखेत भाषेचा आणि समाजाचा परस्पर संबंध अभ्यासला जातो. म्हणजेच, माणूस ज्या समाजात राहतो, त्याच्या जात, वर्ग, व्यवसाय, शिक्षण, लिंग, वय, प्रदेश इत्यादी सामाजिक घटकांनुसार त्याच्या बोलण्याच्या पद्धतीत होणारे बदल हे सामाजिक भाषाविज्ञानात अभ्यासले जातात. ज्या समाजाची भाषा असेल त्या समाजाचा परिणाम सामूहिकपणे भाषेवर होत असतो त्या समाजाची जे सामाजिक वातावरण असते त्या वातावरणाचा परिणाम भाषेवर होत होतो उदा. कुटुंब व्यवस्था, विवाह संस्था इत्यादी संस्थांचा परिणाम भाषेवर होतो.

भाषा विज्ञानाचे एक नवीन अभ्यास शेत्र म्हणून समाजभाषा विज्ञान उदयास आलेले आहे. भाषा ही समाजाला संघटित व एकत्र ठेवण्याचे कार्य करीत असते दैनंदिन जीवनाचे एक अविभाज्य घटक म्हणजे भाषा होय. मानवी जीवनातील सर्व व्यवहार भाषेद्वारे होतात समाज, समाजातील

परंपरा, रुढी, सामाजिक संस्कृति, समाज जीवनातील वातावरण या साऱ्या घटकांचा प्रभाव व परिणाम भाषेवर होतो. या साऱ्या घटकांचा अभ्यास सामाजिक भाषाविज्ञान या नवीन अभ्यास क्षेत्रात केला जातो भाषा वेगवेगळ्या पद्धतीने समाजात कशी वापरतात याचाही अभ्यास या अभ्यास पद्धतीत होतो.

सामाजिक भाषा विज्ञान - पायाभूत संकल्पना

सामाजिक भाषाविज्ञान संकल्पनेचा विचार करताना डॉ. पपरूषोत्तम महाजन यांनी घेतलेला आढावा महत्त्वाचा वाटतो. त्याची दखल जशाचतसे पुढीलप्रमाणे दिला आहे. "भाषेचा सामाजिक अंगाने अभ्यास करण्याची सुरुवात जे. आर. फर्थ १८९०-१९६०) या भाषावैज्ञानिकाने केली. त्यानंतर समाजशास्त्र, मानसशाख, नववंशशास्त्र या विषयांच्या साहाय्याने भाषाशाखाच्या अभ्यासाला सुरुवात ली व नवीन भाषाभ्यासाचे क्षेत्र उदयास आले.

समाज भाषाविज्ञानाबाबत खालील अभ्यासकांच्या व्याख्या अभ्यासणे आवश्यक आहे.

डॉ. रमेश धोंगडे: भाषेचा प्रत्यक्ष उपयोग वा वापर याचा अभ्यास भाषाविज्ञानाचा भाग आहे. त्याला सामाजिक भाषाविज्ञान असे म्हणतात.

डॉ. कल्याण काळे: भाषेच्या समाजातील आविष्काराचा विचार करणारी शाखा म्हणजे समाजभाषाविज्ञान होय.

वरील व्याखेचा विचार केल्यास असे सांगता येईल की, भाषा ही सामाजिक गाने अभ्यासणे होय. यात समाज आणि भाषा हे दोन घटक महत्त्वपूर्ण आहेत. दश बदलला की भाषा बदलते, म्हणून समाज भाषाविज्ञान हे परिवर्तनशील अभ्यासक्षेत्र आहे.

माणूस समाजात राहतो. मनुष्याचा संबंध भाषेशी येत असतो. माणसाची ली ही वेगवेगळ्या स्वरूपात समाजामध्ये बोलली जात असते. समाजात पढळणारी भाषेची रूपे शोधण्याचे कार्य समाजभाषाविज्ञानात केले जाते. भाषेची विध रूपे कशी आकाराला आली. याचाही अभ्यास समाजभाषाविज्ञानात केला तो. डॉ. कल्याण काळे यांनी समाज भाषाविज्ञानाचे दोन भागात वर्गीकरण केलेले आहे.

१. स्थूल लक्षी समाजभाषाविज्ञान

२. सूक्ष्मलक्षी समाजभाषाविज्ञान

स्थूल लक्षी समाजभाषाविज्ञानात व्यक्ती व तिच्याशी संबंधित भाषा भेदांचा यास करतात तर सूक्ष्मलक्षी समाजभाषाविज्ञानात संपूर्ण समाज व त्याच्याशी बधित भाषा भेदांचा अभ्यास करतात.

वैशिष्ट्ये

- समाजभाषाविज्ञानात व्यक्ती व त्याची बोली, समाज या घटकांना अनन्यसाधारण महत्त्व असते.
- नवे- जुने भाषाभेद, त्यांची कारणमीमांसा यांचा शास्त्रीय अभ्यास समाज भाषाविज्ञानात अभिप्रेत असतो.
- समाजभाषाविज्ञानात भाषेच्या समाजातील आविष्काराचा विचार अभिप्रेत असतो.

वरील भाषाविज्ञानाच्या विविध पद्धतींद्वारे पाश्चात्त्य व भारतीय भाषावैज्ञानिकांनी भाषाशास्त्राचा अभ्यास केला व भाषाविज्ञान हे भाषेशी संबंधित शास्त्र उदयास आले."[५]

१. भाषिक सापेक्षतावादाचा सिद्धांत

भाषिक सापेक्षतावाद सिद्धांत हा समाज भाषा विज्ञानात सपीर - वोर्फ हायपोथेसिस म्हणून प्रसिद्ध आहे. यामध्ये दोघानी ॲरीझोनामधील 'होपी' भाषेचा मानवंशी शास्त्रीय दृष्टितून अभ्यास केलेला होता.

भाषा आणि संस्कृतीच्या आंतर संबंधांचा अभ्यास एडवर्ड सपीर याने १८४४ ते १९३९ मध्ये फ्रांझ बोसकडून दीक्षा घेऊन केला होता. व 'एथ्नोलिंग्विस्टिक' या स्वतंत्र ज्ञान शाखेचा पाया घातला सपिरच्या मते भाषा निरपेक्ष अनुभव संभवत नाही; किंबहुना मनुष्य भाषेच्या दयेवरच वास्तवाला सामोरे जात असतो. वास्तव जगाची प्रतिमा तो आपल्या मनातच भाषिक आधारावरच उभी करत तो आणि जाणिवेच्या आधारावरच आपला संज्ञापन व्यवहार करीत असतो.

३) बोली विज्ञान

भाषेच्या विविध भागांमध्ये बोलल्या जाणाऱ्या रूपांमध्ये उच्चार, शब्दसंपदा, वाक्यरचना, व्याकरण या सर्वांमध्ये सूक्ष्म फरक आढळतात. या फरकांचा शास्त्रीय अभ्यास म्हणजे बोली भाषाविज्ञान. बोलीभाषा ही प्रत्येक बारा कोसानंतर बदलते असे म्हटले जाते.! हे विधान पूर्णतः सत्य असल्याचे आढळून येते.

- **बोलीभाषा व बोलीभाषेत पडणारा फरक**

अ.क्रं	प्रदेश / विभाग	प्रमुख बोली	प्रमुख जिल्हे	उदाहरणे	भाषिक वैशिष्ट्ये
१.	कोकण	कोकणी बोली	रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड	"हाव जातो", "काय करता.?"	नासिक ध्वनीचा वापर जास्त पोर्तुगीज व संस्कृत प्रभाव
२.	विदर्भ	वऱ्हाडी बोली	अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वर्धा	"मी काय करतो रे	ह, रे, गं यांचा वापर
३.	खानदेश	अहिराणी व खानदेशी	जळगाव, धुळे, नंदुरबार	तू काय बोलतोस हं?", काय केलं रे?"	गुजराती आणि राजस्थानी प्रभाव, स्वरांमध्ये बदल
४.	मराठवाडा	मध्य मराठी बोली	औरंगाबाद, लातूर, बीड, नांदेड, परभणी	"कुठे चाललात?""मी कामाला जातो."	प्रमाण मराठी च्या जवळची बोली
५.	पश्चिम महाराष्ट्र	दक्षिणी मराठी बोली	सातारा, सांगली, कोल्हापूर	काय करताय हो?"' "मी आलो गं."	दक्षिणात्य (कन्नड) प्रभाव स्वर थोडेसे गोल
६.	झाडी प्रदेश (विदर्भ व गडचिरोली)	झाडी बोली	गडचिरोली आणि चंद्रपूर	काय करतोस बंधू?", काय चाललं"	गुंडी, तेलुगु, आदिवासी प्रभाव
७.	नाशिक परिसर	खानदेशी मिश्रबोली	नाशिक, नगर, ठाणे	"मी जातोय बघा", "काय चाललंय?"	मराठी व खानदेशी चा संगम

➢ **महाराष्ट्रातील स्थानिक बोली भाषा व त्याची उदाहरणे**

अ.क्र.	**प्रदेश**	**स्थानिक भाषा**	**वापर क्षेत्र**
१.	कोकण	कोकणी	रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड
२.	विदर्भ	वऱ्हाडी	अकोला, अमरावती, वर्धा
३.	खानदेश	अहिराणी/खानदेशी	धुळे, जळगाव
४.	मराठवाडा	मध्य मराठी	संभाजीनगर, लातूर
५.	पश्चिम महाराष्ट्र	दक्षिण मराठी	कोल्हापूर, सांगली, सातारा

➢ **शेती, जंगल, पशू -**

टिकाव, फावडा, घन, छिन्नी, हातोडा, टोपले, कासरा, दोऱ्या, ल्हवारकी, फाळ, हातोडा, खुरपे, इळे (ईवे), कुऱ्हाडी, नांगर, फासा, लकुंड (लोखंड) खुरपे, कोयते, कनगी, मोळा- (खिळा), बाटीक (बारीक) चारा, कुरण - चाऱ्यासाठी राखलेले गवत, जवारी - ज्वारी, जुंदळा ज्वारी, शाळू ज्वारी, घौ - गहू जिमीन - जमीन, पेंड्या - कडबा, पाचोळा, खळे, मोडणी, काडनी, कुळव (वखर), नांगरनी, पेरनी, खुरपनी, रान, तिपनी (तिपन), दिंड, तास, पात, चाड, गाडीबैल, भागीन, कोटा - गोठा, कोप / खोप - शेतात बांधलेली झोपडी, सोल, गायी, म्हशी जनावरांना बांधलेली, धाट, खरकूत - गाई बैलाच्या जिभेला काटे येण्याचा रोग, बेगडे - बैलपोळाच्या सणाला सोन्याचांदीच्या रंगाण्या चकाकणारा कागद म्हणजे बेगडे, वारनिश – शिंगांना रंग दिला जातो, शिंगोटी - बैलाच्या शिंगांत पितळीं फिरक्या घालतात, माटाट्या - दोन शिंगांतून कपाळावर गोंडे, घोंडा - गोंडा, कंडे - बैलाला दृष्ट लागू नये म्हणून कपाळावर बांधतात, फऱ्या. जनावरांचा पाय उतरतो त्याला फऱ्या रोग असे म्हणतात.

➢ **नातेसंबंधविषयक शब्द**

बाबा, आई, मामा, भाऊ, बा, मावशी-मावसा, भावकी, ल्योक, लेक, आज्जा, आज्जीमाय, माय, बाप, भैन, दीर, भाव्या, बारका, थोरला, मदवा, धाकला, पिळगे, मायबाप, भैनीभैनी, बहिणी-बहिणी, चुलता-चुलती, मावळा-मावळन, पावनेरावने, सोयरेधायरे, वयनी – वहिनी, मावळण - मामाची बायको, मामी, मावळा -मामा, भाव्या – नवऱ्याचा मोठा भाऊ, मोठा दीर, आत् - आत्या, आतू , भाचा, भाची

➢ **वस्त्रविषयक –**

सण-उत्सव साजरी करण्यातून भाषा आपुलकीची आणि नात्यांचीही आहे. सणांच्या निमित्ताने कुटुंब एकत्र येते, नातेवाईकांची धोतर, मुंडासं, बंडी, फेटा, लुगडं, परकर, आंगी, बदामी, चोळना, वाकळ, चोळी, झंपर, धडपा, चिंदकं, बदगं – हलक्या प्रतिचे कापड, जुने कापड, पटकर - कापडाचा लहानमोठा तुकडा, चिरगूट - चिंधी, जुन्या कापडाचा तुकडा, चिंधुक, कांबळ - पांघरूण, घोंगडं - पांघरूण, झंपर पोलकं / ब्लाऊज, फराक - फ्रॉक, जांग चड्डी, पोकळ – सैल कपडे, बनियन, आंगी - सदरा, शर्ट, रुमाल - डोक्याला बांधायचा रंगीत रेशमी फेटा, पटका - सुती फेटा पांढरा, पदर , चोळना - विजार, कुंची - जुन्या लुगड्याच्या चौपदरी पांघरून, परकर, सतरंजी.

➢ **सण – उत्सव :**

भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्येक सण-उत्सव साजरी करण्याचे जसे वेगवेगळे नियम आहेत तसेच त्या त्या सण-उत्सवाची भाषा वेगळी असते. भारत हा सण-उत्सवांचा देश म्हणून ओळखला जातो. वर्षभर विविध धर्म, प्रांत आणि संस्कृतींचे सण साजरे केले जातात. हे सण केवळ परंपरा पाळण्यासाठी नसून त्यामागे एक खास भाषा दडलेली असते. ही भाषा शब्दांत व्यक्त होत नाही, तर आनंद, एकोपा, रंग, चालीरीती आणि भावना यांतून प्रकट होते. सण-उत्सवांची भाषा ही आनंदाची भाषा आहे. दिवाळीत दिव्यांचा उजेड अंधार दूर करतो, तर होळीचे रंग मनातील भेदभाव पुसून टाकतात. ईदचा सण बंधुभाव आणि त्यागाचा संदेश देतो, तर ख्रिसमस प्रेम, क्षमा आणि शांततेची शिकवण देतो. गणेशोत्सव, नवरात्र, मकरसंक्रांत यांसारखे सण समाजाला एकत्र आणून सामूहिक भेट होते, मित्रमैत्रिणी जवळ येतात. फराळ, भेटवस्तू, शुभेच्छा यांमधून प्रेम व्यक्त होते. शब्द कमी असले तरी भावना खोल असतात—हीच सण-उत्सवांची खरी भाषा आहे. सण-उत्सवांची भाषा संस्कृती जपणारी आहे. पारंपरिक कपडे, लोकनृत्ये, गाणी, पूजा-विधी यांमधून आपली परंपरा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचते. आधुनिकतेच्या युगातही सण आपल्याला आपल्या मुळांची आठवण करून देतात आणि सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवतात. आजच्या धावपळीच्या जीवनात सण-उत्सवांची भाषा अधिक महत्त्वाची ठरते. ती माणसाला थांबायला, आनंद घ्यायला आणि इतरांशी जोडायला शिकवते. मतभेद विसरून एकत्र येण्याचा, सहिष्णुतेचा आणि सौहार्दाचा संदेश सण-उत्सव देतात. अशा प्रकारे सण-उत्सवांची भाषा ही आनंद, एकता, प्रेम आणि संस्कृतीची भाषा आहे. ही भाषा समजून घेतली, जपली आणि मनापासून स्वीकारली तर समाज अधिक सुसंस्कृत आणि आनंदी होईल.

४) व्याकरण

व्याकरण म्हणजे भाषेचा योग्य वापर कसा करावा हे शिकवणारे शास्त्र. भाषेची शुद्ध रचना, उच्चार, शब्दरचना आणि वाक्यरचना यांचे नियम सांगणारे शास्त्र म्हणजे व्याकरण होय. मराठी व्याकरणाच्या बाबतीत कृ. पा. कुलकर्णी आपले मत पुढीलप्रमाणे नोंदवताना दिसतात,

"मूळ आर्यभाषेतील रूपसमृद्धी पुढील अवस्थांत कमी झाली असली, तरी मराठीत रूपसमृद्धी कमी उतरली असे नाही. रूपांचे विविधत्व व भिन्नत्व हे मराठी भाषेत काही कमी नाही व ते त्या भाषेचे एक भूषण आहे, असे काही व्याकरणकार मानतात. भाषेच्या विकासातील ही एक गंमतच आहे. भाषेच्या विकासाच्या एका अवस्थेत जर एक प्रकारचे विविधत्व कमी झाले तर त्याच अवस्थेत दुसऱ्या कोणत्या तरी प्रकारचे विविधत्व येते. शब्दाचे आठ प्रकार, सात विभक्ती, तीन लिंगे, दोन वचने, तीन काळ व त्यांचे पोटभेद, अर्थ, रूप, प्रयोजक, कर्मणी, साधित धातू, संयुक्त क्रियापदे इत्यादी कितीतरी भिन्न भिन्न गोष्टी मराठीत आहेत. शिवाय शब्दाचे सामान्यरूप व त्याचे निरनिराळे प्रकार ही तर मराठीची विशिष्ट बाब आहेच. कर्तरी, कर्मणी, भावे, भावकर्तरी, कर्मकर्तरी इत्यादी प्रयोगाचे भेद आहेतच. रूपांच्या ह्या भिन्नत्वामुळे व विविधत्वामुळे मराठी भाषा ही किंचित ताठर झाली आहे, असा तिच्यावर अन्यभाषीयांचा आरोप आहे.

नामविभक्ती, आख्यातविभक्ती, शब्दसिद्धी ह्या बाबींचा विचार अनुक्रमे पुढे केला आहे.

२३१. "व्याकरणाच्या दृष्टीने मराठीत शब्दांचे दोन मुख्य प्रकार आहेत. एक व्ययो शब्द व दुसरा अव्ययी शब्द, पहिल्या व्ययी प्रकारात नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद व दुसऱ्या अव्ययाच्या प्रकारात क्रियाविशेषण, शब्दयोगी, उभयान्वयी व उद्‌गारवाचक हे विभाग पडतात. संस्कृतमधील नाम, आख्यात, उपसर्ग व निपात ह्या शब्दांत चार प्रकारांपैकी उपसर्ग हे धातूतच सामावून गेल्यामुळे मराठीत शब्दाचे प्रकार फक्त तीनच राहतात; व ह्या तिन्हींमध्ये वर दिलेले आणखी उपभेद पडले आहेत. मानसशास्त्रदृष्ट्या पाहिले तर वाक्यांतील खरे जिवंत शब्द म्हटले म्हणजे नाम आणि क्रियापद हे दोनच ठरतात. सर्वनाम हा जरी भाषेतील आद्य शब्द असला, तरी ज्या अर्थी नामासाठी त्याचा उपयोग होतो, त्या अर्थी तो एक निराळा प्रकार मानण्याची जरुरी नाही. नाम आणि विशेषण हे दोन्ही शब्द वाक्यात एकमेकांसाठी वापरले जातात. क्रियाविशेषण, शब्दयोगी व उभयान्वयी वगैरे अव्यये ही वाक्यरचनेची किंवा वाक्यरचनेत शब्द जोडण्याची निरनिराळी साधने आहेत. उद्‌गारवाचक अव्यये तर निराळा प्रकार मानण्याची जरुरीच नाही. भावनेचा आवेग दाखवणारी अतिसंक्षेपित अशी ही वाक्येच आहेत. ही वाक्ये व्याकरणदृष्ट्या पूर्ण नाहीत एवढेच. परंतु ही मानसशास्त्राची दृष्टी झाली. तर्कशास्त्राच्या कसोटीने पाहिले, तर शब्दाचा

निराळा धर्म दिसला की त्याला निराळे नाव दिले पाहिजे. मानसशास्त्राच्या दृष्टीने उद्‌गारवाचक अव्ययेच फक्त वगळली जाऊन शब्दांचे सात प्रकार ठरतील."[६]

३.२.२ बोलीभाषा विज्ञान

बोलीभाषा म्हणजे विशिष्ट प्रदेशातील किंवा लोकांच्या विशिष्ट गटाद्वारे वापरली जाणारी भाषा किंवा भाषेची प्रादेशिक/सामाजिक विविधता आहे. बोलीमध्ये सामान्य भाषेपेक्षा उच्चार, शब्दसंग्रह, आणि व्याकरण यामध्ये काही फरक असू शकतो. बोली भाषेचा वापर मुख्यत्वे संवादासाठी होतो, आणि बऱ्याच बोली भाषा लिहिल्या जात नाहीत. उदा. मराठीमध्ये कोल्हापुरी, वऱ्हाडी, बेळगावी, देहवाली, भटक्या विमुक्त आवृत्त्या विविध ठिकाणांच्या लोकांमध्ये बोलीभाषा म्हणून वापरल्या जातात.

- **बोली भूगोलाची क्षेत्रीय संकल्पना**

बोलीभाषा ही लोकांच्या व्यवहारातील सामान्य संवादाची माध्यमे असून, त्या प्रदेशाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक परिसंस्थांशी संबंधित असते. बोलीभाषांचा भूगोलात अभ्यास केल्यावर त्यांच्या विस्ताराचे, स्थानिक प्रभावांचे, आणि वंशपरंपरेतील संबंधित घटकांचे विश्लेषण करता येतो.

बोली भूगोलाचे महत्त्व स्पष्ट करताना डॉ. शशिकला कांबळे आपल्या सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली या ग्रंथात पुढीलप्रमाणे आपले मत मांडतात. "बोलीचा विचार भाषाशास्त्रामध्ये प्रामुख्याने होतो. भाषा व बोली यांच्यात वस्तुतः भाषकदृष्ट्या काही फरक नाही. सुशिक्षित व पुढारलेला समूह जी बोली बोलतो त्या बोलीस एक प्रकारचा सामाजिक दर्जा प्राप्त होतो. राजकीय किंवा इतर काही अन्य कारणांसाठी एका विशिष्ट बोलीलाच भाषेचा मान मिळतो. ज्या प्रमाणात साक्षरता वाढत जाईल, लोकमान्य, राजमान्य झालेल्या बोलीमध्येच व्यवहार करण्याची हौस किंवा गरज वाढत जाईल, त्या प्रमाणात मान्यता व पावलेल्या बोली नष्ट किंवा लुप्त होण्याचा धोका वाढेल. ज्या बोली अत्यंत कमी लोक बोलतात त्या नष्ट झाल्याची अनेक उदाहरणे दृष्टोत्पत्तीस येतात.

म्हणून बोली नष्ट होण्याच्या आत त्यांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. त्यासाठी बोलीला भाषाशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्वाचे अंग गणले, मानले जाते. भौगोलिक दृष्टीने जवळ असलेल्या बोलीच्या मर्यादा निश्चित करणे हे या अभ्यासाचे एक प्रमुख कार्य आहे. हे कार्य दिसते तेवढे सोपे नाही. या बोलींमध्ये बरेच साम्य असल्यामुळे त्या सहजपणे इतरांनादेखील समजू शकतात. भिन्न ध्वनी, वेगवेगळी रूपे, शब्दप्रयोग, वाक्यप्रयोग यांचाही अभ्यास करून त्या बोलीचे नकाशे तयार

करण्यात येतात. यामध्ये समान उच्चाररेषांच्या आधारे बोलींच्या मर्यादा नष्ट होत असतात. या पद्धतीमध्ये बोली म्हणजे काय ? बोलीची व्याख्या, बोलीबाबतच्या सर्वसाधारण कल्पना यांचा परामर्श घेऊन शास्त्रीय विचार, व्यक्तिगत बोली, एका समाजाची बोली व भाषा यांच्यातील परस्पर संबंध, विशेषतः बोली व भाषा यांच्यातील भेद, या सर्व घटकांचा विचार करण्यात येतो."[२६]

➢ क्षत्रिय बोली

'बोलीभाषाविज्ञान' याचेच दुसरे नाव 'भाषिक भूगोल' असे आहे. सामान्यतः प्रत्येक व्यक्ती निदान एकातरी भाषेचा उपयोग करते, म्हणजेच बोलणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा कोणत्यातरी एका भाषेशी परिचय असतोच. परंतु परिचय असणे, विनिमयसाधन म्हणून वापरता येणे, म्हणजे त्या वस्तूचे अथवा गोष्टीचे ज्ञान असणे असे नव्हे. आपण सगळे पृथ्वीवर राहतो, म्हणून पृथ्वीविषयक अगदी ढोबळ माहितीसुद्धा आपल्याला असतेच, असे नव्हे. प्रत्येक हिंदू मनुष्य कोणत्यातरी जातीचा असतो, म्हणून त्याला हिंदू धर्माची, जातिसंस्थेची, एव्हढेच काय पण स्वतःच्या जातीचीही यथार्थ माहिती असतेच, असे नव्हे. किंबहुना अतिपरिचयामुळे अशा गोष्टींबद्दल एक स्वाभाविक अज्ञान किंवा कुतूहलशून्यताच असते.

हीच गोष्ट भाषेबद्दलही म्हणता येईल. भाषा वापरणाराला भाषा म्हणजे काय हे माहीत असतेच, असे नाही. एवढेच नव्हे तर स्वतःच्या भाषेची घडण, तिचे स्वरूप व कार्य यांविषयी बहुतेक लोकांना काहीच ठाऊक नसते. तरीही आपण अमुक भाषा बोलतो, म्हणून तिच्याविषयी वाटेल ती विधाने करण्याचे धार्ष्ट्य अनेक लोक करतात. परंतु शास्त्रीय दृष्टिकोणातून पाहणाऱ्या परभाषिक अभ्यासकालासुद्धा त्यातला पोकळपणा लगेच दिसून येतो.

मानवी भाषा म्हटली, म्हणजे तिच्या अंगी काही सर्वसामान्य वैशिष्ट्ये असतातच. प्रत्येक भाषा ही विशिष्ट ध्वनींचा वापर करते. हे ध्वनी वापरण्याची प्रत्येक भाषेची एक निश्चित पद्धत असते. ध्वनींच्या लहानमोठ्या शृंखलांतून अर्थदर्शक संकेत बनवले जातात. या संकेतांना विकारयुक्त बनवून किंवा ते तसेच वापरून, एका विशिष्ट क्रमाने ते मांडून विनिमय साधणारे घटक-वाक्ये, उपवाक्ये, वाक्यखंड इ. बनवता येतात.

बहुतेक जणांच्या मते अशी ही एका नावाने ओळखली जाणारी भाषा तिच्या सर्व प्रदेशात एकरूप असते, किंवा असली पाहिजे. पण भाषेची तर जातीय, व्यावसायिक, धार्मिक, प्रादेशिक, स्थानिक अशी असंख्य रूपे एकाच वेळी दिसून येतात. एकरूपतेचे समर्थक म्हणतात, 'खरोखर भाषा एकच पाहिजे. तिचे लेखनातील रूप हेच तिचे खरे शुद्ध रूप. बोलताना ते कमीअधिक प्रमाणात विकृत होते. या बोलीरूपातही सुशिक्षित शिष्ट उच्चवर्गीयाकडून बोलले जाते, तेच तिचे

ग्राह्य प्रमाण रूप. इतर रूपे अशुद्ध, कारण अडाणी लोकांना कसे बोलावे, शुद्ध उच्चार कसे करावे, व्याकरणाची खरी रूपे कोणती ते कळत नसते'.

बोली निर्मितीच्या कारणाचा विचार करताना डॉ. सुधाकर चौधरी आपल्या समाजभाषाविज्ञान बोलीचा अभ्यास सागतात. त्यांची काही कारणे विचारात घेणे महत्त्वाची वाटतात " एक भाषा बोलणारे लोक जेव्हा दुसऱ्या एखाद्या विस्तीर्ण भू - प्रदेशावर आक्रमण करतात आणि नंतर त्या प्रदेशाच्या वेगवेगळ्या प्रांताचे कायमचे स्थानिक रहिवासी होतात त्या बाहेरुन आलेल्या लोकांशी भाषिक व्यवहार करतांना तेथील मूळ स्थानिक लोक मात्र आपली भाषा न वापरता अगोदर त्यांच्याशी त्यांच्या भाषेत बोलण्याचा प्रयत्न करतात. या लोकांच्या भाषिक वापराच्या सवयीमुळे त्या बाहेरच्या लोकांच्या भाषेपेक्षा थोडी वेगळी अशी भिन्न स्वरूपाची भाषा तयार होते व ती भाषाच हळूहळू भिन्त्र बोलीचे रूप धारण करते.

दोन भिन्न भाषिक समाज जेव्हा एकत्र येतात, तेव्हा त्या दोन भिन्न भाषिक समाजापैकी ज्या समाजात भाषिक न्यूनगंड असेल अशा समाजातील लोक आपला सार्वजनिक व्यवहार करतांना आपली स्वतःची मूळ बोली न वापरता त्या दुसऱ्या प्रतिष्ठित समाजाच्या भाषेचा वापर करतात. अशा पद्धतीच्या भाषिक वापरातून भाषेमध्ये संक्रमण घडून येते. या संक्रमणातूनच नवी बोली आकाराला येते.

उदा. कोल्हापूरची मराठी, बेळगावची मराठी, मराठवाड्यातील मराठी, खान्देशमधील मराठी.

एखादा प्रदेश वरून कितीही सलग स्वरूपाचा वाटत असला तरी त्या प्रदेशाचे भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक अशा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून विभाग पडलेले असतात. भौगोलिक कारणांमुळे जास्त जवळ असलेल्या प्रदेशातील बोलीचे रूप दररोजच्या संपर्कामुळे जवळ आलेले असते. यामधून नवी बोली जन्माला येऊ शकते. अहिराणी / खान्देशी व वऱ्हाडी या बोलींमध्ये जेवढे साम्य आढळते तेवढे कोकणी व वऱ्हाडीमध्ये आढळत नाही. तसेच कोकणी व मालवणीत जेवढे साम्य आढळेल तेवढे नागपूरी किंवा डांगी बोलीत आढळत नाही.

जसा काळ मागे जातो तशी भाषा बदलत असते, त्याप्रमाणेच बोलीतही परिवर्तने घडत असतात. कालौघात एकाच बोलीची भिन्न भिन्न रूपे त्या प्रदेशाची व्याप्ती मोठी असेल तर निर्माण होत जातात. एकाच प्रदेशातील दोन वेगवेगळ्या टोकाकडील बोलीची भिन्न भिन्न रूपे जाणवायला लागतात. म्हणजेच दोन नवीनच बोली आकाराला येतात.

पूर्वीच्या काळी वेगवेगळ्या प्रदेशांवर बाहेरच्या राजांची आक्रमणे होत असत. त्यामधून मग तिथल्या मूळ लोकांचीबोली व त्या बाहेरुन आलेल्या राज्यकत्यांची भाषा या भाषिक संकरातून नवीन बोली तयार होते." या सोबतच बोलीची अनेक कारणे आपल्याला दिसतात.

- **सामाजिक बोली**

सामाजिक बोली म्हणजे विशिष्ट सामाजिक गट, जात, वर्ग, व्यवसाय, वय, लिंग किंवा इतर सामाजिक घटकांद्वारे वापरल्या जाणाऱ्या भाषिक विविधतेचे स्वरूप. या बोलींमध्ये उच्चार, शब्दसंग्रह, वाक्यरचना आणि भाषिक शैलीत फरक असतो, ज्यामुळे त्या समाजाच्या ओळखीशी संबंध निर्माण होतो. सामाजिक बोली भाषा आणि समाज यांतील परस्पर संबंधांचा अभ्यास सामाजिक भाषाशास्त्रात केला जातो.

उदा. उखाणे

वटसावित्रीचा पूजते वळ
नागपंचमीचा पूजते नाग
गौराबाईचे काळते चित्र
पुढे आली भादवी पित्र
पित्राची निवडते दाळ
गौराबाईला आला राग
पुढे आली घटाची माळ
दसऱ्याचे घेते सोनं
दिवाळी बाईन केलं येणं
दिवाळी बाईची लावते पणती
पुढे संक्रांत आली निडती
संक्रांतीचे पुजते सुगळ
माई पूनम आली दुगड
माई पुनवेची ओंबी
शिंगा खेडे झोंबी
शिंगेची करते पोळी
रंगपंचमीचा करते रंग
पाडवा आला डोलेजंग
पाडव्याची उभारते गुढी

आखीतिने मारली उडी
आखीतिचा पुजते करा
रावांचं नाव एक डाव सोडून दहाडाव घेते
एकदा गतका बंद करा

३.२.३ स्थानिक भाषा

स्थानिक भाषा म्हणजे विशिष्ट प्रदेशातील लोकांनी बोलली जाणारी भाषा किंवा बोली. ही भाषा सामान्यतः त्या प्रदेशाशी संबंधित असते आणि त्या भागातील लोकांची रोजची बोलण्याची आणि संवाद साधण्याची प्रथागत भाषा असते. स्थानिक भाषा ही अधिक औपचारिक, शास्त्रीय किंवा मानक भाषेच्या तुलनेत साधी, सोपी, आणि स्थानिक संस्कृतीशी निगडीत असते. ती पुस्तकात किंवा शास्त्रीय लिखाणात वापरली जाणारी भाषा नसून, खास बोलचालीतली भाषा असते.

३.२.४ मातृभाषा

आईच्या कुशीत असताना कानावर पडलेल्या पहिल्या शब्दापासून ते आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्याला मनमोकळेपणाने व्यक्त व्हायला शिकवणारी आपली मातृभाषा खऱ्या अर्थाने आपली ताकद असते. मातृभाषा म्हणजे जी भाषा आपल्या घरात किंवा आपल्या कुटुंबात बोलल्या जाते त्या भाषेला मातृभाषा असे म्हणतात. मातृभाषा ही आईकडून आई-वडिलांकडून मुलांना मिळत असते. त्यासोबतच मातृभाषा ही प्रत्येक विभाग, प्रांत, राज्य आणि प्रदेश यानुसार वेगवेगळी असल्याचे दिसून येते.

सामान्यतः अशी समजूत असते, की मातृभाषा रोजच्या व्यवहाराने आपोआप येते, तिच्यासाठी फारसे परिश्रम करावे लागत नाहीत. पण ही समजूत काही एका मर्यादेपर्यंतच खरी आहे. दैनंदिन जीवनातील काही व्यवहार बोली भाषेच्या साहाय्याने पार पाडले जातात. पण त्या व्यवहारांचे स्वरूप मर्यादित असते.

"जी भाषा वापरली जाते, ती बऱ्याच प्रमाणात शिकावीच लागते. भाषेचा सुयोग्य उपयोग करता येणे हे एक कौशल्य आहे व कौशल्य म्हटले की, अध्ययन-अध्यापनाची आवश्यकता आलीच. आपल्या मनातील विचार स्पष्ट, निःसंदिग्ध शब्दांत मांडता येणे हे भाषेचे कार्य. पण ही पात्रता कितीकांच्या अंगी असते ? भाषाशिक्षणाकडे दुर्लक्ष झाल्याचा हा परिणाम असतो, हे फारच थोड्यांच्या लक्षात येते. मातृभाषा सहजासहजी येते असे मानणाऱ्यांच्या दृष्टीतून महत्त्वाची गोष्ट सुटते ती ही, की विचार करावयास शिकविणे, विचारशक्तीची वाढ होण्यास साहाय्य करणे हा

भाषाशिक्षणाचा प्रधान हेतु आहे. अभिजात ग्रंथांतील विचार आत्मसात करण्याचे सामर्थ्य येणे हाही भाषेच्या अभ्यासातील महत्त्वाचा भाग आहे. दैनं दिन व्यवहारातील भाषण-लेखन तुटपुंज्या साधनसामग्रीवर चालू शकेल; पण त्यांतही सहजता, कार्यक्षमता यावी हा शिक्षणाचा हेतू नाही काय ? आणि हे हेत अभ्यासानेच साध्य होणार आहेत. पण दुसरी एक महत्त्वाची गोष्ट अशी की, या नित्याच्या जीवनातील साधेसुधे व्यवहार म्हणजेच सर्व जीवन असे आपण मानीत नाही. जीवनात वाङ्मय, शास्त्रे व कला इत्यादींना आपण केवढे तरी महत्त्व देतो. या दृष्टीने जीवन किती तरी विशाल आहे. आणि भाषेचा प्रांतही तेवढाच व्यापक आहे. वाङमय, शास्त्र इत्यादी ग्रंथांची भाषा सहजासहजी आकलनीय असते काय ? शास्त्र, वाङ्मय ही दूरच राहोत; पण व्यापारउदीम, न्यायकचेऱ्या ही व्यवहाराची क्षेत्रे घेतली तरी प्रत्येकाची भाषा भिन्न भिन्न आढळते. शिवाय बोलीतील शब्दभरणा आणि ग्रांथिक भाषेतील शब्दभरणा किती तरी भिन्न असतो ! पण हा नुसता भाषाकाठिण्याचा, नव्या शब्दसंपत्तीचा प्रश्न नाही. प्रत्येक व्यवसायाचे एक स्वतंत्र अनुभवक्षेत्र असते. नागरी जीवन आणि ग्रामीण जीवन यांत जसा नुसत्या भाषेचा फरक नाही तसाच दैनंदिन व्यवहाराचा आणि वाङ्मयादी ललितकलांचा, शास्त्रांचा संबंध शब्दमेदावर आधारलेला नाही. या नव्या नव्या क्षेत्रांतून विविध अनुभव आपण घेत असतो आणि विविध अनुभवांनी मन संपन्न, उदार व विशाल करणे, हे शिक्षणाचे व्यापक उद्दिष्ट आहे. तेव्हा मातृभाषेचा अभ्यास हा प्रयत्नपूर्वक आस्थेने केला पाहिजे हे सहज लक्षात येईल."[८]

मातृभाषेतील शिक्णामुळे विद्यार्थ्यांचाआत्मविश्वास वाढतो. वर्गात मोकळेपणाने प्रश्न आणि आपले विचार स्पष्टपणे मांडू शकतात. मातृभाषेत शिक्षण देणं हे केवळ सांस्कृतिक किंवा भावनिक दृष्टीने महत्त्वाचं नसून आधुनिक विज्ञानातील संशोधनाचाही याला भक्कम आधार आहे.

मातृभाषा ही व्यक्तिमत्त्व घडवणारी पहिली शाळा आहे. विचार करण्याची क्षमता, भावनांची अभिव्यक्ती मातृभाषेतच सहज होते. संस्कृती, परंपरा आणि मूल्ये मातृभाषेमधूनच पुढे जातात. एका भाषेचा अंत म्हणजे एका संस्कृतीचा अंत. म्हणूनच मातृभाषा जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. मातृभाषा ही फक्त शब्दांची रचना नाही, ती आईच्या मायेचा स्पर्श आहे. आपली भाषा आपल्या मनाशी जोडलेली असते. ती आपल्या मुळांची आठवण करून देते.

मातृभाषा ही केवळ संवाद साधण्याचे साधन नसते, तर ती आपली ओळख, आपली संस्कृती आणि आपल्या भावनांचे सर्वात सुंदर प्रतिबिंब असते. जगात कितीही भाषा शिकलो तरी, आपल्या भावनांचा खरा उमाळा आणि जिव्हाळा फक्त मातृभाषेतूनच व्यक्त होऊ शकतो.

३.२.५ अभिजात भाषा

"अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आणि ख्यातनाम समीक्षक, प्रा. रा. ग. जाधव यांनी मराठी विश्वकोशाच्या खंड-१ मध्ये अभिजाततावाद यावर अभ्यासपूर्ण टिप्पणी लिहिली आहे. (लक्ष्मणशास्त्री जोशी (प्रमुख संपादक), मुंबई, १९७६, पृ.३२० ते ३२४. त्यात ते म्हणतात, "साहित्यातील पश्चिमी वाङ्मय क्षेत्रातील आदर्शानुकरण व संकेतपालन यावर भर देणारी महत्त्वाची विचारसरणी. प्राचीन ग्रीक व लॅटिन साहित्य त्यांनी प्रभावित झालेले उत्तरकालीन पश्चिमी साहित्य यांचा आधार या विचारसरणीत आहे. ही विचारसरणी व अभिजात ही विशेषणात्मक संज्ञा या दोहोंनाही एक इतिहास आहे. ग्रीक, लॅटिन साहित्याचा प्राचीन कालखंड (इ.स.पू.९०० ते इ.स.५००), युरोपातील प्रबोधनकाळ (१४०० ते १६००), नव-अभिजाततावादाचा कालखंड (१६०० ते १८००) व स्वच्छंदतावादाचा कालखंड (स्थूलमानाने १८०० नंतर) हे त्या इतिहासातील महत्त्वाचे टप्पे असून, त्यातून वाङ्मयीन अभिजाततावादाचे स्वरूप अधिकाधिक निश्चित होत गेले. यावरून या वादाला केवळ एक ऐतिहासिक विचारसरणी समजणे मात्र एकांगी ठरेल, याचे कारण प्राचीन ग्रीक-लॅटिन साहित्याच्या अनुकरणीय ठरलेल्या विशेषांचे तात्त्विक स्वरूप या वादात अंतर्भूत होते. अभिजाततावादास केवळ एक ऐतिहासिक विचारसरणी अथवा केवळ इतिहास निरपेक्ष तत्त्वप्रणाली मानले तर या वादाचे यथार्थ स्वरूप समजणार नाही. अभिजाततावादाने कला वाङ्मय विषयक विशिष्ट शैली, विशिष्ट दृष्टिकोन, विशिष्ट मनोवृत्ती, विशिष्ट प्रेरणा, विशिष्ट कालखंड व विशिष्ट वाङ्मयीन मूल्यकल्पना यांपैकी एक, अनेक किंवा सर्वच गोष्टी सुचविल्या जातात. अशा गोष्टींचा संदर्भ कधी प्राचीन ग्रीक व लॅटीन कला-साहित्यापुरताच सीमित असतो, तर कधी त्यांना अनुसरणाऱ्या उत्तरकालीन कला साहित्याचाही त्यात समावेश केला जातो. अभिजात या कम विशेषणात्मक संज्ञेचा उपयोग ऑल्स जेलियस या लॅटिन लेखकाने इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात

प्रथम केला. 'स्क्रिप्टर क्लॅसिकस' व 'स्क्रिप्टर प्रोलेटेरियस' असे लेखकांचे दोन वर्ग समाजातील उच्चवर्गीय लेखकांस त्याने अभिजात हे विशेषण लावले. पुढे मध्ययुगात (-१४५०) व युरोपीय प्रबोधन काळात अभ्यसनीय व अक्षय ठरविण्यात आलेल्या साहित्य व साहित्यिकांना अभिजात मानण्यात आले. त्यानंतरच्या कालखंडात (१६०० ते १८०० प्राचीन, ग्रीक व लॅटिन साहित्य अभिजात मानून, त्यांच्या आशय अभिव्यक्तिविषयक अ अनुसरणाऱ्या तत्कालीन साहित्यास 'नव-अभिजात' ही संज्ञा देण्यात आली. स्वच्छंदताव प्रभावकाळात 'जे जे प्राचीन ते ते अभिजात' या कल्पनेला विरोध करण्यात आला व को काळातील श्रेष्ठ साहित्यकृतींना अभिजात असे संबोधण्यात आले."[९]

श्री. जाधव पुढे म्हणतात, "अभिजाततावादाला अभिप्रेत असणारे आदर्शानुक संकेतपालन हे विषय प्रथम लॅटिन साहित्यात (इ.स.पू. २४० ते इ.स.५००) दिसते. लॅटिन काल साहित्याचे क्षेत्र समाजातील तेव्हाच्या उच्च वर्गापुरते मर्यादित बनले व जिवंत भाषेपासून क भाषेची फारकत करण्यात आली. "अभिजातवादी साहित्य म्हणजे समाजातील उच्चव साहित्य" ही कल्पना ग्रीक साहित्यापेक्षा लॅटिन साहित्यालाच अधिक लागू पडते. सर्वच साहित्याला "अभिजाततावादी" ही संज्ञा याच कालखंडात प्राप्त झाली. प्रदीर्घ काळाच्या कर उतरून अक्षय ठरलेले; शाश्वत, कलात्मक प्रमाणबद्धता व विश्वव्यापक प्रत्ययकारिता या संपन्न असलेले व माहिती, आदर्श व अनुकरणीय ठरणारे जे साहित्य, ते अभिजाततावादी प्रबोधन काळाच्या दृष्टीने अर्थ होता. अभिजाततावादी मनोवृत्ती प्रामुख्याने स्थितिशील अस स्वच्छंदतावादी मनोवृत्ती प्रामुख्याने गतिशील असते असे मानण्यात आले. अभिजाततात्व वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील या वादात आदर्शानुकरणाचे तत्त्व आहे. हे तत्त्व साहित्यकृतीच्या अनुकरणात व परंपरागत वाङ्मयीन संकेताच्या परिपालनात दिसून येते. वस्तुस्थिती ही या वादाचे महत्त्वाचे लक्षण आहे. हे लक्षण तर्कशुद्धता, विवेक प्रामाण्ये, कलात्मक उद्दि प्रकट जाणीवेने नियमित केलेली रचना, कलात्मक प्रमाणबद्धता, भव्योदात्त आशय व शाश्वत स प्रतिपादन याबाबत आढळतात. सामाजिक विवेक हे या वादाचे वैशिष्ट्य आहे. त्याचे परीक्षण प्र सामाजिक नीतिनियमांचे पालन, सद्भिरुची, प्रातिनिधिक स्वभावचित्रण, सामाजिक उ आशय व अभिव्यक्तीमधील सर्वांगीण औचित्यविचार इत्यादींमध्ये विशेषतः घडते."[१०]

आता काळाच्या ओघात अभिजात या शब्दाला नवा अर्थ प्राप्त झाल्याचे संशोधन विचारवंतानी पुढे आणले आहे. 'बर्मिंगहॅम कल्चरल स्टडी सेंटरने' केलेल्या संशोधनात आता या शब्दाला कार्यकारणभाव मानणारे, विज्ञाननिष्ठ, परिवर्तनवादी आणि श्रेष्ठ प्रतीचे साहित्य असे अर्थ प्राप्त झाले आहेत.

३.३ अकरा कोटी लोकांची मराठी

"अकरा कोटी लोकांची मराठी ही जगातील दहाव्या ते पंधराव्या क्रमांकाची भाषा आहे. संपन्न ज्ञानभाषा असणारी मराठी महानुभावांची धर्मभाषाही आहे. सातवाहन, राष्ट्रकूट आणि मराठी हे राज्यकर्ते भारतभर राज्य करत होते. आजच्या पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानावरही मराठी सत्तेची पताका फडकत होती. ही भाषा बोलणारे लोक आज जगातील सुमारे ७२ देशांत पसरलेले आहेत. ते भारतातील ३५ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशात महत्त्वाच्या पदावर काम करत आहेत. त्यामुळे ही फक्त एका प्रांताची भाषा नसून, ती महत्त्वाची राष्ट्रीय भाषा आहे.

मराठीत दरवर्षी सुमारे दोन हजार पुस्तके प्रकाशित होतात, पाचशे दिवाळी अंक निघतात आणि छोटी-मोठी सुमारे दोनशे साहित्य संमेलने होतात. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला लाखो रसिक उपस्थिती लावतात. दरवर्षी साहित्य संमेलनस्थळी आणि मुंबईचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक चैत्यभूमी व नागपूरची दीक्षाभूमी येथे कोट्यवधी रुपयांची पुस्तकविक्री होत असते. नामवंत खासगी प्रकाशन संस्था आणि सरकारी प्रकाशने यांची वैचारिक आणि ललित पुस्तकांची वार्षिक उलाढाल वीस ते पंचवीस कोटी रुपयांपर्यंत असून पाठ्यपुस्तके, धार्मिक ग्रंथ, पाककृती, व्यक्तिमत्व विकासविषयक तसेच ललित आणि वैचारिक ग्रंथ यांची एकत्रित बाजारपेठ सुमारे २५० कोटी रुपये आहे, असा एका पाहणीचा निष्कर्ष आहे. देशातील एकूण ग्रंथालयांपैकी २५ टक्के ग्रंथालये एकट्या महाराष्ट्रात आहेत. मराठी भाषेवर सामान्य माणसाचे उदंड प्रेम आहे. तिचे अस्तित्व आणि तिची समृद्धी हा महाराष्ट्रीय लोकांच्या आस्थेचा आणि अभिमानाचा भाग आहे.

नाणेघाटातील ब्राह्मी लिपीतील २२२० वर्षांपूर्वीच्या शिलालेखातील 'महारठ्ठीनो' हा उल्लेख, विनयपीटक, दीपवंश, महावंश या ग्रंथांतील महाराष्ट्राचे उल्लेख, हालसातवाहनाच्या गाथासप्तशती-तील श्रेष्ठ दर्जाचे मराठी काव्य, रामायण, महाभारत आणि गुणाढ्याच्या बृहत्कथेत येणारे असंख्य मराठी शब्द, वररुचीचे प्राकृतप्रकाश, हेमचंद्राची देशीनाममाला, शाकुंतल मृच्छकटिकातील अनेक पात्रांच्या तोंडचे मराठी संवाद यावरून मराठीची प्राचिनता निर्विवादपणे सिद्ध होते.

पतंजली, कौटिल्य, टॉलेमी, वराहमिहिर, चिनी प्रवासी ह्युएन त्संग, अल्बेरुनी यांचे लेखन आणि थोर संशोधक श्री. व्यं. केतकर, राजारामशास्त्री भागवत, रावसाहेब वि. ना. मंडलीक, महापंडित राहुल सांकृत्यायन, डॉ. रा. गो. भांडारकर, डॉ. वेबर, डॉ. ए. एम. घाटगे, नारायण विष्णु बापट, वि. का. राजवाडे, इरावती कर्वे, कृ. पां. कुलकर्णी, दत्तो वामन पोतदार, वि.ल. भावे, शं.गो. तुळपुळे, रा. भि. जोशी आदींच्या संशोधनाच्या आधारे आधुनिक दृष्टीतून एक सुसंगत आराखडा मांडायचा झाल्यास महारट्ठी किंवा महाराष्ट्री म्हणजेच मराठी भाषा ही किमान अडीच हजार वर्षे जुनी असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. मराठी भाषा काळाच्या ओघात महारट्ठी, मरहट्ठी, महाराष्ट्री, अपभ्रंश, देशी, मराठी अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखली गेलेली आहे. या वेगळ्या भाषा नसून ती एकाच भाषेची वेगवेगळी नावे होत.

ज्ञानेश्वर, तुकाराम ते भाऊ पाध्ये, भालचंद्र नेमाडे, नामदेव ढसाळ आदींचे श्रेष्ठ लेखन आणि राजारामशास्त्री भागवत, श्रीधर व्यंकटेश केतकर, शं. गो. तुळपुळे, ल. रा. पांगारकर यांनी मराठी भाषेच्या निर्मितीबाबत केलेले विवेचन पाहता सारांशाने असे म्हणता येते की प्राचीनता, मौलिकता,

श्रेष्ठ साहित्याची परंपरा, भौगोलिक विस्तार या सर्व अंगांनी विचार करता मराठी ही अभिजात भाषा आहे. तिचे अभिजातपण स्वयंसिद्ध आहे." [११]

३.४ भारतीय अभिजात भाषा

भारतीय अभिजात भाषा म्हणजे भारत सरकारने प्राचीन साहित्यिक वैभव, ऐतिहासिक वारसा आणि सांस्कृतिक महत्त्व असलेल्या भाषांना दिलेला विशेष दर्जा आहे.हा दर्जा २००४ मध्ये सुरू झाला, जेव्हा तामिळला पहिला अभिजात भाषेचा मान मिळाला आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळालेल्या भाषा खालील प्रमाणे

भारतात २०१४ पर्यंत अभिजात भाषा दर्जा ६ भाषांना मिळाला होता. तर २०२४ मध्ये ५ भाषांना अभिजात भाषा दर्जा मिळाला आहे. आता अभिजात भाषा दर्जा मिळालेल्या भाषांची संख्या ही ११ झाली आहे. तामिळ (२००४), संस्कृत (२००५), तेलुगू (२००८), कन्नड (२००८), मल्याळम (२०१३), ओडिया (२०१४), मराठी (२०२४), पाली (२०२४), प्राकृत (२०२४), आसामी (२०२४), बंगाली (२०२४). या दर्ज्यामुळे भाषांच्या संवर्धनासाठी केंद्र सरकार विशेष योजना राबवते.

तमिळ भाषा

तामिळ या भाषेला २००४ ला अभिजात दर्जा मिळाला आहे. प्राचीन लिखित परंपरेच्या बाबतीत तमिळचे स्थान अद्वितीय आहे. तमिळ ही द्राविड भाषाकुलातील सर्वात जुनी आणि सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न भाषा मानली जाते. या भाषेतील जुन्या साहित्याला साहित्य 'संघम्' या नावाने ओळखले जाते. तमिळचा भौगोलिक प्रसारही मोठा आहे. संस्कृत आणि प्राकृत नंतर भारतीय भाषेतील प्राचीन पुरावा जुना आढळतो. ब्राह्मी लिपीतले तमिळ लेख इ.स.पूर्व तिसऱ्या शतकातील मिळतात. मूळ तमिळ लिपीतील लेखन सहाव्या शतकातील उपलब्ध आहे.

तमिळ भाषक लोक मुख्यत: तमिळनाडूमध्ये राहतात. काही लोक कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र आणि इतर राज्यांत पसरलेले दिसतात. श्रीलंकेतही काही लोकांची मातृभाषा तमिळ आहे.

तमिळची लिपी ब्राह्मीवर आधारित असून तमिळमध्ये बारा स्वर आणि अठरा व्यंजने आहेत. आवश्यक तेवढीच चिन्हे स्वीकारलेली आहेत. काही व्यंजन एका पेक्षा अधिक ध्वनी दर्शवतात. संगम साहित्य हे प्राचीन तमिळ भाषेतील साहित्य आहे. जे दक्षिण भारतातील संगम काळात अंदाजे इ.स.पू. ३०० ते इ.स. ३०० मदुराई येथे झालेल्या साहित्य सभांमध्ये रचले गेले. या

काळाला तमिळ वाङ्मयाचे स्वर्णयुग मानले जाते, ज्यात प्रेम (अकम), वीरता (पुरम) आणि नैतिकतेचे विषय केंद्रस्थानी आहेत. संगम काळात चेर, चोल आणि पांड्य राजवंशांचे राज्य होते, ज्यामुळे राजकीय स्थैर्य आणि आर्थिक समृद्धी साहित्याला चालना देणारी ठरली. तमिळ परंपरेनुसार तीन संगम सभांचा उल्लेख आहे, ज्यात कवी आणि विद्वान एकत्र येऊन कविता रचल्या आहेत.

तेलुगू भाषा

तेलुगू भाषेला २००८ मध्ये अभिजाततेची मोहोर उमटवली. आंध्र प्रदेश राज्याची प्रादेशिक भाषा तेलुगू ही आहे. द्राविड भाषाकुलातील सर्वाधिक बोलली जाणारी भाषा म्हणुन याची गणना होते. या तेलुगू भाषेताल सर्वात जुना शिलालेख इ.स. ६३३ वर्षातील मानला जातो. या भाषेतील लेखकाने अकराव्या शतकात तेलुगूत व्याकरणग्रंथ लिहिला. महाभारताचे भाषांतर केले. त्यामुळे तेलुगू भाषेची साहित्यपरंपरा प्राचीन आणि सुसंगत मानली जाते.

तेलुगू भाषिक लोक तमिळनाडू, महाराष्ट्र, कर्नाटक, ओडिशा आणि इतर राज्यांत विखुरलेले आहेत. तिच्या दक्षिणेला तमिळ, पश्चिमेला कन्नड आणि मराठी, तर उत्तरेला मराठी, हिंदी आणि ओडिया या भाषा आढळतात. लिपीत सोळा स्वर आणि चौतीस व्यंजने आहेत. त्याशिवाय क्ष आणि ज्ञ यांना स्वतंत्र चिन्हे दिलेली आहेत. स्वरांमध्ये ऋ, ल आणि त्यांच्या दीर्घ रूपांचा वापर फारसा बोलचालीत नसून ते मुख्यत्वे संस्कृतजन्य शब्दांच्या लेखनापुरते मर्यादित असतात. क्र चा उच्चार 'रु' असा होतो.

मलयाळम् भाषा

मलयाळम् ही द्राविड भाषाकुलामधील एक महत्त्वाची व समृद्ध भाषा आहे. केरळ राज्याची अधिकृत भाषा आहे. द्राविड भाषेसमूहामध्ये तमिळ, कन्नड, तेलुगू आणि मलयाळम् या चार भाषांना प्राचीन साहित्य परंपरा लाभली आहे. मलयाळमच्याही प्राचीन लेखनाच्या परंपरेचा आधार मिळतो. मलयाळमचा तमिळ व कन्नडशी नैसर्गिक संबंध असल्यामुळे या तिन्ही भाषांमध्ये समानता दिसून येते. मलयाळम् आणि तमिळमध्ये सारखेपणा दिसतो. आजची मलयाळम् या भाषेला स्वतंत्र ओळख आहे. शिलालेखांच्या आधारे मलयाळमची परंपरा दहाव्या शतकापर्यंत मागे जाते. नवव्या दहाव्या शतकांपासून मलयाळम् तमिळपासून वेगळी होत साहित्यनिर्मिती करायला लागली. चौदाव्या शतकानंतर तिचे लेखन मलयाळम् लिपीत दिसू लागते.

संस्कृत भाषा

'संस्कृत' या शब्दाचा अर्थ शब्दांना केलेला संस्कार व व्याकरणशुद्ध भाषा. संस्कृत भाषेला २००५ मध्ये अभिजीत दर्जा मिळाला. संस्कृत ही इंडो-आर्यन भाषाकुलातील एक अत्यंत प्राचीन

भाषा मानली जाते. संस्कृतचे सर्वांत जुने रूप ऋग्वेदात मंत्रांमध्ये दिसते. हे मंत्र इ.स.पूर्व १५००-१२०० या काळात रचले गेले असे मानता. संस्कृतला तीन ऐतिहासिक रूपे आहेत. पहिले वेदसंहितांतील वैदिक संस्कृत; दुसरे उत्तरवैदिक गद्य, ब्राह्मण, उपनिषदे व वेदांगांतील रूप, ज्याचे वर्णन पाणिनीने केले; आणि तिसरे म्हणजे पाणिनीनंतर कालिदासांसारख्या कवींच्या साहित्यांत दिसणारे अभिजात, परिष्कृत रूप.

दोन भिन्न रूपे आढळतात. एक म्हणजे सूतसंस्कृत, जे रामायण आणि महाभारत यांसारख्या कथनपर ग्रंथांत दिसते. दुसरे रूप म्हणजे बौद्धसंस्कृत किंवा मिश्र संस्कृ, जे महावस्तुसारख्या ग्रंथांमध्ये दिसते. येथे प्राकृतमधील शब्द आणि संस्कृत रूपांचे मिश्रण स्पष्ट आढळते. यामुळे संस्कृत भाषा ही इतिहास, साहित्य, व्याकरण आणि तौलनिक भाषाशास्त्र या क्षेत्रांत प्रभावी भाषा दिसते.

कन्नड भाषा

कन्नड भाषा कर्नाटक राज्याची प्रमुख भाषा आहे. कन्नड ही द्राविड भाषाकुलातील एक महत्त्वाची भाषा आहे. कन्नड भाषेचा संपर्क तेलुगू, मराठी, कोकणी, मलयाळम्, आणि तमिळ भाषा प्रदेशासीआहे. कन्नड भाषक कर्नाटकात राहतात. काही कन्नड भाषिक लोक तमिळनाडू, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, केरळ, गुजरात आणि इतर राज्यांतही दिसतात. कन्नड चा लिखित पुरावा हा शिलालेख सुमारे इ.स. ४५० च्या आसपासचा आहे. कन्नड ही लिखित पुरावा असलेली सर्वांत जुनी द्राविड भाषा मानली जाते. तिचे सुरुवातीचे आणि त्यामध्ये संस्कृतसोवत प्रगल्भ कन्नडही वापरलेली दिसते. कन्नडमध्ये साहित्य निर्मिती नवव्या शतकापासून सुरु झाली. कविराजमार्ग हा या भाषेतील सर्वांत जुना ग्रंथ मानला जातो. तो साहित्यशास्त्रावरचा असून त्यात कवींचाही उल्लेख आहे. 'कन्नड' या शब्दाची उत्पती 'करि' (काळा) आणि 'नाडु' (प्रदेश) यावरून तिची निर्मिती झाली असावी.

कन्नडमध्ये द्राविडी भाषांचे मुख्य गुणधर्म दिसतात. शब्दरचना प्रामुख्याने प्रत्ययांवर आधारित आहे; ध्वनी स्पष्ट असल्याने शब्दांचे घटक ओळखणे सोपे होते आणि व्याकरणाची शिस्तही जाणवते. क्रियापद व नाम यांचा उगम समान असल्याचे तिच्या रचनेतून दिसते. वाक्यरचनेत सर्वनामांचा नामांप्रमाणे प्रत्ययात्मक उपयोग होताना आढळतो. कन्नडच्या बोलींमध्ये विजापुरी, होलिया, उरळी, कुरुव, लिंगायती, मंगलोरी, म्हैसूर, कोराचा, नागरी-कन्नड, वाणी इ. समावेश होतो. कन्नड व तेलुगू लिपीमध्ये काही प्रमाणात साम्य असल्याचे दिसते.

मराठी भाषा

मराठी भाषा ही भारतीय आर्यभाषांपैकी एक प्रमुख भाषा आहे. ती महाराष्ट्र राज्यात प्रामुख्याने बोलली जाते. महाराष्ट्राच्या उत्तरेस गुजराती, राजस्थानी, भिल्ली व हिंदी, पूर्वेला हिंदी व तेलुगू, दक्षिणेला कन्नड व कोकणी आणि पश्चिमेला अरबी समुद्र असल्यामुळे मराठीला भौगोलिक विविधतेचा व्यापक परिसर लाभलेला आहे. मराठी भाषिक महाराष्ट्राच्या बाहेर मध्य प्रदेश, कर्नाटक, आंध्र, गुजरात, तमिळनाडू, दादरा नगर हवेली, गोवा, दिल्ली या ठिकाणी वास्तव्यास आहेत. मॉरिशसमध्ये मराठी लोक अधिक राहताना दिसतात. प्रामुख्याने तेथे मराठी बोलली जाते. मराठी ही इंडो-यूरोपियन परिवारातील भारतीय आर्य शाखेतील सर्वांत दक्षिणेकडील भाषा आहे. भौगोलिक स्थितीमुळे मराठीवर आर्येतर प्रभावही पडला. आधुनिक काळात मराठी भाषेवर इंग्रजीचा प्रभाव जाणवतो. इंग्रजीतील ('अँ', 'ऑ') यांच्यासह वाक्यरचनाही मराठीमध्ये सहज मिसळलेली दिसते. मराठीच्या पोटभाषां बोलीभाषा म्हणून कोकणी, देशी, खानदेशी व वऱ्हाडी यांना ओळखले जाते. मराठी भाषेच्या भौगोलिक क्षेत्रानसार ६० पैक्षा अधिक बोली आपल्याला आढळतात. मराठी भाषेत बोलीभाषेतील लेखन अधिक झाल्यामुळे बोलीभाषाही अभिजात ठरते. या साहित्य लेखनावरच प्रमाणभाषा उभी असते. मराठी भाषेचा इतिहास साधारण इ.स. ६०० च्यानंतर आपणास स्पष्टपणे पुढे येताना दिसतो. श्रवणबेळगोळ, मानसोल्लास, परळ व पाटण येथील शिलालेखांतील वाक्ये ही प्राचीन मराठीची पुरावे आहेत. मराठी भाषेच्या विकासाचा अभ्यास करण्यासाठी प्राचीन, मध्य आणि अर्वाचीन असे तीन कालखंड मानले जातात.

ओडिया भाषा

उडिसा राज्यातील लोकांची मातृभाषा ओडिया आहे. या भाषेला या भाषेला १०१४ मध्ये अभिजात भाषेचा दर्जा दिला गेला. ओडिया भाषेतील सर्वात प्राचीन शिलालेख इ.स. १०५१ चा उरजंग येथे आहे. या भाषेचा विशेषतः 'उग्री' लिपीचा उल्लेख बौद्ध ग्रंथांमध्ये तसेच प्राकृत व्याकरणग्रंथांमध्येही दिसतो. ओडिशा व आंध्र प्रदेशात आढळलेल्या जुन्या संस्कृत कोरीव लेखांमध्ये ओडियाचा प्रभाव दिसतो. इ.स. १००० च्या सुमारास बौद्ध साधूच्या चर्यागीतांत या भाषेचा साहित्यिक उपयोग दिसतो. सूर्यवंशीय राजांच्या काळात (१४३५-१५३३) ओडिया साहित्याचा खरा विकास सुरु झाला.

या भाषेचा मैथिली व विहारी या भाषांशी जवळचा संबंध आहे. ओडिया लिपी ब्राह्मीवरून उद्भवलेली असून तिला 'कलिंग लिपी' असेही म्हणतात. ताडपत्रांवरील जुने ग्रंथ 'करणी' लिपीत लिहिलेले दिसतात. लेखन व उच्चार यांत फरक नसल्यामुळे ही भाषा शिकण्यास सोपी वाटते.

प्राकृत भाषा

प्राकृत भाषा हा भारतीय आर्यभाषांच्या प्रवाहातील मध्यावस्थेचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. वैदिक संस्कृतपासून इंडो-आर्यन भाषाकुलातील आधुनिक भारतीय आर्यभाषांपर्यंतचा साडेतीन हजार वर्षांचा भाषिक प्रवास अनेक टप्प्यांतून गेल्याचे दिसते. आर्य भाषिकांचे मूळ केंद्र भारताच्या वायव्य भागात होते; पण त्यांचे सांस्कृतिक व राजकीय वर्चस्व वाढत गेले तसे ही भाषिक परंपरा पूर्वेकडे आसामपर्यंत आणि दक्षिणेकडे केरळपर्यंत पसरली.

प्राकृत भाषा ही भारतीय आर्यभाषांच्या विकासातील मध्यावस्थेचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. वैदिक संस्कृतपासून आधुनिक भारतीय आर्यभाषांपर्यंतचा सुमारे साडेतीन हजार वर्षांचा भाषिक प्रवास तीन कालखंड मानले जातात. प्राचीन भारतीय आर्य (ख्रि. पू. १५००-६००), मध्य भारतीय आर्य म्हणजेच प्राकृत (ख्रि.पू. ६००-इ.स. १०००) आणि नव भारतीय आर्य (इ.स. १००० नंतर). प्राकृत म्हणजे या मध्यावस्थेतील भाषिक रूपे, जी संस्कृतोत्तर आधुनिक भारतीय भाषांपूर्वीची आहेत.

प्राकृतांचे प्रकार त्यांच्या उपयोगानुसार विभागले जातात. धर्मग्रंथांमध्ये पाली, अर्धमागधी, जैन माहाराष्ट्री, जैन शौरसेनी आणि अपभ्रंश यांचा उपयोग होतो. साहित्यिक ग्रंथांमध्ये माहाराष्ट्री, शौरसेनी, मागधी आणि पैशाची या आढळतात. नाटकांमध्ये शौरसेनी, माहाराष्ट्री, मागधी आणि इतर बोलींचा वापर केला जातो. प्राकृतांची ओळख संस्कृतमधील ध्वनीबदलांवरून ठरते. अशोकाची भाषा पाली हा पहिला टप्पा, शौरसेनी दुसरा, महाराष्ट्री तिसरा आणि अपभ्रंश हा शेवटचा टप्पा मानला जातो. पूर्व व पश्चिम प्राकृतांमध्येही ध्वनी वैशिष्ट्यांवरून वेगळेपण दिसतो. त्यामुळे नाट्यशास्त्रातील प्राकृतांचा उपयोग हा मुख्यतः साहित्यिक संकेत मानला जातो.

पाली भाषा

पाली भाषा ही इंडो-आर्यन भाषाकुलातील एक महत्त्वाची प्राकृत भाषा असून जातक, धम्मपद आणि दीघनिकाय यांसारख्या बौद्ध धर्मग्रंथांची भाषा म्हणून प्रसिद्ध आहे. 'पाली' या शब्दाचा मूळ अर्थ ओळ किंवा पंक्ती असा असला तरी पुढे तो धर्मग्रंथांतील वचन या अर्थाने रूढ झाला. पाली भाषा ही मागधी भाषा असल्याचा समज होता; मात्र भाषाशास्त्रीयदृष्ट्या ती मागधीपेक्षा वेगळी असल्याचे दिसते. कारण ध्वनी व रूपरचनेत अनेक फरक आढळतात. अशोकाच्या शिलालेखांवरून पालीचे नाते पूर्वेकडील नव्हे तर पश्चिमेकडील प्राकृतांशी अधिक जुळते, त्यामुळे ती बुद्धांच्या काळातील नव्हे तर नंतरची विकसित अवस्था मानली जाते. संस्कृतच्या तुलनेत पालीत स्वर व व्यंजनांमध्ये काही बदल दिसतात. पाली ही संस्कृतोत्तर प्राकृत अवस्था असून बौद्ध परंपरेत विकसित झालेली स्वतंत्र, सोपी व प्रभावी भाषा आहे.

बंगाली भाषा

बंगाली भाषा ही इंडो-आर्यन भाषाकुलातील भाषा आहे. या भाषेला २०२४ मध्ये अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. बंगाली भाषा पश्चिम बंगाल, बांगलादेश, बिहार व आसामच्या सीमाभागांत बोलली जाते. इंडो-आर्यन भाषासमूहात बंगालीचा समावेश होतो.

बंगाली भाषेच्या विकासाचे तीन टप्पे आहेत . इ.स. १००० ते १३०० या काळातील प्राचीन बंगालीचा पुरावा नेपाळमध्ये मिळालेल्या 'चर्यापद' या गूढ गीतरूपातील हस्तलिखितांमध्ये सापडतो. इ.स. १३०० ते १७५० या काळात मध्यकालीन बंगालीची निर्मिती झाली. पंधराव्या शतकापासून अनेक काव्यपरंपरा दिसतात. बंगाली भाषेच्या साहित्याला 'साधुभाषा' या नावाने ओळखली जात होती.

भक्ती चळवळीचा विकास आणि चैतन्याने केलेल्या रचना यांमुळे बंगाली वाङ्मयाच्या वाढीला चेतना मिळाली. मंगल काव्य म्हणजे कथा काव्यप्रकारही या काळात लोकप्रिय बनला. विल्यम कॅरी यांनी बंगालीचे व्याकरण लिहून इंग्लीश बंगाली असा शब्दकोश निर्माण केला.

असमिया भाषा

असमिया भाषा ही आधुनिक भारतीय भाषांपैकी एक आहे. ती आसाम राज्यातील ब्रह्मपुत्रा खोऱ्यात बोलली जाते. ही इंडो-आर्यन भाषाकुलातील भाषा आहे. मागधी अपभ्रंशापासून ओडिया असमियाचा विकास झाला. असमियाच्या दोन पोटभाषा दिसतात पूर्व असमिया आणि पश्चिम असमिया. पूर्व असमिया पोटभाषा सदिया ते गौहाती या भौगोलिक पट्ट्यात बोलली जाते. कामरूप व गोआलपाडा भागांत पश्चिम असमिया पोटभाषा आढळते. गोआलपाड्यातील भाषेवर कुचबिहार भागातील बोलींचा प्रभाव दिसत असला तरी या विभागातील बोलींमध्ये आंतरिक एकसंधता मोठ्या प्रमाणात जाणवते. बंगाली वाङ्मयाप्रमाणेच आसामी वाङ्मयाच्या विकासाला भक्ती चळवळीमुळे गती मिळाली. असाममध्ये शंकरदेव यांनी वैष्णव पंथ रूजवला. त्यामुळे असामी काव्याच्या विकासाला मदत झाली. पुराणांचेही आसामीमध्ये भाषांतर झाले. यानंतर वैष्णव साहित्याचा प्रभाव असमियात लक्षणीय जाणवतो. काव्य, नाटके, संतचरित्रे, तसेच धार्मिक गद्याभिवचने या काळात विपुल प्रमाणात लिहिली गेली.अगदी सुरूवातीचे आसामी लेखन दरबारी तिहास लेखन होते. शंकरदेवांनी अनेक भक्तीपर कविता लिहिल्या. असमियाचा विकास मागधी अपभ्रंशाच्या 'कामरूप' शाखेतून झाला. आससामिया भाषेचा इतिहास प्राचीन, मधली आणि आधुनिक या टप्प्यांमध्ये विभागता येतो. नवव्या ते बाराव्या शतकांत सहजयान बौद्धांनी रचलेल्या चर्यापदा ही पद्ये उपलब्ध आहेत. असमिया-बंगाली-ओडिया यांच्या अतिप्राचीन भाषिक वैशिष्ट्यांचा मागोवा या लेखनातीन दिसतो.

३.५ मराठी भाषेची जडणघडण

मराठी भाषेची जडणघडण ही हजारो वर्षांच्या ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक प्रक्रियेचा परिणाम आहे. मराठी भाषा ही इंडो-आर्यन भाषाकुलातील एक महत्त्वाची भाषा असून तिची मुळे थेट संस्कृत भाषेत आढळतात. वैदिक व अभिजात संस्कृत ही भारतातील अनेक आधुनिक भाषांची जननी मानली जाते. कालांतराने संस्कृतच्या लोकप्रचलित रूपातून विविध प्राकृत भाषा निर्माण झाल्या. महाराष्ट्र प्रदेशात प्रामुख्याने महाराष्ट्री प्राकृत बोलली जात होती. हीच प्राकृत मराठी भाषेची थेट पूर्वज मानली जाते. पुढील टप्प्यात महाराष्ट्री प्राकृतचे रूपांतर अपभ्रंश या अवस्थेत झाले. अपभ्रंश ही भाषा संस्कृतपेक्षा सोपी, लोकसुलभ आणि व्यवहारात अधिक वापरली जाणारी होती. इ.स. सुमारे दहावे ते बारावे शतक या कालखंडात अपभ्रंशातून मराठी भाषेचे स्वतंत्र रूप आकारास आले. प्रारंभी मराठी ही बोलीभाषा स्वरूपात होती; परंतु हळूहळू तिला साहित्यिक प्रतिष्ठा प्राप्त झाली.

मराठीच्या जडणघडणीत भौगोलिक परिस्थिती आणि लोकजीवनाचा मोठा प्रभाव दिसून येतो. सह्याद्री पर्वतरांगांमुळे महाराष्ट्र प्रदेश तुलनेने स्वतंत्र राहिला आणि येथील भाषा स्वतःची वैशिष्ट्ये विकसित करू शकली. ग्रामीण जीवन, लोकपरंपरा, लोककला, सण-उत्सव, संतपरंपरा यांचा मराठी भाषेवर खोलवर परिणाम झाला. यादवकालात (इ.स. १२वे ते १४वे शतक) मराठी भाषेला राजाश्रय मिळू लागला. याच काळात मराठीतील आद्य ग्रंथरचना झाली. मुकुंदराजांचे 'विवेकसिंधू', ज्ञानेश्वरांचे 'ज्ञानेश्वरी', तसेच नामदेव, एकनाथ, तुकाराम यांच्या संतवाङ्मयामुळे मराठी भाषा लोकाभिमुख आणि भावसमृद्ध बनली. संतांनी मराठीचा वापर धर्म, तत्त्वज्ञान आणि समाजप्रबोधनासाठी केल्यामुळे ती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचली.

मध्ययुगीन काळात मराठीवर फारसी व अरबी भाषांचा प्रभाव पडला. प्रशासन, न्यायव्यवस्था आणि व्यवहारात या भाषांतील अनेक शब्द मराठीत रूढ झाले. पुढे पोर्तुगीज आणि इंग्रजी सत्तेमुळे नव्या संकल्पना व शब्द मराठीत आले. ब्रिटिश काळात मुद्रणकलेचा प्रसार, शिक्षणव्यवस्था आणि आधुनिक गद्यलेखन यांमुळे मराठी भाषा अधिक विकसित झाली. अशा प्रकारे संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश या टप्प्यांतून विकसित झालेली मराठी भाषा आज समृद्ध साहित्यपरंपरा, स्वतंत्र व्याकरण आणि व्यापक वापर असलेली समर्थ भाषा म्हणून ओळखली जाते. तिची जडणघडण ही महाराष्ट्राच्या इतिहासाची, संस्कृतीची आणि लोकजीवनाची साक्ष देणारी आहे.

३.५.१ मराठी भाषेची उत्पत्ती - विविध मतप्रवाह

मराठी भाषेच्या उत्पत्ती संदर्भातील मतप्रवाहाचा विचार कृ.पा. कुलकर्णी यांनी पढील प्रमाणे मांडलेला आहे. "भाषेची उत्पत्ती समजून घेताना ती भाषा बोलणारे लोक आणि ती ज्या प्रदेशात वापरली जाते त्या प्रदेशाचा विचार करणे आवश्यक असते. त्यामुळे मराठी भाषेचा विचार करताना मराठा समाज आणि महाराष्ट्र या दोहोंचा संदर्भ घ्यावा लागतो. या प्रकरणात प्रथम मराठी भाषेच्या उत्पत्तीचा अभ्यास करण्यात येईल आणि त्यानंतर महाराष्ट्रातील वसाहतींचा विकास तसेच मराठा समाजाची जडणघडण यांचा विचार केला जाईल. आर्य भाषांचा प्रवाह एखाद्या पवित्र नदीप्रमाणे प्राचीन काळापासून अखंडपणे वाहत आला आहे. या दीर्घ प्रवासात त्या भाषेत अनेक बदल झाले, विविध टप्प्यांत तिचे रूपांतर झाले. अनेक लोकांनी श्रद्धा आणि निष्ठेने या भाषेच्या आधारे आपले जीवन समृद्ध केले. या भाषेच्या शाखा-उपशाखांनी दूरदूरच्या प्रदेशांना संस्कारित केले. अनेक भक्तांनी या भाषेची सेवा करून लौकिक आणि पारलौकिक सुख प्राप्त केले व तिचा गौरव वाढविला. भाषेची स्थिती ग्रीक पुराणकथांतील फिनिक्स पक्ष्यासारखी आहे. जसा फिनिक्स पक्षी स्वतःच्या मृत्यूनंतर नव्या रूपात पुन्हा जन्म घेतो, तसेच एक भाषा कालांतराने लुप्त होत जाते आणि त्यातूनच नवी भाषा जन्माला येते.

काही विद्वान असा सिद्धांत मांडतात की जेव्हा एखादी भाषा बोली अवस्थेतून साहित्यिक स्वरूपात जाते, तेव्हा ती मूळ स्वरूपात नष्ट होते आणि तिच्यापासून नवीन भाषा निर्माण होते. या सिद्धांताला आधार देण्यासाठी आर्य भाषांचा इतिहास दिला जातो. वैदिक संस्कृतपासून जेव्हा साहित्यिक संस्कृत भाषा विकसित झाली, तेव्हा प्राकृत भाषा बोली रूपात उदयास आल्या आणि लोकांच्या दैनंदिन व्यवहारात प्रचलित झाल्या. पुढे प्राकृत भाषाही जेव्हा साहित्यिक चौकटीत बसल्या, तेव्हा त्यांच्या जागी अपभ्रंश भाषेने बोली स्वरूपात वर्चस्व मिळवले. नंतर कालांतराने अपभ्रंश भाषेचेही साहित्यिक रूप निश्चित झाले आणि त्याच वेळी सिंधी, हिंदी, गुजराती व मराठी या भाषांनी बोली स्वरूपात आपापल्या प्रदेशांत स्थान मिळवले. अशी या सिद्धांताची मांडणी आहे. परंतु या विचारसरणीत स्पष्ट दोष आहे. जर एखाद्या भाषेच्या उदयाचे कारण तिच्या पूर्वीच्या भाषेचे साहित्यिक रूप असेल, तर आज हिंदी, गुजराती, बंगाली व मराठी या भाषांना उत्तम साहित्यिक स्वरूप प्राप्त झालेले असल्यामुळे त्या नष्ट होऊन त्यांच्यापासून नव्या भाषा निर्माण व्हायला हव्या. प्रत्यक्षात मात्र तसे घडत नाही. मराठी भाषा तर जन्मानंतर लवकरच साहित्यिक झाली, हे विवेकसिंधु, मानभावी वाङ्मय आणि ज्ञानेश्वरी या ग्रंथांवरून स्पष्ट होते. तरीही मराठी भाषा नष्ट न होता सतत विकसित होत आहे.

कोणतीही भाषा साहित्यिक होणे हे तिच्या ऱ्हासाचे नव्हे, तर तिच्या प्रगतीचे लक्षण आहे. साहित्यिक भाषेचे स्थिर आणि प्रमाणबद्ध स्वरूपच तिच्यापासून नव्या भाषेचा जन्म होण्यास अडथळा ठरते. बोली भाषा सतत बदलणारी असते, तर साहित्यिक भाषा तुलनेने स्थिर असते. त्यामुळे नव्या भाषेचा उगम बोली भाषेतून होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे भाषेच्या उद्भवाचे खरे कारण तिचे साहित्यिक स्वरूप नसून समाजातील मोठे बदल असतात. समाजाला जबर धक्का बसल्याशिवाय भाषा बदलत नाही. लोकक्रांती, राज्यक्रांती, धर्मक्रांती यांसारख्या मोठ्या घडामोडींमुळेच भाषेत परिवर्तन घडून येते. आर्य भाषेच्या इतिहासात ज्या-ज्या काळात भाषेचे स्वरूप बदलले, त्या-त्या काळात अशा सामाजिक क्रांती झाल्याचे इतिहासावरून दिसून येते. मराठी भाषेच्या उत्पत्तीच्या संदर्भात अशा क्रांतींचा उल्लेख करण्यापूर्वी तिची उत्पत्ती नेमकी कशी झाली, हे समजून घेणे आवश्यक आहे.

प्रकरणांत अनुक्रमाने पूर्ववैदिक, वैदिक, संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश इत्यादी आर्यभाषांची निरनिराळी अवस्थांतरे व त्यांची रूपे विशद केली. मराठीच्या ह्या पूर्वस्वरूपाचे स्पष्टीकरण करताना एक दृष्टी समोर होती आणि ती म्हणजे भाषेच्या अंतरंगासंबंधी होय. भाषेची जी बाह्य आणि आंतर अशी दोन अंगे असतात, त्यांपैकी भाषेचे स्वरूप विशद करताना तिच्या बाह्य अंगाच्या विचाराबरोबर अंतरंगाचाही विचार करावा लागतो. बाह्य स्वरूपांत केवळ शब्दांचाच संबंध येत असल्यामुळे त्यांचा विचार बाजूस ठेवून वर्णप्रक्रिया, प्रत्ययप्रक्रिया, प्रयोगप्रक्रिया इत्यादी आंतर गाभ्यातील बाबींचे जे स्पष्टीकरण केले आहे, त्यावरून त्या-त्या भाषेचे यथार्थ स्वरूप दिसेल; एवढेच नव्हे तर मराठी भाषेचा उद्गम ठरविण्यासही ते उपकारक होईल. पूर्ववैदिक, वैदिक, संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश इत्यादी भाषांच्या स्वरूपांवरून जर सहज नजर फिरविली, तर त्या प्रत्येकीच्या स्वरूपातील बरीच चिन्हे मराठीत आल्याचे दिसून येईल व अशा रीतीने पूर्वीच्या निरनिराळ्या भाषांची बरीच साम्ये मराठीत आढळून येतात, म्हणूनच मराठीच्या उद्गमासंबंधी विद्वानांमध्ये मतभेद झालेला दिसतो. मराठी भाषा पूर्ववैदिक भाषेपासून निघाली, असे एक म्हणतो, तर कोणी माहाराष्ट्रटीस तिच्या मातृस्थानी बसवितो. कोणी तिसरा माहाराष्ट्रीस बाजूस सारून अर्धमागधीस तो मान देतो. आणखी कोणी तर हे सर्व पक्ष बाजूस सारून अपभ्रंश भाषेपासून मराठी निघाली हा सिद्धान्त प्रस्थापित करण्यास पाहतो. मराठीच्या उद्गमासंबंधी अशा प्रकारचे मतवैचित्र्य आहे. ह्याचे कारण हे जे पूर्वभाषांतील अवशेष मराठीत उमटलेले दिसतात ते होय. पूर्वीच्या प्रकरणांत विवेचिलेल्या पूर्वभाषांचा आणि मराठीचा संबंध आहे; परंतु तो कुळाचा आहे, नात्याचा आहे. आपणास हाच संबंध सांगून भागणार नाही. मराठीची उत्पत्ती सांगावयाची म्हणजे ती अमक्या कुळात झाली, अमकी अमकी तिची आजी, पणजी वगैरे परात्पर नाते सांगणे पुरे पडणार नाही. ती

प्रत्यक्ष कोणत्या भाषेपासून जन्माला आली, तिची प्रत्यक्ष जननी-जन्म देणारी कोण ह्याचाच तपास लाविला पाहिजे.

मराठी भाषेच्या उत्पत्तीचा निर्णय करताना आपणास मराठीचा सांगाडा तपासला पाहिजे. तिच्या शब्दसंभाराकडे म्हणजे बाह्य स्वरूपाकडे लक्ष न देता तिचे आंतर स्वरूप-वर्ण, प्रत्यय व प्रयोग ह्या तिन्हींची प्रक्रिया तपासून ह्या तिन्ही बाबींत कोणत्या भाषेचा ठसा जास्त दिसतो, हे पाहिले पाहिजे. हे पाहिल्यावर कोणत्याही एका पूर्वभाषेचा जशाच्या तसा हुबेहूब सांगाडा मराठी भाषेने घेतला, असे आपणास म्हणता येत नाही. मराठीतील वर्णोच्चार, नामविभक्ती, आख्यातविभक्ती, सर्वनामे, संख्याविशेषणे, शब्दयोगी व इतर अव्यये, लहानलहान निपात, विकारंदर्शक अव्यये व वाक्यरचनेचे जे निरनिराळे प्रकार आहेत, ते तपासले म्हणजे निरनिराळ्या प्राकृत भाषांचे अवशेष मराठीत उतरल्याचे दिसून येतील. त्यावरून एका कोणत्यातरी विशिष्ट भाषेपासून- उदाहरणार्थ, पाली, माहाराष्ट्री, मागधी, अर्धमागधी किंवा अपभ्रंश ह्यांपैकी एकीपासून मराठी भाषा निघाली, असे आपणास निश्चित रीतीने सांगता येत नाही. मराठीच्या उत्पत्तीसंबंधी जे निरनिराळे सिद्धान्त आजपर्यंत मांडले गेले आहेत, त्यांचा विचार प्रथम करणे जरूर आहे.

- "वेदसमकालीन ज्या बोली होत्या, त्यांपासून मराठी उद्भवली, व ह्याला आधार म्हणजे वेदांत संस्कृत भाषेच्या स्वभावाशी विसंगत व प्राकृत भाषांच्या स्वभावाशी जुळणारे जे विशेष सापडतात, ते होते. परंतु असल्या ह्या तुटपुंज्या पुराव्यावर मराठी भाषा त्या भाषांपासून प्रत्यक्ष उद्भवली, असे म्हणता येणार नाही. त्या भाषांचे काही त्रोटक अवशेष मराठीत उत्तरले, एवढेच फार झाले तर म्हणता येईल. शिवाय भाषेस शिष्ट व अशिष्ट किंवा नागर व ग्रामिक किंवा ग्रांथिक व बोली अशी दोन स्वरूपे असतात. त्यांपैकी वेदकालीन भाषेतही दोन स्वरूपे होती हे उघड आहे. व परिणतीच्या दृष्टीने तत्कालीन बोलीतील काही अवशेषांचे लोण मराठीपर्यंत येऊन भिडणे शक्य आहे. परंतु त्यावरून मराठीस साक्षात् जन्म देणारी ती कशी ठरेल? वेदकालापासून तो थेट खिस्तोत्तर ५००-७०० पर्यंत म्हणजे वर्तमानकालीन भाषांच्या उदयापर्यंतच्या काळात वेदसमकालीन प्राकृत भाषा वापरात नव्हत्या, अशी साक्ष इतिहास देत आहे. तेव्हा मराठीच्या जननीचा शोध आपणास इतरत्रच केला पाहिजे."[१२]
- "दुसरा एक पक्ष मराठीची जननी संस्कृत भाषा आहे, असे मानतो. वर दिलेला पक्ष ज्या कारणाने लंगडा दिसतो, तेच कारण ह्या संस्कृतपक्षासही लागू पडते. केवळ वरवर जरी पाहिले, तरी संस्कृत ही मराठीची साक्षात जननी ठरत नाही. वर्णाचे बदल, प्रयोगांची

भिन्नता, उच्चारात फरक, वाक्प्रचार वगैरे बाबतींत दोन्हींत परस्पर नाते आहेच. ह्या दोन्हींमध्ये अंतर्वर्ती पुष्कळ अवस्था प्राकृत भाषा म्हणून आहेत. भाषेच्या एकंदर परिणतीच्या किंवा वाढीच्या दृष्टीने अशा अवस्था उत्पन्न होणे अपरिहार्य आहे. तेव्हा मराठीच्या लगत पूर्वी साक्षात जननी म्हणून संस्कृत भाषेस बसवणे म्हणजे अनैतिहासिक व अशास्त्रीय आहे."[१३]

- "तिसरा एक पक्ष मराठीची उत्पत्ती बालभाषेपासून लावतो. परंतु भाषाशास्त्राच्या व एकंदर भाषिक संशोधनाच्या काळात असले ठोकळ मत मान्य व्हावयाचे नाही. बालभाषा म्हणजे प्राकृतभाषा असे समजले, तरी प्राकृत भाषेपासून मराठी उत्पन्न झाली, ह्या नुसत्या म्हणण्यात काहीच अर्थ नाही. असल्या मोघम विधानाने समाधान व्हावयाचे नाही. प्राकृतपैकी कोणती प्राकृत हे निश्चित सांगून त्यांची कारणे किंवा त्याच्यासाठी पुरावा दिला पाहिजे."[१४]

- "प्राकृत भाषांच्या क्षेत्रात आपण आलो म्हणजेही मराठीच्या उत्पत्तीसंबंधी आणखी काही मते पुढे येतात. पाली, मागधी, अर्धमागधी, माहाराष्ट्री, अपभ्रंश इत्यादी भाषांप्रमाणे निरनिराळे पक्ष आहेत व त्याप्रमाणे त्यांना पुरावाही सापडतो व तो ते आपापल्या मताच्या समर्थनार्थ पुढे आणतात. संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश यांपैकी कोणत्या भाषेचे कोणते अवशेष मराठीत सापडतात, हे पुढील परिच्छेदात दिलेच आहे. त्याकडे जर नजर फिरवली तर कोणत्याही एका प्राकृतापासून मराठी उद्भवली असे आपणास म्हणता येत नाही. प्राकृतोद्भव व प्राकृतिकोद्भव म्हणून ज्या काही आधुनिक, वर्तमानकालीन बोली आहेत त्यांपैकी सिंधी, गुजराती, हिंदी किंवा बंगाली आहे. शौरसेनीपासून हिंदी, अपभ्रंशापासून सिंधी व गुजराती, मागधीपासून बंगाली अशा ह्या नवभाषांचा उद्भव मध्ययुगीन प्राकृतांपासून झाला, असे म्हणता येण्यासारखे आहे. अमक्या एका भाषेपासून दुसरी भाषा निघाली, असे म्हणताना जी भाषा उत्पन्न झाली तिने मूळ भाषेच्या व्याकरणाचा सर्वच्या सर्व सांगाडा उचलला, असे दाखविण्याची जबाबदारी म्हणणाऱ्यांवर येऊन पडते. बंगालीने मागधीचे सर्व व्याकरणयंत्र उचलले आहे. त्याचप्रमाणे शौरसेनीचे व्याकरणयंत्र हिंदीने उचलले आहे. तोच प्रकार सिंधी भाषेने सर्व सांगाडा माहाराष्ट्रीपासून किंवा अपभ्रंशापासून तंतोतंत घेतला, असे दाखविता येत नाही. अर्धनारीनटेश्वराच्या देहयष्टीमध्ये ज्याप्रमाणे अर्धा भाग पुरुषाचा व अर्धा भाग स्त्रीचा असा अनन्यसाधारण देखावा दिसतो व त्यावरच सृष्टीतील सर्व रमणीय अशा पसाऱ्याची उभारणी केलेली दिसते, तद्वत, मराठी भाषादेवीच्या

देहयष्टीमध्ये अर्धा भाग माहाराष्ट्रीमय व अर्धा अपभ्रंशमय असा अनन्यभाषासाधारण देखावा दिसतो व त्यावरच ह्या भाषादेवीने आपल्या सृष्टिकर्माचा पसारा थाटला आहे. भाषेच्या पंचप्राणांपैकी निम्मा भाग नामविभक्तीचा तर निम्मा भाग आख्यातविभक्तीचा. तेव्हा मराठीचा ह्या पंचप्राणांपैकी निम्मा भाग जो नामविभक्तीचा- नामाचे प्रत्यय वगैरे - तो अपभ्रंश भाषेपासून तिला प्राप्त झालेला दिसतो व राहिलेला निम्मा भाग जो आख्यातविभक्तीचा-क्रियापदांचे प्रत्यय वगैरे तो माहाराष्ट्रीपासून घेतलेला दिसतो."[१५]

निरनिराळ्या प्राकृत भाषांमधून ज्या काही लकबी मराठीत उतरल्या आहेत व ज्यांच्यामुळे मराठीचे जननीत्व त्या-त्या भाषेकडे देण्याचा मोह उत्पन्न होतो, त्या क्रमाने पुढे दिल्या आहेत.

- प्राकृत भाषांची आद्य अवस्था जी पाली भाषा तिच्यामधील काही गोष्टी मराठीमध्ये आलेल्या आढळतात. काही शब्दांची वर्णप्रक्रियेमुळे झालेली रूपांतरे पालीमध्ये जी आढळतात तीच मराठीमध्ये आलेली आहेत. तिण (तृण), पाऊस (प्रावृष्), पिळणे (पीडन), छकडा (शकट), गूळ (गुड), अस्वल (ऋच्छभल्ल), रूख (वृक्ष) इत्यादी पाली भाषेच्या स्पष्ट छापाचे शब्द मराठीत रूढ आहेत. ह्या वर दिलेल्या शब्दांची रूपे तृण, पाऊस, पीडण, साटी, रीस, वच्छ अशी इतर प्राकृत भाषांत होतात. ही रूपे मराठीत फारशी रूढ नाहीत व जरी थोडी कोठे असली, तरी पालीमधीलही रूपे रूढ आहेत. शिवाय पालीतील रूपे इतर प्राकृत भाषांत आढळली, तरी त्या भाषांत ती पालीमधूनच आली. दुसरी गोष्ट पालीमधील 'ळ'कारासंबंधीची. पालीमध्ये 'ळ'कार ही एक विशिष्ट बाब आहे. 'ळ' हा वर्ण पाली-पैशाची खेरीज इतर प्राकृत भाषांमध्ये नाही. 'ळ' कार संस्कृतमध्ये नाही, वैदिक भाषेत आहे. तेथूनच तो पालीत उतरला असावा. 'ळ' कार हा मूर्धन्य वर्ण असल्यामुळे इतर मूर्धन्य वर्ण जसे द्राविडी भाषेच्या संपर्काने आर्यभाषेत शिरले तसा 'ळ' हा वर्णही त्यांच्याबरोबर द्राविडी भाषेतून शिरला असावा. हा तेलगू भाषेतून मराठीत आला' असे म्हणण्याऐवजी जुन्या द्राविडी भाषेतून जुन्या आर्यभाषेत व तेथून मराठीत उतरला, हे म्हणणे अधिक योग्य होईल. शिष्ट मराठी भाषेत ह्या 'ळ'काराच्या उच्चाराकडे बरीच प्रवृत्ती असलेली दिसून येते. दुर्मिळ, नळ, डाळिंब, ओंजळ, सावळा, सळई, सोमळ, आळे, फळे, काजळ, मिळणे, इत्यादी अनेक संस्कृतोद्भव शब्दांत 'ळ'कारच शिष्टमान्य आहे. जळ, मळीण, पडळ, जळधि, कमळ, सकळ, पाळण, प्रेमळ इत्यादी शब्दांत तो वैकल्पिक आहे. कित्येक शब्दांत 'ल' काराऐवजी 'ळ'कार घातल्यास अर्थ सर्वस्वी बदलतो, म्हणजे ते स्वतंत्र अर्थाचे निराळेच शब्द होतात. उदाहरणार्थ- चूल, चूळ बोल, बोळ; कळ, कल; गाल, गाळ; नील, नीळ, वेल, वेळ इत्यादी.

ह्या उदाहरणांवरून मराठीतील 'ळ'काराचे महत्त्व चिंतनीय आहे. जुन्या पेशवाईच्या काळात मराठी लिखाणात 'ल' हाच जास्त प्रचारात असलेला दिसतो. तो 'ळ' दाखविण्याकरिता 'ल'च्या मागे एक 'तू' कार जोडत असत. 'त्ल' हे प्रतीक 'ळ'बद्दल वापरीत असत.

- पैशाची भाषेतील जी लकब मराठी भाषेत राहिली ती 'ण' व 'न' ह्यांसंबंधी होय. पैशाचीशिवाय इतर प्राकृत भाषांत 'ण'कार आहे; परंतु 'न'कार नाही. उलट पैशाचीत 'न' कार आहे; पण 'ण' कार मुळीच नाही. 'गुणगणगणना' पैशाचीत 'गुनगनगननना' असे स्वरूप धारण करते. पैशाची भाषेत ही लकब शिष्ट मराठीतही बऱ्याच वेळा चमकते. उदाहरणार्थ- ऊन (उष्ण); तहान (तृष्णा); कान (कर्ण), रान (अरण्य), जानवे (यज्ञोपवीत), विनंती (विण्णतिआ), सुने (सुण्ण) इत्यादी पुष्कळ शब्दांत संस्कृतातील अगर प्राकृतातील 'ण' काराऐवजी 'न' कारच मराठीत शिष्टाभिमत आहे.
- मागधी ह्या प्राकृत भाषेनेही मराठीत आपल्या स्मृतींची काही चिन्हे ठेवून दिलेली आहेत. मागधी प्राकृतचा असा एक विशेष आहे की 'र' कार व 'स' कार या दोहोंबद्दल 'ल' कार व 'श' कार हे वर्ण अनुक्रमे येतात. तसेच संस्कृत 'स्थ' अगर 'र्थ' ह्या जोडवर्णाबद्दल मागधीत 'त्थ' होतो. तसेच 'ष्ट' ह्या वर्णाबद्दल मागधी 'स्ट' होतो. ह्या प्रकारांपैकी बरेच प्रकार ग्रामीण मराठीत तर रूढ आहेतच, परंतु बऱ्याच शिष्टांच्या तोंडीही आढळतात व क्वचित त्यांच्या लेखांतही चमकतात. उदाहरणार्थ- ओशाळणे (अपसर), मिसळ (मिश्र), घोळतो (घूर्णते), जोशी (जोइसी), केशर (केसर), पेलणे (प्रेरणम्). क्वचित ठिकाणी हा प्रकार विकल्पेकरून होतो. उदाहरणार्थ- बोरव, वोळव; भरभर, भळभळ; खर, खळ, सरभेसळ, सळभेसळ इत्यादी.
- १. अर्धमागधी प्राकृतचे बरेच विशेष मराठीमध्ये आढळून येतात. अर्धमागधी आणि माहाराष्ट्री ह्या दोन्ही भाषा पुष्कळ अंशाने सारख्या स्वरूपाच्या असल्यामुळे अर्धमागधीचे जे विशेष मराठीत आढळतात ते माहाराष्ट्रीच्या विशेषांशी जुळले तर नवल नाही. जो प्रांत मराठीने सध्या व्यापिला आहे. त्यामध्ये जैनधर्मीयांनी आपल्या धर्माच्या प्रचारासाठी पुष्कळ प्रयत्न केला. जैनधर्मीयांची धर्मभाषा अर्धमागधी असल्यामुळे १. दीर्घ स्वर हस्व करण्याची लकब जी अर्धमागधीमध्ये दिसून येते, ती मराठीने उचललेली आहे. उदाहरणार्थ- कुमर (कुमार).

- २. व्यंजनांच्या बाबतीत अर्धमागधीतील बरेच फरक मराठीने घेतले आहेत. 'त'चा लोप अर्धमागधीप्रमाणे मराठीतही होतो. भूतकालवाचक धातुसाधितांतील 'त'चा लोप मराठीत नेहमी होतो. 'खादिले' ह्या एकाच रूपात तो 'द' च्या स्वरूपात राहिला आहे.
- ३. मृदू व्यंजने कठोर करण्याचा जो अर्धमागधीचा स्वभाव तो कोकणी मराठीत कोठे कोठे दिसून येतो. उदाहरणार्थ- मच्चई < माद्यति, वच्चइ ८ व्रजति.
- ४. (वोचूं-कोंकणी मराठी). ४. व्यंजनात कधीकधी महाप्राण येतो.- घेणे < गृह.
- ५. आद्य 'द' चा 'ड' होण्याची क्रिया अर्धमागधी, माहाराष्ट्री आणि मराठी ह्या तिन्हींत सारखीच आहे. उदाहरणार्थ- डसतो, डसइ ८ दशति; डाह < डाहइ < दहति; डोळा, डोलते, डोला, डोलाइ दोलयति; डरणे < डरइ < दरह; डोहळा < डोहलअ < दोहलक.
- ६. आद्य न् आणि द्वित्त न्न् मराठीत न् आणि न्न् च राहतात. मध्य 'न्'चा 'ण्' होतो. ही प्रवृत्ती अर्धमागधी आणि जैन माहाराष्ट्रीमधून मराठीत आली आहे. उदा-पन्नास < पण्णासअ < पञ्चाशत्, फणस < पनश. प्रत्ययांच्या बाबतीत माहाराष्ट्रीचे जे विशेष मराठीत आलेले आढळतात ते अर्धमागधीचे जर मानिले, तर त्यात फारशी चूक होणार नाही.
- (५) माहाराष्ट्री भाषेचे बरेच ऋण मराठीने घेतले आहे. माहाराष्ट्री भाषा प्रत्यक्ष बोली असो वा नसो; ती महाराष्ट्राची भाषा असो वा नसो; ती प्रामुख्याने पुष्कळ शतके ग्रांथिक भाषा म्हणून मोठमोठ्या नामांकित ग्रंथकारांकडून आदरिली जात होती हे खास; तेव्हा अशा शिष्टाभिमत भाषेचा ठसा उत्तरकालीन बोलीवर उठणे साहजिक आहे. डॉ. तुळपुळे (या. का. म. अभ्यास, प्रस्तावना) म्हणतात की, माहाराष्ट्री अपभ्रंशापासून मराठी भाषा उत्पन्न झाली. माहाराष्ट्री म्हणजे मुख्य प्राकृत व तशा दृष्टीने तिची चिकित्सा मागे विस्ताराने केलेली आहे. ती येथे उपयोगी पडेल. मराठीत उतरलेल्या तिच्यातील फक्त मुख्य बाबीच येथे एकत्र नमूद करतो.
- १. अकरान्त नपुंसकलिंगी नामे जशी माहाराष्ट्रीत लिंग बदलत नाहीत तशी मराठीतही बदलत नाहीत.
- २. मराठीतील द्वितीयेचा 'स' प्रत्यय माहाराष्ट्रीतील षष्ठीचतुर्थीच्या 'स्स' प्रत्ययावरून आला आहे. उदाहरणार्थ- हत्तीस हत्तिस्स; आगीस अग्गिस्स < अग्रेः.
- ३. माहाराष्ट्रीतील आख्यातविभक्तीतील बरेच प्रकार मराठीत उतरले आहेत. लकारांपैकी लट् (= वर्तमान) मध्ये मराठीने अपभ्रंशाला सोडून माहाराष्ट्रीचेच जास्त काळ व अर्थ ह्यांचे

प्रत्यय मराठीने माहाराष्ट्रीपासून घेतलेले दिसतात. एकंदर आठ अनुकरण केले आहे. लिङ् (विध्यर्थ), लोट् (आज्ञार्थ), लङ् (अनद्यतनभूत) ह्यांमध्येही माहाराष्ट्रीचेच अनुकरण मराठीने केलेले आढळते. मराठीतील कर् ह्या धातूची (तृट्) भविष्यकाळाची रूपे माहाराष्ट्रीतील रूपांवरून कशी आली आहेत, हे पुढे दिलेल्या उदाहरणांवरून कळेल.

१. करिस्यामि > करिहिमी > करिइइं करील करीन.

२. करिस्सामो > करिहिमो > करिहिमु > करिइउ > करउ > करू + ल > करून > करूं.

३. करिस्सासि > करिहिसि > करिइसि करिसी ल = करिशील.

४. करिष्यथ > करिहित्था > करिइहा > कऱ्या करा ल कराल. करीत, मानीत, धरीत, घालीत, लिहीत वगैरे सेट् क्रियापदांची वर्तमान कृदन्ते 'इत्' आगम होऊन होतात. हा 'ईकार' माहाराष्ट्रीतून आला आहे.

५. इडागम घेण्याचा, न घेण्याचा किंवा विकल्पाने घेण्याचा गुण मराठीने माहाराष्ट्रीपासून घेतला आहे.

६. इच्छार्थक धातू मराठीत माहाराष्ट्रीद्वारा आले आहेत. उदाहरणार्थ- बुभुक्ष-बुभुक्त- बुभुक. चिकित्स- चिइच्छ चेच, ध्यास, प्यास, ईर, रेच इत्यादी.

७. 'मी' ह्या सर्वनामाच्या बाबतीत मराठीतील सर्व रूपे माहाराष्ट्रीतील रूपांशी जुळतात. अपभ्रंशातील प्रथमपुरुष सर्वनामाच्या रूपांशी जुळत नाहीत. एकवचनाची रूपे, उदाहरणार्थ - अहम्मि, अग्मि, म्मि मी. अम्मि, मि मी, मी, मी, मज. मए, मइ > मिया, मियाँ, म्याँ. मझत्तो, महाहिंतो > मजहुनि. मज्झ > मज. मइ, मि > मी. मज, मेज्च्चअ > माझ. अनेकवचनाची रूपे- उदाहरणार्थ अम्हे आम्ही. अह्मे आम्ही, आम्हाहिं > आम्ही, आह्मां. अह्मसुंतो > आह्माहुनी. अह्म> आह्मा. अम्हेसु > आह्मांत.

- 'तू' ह्या सर्वनामाची रूपे काही थोड्या बाबतीत माहाराष्ट्रीतील 'तुम्' च्या रूपाशी जुळत नाहीत.

८. मतुबर्थक 'ल' जो संस्कृतमध्ये आहे, तो माहाराष्ट्रीत व मराठीत स्वार्थक झाला आहे. म्हणजे त्या 'ल' ला काही विशेष अर्थ नाही.

९. माहाराष्ट्रीत क्त व क्तवतु प्रत्यय लागून झालेली धातुसाधित विशेषणे भूतकालाचे बरेच काम करीत. तोच कित्ता मराठीने गिरवला आहे. रीतिभूतकाळाच्या रूपांबरोबर वर्तमान व भूत ह्या दोन काळांची धातुसाधिते मराठीत भूतकाळ दाखविण्याकरिता योजतात.

१०. तारतम्याचा गुण मराठीने माहाराष्ट्रीपासून घेतला आहे.

* मराठीमध्ये काही विशेष असे आहेत की, ते माहाराष्ट्री व अपभ्रंश ह्या दोन्ही भाषांमध्ये आढळून येतात. ते पूर्वीच्या प्राकृत भाषांतून परंपरेने आले असावेत, हेच अनुमान करणे प्राप्त आहे. असे दोन्ही भाषांना साधारण असलेले विशेष पुढे दिले आहेत.

१. दन्त्यतालव्य व्यंजने संस्कृतात नाहीत. माहाराष्ट्रीत व अपभ्रंशात आहेत. ज् अथवा ज्य् याचा दन्त्यतालव्य 'ज्' करण्याकडे माहाराष्ट्रीची प्रवृत्ती आहे.

२. नामे व्यंजनान्त न ठेवता स्वरान्त करण्याची प्रवृत्ती माहाराष्ट्री व अपभ्रंश ह्या दोन्हींमध्ये आहे, तीच मराठीने उचलली.

३. संस्कृत एतद् व इद ह्या सर्वनामांपासून आ प्रत्यय माहाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांच्यामार्फत मराठीत आला आहे.

४. विशेष्याची जी विभक्ती तीच विशेषणाची ठेवण्याची जी प्रवृत्ती संस्कृत, माहाराष्ट्री, अपभ्रंश ह्यांमध्ये दिसून येते, तीच कधीकधी मराठीतही दिसते.

५. पौनःपुन्यावाचक धातू माहाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांपासूनच मराठीत आले आहेत. उदाहरणार्थ- ढंढल्ल > ढेंढळ; डुंडल > डंडल > ढंदुल > धुंडाळ; जग्ग > जाग; चकम्म > चकव.

६. मराठीतील काही शब्दांची लिंगे माहाराष्ट्री व अपभ्रंश भाषांतील लिंगांप्रमाणे आहेत. उदाहरणार्थ- पाऊस, जन्म, नयन वगैरे हे पुल्लिंगी व अंजली, गाठ वगैरे हे स्त्रीलिंगी आहेत.

(७) आता केवळ अपभ्रंशामधून मराठीत कोणकोणते विशेष आले आहेत, ते पाहू. अपभ्रंश ही आभीरांची भाषा होती व ही आभीरांची जात उत्तरेकडून सिंध प्रांतातून गुजरातेत, तेथून कोकणात व विदर्भाच्या काही भागांत येऊन तेथे स्थायी झाली. त्यामुळे अपभ्रंशाचे बरेच अवशेष मराठीत सापडणे शक्य आहे. **डॉ. गुणे (वि. ज्ञा. वि. १९२२)** व **प्रो. कोलते (विक्रमस्मृति ग्रंथ) हे** तर म्हणतात की, केवळ अपभ्रंशापासूनच मराठी निघाली.

नामाला लागणारे विभक्तीचे प्रत्यय मराठीने अपभ्रंशापासून घेतले आहेत. सर्व विभक्तिप्रत्यय अपभ्रंशोत्पन्न आहेत.

१. अकारान्त पुल्लिंगी नामाचे प्रथमेचे एकवचन 'उकारान्त' होते. शब्दातील उपान्त्य वर्ण जर 'य्, व्' किंवा 'ह' असेल, तर मात्र ते रूप ओकारान्त होते.

२. अपभ्रंशामध्ये 'पुतेण्' अशा उच्चाराचे रूप होते. त्यापासूनच मराठी रूप 'पुत्तें' हे उद्भवले. मेघे; ईश्वरे, ईश्वरेसी (ईश्वरेण + समम्) ही रूपे तशीच आहेत. तृतीया व सप्तमी ह्या विभक्ती एकमेकींबद्दल अपभ्रंशाप्रमाणे मराठीतही चालतात.

३. प्रथमेच्या रूपाप्रमाणे द्वितीयेची रूपे तयार करण्याची तऱ्हा मराठी व अपभ्रंश ह्या दोन्हींमध्ये एकच आहे.

४. तृतीया, षष्ठी, सप्तमी, संबोधन ह्या चार अनेकवचनी विभक्तिप्रत्ययांचे अंत्य स्वर अपभ्रंशाप्रमाणे मराठीत सानुनासिक आहेत.

५. अपभ्रंशात करेवि, पालेवि, वगैरे इकारान्त ल्यबन्त अव्यये होतात. त्याचप्रमाणे मराठीतही 'ऊन' प्रत्ययान्त जी अव्यये आहेत. ती 'इ'कारान्त होतात. असली 'इ'कारान्त अव्यये जुन्या पद्यांत आढळतात. उदाहरणार्थ - जिणूनि, हसूनि इत्यादी.

६. अपभ्रंशात प्पिणु, पिणु, विणू, असे उ-कारान्त प्रत्यय लावून अव्यये तयार करतात. त्याचप्रमाणे मराठीच्या जुन्या लिखाणात 'उ'प्रत्ययान्त अव्यये तयार केलेली आढळतात. उदाहरणार्थ- करूनु, घेऊनु, हसूनु इत्यादी.

७. भाववाचक नामे तयार करण्याचा प्रत्यय अपभ्रंश भाषेत प्पण असा आहे. तोच मराठीने उचलला आहे.

८. सामान्यरूप साधण्याचा प्रकार मराठीने अपभ्रंश भाषेपासून उचलला असण्याचा संभव आहे. अपभ्रंशामध्येही नामाचे सामान्यरूप होऊन नंतर विभक्तीचे प्रत्यय लागतात.

९. मराठीच्या जन्मापासून तिच्या काव्याला अन्त्ययमकाचे सुंदर लेणे लाभले आहे. मराठीप्रमाणे इतर वर्तमानकालीन बोलींमध्येही अन्त्ययमकाचे प्राबल्य दिसून येते. हा अन्त्ययमक अपभ्रंश भाषेमधून आला आहे. अपभ्रंश भाषेतील सर्व पद्यवाङ्मय अन्त्ययमकयुक्त आहे. संस्कृत, पाली व इतर प्राकृत ह्यांत हा प्रकार नाही.

१०. अन्त्ययमकाप्रमाणेच अपभ्रंश भाषेतील काही छंदांचे प्रकारही मराठीने घेतले आहेत. प्रचलित छंदांचे पृथक्करण केले, तर दोन्हींमधील साम्य दृष्टीसमोर आल्याविना राहणार नाही.

(८) प्राकृत भाषांपैकी निरनिराळे अवशेष जसे मराठीत सापडतात, तसे संस्कृत भाषेचेसुद्धा अवशेष मराठीत सापडतात व ह्यात फारसे काही आश्चर्यही नाही. मराठी उद्गमाच्या पूर्वी व नंतर ज्या काही सनातनी धर्मीय राजांच्या राजवटी झाल्या, त्यात त्यांनी आपल्या अमदानीत संस्कृत भाषेस आश्रय देऊन तिचा चांगला पुरस्कार केल्यामुळे प्राकृत भाषांच्या काळात व पुढे देशी भाषांच्या काळातही संस्कृतचे काही ठसे प्राकृत भाषांवर व पुढे देशी भाषांवरही उमटले. अशा अवशेषांची काही उदाहरणे पुढे देतो.

१. ऋ, ॠ, ऐ, औ हे वर्ण संस्कृतात व मराठीत आहेत, प्राकृतात नाहीत ह्यावरून ते संस्कृतामधून आले आहेत, हे निश्चित.

२. ङ्, ञ् ही दोन अनुनासिके संस्कृतात आहेत. प्राकृतात नाहीत; मराठीत संस्कृतसम शब्दांत आहेत. संस्कृतमधूनच ती आली आहेत.

३. मराठीत भावे क्रियापदांची रूपे नपुंसकलिंगी तृतीयपुरुषी एकवचनी तेवढी चालतात. हा गुण मराठीने संस्कृतपासून घेतला आहे. मराठीत कर्ता प्रायः चतुर्थ्यन्त किंवा च-कारान्तरूपाचा तृतीयान्त असतो. उदाहरणार्थ- मला कळमळते; मला जाववते; माझ्याच्याने जाववते.

४. संस्कृतमधून शब्दांचे ऋण तर मराठीने अमूप घेतले आहे. तद्भव शब्दांचा भरणा आहेच. परंतु तत्सम शब्दही काही कमी नाहीत. एकंदर शब्दसमूहापैकी जवळजवळ ९/१५ शब्द अस्सल संस्कृत शिक्क्याचे आहेत. तद्भव शब्दांच्या बाबतीतही त्यांच्या बरोबरीने मूळ संस्कृत शब्द रूढ आहेत. 'पूर्वीच्या प्राकृत ग्रंथभाषा व त्यांचे अपभ्रंश यांच्या द्वारा अपभ्रष्ट होऊन आलेल्या शब्दांची अंतिम रूपे जशी आढळतात, तशीच संस्कृत शब्दांची स्वतंत्र रूपान्तरे दिसून येतात. यांपैकी पूर्वपरंपरेने अंगवळणी पडून हाडीमांसी खिळलेले शब्दापभ्रंश नियमित अर्थाने शिष्टांनी मराठीत मान्य केलेले आहेत.

ह्या सर्व विवेचनावरून व उदाहरणांवरून मराठी भाषा अमुक एका प्राकृत भाषेपासून उत्पन्न झाली, असे आपणास म्हणता येत नाही. सर्व प्राकृत भाषा, अपभ्रंश व संस्कृत ह्या भाषांनी आपापल्यापरीने व प्रामुख्याने माहाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांनी मराठीस जन्माला आणण्यास हातभार लावलेला दिसतो. निरनिराळ्या प्राकृत भाषा बोलणारे निरनिराळे समाज निरनिराळ्या काळी उत्तरेकडून, आर्यावर्ताहून अनेक कारणांमुळे महाराष्ट्रात आले आणि तेथे स्थायी झाले. त्यांच्या संमिश्र बोलण्यानेच मराठी भाषा बनली. महाराष्ट्र देश ज्याप्रमाणे गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, अश्मक, कुन्तल, विदर्भ, कोकण इत्यादी लहानलहान देशविशेषांचा मिळून बनला व महाराष्ट्राची लोकवसाहत ज्याप्रमाणे निरनिराळ्या लोकघटकांची मिळून बनली, त्याचप्रमाणे मराठी भाषा ही निरनिराळ्या प्राकृत भाषांच्या- विशेषतः माहाराष्ट्री व अपभ्रंश ह्यांच्या मिश्रणाने बनली. महाराष्ट्र देश, मराठा समाज व मराठी भाषा ह्यांची घटना वर दिलेल्या रीतीने ख्रिस्तोत्तर ६००-७००च्या सुमारास झाली."[१६]

३.६ अभिजात भाषेचे निकष

१) संबंधित भाषेच्या साहित्याचा इतिहास किमान १५०० ते २००० वर्षे प्राचीन असावा.

२) त्या भाषेचे समृद्ध साहित्य उपलब्ध असावे

३) भाषेचे साहित्य स्वतंत्र परंपरेत विकसित झालेले असावे.

४) भाषेला स्वतःचे स्वयंभूपण असावे, म्हणजेच ती स्वतंत्र असावी.

५) भाषा इतर आधुनिक भाषांच्या विकासात प्रभावी भूमिका बजावत असावी.

३.७ अभिजात मराठीची वाटचाल

मराठीचे अभिजातपण प्राचीन कालपासूनच दिसते. डॉ.ए.एम. घाटगे हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भाषाशास्त्रज्ञ होते. संस्कृत, प्राकृत, पाली, जर्मन, फ्रेंच, इंग्लिश, ग्रीक, लॅटिन या सर्व भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेच्या प्राकृत इंग्लिश महाशब्दकोशाच्या प्रस्तावनेत ते जैन लेखक हरिभद्राच्या जैन महाराष्ट्रीस 'अभिजात' असे संबोधतात, हरिभद्रांनी 'समरादित्यकथा' ही प्रदीर्घ कादंबरी आणि 'धूर्ताख्यान' नावाचे व्यंग्य उपहासप्रधान खंडकाव्य लिहिले. डॉ. घाटगे म्हणतात, "In it's classical form, as represented by Harıbhadra's Samaradıtyakatha and Dhurtakhyana, Jam Maharashtrı comes nearest to pure Maharashtri" [१७]

आठव्या शतकात जर महाराष्ट्री भाषेने 'अभिजात' (Classical) हा दर्जा मिळवला असेल तर त्याच महाराष्ट्री अपभ्रंशातून बनलेल्या मराठीचे अभिजातत्व वस्तुतः जन्मसिद्धच म्हणावे लागेल. महाराष्ट्री भाषा 'अपभ्रंश' अवस्थांतरातून गेल्यावर ज्या रूपात अवतरली ती आधुनिक मराठी होय. 'प्राकृतशब्दमहार्णव' नावाच्या प्राकृत हिंदी काशाचे संपादक पं. हरगोविददास सेठ म्हणतात 'महाराष्ट्री अपभ्रंश से मराठी और कोंकणी भाषाएँ उत्पन्न हुई।

वरील विवेचन बघता मराठी भाषेचे अभिजातत्व सिद्ध करण्यासाठी जैन महाराष्ट्री भाषेचा प्रवास जमेला घरला, तर एकाही शतकाचे किंबहुना शताकार्थाचेही अंतर न पडता, सलग दुसऱ्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतचा तिचा साहित्यिक प्रवास लक्षणीयपणे नोंदवता येतो.

चण्ड, कात्यायन, वररुची, हेमचन्द्र त्रिविक्रम, मार्कण्डेय, लक्ष्मीधर या प्रमुख वैयाकरणांनी लिहिलेल्या विविध प्राकृत भाषांच्या व्याकरणात महाराष्ट्रीला सर्वाधिक महत्त्व दिलेले दिसते. वररुचीचे व्याकरण ६ व्या शतकातील आहे. त्याच्या १२ परिच्छेदांपैकी ९ परिच्छेद सामान्य 'प्राकृत' वर आधारलेले आहेत. उरलेल्या सर्व प्राकृतांचे विवेचन थोडक्यात करून तो १२ व्या परिच्छेदाच्या ३२ व्या सूत्रात म्हणतो, 'शेषं महाराष्ट्रीवत्' याचा अर्थ असा की, ६ व्या शतकात महाराष्ट्री प्राकृत अत्यंत विकसित स्वरूपात होती किंबहुना सामान्य प्राकृत- महाराष्ट्री असे समीकरण दृढ झाले होते.

महाराष्ट्री आणि जैन महाराष्ट्री यांचा संबंध प्राचीन असा आहे. हर्मन याकोबी या जर्मन अभ्यासकाने प्रथमतः 'जैन महाराष्ट्री' ही संज्ञा वापरली. त्यांच्या मते प्राचीन जैन आगमग्रंथ म्हणजे धर्मग्रंथ हे 'जैन महाराष्ट्री' भाषेत लिहिलेले आहेत. पुढे जैनविद्येच्या अभ्यासकांनी या मताचे खंडन करून असे प्रस्थापित केले की सर्वाधिक प्राचीन श्वेतांबर ग्रंथ 'अर्धमागधी' भाषेत असून, इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापासून जैन लेखकांवरचा 'महाराष्ट्री'चा प्रभाव वाढत गेला.

सातवाहन साम्राज्याचा विस्तार बराच मोठा होता. सातवाहन राजे प्राकृतप्रेमी होते. जैन आचार्य सतत विहार करून, त्या त्या प्रादेशिक बोली भाषेत प्रवचने करीत असत (आजही करतात), वरील तीनही आचार्य प्रतिष्ठान (पैठण) येथे राहिलेले होते. भद्रबाहू हे प्रतिष्ठान-निवासी बृहत्संहिताकार वराहमिहिरांचे बंधू होते. कालकाचार्याचा इतिहास शक संवत् आणि विक्रम संवत् या कालगणनशी जुळलेला आहे. इ.स.च्या ६ व्या शतकात होऊन गेलेला 'दण्डी' कवी म्हणतो, 'महाराष्ट्राश्रयां भाषां प्रकृष्टं प्राकृतं विदुः। **(काव्यादर्श १.३४)** यात अपेक्षित असलेला 'महाराष्ट्र' म्हणजे आजचा भौगोलिक महाराष्ट्र नसून, त्यात महाराष्ट्राच्या सीमेलगतच्या कर्नाटक, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश व गुजरात या प्रदेशांमधले काही भाग समाविष्ट होते. एकंदरीत महाराष्ट्री भाषा भारतातल्या मोठ्यात मोठ्या प्रदेशातील जास्तीत जास्त लोकांना समजत होती. म्हणूनच जैन लेखकांनी तिचा साहित्यभाषा म्हणून स्वीकार केला.

महाराष्ट्री भाषेची बरीच वैशिष्ट्ये जैन महाराष्ट्रीत असलो तरी त्यात थोडे वेगळेपणही होते. ती अर्धमागधीने काहीशी प्रभावित होतो, कारण श्वतांबर जैन लेखकांवर अर्धमागधीचा प्रभाव होता. शिवाय ते लेखक भारताच्या ज्या ज्या प्रांतात जन्मलेले होते. तेथील बोली भाषेतील शब्दसंपत्तीही त्यात होती. शिवाय जैन तत्त्वज्ञान व आचारातील अनेक रुढ पारिभाषिक शब्दही त्यात होते, दिगंबर जैनांनी शोरसनी भाषेला आपलेस केल्यावर अर्थातच आपले सांप्रदायिक वेगळेपण राखण्यासाठी श्वेतांबर जैनांनी समकालीन भाषांमध्ये सवांत प्रभावा असलेली महाराष्ट्री भाषा आपली साहित्यभाषा म्हणून निवडली. यावरून अभिजात मराठीचे प्राचीनत्व व विविध दुवे लक्षात येतात. खालील संदर्भाच्या अनुषंगाने अभिजात मराठीची वाटचाल अधोरेखित करता येते.

नाणेघाटचा शिलालेख

नाणेघाटच्या खिंडीत असलेल्या मुख्य लेण्यात सातवाहनकालीन राजे व त्यांच्या नातलगांच्या आता मोडकळीस आलेल्या प्रतिमा दिसतात. या प्रतिमांच्या वर त्यांच्या नावांची नोंद कोरलेली आहे. येथे सातवाहन राणी नागनिकेने केलेल्या वैदिक यज्ञांची व विविध दानांची नोंद असलेला मोठा शिलालेख दोन भिंतींवर कोरलेला आहे. जरी अनेक अक्षरे झिजली असली, तरी उरलेल्या मजकुरावरून त्या काळातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय जीवनाबद्दल महत्त्वाची माहिती मिळते. मुख्य लेण्याच्या मंडपातील दोन्ही बाजूंना दगडी बाके बनवलेली आहेत आणि दोन्ही बाजूंच्या भिंतींवर शिलालेख कोरलेला आहे. मागच्या भिंतीवर सातवाहन घराण्यातील सात व्यक्तींच्या प्रतिमा आहेत - सिमुक सातवाहन, देवी नागनिका, श्रीसातकर्णी, कुमार भाय, महारठी त्रनकयिर, कुमार हकुश्री आणि कुमार सातवाहन. एका जोडप्याच्या प्रतिमेवर ‘देवी नागनिका’ आणि ‘श्रीसातकर्णी’ अशी नावे लिहिलेली दिसतात.

त्यामुळे ती सातकर्णीची राणी असावी आणि महारठी त्रनकयिर हा नागनिकेचा पिता असावा, असे वा. वि. मिराशी यांचे मत आहे. शेवटचे दोन कुमार, हकुश्री आणि सातवाहन, हे सातकर्णी–नागनिकेचे धाकटे पुत्र असावेत आणि हे लेणे म्हणजे सातवाहनकुलाचे प्रतिमागृह असावे, असा पुरातत्त्वज्ञांचा समज आहे.

नाणेघाटच्या लेण्यात कोरलेला नागनिकेचा हा शिलालेख ब्राह्मी लिपीत आणि प्राकृत भाषेत आहे. अक्षरांच्या रूपावरून योहान ब्यूलर, मिराशी इत्यादी विद्वानांच्या मते याचा काळ साधारण इ.स.पू. दुसऱ्या ते पहिल्या शतकातील आहे. आता उपलब्ध अवस्थेत हा लेख वीस ओळींचा असून दहा ओळी डाव्या भिंतीवर आणि उरलेल्या दहा उजव्या भिंतीवर कोरलेल्या आहेत. १८३७ मध्ये डब्ल्यू. एच. साईक्स यांनी रॉयल एशियाटिक सोसायटीच्या नियतकालिकात प्रथम या शिलालेखाची नोंद केली. पुढे जेम्स प्रिन्सेप, रेव्हरंड जॉन स्टीव्हन्सन, भगवानलाल इंद्रजी, ब्यूलर, मिराशी, अजयमित्र शास्त्री, शोभना गोखले आणि इतर संशोधकांनी या लेखाचे वाचन करून त्याचा अर्थ स्पष्ट केला आहे.

गाथा सप्तशती

आरंभीच्या सातवाहन राजांनी अनेक श्रौत यज्ञ केले होते. नाणेघाटातील नागनिकेच्या लेखात तिचा पति सातकर्णि राजा याने व तिनेही अनेक श्रौत यज्ञ करून ब्राह्मणांना हजारो गाई व कार्षापण नाणी तसेच अनेक गाव, घोडे व हत्ती दक्षिणा म्हणून दिल्याचा उल्लेख आहे. पण त्या श्रौत यज्ञांचे वर्णन असलेला लेख मात्र संस्कृत भाषेत नसून प्राकृत भाषेत आहे. किंबहुना, एकाही सातवाहन राजाचा एकही लेख संस्कृतात नाही ही आश्चर्याची गोष्ट आहे. यापेक्षा परकी शक क्षत्रपांनी संस्कृत भाषेस बराच आश्रय दिला होता, असे दिसते. शक ऋषभदत्ताचे नाशिक येथील लेण्यातील लेख शुद्ध संस्कृतमध्ये नसले तरी त्यांत संस्कृत शब्दांचे प्राचुर्य आहे. [नाशिकच्या लेण्यातील उषवदालाचा लेख, क्रमांक ४३ पाहा.] रुद्रादामन् या शक क्षत्रपाचा गिरनार येथील लेख तर समासप्रचुर आणि शब्दलंकारयुक्त सुन्दर संस्कृत भाषेत लिहिला आहे इतकेच नाही, तर त्याने स्वतःही गद्य व पद्य काव्ये रचली होती असाही त्यात निर्देश आढळतो. [क्रमाक ५१, ओ. १७.] याच्या उलट राजमाता गौतमी बलश्रीने आपला नातू पुळुमावि याला सांगून आपल्या दिवंगत सातकर्णि नामक थोर पुत्राचे जे वर्णन करविले होते ते अलंकारयुक्त असले तरी प्राकृतात आहे. किंबहुना, ते प्रथम संस्कृतात लिहून मागाहून त्याचे प्राकृतात रूपान्तर केलेले दिसते.

सातवाहनांच्या प्राकृत प्रेमामुळे अनेक आख्यायिका प्राचीन कालापासून प्रचलित झाल्या होत्या. राजशेखराने म्हटले आहे की, कुन्तल देशात सातवाहन राजाने आपल्या अन्तःपुरात प्राकृत

भाषाच वापरली पाहिजे असा नियम केला होता. भोजानेही 'सरस्वतीकण्ठाभरणा'त याचा निर्देश केला आहे. सातवाहन राजे प्राकृत् कवींना कसा उदार आश्रय देत असत हे हाल या सातवाहनवंशी राजाच्या ग्रंथांवरून व तद्विषयक आख्यायिकांवरून स्पष्ट दिसते. हालाचा सुप्रसिद्ध ग्रंथ 'सत्तसई' किंवा 'गाथासप्तशती' हा माहाराष्ट्री प्राकृतात रचला आहे. त्याविषयी प्रथम चर्चा करू.

गाथा सप्तशती हा महाराष्ट्री प्राकृतमधील प्रामुख्याने श्रृंगाररसावर आधारित गीतांचा संग्रह आहे. सातवाहन राजा हाल (इ.स. पहिले किंवा दुसरे शतक) याने हा संग्रह तयार केला. ‘गाथासप्तशती’ हे त्याचे संस्कृत रूप, तर ‘गाहा कोस’ हे मूळ प्राकृत नाव. स्वतः हालराजा सांगतो की त्याने एक कोटी गाथांमधून सातशे निवडल्या. तो केवळ संपादक किंवा संकलक नव्हता, तर काही गाथांचा रचनाकारही होता. या संग्रहाची पहिली ओळख भारतीयांना जर्मन पंडित आल्ब्रेख्त वेबर यांनी १८८१ मध्ये करून दिली. त्यांनीच या ग्रंथाची पहिली संपादित आवृत्ती प्रकाशित केली. अनेक विद्वानांच्या मताने, गाथा सप्तशतीचा आरंभीचा स्वरूप कदाचित एक छोटा ‘गाथा कोश’ होता, जो पुढील शतकांमध्ये वाढत जाऊन सध्याच्या स्वरूपात आला. या गाथांमध्ये सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील क्षणचित्रे आहेत. त्यामुळे त्याकाळच्या समाजाची स्पष्ट झलक मिळते. गोदावरी, वड, पळस, बेल, आंबा, जांभूळ, कमळ, मालती, माधवी, केतकी अशा वृक्ष-वेलींवर अनेक उल्लेख येतात. जंगलात, शेतात काम करणाऱ्या लोकांनी या गाथा रचल्यासारखे वाटते; म्हणून निसर्गचित्रण स्वाभाविकपणे दिसते. स्त्रियांची घरकामे, पतीला आनंदी ठेवण्याचे प्रयत्न, पतीचा आदर राखणे, कुटुंब एकत्र ठेवण्याची जबाबदारी इत्यादी नोंदी त्या काळातील पती-पत्नीच्या नात्याची छटा दाखवतात. स्त्री-पुरुषांचे तुलनात्मक समान स्थानही सूचित होते.

देव-देवतांविषयीचे विश्वास, पौराणिक कथांचे उल्लेख, सामाजिक रुढी गाथांमध्ये आढळतात. सुरुवातीला, मध्ये आणि शेवटी शंकराला केलेले वंदन दिसते. गाथा सप्तशतीमध्ये सज्जनांची स्तुती, दुष्टांची निंदा, प्रेम आणि जीवनाचे तत्त्वज्ञान, निसर्गाची सुंदर चित्रे असे अनेक विषय हाताळले आहेत. प्राकृत भाषेचे माधुर्य, निसर्गातील सौंदर्य, लोकजीवनाची सहजता, प्रेमाचे नाजूक स्वरूप यांचा संगम या गाथांमध्ये दिसतो. अनेक गाथा श्रृंगारप्रधान असल्या तरी हा संग्रह केवळ श्रृंगारापुरता मर्यादित नाही. तो मानवी भावना, अनुभव आणि नितीनियम यांचे समृद्ध जग दाखवतो. म्हणूनच हा ग्रंथ वाचकाला आजही आकर्षित करतो.

कुवलयमाला

कुवलयमाला हे महाराष्ट्री प्राकृतमधील एक उत्कृष्ट चंपूकाव्य मानले जाते. उद्योतनसूरी यांनी हे काव्य इ.स. ७७९ मध्ये जालोर येथे रचले. संपूर्ण काव्याची चौकट कुवलयचंद्र आणि कुवलयमाला या दोन पात्रांच्या कथेला आधारलेली आहे. या मुख्य कथेच्या दरम्यान राग, मत्सर, क्रोध अशा मानवी विकारांमुळे घडणाऱ्या घटनांच्या अनेक छोट्या कथा गुंफल्या आहेत. कथेचा नायक कुवलयचंद्र हा मध्यदेशातील विनीता नगरीचा राजा दृढवर्मा याचा मुलगा. समुद्रकल्लोल नावाच्या घोड्यावरून तो दूरवर जंगलात जातो. तेथे घोड्याचा मृत्यू होतो आणि त्याच वेळी त्याला आकाशवाणी होते. त्या आवाजात त्याला दक्षिणेकडे जाण्याची आज्ञा मिळते. कुवलयचंद्र दक्षिणेकडे प्रवास करत असताना विंध्य पर्वताच्या रांगेत एका भल्यामोठ्या वडाच्या झाडाखाली ध्यानात मग्न असलेला एक मुनी दिसतो. त्या मुनीच्या सल्ल्यानुसार तो विजयानगरीला पोहोचतो. तेथे राजकन्या कुवलयमाला हिची शंका-कुशंका सोडवतो आणि आपल्या बुद्धिमत्तेमुळे तिचे मन जिंकतो. याच काळात कुवलयचंद्राचा दत्तक भाऊ महेंद्र त्याचा शोध घेत विजयानगरीत येतो. तो कुवलयचंद्राचे कुवलयमालेच्या आई-वडिलांशी औपचारिक परिचय करून देतो. दोघांचा विवाह होतो. नंतर वय वाढल्यावर ते दोघेही संसारातील कर्तव्यांपासून निवृत्त होऊन आत्मकल्याणाच्या मार्गावर जातात.

या काव्याला ‘आश्वास’ किंवा ‘सर्ग’ असे विभाग नाहीत. जरी कुवलयमाला मुख्यतः महाराष्ट्री प्राकृत भाषेत लिहिलेले असले, तरी संस्कृत, पैशाची, अपभ्रंश अशा भाषांचे मिश्रणही अनेक ठिकाणी दिसते. भारतातील वेगवेगळ्या प्रदेशांत राहणाऱ्या लोकांच्या बोलीभाषा, त्यांचे स्वभाव, त्यांचे रीतिरिवाज हे सुद्धा कथेच्या प्रवाहात अधूनमधून प्रकट होतात. कुवलयमालेची भाषा समासांनी भरलेली, प्रगल्भ आणि तरीही ओघवती आहे. संवाद काव्यमय आहेत, तर छंदोबद्ध, नादमधुर आणि भावपूर्ण ओवीसदृश शैली काव्याची शोभा वाढवते. अनेक ठिकाणी सुंदर सुभाषिते, हुशार प्रश्नोत्तरे आणि मनोरंजक प्रहेलिका येतात, ज्यामुळे हा ग्रंथ वाचण्याची मजा अधिक वाढते. मध्ययुगीन भारतीय समाजाचे चित्र जाणून घेण्यासाठीही हा ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो.

अक्षीचा शिलालेख

रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात अक्षी येथे उपलब्ध झालेला शिलालेख मराठीतील सर्वात जुन्या शिलालेखांपैकी एक मानला जातो. अलिबागच्या दक्षिणेला सुमारे तीन मैलांवर वसलेले अक्षी हे गाव नारळ-पोफळीच्या बागांनी आणि केळीच्या मळ्यांनी समृद्ध आहे.

शिलालेख असलेली शिळा गावालगतच्या रस्त्याच्या कडेला जमिनीत अर्धवट गाडलेली आहे. जमिनीवर दिसणाऱ्या भागावरच लेख कोरलेला असून जमिनीखालील भागावर एकही अक्षर नाही, याची तपासणी करून खात्री करण्यात आली आहे. अक्षी गावावरील छोट्या टिपणात रायगड जिल्ह्याच्या 'गॅझेटीअर' मध्ये या शिलालेखाचा उल्लेख आढळतो. हा लेख एका खडबडीत दगडावर कोरलेला आहे. 'गॅझेटीअर'मधील वर्णनावरून या दगडाच्या लांबी–रुंदीचा अंदाज येतो. शिळेच्या वर चंद्र-सूर्य अशी चिन्हे, त्याखाली गद्धेगाळाची आकृती, नंतर मुख्य लेख आणि शेवटी पुन्हा चंद्र-सूर्य अशी रचना दिसते.

या शिलालेखात एकूण नऊ ओळी असून प्रत्येक ओळीत अकरा ते चौदा अक्षरे आहेत. अक्षरे आकाराने मोठी, सुमारे पाव इंच उंच आणि रुंद अशी कोरलेली आहेत. हा लेख साधारण हजार वर्षे जुना असल्याने त्यात बरीच झीज झाली आहे; तरीही बहुतेक अक्षरे अजूनही ओळखता येण्याजोगी आहेत. संपूर्ण लेख देवनागरी लिपीत असून काही अक्षरांचे प्राचीन वळण त्याचे जुनेपण दाखवते. इतिहास आणि लिपिविज्ञानाच्या अभ्यासासाठी हा शिलालेख त्यामुळे विशेष महत्त्वाचा ठरतो. अक्षीचा शिलालेख मराठीतील आद्य शिलालेख असून त्यावर शके ९३४ म्हणजेच इ.स. १०१२ असा स्पष्ट उल्लेख आहे. शिलाहारवंशीय राजा पहिला केसीदेवराय याचा प्रधान भइर्जू सेणुई याच्या काळात, म्हणजे शिलाहार काळात कोरलेला हा शिलालेख असून त्याने देवीच्या बोडणासाठी नऊ कुवली धान्य दिल्याचा यात उल्लेख आहे.

दिवेआगरचा ताम्रपट हा महाराष्ट्राच्या मध्ययुगीन इतिहासाचा एक अत्यंत महत्त्वाचा व प्रामाणिक दस्तऐवज मानला जातो. राजाच्या दातृत्वाचा, धर्मनिष्ठेचा व राज्यकारभारातील शिस्तीचा गौरव करणारी स्तुतिपर भाषा येथे दिसून येते. त्यामुळे दिवेआगरचा ताम्रपट केवळ ऐतिहासिक पुरावा न राहता, अभिजात मराठीच्या विकासप्रक्रियेतील एक मौलिक सांस्कृतिक दस्तऐवज ठरतो.

कुडलचा शिलालेख

सोलापूरजवळच्या हत्तरसंग कुडल येथे मराठी भाषेतील सर्वात जुना मानला जाणारा एक महत्त्वाचा शिलालेख आढळतो. 'वाचेल त्याचा विजय होईल' म्हणजे वाचाल तर वाचाल आणि ज्ञान मिळवणाऱ्याचा विजय होतो असा उल्लेख असणारा शिलालेख म्हणून याची ओळख आहे. हा शिलालेख संगमेश्वर मंदिराच्या सभामंडपातील तुळईवर कोरलेला असून त्यावरील नोंदीनुसार त्याची तारीख इ.स. १०१८ (शक ९४०) आहे. सोलापूरचे इतिहास संशोधक आनंद कुंभार यांनी या शिलालेखाचा शोध लावला. मराठीच्या उत्पत्तीविषयीच्या संशोधनात हा शिलालेख अत्यंत

महत्त्वाचा पुरावा ठरतो. जवळपास हजार वर्षांपूर्वी, म्हणजे ९९७ वर्षांपूर्वी कोरण्यात आलेला असल्याने तो श्रीज्ञानेश्वरीपेक्षाही १८२ वर्षे जुना असल्याचे कुंभार यांच्या अभ्यासातून स्पष्ट झाले.

शिलालेखाची लांबी ९४ सेंमी आणि रुंदी १६ सेंमी आहे. तुळईतील दगड उत्तम घडीव असून लेखनापूर्वी तो नीट गुळगुळीत घासलेला दिसतो. अक्षरांची उंची साधारण १ सेंमी आहे. संख्येचा जो अंक कोरलेला आहे, तो नागमोडी स्वरूपाच्या प्राचीन लिपीत असल्याने लगेच ओळखता येत नाही. मात्र नागपूरचे प्रख्यात विद्वान वा. वि. मिराशी यांनी दिवेआगार येथे सापडलेल्या ताम्रपत्रात याच प्रकारचा अंक असल्याचे सांगून त्याची दिशा स्पष्ट केली आहे.

या शिलालेखावर एकूण अडीच ओळी आहेत. पहिल्या दोन ओळी संस्कृतमधील आहेत.

१) "स्वस्ति श्री शके ९४० कालयुक्त संवत्सरे माघ कधनुळिकाळ छेळा"

२) "पंडित गछतो आयाता मछ मि छिमळ नि १०००"

शेवटची **तिसरी ओळ** मात्र स्पष्ट आणि स्वच्छ मराठीत आहे – **'यवाछि तो विजेया हो ऐवा.'"** [१८]

या संदेशाचा सार असा की जो वाचेल, शिकेल त्याचा विजय होईल. याचबरोबर शिलालेखात त्या काळातील एका दानशूर व्यक्तीने हजार निष्क (चलनरूप नाणे) दान दिल्याची नोंदही आढळते.

दिवेआगरचा ताम्रपट

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यात असलेल्या दिवेआगर येथे मराठी भाषेतील सर्वात प्राचीन मानला जाणारा ताम्रपट सापडला. हा ताम्रलेख डॉ. मो. गं. दीक्षित यांना तेथील रहिवासी श्री. स. ना. जोशी–पटवर्धन यांच्या मार्फत मिळाला. दिवेआगरमधील एका वाडीत नारळाची रोपे लावताना एका कुळवाड्यास हा ताम्रपट जमिनीत गाडलेला मिळाला. ताम्रपटातील मजकुरावरून हा लेख दिवे गावाशीच संबंधित असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे त्याला दिवेआगर ताम्रपट असे नाव देण्यात आले. या ताम्रपत्राचा एकच पत्रा उपलब्ध असून त्याची लांबी साधारण साठी–तीन सेंमीटर आणि रुंदी तीन सेंमीटर आहे. पत्र्याच्या एका बाजूस एक छिद्र असून त्यात कडी ओवलेली आहे, पण त्यावर कोणत्याही प्रकारची मुद्रा किंवा शिक्का नाही. या पत्र्यावर एकूण नऊ ओळी कोरलेल्या आहेत आणि एवढ्याच भागात संपूर्ण मजकूर येतो, त्यामुळे हा लेख पूर्ण स्थितीत मिळाल्याचे मानता येते. प्रत्यक्ष लेखाचे क्षेत्रफळ अंदाजे त्रेपन्न बाय तीन सेंमीटर आहे. आल्फ्रेड मास्टर यांनी या लेखाचे रोमन लिप्यंतरण करून काही भाषाविषयक टिपाही जोडल्या आहेत.

या ताम्रलेखातील विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे दुसऱ्या ओळीपासून शेवटपर्यंतचा सर्व मजकूर स्वच्छ आणि मूळस्वरूपातील मराठीत आहे. पहिली ओळ आणि दुसऱ्या ओळीतील काही भाग मात्र संस्कृत भाषेत आहे. मराठी वाक्यांमध्ये आलेली हे, जे, ते ही सर्वनामे तसेच व्यक्तिनामांची रूपे पूर्णपणे मराठी ढंगाची असल्याने ती भाषावैशिष्ट्ये महत्त्वाची ठरतात. कोंकणी बोलीचा प्रभावही जाणवतो. दिवेआगरचा हा ताम्रपट भाषाशास्त्र, समाजव्यवहार आणि मराठी–कोंकणी बोलींच्या प्राचीन रूपाचा अभ्यास करण्यासाठी अतिशय महत्त्वाचा मानला जातो.

श्रवणबेळगोळचा शिलालेख

श्रवणबेळगोळ येथील शिलालेख कर्नाटकातील जैन परंपरेच्या दीर्घ इतिहासाचा अत्यंत महत्त्वाचा पुरावा मानला जातो. हासन जिल्ह्यातील या पवित्र तीर्थक्षेत्रात दोन टेकड्या, विंध्यगिरी आणि चंद्रगिरी यांच्यावर वेगवेगळ्या कालखंडातील अनेक शिलालेख आढळतात. त्यांपैकी सर्वाधिक प्रसिद्ध शिलालेख विंध्यगिरीवरील बाहुबलीच्या महाशिल्पाशी संबंधित आहे. हा शिलालेख इ.स. ९८३ च्या सुमारास गंगवंशीय मंत्री व सेनापती चामुंडराय यांनी या भव्य प्रतिमेची स्थापना केली, याची नोंद करतो. या शिलालेखात बाहुबलीच्या तपश्चर्येचे, त्याच्या त्यागमय वृत्तीचे आणि जैन धर्मातील ‘कैवल्य’ साधनेच्या आदर्शांचे वर्णन दिसते. चामुंडरायाने हा स्मारकप्रकल्प केवळ धार्मिक हेतूनेच नव्हे, तर जैन समाजातील सांस्कृतिक आणि आध्यात्मिक एकात्मता टिकवण्यासाठीही उभारल्याचे संकेत मिळतात. लेखनशैलीने हा शिलालेख विशेष ठरतो. संस्कृत आणि कन्नड या दोन्ही भाषांचा प्रभाव त्यात दिसतो. प्रारंभीचे काही भाग संस्कृत छंदात असून पुढील भाग सहज-प्रवाहातील कन्नड गद्य-पद्यरचनेत आहे.

या शिलालेखामधून त्या काळातील राजकीय परिस्थिती, गंग राजघराण्याचे आश्रयदाते स्वरूप, तसेच जैन संन्यास-परंपरेचा सामाजिक प्रभाव यांचे स्पष्ट दर्शन होते. विशेषतः बाहुबलीची ५७ फूट उंच एकाश्म प्रतिमा भारतीय शिल्पकलेच्या उत्कर्षाचे प्रतीक मानली जाते; त्या प्रतिमेच्या स्थापनेचा दस्तऐवजी पुरावा म्हणून हा शिलालेख अमूल्य आहे. श्रवणबेळगोळच्या शिलालेखांचे आणखी एक महत्त्व म्हणजे ते कन्नड भाषेच्या प्रारंभिक विकासाचा मागोवा देतात. शब्दरचना, व्याकरण, आणि लिपी यांतील बदलांचे साक्षीदार म्हणून हे लेख इतिहासकारांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. धार्मिक, भाषिक, सांस्कृतिक आणि राजकीय अशा अनेक स्तरांवर या शिलालेखांचे मूल्य अधोरेखित होते. मराठीतील अत्यंत जुन्या शिलालेखांपैकी एक असलेला ‘श्री चावुंडराये करवियले’ हा उल्लेख असलेला शिलालेख येथेच आहे.

मानसोल्लास

मानसोल्लास (मानस + उल्लास म्हणजे मनाचा आनंद) हा बाराव्या शतकातील एक अत्यंत महत्त्वाचा संस्कृत ग्रंथ आहे. याचे लेखक चालुक्य वंशातील राजा तृतीय सोमेश्वर होत. या ग्रंथाला अभिलषितार्थचिंतामणी असेही नाव आहे. याची रचना इ.स. ११२९ मध्ये झाली. ग्रंथात राजाच्या शंभर विनोदांचे, म्हणजे विविध रसिक आणि मनोरंजनात्मक उपक्रमांचे वर्णन दिलेले आहे. संगीत, नृत्य, वाद्य, त्या काळातील सामाजिक उपयोग आणि त्या मागील तत्त्वज्ञान अशा अनेक गोष्टींचे सविस्तर वर्णन येथे आढळते. संगीताचे विविध पैलू, त्यांचा इतिहास, रचना आणि उपयोग यांचे व्यवस्थित विश्लेषण या ग्रंथात दिसते.

इ.स. ११२९ मध्ये लिहिलेल्या या मानसोल्लास/अभिलषितार्थचिंतामणी ग्रंथातील 'गीत विनोद' या विभागात महाराष्ट्रातील स्त्रिया धान्य कांडताना ओव्या म्हणतात, असा उल्लेख येतो. "महाराष्ट्रेषु योषिद्भिरेवी ह्या तु कण्डने" असा तो ठळक उल्लेख आहे. या ग्रंथात काही मराठीसदृश पदेसुद्धा दिसतात, ज्यातून त्या काळातील भाषेच्या रूपाची महत्त्वपूर्ण माहिती मिळते. स्वतः सोमेश्वरदेवाने या ग्रंथाला 'जगदाचार्यपुस्तक' असे नाव दिले आहे. जगाला मार्गदर्शन करण्याच्या हेतूने, आचार्यभावनेने लिहिलेले पुस्तक असा त्याचा आशय आहे. या ग्रंथात देवता, शासनपद्धती, क्रीडा, संगीत, ललित कला आणि अशा अनेक विषयांचा सविस्तर आढावा घेतला आहे. मानसोल्लास हा केवळ कलेवर आधारित नसून त्या काळातील समाजजीवन, संस्कृती आणि राज्यकारभार यांचेही जिवंत चित्रण करणारा अमूल्य ग्रंथ मानला जातो.

विवेकसिंधू

मुकुंदराज हे मध्ययुगातील एक महत्त्वाचे, पण वादग्रस्त मराठी संतकवी व तत्त्वज्ञ मानले जातात. विवेकसिंधू या ग्रंथाचे कर्ते म्हणून त्यांचे स्थान मराठी वाङ्मयाच्या इतिहासात विशेष महत्त्वाचे आहे. पूर्वी अनेक विद्वानांनी मुकुंदराजांना मराठीचा आद्य ग्रंथकार मानले होते; मात्र त्यांच्या काळाविषयी व स्थळाविषयी झालेल्या सखोल संशोधनामुळे ही समजूत आज वादग्रस्त ठरली आहे. विवेकसिंधूतील एका ओवीमध्ये ग्रंथरचनेचा काळ शकसंवत १११० च्या सुमाराचा सांगितला आहे. या आधारावर ग्रंथरचना इ.स. ११८८ मध्ये झाली असे मानले जात होते. परंतु हा कालोल्लेख संशयास्पद आहे. कारण हा उल्लेख उपलब्ध असलेल्या ९२ हस्तलिखित प्रतींपैकी केवळ दोन प्रतींत आढळतो. शिवाय दिलेला शकसंवत आणि राजवटीचा उल्लेख ऐतिहासिक दृष्ट्या जुळत नाही. ओवीत उल्लेखिलेला शार्ङ्गधर राजा अद्याप निश्चित ओळखता आलेला नाही. त्यामुळे हा कालोल्लेख नंतर घुसडलेला असावा, असे विद्वानांचे मत आहे.

मुकुंदराजाचा काळ ठरविताना जैतपाळ या राजाचा उल्लेख महत्त्वाचा ठरतो. विवेकसिंधूमध्ये जैतपाळ राजाने ग्रंथरचनेस प्रोत्साहन दिल्याचा निर्देश आहे. मध्य प्रदेशातील खेडला (जि. बैतूल) येथील शिलालेखात शकसंवत १२८५ (इ.स. १३६३) मधील जैतपाळ राजाचा उल्लेख आढळतो. या शिलालेखातील वंशपरंपरा विवेकसिंधूतील वर्णनाशी जुळते. तसेच महानुभाव पंथातील ग्रंथांमधूनही या जैतपाळाचा उल्लेख मिळतो. या पुराव्यांवरून मुकुंदराजाचा काळ चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धात निश्चित करता येतो. यावरून मुकुंदराज हे ज्ञानेश्वरांनंतर सुमारे पन्नास वर्षांनी होऊन गेलेले असून ते मराठीचे आद्य कवी नाहीत, हे स्पष्ट होते. मुकुंदराजाचा महानुभाव पंथाशी गुरुपरंपरेद्वारे संबंध दिसतो. त्यांनी आपले परात्परगुरू हरिनाथ असल्याचे नमूद केले आहे. हे हरिनाथ म्हणजे महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधरस्वामी होत. तरीही तत्त्वज्ञानाच्या बाबतीत मुकुंदराजांवर महानुभावांच्या द्वैतमताचा प्रभाव दिसत नाही. ते कट्टर अद्वैतवादी असून शंकराचार्यांच्या वेदान्तपरंपरेचे अनुयायी आहेत.

मुकुंदराजांचे मुख्य ग्रंथ विवेकसिंधू आणि परमामृत हे होत. विवेकसिंधू हा ओवीबद्ध ग्रंथ असून त्यात अद्वैत वेदान्ताचे तर्कप्रधान विवेचन केले आहे. ज्ञानेश्वरांप्रमाणे रसवृत्तीचा मार्ग न स्वीकारता मुकुंदराजांनी तर्क आणि विवेक यांच्या आधारे तत्त्वज्ञान मांडले आहे. त्यांनी अध्यात्मासारखा गंभीर विषय रसात्मक शैलीत मांडणे अयोग्य ठरविले असून ज्ञानेश्वरांच्या पद्धतीवर अप्रत्यक्ष टीकाही केली आहे. त्यामुळे विवेकसिंधू काव्यदृष्ट्या मर्यादित असला, तरी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो. अशा प्रकारे मुकुंदराज हे मराठी वाङ्मयातील आद्य कवी नसले, तरी मराठीत अद्वैत वेदान्त मांडणारे पहिले महत्त्वाचे तत्त्वज्ञ कवी म्हणून त्यांचे स्थान अढळ आहे.

लीळाचरित्र

म्हाइंभट हे मराठी साहित्याच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे व आद्य ग्रंथकार मानले जातात. त्यांनी रचलेले *लीळाचरित्र* हे मराठीतील पहिले चरित्रग्रंथ असून त्यामुळे मराठी गद्यपरंपरेला एक भक्कम पाया मिळाला. महानुभाव पंथाच्या तत्त्वज्ञानाचा, जीवनदर्शनाचा व समाजसंपर्काचा हा ग्रंथ विश्वसनीय दस्तऐवज ठरतो. *लीळाचरित्र* ग्रंथाची सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे त्याची घरगुती, सहज व प्रवाही गद्यशैली. या ग्रंथात अलंकारिकता किंवा कृत्रिमता नसून आठवणींच्या स्वरूपात आलेले निवेदन आहे. त्यामुळे तत्कालीन मराठी भाषेचे लौकिक व व्यवहार्य स्वरूप स्पष्टपणे समोर येते. 'एकांक' हा भाग विशेषतः भाषाशैलीच्या दृष्टीने प्रभावी ठरतो.

चरित्रलेखनात कल्पनारम्यता न आणता प्रत्यक्ष अनुभव, ऐकीव माहिती आणि भक्तांकडून मिळालेल्या लीळा प्रामाणिकपणे नोंदविणे, ही म्हाइंभटांची संशोधकवृत्ती दर्शवते.

चक्रधरांचे शिष्य असलेल्या म्हाइंभटांनी सु. १२७८ मध्ये 'लीळाचरित्र' हा आपला पहिला ग्रंथ पूर्ण केला. या ग्रंथात त्यांनी श्रीचक्रधरांच्या आठवणी म्हणजेच 'लीळा' गोळा करून लिहिल्या आहेत. लीळाचरित्राचे दोन भाग आहेत—पूर्वार्ध आणि उत्तरार्ध. याशिवाय 'एकांक' नावाचा भाग आहे ज्यात श्रीचक्रधरांनी लोकांशी उपदेश करण्यापूर्वी केलेल्या एकाकी भ्रमंतीतील अनुभव नोंदवले आहेत. या लीळा गोळा करताना महानुभाव पंथाचे पहिले आचार्य श्रीनागदेवाचार्य (भटोबा) यांनी त्यांना मोठे साहाय्य केले. उत्तरार्धातील घटनांसाठी नागदेवाचार्य महत्त्वाचे सहकारी ठरले; पण चक्रधरांच्या जीवनाच्या पूर्वार्धातील लीळा त्यांना माहीत नव्हत्या, कारण ते चक्रधरांच्या संपर्कात नंतर आले. त्यामुळे म्हाइंभटांना त्या लीळा इतर जाणकार भक्तांकडून शोधून घ्याव्या लागल्या. काही वेळा तर एका लीळेसाठीही त्यांनी भक्तांची विनंती केली, अशी नोंद आढळते.

लीळाचरित्र हा ग्रंथ अनेक कारणांनी महत्त्वाचा मानला जातो. मराठीतला पहिला चरित्रग्रंथ म्हणून त्याचे विशेष स्थान आहे. या ग्रंथातील लीळा साध्या, घरगुती गद्यात सांगितलेल्या असल्यामुळे त्या काळातील बोलचाल मराठीचा स्वरूप स्पष्ट दिसते. यातील भाषाशैली साधी, स्वच्छ आणि थेट आहे. विशेषतः 'एकांक' हा भाग भाषाशैलीच्या दृष्टिकोनातून उत्तम मानला जातो. लीळाचरित्र हा महानुभाव पंथाच्या पुढील संपूर्ण वाङ्मयाचा पाया ठरला. सिद्धांतसूत्रपाठ, दृष्टांतपाठ यांसारखे ग्रंथ त्यातूनच पुढे विकसित झाले. हा ग्रंथ एका नवपंथसंस्थापकाचे, समाजाच्या सर्व थरांशी नाते निर्माण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचे चरित्र मांडतो, त्यामुळे त्यात त्या काळातील समाजचित्रही जीवन्तपणे दिसते. ग्रंथातील व्यक्तिचित्रे रोचक असून पंथाच्या इतिहासाला त्यातून भक्कम आधार मिळतो.

ज्ञानेश्वरी

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी *ज्ञानेश्वरी* हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आणि निर्णायक पुरावा मानला जातो. इ. स. १२९० साली संत ज्ञानेश्वरांनी रचलेली *ज्ञानेश्वरी* ही भगवद्गीतेवरील मराठी टीका असली, तरी ती केवळ भाषांतर नसून स्वतंत्र, मौलिक आणि तत्त्वज्ञानात्मक साहित्यकृती आहे. या ग्रंथामुळे मराठी भाषेची तात्त्विक, वैचारिक व साहित्यिक क्षमता सिद्ध होते. *ज्ञानेश्वरी*ची भाषा ओवीबद्ध, मधुर, प्रवाही व अत्यंत संस्कारित आहे. संस्कृत गीतेतील गूढ तत्त्वज्ञान सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्याचे कार्य ज्ञानेश्वरांनी मराठीतून साधले. ही

लोकाभिमुखता अभिजात भाषेचे एक प्रमुख लक्षण आहे. ज्ञानेश्वरीतील शब्दसंपदा, रूपके, उपमा, दृष्टांत आणि प्रतिमानिर्मिती मराठी भाषेच्या समृद्धतेची साक्ष देतात.

या ग्रंथात अद्वैत वेदांत, भक्तीयोग, कर्मयोग व ज्ञानयोग यांचा समन्वय साधलेला आहे. तत्त्वज्ञानाची ही उच्च पातळी व्यक्त करण्यासाठी मराठी भाषा समर्थ आहे, हे ज्ञानेश्वरी ठामपणे सिद्ध करते. 'आवडीनें बोलिले विश्वरूप' यांसारख्या ओवींमधून कवीची तात्त्विक उंची आणि भाषिक प्रतिभा प्रत्ययास येते.

ज्ञानेश्वरी ही संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेत रचलेली भगवद्गीतेवरील पहिली आणि सर्वात महत्त्वाची रचना आहे. वारकरी परंपरेत तिला अत्यंत मानाचे स्थान आहे. ही कृती म्हणजे प्रत्यक्ष काव्याच्या शैलीत सांगितलेले प्रवचन आहे. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या मोठ्या भावाच्या आणि गुरु निवृत्तिनाथांच्या आदेशाने ही टीका सांगितली. गीतेतील सातशे श्लोकांचा अर्थ त्यांनी मराठीतल्या सुमारे नऊ हजार ओव्यांमध्ये रसाळपणे आणि सोप्या भाषेत मांडला आहे. ज्ञानेश्वरी ही शंकराचार्यांच्या भाष्याप्रमाणे 'प्रतिपदार्थ' सांगणारी टीका नाही. ती गीतेचा खोल भाव पकडून केलेली 'भावार्थदीपिका' आहे. १९९० साली भारत सरकारने या ग्रंथाच्या गौरवार्थ दोन रुपयांचे टपाल तिकीटही प्रकाशित केले.

ज्ञानेश्वरांची ही टीका त्यांच्या स्वतंत्र विचारशक्तीची देणगी आहे. गीतेतील अध्यायसंगती आणि श्लोकांच्या परस्पर जोडणीचा विचार करताना त्यांची विचारप्रवणता ठळक दिसते. सुरुवातीचे अध्याय त्यांनी थोडक्यात समजावले, पण पुढील अध्यायांमध्ये त्यांची प्रतिभा विलक्षण फुललेली दिसते. गुरुसेवा, श्रोत्यांना केलेली प्रार्थना, मराठी भाषेचे केलेले कौतुक, गीतेचे स्तवन, श्रीकृष्ण-अर्जुनातील प्रेमभाव हे सर्व विषय सांगताना ज्ञानेश्वरांची वाणी अत्यंत काव्यमय झाली आहे. आजवर गीतेवर अनेक भाष्ये लिहिली गेली असली तरी विद्वत्ता, काव्यगुण आणि संतत्व या तिन्ही दृष्टिने ज्ञानेश्वरी सर्वश्रेष्ठ आहे, असे डॉ. रा. द. रानडे यांचे मत आहे. ज्ञानेश्वरांनी गीतेची टीका शंकराचार्यांच्या भाष्यावर आधारून केली असली, तरी त्यांच्या स्वतःच्या नाथपंथीय साधनेचा प्रभावही ग्रंथात दिसतो. योग, स्वानुभव, ध्यान इत्यादी विषय तेथथे येतात. मात्र ते सर्व त्यांनी भक्तीच्या आधारे जोडले आणि भागवत परंपरेच्या भक्कम भूमीवर स्थापित केले. ज्ञानेश्वरी मूळतः भक्तिरसप्रधान आहे. ईश्वरप्राप्तीचे सर्वश्रेष्ठ साधन 'भक्ती' हेच असल्याचा मोठा संदेश या ग्रंथातून मिळतो.

३.८ बृहन्महाराष्ट्रातील मराठीचे प्राचीन संदर्भ

- **पंडिताराध्यचरित : पालकुरिकी सोमनाथ**

पालकुरिकी सोमनाथ (सु. १२व्या शतकाचा उत्तरार्ध) हे तेलुगू-कन्नड साहित्यपरंपरेतील एक महत्त्वाचे कवी, विचारवंत व वीरशैव (लिंगायत) परंपरेतील संत मानले जातात. ते प्रामुख्याने काकतीय राजवटीच्या काळात कार्यरत होते. संस्कृत, तेलुगू व कन्नड या तिन्ही भाषांवर प्रभुत्व असलेले सोमनाथ हे बहुभाषिक साहित्यनिर्माते होते, ही बाब त्यांना मध्ययुगीन भारतीय साहित्यपरंपरेत वेगळे स्थान देते. त्यांची सर्वात प्रसिद्ध कृती *पंडिताराध्य चरित्र* (तेलुगू) असून हा ग्रंथ वीरशैव परंपरेतील आचार्य पंडिताराध्य यांच्या जीवनावर आधारित आहे. या ग्रंथात भक्ती, वैराग्य, सामाजिक समता आणि शिवभक्ती यांचे तत्त्वज्ञान प्रभावीपणे मांडले आहे. चरित्रात्मक निवेदन असूनही ग्रंथात काव्यात्मता, दृष्टांत आणि संवादात्मकता आढळते.

पालकुरिकी सोमनाथांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी लोकभाषेला प्रतिष्ठा मिळवून दिली. संस्कृतप्रधान धार्मिक विचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी तेलुगू व कन्नड या देशी भाषांचा वापर केला. त्यामुळे ते ज्ञानेश्वर, बसवेश्वर यांच्याप्रमाणे लोकाभिमुख धार्मिक साहित्यपरंपरेतील महत्त्वाचे कडी ठरतात. त्यांच्या साहित्यामध्ये जातिभेदाविरुद्ध स्पष्ट भूमिका, कर्मकांडावर टीका आणि वैयक्तिक भक्तीचा पुरस्कार दिसून येतो. वीरशैव चळवळीच्या सामाजिक आशयाला त्यांच्या लेखनामुळे वैचारिक बळ मिळाले. तथापि, काही ठिकाणी त्यांच्या लेखनात पंथनिष्ठ आग्रह अधिक जाणवतो, ही त्यांची मर्यादा मानली जाते.

बाराव्या शतकात रचलेल्या एका तेलगू काव्यातही मराठीचा उल्लेख मिळतो. अष्टभाषांमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या कवी पालकुरिकी सोमनाथ यांनी लिहिलेल्या 'पंडिताराध्यचरित' या काव्यात मराठी यात्रेकरूंचे बोलणे जसेच्या तसे दिले आहे. या काव्याचा नायक श्रीशैल यात्रेस जातो. तिथे अनेक भाषा बोलणारे भक्त असतात; त्यात मराठी माणसे कोणती वचने बोलतात, याचे पद पुढीलप्रमाणे आहे—

"माग राहू नको मज बापू म्हणत । भागवत वाटे भक्त ते म्हणत

वरलिंग गुरुलिंग शंभू जो म्हणत । पुरवंर केत्ती दूर पुर हो ते म्हणत

अखिसिरी कैलास दखसील म्हणत । मग महाराटाचा महादेव आमचा

गगनराणा आमचा कैलास आमचा । अखुमराणा आमचा सुखदेव आमचा

सुखकर आपले शुभदेवू आमचा । अरे ठाव हे भक्त आपले लिंग

सिरीगिरी मल्लया चरम दियंता । सुखताल जतिताल जतिमानला खेळणाचे

मखर जे सिरीगिरी मल्लया राणा । आला निबंधन ताळ गीतासी

माळा समर्पण मल्लया राणा । साब्ब संताप संसार नाटकने

प्रब्बत मल्लय्या पुणु हरजाण चित्त । आमचा महाभक्त अखिल सम्मेल

शरण हे चिदूवर जवळ ते म्हणत । वरसुख सुखी माझु वरद हे म्हणत"

हे संपूर्ण पद आर्यभाषेत आहे आणि या काव्यात कवी महाराष्ट्राला 'आरे देश' आणि मराठीला 'आरे भाषा' असे म्हणतो. पदातील 'मल्लय्या' हा देव खंडोबा असल्याचे मानले जाते.

एकूणच, पालकुरिकी सोमनाथ हे दक्षिण भारतीय लोकभाषा साहित्याच्या विकासातील अग्रगण्य व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी चरित्रलेखन, भक्तिसाहित्य आणि समाजसुधारणेचा संगम साधला. त्यामुळे भारतीय अभिजात व देशी साहित्यपरंपरेच्या अभ्यासात त्यांचे योगदान मोलाचे व अविस्मरणीय आहे.

- **मैलंगीचा शिलालेख**

इसवी सन १२९० मध्ये मैलंगी - (कर्नाटक) म्हैसुर प्रांतात होयसळ राजाचा मंत्री पेरुमल याने विद्यामंदिर स्थापन केले असून त्यात मराठी भाषेच्या अध्यापनाची सोय केली असे हा शिलालेख सांगतो. तो उल्लेख खालील प्रमाणे आहे.

"नागर कन्नड तिगुळ आरेवन ओडिसुव बालसिक्षे उपाध्यर जीवितके वर्ष के गद्याणं आरु."

याचा अर्थ : नागर (म्ह. संस्कृत), कन्नड, तेलुगू व आरे (म्ह. आर्य, मराठी) या चार भाषा शिकविण्याकरिता उपाध्यायाच्या, म्हणजे शिक्षकाच्या उपजीविकेसाठी प्रतिवर्षास सहा गद्याण (एक नाणे)." असा आहे.

- **राजीमतीप्रबोध**

सन ११ व्या शतकात यशश्चंद्र नावाच्या जैन पंडिताने रचलेल्या 'राजीमतीप्रबोध' या संस्कृत नाटकात मराठी भाषेतील उतारा आढळतो. राजमाती ही या नाटकाची नायिका असून तिच्या रूपाचे वर्णन 'महाराष्ट्रिकाकडून करविले' अशी नोंद आहे.

"महाराष्ट्रिकमुखमीक्षते राजा । (अथ महाराष्ट्रिकः ।) देव । चतुरांगुलाची जीहा' ।

मी कांइ सांघओं । गोमटी, मुहरे फाफट, निलाड चापट्ट । अखंड याली ताहीची ।

वीणी काली । न छोटी न मोटी । वानि चांपाहूली नाही कांइ ताहि तुलि । नाहि उंडी

जाणउं सुखकरी कंडी । बोलती मुहुरवाणी । चालती सुजाणी । राउल खरी रूडी

अमृतकरी इसी कुयडी । ना पभूदं रुपेढुं जाणामि ।... ॥

- **धर्मोपदेशमाला**

इ.स. ८५९ (विक्रम संवत् ९१५) धर्मोपदेशमाला या ग्रंथात मराठी भाषेचा उल्लेख आहे. मराठी भाषा कशी आहे हे यात सांगितले आहे. हे पुढील प्रमाणे -

सललयि-पय-संचारा पयडियमअणा सुवण्णरयणेल्ला।

मरहठ्य भासा कामिणी य अडवीय रेहंती ।।

वरील श्लोकाचे संस्कृत रूपांतर पुढील प्रमाणे

सललितपदसंचारा प्रकटितमदना सुवर्णरचनावती।

मरहट्ठ भाषा कामिनी य अटवी च राजन्ते ।।

मराठी भाषा सुंदर कामिनीप्रमाणे असून ती अटवीप्रमाणे सुंदर गतीची, मदनाने भरलेली आणि चांगल्या वर्णाची आहे. असे मराठी भाषेचे कौतुक. केले आहे.

- **सावरगावचा शिलालेख**

सप्टें. ११६४ शके १०८६ आश्विन शु. १ उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील काटी सावरगाव येथे हा शिलालेख आहे. 'महामंडलेश्वर कडंबकुलतिलक मारडदेवाने' दिलेल्या दानासंबंधीचा उल्लेख या लेखात आहे.

सकु १०८६ तारण संव - १

त्सरे अश्विन सुध १ गुरौकडं (ब) २

कुलतिलक महामंडलेस्वर मा ३

रड (?) देवगणक तत्पादपद्मोपजी ४

वि भालि अंबादेवीचेआ कीर्तनासि वीसोवे म ५

माधवनायके लाहिंपनाथके मासप्रति द्रा ६

म २ दत्त (न) फेडी तो स्वान गावपशुलय ७

स्य यस्य य (दा) (भू) मी तस्य तस्यतदा फ (लं) ८

- **परळचा शिलालेख**

इ.स. ११८७ (शके ११०८) सरकारी बंगला बांधीत असताना परळ येथे हा लेख सापडला. हा ज्ञानेश्वरीच्या अगोदर १०३ वर्षात्ता आहे. या शिलालेखात कोकणच्या अपरादित्य राजाने श्री वैद्यनाथ देवाच्या पूजेसाठी' 'षट्षष्टि' (साष्टी) विभागातील माहुलीजवळ २४ द्राम उत्पन्नाच्या जमिनीची देणगी दिल्याचे म्हटले आहे. हा लेख संस्कृत भाषेत असून शेवटची शपथ मराठीत आहे.

अथ तु जो कोणु हुवि ए शासन लो।।२२

पी तेया श्री वैद्यनाथ देवाची भाल सकुटुंबीआ पडे।। तेहाची।।२३॥

माय गाढवे विजे ॥२४॥

- **पाटणचा शिलालेख**

इ.स. १२०६ (शके ११२८) चाळीसगावापासून दहा मैलावर असलेल्या पाटण या गावी असलेल्या भवानी मातेच्या मंदिरात हा शिलालेख आहे. हा लेख भाषेच्या दृष्टीने स्पष्ट असून प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य यांच्या चांगदेव नावाच्या नातवाने कोरला आहे. देवगिरीच्या सिंघण यादवाचे मांडलिक असलेल्या निकुंभ राजकुलाच्या आश्रयाने ज्योतिषशास्त्राचे अध्ययन, अध्यापन करण्यासाठी मठाची स्थापना केल्याचा यात उल्लेख आहे. मठाचा खर्च चालविण्यासाटी कोणकोणत्या गोष्टी द्यायच्या त्याचा उल्लेख या लेखात आहे. या लेखाच्या शेवटच्या चार ओळी मराठी भाषेचे रूप दर्शवितात. यात इया, पाटणी, केणे, तेहाचा, ब्राह्मणा, दिन्हला, तेलिया, मविजे, मवावे इत्यादी मराठी शब्दरूपे आहेत.

'स्वस्ति श्री शाके ११२८ प्रभवसंवत्सरे श्रावणमासे पौर्णमास्यां चंद्रग्रहणसमये श्री

सोइदेवेन सर्वजनसंनिद्धौ हस्तोदक पूर्वकं विजगुरूरचित मठायाय स्थानः ॥२१॥'

दत्तं।। तद्यथा ।। इयां पाटणी जे केणे उघटे तेहाचा

असि आउं जो राउला होता ग्राहकापासी तो मठा दिन्हला।।

ब्राह्मणा जे विक (ते) यापासी ब्रह्मोत्तर ते ब्रह्मणी दिन्हले ग्राह॥२२॥

कापासी दामाचा वीसोबा आसूपाठी नग (रे) दिन्हला ।।

तुलदाइया बैला सिद्धवै।। बाहीरिला असूपाठी गिधवे

ग्राहकापासी। पांच पोफली ग्राहकापासी ।। पहि ॥२३॥

- **खोलेश्वैराचा शिलालेख, आंबेजोगाई**

इ.स. १२२८ (शके ११५०) खोलेश्वर मंदिराजवळ हा लेख मिळाला. या शिलालेखात ४७ ओळी असून ज्ञानेश्वरीच्या पूर्वी ६२ वर्ष अगोदरचा हा शिलालेख आहे. आंबेजोगाईच्या पहिल्या ३५ आणि शेवटच्या ५ ओळी संस्कृत आहेत. मधल्या ६-७ ओळी मराठी आहेत असे वाटते. संस्कृतमध्ये लिहून झाल्यावर तोच मजकूर महाराष्ट्र भाषेत लिहिला आहे.

'तदेव महाराष्ट्र भाषमात्र लिख्यते। ळा ळ आंम्रदेशे लघुवाड॥३६॥

धी नाम ग्रामो दत्तः।। तथा बेढे सुकेडादेउ। असिदत्त।

उदगिरि रघुवेसिगे विडिवासह प्रति.... लिक।। तथा आंब्रपुरे'

- **पंढरपूरचा शिलालेख**

इ.स. १२७३ (शके ११९५) पंढरपूरच्या श्रीविठ्ठल मंदिरात हा शिलालेख आहे. याला चौऱ्यांशीची शिळा म्हणतात. या शिळेस पाठ लावली म्हणजे मनुष्य चौऱ्यांशी योनीतून मुक्त होतो अशी समजुत आहे. श्रीविठ्ठलाचे मंदिर बांधण्यासाठी ज्यांनी मदत केली त्यांची नावे या शिळेवर आठ रकाने काढून कोरलेली आहेत. यातील काही नावे आणि शब्द मराठी वळणाची आहेत. ती म्हणजे चालावेया, पैकाचा, रामचंद्र देवराये, देवरायाची, करनु सेठी, तेयाची, विट्ठळाची आण इत्यादी

स्वस्ती श्री सकु ११९५ श्रीमुख संवत्सरे फागनिपूर

श्रीविठ्ठलदेव रायासि तिसा सिति

फुले दांडे आचंद्रार्क चालावेआ नाना भक्त

मालीआं दत्त पैकाचा विवरु ।।

- **सासवडजवळील 'पूर'चा शिलालेख -**

इ.स. १२८५ (शके १२०७) पुणे-सासवड गावाजवळ पूर गावात ज्ञानेश्वरीच्या ५ वर्ष पूर्वीचा हा शिलालेख आहे. या शिलालेखात एकूण अकरा ओळी आहेत.

स्वस्ति स्त्री सक १२०७

वर्षे प (पा) र्थिव सवछरे

आस्विन (ना) दो अद्यैह स्त्री

म प्रौ (त्प्रौ) ढप्रताप चक्रव

र्ती स्त्रीरामच (चं) द्रदेवविजय

राज्योदैत दपादपदुमोपजिविस

कळकर्णा (रणा) धिप हेमा डिपंडि

तो। त बोइ...दंडनायक स्त्रीपत प (प्र) भु

णे नायक। रामचंददेवो नाडिती जिवि....

- **उनकेश्वराचा शिलालेख**

इ. स. १२८९ (शके १२११) मधील आहे. हा शिलालेख किनवट तालुक्यात उन्हकदेव येथील मुख्य देवालयाच्या दक्षिणेकडील दरवाजाच्या डाव्या बाजूला भिंतीत बसवलेल्या शिळेवर कोरलेला आहे. हा शिलालेख यादववंशीय राजा रामचंद्र याच्या कारकीर्दीत कोरला गेलेला आहे. यात रामचंद्र यादव, त्याचा एक नातलग वंकदेव, त्याचा करणाधिप हेमाडपंडित, त्याचा हस्तक सोपदेव पंडित व माहूरचा रहिवासी सरण नायक इ. नावे यात असून सरण नायकाने उनकेश्वराच्या देवालयाचा जीर्णो द्वार केल्याचा उल्लेख आहे. या लेखात १८ ओळी आहेत. पहिल्या तीन ओळी सोडल्यास लेख मराठी भाषेत यादवकालीन देवनागरी लिपीमध्ये कोरलेला आहे.

"ॐ नमो गणाधिपते नमः स्वस्ती सी सके १२११।।

वीक्रम संवत्सरे आ. स्व

प्रताप चक्रवर्तिः स्त्री रामचंद्र देवः विजयोप्रत पाद पद् मोपजिविः हाचि साहा

स्सी वकदे

वः प्रधान हेमाडिपंडितः तऐ निरोपीत नाएकु टकतु सामेदयो पंडितः तास्मिकाले

वर्तमाने

त्रेता युगी नामुः वनवासप्रसंगीः सभंगाचआ आस्त्रया आलेः

सरभंग प्रीत्यर्थः हे उद

दक उप्ल केलेः तदा काल्ये स्सि देवयेचित तीर्थ हेः

हऱ्याहिऱ्या प्रसादे मातापुरनिवासी क-सी

ठ्यंः कौडण्यगोत्रः सरागुना एकः रूतेमेवूतेवैः सकव प्रासादातु

केले तो ऱ्याम प्रासादं संपुर्ण

जालाः तेयाचा नमस्कारु हऱ्याहिऱ्या देवता सकलासि

नमस्कारु त्रिकालः वचिता विजैयाः...लटिग्रामु ॥२॥"

ह्यापुढे देवालयास दान दिल्याचा उल्लेख आहे. ह्या लेखातील भाषा संस्कृतमिश्र मराठी आहे. काही रूपे अस्सल मराठी शिक्क्यांची आहेत.

३.९ भाषा शिक्षण आणि अनुदेशन पद्धती

भाषा शिक्षण आणि अनुदेशन पद्धती ही भाषा शिकवण्याच्या विविध पध्दतीचा संग्रह आहे. या पद्धती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाच्या आहेत. योग्य अनुदेशन पद्धतीचा वापर केल्यास भाषा शिक्षण अधिक प्रभावी आणि परिणामकारक होऊ शकते. भाषा शिक्षण आणि अनुदेशन पद्धती हा एक व्यापक विषय आहे. भाषेचे अध्यापन करताना मातृभाषा, दुसरी भाषा, परकीय भाषा शिकताना विविध पद्धतीचा वापर केला जातो. शिक्षकाची भूमिका, विद्यार्थ्यांचा सहभाग आणि भाषा शिकण्याची उद्दिष्टे यावर अवलंबून असतात. विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन, श्रवण आणि संभाषण ही कौशल्य विकसित करण्यावर भर देते. शिक्षकाने विद्यार्थ्यानुसार अध्यापन पध्दतीत लवचिकता ठेवणे गरजेचे आहे.

३.९.१ बहुभाषिकता

बहुभाषिकता म्हणजे बहुविध भाषा बोलण्याची, समजण्याची, वापरण्याची क्षमता होय जेव्हा एखादी व्यक्ती दोन भाषा वापरते तेव्हा त्याला द्विभाषिकता म्हणतात दोन पेक्षा जास्त भाषा बोलणे किंवा समजणे त्याला बहुभाषिकता असे म्हणतात.

प्रा. रमेश वरखेडे बहुभाषिकतेबद्दल म्हणतात, "एखाद्या व्यक्तीच्या किंवा समाजाच्या/देशाच्या संज्ञापन व्यवहारात तीन किंवा त्याहून अधिक भाषांचा उपयोग केला जातो तेव्हा अशा संज्ञापन व्यवहाराला बहुभाषिकता म्हणतात." भारत, मलेशिया, आफ्रिका, इस्त्रायल, सिंगापूर ही राष्ट्र बहुभाषिक राष्ट्र म्हणून ओळखली जातात. एखादा देश बहुभाषिक म्हणून

ओळखला जातो याचा अर्थ त्या देशातील सर्वच माणसांना तीन किंवा अधिक भाषांचे ज्ञान असते असे नाही. सामान्यतः बहुभाषिक व्यक्तीचे स्वरूपाबद्दल पुढीलप्रमाणे आपले मत व्यक्त केले आहे.

(१) एक भाषा उत्तम प्रकारे समजते, बोलता येते.

(२) एकाच भाषेत उत्तम प्रकारे लिहिता येते.

(३) लघुक्षेत्रानुसार विशिष्ट भाषेचा उपयोग करण्याचे संकेत ठरलेले असतात.

उदाहरणार्थ, एक भाषा घरात, दुसरी व्यवसायक्षेत्रात, तिसरी बाजार-हाटात.

(४) कोणत्या क्षेत्रात कोणती भाषा वापरायची ह्याचे संकेत ठरलेले असतात. उदाहरणार्थ, ज्ञान-विज्ञानाची भाषा, धर्माची भाषा आणि व्यक्तिगत संभाषणाची भाषा." [१९]

"बहुभाषिकता शिकल्याने मुले बौद्धिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध होतात वेगवेगळ्या भाषेतील अभिव्यक्ती, संरचना, शब्दविधी, वाक्य प्रयोग आणि वाङ्मयातून ते विचारांच्या अनेकविध विधी आत्मसात करतात. "मानवी समूहात, एकभाषिकता नाही, तर बहुभाषिकताच रूढ असल्याचे सर्वसामान्यपणे दिसून येते. समाजात बहुभाषिक क्षमता आणि सज्ञानात्मक लवचिकता त्यांच्यामध्ये एक सकारात्मक संबंधाचे भक्कम पुरावे बघायला मिळतात. एका वेळी अनेक भाषा शिकणे किंवा बोलणे ही एखाद्या माणसासाठी काही आश्चर्याची गोष्ट नाही. वास्तवात, बऱ्याच भाषिक-समुदायांमध्ये रोजच्या कृती करताना मिश्र भाषेचा व्यवहार ही आता सर्वसामान्य गोष्ट झाली आहे. बहुभाषिक वर्ग हा समाजाचेच एक जैव अंग आहे आणि ती एक सामान्य स्वाभाविक प्रक्रिया आहे."[२०]

मध्ययुगीन काळात भारतात बहुभाषिकतेला विशेष महत्त्व होते. त्या काळात लोक एकापेक्षा अधिक भाषा वापरत असत. राजकारभार, धर्म, साहित्य आणि व्यापार यांसाठी वेगवेगळ्या भाषांचा उपयोग केला जात होता. संताच्याही रचनेमध्ये बहुभाषिकता पहावयास मिळते. कारण संत नामदेवांच्या हिंदी अभंगातून मराठी भाषेच्या छायेखाली वाक्ये एकरूपता दिसते.उदा. 'झिलमिलिकारू दिसत' याचा मराठी अनुवाद 'चमचम करणारा प्रकाश दिसतो.'

संत नामदेव हे मराठी भाषिक असून त्यांनी हिंदी भाषेमध्ये अभंग रचना केली आहे. याचाच अर्थ असा की मध्ययुगीन काळात बहुभाषिकता होती. त्याची काही उदाहरणे पुढील प्रमाणे –

पतित पावन माधऊ बिरदु तेरा। धंनि ते वै मुनि जन, जिन धिआइउ' हरि प्रभू मेरा ॥१॥ मेरै माथै लागीलै धूरि गोबिंद चरणन की। सुर नर मुनि जन तिनहु ते दूरि ।।रहाउ ।।दीन का दइआलु माधौ गरब परिहारी । चरण सरन नामा बलि तिहारी ॥२॥ [२१]

हे माधवा ! पतित लोकांना पावन करणे हे तर तुझे ब्रीद आहे. माझ्या हरीचे अंत:करणापासून प्रेमाने ज्यांनी ध्यान केले, ते मुनिजन धन्य धन्य होत ॥१॥ प्रभूच्या चरणकमलाची धूळ माझ्या मस्तकाला लागलेली आहे. हे भाग्य सुर, नर, मुनी यांनादेखील बुर्लभ आहे ॥रहाउ ॥ तू गरिबांवर दया करणारा आहेस. उन्मत्त लोकांचा अहंकार दूर करणारा आहेस. हे माधवा ! मी तुझ्या चरणकमळाजवळ आलो आहे. तुला पूर्णपणे शरण आलो आहे. तुझ्यावरून जीव ओवाळून टाकत आहे. असे विश्वसंत नामदेव महाराज म्हणतात.

जैसी भूखे प्रीति अनाज ॥ त्रिखावंत जलसे ती काज ॥ जैसी मूढ कुटंग पराइण ।। जैसीं नामे प्रीति नराइण ।॥१॥ नामे प्रीति नाराइण लागी ।। सहज सुभाइ भइओ बैरागी ।। रहाउ ।। जैसी पर-पुरुखा रत नारी । लोभी नरु धनका हितकारी।। कामी पुरखु कामनी पिआरी ।। जैसी नामें प्रीति मुरारी ॥२॥ साई प्रीति जि आपे लाइ ।। गुर परसाई दुबिधा जाइ ।। कबहूं न तुटसि रहिआ समाइ नामे चितु लाइआ ।। सचि नाइ ॥३॥ जैसी प्रीति बारिक अरु माता ।। जैसा हरिसे ती मनु राता ।। प्रणवै नामदेउ लागी प्रीति । गोविंद बसै हमारे चीति ।।४।। [२२]

जसा भुकेलेला माणूस अतिशय उत्कंठतेने भोजन करतो अथवा तहानलेला मनुष्य जना उतावळेपणे पाणी पितो, तसेच अज्ञानी माणूस फक्त कुटुंबातच रंगून गेलेला असतो, ती त्याप्रमाणे नारायणाच्या प्रीतीची अतिशय ओढ लागलेली आहे.

३.९.२ संवाद क्षमता

संवाद क्षमता म्हणजे विचार, भावना आणि माहिती योग्य पद्धतीने दुसऱ्यांपर्यंत पोहोचविने होय संवाद क्षमता वाढविण्यासाठी भाषेत स्पष्टता आत्मविश्वास आणि समजूत घेण्याची वत्ती महत्त्वाची आहे .संवाद क्षमता वाढल्याने विचारांची देवाण-घेवाण होते व्यक्ती आपल्या मनात सतत चालत असलेले भावनिक युद्ध संवादातून व्यक्त करू शकतो व्यक्तीने आपल्या भावना प्रकट केल्यामुळे त्याच्या आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतो व आरोग्य चांगले राहते त्यासाठी संवाद क्षमता विकसित होणे गरजेचे आहे.

संवाद क्षमता वाढवण्यासाठी भाषा हे प्रमुख साधन आहे भाषेतून व्यक्ती इतर व्यक्तीसोबत संवाद साधू शकतो, आपले स्वतःचे मत मांडू शकतो त्यासाठी भाषा ही महत्त्वाची आहे.

३.९.३ सर्जनशीलता

सर्जनशीलता ही एक व्यापक आणि बहुआयामी विषय आहे. यात भाषेच्या पारंपरिक नियमांचा वापर करून नवीन वाक्यरचना, शब्दसंपदा, अर्थ घडवणे यामुळे भाषेला एक कलात्मक रूप प्राप्त होते.

"सर्जनशीलता" म्हणजे नवीन कल्पना, उपाय, कला निर्माण करण्याची मानसिक प्रक्रिया होय. ही एक मानकभाषा असून व्याकरण व शब्दांच्या पलीकडे जाऊन कल्पकतेने आणि नवतेने भाषेचा उपयोग करायला लावते. सर्जनशीलतेमुळे भाषा प्रभावी आणि सौंदर्यपूर्ण बनते. भाषेचा सौंदर्यपूर्ण वापर करणे ही भाषिक सर्जनशीलता व एक कौशल्य आहे. हे कौशल्य अभ्यास करून विकसित करता येते. सर्जनशीलता आपल्या आयुष्यात नावीन्य, उत्साह आणि समाधान आणते.

३.९.४ तार्किक युक्तिवाद कौशल्य

एखाद्या समस्येचा सखोल विचार करून, परिणाम संबंध जोडून, सत्य-असत्याचा कस लावून, तर्कशुद्ध पद्धतीने मुद्दे मांडणे, पुरावे देणे आणि योग्य निष्कर्षापर्यंत पोहोचणे होय. कोणत्याही माहितीचे विश्लेषण करण्यास, भावनांपेक्षा तथ्यांवर आधारित निर्णय घेण्यास व सिद्ध करण्यास मदत करते. राष्ट्राय शिक्षण धोरण- २०२० मध्ये विद्यार्थ्यांत चिकित्सक विचार आणि तार्किक कौशल्य विकसित करण्यावर भर दिला आहे.

तार्किक युक्तिवाद कौशल्य विकसित झाल्याने कोणत्याही विषयावर विचार करताना हे कौशल्य शिक्षण, वादविवाद, संशोधन आणि दैनंदिन जीवन सुकर होण्यास मदत होईल. यात कौशल्य शिकण्याची आणि संवाद साधण्याची कला आहे. भाषा शिक्षण आणि सामाजिक बोलीच्या चर्चेशी जोडली जाऊ शकते. तार्किक युक्तिवाद कौशल्य हे भाषेच्या दृष्टीने भाषा आणि तर्क यांचा संगम आहे. सुसंगत आणि प्रभावीपणे मत मांडण्यास सक्षम करते. ही कौशल्य व्यक्तीला युक्तिवाद सिद्ध करण्यासाठी भाषेचा योग्य वापर करण्यास शिकवते. मराठी साहित्य आणि शिक्षणात वादविवाद, निबंध लेखन किंवा संवाद अभ्यासाद्वारे ही कौशल्य वाढवता येते.

३.१० समारोप

अभिजात मराठीची वाटचाल ही काळाच्या प्रवाहात घडलेली एक समृद्ध आणि सातत्यपूर्ण परंपरा आहे. ती महाराष्ट्र आणि बृहन्महाराष्ट्र या प्रदेशात आढळते. संस्कृत, प्राकृत व

अपभ्रंश यांच्या प्रभावातून जन्मलेली मराठी भाषा लोकजीवनाशी घट्ट नाते ठेवून विकसित झाली. संतसाहित्य, शिलालेख, बखरी, शाहिरी, लोकसाहित्य ते आधुनिक काव्य, नाटक, कादंबरीपर्यंत मराठीने आपली अभिव्यक्ती सातत्याने विस्तारली. या वाटचालीत मराठीने केवळ भाषिक सौंदर्यच नव्हे, तर सामाजिक जाणीव, मानवतावादी विचार आणि सांस्कृतिक मूल्येही जपली. ज्ञानेश्वरांपासून आधुनिक साहित्यिकांपर्यंत अनेक सर्जनशील प्रतिभांनी मराठीला अभिजाततेचा दर्जा मिळवून दिला. काळानुसार बदल स्वीकारत असतानाही मराठीने आपली मूळ ओळख कधीही गमावली नाही. आज अभिजात भाषेचा मान मिळाल्यानंतर मराठीची जबाबदारी अधिक वाढली आहे. तिच्या समृद्ध परंपरेचा सन्मान राखत, नव्या विचारांना व आधुनिक अभिव्यक्तींना सामावून घेणे हीच अभिजात मराठीच्या वाटचालीची पुढील दिशा आहे. अशी ही मराठी भाषा भूतकाळाचा वारसा आणि भविष्याचा आश्वासक सेतू ठरते.

अभिजात मराठीचा आद्यस्रोत हा केवळ भाषिक इतिहासाचा विषय नसून तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि वैचारिक परंपरेचा मूलाधार आहे. संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश आणि देशी बोली यांच्या संमिश्र प्रवाहातून मराठी भाषा घडत गेली. संतसाहित्य, लोकसाहित्य, शिलालेख आणि प्राचीन ग्रंथांनी मराठीला अभिजाततेची उंची प्राप्त करून दिली. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांसारख्या संतांनी मराठीला लोकाभिमुख आणि तत्त्वज्ञानात्मक समृद्धी दिली. मराठी भाषेचा आद्यस्रोत शोधताना तिच्या लोकजीवनाशी असलेल्या नात्याची जाणीव होते. जनसामान्यांच्या भावना, श्रद्धा, संघर्ष आणि आनंद यांचे प्रतिबिंब मराठी भाषेत उमटले आहे. त्यामुळे अभिजात मराठी ही केवळ प्राचीन भाषा नसून सतत प्रवाही, विकसित होत राहणारी जिवंत भाषा आहे. आज अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठीच्या या आद्यस्रोतांचा अभ्यास, संवर्धन आणि जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. परंपरा आणि आधुनिकता यांचा समतोल राखत अभिजात मराठीचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हेच या अभ्यासाचे अंतिम उद्दिष्ट आहे.

संदर्भग्रंथ

१) महाजन, पुरूषोत्तम, मराठीचा भाषिक अभ्यास, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०२१, पृ.क्र. १०.

२) तत्रैव, पृ.क्र. १०.

३) तत्रैव, पृ.क्र. १०.

४) तत्रैव, पृ.क्र. ११.

५) तत्रैव, पृ.क्र. ३१,३२.

६) कुलकर्णी, कृ. पा. मराठी भाषा उद्गम व विकास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, नोव्हे. २०१७, पृ.क्र.३६९,३७०.

७) तुळपुळे शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३.

८) अकोलकर,पाटणकर "मराठीचे अध्यापन" व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६९, पृ. क्रं. ४५ व ४६

९) लक्ष्मणशास्त्री जोशी (प्रमुख संपादक), मुंबई, १९७६, पृ. क्रं.३२०

१०) लक्ष्मणशास्त्री जोशी (प्रमुख संपादक), मुंबई, १९७६, पृ. क्रं.३२१,३२२.

११) अभिजात मराठीची गौरवगाथा" मराठी भाषा विभाग, म.शा मुंबई, २०२५, पृ. क्रं. ७५ व ७६.

१२) कुलकर्णी, कृ. पा. मराठी भाषा उद्गम व विकास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, नोव्हे. २०१७, पृ.क्र. १७६,१७७.

१३) तत्रैव, पृ.क्र. १७७.

१४) तत्रैव, पृ.क्र. १७७.

१५) तत्रैव, पृ.क्र. १७७.

१६) तत्रैव, पृ.क्र. १७६-१८४.

१७) A.M.Ghatage, (Editor), Pune १९९६, प्रस्तावना, पृ.१०.

१८) नवभारत २८.१० वर्ष १९७५.

१९) वरखेडे रमेश, समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००१, पृ. क्र. ५९-६०.

२०) पांडे अविनाश, हरी विनया, "बहुभाषिकता: गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया", २०१८, युनिक अकॅडमी पब्लिकेशन्स, पुणे, पृष्ठ क्रं ७०

२१) तांदळे ज्ञानेश्वर, "सार्थ अभंगगाथा", आदर्श विद्यार्थी प्रकाशन, पुणे, पृ. क्रं. १०१५.

२२) तत्रैव, पृ.क्र. १०२६.

२३) तुळपुळे शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३.

२४) मराठी विश्वकोश- खंड ९, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई.

२५) ढेरे रां.चिं., गंगाजळी, नीलकंठ प्रकाशन, पुणे, १९९६.

२६) कांबळे, शशिकला, सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०११, प्.क्र. १८.

२७) चौधरी सूधाकर, समाजभाषविज्ञान बोलीचा अभ्यास, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे, २०१४. पृ. क्र. ५३.

****

प्रकरण ४

भारतीय ज्ञान परंपरा आणि मराठी लोकसाहित्य

प्रास्ताविक

४.१ लोकसाहित्याची संकल्पना

४.२ लोकसाहित्याच्या व्याख्या

४.३ लोकसाहित्याचे स्वरूप

४.४ लोकसाहित्याची व्याप्ती

- ४.४.१ मौखिक आविष्कार
- ४.४.२ भौतिक संस्कृती
- ४.४.३ लोकरूढी, परंपरा, समजुती इत्यादी
- ४.४.४ प्रयोगसिद्ध लोककला

४.५ लोकसाहित्याची लक्षणे

४.६ लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्व

४.७ मराठी लोकसाहित्यातील लोककला

४.८ लोककला

४.९ लोककलांची वैशिष्टये

४.१० निवडक लोककला

- ४.१०.१ कीर्तन
- ४.१०.२ लळित
- ४.१०.३ तमाशा
- ४.१०.४ पोवाडा
- ४.१०.५ दशावतार
- ४.१०.६ गोंधळ
- ४.१०.७ लंगर विधी
- ४.१०.८ लावणी
- ४.१०.९ जात्यावरील गाणी
- ४.१०.१० पोतराज आणि कडकलक्ष्मी
- ४.१०.११ वासुदेव
- ४.१०.१२ भारूड
- ४.१०.१३ कळसुत्री बाहुल्या
- ४.१०.१४ बहुरूपी

४.१०.१५ गजगिते
४.११ लोकगीते
४.११.१ अभंग
४.११.२ भजन
४.११.३ पोवाडा
४.११.४ लावणी
४.११.५ भावगीते
४.११.६ भारूड
४.११.७ दिंडी गीते
४.११.८ लग्नगीते
४.११.९ नागपंचमीची गाणी
४.११.१० गौराईची गाणी
४.११.११ भोंडला
४.१२ लोककथा
४.१३ लोकनृत्ये
४.१४ वाक्प्रचार
४.१५ म्हणी
४.१६ उखाणे
४.१७ हुमान
४.१८ समारोप
संदर्भग्रंथ

प्रकरण ४

भारतीय ज्ञान परंपरा आणि मराठी लोकसाहित्य

प्रास्ताविक

लोकसाहित्याला प्राचीन परंपरा लाभलेली आहे. प्राचीन साहित्य, धर्मग्रंथातही लोकसाहित्याचे संदर्भ आढळून आलेले आहेत. लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीचा खराखुरा आविष्कार असतो. या आविष्कारातून लोकमानस प्रकट होत असते. लोकजीवनातील आणि लोकसंस्कृतीतील अनेक घटना लोकसाहित्यात अवतरत असतात.

आदिम लोकांनी शिकार, प्राणी, विधी, निसर्गदेवता पूजा इत्यादी निमित्ताने नृत्य, वाद्य, गायनाचा वापर करीत परंपरा जपले आहेत. सिंधू संस्कृतीत हडप्पा मोहेंजोदडो या उत्खननात नर्तिकेची मूर्ती म्हणजेच ब्रांच आढळली आहे. भरत मुनींच्या नाट्यशास्त्र या ग्रंथातून पूर्वपरंपरेचा संदर्भ लक्षात येतो. चार वेदांमध्ये ऋग्वेदात संहिता म्हणजेच कथा सामवेदात गायन, यजुर्वेदात अभिनय आणि अथर्ववेदात रस अशा कल्पना दिसून येतात. पूर्वीच्या काळी असणारे ज्ञान व परंपरा आजच्या आधुनिक युगात दिसते आहे.

साहित्यनिर्मिती ही सामाजिक-सांस्कृतिक-राजकीय धार्मिक शैक्षणिक आणि कलासौंदर्य क्षेत्रातील घटना मानली पाहिजे, म्हणजे साहित्यनिर्मिती ही सामाजिक घटना, राजकीय घटना, धार्मिक घटना, शैक्षणिक घटना, सांस्कृतिक घटना आणि शब्दाश्रयी सौदर्यात्मक घटना आहे, असे म्हटले पाहिजे. इतिहासात घडणारी घटना 'सत्ता-राजा-प्रजा-प्रदेश' यांच्याशी निगडित कालिक घटना असते, साहित्यनिर्मितीत 'समाज-संस्कृती-राजकारण' या भौतिक आत्मिक घटनांचाही काहीएक वाटा असतो, लेखक माणूस असतो, माणसाच्या भावभावना, सौदर्यकल्पना, जीवनधारणा, संघर्ष असे सारे तो सामाजिक मानवी आशयाच्या अनुरोधाने प्रकट करतो. साहित्याला समाज-संस्कृती यांचेच अधिष्ठान असते. स्थल फालसंबद्ध वातावरणाचे पडसाद साहित्यातून प्रकट होतात. विशिष्ट काळात साहित्याचा आशय, जीवनभाध्यांत्यकता, प्रेरणा प्रवृत्ती यात काही प्रभावी परिकल्पना, गुणवत्ता, संवेदनात्मभाव, युगधर्म जाणिवा प्रकटतात म्हणून विशिष्ट कालखंडात साहित्यात आविष्करणात अर्थनिर्णयात काही बदल होतात. साहित्याच्या कालखडानुसार करावयाच्या अभ्यासात कालखंडांचे विभाजन करावे लागते. विशिष्ट कालखंडावर लक्ष केंद्रित करून सामग्रयाने त्या कालखंडाचा स्वभावधर्म समजावून घ्यावा लागतो. साहित्याच्या कालखंडाचा अभ्यास हा साहित्याच्या इतिहासाशी नाते सांगतो, इतिहास हा कालानुक्रमे घडणाऱ्या घटितांनी, व्यक्तींनी, व्यक्ती-समी यांच्या

कृती उत्तीमधून साकारतो. एकूण जीवनदृष्टी जीवनरहाटी-जीवनशैली यांच्यावर परिणामही घडून येतो, अशा परिवर्तनशील घटितांमध्ये कार्यकारणसंबंध असतात, नैसर्गिक कालक्रम असतात, त्यांची परिगणना करता येते. कालखंडाचे प्रमुख विभाजन आणि उपविभाजनही करता येते. विशिष्ट कालखंड ठरवताना, त्या कालखंडात प्रभाव-प्रकर्ष दर्शविणाऱ्या जीवनप्रवृत्ती प्रेरणा, परिवर्तनाचे टप्पे महत्वाचे मानावे लागतात."[१]

वैदिक कर्मकांडातील नाट्य बौद्धकालीन नाट्य जातक कथांमधील नाट्याचा संदर्भ दिसून येतो. रामायण महाभारतामध्ये नाट्यकला कामसूत्रातील नाट्य विचार कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील नाट्य संदर्भ असा एकूणच आदिम लोकायन आणि वैद्यकीय परंपरातील नाट्यविष्काराचा अभ्यास करता येतो. भारतीय जीवनधारणांमध्ये गोष्ट, कथा, दंतकथा, मिथ व मिथक यांना आत्यंतिक महत्व आहे. जन्माला येणारे कोणतेही बालक ऐकू, बोलू अथवा हुंकार टाकू लागले की, त्याला गोष्टी सांगितल्या जातात. त्याला भरवताना, झोपवताना गाणी म्हटली जातात. या शिवाय सणवार, मयत, धार्मिक कार्य, जावळ, बारसे, अशा अनेक विधीमध्ये गाणी म्हटली जातात. ही संस्कारांची धारा शतकानुशतके एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत जात असते. लोकसमूह एकाच वेळी भूतकाळाशी नाते जोडीत वर्तमानकाळात वर्तमानपरिस्थितीशी मिळतेजुळते घेत आपली जीवनरहाटी चालवीत असतो. लोककला हे एक प्रबोधनाचे व मनोरंजनाचे माध्यम आहे.

''लोकसाहित्याद्वारे लोकसमूहाच्या नीतिकल्पना, सामाजिक संकेत, समाजमान्य कृती आणि समाज निषिद्ध धार्मिक मूल्य संस्कार, सामाजिक समस्या, मूल्यहीनता इत्यादी विषयाचे ज्ञान लोकसमूहाला प्राप्त होत असते. त्यामुळे लोकसाहित्य, लोकांना शिक्षण देण्याचे, बोध देण्याचे, समाजाला वळण लावण्याचे प्रभावी साधन असते.''[२]

लोकसाहित्य हे समाजातील सर्वसामान्य लोकांना शिक्षण देण्याचे कार्य करते. त्याद्वारा लोकांच्या कर्तव्याचे, अधिकारांचे आणि नीतिमूल्यांचेही अपारंपरिक वळण्याचे निरंतर शिक्षण होत असते. लोकशिक्षणाची व प्रबोधनाची गरज लोकसाहित्याच्या माध्यमातून पूर्ण होत असते. मौखिक साहित्याच्या परंपरेतील लोकसाहित्याला नृत्य, नाट्य, संवाद, संगीत व लोकभूमिका यांचा स्पर्श होतो आणि साहित्यातील लोकरंग कलेच्या अंगाने आविष्कार घेत-घेत लोककला जन्माला येते. प्रत्येक लोककला ही निरूपण प्रधान आहे. अर्थात लोककला हे प्रबोधनाचे एक माध्यम आहे.

४.१ लोकसाहित्याची संकल्पना

लोकसाहित्य हा एक जोडशब्द आहे. त्यात दोन शब्द एकत्र आले आहेत. 'लोक' आणि 'साहित्य' 'साहित्य' म्हटले की, आपल्याला कथा, कादंबरी, नाटक व कविता आठवते. म्हणजेच

कथा, कादंबरी, कविता यासारख्या ललित साहित्यासाठी मराठीत 'साहित्य' हा शब्द रूढ आहे. 'साहित्य' याच अर्थाने 'वाङ्मय' हा शब्दही वापरला जातो. 'साहित्य', 'वाङ्मय' या दोन्ही शब्दांसाठी इंग्रजीमध्ये 'लिटरेचर' हा शब्द आहे.

मराठी साहित्यात 'लोकसाहित्य' ही संज्ञा 'Folklrore' वापरतो, तर आपण 'Folklitrature' संज्ञा 'लोकवाङ्मय'साठी वापर करतो. हे दोन्हीही शब्द एकाच अर्थाचे नसून त्यात फरक आहे. लोकसाहित्याची निर्मिती खऱ्या अर्थाने लोकांमधून होत असते. त्यामुळे लोक साहित्यामध्ये असलेले मौखिक भांडार हे लोकसाहित्य या नावाने ओळखले जाणे योग्य वाटते. लोकसाहित्य हा शब्द संकुचित अर्थाने न वापरता व्यापक अर्थाने वापरला पाहिजे. ''लोकसाहित्याची निर्मिती प्रारंभ काळी कुण्या तरी व्यक्तीने केलेली असते. त्यावेळी ते साहित्य 'लोकसाहित्य' म्हणजे ज्याला निर्मिती आहे, नाममुद्रा आहे असे साहित्य असते. याच साहित्याचे कालांतराने लोकसाहित्यात रूपांतर होते. असे रूपांतर होण्याच्या प्रक्रियेत लोकसाहित्याचा निर्माता, नाममुद्रा आदी गोष्टी गळून पडतात आणि मग ते वाङ्मय जनसमूहाने आपली जनसमूहाची निर्मिती म्हणून स्वीकारलेली असते. एवढेच नाही तर ही रचना आपली म्हणजे जनसमूहाची काळ व परिसरसापेक्ष बदल करण्याचे अधिकारही आपण घेतलेले असतात. परंतु तरीही केवळ एवढ्या त्या रचनेला लोकसाहित्य संबोधता येणार नाही. परंतु जेव्हा ही रचना समाज आपली स्वीकारील त्या रचनेत आशयदृष्ट्या, रचनादृष्ट्या बदल करण्याचे स्वातंत्र्य घेईल व एका पिढीकडून दुसरी पिढी ती रचना आपली रचना म्हणून स्वीकारील तेव्हाच ती रचना लोकसाहित्य म्हणून मान्यता पावेल किंवा स्वीकारता येईल.''[३]

'लोकसाहित्य' शब्दातील लोक म्हटले की, खेड्यातील आणि शहरातील जनसमूह 'लोक' मध्ये गृहीत धरलेले आहेत. खेड्यातील लोकांप्रमाणे शहरातील लोकांचेही 'लोकसाहित्य' आणि लोकसंस्कृती आविष्कृत होत असतेच. परंतु लोक साहित्यातील 'साहित्य' शब्दाचा अर्थ भिन्न स्वरूपाचा आहे. त्याची व्याप्ती मोठी आहे. साहित्य पदाचे वर्गीकरण दोन भागांत केले जाते. एक शब्द साहित्य किंवा मौखिक साहित्यः त्यामध्ये लोकगीते, लोककथा, म्हणी, प्रहेलिका, यांचा समावेश असतो. लोकसाहित्याची जडणघडण साधारणतः निसर्ग, लोक आणि समाजातून होते.

१७ व्या शतकापासून लोकसाहित्याचा अभ्यास होत आहे. महाराष्ट्रात लोकसाहित्याचे संकलन साधारणता १८५७ पासून सुरू झाले. ''लोकसाहित्य ही तर उच्च दर्जाची श्रृती आहे. प्रभावी लोकगाथा आहे आणि अलोखित पण अभिजात व अक्षर वाङ्मयात मोडणारा भारतीय जीवन संस्कृतीदर्शक प्रेरक इतिहास आहे आणि तो अमर आहे. यात संदेह नाही. लोकसाहित्याचा अभ्यास

म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे. संस्कृतीचे सातत्य आणि तिच्यात होणारे बदल त्याचे निरिक्षण करावयाचे तर ते लोकसाहित्याचा अभ्यास करताना दृष्टीस येते आणि जाणवते.''[४]

लोकसाहित्याच्या अभ्यासिका दुर्गा भागवतांनी लोकसाहित्याचे नेमके स्वरूप आणि व्याप्ती स्पष्ट केलेली आहे. त्यांच्या मते, लोकसाहित्य ही अमर अशी लोकगाथा असून संस्कृती सातत्य आणि सांस्कृतिक संक्रमणाचे महत्वाचे साधन म्हणजे लोकसाहित्य होय. म्हणूनच त्यांनी लोकसाहित्याच्या अभ्यासाला संस्कृती अभिसरणाचा अभ्यास असे म्हटलेले आहे. अक्षर, चिरंजीव साहित्यात मोडणारा भारतीय जीवनसंस्कृतीचा प्रेरक इतिहास म्हणजे लोकसाहित्य, असे त्यांचे मत खरोखरच लोकसाहित्याचे चिरंजीवत्व सिध्द करण्यास उपयुक्त ठरणारे आहे.

४.२ लोकसाहित्याच्या व्याख्या

''लोकाचं साहित्य ते लोकसाहित्य'' असा ढोबळ अर्थ लोकसाहित्याचा असला तरी अनेक अभ्यासकांनी लोकसाहित्याची व्याख्या करण्याचा व लोकसाहित्य म्हणजे काय या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

'लोकसाहित्य' हा जोडशब्द 'लोक' आणि 'साहित्य' यांच्यापासून बनलेला आहे. कथा, कादंबरी, नाटक, कविता यांसारख्या ललित साहित्यासाठी 'साहित्य' हा शब्द रूढ आहे. 'जे वाङ्मय लिहून टिकवून ठेवले जाते ते 'साहित्य'. समूहजीवनात अनेक चालीरीती, रूढी, श्रद्धा, समजूती असतात आणि लोकजीवनात त्या सर्व एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आपोआप प्रवाहीत झालेल्या असतात. मात्र वरील व्याख्येत लिखित किंवा मौखिक याविषयी स्पष्टता नाही. लोककथांचा, शिल्पचित्र, विधी, व्रते, गोंधळ, व नाट्य यांचा समावेश करणे शक्य होत नाही. जरी याठिकाणी सामाजिकतेचे लक्षण सांगितले असले तरी सर्व लोकसाहित्य प्रकाराचां त्यांच्या लोकप्रिय व लवचिक रूपांचा बोध होत नाही. पाश्चीमात्त्य आणि भारतीय लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी खालीलप्रमाणे व्याख्या केलेल्या आहेत.

मराठी भाषेतील लोकसाहित्यिक अभ्यासकांच्या व्याख्या

१) डॉ. ना. गो. नांदापूरकर

''लोकसाहित्य म्हणजे माझ्या दृष्टीने तरी लोकांनी निर्माण झालेले आणि मौखिक परंपरेने प्राप्त झालेले जे वाङ्मय तेच होय. याचा कर्ता लोकच, अर्थात अज्ञात, अशी लोकमानसातील व्यक्ती, यास्तव लोकांनी केलेले, लोकभाषेत केलेले आणि लोकांच्या परंपरेने चालत आलेले जे वाङ्मय तेच लोकवाङ्मय होय. वाङ्मयाच्या याप्रकरात लोककथा, कहाण्या, आहाणे, उखाणे आणि लोकगीते येतात.''[५]

लोकसाहित्य हे मौखिक परंपरेने चालत आलेले असून त्याचा कर्ता कोणीही एक नसतो. ते लोकांनी मिळून केलेले असते. म्हणून ती अनेकांची निर्मिती असते. याचा कर्ता अज्ञात असतो.

२) डॉ. प्रभाकर मांडे

''लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिकपरंपरा म्हणजे लोकसाहित्य. लोकसाहित्य लोकांचे असते. व्यक्तिचे कधीही नसते.''[६] परंपरागत आलेल्या मौखिकपरंपरा मग त्यात सर्वच घटक ग्राह्य धरून लोकसाहित्याची व्याख्या केलेली आहे.

३) डॉ. सरोजिनी बाबर

''विविध प्रकारांच्या जातिवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षामागे रचले असताना पाठांतराच्या बळावर पिढ्यानपीढ्या आपल्या नवनवोनमेषशालिनी तेजाने पुढच्या पिढीला उपयौजित करणारे ते लोकसाहित्य.''[७] लोकसाहित्य हे पाठांतराच्या म्हणजेच मौखिक परंपरेच्या बळावर एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आलेले असते.

४) डॉ. गंगाधर मोरजे

''लोकसाहित्य हे केवळ मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेला वाङ्मय प्रकार नाही उलट मौखिक आशय विधिसंबंधित कृती व अभिनय यांच्याद्वारा केलेला प्रयोग असतो. म्हणजेच ही प्रयोगात्मक कला आहे.''[८] समाजातील धार्मिक, सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक या सर्वच महत्वाच्या घटकांचे दर्शन लोकसाहित्यातून होत असते असे म्हटले आहे आणि हाच खरा लोकसमूहाच्या मनाचा आविष्कार असतो. विविध लोककलामधूनच लोकसाहित्याची निर्मिती होत असते.

५) डॉ. शरद व्यवहारे

''लोकसाहित्य म्हणजे स्वयंस्फूर्त अमरवाणी, लोक हृदयाचे उत्स्फूर्त बोल आहेत. ग्रामीणाच्या निरागस सागरातून ते उगम पावलेले व त्यांच्याच मुखातून तरंगत पावून अखंडपणे खळखळ वाहत जाणारी, वाहत असताना इतरांना सुखावणारी ही लोकगंगा आहे.''

६) डॉ. रा. चिं. ढेरे

"लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे प्राथमिक आणि प्रमुख साधन आहे. हे खरेच परंतु लोकसाहीत्यत्तर वाङ्मयीन सामुग्रीतून लोकसंस्कृतीच्या प्रदीर्घ प्रवाहाचे समग्र दर्शन घेता येते. विद्यमान लोकसाहित्य कालौघात नाहीसे झालेले असते. अनेक लोकाचारांचे प्रचलन थांबलेले असते. अनेकात बरीच परिवर्तने घडलेली असतात''[९] अशाप्रकारे अनेक लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी लोकसाहित्याची व्याख्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

पाश्चात्य अभायासकांच्या व्याख्या

१) विल्यम बॅस्कम

या पाश्चात्य अभ्यासकाने लोकसाहित्याला एक कलाप्रकार मानले असून त्याच्या मते, ''लोकसाहित्य म्हणजे मिथ्स, म्हणी, लोकगीते आणि अशाप्रकारे भाषेच्या माध्यमातून अभिव्यक्त होणारे पारंपरिक कलात्मक आविष्कार होय.''[१०]

२) जोनास बॅलिस

जोनास बॅलिस यांनी लोकसाहीत्य म्हणजे, ''लोकसाहित्य हे आदिमानवनिर्मित असून ते परंपरा प्राप्त असते. तसेच ते सुसंस्कृत मानवाने देखील निर्मिलेले असते. ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्याद्वारे पद्य किंवा गद्य स्वरूपात केली जाते. लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकभ्रम, रूढी, लोककला प्रकार त्याचप्रमाणे नृत्ये-नाट्य इत्यादींचा अंतर्भाव होतो. लोकसाहित्य हे लोकसमूहाच्या परंपरागत चालत आलेल्या जीवनाच्या आविष्काराचे शास्त्र आहे.''[११] अशी व्याख्या या तज्ञांनी केली आहे. लोकसाहित्य हे आदिमानवापासून तसेच परंपरेने चालत आलेली निर्मिती आहे. ध्वनी आणि शब्द यांच्या रूपातून पद्य स्वरूप धारण करते ही महत्त्वाची गोष्ट त्यांनी सांगितली आहे.

३) मारियस बार्डो

मारियस बार्डो या पाश्चात्य तत्त्ववेत्याने लोकसाहित्याची संकल्पना स्पष्ट करताना त्याची व्यापकता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते, '' विविध व्यवसायाचे ज्ञान, अनुभूती, शहाणपण, कौशल्य, सवयी, रूढी आणि व्यवहार यासंबंधीचे ज्ञान शब्दाने किंवा कृतीने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत येते. त्या सर्वास लोकसाहित्य म्हणावे.''[१२]

४) बी. ए. बॉटकिन

''आधुनिक समाजातील असे ज्ञान ज्यात परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत आलेल्या विशेषांचे आधिकत्व असते त्याला लोकसाहित्य म्हणता येईल.''[१३] वर्तमानकालीन संस्कृतीविशेष आणि जीवनविशेष यांचा आपल्या परंपरेने साकारत गेलेले जीवन आणि त्या जीवनातून फुलत गेलेले लोकसमूहाचे लोकसाहित्य असे लोकसाहित्याची व्याख्या केलेली आहे.

५) जॉर्ज. एम. फॉस्टर:

''लोकसाहित्य हा शब्द लवचीक असून त्यात लोकसमूहाच्या अलिखित किंवा मौखिक स्वरूपाच्या भाषाविष्कारांचा समावेश होतो.''[१४]

काही हिंदी भाषेतील लोकसाहित्यिकांच्या व्याख्या

१) डॉ. वासुदेवशरण अग्रवाल :

"लोकवार्ता एक जीवित शास्त्र है। सहानुभूति के साथ उसका अध्ययन अपनी संस्कृती के भूले पथों का उद्घाटन कर सकता है। लोक का जितना जीवन है उतना ही लोकवार्ता का विस्तार है। लोक में बसनेवाल जन, जनकी भूमि और भौतिक जीवन तथा तीसरे स्थान मैं उसे जन की संस्कृती इन तीन क्षेत्रो में लोक के पुरे ज्ञान का अन्तर्भाव होता है। और लोकवार्ता का संबंध भी उन्ही के साथ है।''[१५]

२) डॉ. कृष्णदेव उपाध्याय:

"आधुनिक सभ्यता से दूर अपनी सहज तथा प्राकृतिक अवस्था में वर्तमान, तथाकथित असभ्य एवं अशिक्षित जनता को 'लोक' कहते हैं, जिनका जीवन-दर्शन और रहन-सहन प्राचीन परम्पराओं विश्वासों तथा आस्थाओं द्वारा परिचालित एवं नियत्रिंत होता है।''[१६]

३) डॉ. द्विवेदी :

"जो चीजे लोकचिण से सीधी उत्पन्न होकर सर्वसाधारण को आंदोलित, चालित और प्रभावित करती है, वे ही लोकसाहित्य, लोकशिल्प, लोकनाट्य, लोककथानक आदि नामोसे से पुकारी जा सकती है।''[१७]

४) धीरेंद्र वर्मा :

"वास्तव लोकसाहित्य वह मौखिक अभिव्यक्ती है जो भलेही किसी व्यक्तीने गढी हो पर आज जिसे सामान्य लोकसमूह अपना मानता है।''[१८]

लोकगीत, लोककथा, गीते, उखाणे, म्हणी, वाक्यप्रचार इत्यादी आपला वारसा चालवत असते. लोकसाहित्य हा केवळ एक प्राचीन वाङ्मयीन प्रवाह नसून तो संस्कृती अभिसरणाचा अभ्यास आहे. संस्कृतीमध्ये होणाऱ्या स्थलकालानुरूप बदलासह संस्कृतीचे सातत्य टिकविण्यासाठी लोकसाहित्य प्रभावी आहे. वरील व्याख्या लोकसाहित्याच्या वेगवेगळ्या पैलूचा परिचय करून देताना लोकसाहित्याचा अभ्यास हा इतर सामाजिक शास्त्रांनाही पूरक ठरतो हे लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते.

४.३ लोकसाहित्याचे स्वरूप

लोकसाहित्य म्हणजे सामान्य लोकांच्या जीवनातून निर्माण झालेले आणि तोंडी परंपरेने पिढ्यान्पिढ्या पुढे आलेले साहित्य होय. त्याचे स्वरूप अत्यंत व्यापक आणि विविधतेने भरलेले आहे. लोकसाहित्यात लोकांचे दैनंदिन जीवन, त्यांच्या भावना, श्रद्धा, संस्कृती आणि परंपरा यांचे प्रतिबिंब दिसते. 'लोकसाहित्य' ही संज्ञा, या संज्ञेतील 'लोक' आणि 'साहित्य' या शब्दांना प्राप्त झालेला विशिष्ट अर्थ लोकसाहित्याच्या स्वरूपाची कल्पना देऊ शकतो. तसेच लोकसाहित्याच्या

अभ्यासकांनी सांगितलेली लक्षणे, लोकसाहित्याची व्याप्ती आणि केलेल्या व्याख्या यांच्या आधारे लोकसाहित्याचे स्वरूप-विशेष लक्षात येतात.

पारंपरिक लोकजीवन पद्धती म्हणजे लोकसाहित्य किंवा लोकमानसातील कृती-उक्तींचा ऑविष्कार म्हणजे लोकसाहित्य. लोकसाहित्याची ही व्याख्या लोकसाहित्याचे स्वरूप आणि व्याप्ती स्पष्ट करणारी आहे. पारंपरिक जीवनपद्धतीतीत म्हणजेच लोकसाहित्यातील काही बाबी, काही विषय पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१. लोकविश्वास, लोकश्रद्धा, लोकसमजुती, लोकभ्रम, लोकोक्ती

२. आचार-विचार, रितीरीवाज, रूढी-प्रथा

३. विधी-विधाने, सण-उत्सव, व्रत-वैकल्ये

४. निसर्गातील दैवी शक्तीचे स्पष्टीकरण

५. निसर्गातील दृश्यांचे, घटनांचे लावलेले अर्थ

७. परंपरेशी नाते सांगणाऱ्या वस्तू-वास्तू

८. यंत्र, मंत्र, तोडगे, जादूटोणा

९. वनस्पती, नक्षत्रे, खनिज, प्राणी इत्यादी विषयीचे 'लोका'ना असलेले ज्ञान.

१०. लोकनृत्य, लोकनाट्य, लोककला इत्यादी कला,

११. मनोरंजनाचे खेळाचे प्रकार

१२. लोककथा, लोककथागीते, लोकगीते, उखाणे, म्हणी, वाक्प्रचार इत्यादी कलात्मक शाब्द आविष्कार.

स्थूलमानाने वरील बाबींचा समावेश लोकसाहित्यात करता येतो. लोकसाहित्यातील वरील विषय पाहिले तर पारंपरिक लोकजीवनाला लोकसाहित्य व्यापते हे लक्षात येते. त्यावरून लोकसाहित्याच्या व्याप्तीचीही कल्पना येऊ शकते. परंपरेने चालत आलेले जीवन जगणाऱ्या जीवनसमूहाची जीवनविषयक चिंतन प्रणालीची विविध रूपे आणि जीवन जगण्याची रीत, जसे आचार-विचार, रूढी-प्रथा, संस्कार, श्रद्धा, जादू-टोणा, मंत्र-तंत्र आणि निसर्ग दृश्य-घटना विषयींचे चिंतन, त्याचबरोबर जीवन जगण्याचा एक अविभाज्य भाग म्हणून लोककथा, लोकगीत, उखाणे, म्हणी यासारख्या मौखिकरूपातील शाब्द आविष्कार इत्यादींचा समावेश लोकसाहित्यात होतो. लोकसमूहाच्या मानसिक संपन्नतेतू जे जे निर्माण झाले ते ते लोकसाहित्याच्या क्षेत्रात समाविष्ट होते.

लोकसाहित्य हा त्या त्या लोकसंस्कृतीचा एक स्वाभाविक प्रवाह असतो. जेव्हा एखाद्या लोकसमूहाची लोकसंस्कृती लोकश्रद्धा, आचार-विचार, रूढी-प्रथा, रिति-रीवाज, कथा, गीत, नृत्य,

संगीत, कला इत्यादी पारंपरिक माध्यामातून अभिव्यक्त होते तेव्हा या माध्यमांना लोकसाहित्याचे रूप लाभते.

"लोकसाहित्याची निर्मिती लोकजीवनात होते व लोकसाहित्यातून जीवनाला आकार येत असतो. त्यातूनच पुढील जीवनाची जगण्याची पद्धती सिद्ध होत असते. जीवन जगणाऱ्या लोकसमूहाला जीवन विशेषांचे एक वेगळेपण प्राप्त होत असते. लोकसाहित्याच्या जडणघडणीत लोकजीवनाचा महत्त्वाचा वाटा असतो तसेच लोकजीवनाला आकार देण्यात लोकसाहित्यही महत्त्वाचे ठरते. लोकसाहित्य आणि लोकजीवन यांच्यातील परस्पर संबंध अतूट असतात. त्यामुळे लोकजीवनाचा अभ्यास करण्याचे एक महत्त्वाचे स्थान म्हणजे लोकसाहित्य असे म्हणता येते. लोकसाहित्याचे स्वरूप पाहता, परंपरा हे लोकसाहित्याचे प्रमुख तत्त्व आल्याचे स्पष्ट होते. ही परंपरा प्रामुख्याने मौखिकरूपातील असते. ही परंपरा केवळ कथा, गीत यासारख्या शाब्द आविष्कारापुरतीच मर्यादित असत नाही."[१९]

४.४ लोकसाहित्याची व्याप्ती

लोकसाहित्याची व्याप्ती लोकसंस्कृतीच्या आविष्कारांना व्यापून टाकणारी आहे. लोकरूढी, विधी समजूतीचा वारसा सांगणारी किंवा केवळ प्रयोगसिद्ध कला, कथागीत, उखाणे, म्हणी म्हणजे लोकसाहित्याची व्याप्ती नव्हे तर जागर, गोंधळ, विवाह, बोहाडा, रामलीला, भवई, यांसारखे लोकनाटयाचे मंचीय प्रयोगरूप आविष्कार, रांगोळया, भिन्नभिन्नचित्रे, यांसारखे चित्राविष्कार, फुगडया, हमामा, विटी-दांडू यांसारखे खेळ, अंगारे-धुपारे, दृष्ट काढणे यांसारखे उपचार विधी, गृहबांधणी, भांडी, अवजारे तयार करण्याच्या पध्दती या सर्वांचा समावेश ज्यात होतो ते लोकसाहित्य. म्हणून लोकसाहित्याची व्याप्ती मोठी आहे. 'लोकसाहित्य' आणि 'लोकजीवन' याचा संबंध हा अनंन्यसाधारण असा आहे. तेव्हा लोकजीवनाचे वास्तव रूप समजून घ्यायचे असेल तर लोकसाहित्यासारखे दुसरे खात्रीशीर साधन नाही. कारण लोकसाहित्यात नैसर्गिकपणे कोणताही आडपडदा न ठेवता मानवी मनाचा आविष्कार झालेला असतो. हा आविष्कार भावनात्मक पातळीवर असला तरी त्यात प्रकट होणारे वास्तव असते. मानव समूह ज्या भाषेत व्यवहार करीत असतो. त्याच भाषेत त्याची निर्मिती होत असते.

म्हणूनच लोकसाहित्याचा संबंध हा अनेक भाषांशी आलेला आहे. लोकसाहित्य एका प्रदेशापुरते मर्यादित न राहता त्याचा विस्तार हा जगभर होत राहतो. एखाद्याचा सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, भौगोलिक, आर्थिक इतिहास अभ्यासयचा असेल तर लोकसाहित्याची मदत घ्यावी लागते. म्हणून इतिहास समजून घेण्यासाठी लोकसाहित्य उपयोगी ठरते. लोकसाहित्याची

व्याप्ती अभ्यासत असताना लोकसमूहाचा विविधांगी अभ्यास करावा लागतो. त्यातून लोकसाहित्य अभ्यासकांना महत्त्वपूर्ण बाबींचा उलगडा होतो. याचाच अधार घेऊन समाजशास्त्रज्ञ प्राचीन जीवनाच्या खाणा खुणा शोधू लागले आहेत. तद्वतच समीक्षक, भाषाशास्त्रज्ञ व वाङ्मय समीक्षक इत्यादींनी लोकसाहित्याच्या अभ्यासात नवनीवन दिशा मिळाल्याने लोकसाहित्यात वेगळी भर टाकलेली दिसते. लोकसाहित्याचे अध्ययन करणाऱ्या अभ्यासकांनी तर लोकसाहित्याचे तीन किंवा चार प्रकारात वर्गीकरण करून त्याचेही उपप्रकार सांगितले आहेत.

लोकसाहित्याचे प्रसिद्ध अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे यांनी लोकसाहित्याच्या व्याप्तीची खालीलप्रमाणे विभागणी केलेली आहे.

१. मौखिक आविष्कार (लोकसाहित्य)

२. भौतिक संस्कृती

३. लोकरूढी, परंपरा, समजुती, विधी इत्यादी

४. प्रयोगसिद्ध लोककला

४.४.१ मौखिक आविष्कार

लोकजीवनात परंपरेने चालत आलेला मौखिक आविष्कार गायिलेल्या, बोललेल्या स्वरूपाचा असल्यामुळे या मौखिक आविष्काराला इंग्रजीत 'व्हरबल आर्ट' असे संबोधले जाते. त्यात वाक्प्रचार, लोकगीते, म्हणी, उखाणे, लोककथागीते, उपासकांची गीते इत्यादींचा समावेश होत असून समाजात परंपरेने पुढच्या पिढीला मिळत असतात. धार्मिक, कौटुंबिक व सामाजिक विधींच्या निमित्ताने लोकगीत, लोककथागीते, गीतांची निर्मिती श्रमपरिहरासाठी व मनोरंजनासाठी झालेली असते. असे हे शब्दबद्ध वाङ्मय समाजात परंपरेने चालत येते.

लिखित साहित्याचा कर्ता ज्ञात असतो तर लोकवाङ्मय ही समूहाची निर्मिती असून त्यात सामूहिकता आणि समूह जीवनाचे मन प्रतिबिंबित झालेले असते. लोकसाहित्य हे मौखिक स्वरूपात पिढ्यानपिढ्या जिवंत राहून वाहत्या पाण्यासारखे प्रवाहित असते. मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आलेली व व्यक्त आणि प्रदेशानुसार मूळ कथेत बदल स्वीकारून विस्तारत जाणारी, रंजन उद्बोधनाच्या गरजांची पूर्ती करणारी लोककथा वैशिष्ट्यपूर्ण आहे. "मौखिक आविष्काराचा एक भाग असा असतो की ज्याला कथात्मक लोकवाङ्मयात तसेच लोकगीते यैत समाविष्ट करता येत नाही. त्याचा स्वतंत्र लोकविभाग करावा लागतो. ज्यात म्हणी, स्फूट रचनाप्रकार, कोडी, वाक्प्रचार, प्रहेलिका, उखाणे, मंत्र यांचा समावेश होतो."[२०] असे मत मांडे प्रभाकर, लोकसाहित्याचे स्वरूप या ग्रंथात मांडलेले आहे.

लोकसाहित्याचे लिखित वाङ्मय प्रकारांशीही साम्य आढळते. त्याचाही तौलनिक अभ्यास केला जातो. लोकगीतांना 'लोकसाहित्याचा आरसा' मानले जाते. लोकसाहित्यात लोकगीतांची संख्या अधिक असून त्यांना प्राचीन परंपरा आहे. लोकगीत सामान्य माणसाच्या सामुदायिक जीवनाची अभिव्यक्ती असते. मौखिक परंपरा, अनामिक कर्ता, लोकसमूहाच्या भावभावनांचा आविष्कार करणारी, ही लोकगीते गेय आहेत. लोकसाहित्याचा एक महत्वाचा प्रकार म्हणून मौखिक आविष्काराकडे पाहिले जाते. आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत विविधता आहे

४.४.२ भौतिक संस्कृती

भौतिक संस्कृती लोकसाहित्याचा एक विभाग मानला जातो. याचे स्वरूप मौखिक वाङ्मयापेक्षा वेगळे असते. आज आपण यंत्रयुगात वावरत आहोत. याचे चित्र समाजात पाहावयास मिळते. या जीवनाचा समावेश भौतिक संस्कृतीमध्ये होतो. लोकजीवनातील प्रत्येक व्यावसायिकाकडे स्वतःचे कौशल्य होते. प्राचीन काळापासून ग्रामीण जीवनात चालत आलेली सुताराची कामगिरी, लोहाराचे कौशल्य, कुंभाराची मातीची भांडी तयार करण्याची कला, सुवर्णकारांचे कौशल्य आणि विणकराची कारागिरी, शेतकऱ्यांची शेती करण्याची पद्धती आदींचाही अंतर्भाव भौतिक संस्कृतीमध्येच केला जातो.

हजारो वर्षाची परंपरा जपणारे हे ग्रामीण लोक घरे कसे बांधतात, पोशाख कसा तयार करतात, शेतीसाठी लागणारी अवजारे सुताराकडून कशी बनवून घेतात, ही अवजारे शेतात वापरताना त्यांची भूमिका काय असते, या सर्व बाबींचा अभ्यास हा भौतिक संस्कृतीद्धारे लोकसाहित्य करीत असते. यामध्येही आपणास हजारो वर्षांची ज्ञान परंपरा आपल्याला दडलेली दिसते. भौतिक संस्कृती ही ग्रामीण जीवनाशी निगडित असल्यामुळे त्यांच्या जीवनात सर्व बाबी या पारंपारिकच असतात. त्यांच्यापासून यंत्र व विज्ञानयुग कोसो दूर असते. असे असले तरी त्यांची कामगिरी व कला संस्कृतीचा मूळ स्त्रोत ठरतात. आजही त्यांच्या हस्तकला मधुन त्यांच्या पारंपरिक जीवनाचा डोलारा उभा राहतो. या कला आदिमांच्या जीवनात परंपरेने चालत येतात.

आदिवासी लोकसमूह हा पारंपरिक जीवन जगत असल्यामुळे मंत्र, तंत्र, जादूटोणा, तोडगे, लोकवैद्यक, भविष्यवाणी इत्यादी त्यांच्या जीवनात उपयुक्त ठरतात. लोकजीवनाशी संबंधित असल्याने त्याही आपोआप भौतिक संस्कृतीत येतात सर्व पद्धती या पारंपरिक असतात. लोकसमूहाला परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला चालत आलेले लोकसाहित्य यंत्र तोडगे, भविष्य जाणण्याच्या रीती इत्यादी लोकसाहित्यात येतात.

४.४.३ लोकरूढी, लोकविधी, समजुती इत्यादी

लोकरूढी, लोकविधी, समजुती या बद्दल प्रभाकर मांडे आपले मत पूढील प्रमाणे मांडतात, "परंपरेने चालत आलेले मौखिक वाड्.मय किंवा लोकवाड्.मय (Folk-literature) आणि आताच ज्याच्यासंबंधी चर्चा केली ती भौतिक संस्कृती या दोहोंशी संबंध असणारा परंतु त्यांच्यापेक्षा निराळा असा तिसरा महत्त्वाचा विभाग लोकरूढी, विधी, समजुती इत्यादींचा असतो. लोकसाहित्याच्या या विभागात प्रामुख्याने समूहाने केलेल्या कृतींचा अंतर्भाव असतो. या रूढी कुटुंबाच्या किंवा समूहाच्या असतात आणि कुटुंबातील किंवा समूहातील सर्व व्यक्ती त्या रूढी पाळतात. रूढी आणि विधी यांच्या मुळाशी काही लोकविश्वास, समजुती किंवा लोकभ्रम असतात. जन्म, बारसे, लग्न, मतिक इत्यादी विधी आणि दृष्ट काढणे, चेटकाचा प्रभाव होऊ नये म्हणून घराच्या उंबरठ्यावर घोड्याचा नाल ठोकणे, या सर्वांच्या मागे कुठली तरी समजूत असते. त्या समजुती किंवा भ्रम परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत येतात. सामुदायिक सण, उत्सव यांचेही स्वरूप असेच असते. होळी, पोळा, दसरा या सणांत गावातील सर्व लोक सहभागी होतात. या सर्वांचा समावेश या विभागात करावा लागेल."[२१]

लोकजीवनात सण, उत्सव, जत्रा यात्रा, सामुदायिक उत्सव, विधी, तसेच ग्रामदेवतांना प्रसन्न करून घेण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपासना पद्धती व त्यांच्याविषयी लोकमनात असलेल्या श्रध्दा, भय त्यातून केले जाणारे नवस सायास, व्रत, वैकल्ये या सर्व बाबी लोकजीवनांत परंपरेने पाळल्या जातात. कारण याचा लोकमनावर त्यांचा पगडा असतो. लोकमनावर त्यांचा पगडा असतो. लोकजीवनात विधींचे करण्यामागे लोकश्रध्दा असून प्रत्यक्ष विधीं साजरा करण्यात भौतिक वस्तुरूपाला प्रतीकात्मक महत्त्व असते. यामध्ये विधी आचरणाचा एक भाग म्हणून लोकगीत, लोककथागीत या सारख्या लोकवाङ्मयाचा मौखिक आविष्कार घडतो.

लोकजीवनाशी या सर्व बाबींचा संबंध असतो. लोकसाहित्यत प्रामुख्याने समूहाने केलेल्या कृतींचा आविष्कार असल्याने समूहाच्या कृतींचा अंतर्भाव होतो. लोकरूढींमागे धार्मिक समजुती व संस्कारपरंपरा असते. लोकदेवतांना विशिष्ट उपासनापध्दती असतात. वेताळ, म्हसोबा, भैरोबा, मुंजोबा, खंडोबा, आसरा, यांसारख्या लोकदेवतांसंबंधीच्या समजुती, त्यांच्या उपासनापध्दती, त्यांच्यासाठी करावयाचे नवस, फेडण्याच्या पारंपरिक पध्दती यांचाही विचार याच भागात येतो. आपल्या समाजात आजही बारागाड्या ओढणे, पोत खेळणे, धार फिरवणे, आसरा आंगात खेळणे अशा रूढी प्रचलित आहेत, म्हणून लोकसाहित्यात रूढी, परंपरा, विधींचा तपशील अभ्यासण्यावर भर असतो. एक प्रकारे लोकसंस्कृतीच्या सामूहिक लोकधारणांचा तो एक शोध असतो.

४.४.४ प्रयोगसिद्ध लोककला

लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. प्रभाकर मांडे यांनी लोककला या घटकाचा विचार करताना. लोकनृत्य, खेळ, लोकनाट्य, लोकसंगीत, शिल्पकला, चित्रकला व विधिनाट्य इ. चा समावेश लोकसाहित्यात महत्त्वाचा मानला जातो. यामध्ये सण, उत्सव प्रसंगी भिंतीवर काढली जाणारी चित्रे, घरापुढील रांगोळी, वस्त्रांवरील चित्रकृती, वारली चित्रे या कलाही लोकजीवनात परंपरेनेच मानवी जीवनाची विशेष कला दर्शवितात. मानवी आप्तसंबंध, कुटुंबसंस्था, जातिसंस्था, धर्मसंस्था, अर्थसंस्था, राजसंस्था यांच्या संदर्भातील समजुती आणि परंपरांचा वारसा शोधण्यासाठी या लोककलांचा आशय तपासून पाहता येतो. यातून मानवी जीवनाच्या प्राचीनत्वाची कल्पना येते. त्यातून विधिनाट्य, लोकनाट्य, नृत्य या प्रयोगसिद्ध लोककला प्रकाराने लोकवाङ्मयाच्या अभ्यासाला एक वेगळा आयाम प्राप्त करून दिलेला आहे. लोकांच्या संस्कृतीच्या समग्र आविष्कारांचा अभ्यास ही लोकसाहित्याची व्याप्ती आहे. निखळ वाङ्मयीन रूपबंधांच्या अभ्यास परंपरेपेक्षा अधिक व्यापक व सांस्कृतीक अंगाने लोकसाहित्याचे आकलन व विश्लेषण लक्षात येते.

४.५ लोकसाहित्याची लक्षणे

लोकसाहित्य म्हणजे सामान्य लोकांच्या जीवनातून निर्माण झालेले साहित्य आणि पिढ्यान्पिढ्या तोंडी परंपरेने पुढे आलेले साहित्य असुन यात लोकांचे दैनंदिन जीवन, त्यांच्या भावना, संस्कृती, परंपरा, श्रद्धा आणि अनुभव यांचे प्रतिबिंब दिसुन येते. लोकसाहित्यात भाषा साधी, सोपी आणि बोलभाषेतील असते, त्यामुळे ते सर्वसामान्य लोकांना सहज समजते. म्हणी, उखाणे, लोककथा, लोकगीते, भारुडे, पोवाडे इत्यादी प्रकार लोकसाहित्यात येतात. लोकसाहित्य लोकांचे मनोरंजन करताना त्यांना नैतिक मूल्ये, संस्कार आणि सामाजिक संदेशही देते. त्यामुळे लोकसाहित्य हे समाजाच्या संस्कृतीचे जतन करणारे माध्यम मानले जाते. लोकसाहित्याच्या निर्मितीसंबंधी विवेचन करताना मौखिकता आणि पारंपरिकता हीच प्रमुख लक्षणे आहेत. यांवरून सर्वसाधारणपणे लोकसाहित्याची पुढील प्रमुख लक्षणे असल्याचे दिसते.

१. लोकसाहित्य मौखिक किंवा अलिखित स्वरूपात असते.

२. ते एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यन्त याप्रमाणे चालत येते.

३. पारंपरिकता हा लोकसाहित्याचा महत्त्वाचा विशेष असतो.

४. पूर्वकालीन संस्कृतीच्या अवशेषरूपाने ते जमाजजीवनात प्रचलित आहे. हे संस्कृतीचे किंवा पूर्वकालीन जीवनाचे अवशेष असले तरी मृत अवशेष नसतात. तर वर्तमानकालीन जीवनाच्या संदर्भात त्याला अर्थपूर्णता असते. त्यामुळेच या अवशेषांना सजीव अवशेष मानण्यात येते.

५. ते लोकसमूहाचे किवा समाजगटाचे असते. ती समूहाची निर्मिती असते. व्यक्तीने निर्माण केलेले असले तरी त्याला असे स्वरूप प्राप्त होते की ती व्यक्तीची निर्मिती न राहता सर्व समूहाची बनते. त्याचा मूळ निर्माता हा अज्ञात असतो. व्यक्तीचे व्यक्तिविशिष्टत्व त्यात व्यक्त न होता समूह-विशिष्टत्व व्यक्त होते.

६. लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचा आविष्कार होतो. त्यामुळे ते लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे एक महत्वपूर्ण साधन असते. मौखिक संस्कृतीत सर्व काही लोकसाहित्यच असते.

७. लोकसाहित्य हे लोकमानसाचा आविष्कार असते.

८. लोकसाहित्य हे भौतिक (Material) किंवा मनोमय स्वरूपात असते.

९. लोकसाहित्यातून परंपरा टिकविणे आणि पुनरुज्जीवित करणे या क्रिया घडतात. त्यात पारंपरिकता आणि परिवर्तनशीलता असते.

१०. लोकसाहित्य हे लोकसमूहाच्या भ्रमातून किंवा आभाससृष्टीतून निर्माण झालेले असते.

११. लोकसाहित्य हे लौकिकज्ञान असते. जे मानवाने युगानुयुगे घेतलेल्या अनुभवांचे साररूप असते. ते पारंपरिक ज्ञान असते.

१२. लोकसाहित्य हे कला व वाङ् मय यांचे स्रोत असते.

१३. लोकसाहित्याचे संपादन, विकसन आणि एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंतचे संक्रमण स्वाभाविकपणे व सहजपणे होत असते.

१४. लोकसाहित्याच्या अभ्यासाचा समावेशही लोकसाहित्यात होतो. इतिहासात ज्याप्रमाणे सामग्री आणि त्याचे अध्ययन या दोहोंचा समावेश असतो. त्याचप्रमाणे लोकसाहित्य या संकल्पनेत पारंपरिक लोकजीवनाचा विविध माध्यमांतून झालेला आविष्कार आणि त्यांचे अध्ययन या दोहोंचा अंतर्भाव होतो. म्हणजेच अध्ययन सामग्री आणि अध्ययन या दोहोंना लोकसाहित्य असेच म्हणतात.

४.६ लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व

मानवी जीवन व सभोवतालच्या सृष्टीचे नातेही आपणास लोकसाहित्याच्या अभ्यासामुळे कळण्यास मदत झाली आहे. भारतात वेगवेगळया प्रांतांत आढळणाऱ्या वेगवेगळ्या ज्ञान परंपरा आणि प्राचीन संस्कृती यांचे दर्शन आपणास लोकसाहित्याद्वारेच होते. म्हणून लोकसाहित्याला एक प्रकारे 'संस्कृती' ग्रंथ म्हटले तरी वावगे ठरणार नाही. लोकसाहित्याच्या अभ्यासाची जाणीव अनेक शतकांपूर्वीची असली तरी लोकसाहित्याच्या प्रत्यक्ष अभ्यासाला सुरूवात उशिरा झाली असे म्हणता येईल.

लोकसाहित्याच्या अभ्यासक्षेत्राच्या कक्षा रूंदावत असल्यामुळे लोकसाहित्याच्या अभ्यासाला गती आलेली आहे. लोकसाहित्याच्या दृष्टीने एक क्रांती म्हणावी लागेल. अलीकडील काळात लोकसाहित्याचे अभ्यासक लोकसाहित्याचे संकलन करून थांबलेले नाहीत, तर त्या लोकसाहित्यातून संस्कृतीच्या विविध संदर्भाचा शोध अभ्यास होऊ लागला आहे. लोकसाहित्याचा अभ्यास शास्त्रीय अंगाच्या मांडणीच्या संदर्भात काही विषय पूर्णतः दुर्लक्षित राहिलेले आहेत असेही जाणवते विशेष करून जाणवते.

उदा. लोकसाहित्यातील वस्त्रविषयक अभिव्यक्ती, सौभाग्य अलंकारविषयक अभिव्यक्ती, निसर्गाची विलसिते, व्यावसायिक संदर्भ, सामाजिक रूढी, परंपरा, कुलाचार, कुलधर्म, कुलदैवत, सण, उत्सव, व कलापरंपरा इत्यादी लोकसाहित्यातून प्रतीत होणाऱ्या प्रस्तुत विषयासंदर्भात शास्त्रीय चिकित्सेचा अभाव जाणवतो. म्हणून लोकसाहित्याचा अभ्यास होणे आवश्यक वाटते. लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास होय. संस्कृतीचे सातत्य आणि तिच्यात होणाऱ्या बदलांचे निरीक्षण करण्यासाठी लोकसाहित्य हे महत्त्वाचे साधन आहे.

सतराव्या शतकात लोकसाहित्याला महत्त्व प्राप्त झालेले दिसते. अठराव्या शतकात लोकसाहित्याच्या अभ्यासाची एक लाट निर्माण झालेली दिसते. सोबत भाषाशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, भूगोल, इतिहास, पुरात्वशास्त्र या सर्व विषयांचा लोकसाहित्यांशी अत्यंत जवळचा संबंध येत असल्याने विचारवंत व शास्त्रज्ञ या लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे वळाले. मानवी जीवनाशी शास्त्रांचा जो संबंध येतो त्या शास्त्रांना पुरक सामग्री पुरविणारे शास्त्र म्हणून लोकसाहित्याकडे पाहू लागले. यामुळे इतर विषयांच्या अभ्यासकांनी लोकसाहित्याचा अनेक अगांनी अभ्यास केल्यानंतर केला व लोकसाहित्याचे महत्व मान्य केले.

लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्व विशद करताना लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकसाहित्याचे महत्व विशद करताना म्हणतात,'' लोकसाहित्य ही आपल्या संस्कृतीची संपत्ती आहे. तिचे जतन व संवर्धन आम्ही केलेच पाहिजे. ती तर अत्यंत प्राचीन काळापासून हृदयपूर्वक सांभाळून ठेवलेली आमची मूल्यावान ठेव आहे. त्यात आमचा पूर्व इतिहास सामावलेला आहे.'' [२२] असे लोकसाहित्याच्या अभ्यासात मौलिक भर घालणारे आणि भारतीय संस्कृती कशी श्रेष्ठ आहे सांगण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वरील मत पुरेसे आहे. त्यानंतर प्रसिद्ध विचारवंत, थोर बंगाली कवी रवींद्रनाथ टागोर लोकसाहित्याच्या अभ्यासासंदर्भात असे मत व्यक्त करतात की,

''अत्यंत प्राचीन काळी भारतभूमीच्या या आदिसंतांनी लोकसाहित्य आणि लोककला निर्माण करून देशाची उदात संस्कृती सिद्ध केलेली आहे.''[२३]

रवींद्रनाथ टागोर यांनी मांडलेल्या लोकसाहित्याच्या अभ्यासाविषयीच्या मताचा विचार करता असे लक्षात येते की, अगदी प्राचीन काळापासून भारतातील आदिमांनी लोकसाहित्य आणि लोककला निर्माण करून भारताची प्राचीन परंपरा कायम राखली व जगाच्या पाठीवर या आदिमाच्या कला श्रेष्ठ ठरल्या. त्याची जपवणूक आपण अगदी काळजीपूर्वक करायला हवी असा विचार रवींद्रनाथ टागोंर यांनी मांडला आहे. राम नरेश त्रिपाठी यांच्या मताचा सखोल विचार केल्यास त्यांनी ही लोकसाहित्याच्या अभ्यासाबद्दल जागरूकता ठेवून त्याचा सखोल अभ्यास करावे व लोकांनी लोकसाहित्याची निगा राखावी असे म्हटले आहे. कारण या लोकसाहित्यातून केवळ पारंपरिक, धार्मिक, सामाजिक बाबींचाच इतिहास कळतो असे नाही तर लोकजीवनात होणाऱ्या अतिसूक्ष्म बदलांची नोंदही लोकसाहित्यातीन येत असते. म्हणूनच लोकसाहित्याचा सांभाळ करणे, अभ्यासाच्या कक्षा विस्तारित करणे, लोकसाहित्य मानवी जीवनाच्या विकासासाठी अतिशय महत्वाच्या आहेत. पारंपरिक लोकजीवनाचा अभ्यास लोकसाहित्यात होत असल्याने लोकजीवनाचा संबंध ज्या वेगवेगळया घटाकांशी येतो त्या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात होतो. भारतीय लोकसाहित्याचा जागतिक स्तरावर विचार केला तर भारतीय लोककथांना मानाचे स्थान दिलेले दिसते.

लोकसाहित्याचे अभ्यासक शरदचंद्र रॉय यांनी संपादित केलेला 'मेन इन इंडिया' हा ग्रंथ लोकसाहित्याच्या अभ्यासासाठी वरदान ठरला. लोकसाहित्याच्या वेगवेगळया प्रांतांतील अभ्यासाला गती प्राप्त झाली. भारतीय लोकसाहित्याच्या क्षेत्रात 'कर्नल टाड' यांचेही योगदान अतिशय महत्वाचे आहे. त्यांनी भारतातील राजस्थान आणि इतर प्रांतात रेसिडेंट म्हणून काम करत असताना त्यांनी तेथील लोकजीवन, रूढी, परंपरा, वेशभूषा, सण, उत्सव, धार्मिक विधी यांचाही अभ्यास करून अनेक लेख लिहिले आहेत.

'रेव्हरंड हिस्लाप' या ख्रिस्ती मिशनऱ्यानेही मध्य प्रदेशातील वन्यजमातींचा अभ्यास या विषयावर लेखन केले आहे. 'मिस मेरी फियर' नावाच्या इंग्रज महिलेने दक्षिण भारतातील लोककथांचे संकलन करून 'Old Decoan Days ' नावाचा लोककथांचा संग्रह १८५८ मध्ये प्रकाशित केला. भारतातील लोकगीत संग्रहाचा आधुनिक काळातील पहिला प्रयत्न चार्लस-इ गोवर यांनी केला. त्यांनी तेलगू, तमिळ, कानडी, मल्याळी इत्यादी भाषांतील गीते इंग्रजी भाषेत अनुवादित करून १९७१ मध्ये 'Folk songs of southern India' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. इत्यादींनी या क्षेत्रांत

कामगिरी केल्यामुळे लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने एक नवी दिशा मिळाली. ''भारतात ज्यावेळीस लोकसाहित्याच्या अभ्यासाचे, संशोधनाचे, संकलनाचे प्रयत्न होत होते. त्या वेळेसच मराठीत लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ झालेला होता. 'मिस फियर' यांनी प्रसिद्ध केलेल्या 'ओल्ड डेकन डेंज' या ग्रंथात लोकजीवन व त्या लोकजीवनात प्रचलित असलेल्या लोककथांचे वर्णन आलेले आहे. या ग्रंथाचीच मदत पुढे मराठी लोकसाहित्याचे अभ्यासक 'राजाराम शास्त्री भागवत, विष्णू शास्त्री चिपळूणकर, महादेव कुंटे, सरोजनी बाबर, काशीनाथ लेले छत्रे इत्यादीनी घेतलेली आहे.''[२४]

यात स. का. छत्रे यांनी केलेले इसापकथांचे भाषांतर, राजाराम भागवतांनी 'गोंडी भाषा व गीते' हा लोकगीतांवर लिहिलेला चर्चात्मक लेख, १८७७ साली प्रसिध्द झाले. असे असले तरी लोकसाहित्याच्या अभ्यासाला सुरूवात झाली ती प्रामुख्याने इतिहासचार्य वि. का. राजवाडे यांच्यापासून त्यांनीच सर्वप्रथम इ.स. १९२० मध्ये 'लोकगीत' विषयक लेखात लोकगीतांच्या स्वरूपाची चर्चा केली आणि लोककथांचा चिकित्सक अभ्यासही त्यांनी केला. राज्यभर भ्रमंती करून तेथील समाज जीवनाचे निरीक्षण अगदी जवळून केले. त्यांनी लोकजीवनातील अनेक बाबींचा सूक्ष्म अभ्यास केला. लोकजीवनात रूढ असलेल्या चालीरीती, रूढी, परंपरा, आचार, विचार, सण, उत्सव, यात्रा, जत्रा, लोकभ्रम, लोकरूढी, लोकविश्वास, लोकगीते, लोककथा याचेही संशोधन आणि संकलन वि. का. राजवाडे यांनी केल्यामुळे. लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ झाला.

त्यानंतर डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी संस्कृतीच्या अंगाने लोकसाहित्याचा अभ्यास केला. 'भारत इतिहास संशोधन मंडळा' नेही लोकगीतांचा संग्रह प्रसिद्ध केला. ना. गो. चाफेकर यांनी राज्य साहित्य पत्रिकेमध्ये १९२७ सालापासूनच लोकसाहित्याच्या संकलनाला प्रारंभ केला होता. भाषाशास्त्र आणि समाजशास्त्राच्या अध्ययनाला उपयुक्त म्हणून त्यांनी लोकसाहित्याचे संकलन करून महत्वाची कामगिरी केली.याबद्दलची अधिकची माहिती देताना लता लांजेवार म्हणतात, ''भारतीय इतिहास संशोधन मंडळाचे इतिवृत्त व 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' यातून द. वा. पोतदार, य. गो. दाते यांनीही या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. म. वि. डोंगरे, वि. स. सोहनी, अंबुताई गोखले, ग. त्र्य. देसाई, ह. मो. मराठे, वि. व. घुले, सुशीलाताई नवरे, अ. य. देशपांडे, वि. व. जोशी, गो. रा. प्रधान, श्री. य. वर्दे, ना. रा. शेंडे, अनसूया भागवत, नाना हुंड, कमलाबाई देशपांडे, तारा भवाळकर, तारा परांजपे, सरोजिनी बाबर इत्यादी लोकसाहित्याच्या अभ्यसाकांनी लोककथा, लोकगीते, भक्तांची गाणी, ओव्या यांचे संकलन करून ते निरनिराळया पत्रिकेतून प्रसिद्ध केले.''[२५]

या शिवाय दुर्गा भागवत, डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. यू. म. पठाण या लोकसाहित्य अभ्यासकांचे कार्य तर या क्षेत्रात अतुलनीय असेच आहे. दुर्गा भागवतानी अनेक ग्रंथ इंग्रजी भाषेतून लिहिले. त्यांचा 'लोकसाहित्याची रूपरेखा' हा ग्रंथ लोकसाहित्याच्या अभ्यासकांना मोलाचे मार्गदर्शन करणारा ठरला. या ग्रंथात त्यांनी सांस्कृतिक अभिसरणाची प्रक्रिया मांडून भारतीय लोकजीवनाच्या प्राचीन परंपरेतून प्रतीत होणारे एकात्मतेचे दर्शन घडविले. तसेच त्यांचा 'धर्म आणि लोकसाहित्य' हा ग्रंथ अतिशय महत्त्वाचा आहे. यामधून नविन संशोधकांना संशोधन करण्यास वाव मिळत आहे. '' डॉ. श्रीधर केतकर यांनीही सामाजिक दृष्टीकोनातून संस्कृतीचा अभ्यास केला. मानवसमूहांच्या चालीरीती, कला यांचा त्यांनी केलेला अभ्यास लोकसाहित्यास पूरक ठरणारा आहे.''[२६]

मराठवाडा, विदर्भ, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक इत्यादी प्रांतात फिरून लोकसाहित्याविषयक सामग्री, हस्तलिखित, पोथ्या, प्राचीन संस्कृत प्राकृत ग्रंथ स्थलपरिचय, इतिहास, संस्कृती, दैवतकथा, देवदेवता इत्यादी लोकसाहित्याच्या अभ्यासाठी लागणारी माहिती त्यांनी संकलित केली. 'दक्षिणेचा लोकदेव खंडोबा', 'संतसाहित्य आणि लोकसाहित्य', 'लोकसंस्कृतीचे उपासक', 'महाराष्ट्राचा देव्हारा', 'देवयानी', 'संतलोक आणि अभिजन', 'श्री विठ्ठल एक महासमन्वयक', 'चक्रपाणी', लोकसाहित्य शोध आणि समीक्षा', 'भारतीय रंगभूमीच्या शोधात', 'महामाया', 'लोकरंगभूमी', 'लजागौरी' अशा प्रकारची ग्रंथ संपदा तयार करून लोकसाहित्याच्या अभ्यासकांना उपयुक्त माहिती उपलब्ध करून दिली आहे.

''डॉ. ना. गो. नांदापूरकर यांनी हैद्राबादसारख्या अमराठी प्रदेशात राहूनही मराठी भाषेच्या प्रेमामुळे आणि लोकसंस्कृतीच्या आस्थेमुळे लोकसाहित्याच्या क्षेत्रात अतिशय महत्वाचे कार्य केले. त्यांचे 'माहेरची मराठी', 'मायबोलीची कहाणी', मौखिकता आणि वाङ्मय 'खंड १ व २ इत्यादी ग्रंथ प्रसिद्ध आहेत.'' [२७] लोकसाहित्याचा अभ्यास, लोकसाहित्यविषयक सामग्री गोळा करून लोकसाहित्याचे वेगवेगळया अंगांनी संशोधन करीत आहेत.यामुळे लोकसाहित्याचा अभ्यासात प्रगती झालेली दिसते आहे.

मराठी भाषेच्या लोकसाहित्याबद्दल आपल्या लोक आणि अभिजात या ग्रंथात अरूणा ढेरे आपले मत नोंदविताना म्हणतात, "लोकसंस्कृती आणि अभिजात संस्कृती यांच्या नात्याचं अस्तित्व सिद्ध करण्याची आता गरज नाही. मानवजातीच्या आजवरच्या जीवनप्रवाहात या दोहोंची मिसळण होतच आली आहे. त्या मिसळणीचा, तिच्या परिणामांचा शोध कधी धर्मेतिहासज्ञांनी, कधी समाजमानसशास्त्रज्ञांनी, तर कधी लोकविद्येच्या अभ्यासकांनी परिश्रमपूर्वक घेतलेला आहे.

आपल्या दैनंदिन जीवनात आणि कलाजीवनात या संस्कृतीचे धागे कसे एकमेकांमध्ये गुंततात, याचा मागोवा गमतीदार आहे आणि गंभीरही. म्हटलं तर ते गुंतणं सहज, स्वाभाविक असं

पण त्यामुळेच चटकन लक्षात न येणारं. आपण वाचणाऱ्या जातीचे बहुतेक लोक अभिजात किंवा शिष्ट साहित्याच्या संस्कारांत मोठे होतो. आपल्या अभिरुचीची घडणही शिष्ट साहित्याच्या हातांनीच होत जाते. लोकपरंपरेच्या मातीनं मळलेल्या हातांचा स्पर्श आपल्याला सहजी होत नाही. कित्येक वेळा तर 'अभिजात' या संज्ञेचा 'लोक' या संज्ञेच्या संदर्भात वापर करताना एक प्रकारचा तर तमभाव आपल्या मनात असतो.

'अभिजात' या संज्ञेचा कोशगत अर्थदेखील 'कुलीन', 'उच्च', 'पंडित', 'विदग्ध' अशा प्रकारचा आहे. त्या तुलनेत 'लोक' ही संज्ञा 'जन' या बोड्या गौण स्वरूपातच येते. खरं पाहिलं, तर लोक आणि अभिजात यांच्या उत्तम अभिसरणावरच त्या त्या समाजाचा सांस्कृतिक विकास अवलंबून असतो, या वस्तुस्थितीकडे डोळेझाक करता येत नाही. प्रमाण भाषा आणि बोली भाषा यांच्या संबंधात लागू होणारी भाषावैज्ञानिक सत्यं लोक आणि अभिजात यांच्या संदर्भातील सामाजिक सत्यांशी नातं सांगणारी आहेत. बोलीकडून प्रमाण भाषेला जे मिळतं, ते जिवंतपण, लवचीकपण लोकपरंपराही अभिजात परंपरेला देत असते आणि लोकपरंपरेतील कित्येक घटकांचं उन्नयन अभिजात परंपरेकडून होत असतं."[२८]

"अभिजात साहित्य, कलावंताच्या जीवनविषयक अनुभवाचा सौंदर्यात्म साक्षात्कार घडवतं, तर लोकसाहित्य हे समाजाच्या जीवनवास्तवाचाच एक भाग असतं. लोकव्यवहार, रूढी, परंपरा, संकेत, विधी यांच्याशी लोकसाहित्य जसं दृढपणे निगडित असतं, तसं अभिजात साहित्य नसतं. कारण लोकसाहित्य हे लोकजीवनाचंच एक स्पंदित अंग असतं आणि वास्तवाशी त्याचा अविच्छिन्न संबंध असतो.

अभिजात संस्कार, शास्त्रीयता आणि पांडित्य यांच्या जाणिवेपासून, त्या जाणिवेतून जन्माला येणाऱ्या अहंकारापासून लोकसाहित्य मुक्त असतं. युगसापेक्ष अशा अनेक घटकांची उपस्थिती त्यामध्ये अटळपणे असते; पण मानवी जीवनाच्या मुळाशी जाण्याची, युगातीताला स्पर्श करण्याची शक्ती ही त्यात अंतर्भूत असते. जीवनसत्यांचं स्वाभाविक उच्चारण करण्याचा खुलेपणा तिथे नेहमीच आढळून येतो.

या साहित्याची परंपरा अभिजात साहित्यपंरपरेप्रमाणे लिखित नव्हे, तर मुख्यतः मौखिक आहे. आज लिखित किंवा छापील स्वरूपात आणि कधी कुणा व्यक्तीच्या नावानंही ते तुमच्या-माझ्यापर्यंत येत असलं, तरी प्रकृतीनं ते मौखिकच आहे. शिवाय कोणा विशिष्ट व्यक्तित्वाचा आविष्कार करणाऱ्या अभिजात साहित्यापेक्षा ते निराळं आहे. ते समूहाचं असतं आणि समूहमनाचा, समूहजीवनाचा आविष्कार करतं."[२९] अरूणा ढेरे मराठी भाषा अभिजात कशी आहे. त्याचे महत्त्व आपल्याला यातून विशद झालेले दिसते.

४.७ मराठी लोकसाहित्यातील लोककला

लोककला हे लोकसंस्कृतीचे महत्त्वाचे अंग असून लोकसाहित्यातील मानवी जीवनातील आविष्कार व्यक्त करण्याचे साधन आहे. ग्रामीण भागातील लोकांचे मनोरंजन व ज्ञान देण्याचे हे

माध्यम आहे. लोककलांमधून मानवी जीवनातील कल्पनादृष्टी, सुख-दुखे, सौंदर्यदृष्टी यांचा आविष्कार सातत्याने होत असतो. पहाटेच्या प्रहरी रामनामाचा महिमा गात वासुदेव आला की, त्याची ललकारी कानावर पडायची. मग लोकांची सकाळ उजाडत असे. दिवसभराच्या कष्टाने दमलेल्या माणसांची पावले सायंकाळ झाल्यावर देवळाकडे भजन आणि कीर्तनात रंगणारी भारूडातील प्रसंगांनी खदखदून हसू लागायची, तमाशा, लावणीने देहभान हरपून जायची, पोवाड्यांनी अंगावर शहारे उभे राहायचे... पण कालांतराणे ह्या लोककलेचे महत्त्व कमी होताना दिसत आहे. मानवी लोकसमूहाचे ग्रामीण आणि नागर असे दोन भाग पडतात.

मराठेकालीन लोककलेचा अभ्यास करीत असतांना लोककलेचा अर्थ आणि त्यात कोणत्या लोककलेचा समावेश होतो, या संबंधीचे विवेचन करणे आवश्यक आहे. याबद्दल एकनाथ पगार म्हणतात, ''लोककलांची निर्मिती ही समूहमानसामधून होते. ईश्वरविषयक श्रध्दाभावना, धर्मकल्पना व सर्जक जाणिवा कलाविष्कारांस प्रवृत्त करीत असतात. व्यक्तिगत भावभावनांचे सामूहिकीकरण होत असते. लोककलाविष्कार हे मौखिक परंपरेने चालत आलेली लोकसाहित्याची अंगे आहेत. लोककला या सामूहिक भावनांचे आविष्कार असल्या तरी प्रत्येक काळातील व्यक्ती त्यात भर घालीत असतात.''[३०]

कलाविष्कार हा समूहमनाला आवाहन करणाराच असतो. लोककलांचे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रवाहित होत असते. त्यामुळे लोककला परंपरा आणि परिवर्तन यांचा सुयोग्य मेळ साधतात. लोककलांचे स्वरूप जितके पुरातन तितकेच नित्यनूतन राहते. लोककला आदि आणि प्राचीन परंपरेतून आल्या असल्या तरी त्यांचा सद्यःकालीन आविष्कार हा जिवंत आणि काळाचे भान राखणारा असतो. लोकनाट्य, लोकसंगीत व लोकनृत्य या कला अस्सल मराठमोळ्या कला असून त्यांना मराठी बाण्याचा व मराठी मातीचा सुगंध लाभलेला आहे. या लोककला बहुजनसमाजातच जन्मल्या, वाढल्या व वावरल्यामुळे त्यांना आपल्या मराठी मायबोलीने व मराठमोळ्या लोकसंस्कृतीने आगळा-वेगळा स्वतःचा साज व श्रृंगार बहाल केलेला आहे. मनोरंजनासाठी आणि विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र जमलेल्या समूहाच्या भावनातूनंच लोककलांचा जन्म झाला. मौखिक परंपरेत नृत्य, नाट्य, संवाद, लोकगीते, लोकभूमिका यांचा सुरेख समन्वय आपल्यालरा दिसतो आहे. जनलोकांचे मनोरंजनाबरोबरच नीतीच्या ज्ञानाच्या गोष्टी सांगणारी लोककला प्रबोधनाचे एक महत्त्वाचे साधन आहे. पारंपरिक लोककलांचे त्यांच्या प्रयोजनांवरून चार प्रकारात वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

१. आध्यात्मिक प्रबोधन घडविणारी लोककला, कीर्तन, भारूड, लळित व दशावतार.

२. मनोरंजन पुरूषार्थ जागविणारी लोककला शाहिरी, पोवाडे, भेदिक लावणी.

३. लोकधर्माचे लोकाधार मांडणारी लोककला गोंधळ, भराड, जागरण.

४.श्रृंगारातून मनोरंजनाचा खजिना लुटणारी लोककला तमाशा, लावणी.

महाराष्ट्राच्या लोककलांमध्ये कीर्तन, लोकनाट्य, तमाशा, गण, गौळण, भारूड, लळित, दशावतार, गोंधळ, जागरण, या लोककलांचा समावेश करावा लागेल.

४.८ लोककला

सामान्यतः लोककला म्हणजे लोकांपासून चालत आलेली कलेची परंपराच होय, असा त्याचा ढोबळ अर्थ असतो, म्हणून पुढील विवेचन प्रथम लोककला म्हणजे काय याच्या संबंधीच्या तज्ञांनी व अभ्यासकांनी दिलेल्या व्याख्या तपासणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील प्रख्यात भारतीय संस्कृती कोश शास्त्रज्ञ पं. महादेवशास्त्री जोशी यांनी सर्व साधारणपणे लोककलेची व्याख्या केलेली आहे. ती पुढीलप्रमाणे - ''सर्वसाधारणपणे ग्रामीण भागात राहाणाऱ्या बहुसंख्य लोकांची परंपरा प्राप्त कला म्हणजे लोककला होय.'' [३१]

वरील व्याख्येवरून असे दिसून येते की, ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांची कला परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीने आत्मसात केलेली कला म्हणजेच लोककला होय. लोककला ही लोकांनी तयार केलेली असते.एकूण कला ६४ आहेत. पं. महादेवशास्त्री जोशी लोककलेची माहिती सांगत असतांना लोककलांचे तीन भेद सांगतात. ''विधी कर्माच्या साहचर्याने आस्तित्वात येणारा, जनलोकांच्या सामूहिक नेणिवेतील भावविश्वाचे प्रतिनिधित्व करणारा, लोकवाद्यांच्या व लोकमाध्यामांद्वारे अविष्कृत होणाऱ्या व्यक्तिगत वा सांघिक कलाविष्कारास 'लोककला' असे म्हणता येईल.''[३२]

नागरीकरणाचा त्यातून उद्भवणाऱ्या दिखाऊ कृत्रिमपणाचा प्रभाव ग्रामीण अनागर जीवनपध्दतीत कार्यरत असतो. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांची जीवनशैली ही निसर्गाशी इमान राखणारी आणि पूर्णपणे अकृत्रिम असते. हे आदिम ग्रामीण लोकसमूह आपले जीवन जगत असताना, जगण्याचा अंगभूत भाग म्हणून आपल्या जीवनशैलीचा जो कलात्मक आविष्कार करतात असे म्हणता येईल. लोककला ही संज्ञा अत्यंत व्यापक आहे. जुन्या कपडयांची गोधडी शिवण्यापासून हातावर मेहंदी काढण्यापर्यंत अक्षरशःहजारो प्रकारांनी लोकजीवनातील कलाविष्काराची यादी करता येते. जीवनाशी संबंध असणाऱ्या कोणत्या ना कोणत्या कामाशी, विधीशी त्यांचा संबंध असतो. लग्नविधीचा भाग म्हणून पार पाडले जाणारे गोंधळ, जागरणासारखे कुळाचार, कानबाई महालक्ष्मी खंडोबा, या देवतांचे उत्सव व त्या वेळी साजरी होणारी विधिनाट्ये, देव्हाऱ्याच्या भिंतीवर श्रावणात

रंगविलेले जाणारे 'नाग नरसोबा'ची कोनाड्याच्या महिरपीसाठी गेरूने रंगविलेले वेलपट्टीची नक्षी, अंगणात सणासुदींला आणि रोज घातलेल्या रांगोळीपर्यंत लोककलांचा आणि कलात्मक जीवनशैलीचा मुक्त आविष्कार आपल्याला बघायला मिळतो. लोककलाविष्कारांच्या उपलब्धतेचा हा तपशील हवा तेवढा लांबविता येईल. हे सारे कलात्मक आविष्कार अत्यंत सहजतेने, नैसर्गिकपणे व्यक्त होतात.

लोककलांचा हा आविष्कार सांघिक व वैयक्तिक स्वरूपाचा असतो. ''लोककला म्हणजे भिन्न भिन्न माध्यमांद्वारे एका विशिष्ट जनसमूहाचा परिस्थिती, स्थळ, काळ सापेक्ष समूहमनाच्या कलाजाणीवांचा सामूहिक आविष्कार असतो.'' ''निसर्गाशी संवाद साधीत जगणाऱ्या लोकसमूहांचे दैनंदिन जीवनाशी संबंधित परंतु कलात्मक आविष्कार लोककला म्हणून ओळखले जातात.'' ''विधी कर्माच्या साहचर्याने अस्तिवात येणारा, जनलोकांच्या सामूहिक नेणिवेतील भावविश्वाचे प्रतिनिधित्व करणारा, लोकवाद्य व लोकमाध्यमांच्या द्वारे आविष्कृत होणाऱ्या व्यक्तिगत वा सांघिक कलाविष्कारास लोककला म्हणता येईल.

विविध माध्यमांच्या साह्याने प्रदेश कालसापेक्ष समूहमनांच्या लोकसांस्कृतिक जीवनशैलीचे संदर्भमूल्य असलेल्या स्वाभाविक कलात्मजाणिवांची सौंदर्यघटकानी युक्त अशी सामूहिक पातळीवरची अनघड निर्मिती म्हणजे लोककला!'' लोककलांचा आविष्कार हा सामान्यतः लोकसमूहाद्वारे होतो. जेव्हा तो आविष्कार वैयक्तिकरीत्या होतो. तेव्हा त्याचे स्वरूप अंशतः वैयक्तिक असले तरी त्या आविष्कारामागील भावना ही समूहमनाच्या आविष्कराचीच असते. कार्ल युंग ह्या मानसशास्त्रज्ञाने अबोध समूहमन हे त्या लोक समूहातील पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या अनुभवाचे संचित घेऊन लोककलाविष्करातून व्यक्त होत असते. त्यामुळे हा कलाविष्कार समूहमनाला आवाहन करणाराच असतो. व्यक्ति विशिष्ट ते पेक्षा समूहनिष्ठा हेच लोककलांचे व्यवच्छेदक लक्षण राहिले आहे. लोककलांचे संक्रमण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रवाहित होत असतो. त्यामुळे लोककला परंपरा आणि परिवर्तन यांचा सुयोग्य मेळ साधतात. म्हणून लोककलांचे स्वरूप जितके पुरातन तितकेच ते नित्यनूतन ही राहते. प्राकृतिक मुक्तपणा, उत्सफूर्तता आणि लवचिकता ही लोककलांची अंगभूत वैशिष्ट्ये तसेच त्यांचे सामर्थ्य असते. त्यामुळे लोककला आदि आणि प्राचीन परंपरेतून आल्या असल्या तरी त्यांचा सद्यःकालीन आविष्कार हा ताजा, जिवंत आणि काळाचे भान राखणारा असतो.

लोकपरंपरा आणि नागरपरंपरा यांच्यात सततचे अभिसरण होत असते. नागरपरंपरेत जेव्हा साचेबंदपणा, बंदिस्तपणा येतो तेव्हा नागरपरंपरा लोकपरंपरेतील सत्व घेऊन नवा आविष्कार घडवते.

गोंधळ, जागरण, तमाशा, लावणी, भजन, कीर्तन, धनगरीनृत्ये, दशावतार खेळ, वासुदेव, पिंगळा, बहुरूपी, नंदीबैलवाला, शाहीर, सुंबरान, पोतराज, कडकलक्ष्मी या सारख्या अनेक लोककलांचा या ठिकाणी उल्लेख करता येईल. मानवाच्या आदिम श्रध्दा जितक्या प्राचीन आहेत. तितकाच लोककलांचा इतिहासही प्राचीन आहे.

गोंधळ, जागरण, वासुदेव, आदि विविध लोककलाप्रकारांच्या पाठीमागे विधिनाटयाची एक समर्थ परंपरा उभी आहे. ही परंपरा आणि लोकसमूहाची धर्मकल्पना व आस्था यांच्या समावेशाने या विधींना कुलाचाराचे रूप प्राप्त होते. त्यांच्या आविष्कार पध्दतीत एक निश्चितता येते. त्यातून सादरीकरणाचे शास्त्र विकसित होते. त्यामुळे निरनिराळया स्थळी, काळी सादर होणाऱ्या लोककलांमध्ये एकजिन्सीपणा येतो.धकाधकीच्या, दुःखाच्या क्षणांनी भांबावलेल्या मराठी माणसाला आपल्या कलांद्वारे माहित करण्याची किमया साधणाऱ्या या लोककला आणि लोककलावंत आज काळाच्या पडद्याआड जाऊ लागले आहेत. सामाजिक जाणिवेतून लोककलांची निर्मिती होते आणि या सामाजिक जाणिवा शतकानुशतके जिवंत ठेवण्याचे कार्य लोककला करतात. लोककलाविष्कारांतून त्या समाजाचे मनोविचार आणि मनोविकार प्रतिबिंबित होतात. म्हणून मानवी जीवनातील जाणीवविचाराचे सम्यक् दर्शन घडविणारा आरसा म्हणूनही लोककलांचे महत्व असते.

'लोककला' म्हणजे परंपरेने चालत आलेले जीवनरहाटीचे कौशल्य असे म्हणता येईल. जी जीवनशैली परंपरेने चालत आलेली आहे, ज्यात कौशल्य आहे. त्याला लोककला म्हणतात.''[३३] ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांची परंपरेने प्राप्त झालेली कला म्हणजेच लोककला होय. लोककलांचे क्षेत्र हे फार व्यापक आहे. लोकजीवनाच्या बहुतेक क्षेत्रात लोककलांचे दर्शन घडते. मात्र एकविसाव्या शतकांत लोप पावतात की काय अशी स्थिती आज निर्माण झाली आहे. कला आणि कलावंत दुर्मिळ झाले आहेत.

४.९ लोककलांची वैशिष्ट्ये

१. लोककलांची निर्मिती ही धर्मभावनेतून झाली आहे.

२. नृत्य, नाट्य, संगीत वाद्य यांना महत्व असते.

३. उपासना, पूजा, प्रार्थना यांना महत्व असते.

४.उत्सफूर्तता एक महत्वपूर्ण विशेष असतो.

५. संहिता अलिखित असून पौराणिक कथांचे सादरीकरण यातून केले जाते.

७. मनोरंजन, उद्बोधन, धार्मिक श्रद्धा जोपासणे उद्देश असतात.

८. लोकनाट्यातून जीवनदर्शन घडते.

९. मुळ गाभा कायम ठेवून लोकनाट्याचे स्वरूप काळानुसार बदलत जाते.

१०. लोककलांचा जन्म विधिआचरणातून झालेला आहे.

११. लोकनाट्याचा प्रयोग सादर करण्याची काही लोकांची परंपराच असते.

१२. रंगभूषा, वेशभूषा पारंपरिक असते व रंगमंच खुला असतो.

४.१० निवडक लोककला

४.१०.१ कीर्तन

देवाची आराधना करण्याचे, भक्तीचे सुलभ साधन म्हणून प्राचीनकाळापासून कीर्तन प्रचलित आहे. परमेश्वर आणि थोर विभूतींचे गुणगान, तसेच पराक्रमाचे वर्णन करणारा लोककला प्रकार आहे. काव्य, अभिनय आणि काहीवेळा नृत्य यांच्या संगमातून सादर झालेले कथारूप एकपात्री निवेदन म्हणजे कीर्तन. नारद एक उत्तम कीर्तनकार असल्याचा उल्लेख पुराणात सापडतो. वेदकाळातही कीर्तनाला महत्व होते, कीर्तनामध्ये संगीत, नृत्य आणि नाट्य या तिन्ही गोष्टींचा समावेश असतो. कीर्तन जणू एकपात्री नाटयप्रयोग असतो. कीर्तनकार म्हणजे हरदासीबुवा बहुश्रुती, व्यासंगी रसिक असतो. उत्तम पाठांतर, संगीताचे ज्ञान त्याला असते. डोक्याला पगडी, गळयात तुळशीची माळ, अंगात बराबंदी पायघोळ धोतर, कपाळाला बुक्का, हातात वीणा असा त्यांचा पोषाख असतो. रामदासी कीर्तन परंपरा ही समर्थ रामदास स्वामी यांनी सुरू केली आहे. समर्थ स्वामींच्या रचनावर आधारित हे कीर्तन असते. सध्या संयुक्त कीर्तन, जुगलबंदी कीर्तन आणि राष्ट्रीय कीर्तन असे आधुनिक प्रकारही आले आहेत. कीर्तनाच्या रंगमंच व्यवस्थेत संप्रदायानुसार थोडाफार बदल असतो. नारदीय व वारकरी संप्रदायाच्या कीर्तनाच्या वेळी रंगमंचीय व्यवस्था विशिष्ट स्वरूपाची असते.

संस्कृती रक्षण, धर्मोपदेश, सदाचार, सदभावना आणि चराचरातील शाश्वत मूल्यांचे जपवणूक करण्यासाठी कीर्तन हे प्रभावी माध्यम आहे. अंधश्रद्धा निर्मूलन, कर्मकांड, जुनाट कालबाह्य रूढी, दारूबंदी, व्यसनाधीनता अशा अनेक प्रकारावर जनजागृती केली जाते. म्हणून कीर्तन हे लोककला आणि भारतीय ज्ञानपरंपरा यांच्या दुवा निर्माण झालेला दिसून येतो

४.१०.२ लळित

लळित ही एक मराठमोळी लोककला आहे. कोकणात नारदीय कीर्तन परंपरेत लळिताचे महत्वाचे स्थान आहे. लळिताचा हेतू सोंगाच्या माध्यमातून तत्वज्ञान प्रेक्षकांच्या मनावर बिंबवणे हा असतो. या सोंगाच्या माध्यमातून करमणूक केली जाते. उत्सावाच्या शेवटी उत्सवदेवता सिंहासनावर बसली आहे, असे मानून तिच्या दरबारात विविध सोंगे आणली जातात. त्याद्वारे मागणे मागतात.

याला लळित म्हटले जाते. या सोंगांमध्ये भालदार, जोपदार, वासुदेव, गोंधळी, वाघ्या व मुरळी यांसारखी पात्रे असतात.

लळीत या लोककलेतून तत्त्वज्ञानाचे प्रमाण स्पष्ट होते. अभिजात दर्जा प्राप्त होण्यासाठी ज्या अटी शर्ती आहेत त्यापैकी जुनी परंपरा तत्त्वज्ञानाला महत्त्व देत असते. त्यामुळे लळीत हे प्रभावी माध्यम दिसून येते. मराठी लेखनात लळित या शब्दाचा वापर अनेक ठिकाणी आल्याचे उदाहरण आपल्याला दिसतात. लळिताच्या संदर्भात संत तुकारामांच्या अभंगात उल्लेख सापडतात. किंबहना तुकाराम गाथेत लळीत हे स्वतंत्र प्रकरण आहे. लळिताते अभंग पुढीलप्रमाणे,

'गळीत झाली काया। हेंचि लळित पंढरीनाया।।१।।
टालें अवसाना पासीं। रूप राहिले मानसी ।।२।।
वाहिला कळस। तेथें स्थिरावला रस ।।३।।
तुका म्हणे गोड झालें। नारायणी पोट धालें ।।४।।'
'आली लळिताची वेळ। असा सावध सकाळ।।१।।
लहो करा वेगी स्मरा। टाळी वा विश्वंभरा।। २ ।।
झालिया अवसान। न संपडती चरण।।३।।
तुक्या बंधु म्हणे थोडे। अवधि उरली आहे पुढे।।४।।'" [३४]

४.१०.३ तमाशा

मराठी लोकसाहित्यातील अत्यंत महत्वाचा लोककला प्रकार म्हणजे तमाशा. तमाशातील फार्स आणि वगनाट्यातून प्रबोधनाचे, मनोरंजनाचे काम केले जाते. पौराणिक, सामाजिक वगनाट्यामधून प्रबोधन आणि मनोरंजन केले जाते. तमाशा या कलेच स्वरूप अत्यंत साधे आणि सरळ आहे, प्रथम गण नंतर गवळण बतावणी किंवा रंगबाजी होत असे. सर्वात शेवटी नाट्यमय 'वग' सादर केला जात असे. तमाशाची संपूर्ण रचना संगीतावर आधारलेली असे. 'पूर्वीच्या मूळ तमाशात अवघे सहा-सात कलावंत असत तमाशातील प्रमुख पात्र सरदार असते ते स्वतः शाहीर किंवा गाणारे पात्र असते. दुसरे महत्वाचे पात्र 'नाच्या' किंवा 'नाचणारीण' आणि संगीताच्या ठेक्याबरोबर कार्यक्रमात रंग भरण्यासाठी विनोद काम करणारा 'सोंगाडया' हे अत्यंत महत्वाचे पात्र असते.

आज तमाशाचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. पारंपारिकते बरोबरच नवस्वीकृती होत आहे. समाजाची अभिरूची बदलली आहे. तमाशाला रंजनमाध्यमांशी एक प्रकारची स्पर्धा करावी लागते आहे. त्यामूळे काळाच्या ओघात काही अपरिहार्य असले, तरी तमाशा हा मराठी लोकरंगभूमीवरचा एक रांगडा, अस्सल देशी आविष्कार आहे. यापुढील काळात तो किती तग धरेल यांची चिंता वाटावी

अशी परिस्थिती नक्कीच आहे. तमाशा आणि कलावंत यांच्यासाठी सरकारकडून प्रयत्न झालेले दिसतात. तमाशा कलावंतांसाठी पेन्शन योजना सुरू झालेली आहे. मात्र, अद्याप सर्वापर्यंत ही योजना पोहचू शकलेली नाही. आज अनेक तमाशाचे फड बंद पडले आहेत. आणखी बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे तमाशावर संशोधन होणे गरजेचे आहे.

तमाशा ही महाराष्ट्राची अतिशय लोकप्रिय लोककला आहे.महाराष्ट्रामध्ये पेशवेकाळात तमाशाला बहर आला. भक्ती आणि श्रृंगार या दोहोंच्या संयोगातून तमाशाचा जन्म झाला आहे. तमाशा हा शब्द पर्शियन असून नंतर तो उर्दूत आला. तमाशाला वेगवेगळी नावे आहेत. 'गंमत' असे नाव काही ठिकाणी वापरले जाते. १८९८ पर्यंत 'गंमत' या नावानेच ओळखला जात होता असे नामदेव व्हटकरांनी आपल्या पुस्तकाच्या शेवटी दिलेल्या तमाशाच्या जाहिरातीवरून दिसते.

आजही खानदेशात 'खडीगंमत' या नावाने तमाशाला ओळखले जाते आहे. प्रारंभीच्या काळात तमाशा वडाच्या झाडाखाली पारावर, उघड्या मैदानात आणि चावडीवर रॉकेल दिव्याच्या टेंब्याच्या उजेडात तमाशा रात्रभर चालायचे.. बैलगाडीतून तमाशा कलावंताची भटकंती सुरू असायची, तमाशाची मांडणी वारंवार बदललेली दिसते. आजच्या बदलत्या सामाजिक संदर्भात या कलेकडे पाहिले तर अठरापगड जातींनी उभी केलेली ही लोककला कोणतीही जात धर्म न मानता कलावंत म्हणून समतेचा धर्म पाळते.

म्हणून तमाशा हे खऱ्या अर्थाने सामाजिक समतेचे प्रभावी असे रंजनपीठ आहे असे म्हणावेसे वाटते. तमाशा ही दलित-उपेक्षित जातींनी विकसित केलेली कला आहे, हे जसे एका बाजूला सत्य आहे, तसेच समाजातील सत्ताधीश आणि इतर सवर्ण जातींनी या कलेला आश्रय दिल्यामुळे विकसित झालेली आहे. समाजातील सर्व जातीधर्मांची माणसं एका रंगमंचावर आणण्याचे काम तमाशाने केलेले आहे.

जसा ज्ञानोबा, तुकोबा, विठ्ठलाचा नामगजर प्रत्येकाच्या ओठी आहे, तसाच तमाशा हाही प्रत्येकाच्या जगण्याचा अविभाज्य भाग बनलेला आहे. कोणत्याही खेड्यात गेलात तर तमाशा माहीत नाही असा माणूस शोधून सापडणार नाही. म्हणूनच तमाशा ही तमाम बहुजनांच्या अभिव्यक्तीची सर्वात लोकप्रिय अशी लोककला आहे, असे आपल्याला अभिमानाने म्हणता येते. महाराष्ट्रातील तमाम बहुजनांचं जगणं अभिव्यक्त करण्याचं महत्त्वाचं काम तमाशा आणि इतर लोककलांनी केलेले आहे आणि आजपण करत आहेत. या लोककला जसजशा नामशेष होतील तसा तसा मराठी माणूस असुरक्षित आणि बैचेन होईल, कारण या लोककला त्याच्या जगण्याचाच एक भाग आहेत. म्हणून तमाशाला पुनरूज्जीवन देऊन त्याची नवी सांस्कृतिक मांडणी करण्याची ही

वेळ आहे. या कामी शासन, समाज, अभ्यासक, संशोधक, कलावंत आणि रसिक या साऱ्यानी एकत्र येऊन गांभिर्याने विचार करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

तमाशातील संवाद जसे समोरच्या पात्राशी असतात तसे प्रेक्षकांशी समन्धित असतात. प्रयोग सादरीकरणावेळी कधीकधी प्रेक्षकांना जाब विचारून विनोद निर्मिती केली जाते. तमाशात संहिता कलावंतावर अवलंबून असते कलावंत संहितेचा जोडून किती स्थानिक विषयावर संवादाद्वारे अविष्कार करतो याला महत्त्व असते. तमाशामध्ये कथानकातील कल्पना विस्ताराला अधिक वाव असतो. तमाशात राजाची मस्करी केली जाते. संवाद असे असतात की, खरे काय ते लवकर उलगडत नाही.

उदा.

राजा: प्रधानजी! प्रधानजी! ओ प्रधानजी!

प्रधानजी: जी सरकार!

राजा: कुठे होता?

प्रधानजी: महाराज! लवकर निघालो होतो पण रस्त्यात एक भांडाण चालू व्हतं, त्ये सोडवायला गेलो म्हणून उशीर झाला.

राजा: बरं बरं! राज्याचे काय हाल हवाल!

प्रधानजी: महाराज! राज्यात सकळीकडं आबादी आबाद आहे. सुखानं लोक नांदताहेत. राजा असावा तर असा म्हणून आशीर्वाद देताहेत.

राजा: प्रधानजी! रयतेला काही कमी पडू देऊ नका. ज्याला धान्य नसेल त्याला धान्य द्या, ज्याला द्रव्य नसेल त्याला द्रव्य द्या, आपली राजकोठारं खुली करा. राज्यातला एकही माणूस उपाशी राहू देऊ नका.

तेवढ्यात शिपाई वर्दी घेवून येतो.

शिपाई: महाराज

प्रधानजी: काय रे, चल बरोबर! काय हवंय तुला!

राजा: प्रधानजी, त्याला बोलू द्या

प्रधानजी: महाराजा आपण कायबी काळजी करू नका म्यां पाहतो काय ते

राजा: बरं बरं!

प्रधानजी: कारे शिपुरड्या लई माज आला काय?

अशा संवादातून राजाचा रयतेकडे लक्ष देण्याचा प्रसंग चितारून प्रधानजीचा चतुरपणा व्यक्त होतो. तमाशाची संहिता लवचिक असते ऐनवेळी कलावंत आपणास हवा तसा बदल करून पे्रक्षकांना हसवत असतो. तमाशाने ऐतिहासिक विषय जागृतीसाठी, प्रबोधनासाठी निवडले. ऐतिहासिक थोर पुरूषांची चरित्रे, कर्तव्य नीतिमत्ता, स्वाभिमान, देशनिष्ठा अशा गुणांची गरज असल्यामुळे तमाशात ऐतिहासिक स्त्री, पुरूषांच्या चरित्रास अधिक वाव दिला. ऐतिहासिक पुराण पुरूषांचे चरित्र प्रेरणा म्हणून समाजासमोर ठेवले. तमाशाने जसे पोट धरून हसवले तसे प्रेक्षकाच्या डोळयात पाणीही आणले.

उदा. आईचे काळीज हा वग ज्यांनी पाहिला त्यांच्या डोळयात पाणी आल्याशिवाय राहिले नाही. सामाजिक धार्मिक कथानके तमाशातून समाजासमोर मांडली. असे कथानक मांडत असताना नितीत्त्वाचा आग्रहाने पुरस्कार केला. गावागावातील राजकीय वातावरण, पाटील, कुलकर्णी यांचा जनतेला होणारा त्रास, पाटलाची वाईट नजर, भाऊबंदकी, सावकारी, भावाभावातील भांडण, सासू-सुन, पती-पत्नी, सासरा-सुन असा त्रिवेणी संगम, भाऊ-बहिणीतील वाद, बहीण-भाऊ प्रेम असे अनेक विषय तमाशाने संहिता रूपात स्वीकारले.

तमाशात काल्पनिकपणा निर्माण करता येतो. कृष्ण, पेंद्या, राधा, गवळण, मावशी अशी अनेक पात्र तयार करता येतात. बाजार, निसर्गवातावरण फक्त बोलले तरी तयार होते. स्टेजवर चार पावले चालले तरी घरातून बाजारात गेल्यासारखे वाटते. हेच खालील उदाहरणावरून लक्षात येते. काही स्त्रिया आहे त्या वेषात स्टेजवर येतात आणि मावशीला आवाज देतात.

गौळण: मावश्ये ऽ ऽ ऽ ए मावश्ये !

मावशी: आले ! आले ऽ ऽ ऽ (एक पुरूष फक्त साडी घालून स्टेजवर प्रवेश करत.) पोरींनो ! कोणकोण आलंय?

गौळण: मावश्ये कागं एवढा उशीर केलाय, दिस बघ किती वर आलाय (मावशी कपाळावर आडवा हात ठेवून सूर्य कोठे आहे ते शोधते.)

मावशी: व्हय व्हय! दिस लय वर आलाय, चला बिगी बिगी (रंगभूमीवर जमलेल्या गौळणी डोक्यावर हात करून गोलाकार फिरत चालू लागतात.)

गौळण: मावश्ये तू पुढं चल! मला भ्याव वाटतंय!

मावशी: अगं! कोणधरंल! चल बिगी बिगी!

पेंद्या: थांबा

गौळण: मावश्ये कोण म्हणालं आंबा?

मावशी: अगं आंबा नय, थांबा म्हणालं

गौळण: मावश्ये!बघ ह्यो, यानं माझा हात धरला!

मावशी: ए! आरं बाबा, त्वां धरलं पण धरायची जागा चुकलास सोड तिचा हात! (पेंद्या हात सोडतो, मावशी साडीच्या निऱ्या पुढे करते आणि हय धर म्हणते) ''दिस बघ किती वर आलाय''

डोक्यावर हात उभे करणे, रंगभूमीवर गोलाकार फिरून चालण्याची क्रिया करणे, मला भ्याव वाटतय यावर तुला भरदिवसा कोण धरंल या संवादात प्रतिआभास विश्व निर्माण केल्याचे जाणवते. तमाशाचा प्रयोग रात्री चालू आहे. तरीही दिस डोक्यावर आला म्हणणे, कपाळावर आडवा हात धरून खरोखर दिस किती वर आला हे रात्री पाहणे प्रेक्षकांचे मनोरंजन करून जाते. तमाशाच्या प्रेक्षकांना याची कल्पना असते तरीही ते विनोद म्हणून त्याकडे पाहतात. मुळात तमाशाची संहिता द्विअर्थाचा अविष्कार करत जाते. तमाशात बैल दूध देतो. मित्रामित्रांचा व्यापार देशांतर्गत व देशाबाहेर चालतो. तमाशा आणावयास गेलेल्या मित्राकडून तमाशातील बाईला ''रामराम'' घालतात. हे केवळ तमाशातच चालते नाटकात चालत नाही. ''त्याने आपल्या लोकरंगभूमीवर जुनाच आशय जरी स्वीकारला होता तरी त्याने तमाशा लोकरंगभूमीला विधीनाट्याएवढे धार्मिक अधिष्ठान दिले नाही. तमाशात महिला असताना देखील पुरूष फक्त अंगाभोवती साडी गुंढाळून कुंकू लावून मावशीचे रूप घेतले जाते. गवळणींना सोबत घेऊन बाजाराला जाणारे हे पात्र कृष्ण व पेंद्याला उलट सुलट उत्तरे देऊन प्रेक्षकांना हसवते. रंगमंचाचं पूजन झाल्यानंतर सर्व कलाकार रंगमंचावर येऊन तमाशा रंगतदार व्हावा म्हणून श्रीगणेशाला साकडं घालतात.

'जय जय गरूड ध्वजा आमुची राखावी तुम्ही लज्जा।।धृ।।

अनंत नामे, अनंत रूपे, अवतार आहे तुझा ।

अनंत धर्मे? अनंत कर्मे, सज्जन दुर्जन करीती पूजा।।

या गणात केवळ दोन ओळींचा समावेश आहे. पठठे बापुरावांचा हा गण अत्यंत लोकप्रिय असून तो आजही सगळया तमाशा फडातून गायला जातो.

वगाला लोकप्रियता मिळत असते. काही गाजलेले वग 'इष्कानं घेतला बळी,' 'तांबडं फुटलं रक्ताचं,' 'बाईने दावला इंगा,' 'आईच काळीज,' 'राजा हरिश्चंद्र,' 'सख्खा भाऊ पक्का वैरी,' 'चांगुणाची कथा,' 'एक बाई दोघांची घाई,' इत्यादी. अशारीतीने तमाशातील वग हा घटक लोकरंजनासाठी महत्वपूर्ण ठरतो. सामाजिक संकेत झुगारून सामान्य माणसाला नैतिकतेची जाणीव करून देणे, विनोदातून प्रेक्षकांच्या मनातील ताण कमी करणे त्यांना हसवत ठेवणे ही वगलेखनाची

तात्क असते. गंभीर स्वरूपाचे वग आणि रंजनपर वग यांतून सामान्य माणसाला विमुक्तेचा प्रत्यय आणून दिला जातो. तमाशा या लोकलेतून लोक मनोरंजनाबरोबरच लोकप्रबोधन करत असून लोकप्रबोधन हा भारतीय ज्ञान परंपरेत महत्त्वाचा घटक मानला जातो.

४.१०.४ पोवाडा

पोवाडयाच्या सर्वांत जुना उल्लेख महिकावतिच्या बखरीत सापडतो. यासंदर्भात वि. का. राजवाडे लिहितात. बिंबराजाचा पुत्र केशव देव - याने मोठ्या ऐश्वर्याने बारावर्षे राज्य केले. त्याने राजपितामह म्हणजे आसपासच्या सर्व लहानसहान संस्थानिकांना आजा ही पदवी धारण केली. व त्या अर्थाचे बडेजावीचे गद्य पद्य पोवाडे रचिले म्हणजेच सर्वसाधारणपणे शके अकराशेच्या सुमारास मराठी भाषेत पोवाडयाची व्युत्पत्ती झाली असावी असे दिसते.

'पोवाडा' या शब्दाच्या उत्पत्ती संबंधीचा आणखी एक उल्लेख बाराव्या, तेराव्या शतकाच्या सुमारास ज्ञानेश्वरीमध्ये सुद्धा पहावयास मिळतो. ज्ञानेश्वरीच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या अध्यायामध्ये अनुक्रमे दहाव्या आणि एकशे त्रेसष्टाव्या ओवीमध्ये "पवाडा" असा शब्द आढळतो. याठिकाणी पवाडा याच अर्थ काही ठिकाणी स्तुती तर काही ठिकाणी युद्ध, झगडा असा घेतलेला दिसतो. यादवांच्या दरबारी यादवराजांची स्तुती गाण्यासाठी भाट होते. या भाटांचा गायनपरंपरेचा परिणाम शिवशाहीतील शाहिरांच्यावर झाला असावा. आणि या भाटांच्या संपकानेच अज्ञानदासा सारख्या शाहिराने आपल्यामध्ये असणा-या सुप्त काव्यशक्तीला मुक्त करून पोवाडयाची परंपरा शिवशाहीमध्ये रुजू केली असावी. अज्ञानदास सारख्या काही कवींनी गुरुस्तुती सारख्या विषयावर क्वचीत पोवाडयाची रचना केलेली दिसते. म्हणजेच इसवी सन १६५९ च्या पूर्वीच काहीप्रमाणात का असेना पोवाडा लोकप्रिय झालेला दिसतो.

मुसलमानी अमदानीत मराठ्यांचे स्वतंत्र अस्तित्वच संपुष्टात आले; मग पराक्रम कुठला नि त्यांचे वर्णन कुठले? त्या वेळी शाहिरी कवितेची निपज बंद पडली असावी. सतराव्या शतकातील स्वराज्याकांक्षेने व शिवाजीच्या अद्भुत पराक्रमाने महाराष्ट्राचें वातावरण एकदम बदलले. नव्या आकांक्षा, नवा उत्साह यांच्या बहरात नव्या भावनेची नवी गाणीही महाराष्ट्र गाऊ लागला. तलवारींची खणखणाट व घोड्यांच्या टापा यांच्या आवाजात ढोलकी, संबळ, डफ या देशी वाद्यांच्या साथीत वीरश्रीच्या कथा गाणारा कवींचा व गायकांचा एक नवा वर्गच शाहीर व गोंधळी या नावाने निर्माण झाला, आणि त्या जुन्या मराठी वाङ्मयात पोवाडा हा नवा वाङ्मय प्रकार अस्तित्वात आला.

विसाव्या शतकात शिवाजी महाराजां सोबतच, स्वांतत्र्य चळवळीतील प्रमुख लोकनेते आणि तदनंतर सामाजिक चळवळी मध्ये अग्रेसर असणारे समाजसेवक यांचा कार्यगौरव करण्यासाठी अनेक

पोवाडे लिहीले गेले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, लोकशाहीर बशीर मोमीन (कवठेकर) यांनी स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराज, आझाद हिंद सेनेचे सुभाषचंद्र बोस, संविधानकार डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि रयतेच्या शिक्षणासाठी झटणारे कर्मवीर भाऊराव पाटील, यांच्या जीवनावर अनेक पोवाडे लिहीले आहेत.

४.१०.५ दशावतार

दशावतार हा एक लोकनाटयाचा प्रकार आहे. विष्णूचे दहा आवतार विष्णूने कधी कोणत्या कारणांसाठी घेतले, याची माहिती त्यात असते. हा लोककला प्रकार गोवा, कोकण, कोल्हापूर भागात मोठया प्रमाणावर सादर केला जातो. श्री शामजी नाईक काळे यांनी कर्नाटकातून कोकणात आणलेला प्रसिध्द लोककला प्रकार आहे. त्याचा पहिला प्रयोग अडिवरे गावी महाकाली देवीसामोर झाला. दशावतार या खेळात पेटाऱ्याना फार महत्व असते. दशावतारी नाट्यात पूर्वरंग असतो. पूर्वरंगात सादर होणाऱ्या भागाला आडदशावतार असे म्हणतात. सूत्रधाराच्या निवेदनाने खेळाची सुरवात होते. उत्तररंगात रामायण, महाभारत, पुराणे, भागवत इ. मधल्या पौराणिक प्रसंगाचे सादरीकरण केले जाते.

४.१०.६ गोंधळ

महाराष्ट्रात गोंधळाला मोठी परंपरा आहे. लग्न समारंभ किंवा शुभ कार्यामध्ये गोंधळाचा कार्यक्रम केला जातो. कुलदेवतेला प्रसन्न करणाऱ्यासाठी गोंधळ घालण्याची परंपरा सध्यातरी टिकून आहे. अंगात तेलकट झबला, गळयात देवींची प्रतिमा, कपाळावर कुंकू व भंडारा आणि गळयात कवड्यांची माळ अशी वेशभूषा असलेली व्यक्ती म्हणजे गोंधळी. संबळ आणि तुणतुणे या वाद्यांद्वारे नृत्यही करणारा गोंधळी काकडे पेटवून देवीचे गुणगान करत गोंधळ घालतो. पण शहरीकरणाचे दुष्परिणाम या परंपरेवर होत आहेत.

महाराष्ट्रातील लोकजीवनात धार्मिक विधी म्हणून गोंधळ या लोककलेला फार मोलाचे स्थान आहे. घराण्याचा एक कुलाचार आणि देवीच्या उपासनेचा एक भाग म्हणून गोंधळ घालण्याची प्रथा महाराष्ट्रातील अनेक घराण्यातून आजही सुरू आहे. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकातही गोंधळविधी केला जातो. लग्न, मुंज, इ. मंगल कार्याच्या निमित्ताने यजमानाच्या घरी गोंधळी नृत्य, नाट्य, संगीत इ. गोष्टीसह देवीच्या नावाने गोंधळाचा कार्यक्रम करतात. देवीची भक्ती हाच गोंधळाचा मुख्य हेतू असतो, पण भक्तीबरोबरच मनोरंजनाचा भाग गोंधळाच्या कार्यक्रमात आलेला असतो. 'गोंधळ' हा महाराष्ट्रातील प्रमुख लोककला प्रकार असून अनेक अंगाने तो समृध्द आहे. दैवतांची भक्ती व अध्यात्मक त्याचा अविष्कारबरोबरच समाजप्रबोधन करणे हा त्याचा उद्देश आहे.

संत वाङ्मयात गोंधळाची परंपरा अत्यंत प्राचीन असल्याचे उल्लेख आढळतात. भूतमात महोत्सवाचे आणि गोंधळाचे साम्य असल्याचे अनेक अभ्यासकांनी दर्शवून दिलेले आहे. देवीच्या उपासनेत 'गोंधळ' विधीच्या दृष्टीने जसा महत्त्वाचा आहे, तसाच प्रयोगात्मक कलेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. गोंधळ घालताना किंवा सादर करताना फक्त रात्रभर जागणे नव्हे तर झोपलेल्या समाजाला जागवण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. समाज जागृती हे त्याच मूळ ध्येय होय. महाराष्ट्रात गोंधळयांच्या मराठे, कुंभार कदमराई व रेणूराई अशा पोटजाती असल्याचे उल्लेख असले तरी गोंधळ्यांनी रेणुराई आणि कदमराई या दोनच पोटजाती असल्याचे मान्य केले आहे.

माहूरच्या रेणुकेचे भक्त रेणुराई तर तुळजापूरच्या तुळजाभवानीचे भक्त कदमराई असून तिचीच पूजा मांडतात. रेणुराई गोंधळी विधिनाट्याच्या वेळी समोर दिवटी ठेवतो तर कदमराई गोंधळी हातात जळता पोत धरून गाणी म्हणतात. सामाजिक व्यक्तीचे मार्मिक चित्रही गोंधळी आपल्या कथागीतातून करतात.

गोंधळी आपल्या स्मरणशक्तीचा, कल्पकतेचा, वकृत्वतेचा आणि कथनशैलीचा प्रकर्ष आख्यानात दाखवितो. त्यांच्या निवेदनात नाट्य, गीत, वाद्य यांचा मिलाप होतो. तुळजापूरची भवानी ही महाराष्ट्राची कुलस्वामिनी. या कुलस्वामिनीच्या भगतांना गोंधळी म्हणतात. गोंधळ्यांनी देवीची मांडलेली उपासना विधी म्हणजे गोंधळ. बदलत्या सांस्कृतिक संक्रमणातही गोंधळ ही लोककला आजतागायत तग धरून आहे. महाराष्ट्राच्या लोकमानसात ज्या देवतांनी आपल अबाधित स्थान निर्माण केलेले आहे. त्यात तुळजापूरची भवानी आणि माहुरची रेणुका ही दोन शक्तिपीठं अग्रस्थानी आहेत.

गोंधळी या संस्थेला जवळजवळ हजार ते बाराशे वर्षोंची परंपरा निश्चितच लाभलेली आहे. आराध्याचा गोंधळ: मराठ्यांच्या गोंधळाप्रमाणे या गोंधळाचे स्वरूप असते. या गोंधळात दिवटीऐवजी पोत तेवत ठेवला जातो. पेटता पोत हातात धरून मुख्य गोंधळी अधून-मधून नृत्य करतो. सबंळ किंवा हलगी जशी ताला सुरात वाजेल तसा गोंधळी किंवा आराधी पोत हालवून घुमायला लागतो. पायात घुंगरे बांधलेली असतात. गोंधळ चालू असताना त्यांच्या अंगात येते. व आराधी घुमू लागतो.

मग त्याच्यामार्फत देवीला कौल लावला जातो. आजारी असेल, कोणाला करणी केली असेल तर याला प्रश्न विचारले जातात. कोणी नवसही बोलतात. संबळया गोंधळापेक्षा आराध्याच्या गोंधळात एकूणच वातावरण भारलेले असते. आराध्याच्या गोंधळात पूर्वरंगात देवीची पूजाविधी, गण

देवदेवता आवाहन, देवीची महात्म्यपर गाणी आणि उत्तररंगात पुराण-कथाभागावर आधारित कथागीत असते.

गोंधळ कलाप्रकार प्रत्येक घरोघरी केला जाणारा कुलाचार आहे. गोंधळ सादर करण्यासाठी जी वाद्ये वापरली जातात ती परंपरेने ठरवलेली असतात. त्यात प्रामुख्याने संबळ, तुणतुणे, आणि झांज ही वाद्ये येतात. गोंधळातील गण साधारणपणे पुढीलप्रमाणे

''गणराज लवकर यावे, भेट सकळाला द्यावे।।धृ।।
अंगी शेंदराची उटी, केसर कस्तूरी ललाटी।।
पायी घागऱ्या वाजती, नाचत आले हो गणपती।
तुका म्हणे शोधून पाहे विठ्ठल गणपती तुझा नाही''।।१।।

अशाच पारंपरिक गणांमध्ये विविध पारंपरिक 'गण' सादर केले जातात. गणपती बाप्पाला गोंधळात कोणतेही विघ्न न येता गोंधळ पार पाडण्यासाठी विनंती करतात.
परिसरातील देवदेवतांना आवहन केले जाते.

''या गोंधळाला आज यावे अंबे
चैक भरीला कुसरी, लिंब नारळ नानापरी
उदबत्या लावूनी चारी,
आज मी गोंधळ मांडिला या गोंधळाला
आज यावे अंबे या गोंधळाला लवकर
यावे अंबे माहूरगड रेणूके गं
गोंधळा यावे तुळजापूर भवानी गं
गोंधळा यावे येरमाळा येडूबाई
गोंधळा यावे राशीन यमाबाई
गोंधळा यावे हुकले चुकले हो गोंधळा यावे।
राहिले साहिले हो गोंधळा यावे।
सकळीक देवांना वो हंकार केला हंकार केला
वो मेळा मिळाला बोल एकदा सदानंदाचा उदे उदे उदे,
कुलस्वामिनी, माहूरगड रेणुका भवानी की जय
श्री तुळजामाता भवानी की जय''।।.

सर्व देवी देवतांना गोंधळाला येण्याचे 'आवतन' गोंधळी देतो. यालाच 'आवाहन' असेही म्हणतात. अलौकिक पातळीवरच्या या देवतांना लौकिक पातळीवर आणण्याची किमया गोंधळी आपल्या गीतातून करतो.

देव संचारणे: पहाटेच्या वेळी यजमानाला आंघोळ करून यायला सांगितले जाते. ज्या व्यक्तीच्या अंगात देवाचे वारे असते अशा व्यक्तीही आंघोळ करून येतात. त्यांच्या अंगात वारे येते देव संचार करतो. पुजेच्या समोर तो उडया मारून अंगात आल्याबरोबर घुमायला लागतो, त्याला प्रोत्साहित करण्यासाठी वाघे अशा रीतीने वाद्ये वाजवतात की त्याला अधिक प्रोत्साहन मिळते. वाद्याची गती वाढते वारे वाढल्याने थांबा म्हटले की वाद्ये बंद केली जातात.

वारे वाला जागरण पावन झाले किंवा नाही सांगतो. 'आनंद' अशी खूण असते. त्याला लिंबू दिले जाते. कधीकधी प्रेक्षकांची कोडी सोडवून घेतली जातात. करणी, भूतबाधा, अडीअडचणी यावर उपाय विचारले जातात. 'चलहट' ही खंडोबाचे वारे अंगात असणाऱ्या व्यक्तीची वाघ्यांना वाद्य वाजवण्यास सांगण्याची खूण असते. अंगात वारे आलेली व्यक्ती अंगावर मारून घेणे, लंगर अंगावर आटपणे, सवते लिंबू चावून खाणे, तळहातावर कापूर पेटवणे, पेटता कापूर तोंडात टाकणे असे अंगावर शहारे आणणारे प्रकार करतात.

४.१०.७ लंगर विधी

लंगर ही खंडोबा देवतेची जणू आभूषणे होत. करंगळी एवढया जाडीच्या कडयाची एकत्र ही साखळी असते. लंगर तोडण्याचा विधी यजमानाकडून केला जातो. लंगर तोडण्यापूर्वी यजमानाकडून त्याची पूजा केली जाते. वाघे लंगराची पूजा करतात. यजमानाला भंडार लावतात. आणि लंगर लावतात. यजमानाकडून जर लंगर तुटला तर ते चांगले मानले जाते. लंगर पण हालक्या दर्जाचा बनवला जात आहे. त्यामुळे तो लवकर तुटतो. ''गायन, नर्तन, संवाद आणि अभिनय यांचा सुयोग्य मेळ पाहावयास असेल तर लोकरंगभूमीवरील गोंधळाचे विशेषतः वाघ्याच्या जागरणाचे कार्यक्रम पहावेत. तेथे या सर्व कलांच्या अवष्कारांचा एक मनोरम विन्यास पहावयास मिळतो.

गोंधळ सादरीकरणाचे बदलते स्वरूप: 'गोंधळ' ही एक पारंपरिक लोककला आहे. गोंधळयांच्या सादरीकरणात पारंपरिक लोककलेतील देवीची स्तुती गाणे, चांगल्या गोष्टीचे महत्त्व वर्णन करणारी पदे, वीरांचे पराक्रम गाणारे पोवाडे तसेच लोकजीवनातील वास्तवावर उपरोक्त भाषेत प्रकाश टाकणारी कवणे, त्याचबरोबर नृत्य, नाट्य, संवाद, बतावणी या सर्वांचा एकत्रित करून गोंधळाचे एक सुंदर नाट्य उभे राहते.

पूर्वी गोंधळ रात्रभर चालायचा त्या गोंधळात गोंधळ्यांच्या कलात्मक सादरीकरणाने खरा रंग भरत असे आणि पहाटे पर्यंत गोंधळ चालूच राहायचा. कधी पहाट झाली याचे भान पण प्रेक्षकांना राहत नसे. परंतु आता शासनाने रात्री ११ नंतर कोणती कार्यक्रम चालू ठेवू नयेत असे नियम घातलल्यामुळे गोंधळ रात्री ११ नंतर बंद होतो. तर राहिलेला विधि सकाळी घेतला जातो. तसेच इतर कार्यक्रमाप्रमाणे गोंधळ्यांच्या कार्यक्रमांतही काटकसर झाली आहे. लग्नप्रसंगी गोंधळ घालावा लागतो. म्हणून यजमान घालतो इतकेच गोंधळी असे दीडतासांचे छोटेखानी गोंधळ घालतो.

आज सद्यस्थितीमध्ये गोंधळी दिवसाकाठी दोन ते तीन देखील गोंधळ घालताना आढळतात. पण गोंधळ्याचा ठरावीक कार्यक्रम संपूर्ण रात्रीचा असतो. गोंधळाचे प्राचीन स्वरूप याप्रमाणे धार्मिक होते खरे, परंतु त्यातील पूर्वरंग व उत्तररंग या शब्दावरून त्यांची मनोरंजकता व लोकप्रियता निर्विवाद दिसून येते.

गोंधळी समाजामध्ये रंजनाबरोबरच समाजप्रबोधन करतात. त्यामध्ये शिक्षण, हुंडाबळी, एड्स, कर्जबाजारीपणा, सवती मत्सर, व्यसनमुक्ती, व्यभिचारीपणा इ. सारख्या विषयावर प्रकाश टाकण्याचे काम आजचे गोंधळी करताना आढळतात. हेच गोंधळाच्या संहितेचे बदलते स्वरूप म्हणावे लागेल. समाजातील जिवंत प्रश्न मांडून गोंधळी आपले कार्यक्रम प्रेक्षकांना कसे आवडतील याचा विचार करून गोंधळ सादर करताना दिसतात. अध्यात्मिक किंवा दैवी उद्बोधन, सामाजिक प्रबोधन आणि लोकरंजन घडवीत बदलत्या काळातही विविध स्थित्यांतरातून वाटचाल करीत गोंधळाची परंपरा आजही समर्थपणे उभी आहे.

४.१०.८ लावणी

घरदार सोडून लढाईवर बराच काळ दूर गेलेल्या शिपायांच्या मनोरंजनासाठी गीत, नृत्य आणि अदाकारी यांचा संगम असलेली लावणी हा लोकप्रिय कलाप्रकार आहे. तमाशाचा भाग म्हणूनही लावणी सादर केली जाते, श्रृंगारावर आधारलेल्या लावणीचे मूळ संतांच्या विराण्या, गौळणी, बालक्रीडेचे अभंग यात आढळून येते. शाहिरांनी या लावण्यांची लज्जत वाढवली. श्रृंगारीकच नव्हे, तर भक्तीरस, वीररस, वात्सल्यरस असलेल्या लावण्याही शाहिरांनी रचल्या आहेत. लावणीशिवाय मनोरंजनाच्या कार्यक्रमाला शोभा येत नाही. मात्र सध्याची लावणी आणि लावणीकलावंत यांची स्थिती दयनीय झाली आहे.

लावणीचे अंतरंग सुंदर व ती म्हणण्याचा ढंगही नखरेबाज आहे. श्रृंगाराशिवाय लावणी लावणीच वाटत नाही. त्यामुळेच नऊ रसांची लावणी नऊवारीत सादर झालेली पहाताना रसिक देहभान विसरतो.

झाल्या तिन्हीसांजा करून शिणगार साजा

वाट पहाते मी गं येणार साजन माझा

प्रीतीच्या दरबारीच येणार सरदार

मायेच्या मिठीचा त्यांच्या गळ्यात घालीन हार

दिलाच्या देव्हाऱ्यात बांधीन मी पूजा

आपला पती शेतात कामाला गेलेला असतो तो दिवसभर काबाडकष्ट करून थकून दिवस मावळतीला येणार म्हणून नटूनथटून श्रृंगार करून आपल्या पतीची वाट पहात असते. तीच्या मनात अनेक विचारांचे काहूर माजलेले असते. आपल्या पतीला कधी साजन तर कधी सरदार कधी सख्या असे अनेक उपमा देत असते. आजसुध्दा ग्रामीण भागात स्त्रीया चार पाच वाजता सर्व कामे आवरून केस विचारंतात, पावडर, लाली वगैरे वगैरे लावून आपला श्रृंगार करतात. याच्या पाठीमागे पण तेच कारण आहे की, आपला पती कामावरून आल्यावर आपण त्याला सुंदर दिसावे त्याचे मन प्रसन्न व्हावे त्यान दिवसभर केलेल्या कामाचा थकवा जावा.

एकीकडे श्रृंगार रसाने भरलेली लावणी तर दुसरीकडे मोहमयी संसारातून दूर राहण्याचा सल्ला देणारी आध्यात्मिक शाहिरी सरमिसळ केल्याचे दिसते.

सुंदरा मनामध्ये भरली, जरा नाही ठरली।।

हवेलित शिरली, मोत्याचा भांग।।

अरे गड्या हौस नाही पुरली, म्हणोनी विरली,

पुन्हा नाही फिरली कुणाची सांग।।

सुंदरा मनामध्ये भरली' ही रामजोशींची गाजलेली आणि रसिकप्रिय लावणी म्हणजे स्त्री सौंदर्यांच्या मोहक आणि उन्मादक वर्णनाचा सुंदर नमुना आहे. अतिशय मितशब्दात सुंदर अशा ललनेच वर्णन सुरेख पध्दतीने केलेले आहे. स्त्री सौंदर्याचे एवढे सुरेख वर्णन जास्त प्रमाणात पहावयास मिळत नाही. लावणीसाठी यमक आणि प्रास अगदी चपखलपणे बसविलेला आहे. प्रवाही वळणाची रामजोशीची ही लावणी आजही तितकीच लोकप्रिय आहे.

''माझी मैना गावावर राहिली। माझ्या जिवाची होतीया काहिली।।

आतिव बांधा। रंग गव्हाळा। कोर चंद्राची उदात गुणाची।

मोठ्या मनाची। सीता ती माझी रामाची।

हसून बोलायची। मंद चालायची।

सुगंध केतकी। सतेज कांती।

घडवी पुतळी सोन्याची नव्या नवतीची।

काडी दवण्याची।''

मुंबईचा कामगार व त्याची बायको व तिच्यापासून झालेली ताटातूट, पोटापाण्यासाठी सहन करावा लागलेला विरहाने व्याकूळ झालेला कामगार, त्याच्या मनाची झालेली तगमग, बायकोचे सौंदर्य, तिचे उदात मन, तिच्यासाठी दागिने आणतो म्हणूनही न हसणारी मनात खचलेली हात उंचावून निरोप देणारी मैना आणि तिला सोडून मुंबईत येणारा हा श्रमजीवी कामगार यांच्यावर ही लावणी रचलेली आहे.

तसेच मुबंईत सुरू झालेली संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व बेभान झालेला मराठी कामगार आणि गावाकडे राहिलेल्या मैनेसारखी अवस्था झालेली जनता म्हणजे बेळगाव, कारवार, निपाणी व गोव्यातील मराठी जनतेचे चित्रण केले आहे. ''माझी मैना गावावर राहिली हे बेळगाव आणि कारवार या भागासाठी रूपक आहे. बेळगाव आणि कारवार यांना वेगळे करण्याचे काम सरकार करत असताना अण्णांनी येथे दोन जिवांची ताटातूट झाल्यावर काय होतं याचं समर्पक वर्णन या लावणीत आलेले आहे.

४.१०.९ जात्यावरची गाणी

जात्यावरीची गाणी किंवा ओव्या हा लोककला प्रकार आपण सर्वांनीच लहानपणी ग्रामीण भागात स्त्रियांकडून दळण दळताना पाहिले किंवा ऐकले आहे. सासुरवाशीणच्या मनात दडलेल्या भावना कुणाला सांगता येत नसल्याने जात्यावर दळतांना गाण्याच्या माध्यमातून स्त्रिया आपल्या विचारांना वाट करून देत असत. जरी हा छंद असला तरी दळण दळताना थकवा येवू नये मनावरील ताण हलका व्हवा म्हणून गीते गात असत. याचे विषय संसार, धर्म, भावाचे गुणगाण, बहिणीची माया, माहेरची आठवण, पतीवरील प्रेम, जत्रा, स्त्रीवरील अन्याय, कौतुक, मुलांच्या जन्मावर अशा विविध विषयावर गीते असतात.

जात्यावरच्या ओव्यांची चाल शांत व संथ असते. त्यांचा आवाज फारसा चढा नसतो. सध्याचा जमाना इंटरनेटचा असल्यामुळे घरातील जात हे दुर्मिळ झाल आहे. कोणीही जात्यावर दळण न दळता गिरणीतून दळण दळूण आणत आहेत. त्यामुळे जात्यावरील गाणी हा लोककला प्रकार लुप्त होत चालला आहे.

वळणाचं पाणी, नीट वळणानं जात

तानी माझी बाळाबाई, हाक मारली की माग येती

माझी लाडाची लाडुबाई किती आज्ञाधारक आहे हे सांगताना ती मोठ्या कल्पकतेने पाण्याच्या प्रवाहाच उदाहरण ओवीमधून देते. पाण्याच्या प्रवाहाला जर वळण असेल तर ते त्याच वळणाने अगदी सहजतेने धावत असतं. त्याप्रमाणेच माझी बाळाबाई ही मोठ्या गुणांची आहे, चांगल्या वळणाची आहे. पहिल्यांदा हाक मारताच सरकन माघारी वळते.

माहेरच्या ओव्या म्हणजे स्त्रियांच्या पारंपरिक लोकगीतांचा एक प्रकार आहे. माहेरच्या आठवणी, आईची माया आणि सासरच्या जबाबदाऱ्या यांसारख्या भावनांचा सुंदर मिलाफ असतो. या ओव्या पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या आहेत आणि जात्यावर दळताना गायल्या जातात, ज्यामुळे त्यातून ग्रामीण आणि पारंपरिक मराठी जीवनशैली दिसते. माहेरची आठवण, बहिणी-भावाचे नाते, सासरच्या नव्या जगाची ओळख आणि आपले घर सोडून जाण्याची वेदना यांसारखे विषय यात आढळतात.

उदाहरणे:

- "माय माय करू आता, माहेरची माया लागली..." (आईची आठवण).
- "सासरची वाट लांब, माहेरची आठवण दाट..." (सासर आणि माहेरची तुलना).
- "बहिणीला भावाने दिलेली भेट, सासरी जाताना..." (भाऊ-बहिणीच्या नात्यावर आधारित).

थोडक्यात, माहेरच्या ओव्या म्हणजे स्त्रियांच्या मनातील भावना, घरगुती जीवन आणि मराठी संस्कृतीचे सुंदर प्रतिबिंब आहेत.

४.१०.१० पोतराज आणि कडकलक्ष्मी

पोतराज हा ग्रामीण भागात मंगळवारी व शुक्रवारी फेरी मारतो. हालगीच्या तालावर तो देवीची गाणी म्हणतो. कमरेला वेगवेगळया चोळी खणाची रंगीत घागरा घातलेला असतो. ही लोककला फार पारंपरिक आहे. स्त्रिया ते जेव्हा गाणी म्हणत आापल्या दारी येतो तेव्हा त्याला घरातील धान्य देतात. त्याच्यावर तो आपला उदनिर्वाह करत असतो. काळाच्या ओघात ही कला सुध्दा बंद पडण्याच्या मार्गावर आहे.

मरीआई या ग्रामदेवतेचा उपासक असतो. तो जातीने महार किंवा मांग असतो. हळदी-कुंकुवाचा मळवट भरलेला, कंबरेला अनेक चिंध्यांपासून तयार झालेले घागरावजा वस्त्र आणि हातात 'कोरडा', गळयात मण्यांच्या माळा, कंबरेला सैलसर घुंगराची माळ बांधलेली आणि पायात खुळखुळा घातलेला. आपल्या हातातील हसाडणे कधी स्वतःच्याच शरीरावर प्रहार करीत तर कधी नुसतेच हवेत 'सट सट' आवाज काढीत तो मरिआईच्या नावाने दान मागतो. मरीआई ही कडक देवी असल्यामुळे तिला कडकलक्ष्मी म्हणतात. ग्रामीण भागात प्रत्येक गल्लीत पेटारा ठेवून तो भाकणूक

करतो की, यावर्षी पाऊस चांगला पडेल. धान्याची भरभराट होईल. आई नवसाला पावेल. लहान मुलांना आजारातून बरं करण्यासाठी, जनावरांच्या रक्षणासाठी, घरात शांतता नांदण्यासाठी मरिआईला नवस बोलला जातो. ग्रामीण भागातल्या महिलांची या देवीवर गाढ श्रध्दा असते. त्यामुळे स्त्रिया खुश होवून सुपात धान्य, हळदी कुंकू, आगरबत्ती आणून देवीची पूजा करतात.

बांगड्याची माळ लिंबा वाणी डोळं

उभी हाय नदीच्या काठाला

लखाबाई पोतराज आलाय भेटीला..॥ धृ ॥

तरूपण वेला मी घालतोया साज

हातात चंग पायी वाकी वाज

आवरण लेतो नाव तुझं घेतो

सदा पाण्याच्या घोटाला

लखाबाई पोतराज आलाय भेटीला..॥ १ ॥

पोतराजाबरोबर पत्नीही असते. गुडघ्यापर्यंत नेसलेली नऊवारी साडी, हळदी कुंकवाचा मळवट भरलेला, गळयात कवड्यांच्या माळा आणि हातामध्ये टिमकी अथवा मृदंगासारखे एखादे चर्मवाद्य आणि डोइवर मरिआईचा पेटारा घेवून ते वाजवत, बेभान होवून नाचणाऱ्या पोतराजाबरोबर तिही त्याची साथ देत असते. पोतराज आपल्या वैविध्यपूर्ण नृत्याने आणि हाततल्या 'कोरड्याच्या' फटकाराने पोतराज देवीची अवकृपा तसेच संकटे, विपत्ती दुर करतो असे मानले जाते.

४.१०.११ वासुदेव

सकाळच्या वेळी घरोघर हिंडून पांडुरंग आणि श्रीकृष्ण यांचे अभंग-गवळणी गात दान मागणारा लोककलाकार आहे. पंढरपूर सारख्या ठिकाणी वासूदेव हा तीर्थक्षेत्रात स्नान करायला आलेल्या मंडळीना नाना तीर्थक्षेत्रांची आणि तिथल्या देवतांची नावे सांगतो. त्या अर्थाने वासुदेव तीर्थांचा चालताबोलता कोशच आहे.

गाव जागवीत आली, वासुदेवाची स्वारी....

आता उठा मंडळी सारी, कर जोडुनी

विनवणी करी.....

असे पहाटेच्या प्रसन्न वातावरणात पारंपरिक गाणी म्हणत भिक्षा मागत फिरणारे वासुदेव आजही खेड्यांपाड्यांतून आणि शहरातून दिसतो. डोक्यावर मोरपिसांची आकर्षक टोपी, पायात घुंगरु,हातात टाळ घेऊन बासरी वाजवणारा वासुदेव आपला या पोशाखात आसतो.सगळेजण मोठ्या आनंदाने

त्याचे स्वागत करतात. त्याचे सौम्य मंजूळ गाणे मनाला प्रसन्न करते.वासुदेवांच्या गाण्यात पांडुरंगाचे अभंग, भक्त प्रल्हाद माहात्म्य, गवळणी असतात. संतांच्या रूपकांमधील वासुदेव हा लोकांना अहंकाराचा त्याग करा, भक्तीची कास धरा म्हणजे आत्मज्ञानाची, ब्रह्मानंदाची प्राप्ती होते असे सांगताना दिसतो.

दान पावलं ..... दान पावलं
पंढरपुरात ..... इठोबा रायाला
कोल्हापूरच्या ..... अंबाबाईला

असं सर्व गावांच्या देवदेवतांचे नाव घेत, ज्याने दान दिले त्याच्या पूर्वजांचे स्मरण करतो. त्यामुळे तो जणू आपला उद्धार करतो अशी लोकमानसाची श्रद्धा आहे. देवाच्या नावाने दान मागणारा वासुदेव दान मिळाले की अंगाभोवती गिरक्या घेत दान पावल्याचे गाणे म्हणतो. चांगलं बोला, चांगलं कृत्य करा. भुकेलेल्यांना दानधर्म करा, परमेश्वराची भक्ती करा असा संदेश तो आपल्या गाण्यातून देतो.

खोटं बोलणं, खोटी ग्वाही, उलटा जमाना
शहाणा चतुर पंडीत, त्याला कोणी इचारीना.

अशा प्रकारच्या उपदेशपर रचना करता करता त्याच्या मनातील लोकाद्धाराची तळमळ स्पष्टपणे जाणवते.

वासुदेवाला दान दिल्यावर तो सगळया दैवतांच्या नावाने पावती देतो, आणि मग अलगुज वाजवतो. वासुदेव सहसा कुणालाही आपणाहून पैसे मागत नाही. मराठी लोकजीवनात आणि लोकसंस्कृतीत प्राचीन काळापासून वासूदेवाला एक आगळे वेगळे स्थान आहे. या वासुदेवाच्या साह्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी मावळयांच्या घरी निरोप पाठवले आहेत. तसेच वासुदेवाचा हेरगिरीसाठी उपयोग करून शत्रुंच्या गोटातल्या बातम्याही मिळवल्या जात होत्या.

बळीच्या वंशी जन्म घेतला,
काळीचा धंदा सोडू नको.
ऐक पराण्या, तुला सांगतो,
हरि भजल्याविण राहू नको.

असा हिताचा उपदेश करतानाच, 'तुम्ही आया बायांनो द्या वासुदेवणीला चोळी, अहो, लहान मुलीच्या द्या अंगीची काचोळी...' अशी स्वतःच्या संसाराला हातभार लावणारी मागणी वासुदेव सकाळी करत गावो-गाव फिरत असतो. वासूदेव जरी भिक्षेकरी असले, तरी ते भिकारी गणले

जात नाहीत, कारण त्यांना भिक्षा वाढणे हा धर्माचरणाचा भाग मानला जातो. पहाटेच्या वेळी रामकृष्णाचा नामघोष करीत येतो. असे असले तरी वासुदेव आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. सध्या वासुदेवांची मुले शिक्षण घेऊन आपला उदरनिर्वाह करत आहेत.

४.१०.१२ भारूड

भारुडाचे मूळ साधारणतः सहाव्या शतकातील तामीळ गीतात आढळते. विशेष म्हणजे नाथांच्याही पूर्वी ही रचना लोकवाङ्मयपरंपरेत पाहायला मिळते, ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. मुळात 'भारूड' हे 'लोकधर्मी' आहे. एकनाथांनी प्रसिध्द केलेला लोककला प्रकार म्हणजे भारूड. प्रतीकात्मक भूमिकांमधून रूपकात्मक पध्दतीने तत्त्वज्ञानाची मांडणी करून नितीचा उपदेश संतानी केला. त्यासाठी 'बहूरूढ' म्हणजे भारूढ लोककलेचा उपयोग केला. मराठी भाषेत अनेक संतानी भारूढे लिहिली. भारूडांच्या रचनेतून अध्यात्म, मनोरंजन, दोष-दुर्गुणांचे भजन तसेच गुढगुंजन आहे भारूड लिहिण्याच्या प्रयोजनांवरून व रचना संकेतावरून एकनाथांची भारूडे ही आध्यात्मिक उद्बोधन, प्रबोधन व लोकरंजन साधण्यासाठी केलेली रूपकात्मक स्फुट रचना होय.

भारूड म्हणजे उपदेशपर रूपके ! एकाच वेळी मनोरंजन आणि प्रबोधन साधणारी लोकप्रिय काव्यरूपे म्हणजे भारूड, असे म्हणता येईल. संत ज्ञानेश्वरांनी भारुडे लिहिली असली तरी प्रामुख्याने 'भारूड' म्हटले की, एकनाथमहाराजांचेच नाव प्रथम घ्यावे लागते. भाषिकदृष्ट्या दुर्बोध आणि अल्पसंख्या यामुळे ज्ञानेश्वरांच्या भारुडांकडे कोणाचे फारसे लक्ष गेले नाही. वास्तविक, ज्ञानेश्वरांची आंधळ्या, घोगडी, काऊ, नामदेवांचा 'बोबडा', जोगा परमानंदाची 'गुडगुडी' ही काव्ये म्हणजे भारुडेच होत. रामदास-तुकाराम यांनीही क्वचित भारुडे लिहिलेली आढळतात. 'भारूड' हा लोकगीतप्रकार असल्यामुळे त्यात नृत्य, नाट्य, संगीत, या वैशिष्ट्यांचा आढळ होतो; परंतु मुळातच लोकशैलीचा स्पर्श असल्यामुळे त्याचे आताच्या नाट्यगीतांशी साम्य असल्याचे तीव्रतेने जाणवते.

म्हणूनच संस्कृत वाङ्मयात जे स्थान पुराणांचे आहे तेच संत वाड्.मयात भारूडांचे स्थान आहे. भारूडरचनांध्ये नाट्यतत्त्वे ठासून भरलेली असतात. त्यामुळे त्यांचे नाट्यरूपांतर सहजतेने होते. रूपकांमधून धार्मिक आणि नैतिक तत्त्वज्ञान सांगणारी लोककला म्हणजे भारूड समाजाला समजेल अशा भाषेत तत्त्वज्ञान सांगून सदाचार आणि नीतीवर भर देणारे असे भारूड आहे. जीवनाचे अवलोकन आणि चिंतन भारूडामधून व्यक्त झालेले दिसते. तंत्रज्ञानाच्या युगात करमणूकीची अनेक साधने आल्यामुळे भारूडे दिसेनाशी झाली आहे. खेडोपाडी अनेकांनी भारूड सादर करून लोकशिक्षणाचे काम केले. असे राजेंद्र नाईकवाडे, प्राचीन अर्वाचन साहित्य अनुबंध, या ग्रंथात

म्हणतात. भारूडातील विषय हे सर्वसामान्यांच्या परिचयाचे व नित्याच्या व्यवहारात वावरणारे व आढळणारे असतात. 'विचू चावला,' 'दादला नको ग बाई,' 'सुया घे दाबन घे, ' असे अनेक भारूडे जनमानसात लोकप्रिय आहेत. आजही भारूडाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे.

४.१०.१३ कळसुत्री बाहुल्या

महाराष्ट्रात कळसुत्री बाहुल्यांच्या खेळांची परंपरा फार प्राचीन आहे. बाहुल्यांचे हे नाटक सर्व प्रांतात लोकप्रिय आहे. सादरीकरणात थोडा फार फरक आढळतो. काही ठिकाणी बाहुल्यांचे काही खेळ पडद्यावर बाहुल्यांची सावली पाडून केले जातात. तर काही खेळ रंगमंचावर प्रत्यक्ष बाहुल्या नाचवून केले जातात. प्रत्येक बाहुलीला तीन सूत्रे असतात. डोक्याला एक आणि दोन हातांना एकेक. बाहुल्या संपूर्ण लाकडी असतात. राक्षसासारख्या पात्रांच्या खालच्या जबड्यांना आणिक जादा सूत्र असते. त्यामुळे राक्षसाला रूंद जबडा उघडून दाखविता येतो. तसेच जबडा बंद करताना खाडकन आवाजही करता येतो. ही कला रामायण व महाभारत काळापासून भारतात दाखविली जाणारी लोककला आहे.

सूत्रे हलवून बाहुल्यांची हालचाल नियंत्रित करणारा तो सुत्रधार असतो. सूत्रधार हा प्रमुख पात्राची भूमिका बजावतो, प्रसंगानुसार आवाज काढतो. रंगमंचाजवळच त्याचे इतर साथीदार म्हणजे टाळवाला, ढोलकीवाला, तबलेवाला, तुणतुणेवाला व इतर अन्य पात्रांचे संवाद म्हणणारे असतात. सूत्रधार बाहुल्यांची सूत्र आपल्या बोटात अडकवून बाहूली नाचवितो. एकावेळी दोन्ही हातांनी चार चार बाहुल्या नाचवितो. ते त्याचं कसब असते, कौशल्य असते. सूत्रधार मखरात बसून रंगमंचावर प्रसंगानुरूप बाहुल्या सोडतो.

४.१०.१४ बहुरूपी

विविध प्रकारची सोंगे बेमालूपणे धारण करणायाला बहुरूपी म्हणतात. रूढार्थाने ही एक अनेक रूपे घेऊन उपजीविका करणारी डावरी जात आहे. लोककलांकारापैकी एक पूर्वीच्या काळी जेव्हा गावोगांव करमणूकीचे पर्याय मर्यादित होते. तेव्हा हे कलाकार कुणाची तरी हुबेहुब नकक्ल करून लोकांना हसवत. पोलीस, फौजदार, सोंगे बहुरूपी वठवतो. प्रत्येक घरी जाऊन विनोद करून पैसे किंवा धान्य मागतो. बहुरूप्याची रंगभूमी रस्ता किंवा घरासमोरील अंगण असते. अंगणाला लोकरंगभूमीचे स्वरूप येते. बहुरूप्याचे हे लीलानाट्य एका दृष्टीने एकपात्री असते. बहुरूप्याच्या विनोदाला कोणतेही बंधन नसते. त्याच्या विनोदातील पात्रे लहान मुले, महिला, पुरूष, मांजरे, कुत्रे व ग्रामीण भागातील निसर्ग असतो.

आता चित्रपट आणि करमणुकीची साधने वाढल्याने आणि नविन पिढीला या गोष्टीची माहिती नसल्याने, या लोकांवर उपासमारीची वेळ आली आहे. मी लहान असताना बहुरूपी आमच्या गावात आल्यावर आम्ही मुले खेळत असताना त्याला पाहिल्या बरोबर खेळ जाग्यावर आहे आसा सोडून पळ काढत असे. जर एखादे काम जर नाही ऐकले तर आई म्हणत असे पोलीसाला पकडून नेण्यास सांगेन. त्याकाळी त्यांचा चांगलाच दरारा होता.

''वहिनी, तुम्ही काळजी करू नका पाटलानी जरी दुसरी बायको केली असली तरी पोलीस खातं तिला टिकू देणार नाही,

पाटलाना शिक्षा म्हणून त्यांच तिसर लग्न लावून देतो.''

असे विनोद करून ग्रामीण महिलावर्गाला व मुलांना काही क्षणांची का असेना खळखळणारी उसंत देणारा हा जातिवंत विनोदवीर आपण जपायला हवा. त्यांच्या गीतातून समाजजीवनाचे दर्शन घडते. व्यक्तिस्वभावाचे नमुने पाहावयास मिळतात. बहुरूप्याची गाणी परंपरेने त्याच्या घराण्यात चालत आलेली असली तरी प्रत्येक पिढीतील बहुरूपी त्यात आपल्या परीने भर घालीत असताना प्रासंगिक असे बदल करत असतो. लोकांना हसवणे, त्यांचे मनोरंजन करणे हा मुख्य उद्देश असतो. त्याच्या गीतातून, संवादातून आणि अभिनयातून विनोद जाणवतो. त्याच्या गाण्यातून व बोलण्यातून प्रकट होणारा विनोद प्रेक्षकांची करमणूक करतो. वेगवेगळ्या व्यक्तींच्या बोलण्याची नक्कल करतो. अतिशयोक्तीवर त्याचे विनोद असतात.

''काहो तुमचा रेडिओवर फोटो आला तुम्ही पिऊन लफडे केले बैलगाडीच्या काचा फोडल्या ती केस मी हाताळत आहे केस लवकर मिटवून टाकू देणंघेणं ठरवून घेऊ''

फोटो रेडिओवर कधीच येत नाही, बैलगाडीला काचा नसतात, केस कधी लाच घेऊन मिटवत नसतात हे ऐकून समोरच्या लोकांना हसू येत. ग्राम्यता, चातुर्य, प्रासंगिक हास्यकारक घटना आणि भाषेचे वेगवेगळे प्रयोग वापरून तो विनोदनिर्मिती करतो. त्याचा विनोद खळाळून हसावयास लावणारा असतो. त्याचा प्रत्येक शब्द, त्याची प्रत्येक हालचाल, अभिनय विनोदनिर्मितीस पूरक असतो. बहुरूप्याच्या कलात्मक आविष्काराचा प्रधान हेतू लोकरंजन असल्याने विनोदनिर्मितीला त्याच्या आविष्कारात प्राधान्य असते.

४.१०.१५ गजगिते

धनगर समाजाने जपलेला नृत्यप्रकार अजूनही ग्रामीण भागात यात्रा, जत्रा, सणाच्या वेळी धनगर पुरूष गजनृत्य करतात. गजनृत्य करताना गुडघ्याच्यावर नेसलेले धोतर, अंगात कोपरी,

मनगटात कडे, खांद्यावर कांबळे, डोक्याला काळी घोंगडी, दोन्ही हातात लाल रंगाचे रूमाल किंवा कापड धरतात.

धनगर जमातीतील लोक दिवसभर कष्ट करून मेंढ्या चारून येतात दमतात तेव्हा देवाच्या नावाने ओव्या म्हणतात. या ओव्या मध्ये निसर्गातील पावसाळा, हिवाळा आणि उन्हाळा, शेती, स्त्री, परंपरा, संस्कृती, चालीरीती, रिवाज, शिक्षण समाज, देव देवता, ऋषी मुनी यावर गजगीते सादर केली जातात. यातून सुद्धा भारतीय ज्ञान परंपरेतील लक्षणे दिसून येतात.

४.११ लोकगीते

मराठी लोकसाहित्याचे दालन अतिशय समृद्ध असून यातील बराचसा भाग लोकगीतांनी व्यापलेला आहे. लोकगीतांना शेकडो वर्षांची परंपरा असून ती मौखिक स्वरूपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आलेली दिसतात. या गीतांमधून लोकमानस, त्यांची विचारप्रणाली, कल्पनावैभव, नीतीधर्म यांचे चित्रण झालेले दिसते. मराठी लोकसंस्कृतीचे चित्रण, विविधता, भावोत्कटता आणि मानवी जीवनातील अनेक प्रसंगांचे हृदयस्पर्शी चित्रण लोकगीतात आढळते. त्यामुळे लोकगीतांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

लोकगीताच्या परंपरेचा शोध घेताना वैदिक काळापर्यंत जावे लागते. वेदकाळातसुद्धा लोकगीते होती.यज्ञसमारंभात सादर होणाऱ्या गीतांचे स्वरूप हे लोकगीतासारखेच होते. वेदातील सूक्ते, कथागीते किंवा लोकगायकांची गाणी यातून लोकगीतांची परंपरा आढळते. समाजातील रूढी, परंपरा, चालीरीती, परस्पर मानवी संबंध यांचा आविष्कार लोकगीतातून आढळतो. त्यामुळे समाजजीवन व संस्कृतीच्या आकलनासाठी ही गीते उपयुक्त ठरतात. कौटुंबिक व सामाजिक जीवनाचे चित्रण, सण-समारंभ, यात्रा-जत्रा, याबरोबरच लोकांच्या श्रद्धा, समजुती यातून परंपरेने चालत आलेल्या संस्कृतीचा परिचय होतो. लोकगीतातून नैतिक संस्कारही केलेला आढळतो. उच्च दर्जाचे काव्यगुण लोकगीतातून आढळून येतात.

महाराष्ट्र ही संत-परंपरा आणि शौर्यगाथांची भूमी आहे. या मातीतील प्रत्येक कणातून, प्रत्येक सणातून आणि प्रत्येक सामाजिक सोहळ्यातून इथल्या लोकसंगीताचा गोडवा आणि ओलावा अनुभवायला मिळतो. महाराष्ट्राचे लोकसंगीत म्हणजे केवळ गायन-वादन नव्हे, तर तो इथल्या जनजीवनाचा आरसा आहे. या संगीताने अनेक पिढ्यांच्या भावना, श्रद्धा, इतिहास, आणि समाजकारण जपले आहे.

४.११.१ अभंग

संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव आणि इतर संतांनी रचलेले हे अभंग, संसारातील क्षणभंगुरता आणि ईश्वराची महती सांगतात. त्यांचे नाव 'अभंग' कारण ते अखंड आहेत आणि

त्यांची रचना भंग न होणारी आहे. ते ज्ञान आणि वैराग्याचे प्रतीक आहेत. संतपरंपरेतील भक्तिपर गीतांचा आत्मिक आणि शाश्वत अभंग म्हणजे संत परंपरेने महाराष्ट्राला दिलेला अमूल्य वारसा आहे. वारकरी संप्रदायाचा आधारस्तंभ असलेले अभंग, हे विठ्ठलाच्या भक्तीत रममाण झालेले, आत्मिक शांतता देणारे गीते आहेत.

परमेश्वराप्रती असलेली अखंड भक्ती आणि जीवनविषयक तत्त्वज्ञान हे अभंगाचे सार आहे. प्रामुख्याने वारकरी संप्रदायातील संतांनी रचलेले आहेत.विशिष्ट छंद रचना असूनही ते सहजपणे गायले जातात, ज्यामुळे ते श्रवणीय बनतात. जीवनातील सत्य, असत्य, आणि मुक्तीचा मार्ग यावर ते भाष्य करतात. वारी आणि कीर्तनांचा आत्मा असलेले अभंग सामाजिक एकतेचे आणि समतेचे प्रतीक आहेत. भेदभाव विरहित समाज आणि सर्वांप्रती प्रेम या मूल्यांची शिकवण देऊन त्यांनी महाराष्ट्राच्या नैतिक आणि अध्यात्मिक जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

धरीला पंढरीचा चोर | गळा बांधुनिया दोर || १ ||
हृदय बंदिखाना केला | आंत विठ्ठल कोंडीला || २ ||
शब्दे केली जडाजुडी | विठ्ठल पायी घातली बेडी || ३ ||
सोहम शब्दाचा मारा केला | विठ्ठल काकुळती आला || ४ ||
जनी म्हणे बा विठ्ठला | जीवे न सोडी मी तुजला || ५ |

४.११.२ भजन

भजन हे महाराष्ट्रातील धार्मिक आणि सामाजिक जीवनाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. मंदिरांमध्ये, घराघरात, आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये भजन गायले जाते. टाळ, मृदंग, आणि हार्मोनियमच्या साथीने गायले जाणारे भजन मनःशांती आणि अध्यात्मिक ऊर्जा प्रदान करते. भजनात अनेकदा देवदेवतांच्या कथा आणि माहात्म्य सांगितले जाते. भजन म्हणजे ईश्वराच्या स्तुतीसाठी गायली जाणारी सामूहिक भक्तिगीते आहेत. अभंगाप्रमाणेच भजनांमध्येही भक्ती आणि अध्यात्माचे महत्त्व असले तरी, भजन हे अधिक सामूहिक, लयबद्ध आणि वाद्य-समृद्ध असते. भजन हे अनेक लोक एकत्र येऊन एका सुरात गातात, ज्यामुळे एकजूट निर्माण होते. याची रचना सोपी आणि ताल-सुलभ असते, ज्यामुळे ते लवकर लोकप्रिय होते. ते भक्ती आणि श्रद्धेचे वातावरण तयार करून मानसिक शांती देते.

ग्रामीण भागात भजन हे सामाजिक मिलाफ आणि एकत्रित वेळ घालवण्याचे प्रमुख साधन आहे. नवीन पिढीला पौराणिक कथा आणि धार्मिक तत्त्वज्ञान समजावून सांगण्याचे हे एक प्रभावी माध्यम आहे. भजनांनी संगीत आणि अध्यात्म यांना एकत्र आणून कला आणि संस्कृतीचा प्रसार केला आहे.

देव माझा विठू सावळा

माळ त्याची माझिया गळा….. || धृ ||
विठू राहे पंढरपुरी, वैकुंठच हे भूवरी,
भीमेच्या काठी डुले भक्तीचा मळ….. || १ ||
साजिरे रूप सुंदर, कटी झळके पितांबर
कंठात तुळशीची हार, कस्तुरी टिळा…. || २ ||
भजनात विठू डोलतो, कीर्तनी विठू नाचतो
रांगुनी जाई पाहुनी, भक्तीचा लळा….. || ३ ||

४.११.३ पोवाडा

पोवाड्याने महाराष्ट्राच्या इतिहास आणि राष्ट्रीय अस्मितेची भावना जिवंत ठेवली आहे. हा प्रकार नवीन पिढीला आपल्या थोर वीरांची माहिती देतो आणि त्यांच्या त्यागाचे स्मरण करून देतो. देशप्रेम आणि सामाजिक न्याय या मूल्यांची शिकवण पोवाड्यांमधून दिली जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळ असो किंवा सामाजिक प्रबोधन, पोवाड्याने नेहमीच लोकजागृतीचे प्रभावी काम केले आहे. यामुळे पोवाडा हा महाराष्ट्रीयन संस्कृतीचा एक प्रेरक आणि अखंड भाग आहे.

शौर्य, इतिहास आणि पराक्रम सांगणारी वीररसप्रधान गीते पोवाडा म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहास आणि शौर्यगाथांचा तेजस्वी आणि वीररसप्रधान गायन प्रकार आहे. हा लोकगीत प्रकार छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात विशेष लोकप्रिय झाला. शाहिरी परंपरेचा आधारस्तंभ असलेला पोवाडा, ऐतिहासिक घटनांचे आणि पराक्रमी व्यक्तींचे वर्णन ओजस्वी भाषेत करतो. पोवाड्याचे सादरीकरण जोशपूर्ण असते आणि ते ऐकणाऱ्यांमध्ये राष्ट्रप्रेम आणि प्रेरणा निर्माण करते. पोवाडा केवळ मनोरंजन नव्हे, तर तो इतिहासाची मौखिक शिकवण आहे.शौर्य, पराक्रम आणि युद्धकथांचे प्रभावी सादरीकरण. शाहिर हा पोवाड्याचा मुख्य गायक असतो, जो ढफ, तुणतुणे वापरतो. पोवाडे मुख्यतः ऐतिहासिक घटना आणि थोर व्यक्तींच्या जीवनावर आधारित असतात. जोशपूर्ण शब्दरचना आणि उत्कृष्ट लयबद्धता हे त्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

कुलवाडी-भूषण पवाडा गातो भोसल्याचा । छत्रपती शिवाजीचा ॥ध्रु०॥
लंगोटयांस देई जानवीं पोषींदा कूणब्याचा । काल तो असे यवनांचा ॥
शिवाजीचा पिता शहाजी पुत्र मालोजीचा । असे तो डौल जहागिरीचा ॥
पंधराशें एकूणपन्नास साल फळलें । जुन्नर तें उदयासी आलें ॥
शिवनेरी किल्ल्यामध्यें बाळ शिवाजी जन्मलें । जिजीबाईस रत्न सांपडलें ॥

४.११.४ लावणी

लावणीमध्ये श्रृंगार, भक्ती, आणि सामाजिक उपदेशाचा त्रिवेणी संगम आढळतो. ढोलकी, तुणतुणे, आणि मंजिरीच्या तालावर सादर होणारी लावणी ही रसिक प्रेक्षकांच्या मनाला भिडणारी आणि झंकारून टाकणारी असते. तिचा उत्स्फूर्तपणा आणि ताल-सुलभता तिला खास बनवते.

लावणी हा महाराष्ट्राच्या लोकसंगीताचा मुकुटमणी आहे. नऊवारी साडी आणि नृत्याची अदा यातून सादर होणारी लावणी केवळ एक कला प्रकार नसून, ती इथल्या मनोरंजनाची आणि लोकभावनांची अभिव्यक्ती आहे.

लावणी श्रृंगाररसावर आधारित असते, पण त्यातून सामाजिक वास्तवही मांडले जाते. ढोलकीचे तेजस्वी आणि उत्स्फूर्त ताल हे लावणीचे अविभाज्य अंग आहे.नृत्य आणि गायनासोबतच आकर्षक नृत्य आणि भावनिक अभिनय हे तिचे मुख्य आकर्षण आहे.

लोकगीतांचे प्रकार महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख घडवण्यात पारंपरिक लोकसंगीताचे फार मोठे योगदान आहे. ओवी, लावणी, पोवाडा, गोंधळ, भारूड अशा विविध लोकगीतांमधून समाजजीवन, श्रद्धा, इतिहास आणि परंपरा व्यक्त होताना दिसतात. या लेखात आपण महाराष्ट्रातील लोकसंगीताचे प्रकार, त्यांची वैशिष्ट्ये आणि सांस्कृतिक महत्त्व यांचा अभ्यास करणार आहोत.

चैत पुनवेची रात आज आलिया भरात
धडधड काळजात माझ्या माईना
कदी कवा कुठं कसा जीव झाला येडापिसा
त्याचा न्हाई भरवसा तोल हाईना
राखली की मर्जी तुमच्या जोडीनं
मी आले पिरतीच्या या रंगी
राया चिंब ओली मी झाले
राया सोडा आता तरी काळयेळ न्हाई बरी
पुन्हा भेटु कवातरी साजणा
मला जाऊ द्या ना घरी,
आता वाजले की बारा
कशा पाई छळता, मागं मागं फिरता
असं काय करता, दाजी हिला भेटा की येत्या बाज
सहाची वि गाडी गेली नवाची वि गेली वाराची गाडी निघाली

४.११.५ भावगीते

मनातील भावनांना शब्द व सूर देणारे सुमधुर गीते भावगीत हा मराठी लोकगीतातील असा एक प्रकार आहे, जो मनातील खोलवरच्या भावनांना सुमधुर शब्द आणि चालींच्या माध्यमातून व्यक्त करतो. हा प्रकार शास्त्रीय संगीताच्या नियमांनुसार बांधलेला नसला तरी, त्याची गेयता आणि साधेपणा त्याला अत्यंत लोकप्रिय बनवतो. भावगीतांमध्ये अनेक कवी आणि संगीतकारांनी उत्कृष्ट कलाकृती दिल्या आहेत. कवितेतील भावभावना आणि संगीतातील माधुर्य यांचा सुसंवाद हे

भावगीतांचे मुख्य वैशिष्ट्य आहे.मानवी मनातील विविध सूक्ष्म भावनांचे चित्रण. याची चाल सोपी, सुरेल आणि लक्षात राहणारी असते. उच्च साहित्यिक मूल्यांच्या कवितांना सुमधुर चालीत बांधले जाते. हार्मोनियम, तबला, आणि व्हायोलिनचा वापर भावनिकता वाढवण्यासाठी होतो.

भावगीतांनी मराठी संगीत क्षेत्राला एक नवीन आयाम दिला आहे. प्रेम, निसर्ग, आणि मानवी संबंधांवर आधारित असल्याने ही गीते प्रत्येक वयोगटातील लोकांना आपलीशी वाटतात. दैनंदिन जीवनातील भावनांना कलात्मक आणि माधुर्यपूर्ण अभिव्यक्ती देऊन भावगीतांनी मराठी साहित्य आणि संगीताला एक सुसंस्कृत आणि भावपूर्ण ओळख दिली आहे.

चाफा बोलेना, चाफा चालेना
चाफा खंत करी, काही केल्या फुलेना
गेले आंब्याच्या बनी, म्हटली मैनासवे गाणी
आम्ही गळयांत गळे मिळवूनी रे
गेले केतकीच्या बनी, गंध दरवळला वनी
नागासवे गळाले देहभान रे
चल ये रे, ये रे गडया, नाचू उडू घालू फुगडया
खेळू झिम्मा झिम पोरी झिम पोरी झिम

४.११.६ भारूड

भारूडाने महाराष्ट्राच्या समाजसुधारणेत अत्यंत मोलाची भूमिका बजावली आहे. तत्त्वज्ञानाला सामान्य जनतेच्या भाषेत आणून, संत एकनाथांनी सामाजिक जाणीव आणि नीतिमूल्ये रुजवली. भारूड हा संत एकनाथांनी १६ व्या शतकात समाजप्रबोधनासाठी निर्माण केलेला एक अद्वितीय लोकगीत प्रकार आहे. भारूडात तत्त्वज्ञान, उपदेश आणि अध्यात्म हे विषय विनोदी, उपरोधिक आणि नाट्यमय पद्धतीने मांडले जातात. अंधश्रद्धा निर्मूलनासाठी भारूड हे एक प्रभावी शस्त्र ठरले आहे. आजही कीर्तने आणि धार्मिक कार्यक्रमांमध्ये भारूड सादर केले जाते, ज्यामुळे ज्ञानाची आणि विज्ञानाची कास धरण्याची शिकवण मिळते.

संत एकनाथांनी सामान्य माणसाला तत्त्वज्ञान सहज समजावे म्हणून साध्या भाषेत आणि दैनंदिन जीवनातील उदाहरणे वापरून भारुडे रचली. सांस्कृतिक आणि धार्मिक अंधश्रद्धांवर टीका करण्यासाठी याचा वापर केला जातो.संत एकनाथांनी निर्माण केलेला उपरोधिक व तत्त्वज्ञानप्रधान लोकगीत प्रकार गंभीर तत्त्वज्ञान विनोदी आणि उपरोधिक पद्धतीने मांडले जाते. अंधश्रद्धा, रूढी आणि वाईट सवयींवर टीका करून प्रबोधन करणे. भारूड सादर करताना नाट्य, अभिनय आणि वेशभूषेचा वापर केला जातो. रूपकात्मक भाषा वापरून गूढ अर्थ सामान्य माणसांपर्यंत पोहोचवला जातो.

सत्वर पाव गे मला । भवानी आई रोडगा वाहिन तुला ॥ १ ॥
सासरा माझा गावी गेला । तिकडेच खपवी त्याला ॥ २ ॥
सासू माझी जाच करिते । लौकर निर्दाळी तिला ॥ ३ ॥
जाऊ माझी फडफड बोलति । बोडकी कर गं तिला ॥ ४ ॥
नणंदेचे पोर किरकिर करिते । खरूज होऊ दे तिला ॥ ५ ॥
दादला मारून आहुति देईन । मोकळी कर गं मला ॥ ६ ॥
एका जनार्दनि सगळेच जाऊ दे । एकलीच राहू दे मला ॥ ७

४.११.७ दिंडी गीते

पंढरीच्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी लाखो वारकरी जेव्हा पायी प्रवास करतात, तेव्हा सामूहिकपणे जी भक्तिगीते गायली जातात, त्यांना दिंडी गीते म्हणतात. ही गीते भक्ती, त्याग, आणि आनंदाचा अनुभव देतात. टाळ-मृदंगाच्या तालावर, पंढरीच्या वाटेवर दिंडी गीते अखंड गायली जातात. दिंडी गीते ही महाराष्ट्राच्या अखंड आणि महान परंपरेचा, म्हणजेच पंढरपूरच्या वारीचा आत्मा आहेत.ही गीते केवळ पंढरपूरच्या पायी वारी दरम्यान गायली जातात. ईश्वराप्रती असलेली अखंड श्रद्धा आणि प्रवासाचा आनंद त्यातून व्यक्त होतो. लाखो वारकरी एका सुरात, ताल-वाद्यांच्या साथीने ही गीते गातात.संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर आणि इतर संतांचे अभंग हे दिंडी गीतांचे मुख्य स्वरूप असते.

कष्ट, संयम आणि सामूहिकतेची भावना दिंडी गीतांमुळे वाढीस लागते. वारीच्या माध्यमातून महाराष्ट्रीयन संस्कृतीची ही अद्वितीय परंपरा टिकवून ठेवण्याचे अमूल्य कार्य दिंडी गीते करत आहेत. दिंडी गीते महाराष्ट्राच्या सांस्कृतिक एकतेचे आणि समतेचे महान प्रतीक आहेत. जाती-धर्माचे बंधन न मानता, ही गीते सर्व वारकऱ्यांना एका भक्तीच्या धाग्यात जोडतात.

४.११.८ लग्नगीते

महाराष्ट्रातील लग्नगीते म्हणजे केवळ गाणी नव्हेत, तर ती नात्यांतील भावना, आनंद, विरह आणि विनोदाचा अप्रतिम संगम आहे. लग्नातील विविध विधींसाठी गायली जाणारी लोकभावनांनी भरलेली गीते हळदी, मेहेंदी, गौरी-हर, मंगलाष्टक, आणि पाठवणी अशा प्रत्येक विधीसाठी खास लोकगीते गायली जातात. लग्नगीते कौटुंबिक आणि सामाजिक संबंधांना अधिक घट्ट बनवतात. ही गीते स्त्री भावनांना आणि तिच्या कुटुंबातील स्थानाला महत्त्व देतात. लग्नसोहळ्यातील उत्सवाचे आणि उत्साहाचे वातावरण जिवंत ठेवतात.

पारंपरिक विधी आणि चालीरीतींची माहिती मौखिक स्वरूपात पिढ्यानपिढ्या पुढे नेण्याचे काम ही गीते करतात, ज्यामुळे महाराष्ट्राच्या कौटुंबिक संस्कृतीचा ठेवा जपला जातो. ही गीते महिलांनी एकत्र येऊन, उत्स्फूर्तपणे आणि सामूहिक तालावर गायलेली असतात. यात माहेर-सासर या

नात्यांतील गोड-कडू भावनांचे चित्रण असते. विधी-आधारित रचना: हळदी, रुखवत, कन्यादान अशा प्रत्येक विधीसाठी वेगळी गाणी.आनंद, मुलीच्या पाठवणीचा विरह आणि नातेवाईकांवरील मिश्किल टीका याचा समावेश.घरातल्या महिला एकत्र येऊन ही गीते उत्स्फूर्तपणे सादर करतात.गीते सहज, सोपी आणि स्थानिक बोलीभाषेत रचलेली असतात. मंगलाष्टकांचे मूळ विवाहप्रसंगी ज्येष्ठांनी वधूवरांना त्यांच्या दांपत्यजीवनासाठी द्यावयाच्या आशीर्वचनात आहे. पारंपरिकरीत्या मंगलाष्टक ही आठ ओळींचा चरण असलेली, विशिष्ट सुरांत म्हणण्याची पद्यरचना असते. तिचा एक चरण संपल्यानंतर जमलेली मंडळी वधूवरांवर फुले आणि अक्षतांचा वर्षाव करतात. ही पद्यरचना मराठी किंवा संस्कृतमध्ये असते. मात्र विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापासून मंगलाष्टके स्वरचित म्हणण्याचा परिपाठही वधू वराचे नातेवाईक आणि निकटवर्तीयांनी सुरू केला आहे. वधू आणि वराला त्यांच्या दांपत्यजीवनासाठी शुभेच्छा आणि आशीर्वाद हा या रचनांचा मुख्य गाभा मात्र टिकून आहे.

स्वस्ति श्री गणनायकं गजमुखम, मोरेश्वरम सिद्धीधम ।
बल्लाळो मुरुडम विनायकमहम चिन्तामणि स्थेवरम।
लेण्याद्री गिरीजात्मकम सुरवरदम विघ्नेश्वरम् ओझरम ।
ग्रामो रांजण संस्थीतम गणपति।
कुर्या सदा मंगलम शुभ मंगल सावधान।।१।।
गंगा सिंधु सरस्वतीच यमुना,गोदावरी नर्मदा ।
कावेरी शरयू महेंद्रतनया शर्मण्वति वेदीका ।
शिप्रा वेञवती महासूर नदी,ख्याता गया गंडकी।
पुर्णा पुर्ण जलै, समुद्र सरीता।
कुर्या सदा मंगलम शुभ मंगल सावधान।।२।।

४.११.९ नागपंचमीची गाणी

नागपंचमीच्या सणानिमित्त वारुळाला जाणे, नागोबाला पूजणे आणि नागदेवतेचे आशीर्वाद घेणे यावर आधारित पारंपरिक गाणी प्रसिद्ध आहेत. "वारुळाला जाऊया नागोबाला पुजूया", "आला पंचमीचा सण" आणि "घागर पवत बाई चुंबळ तरंगत" ही नागपंचमीची लोकप्रिय मराठी गाणी आहेत, जी सणाचा आनंद द्विगुणित करतात. श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षातील नाग चतुर्थी व नागपंचमीचे दोन दिवस नाग या प्राण्याबद्दल "आदर" व "पूज्य" भावना समाजात रुजवण्यासाठी वार्षिक सण म्हणून पाळले जाण्याची परंपरा आहे. मनांतील सर्प जातीबद्दलची गैर समजूत दूर करून त्यांना आपल्या योग्य परंपरांचे योग्य प्रकारे शिक्षण दिले जायला हवे.

चल ग सखे वारुळाला, वारुळाला, वारुळाला ग ।
नागोबाला पूजायाला, पूजायाला, पूजायाला ग ।।
नागोबाचे अंथरूण निजले वरी नारायण ।

साती फडा ऊभारून धरती धरा सावरून ।
दूध लाह्या वाहू त्याला, वाहू त्याला, नागोबाला ।।
बारा घरच्या बाराजणी, बाराजणी, बाराजणी ।
रूपवंती कुवारिणी, कुवारिणी, कुवारिणी ।
नागोबाची पुजू फणी, कुंकवाचा मागू धनी ।
राजपद मागू त्याला, मागू त्याला, नागोबाला ।।
बाळपण त्याला वाहू, त्याला वाहू, त्याला वाहू ग ।
नागिणीचा रंग घेऊ. रंग घेऊ, रंग घेऊ ग ।
नागोबाला फुलं वाहू, लालमणी माथी लेवू ग ।
औक्ष मागू कुंकवाला, कुंकवाला, बाई कुंकवाला ।।
चल ग सखे वारुळाला, वारुळाला, वारुळाला ।।

४.११.१० गौराईची गाणी

गौरी पूजेचा सण हा महाराष्ट्राच्या संस्कृतीतील एक अतिशय महत्त्वाचा आणि कौटुंबिक आनंद देणारा सण आहे, जो घरातील सौभाग्य आणि समृद्धि वाढवतो गौरी आवाहनावेळी आणि पूजेदरम्यान गायली जाणारी पारंपारिक गौरीची गाणी महाराष्ट्रात अत्यंत लोकप्रिय आहेत. ही गाणी गौरीचे कौतुक, माहेरवाशिण म्हणून तिचे आगमन आणि सासरी जाण्याबद्दलच्या भावना व्यक्त करतात. गौरीला 'महागौरी' किंवा 'महालक्ष्मी' असेही संबोधले जाते, ती आदिशक्तीचा एक अवतार मानली जाते. महाराष्ट्रात गणेशोत्सवात, भाद्रपद शुद्ध गौरीचे आगमन होते महिला गौरीचे मुखवटे किंवा खडे (खड्याची गौरी) पाटावर स्थापन करतात, त्याला माहेरवाशीण मानून औक्षण केले जाते.गौरीला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवला जातो आणि पारंपरिक दागिने व साडी-चोळीने सजवले जाते. सहसा तिसऱ्या दिवशी (सप्तमीला) गौरीचे विसर्जन केले जाते. असुरांच्या त्रासातून सुटका करण्यासाठी आणि सौभाग्य मिळवण्यासाठी महिलांनी गौरीची पूजा केली, असे मानले जाते. तसेच, स्वतःच्या हळदीच्या लेपापासून गणेशाला निर्माण करणारी देवी म्हणूनही गौरी प्रसिद्ध आहे.

"सोन पावलानी गौर आली,
माझ्या घराला,
आनंदाची भरती आली,
गौरी गौराईला...

ही गाणी सहसा गौरीच्या पूजेच्या वेळी, गौरीच्या आरत्या आणि इतर भक्तीगीतांसोबत गायली जातात.

४.११.११ भोंडला

भोंडला हा प्रचलित असलेला स्त्रियांच्या सामुदायिक गाणी प्रकार आहे. नवरात्रीचे नऊ दिवस आणि दसऱ्याच्या दिवशी हा खेळला जातो.घटस्थापनेच्या दिवसापासून संध्याकाळी अंगणात भोंडला खेळला जातो. एका पाटावर हत्ती काढून त्याची पुजा करतात. त्याभोवती फेर धरून छोट्या मुली, व शाळेतल्या मुली भोंडल्याची पारंपरिक गाणी म्हणतात. भोंडल्यासाठी सर्व जातीच्या मुली येतात. या उत्सवात जातीची चौकट कठोर नसते. खानदेशात दलित समाजातील मुलीही भुलाबाई खेळायला जात असत. त्या भुलाबाई मांडत असत. असे श्रीमती ज्योत्स्ना खैरनार यांनी सांगितले. भोंडला वा भुलाबाई मांडण्याची जागा बहुधा अंगण वा ओसरीवर असते. भोंडला भुलाबाईची गाणी परंपरेने चालत आलेली लोकगीते आहेत. त्यांचे मर्म उकलताना, त्यातील अर्थसंदर्भाचा वा कालसंदर्भाचा मागोवा घेताना, कवितेच्या आस्वादनाची रीत वापरता येत नाही. या गीतांत समूहमनाचे प्रतिबिंब असते. या गीतांचा कर्ता केवळ 'अनाम' असतो. असे नाही तर या गीतांत अनेक अनामिकांनी आपापल्या काळाचे आणि मनाचे रंग मिसळवलेले असतात. मानवी मनाच्या एकात्मतेचे अनोखे दर्शन त्यातून घडते.

आला चेंडू गेला चेंडू
राया चेंडू झुगारिला
आपण चाले हत्ती घोडे
राम चाले पायी
रामाचा पत्ता कुठ नाही
राम ग वेचितो कळ्या
सीता ग गुंफिते जाळ्या

४.१२ लोककथा

लोकसाहित्यात लोककथांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. ज्या काळात मनोरंजनाची कोणतीच साधने उपलब्ध नव्हती; तेव्हापासून कथा रंजनाचे महत्त्वाचे कार्य करीत आहेत. लोककथा या मौखिक परंपरेने अगदी अनादी काळापासून चालत आलेल्या आहेत. कथा ही वेगवेगळ्या स्वरूपात प्राचीन काळापासून लोकमनावर आपले प्रभुत्व गाजवीत आहे. भारत हा कथाप्रय देश आहे.लोककथांचा जनक म्हणून भारत देशाची ओळख आहे. या कथांमधून रंजन आणी बोध केलेलाआढळतो. लोककथांमधून तत्कालीन समाजजीवनाचे, त्यांच्या मानसिकतेचे, धामिर्क समजुतीचे, संस्कृतीचे दर्शन घडते.

लोककथांची भारतीय परंपरा

भारतीय लोककथेती परंपरा डॉ. शरद व्यवहारे यांनी आपल्या ग्रंथात अधिक समर्पक पध्दतीने मांडलेली आहे. ती पुढीलप्रमाणे, "भारतात लोककथांची परंपरा फार प्राचीन आहे. प्राचीन काळात धार्मिक ज्ञान देण्यासाठी कथांचे माध्यम वापरल्या जात असे. अशा स्वरूपाच्या कथा आपणास

श्रौतवाङ्मयात पाहावयास मिळतात. ऋग्वेदातही आपणास अनेक कथासूत्रे सापडतात. ब्राह्मण ग्रंथात व उपनिषदातही अनेक कथांचे उल्लेख आहेत. उपनिषदातील तत्त्वज्ञानाचे स्पष्टीकरण करताना गुरू आपल्या शिष्याना मधूनमधून कथा सांगत वेदाप्रमाणेच पुराणातही अनेक कथांचे उल्लेख आढळतात.

बृहत्कथेला भारतीय लोककथांच्या परंपरेत महत्त्वाचे स्थान आहे. बृहत्कथा हा भारतीय कथांचा संग्रह असून लोककथांची विविध वैशिष्ट्ये पाहावयास मिळतात. या कथाग्रंथात राजा विषयीच्या कथा, सामान्यांच्या कथा, पशुकथा, अद्भुतकथा आणि नीतिकथा यांचा समावेश आहे. या कथासंग्रहात कथांचे लौकिक स्वरूप कायम ठेवण्याचा संग्राहकाचा प्रयत्न स्तुत्य आहे. वेदकाळापासून ते उपनिषदापर्यंत कथा धार्मिक ज्ञानातून विकसित झालेली दिसते. तसेच बृहत्कथेतील लौकिक आविष्कार दोन्ही प्रवाह भारतीय लोकजीवनात परंपरेने चालत आलेले असल्याचे आपणास कळते. यानंतर लोकजीवनात पंचतंत्र, हितोपदेश आणि वेताळ पंचविशीतील कथा लोकप्रिय होऊ लागल्या. प्राचीन भारतीय लोककथात पंचतंत्राचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. पंचतंत्रात विष्णू शर्मा याने मित्रभेद, मित्रप्राप्ती, ककोलूकयिम, लब्धप्राणाशाम आणि अपरीक्षित कारकम या तंत्रानुसार अनेक कथा सांगितल्या आहेत. पंचतंत्रातील कथांचा प्रसार जगभर झाला असून अनेक भाषांतून त्यांचे भाषांतरे झाली आहेत. लोककथांचे भारत उगमस्थान आहे असे म्हणतात याला मुख्य कारण म्हणजे पंचतंत्र. एका कथेत अनेक उपकथा घालून एका कथेतून दुसरी कंथा, दुसरीतून तिसरी अशा रीतीने गुंफलेली कथांची साखळी पंचतंत्रात आढळते. याच तंत्राचा स्वीकार पुढे कथेच्या बाबतीत भारतात व भारताबाहेर होऊन या पद्धतीच्या अनेक कथा लोकजीवनात रूढ झाल्या.

लोककथांच्या भारतीय परंपरेत हितोपदेशाचेही महत्त्व अनन्यसाधारण आहे. यातील बोधकथा लोक आवडीने वाचीत. भारतीय लोककथेत वेताळपंचविशी, सिंहासनद्वात्रिंशिका, शुकसप्तती, माधवालनकथा, कयार्णव, पुरुषपरीक्षा इत्यादी कथासंग्रहातील कथा भारतीय लोककथांचे स्वरूप स्पष्ट होण्यास अभ्यासनीय आहेत.

भारतीय लोककथांच्या परंपरेत बौद्ध आणि जैन धर्मीयांच्या कथांचेही स्थान अद्वितीय आहे. जातककथा या बुद्धाच्या पूर्वजन्मीच्या कथा होत. या एकंदर ५४७ कथा आहेत. या कथेतून बुद्धाचे विविध स्वरूपात दर्शन घडते. नायक, दुय्यम व्यक्ती आणि प्रेक्षक या रूपातून बुद्ध या कथातून सहभागी झालेला दिसतो. जातककथांचे स्वरूप नीतिकथासारखे असले तरी या कथांचे स्वतःचे असे वैशिष्ट्य आहे.

जातककथांचा अभ्यास करताना आपल्या लक्षात येते की, या कथांचे स्वरूप लोककथांसारखे आहे. या कथांचा प्रसार परदेशातही झालेला आढळतो. पाश्चात्त्य लोकसाहित्य विशारद विंटरनिझ या कथांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करतो

१. नीतीसंबंधीकथा.

२. पशुकथा.
३. रोमांचकारीकथा.
४. धार्मिककथा.
५. विनोदीकथा.

तसेच या कथांच्या निवेदन पद्धतीचाही अभ्यास विंटरनिझ याने करून या पद्धतीचे विवेचनही केले आहे. या सर्व जातककथांच्या पाठीमागे धार्मिक प्रेरणा असावी असे वाटते.

जैन धर्मीयांनी संग्रह केलेल्या जैनांच्या कथांना चुर्णी किंवा चूर्णक म्हणतात. या कथांचे स्वरूप जातककथांप्रमाणेच नीतिकथासारखेच आहे. या कथातून मनोरंजन आणि उद्बोधन यांचा सुंदर मिलाप पाहावयास मिळतो.

भारतीय लोककथांची परंपरा पाहू जाता आपल्या लक्षात येते की, सध्या समाजात प्रचलित असलेल्या लोककथा या पारंपरिक वैशिष्ट्यांनी नटलेल्या आहेत. प्राचीन कथांचे स्वरूप धार्मिक होते. बौद्ध जातके आणि जेन चुर्णी म्हणजेच नैतिक लोककथा होत. रामायण, महाभारतातील नीतिकथांचे स्वरूपही नैतिक लोककथांसारखेच होते. हे परंपरागत कथा साहित्य आपणास धार्मिक कथांच्या (रामायण, महाभारत), स्वतंत्र कथासंग्रहाच्या (बौद्ध जातके, जेन चुर्णी, पंचतंत्र) आणि पारंपरिक अद्भुत कथेच्या स्वरूपात प्राप्त होते. डॉ. विंटरनिझ यांच्या मते संस्कृत साहित्यातील सर्व ललित वाङ्मयाला लोकांमध्ये चालत आलेल्या पारंपरिक कथांचा आधार आहे. डॉ. केतकरांच्या मते बुद्धपूर्व काळात जाती दैवते दुय्यम झाली कारण याच काळात सर्वव्यापी परमेश्वराची कल्पना रूढ झाली व पौराणिक वीरांना महत्त्व आले आणि त्यांनी जनमनाची पकड घेतली. त्यांच्या मते भारतीय वाङ्मयात कथावाङ्मयाचे महत्त्वाचे स्थान आहे. डॉ. केतकरांचे हे मत लोककथेच्या संदर्भात लक्षात घेण्याजोगे आहे.डॉ. विंटरनिझ यांनी सांगितलेला ललित वाङ्मयविषयक सिद्धांत आणि डॉ. केतकरांचे कथाविषयक मत तपासू जाता आपल्या लक्षात येते की, भारतात वेदकालापासून लोककथांची परंपरा आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासात भारतीय कथा परंपरेला अनन्यसाधारण महत्त्व आहे.” [३३]

मराठीतील लोककथांचे वर्गीकरण गद्य व पद्य या दोन गटांत करता येईल. धार्मिक कहाण्या, व्रतकथा, भगतांचया गीतकथा, तीर्थक्षेत्रांसंबंधीच्या व्युत्पत्ति-कथा, दंतकथा, आख्यायिका, स्थलनामकथा, परीकथा, तंत्राख्याने, चातुर्यकथा, हास्यकथा, नीतिकथा, बोधकथा, रूपकथा, श्रृंगारकथा, वीरगाथा या सर्वांचा समावेश होतो. प्राणिकथांमध्ये प्राणी कधी त्यांच्या नैसर्गिक रूपांत अवतरतात तर कधी मानवरूपे धारण करून चालताना-बोलताना दिसतात. धैर्यवान माणसे त्यांचे साहसी अनुभव यांवर आधारलेल्या साहसकथाही प्रचलित आहेत.

लोककथांचा आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार म्हणजे ठकसेनांच्या चातुर्यकथा. ह्या कथांचा नायक धूर्त, लबाड, ठकवणारा असला, तरी चातुर्याने आकर्षक ठरतो. भारतातील बिरबलाच्या गोष्टी, तेनालीरामच्या गोष्टी ही चातुर्यकथांची उत्तम उदाहरणे होत. ह्या कथांना कित्येकदा विनोदाची फोडणी

असते. मराठीत चतुर म्हातारी अनेक कथांतून भेटते. आख्यायिका ह्या वास्तवाभासावर भर देणाऱ्या कथा असतात. ह्या संतपुरुषांच्या जशा असतात. तशाच ऐतिहासिक वीरपुरुषांच्याही असतात. भारतातील रामायण, महाभारताच्या लोकपरंपरेतील कथा या वीरकथाच आहेत.

४.१३ लोकनृत्य

लोकजीवनाच्या आविष्काराचे एक कलात्मक माध्यम म्हणजे लोकनृत्य हे होय. लोकजीवनात परंपरेने चालत आलेला हा एक कलात्मक पैलू आहे. लोकनृत्यातून लोकमनातील भाव-भावनांचे आविष्करण होते. लोकनृत्याला आदिम काळापासून नृत्याची परंपरा आहे. लोकनृत्यातून समूहजीवनाचा आविष्कार होत असल्याने लोकनृत्य त्या समूहजीवनाचे अविभाज्य अंग असते. लोकनृत्यातील शारीरिक हालचालींना एक परंपरा असते. ही परंपरा लोकजीवनात येत असते.

आजही सण उत्सवाच्या निमित्ताने पारंपरिक लोकजीवनात नृत्ये केली जातात.
लोकनृत्यात समूहजीवनाचा भावाविष्कार असतो. नृत्याला पारंपरिक लोकसंगीताची साथ लाभते. नृत्य करताना परंपरेने चालत आलेली गाणी ही गायली जातात. कालांतराने नृत्याला गीताची साथ लाभली.

लोकनृत्याचाय बाबतीत डॉ. शरद व्यवहारे यांचे मत अधिक महत्त्वाचे आहे. ते पुढीलप्रमाणे, "लोकनृत्यात भावाविष्कार असतो तो समूहमनातील भावभावनांचा. नृत्याला पारंपरिक लोकसंगीताची साथ असते त्याचप्रमाणे नृत्य करता करता परंपरेने चालत आलेली गाणीही गायिली जातात. नृत्याच्या प्रारंभीच्या अवस्थेत मात्र नृत्याला गीताची साथ नव्हती. कालांतराने नृत्याला गीतांची साथ लाभली. आजही नृत्यागीतांची परंपरा अनेक लोकसमूहात प्रचलित असल्याचे पाहावयास मिळते. लोकनृत्ये लोकजीवनात परंपरेने चालत आलेली असतात. लोकनृत्यात सहभागी होणाऱ्यांच्या आधारे लोकनृत्याचे पुढील प्रकार मराठी लोकजीवनात प्रचलित आहेत.

१. स्त्रियांची लोकनृत्ये यात नागपंचमी सणाच्या निमित्ताने केले जाणारे फेरनृत्य, फुगडी, झिम्मा, घागर फंकुणे, कोंबडा, पिंगा इत्यादी.

२. पुरुषांची लोकनृत्ये : यात दिंडी नृत्य, टिपरी-लेझीम नृत्य, ढोलाचा नाच, काठी नृत्य इत्यादी.

३. स्त्री-पुरुषांची संमिश्र लोकनृत्ये यात विविध जाती-जमातीत परंपरेने चालत आलेली नृत्ये जशी कोळीनृत्य, बंजारानृत्य, कुणबीनृत्य इत्यादी.

या नृत्य प्रकाराशिवाय पारंपरिक लोकसंस्थांच्या कलात्मक आविष्काराचा एक भाग म्हणून केल्या जाणाऱ्या नृत्यांचाही उल्लेख करता येतो. जसे गोंधळ्याचे नृत्य, वाघ्या-मुरळीचे नृत्य, पारंपरिक तमाशातील नृत्य इत्यादी.

लोकजीवनात लोकनृत्यांना विशेष महत्त्व असते. जीवनातील आनंदाच्या उमींचा, हर्षोन्मादाचा आविष्कार लोकनृत्यातून होत असल्याने समूहमनाची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी त्यातून प्रत्ययास येते. मनोरंजन आणि भावनाविष्कार हे लोकनृत्याचे एक महत्त्वाचे प्रयोजन असून समूहाची निर्मिती, समूहाचा सहभाग आणि समूहजीवनाचा आविष्कार हे लोकनृत्याचे काही विशेष सांगता येतात.'' [३४]

लोकजीवनात लोकनृत्यांना विशेष महत्त्व असते. जीवनातील आनंदाचा आविष्कार लोकनृत्यातून होत असल्यामुळे समूहमनाची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी त्यातून प्रत्ययास येते. मनोरंजन आणि भावनाविष्कार हे लोकनृत्याचे एक महत्त्वाचे प्रयोजन असून समूहाची निमिर्ती, समूहाचा सहभाग, समूहजीवनाचा आविष्कार हे लोकनृत्याचे काही विशेष सांगता येतील.

४.१४ वाक्प्रचार

वाक्प्रचाराची निमिर्ती अत्यंत सहजपणे लोकजीवनातून होत असते. लोकजीवनातील प्रदीर्घ अनुभवाची परंपरा आपल्याला वाक्प्रचारांच्या मागे दिसते. वाक्प्रचाराचे रचनेच्या दृष्टीने, अभिव्यक्तीच्या दृष्टीने म्हणीशी नाते असते. म्हणीपेक्षा वाक्प्रचारात मोजक्या व कमी शब्दांचा उपयोग केलेला असतो. थोडक्यात अनेक संदर्भीय अर्थ व्यक्त करणारा शब्दसमुदाय म्हणजे वाक्प्रचार असे म्हणता येईल. वाक्प्रचारातील शब्दांना मूळच्या अर्थापेक्षा वेगळा अर्थ लाभलेला असतो. विशीष्ट अर्थाने रूढ झालेल्या शब्दसमूहाला 'वाक्प्रचार असे म्हटले जाते. अर्थातच या अर्थाला लोकमान्यता असते, उच्चारण करणाऱ्याला व ऐकणाऱ्याला तो अर्थ ज्ञात असतो. त्यामुळे वाक्प्रचाराचे संदर्भ चटकन लक्षात येतात. विशीष्ट अर्थाने लोकजीवनात रूढ झालेल्या शब्दसमूहांना वाक्प्रचार असे म्हटले जाते. लोकांना ज्ञात असलेल्या माहितीतून लोकांच्या अनुभवातून हे वाक्प्रचार स्वाभाविकपणे निर्माण होतात. लोकांच्या मान्यतेतून ते लोकजीवनात प्रचलित राहतात. त्यांच्या वापरातून मोजक्या शब्दात समर्पक विचार, भाव व कल्पना व्यक्त केल्या जातात.

वाक्प्रचाराची व्याप्ती मोठी असल्यामुळे वाक्प्रचारांचे काटेकोर वर्गीकरण शक्य होणार नाही. मराठीत एकाच शब्दाने अनेक वाक्प्रचार प्रचलित असले तरी त्यातील रूढार्थ लक्षणीय आणि अभ्यासनीय असतो. एकाच शब्दाने रूढ अर्थ व्यक्त करण्याची किमया पहावयास मिळते.मराठी ग्रामीण बोलीतील वाक्प्रचार (ग्रामीण वाक्प्रचार) हे रांगडे, सडेतोड आणि शेतकरी संस्कृतीचे प्रतिबिंब दर्शवणारे असतात, जे दैनंदिन व्यवहारात विशेष छटा निर्माण करतात.

काही महत्त्वाचे मराठी ग्रामीण बोलीतील वाक्प्रचार आणि त्यांचे अर्थ:

- अंगात वीज संचारणे: अचानक बळ किंवा ऊर्जा येणे
- कपाळाला हात लावणे: हताश होणे, निराश होणे

- कंठस्नान घालणे: ठार मारणे
- जीव भांड्यात पडणे: काळजी दूर होणे, आराम वाटणे.
- हातपाय गाळणे: प्रयत्न सोडून देणे, घाबरून जाणे.
- डोळे वटारणे: रागाने पाहणे, धाक दाखवणे.
- दाद न देणे: लक्ष न देणे, कानाडोळा करणे.
- पाय धरणे: शरण जाणे, क्षमा मागणे.
- गळ्यात पडणे: नको असलेली गोष्ट जबरदस्तीने अंगावर येणे.
- तारांबळ उडणे: खूप धावपळ होणे, गोंधळ उडणे.

हे वाक्यप्रचार जीवनातील अनुभवांतून आलेले आहेत. या मध्ये निसर्ग, महिला, प्राणी, अशा अनेक बाबीवर वाक्यप्रचार आढळून येतात.

वाक्प्रचारांचे वर्गीकरण

अ) ऐतिहासिक, पौरानिक किंवा इतर कथा यांच्या संदर्भाने निर्माण झालेले वाक्प्रचार :

१. अहिल्याबाई - साध्वी स्त्री २. आनंदीबाई - कारस्थानी स्त्री

३. भीष्मप्रतिज्ञा - खडतर प्रतिज्ञा ४. रामराज्य - आदर्श राज्य

५. जमदग्नी- रागीट मनुष्य

ब) संख्यावाचक वाक्प्रचार :

१. इजा बिजा तिजा - तीन वेळा २. नव्याचे नऊ दिवस - नवे कौतुक

३. छत्तीसचा आकडा - भांडण

४. अठरा धान्यांचे कडबोळे - अनेक गोष्टींचे मिश्रण

क) शरीर अवयवासंबंधीचे वाक्प्रचार:

१. केसाने गळा कापणे - विश्वासघात करणे २. काना डोळा करणे - दुर्लक्ष करणे

३. पोट दुखणे - मत्सर निर्माण होणे.

ड) व्यापार, व्यवसाय कृषी निगडीत:

१. वकीली करणे - एखाद्याची बाजू घेणे

२. इळा मोडून खिळा करणे - मूल्यवान वस्तू निर्मूल्य करणे

३. आंधळा कारभार - अंदाधुंदीचा कारभार

४. सोनाराने कान टोचणे - योग्य व्यक्तीने पटवून देणे.

इ) खेळावरून रूढ झालेले वाक्प्रचार :

१. कुरघोडी करणे - दुसऱ्यावर वर्चस्व चालविणे

प) भांडणवरून रूढ झालेले वाक्प्रचार :

१. आग लावणे - दोष देणे २. खोड मोडणे - तीव्र उपाय करणे

३. कुभांड रचणे - आळ घेणे ४. आग्या वेताळ - तापट मनुष्य

य) प्राणी, पशु-पक्षी, यावरून रूढ झालेले वाक्प्रचार:

१. उंटावरचा शहाणा - मूर्खपणाचा सल्ला देणारा

२. नंदी बैल - अक्कलशून्य

३. कोल्हेकुई- कुजबुज

र) धर्म, रीती, संस्कार व शास्त्रे यावरून लोकसाहित्यामध्ये वाक्यप्रचार रूढ झालेले वाक्प्रचार:

१. शनीचा फेरा - साडेसाती २. सतीचे वाण - निश्चयी स्त्री

३. भांगेतील तुळस - वाईट व्यक्तीतील चांगली व्यक्ती

२) इतर भाषांतून आलेले काही वाक्प्रचार:

१. न भूतो न भविष्य - अपूर्व गोष्ट

२. बुड्ढी घोडी लाल लगाम - म्हाताऱ्याने तरूणासारखे राहणे.

३. बापसे बेटा सवाई - अधिक हुशार, मुलगा जास्त हुशार असणे.

लोकवाङ्मयातील या वाक्प्रचाराच्या मागे लोकपरंपेतील जीवनाचा अनुभव असतो. मराठी लोकवाङ्मयातील वाक्प्रचार एका वेगळ्या भाषिक सौंदर्याचा अर्थपूर्ण प्रत्यय देणारे असून त्याची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे दिसतात. वाक्प्रचाराचा अर्थ प्रासंगिक घ्यावा लागतो.

उदा. पानपतावर सव्वा लाख बांगडी फुटणे. या वाक्प्रचारामागील घटनांचे स्मरण करून देणारे प्रसंग उद्भवताच त्याचा उपयोग लोकव्यवहारात होतो. वाक्प्रचार नेहमीच लाक्षणीक व व्यंग्यार्थाने वापरले जातात. काही वाक्यात शब्दार्थ बाजूला करून लाक्षणीक अर्थ घ्यावा लागतो. वाक्प्रचाराची बांधणी इतकी पक्की असते की, त्याची मोडतोड करण्याचा प्रयत्न केल्यास त्याचा तोल बिघडतो. म्हणूनच वाक्प्रचार लोकव्यवहारात जसे प्रचलित आहेत तसाच त्याचा स्वीकार करावा लागतो. वाक्प्रचारांमुळे भाषेला सौंदर्य प्राप्त होते. समाजजीवनाची विविधता अशा प्रकारच्या आविष्कारातून प्रकट होत असते.

अभिजात साहित्याला भाषेचा प्रगल्भपणा मिळतो, तर लोकसाहित्यातून त्या भाषेला जिवंतपणा आणि आशय मिळतो. लोकसाहित्य हे सामान्य लोकांच्या भावनांचे प्रतिबिंब आहे, तर अभिजात दर्जा हे मराठी भाषेच्या प्राचीनतेचे आणि साहित्यिक श्रीमंतीचे अधिकृत प्रमाणपत्र आहे.

४.१५ म्हणी

लोकव्यवहारात एखाद्या भाषेचा वापर किती विविध तऱ्हेने केला जातो आणि आशयाची अभिव्यक्ती किती समर्थपणे केली जाते त्यावर त्या भाषेचे सामर्थ्य अवलंबून असते. समाजात प्रचलित असणारे संकेत, रूढी, परंपरा यांचा कौशल्यपूर्ण वापर म्हणी, वाक्प्रचार यांच्यामध्ये केलेला आढळतो. 'म्हणी म्हणजे अनुभवांच्या खाणी असेही म्हटले जाते.

खेड्यामधील लोक आपले दैनंदिन व्यवहार ज्या भाषेतून करीत असतात त्या भाषेला आपण 'लोकभाषा असे म्हणतो. या लोकभाषेतील म्हणींमुळे भाषेला एक प्रकारचे सौंदर्य प्राप्त होते. बोलणाऱ्या व्यक्तीचे चातुर्य, हजरजबाबीपणा अनुभवयास मिळतो. भाषेची परंपरा जितकी जुनी आहे तितकीच म्हणीची परंपरा जुनी आहे. म्हणींना प्राचीन अशा प्रकारची परंपरा आहे. म्हणी जगातील बहुतेक साऱ्या भाषांतून असून वेगवेगळ्या भाषांमधील म्हणींमध्ये साधर्म्य आढळते व देवाण-घेवाण झालेली आढळते. अगदी मामिर्कपणे, शक्य तितक्या मोजक्या शब्दांत विदारक सत्य प्रकट करणारे वचन म्हणजे म्हण होय. म्हणींमुळे लोकांच्या मनावर नैतिक संस्कार होतात. व्यवहारज्ञान आणि मनोरंजन असा म्हणीचा दुहेरी हेतू असतो. म्हणी आकाराने छोट्या असल्या तरी त{च्यातून प्रकट होणारा आशय व{शाल असतो. यमक -अनुप्रास शब्दालंकारांच्या योजनेमुळे म्हणीला सौंदर्य प्राप्त होते. सत्यता आणि नवनवीनता ही म्हणींची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. रचनाआशय, प्रयोग, ग्रामीण, नागरी अशा विविध प्रकारचे वर्गीकरण करणे शक्य आहे.

परमेश्वरविषयक म्हणी

ईश्वर हा सर्वशक्तीमान असून त्याच्याविषयी कृतज्ञतेची भावना आपल्या मनामध्ये आसते.अशी समाजाची धारणा असते. तीच भावना म्हणींमधून व्यक्त होते. काही म्हणींमधून देवावरील श्रद्धा व्यक्त होते.

उदा. १) देव तारी त्याला कोण मारी

२) दैव देत कर्म नेते

३) देवाची करणी आन नारळात पाणी

नीतीतत्त्वाचे चित्रण करणाऱ्या म्हणी:

कोणत्याही समाजामध्ये विकास आणि प्रगती व्हावी यासाठी काही नीतिनियमांची निमिर्ती केलेली असते. अशा नीतिसंकल्पनांचे चित्रण काही म्हणींमधून आढळते.

उदा. १) ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाऊ नये.

२) अती तेथे माती

३) कर नाही त्याला डर कशाला

४) जसे काम तसे दाम

नातेसंबंधाचे दर्शन घडविणाऱ्या म्हणी:

उदा. १) माय मरो मावशी उरो

२) चार द{वस सासूचे चार द{वस सुनेचे

३) लेकी बोले सुने लागे

४) कामापुरता मामा आण{ ताकापुरती आजी

शरीरअवयवावरून रूढ झालेल्या म्हणी:

उदा. १) आपला हात जगन्नाथ

२) आपलेच दात आपलेच ओठ

३) उचलली जीभ लावली टाळयाला

४) कानामागून आली त{खट झाली.

व्यवसायदर्शक म्हणी:

उदा. १) नळी फुकली सोनारे, इकडून तिकडे गेले वारे

२) कसाबाला गाय धार्जिण

३) सोनार, शिंपी, कुलकर्णी अप्पा यांची संगत नको रे बाप्पा

व्यवहारज्ञानाचे चित्रण करणाऱ्या म्हणी:

उदा. १) दुभत्या गायीच्या लाथा गोड

२) अति शहाणा त्याचा बैल रिकामा

३) गरज सरो वैद्य मरो

४) अंथरूण पाहून पाय पसरावे

ढोंगीपणा - आत्मवंचना चित्रण करणाऱ्या म्हणी:

उदा. १) तोंडात हरी बगलेत सुरी

२) घरात नाही ग{न्ना आण{ मला म्हणा आण्णा

३) दिवसा ब्रह्मचारी रात्री व्याभिचारी

४) गळ्यात माळ पोटात काळ

प्रवृत्ती चित्रण करणाऱ्या म्हणी:

उदा. १) सारा गाव मामाचा एक नाही कामाचा

२) गोगलगाय अन् पोटात पाय

३) आधी पोटोबा मग विठोबा

स्त्रीकेंद्री अनुभव व्यक्त करणाऱ्या काही म्हणी आहेत.

उदा. १) नाव सोनाबाई हातात कथिलाच्या बांगड्या

२) दहा पुरुष खपतील पण एक बाई खपणार नाही

तसेच संगतीचा परिणाम,जीवनविषयक तत्वज्ञान व उपदेश सांगणाऱ्याही काही म्हणी आहेत. पशु, पक्षी, प्राणी यांच्याशी निगडीत म्हणी मराठी भाषेत उपलब्ध आहे.

उदा. १) नाचता येईना आंगण वाकडे

२) कावळ्याच्या शापाने गाई मरत नाहीत

३) आडला हरी गाडवाचे पाय धरी

४) माकड म्हणते माझीच लाल

५) ढवळ्या शेजारी पवळ्या बांदला वाण नाही पण गुण लागला

६) माणसा परीस मेंडर बरी

४.१६ उखाणे

उखाणा म्हणजे लोकवाङ्मयातील एक महत्त्वाचे दालन आहे. उखाणे घेण्याची किंवा घालण्याची परंपरा प्राचीन अशी आहे. अगदी रामायण-महाभारत काळापासून याचा धागा सापडतो. उखाण्यात नात्यनूतन अशा प्रकारची भरच पडत आलेली आहे. ज्ञानाबरोबर रंजन करणे हा देखील उखाण्याचा हेतू आहे. उखाण्याचे काटेकोर वर्गीकरण करता येत नसले तरी त्यातील आशय, उद्देश व तत्त्वाआधारे उखाण्यांचे वर्गीकरण करता येते. नाव घेण्याचे उखाणे, व्याही विहीणींचे उखाणे, खेळातील उखाणे, नुसतेच नाव घेतले तर पतीचे आयुष्य कमी होते व तेच नाव उखाण्यात शब्दांच्या अवडंबरात गुंफुन घेतले तर ते मृत्यूच्या कानी पडत नाही. अशी एक समजूत आहे. त्यामुळे उखाण्यातून नाव घेण्याची प्रथा प्रचलित झाली. अशा उखाण्यात कल्पकता व भावसौंदर्य असते. उखाणा सहजासहजी घेतला जात नाही; त्यासाठी बरेच आढेवेढे घेतले जातात. ग्रामीण भागातील महिलामध्ये लांबलचक उखाणे घेण्याची प्रथा आहे. त्यात एक लयबद्धता, नादमयता असते त्याची

रचना वैशिष्ट्यपूर्ण असते. उखाण्यामधून पती, सासर-माहेर, सासू-सासरे, दीर, नणंदा-जावा यांचाही नामोल्लेख आढळतो.

उदा.

१) छिंदुक छिंदुक जात होते खिडकीवाटे पाहत होते
तिकडून आला व्यापारी त्यांन दिली सुपारी
उभी राहिली अंगणी हाती दिली कंगनी
उभी राहिली तुळशी हाती दिली कळशी
उभी राहिली नाणी हाती दिली फनी
उभी राहिले दारात हाती दिली परात
उभी राहिली कोणात हाती दिली बनात
बनाती वर खेळे तान बाळ
बाळाच्या हातात चांदीची डबी डबीत होता पैका
रावांचे नाव आनंदाने घेते सर्वजण चित्त देऊन ऐका

२) नाव घेते एक मी आहे आबांची लेक
नाव घेते ग मी मी आहे पाहुणी रामचंद्र ची मेहुणी
नाव घेते गहीन मी हाय सदाशिवरावांची लाडकी बहीण
नाव घेते खाशी यशोदेची मावशी आणि
अशा माहेराला जायला मी आहे लय खुशी पण
रावांच्या मनात लय शिरलीया एडीपीशी

३) पंढरपूरचा पुडा काशीचा चुडा
मथुरेचं पान खायला छान
कलमी आंबा त्याच्या करते फोडीं
आई बापाची गोडी शितेच्या काखेला दुधाची कळशी
दुधाचं करते ताक ताकाचं करते लोणी
अशी मी अंतरी शहाणी की
रावांच्या रागाचं तवाच करते पाणी

४) आंब्याचा डहाळा त्यात लग्नाचा सोहळा

कडुनिंबाचा पाला पाडव्याने गोड केला
केळीचे पान त्याला जेवणाचा मान
बिङचाच पान त्याची दरबारी शान
बेलाचे पान त्याला शिवाचं ध्यान
तुळशीचे पान त्याला विष्णुपती स्थान
आणि रावांच्या संसारात मला सौभाग्याचा मान

व्याही-विहीणींचे उखाणे लग्नप्रसंगी किंवा रूखवताच्या प्रसंगी थट्टामस्करी करण्यासाठी घेतले जातात. त्याचे स्वरूप मिस्कील असे असते. आटोपशीर रचना, ठसकेबाजपणा आणि लय हे विशेष अशा प्रकारच्या उखाण्यातून आढळतात. उखाण्यात रूखवताच्या साहीत्याचे, सामाजिक व शारीरिक व्यंगाचे आणि जीवनातील विसंगत प्रसंगांचे वर्णन केलेले आढळते.

उदा. **आला आला रूखवत त्यात होता बटवा.**
विहीणबाइंनां नटवा मुंबईला पाठवा.

उखाण्यांमधून जरी परस्परांचे उणेदुणे काढलेले असले तरी कोणीच रागवत नाही. खिलाडू वृत्तीचे प्रत्युत्तर दिले जाते. हजरजबाबीपणे हा सगळा खेळ रंगत असतो.

उदा. समोर होता कोनाडा, त्यात होता पेढा
साळूला नाही कळलं, तिचा नवरा होता बेवडा.

या उखाण्याला प्रत्युत्तर देताना मैत्रीणही म्हणते,

समोर होता कोनाडा, त्यात होता आणा
ठकीला नवरा भेटला काणा, बाई काणा

४.१७ हुमाण

केवळ रंजनाच्या हेतूने अस्तित्वात आलेला प्रकार म्हणजे मनोरंजनात्मक उखाणे. हे उखाणे आबाल-वृद्धांमध्ये लोकप्रीय आहेत. या उखाण्यांचे स्वरूप कोड्यासारखे असते पण अत्यंत सुटसुटीत असे हे हुमाण असतात.

उदा. १) काळ्या राणी हत्ती येला
म्हणजे शेतात असणारा उत्तर - कापूस.
२) जिकडे रस्ता आहे पण
गाडी नाही जंगल आहे पण

झाड नाही, आणि शहर आहे पण

पाणी नाही उत्तर – नकाशा

३) ज्याला कापल्यावर लोक

गाणे म्हणण्यास सुरुवात करतात? उत्तर – वाढदिवसाचा केक

४) असं काय आहे ज्यामध्ये सर्वकाही लिहिलेले असते

पण ते कोणीही ते वाचू शकत नाही? उत्तर – भाग्य

५) एवढस कार्टं घर कसं राखतं? उत्तर – कुलूप

६) तीन पायांची तिपाई,

त्यावर बसला शिपाई? उत्तर – चूल आणि तवा

७) पाणी नाही,पाऊस नाही,तरी रान कसं हिरवं,

कात नाही,चुना नाही,तरी तोंड कसं रंगल...? उत्तर – पोपट

८) जगभर मी फिरतो,पण जमिनीवर ठेवत नाही पाय

दिवसभर मी झोपतो आणि रात्री मी जागा राहतो,? उत्तर – चंद्र

हे उखाणे एकाने सांगायचे आणि दुसऱ्याने तात्काळ उत्तर द्यायचे. मोजके व समर्पक शब्द हे उखाण्याचे वैशिष्ट्य आहे. उखाण्याची परंपरा भारतातील सर्वच प्रांतात प्रचल{त असल्याचे दिसते. उखाण्याची रचना कलात्मक, अर्थपूर्ण, त्यातील कल्पना, विचारांची मांडणी आणि त्यातील नाद, ताल वेगळेपण दर्शवितो. मनोरंजनातून देवाण-घेवाण करण्याचे उखाणा हे एक माध्यम आहे.

४.१८ समारोप

लोकसाहित्य म्हणजे पारंपरिक लोकमानसातील कल्पना, विचार, भाव-भावना लोककलांच्या माध्यमातून व्यक्त होतात. लोककलांची जोपासना आणि वाढ ही समाजातच होत असते. लोककलेतील प्रत्येक घटक म्हणजेच लोकनृत्यातील पदन्यास, शारीरिक हालचाली, चित्रकलेतील चित्रीत आकृती व रंग, शिल्पकलेतील आकार यांना एक परंपरा असते. देणारा आहे. नृत्य, नाट्य, संगीत, चित्र, शिल्प, अंगणात काढलेली रांगोळी, घराच्या भिंतीवर रेखाटलेली चित्रे, कपड्यावरील भरतकाम, नक्षीकाम, लाकडापासून तयार केलेल्या बाहुल्या, खेळणी, सोनारांनी घडविलेले दागिने, कुंभाराने केलेल्या मातीच्या वस्तू, बुरूडाने बांबूपासून बनविलेल्या वस्तू इ. लोकसाहित्यातील लोककलांचा व लोकांच्या सांस्कृतिक जीवनाचा परिचय करून देत असताना या ठिकाणी भाषा ही महत्त्वाची भूमिका बजावत असते. सर्व काम करताना मानवाला भाषेतूनच करावे लागते. लोककलांचा उगम आदिमकाळात निसर्गातील दृश्यातून व निसर्गशक्तीचा अर्थ लावण्यातून

झाला. सामाजिक अभिरूचीचे प्रतिबिंब लोककलेत पडलेले दिसते. लोककला व लोकनाट्यात काम करणारा कलाकार त्या काळाचे प्रतिनिधित्व करताना भाषेचा वापर करीत असतो.

अलीकडच्या काळात मात्र या लोककलांच्या सादरीकरणात फरक पडत चालला आहे. पूर्वीच्या काळी या लोककला लोकपरंपरा, रूढी, श्रद्धा, समजूती, लोकाचार यांना अनुसरून सादर केल्या जात होत्या. धर्मश्रद्धेला अधिकाधिक प्राधान्य होते. पण जसजसा काळ बदलला तस तसे सादरीकरणाचे स्वरूपही बदलले. काही विधी धार्मिक प्रेरणेतुन केले जात असले, तरी त्यामागची मनोरंजनाची प्रेरणाही प्रबळ दिसते आहे. धर्मश्रद्धेतून साकार होणाऱ्या विधीनाटयांचे परिरवर्तन पुढे लोकनाटयात झाले आहे. आधुनिकतेच्या रेटयामुळे लोकनाट्यांत बदल घडून येत आहेत. कीर्तन, भारूडासारखे काही पारंपरिक नाटयात्म प्रकार मात्र लोकरंजनाबरोबर लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम ठरत आहेत. लोककला, लोककलावंत व लोककलाकार जगले तरच लोककला टिकेल. लोककलेच्या जतनासंदर्भात डॉ.अनिल सहस्रबुद्धे यांच्या विचाराची नोद घेणे आवश्यक वाटते. "लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या अभ्यासक्षेत्राने आपली मदार प्रामुख्याने दैवत कथाशास्त्रावर ठेवली असल्याने लोकसाहित्याने लोकसंस्कृतीची कक्षा आत्मभावाने मुळातच तिथपर्यंत पोहोचलेली दिसते. याचाच अर्थ असा की, समग्र अस्तित्वाच्या मुल कारणापासून वर्तमानातील दैनंदिन घडामोडी पर्यंत अतितातून वर्तमानापर्यंत माणसाला घेऊन जाण्याची प्रक्रिया लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या आयुष्यात समाविष्ट असते याकरिता या अभ्यास क्षेत्राचा विकास होताना भारतीय संकल्पना आणि परंपरा विचार महत्त्वाचा ठरतो."[३५]

संदर्भ ग्रंथ

१) "साहित्याभ्यास पध्दती", एम.ए. प्रथम सत्र मराठी, यचममुवि, नाशिक, पृ. क्र. १६.

२) "लोकसाहित्य तात्विक मीमांसा", एम.ए. भाग दोन, मराठी, शिवाजी विद्या., दूर शिक्षण केंद्र, पृ. क्र. १०.

३) मोरजे गंगाधर, "लोकसाहित्य विचार", पद्मगंधा प्रकाशन, पुणे प्र. आ. १९९८, पृ. क्र. १२.

४) भागवत दुर्गा, "लोकसाहित्याची रूपरेखा", वरदा बुक, मुंबई, पृ. क्र. १११.

५) शिंदे विश्वनाथ, "लोकसाहित्य मीमांसा", भाग-१ पृ. क्र. २२५.

६) तत्रैव, पृ. क्र. २२५.

७) तत्रैव, पृ. क्र. २२५.

८) मोरजे गंगाधर, "लोकसाहित्य एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र", पृ. क्र. ६.

९) ढेरे रा. चिं. "लोकसंस्कृतीची क्षितिजे", प्रास्ताविक विश्वकर्मा साहित्यालय, पुणे, पृ. क्र. ७६.

१०) मांडे प्रभाकर, "लोकसाहित्याचे स्वरूप", सविता प्रकाशन, औरंगाबाद, १९८९, पृ. क्र. १६.

११) तत्रैव, पृ. क्र. पृ. क्र. १५.

१२) तत्रैव, पृ. क्र.१५.

१३) तत्रैव, पृ. क्र. १६.

१४) तत्रैव, पृ. क्र.१९.

१५) शिंदे विश्वनाथ, "लोकसाहित्य मीमांसा", भाग – १, पृ. क्र. २२५.

१६) उपाध्यय कृष्णदेव, "लोकसाहित्य की भूमिका", साहित्यभवन लि. इलाहाबाद, १९९८, पृ. क्र.२२.

१७) शर्मा श्रीराम, "लोकसा. सिध्दांत और प्रयोग", विनोद पुस्तक मंदीर, आगरा, दु.आ. पृ. क्र. १९.

१८) तत्रैव. पृ.क्र. १९.

१९) व्यवहारे शरद, "लोकसाहित्य: संकल्पना आणि स्वरूप", कैलाश पब्लिकेशन. औरंगाबाद, १९९९, पृ.क्र. १५.

२०) मांडे प्रभाकर, "लोकसाहित्याचे स्वरूप", सविता प्रकाशन, औरंगाबाद, १९८९, पृ. क्र. ४८.

२१) मांडे प्रभाकर, "लोकसाहित्याचे स्वरूप", सविता प्रकाशन, औरंगाबाद, १९८९, पृ. क्र. ४९.

२२) व्यवहारे शरद, "लोकसाहित्य उगम आणि विकास", पृ. क्र. २६२.

२३) त्रिपाठी राम नरेश, "कविता कौमुदी", भाग ५ वा पृ. क्र. २६.

२४) शिंदे विश्वनाथ, "लोकसाहित्य मीमांसा", भाग पहिला पृ. क्र. २०.

२५) लांजेवार लता, "लोकसाहित्य आणि लोककला", श्रीमत प्रकाशन, लातुर प्र. अ. पृ. क्र. १९,२०.

२६) शिंदे विश्वनाथ, "लोकसाहित्य मीमांसा", भाग पहिला पृ. क्र. २३.

२७) तत्रैव. पृ. क्र. २१.

२८) ढेरे अरूणा, "लोक आणि अभिजात", पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१९. पृ. क्र. ६ व ७.

२९) ढेरे अरूणा, "लोक आणि अभिजात", पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१९. पृ. क्र. ७.

३०) पगार एकनाथ, "लोकसाहित्य व आधुनिक साहित्य", यचममुवि, नाशिक पृ.क्र. १२४.

३१) पं.जोशी माहदेवशास्त्री, "भारतीय संस्कृतीकोश खंड-८ वा", सन १९७४ पृ. क्र.३९१.

३२) पाटील सुरेश, पाटील सुनदा, "लोकसाहित्य", यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ,नाशिक, पृ. क्र. ९०.

३३) खांडगे प्रकाश,'महाराष्ट्राच्या प्रयोगात्म लोककला', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. क्र. ७.

३४) खांडगे प्रकाश, "महाराष्ट्राच्या प्रयोगात्म लोककला परंपरा आणि नवता", मरासाआसंमं, मुंबई. २०१७. पृ. क्र. २७८.

३५) व्यवहारे शरद, "लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप" कैलास पब्लिकेशन', औरंगाबाद, १९९९, पृ. क्र.१६९ ते १७१.

३६) व्यवहारे शरद, "लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप" कैलास पब्लिकेशन' औरंगाबाद, १९९९, पृ. क्र. २१४.

३७) डॉ. अनिल सहस्रबुद्धे, "लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य भारतीय संकल्पना आणि परंपरा", पृ.क.१८.

***

प्रकरण ५

भारतीय ज्ञान परंपरा आणि प्राचीन व मध्ययुगीन साहित्य

५.१. प्राचीन भारतीय ज्ञान स्त्रोतांचा परिचय

- **५.१.१ वेद**
- **५.१.२ उपनिषद**
- **५.१.३ महाकाव्य**
- **५.१.४ पौरणिक वाङ्मय**
- **५.१.५ बौद्ध वाङ्मय**
- **५.१.६ जैन वाङ्मय**
- **५.१.७ अन्य भारतीय भाषेतील अभिजात साहित्य**

५.२ भारतीय ज्ञान परंपरा आणि मध्ययुगीन मराठी साहित्य

- **५.२.१ भारतीय ज्ञान परंपरेची संकल्पना**
- **५.२.२ बिजकथा**
- **५.२.३ आदिबंध**
- **५.२.४ कथा**
- **५.२.५ गोष्ट**
- **५.२.६ कायनी (कोडे)**

५.३ महानुभव साहित्य

- **५.३.१ लिप्यांचा विकास**
- **५.३.२ लिळाचरित्र**
- **५.३.३ महानुभावीय इतर वाङ्मयीन ग्रंथ**

५.४ संत साहित्य

- **५.४.१ आख्यान काव्य**
- **५.४.२ ओवी**
- **५.४.३ अभंग**
- **५.४.४ भारुड**

५.५ पंडिती साहित्य

५.६ शाहिरी वाङ्मय

५.६.१ लावणी
५.६.२ पोवाडा
५.६.३ बखर गद्य
५.७ समारोप
संदर्भ ग्रंथ

प्रकरण ५

भारतीय ज्ञान परंपरा आणि प्राचीन व मध्ययुगीन साहित्य

प्रास्ताविक

भारतीय ज्ञान परंपरा ही एक समृद्ध आणि व वैविध्यपूर्ण परंपरा आहे ज्यामध्ये तत्त्वज्ञान अध्यात्म विज्ञान कला आणि संस्कृती यासह विविध विषयांचा समावेश आहे हा हजारो वर्षाचा मोठा इतिहास आहे आणि विविध संस्कृती आणि संस्कृतीच्या प्रभावाखाली कालांतराने तो विकसित झाला आहे भारतीय ज्ञान परंपरा अनेक कारणांसाठी महत्त्वपूर्ण आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही हजारो वर्षांची समृद्ध, जीवनकेंद्री आणि मूल्याधिष्ठित परंपरा आहे. या परंपरेत भौतिक व आध्यात्मिक ज्ञानाचा समन्वय आढळतो. मानव, समाज आणि निसर्ग यांच्यातील संतुलन राखणे हा या परंपरेचा मुख्य उद्देश आहे.

भारतात एका पिढी कडून दुसया पिढीकडे संक्रमित झालेले व हजारो वर्षात विकसित होत गेलेले ज्ञान, तत्वज्ञान, अनुभव सिद्ध शहाणपण, विज्ञान आणि तंत्रज्ञान या सर्व बाबींचा समावेश भारतीय ज्ञान परंपरेत होतो. या ज्ञान परंपरेत मानवी जीवन, निसर्ग, देव देवता, रूढी परंपरा, लोककला, इत्यादींचे आकलन समाविष्ट आहे. ह्या सर्व परंपरेचे मूळ भारतीय प्राचीन ग्रंथात तसेच औपचारिक व अनौपचारिक रित्या पिढ्यान पिढ्या जतन केलेल्या चालीरीती व मौखिक परंपरेत आढळून येतात.भारत देशाची भूमी ही अनादी काळापासून सर्वासाठी सुरक्षित अशीच होती. ‘‘वसुधैव कुटुंबकम’’ ही वैदिक विश्वसंकल्पना भारतात अनादी कालापासून ते आजपर्यंत रूढ आहे.

भारत देशात सर्वांना प्रवेश मुक्त स्वरूपाचा होता. परिणामतः जगातून, अनेक दिशातून, देशातून या भूमीवर मानव वंश पोहचलेत. त्या मध्ये काही प्रवासी, यात्रेकरू, काही अभ्यासक, तर काही आक्रमक शासकही होते. भारतदेशाने सर्वांना वेळोवेळी सामावून घेतले आहे.भारत वर्षाचे प्राचीन नाव’’ अजनाभ वर्षा’’ हैमवतवर्ष, कूर्म संस्थान, कामुर संस्थान असे देखील पौराणिक नावे आहेत.भरतवर्ष भरतखंडे असे आजही म्हटल्या जाते. या भूमीची महिती देखील अनेक साधु, संत व महात्म्यांनी गायिली आहे.

भरतखंडे नरदेह प्राप्ती। हे तव सकळ भाग्यांची संपत्ती

असे वर्णन अनेकांनी केले आहे.गौरवशाली भारताचे प्राचीन नाव, ‘‘ भारतवर्ष’’ असे नाव होते. राजा भरताचे राज्य असलेला हा भारत ऋषि मुनिच्या तपाने उजळून निघालेला देश अशी ओळख असलेला देश म्हणजे भारत देश होय. या देशाला आदरणाने भारतीय लोक ‘ भारत माता ‘

म्हणतात. पुराणांतील मध्यवर्ती जंबूबेट हे जंबू द्विप म्हणून ओळखले गेले. त्या मधील मेरू पर्वत प्रसिद्ध आहे. मेरू पर्वताच्या आसपास आर्याच्या अनेक वसाहती असल्याचे पुरावे आढळतात. तसेच ऋग्वेद, महाभारत आणि विष्णु पुराणातील सर्व साहित्या मध्ये स्पष्ट होते की, भारत देशाचे प्राचीन नाव भारत वर्ष असे होते. ऐतिहासिक महान परंपरेतील वैदिक संस्कृतीचा वारसा भारत देशाला लाभलेला आहे. ह्या देशालाच हिंदूचे स्थान म्हणून देखील ओळखल्या जाते त्याला हिंदूस्थान असे देखील संबोधतात.

भौगोलिक दृष्ट्या विविधतेतून एकता जोपासणारा हा देश आहे. गौरवशाली या देशाच्या भूमीवर अनेकांनी राज्य केले ब्रिटीशांचा प्रभाव आज देखील असल्याचा दिसतो.

५.१. प्राचीन भारतीय ज्ञान स्त्रोतांचा परिचय

भारतीय प्राचीन ज्ञानाचे स्त्रोत हे ज्ञानाचा खजिना आहे. त्यामध्ये विविध विषय आणि उपविषय यांचा समावेश आहे. भारतीय प्राचीन स्त्रोतांचा अभ्यास केल्यास भारताच्या तत्त्वज्ञान, गणित, विज्ञान, अध्यात्मिक आणि औषधशास्त्र इत्यादी वारसाची सखोल माहिती मिळते. आधुनिक विचार आणि पद्धतीवर त्याचा कसा प्रभाव पडतो या महत्त्वपूर्ण व लक्षणीय गोष्टींचा परिचय आपणास पुढील प्रमाणे करता येतो.

५.१.१ वेद

भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यास करतांना ही समृद्ध ज्ञान परंपरा ज्या वेदां पासून विकसित होत गेली तिचा अभ्यास देखील महत्वाचा ठरतो. वेद हे जगात सर्वात प्राचीन ग्रंथ आहेत हे सर्वश्रृत आहे. वेद या शब्दाचा मूळ धातू विद म्हणजे जाणणे असा आहे. वेदांना एक प्राचीन साहित्य म्हणून अनन्य साधारण महत्व आहे. वेद हे त्या काळी उपलब्ध असलेल्या संपूर्ण झानाचे भांडार म्हणून पूज्य मानले गेले आहेत.ऋग्वेदातील छंदोबध्द रचना असलेल्या ऋचा यजुवेदातील गद्य स्वरूपातील रचना आणि सामवेदातील गेय असलेल्या रचना अशा तीन प्रकारच्या मंत्राचा समावेश वेदामध्ये असल्यामुळे त्यांना त्रयी असे म्हणतात. भारतीय ज्ञान परंपरा ही ज्ञानबोधित आहे.

'वेद' हा शब्द संस्कृत भाषेतील 'विद' या मूळ शब्दापासून बनला आहे, ज्याचा अर्थ जाणून घेणे असून वेदांचा शाब्दिक अर्थ ज्ञान असा आहे. 'वदित' (ज्ञात), 'विद्या' (ज्ञान), विद्वान, (ज्ञात) असे शब्द मुळापासून आले आहेत. हे दैवी शब्द मानले जातात म्हणून तिला 'श्रुती' म्हणतात. वेध हे अंतिम सत्य मानले जातात वेदाचे चार भाग पडतात ती खालील प्रमाणे

i) ऋग्वेद ii) यजुर्वेद iii) सामवेद iv) अथर्ववेद

असे चार प्रकारचे वेद आहेत ; हे चार वेद प्राचीन भारतीय ग्रंथ आहेत, त्यांना ज्ञान आणि बुद्धीचे व विचारसरणीचे अंतिम स्त्रोत मानले जातात. चार वेदांना अपौरुषेय मानले जाते, म्हणजे ते मानवाने निर्माण केलेले नसून ते प्राचीन ऋषी आणि द्रष्ट्यांनी प्राप्त केलेले प्रगटीकरण (स्वप्रकटन) आहेत ते हिंदु तत्वज्ञान, अध्यात्म आणि संस्कृतीचा पाया आहेत.

वेद उपनिषदांमधील ब्रह्मविद्या ही हिंदू धर्माचा आत्मा आहे. हिंदू परंपरेनुसार व्यास मुनींनी वेदाचे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, व अथर्व वेद असे चार भाग केलेले आहेत. व्यास मुनींचे चार शिष्य होते पैल, वैशंपायन, जैमिनी, व सुमंत या चारही शिष्यांना त्यांनी प्रत्येकी अनुक्रमे एक वेद शिकविला व शिष्यांनी त्याचे पाठांतर केले. त्याचे चार भाग पुढील प्रमाणे होय..

५.१.१.१ ऋग्वेद (१५०० इ. स. पूर्व १२०० इ. स. पूर्व)

ऋग्वेद हा पहिला वेद असून त्यातील काव्यात्म ओळीस ऋचा असे संबोधतात. ऋग्वेद हा पूर्ण पणे ऋचाचा संच आहे. ऋग्वेद हा संस्कृत शब्द आहे याचा अर्थ स्तुतीचा वेद किंवा स्त्रोतांचे ज्ञान असा होतो अंदाजे १५०० इ. स. पूर्व - १२०० इ. स. पूर्व मध्ये हा वेद ग्रंथ लिहिला गेला असावा यात १०२८ सूक्त (स्तोत्रे) आणि १०६०० मंत्र आहेत. हा वेद पूजा, प्रार्थना आणि विधी यांच्याशी संबंधित आहे. हा एकूण १० मंडळामध्ये विभागलेला एक प्राचीन ग्रंथ आहे. प्राचीन भारतीय ऋषी आणि दृष्ट्यांनी हा ग्रंथ रचलेला आहे. यात प्रामुख्याने देवी-देवतांची पूजा आणि स्तुती, विधी आणि यज्ञ, कॉस्मोलॉजी आणि जगनिर्मिती, तत्त्वज्ञान आणि अध्यात्म, निसर्ग व त्याचे महत्त्व आणि विश्व याबद्दल विस्तृत माहिती दिलेली आहे. हिंदू धर्माच्या संस्कृतीचा पाया यात सामावलेला आहे. ऋग्वेद हा ज्ञान आणि समृद्ध विचारसरणीचा हा अंतिम स्रोत मानला जातो याचा आजही अभ्यासछत आध्यात्मिक आणि तात्विक आंतरदृष्टीसाठी वापर केला जातो.ऋग्वेदाच्या १० मंडलातील १७५२ वा ऋचेत असे प्रतिपादन आले आहे.

सं गच्छ ध्वं सं वदध्मं सं वः मनांसि जाणतां ।
देवाः भागं यथा पूर्वे सं जाणानाः उपासते॥

याचाच अर्थ असा होतो की, तुम्ही सर्वजण एका जीवाने राहा. एकमेकांशी बोलत राहा. सर्वांनी चित्त एकरूप करून ज्ञान संपादन करावे.

५.१.१.२ यजुर्वेद (१२०० इ. स. पूर्व १००० इ. स. पूर्व)

भारतीय जीवन विकासात ज्ञान, कर्म आणि उपासना यांना अधिक महत्व दिले आहे. ऋग्वेद यामध्ये निरनिराळ्या ज्ञानाबद्दल माहिती दिलेली आहे तर दुसऱ्या वेदांत म्हणजे यजुर्वेदात कर्माचे विवरण केलेले आहे.

यजुर्वेद हा संस्कृत शब्द आहे. याचा अर्थ यज्ञांचा वेद किंवा विधीचे ज्ञान असा होतो. अंदाजे १२०० इ. स. पूर्व ते १००० इ. स. पूर्व मध्ये हा वेद ग्रंथ लिहिला गेला असावा. यात १९७५ सूक्त आणि १५,३२५ मंत्र आहेत. यात विधी, यज्ञ आणि उपासना यावर लक्ष केंद्रित केले जाते. कृष्ण यजुर्वेद आणि शुक्ल यजुर्वेद असे याचे दोन भाग केले गेले आहेत. प्राचीन भारतीय ऋषी आणि दृष्ट्यांनी हा ग्रंथ नसलेला आहे. ग्रंथात प्रामुख्याने विधी आणि यज्ञ देवी देवतांची पूजा आणि नैवेद्य, राजकीय कर्तव्य आणि जबाबदाऱ्या, तात्विक आणि अध्यात्मिक चर्चा, विश्वनिर्मिती (कॉस्मोलॉजी) व त्याचे महत्त्व आणि विश्व याबद्दल विस्तृत माहिती सामावलेली आहे. हा ग्रंथ वेदांमधील दुसरा सर्वात जुना वेद ग्रंथ आहे तसेच या ग्रंथाला हिंदू धर्मात पवित्र वेदग्रंथ मानतात. आजही हिंदू धर्मात विधि आणि समारंभात याचा वापर केला जातो. हिंदू धर्मग्रंथ आणि परंपरा या हिंदू समाजातील लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे.

भारतीय ज्ञान परंपरेत यजुर्वेदाच्या तैत्तिरीय, मैत्रायणी, कठ, कपिष्ठाल, वाजनेय, काण्व अशा सहा शाखा व्यतिरिक्त ९४ शाखा आहेत. एकूण १०० शाखा पैकी उपरोक्त सहा शाखांची उपलब्धता आहे.

५.१.१.३. सामवेद (१००० इ. स. पूर्व ८०० इ. स. पूर्व)

चार वेदापैकी तिसरा वेद 'सामवेद ' असून तो सुद्धा अतीप्राचीन असावा कारण ऋग्वेदामध्ये आणि अथर्ववेदामध्ये सामवेदाचा उल्लेख आढळतो. सामवेदाची उत्पत्ती सूर्यापासून झाली असे मानली जाते तसेच सामवेदापासून ब्राम्हणांची उत्पती झाली असे म्हटले जाते..

'सामवेद' हा संस्कृत शब्द आहे याचा अर्थ 'गीतांचा वेद' किंवा 'गाण्याचे ज्ञान' असा होतो. हा ग्रंथ अंदाजे १००० इ. स. पूर्व - ८०० इ. स. पूर्व मध्ये हा ग्रंथ लिहिला गेला असावा. यात १८१२ सूक्त आणि १८००० मंत्र आहेत. संगीत, हा वेद विधी आणि उपासनेशी संबंधित आहे. यात वैदिक संगीत व मंत्रोपच्चारावर आधारित आहेत. या ग्रंथाची विभागणी दोन भागात झालेली आहे त्यातील एक भाग 'अर्किका' आणि दुसरा 'गण' असा आहे ग्रंथात प्रामुख्याने वैदिक विधींसाठी संगीत आणि धून, पूजा स्तुतीसाठी गाणी आणि मंत्र, तात्विक आणि अध्यात्मिक चर्चा, कॉस्मोलॉजी आणि निर्मित, विधी आणि यज्ञ याबद्दल विस्तृत माहिती दिलेली आहे. वेदांमधील हा तिसरा जुना वेद आहे. या ग्रंथाचे लेखन संस्कृत भाषेत झालेले आहे. वैदिक विधीच्या संगीताच्या पैलूंवर हा लक्ष केंद्रित करतो. पुजारी आणि विधी सादर करणाऱ्यांसाठी राग आणि मंत्रांचा समावेश आहे. आवाज आणि ताल यावर यामधील लक्ष केंद्रित केले आहे. वैदिक विधी आणि उपासनेचे संगीतमय परिणाम ही प्रणाली प्रदान करते हिंदू धर्माचे भावनिक आणि

सौंदर्यात्मक पैलू समजून घेण्यास मदत करते याचा आजही अभ्यास केला जातो आणि आजही हिंदू विधी आणि समारंभांमध्ये याचा वापर केला जातो. या ग्रंथालाही हिंदू धर्मग्रंथ आणि परंपरेचा एक आवश्यक भाग मानला जातो. संगीत आणि गाण्यावर लक्ष केंद्रित केल्यामुळे सामवेदाला 'मेडॉलॉजिकल' वेद (गाणी व गाण्यांचा) असे संबोधले जाते. हा हिंदू धर्म ग्रंथाचा एक अनोखा भाग आहे.

५.१.१.४. अथर्ववेद (८०० इ. स. पूर्व ५०० इ. स. पूर्व)

'अथर्ववेद' हा संस्कृत शब्द आहे. याचा अर्थ 'पुजारी' किंवा 'जादूगर' असा होतो. याला 'वेदा ऑफ स्पेल' किंवा 'जादूचे ज्ञान' असेही म्हणतात. हा ग्रंथ अंदाजे ८०० इ. स. पूर्व -५०० इ. स. पूर्व मध्ये वेद ग्रंथ लिहिला गेला असावा.या ग्रंथात ७३१ सूक्त आणि ५९७७ मंत्र आहेत. ह्या वेदात संरक्षण आणि उपचारांसाठी विधी दिलेल्या आहेत. ग्रंथामध्ये विधी आणि जादूमंत्र यावर लक्ष केंद्रित केले आहे. ग्रंथाद्वारे गूढ आणि आध्यात्मिक वाढ हाताळली जाते. अथर्ववेदात मुख्यता जारण मारण विद्या व गृह संस्काराचे मंत्र दिलेले आहेत. इष्टापूर्ती व शतुपिडा इत्यादी विषयी मंत्र या वेदात आहेत. काही अघोरी मंत्र देखील यात सापडतात. शोनकी आणि पिप्पलाद या अथर्ववेदाच्या दोन शाखा अथर्ववेदात प्रमुख आहेत. जवळजवळ २० कांडे शोनक संहितेची आहेत. प्रामुख्याने या ग्रंथात संरक्षण व उपचारासाठी जादू आणि मंत्र, दुष्ट आत्मे आणि दुर्दैव दूर करण्यासाठी विधी, तात्विक आणि अध्यात्मिक चर्चा, विश्वनिर्मिती, आयुर्वेद आणि औषध विज्ञान इत्यादींचा सामावलेले आहे. वेदांमध्ये हा चौथा वेद ग्रंथ आहे याचे लिखाण संस्कृत भाषेमध्ये केले आहे. अध्यात्म आणि छंदावर लक्ष केंद्रित केले आहे. त्याचबरोबर गृहस्थाने आपल्या घरात वागताना पाळावयाचे नियम त्यात दिलेले आहेत.

५.१.२ उपनिषद

वेदांचे चार उपांग आहेत. वैदिक कालखंडाच्या समाप्तीनंतर ब्राह्मणके आणि आरण्यकांचे उत्पादन थांबले असताना, वैदिक कालखंडाच्या समाप्ती नंतर अतिरिक्त उपनिषदांची रचना झाली. संहिता, ब्राह्मणके, अरण्यके, आणि उपनिषदे, इतर गोष्टीं बरोबरच, वेदांत तत्वज्ञानाचा परिचय करून देणारे, ब्रह्म आणि आत्मा यांसारख्या अमूर्त संकल्पनांचा शोध घेण्यासाठी तात्विक आणि रुपकात्मक मार्गांनी संहितांचा अर्थ लावतात आणि विवेचन करतात.

उपनिषदे ही भारतीय तत्त्वज्ञानाची सर्वोच्च आणि अत्यंत प्रगल्भ अशी ज्ञानपरंपरा आहे. उपनिषदांमधून मानवजीवनाचा अंतिम उद्देश, आत्मा, ब्रह्म, मोक्ष आणि सत्याचा शोध सखोलपणे

मांडलेला आहे. वेदांच्या उत्तरार्धात (अरण्यकांनंतर) उपनिषदे येतात म्हणून त्यांना वेदांत असेही म्हणतात.

उपनिषदाची फोड करून त्याचा अर्थ समजून घेता येईल. उप (जवळ), नि (खाली) आणि षद् (बसणे) या शब्दांपासून उपनिषद हा शब्द बनला आहे. म्हणजेच गुरूजवळ बसून दिले जाणारे ज्ञान होय. जे ज्ञान पापनाशक, सत्यप्रकाशक आणि अज्ञानशिथिल करणारे आहे, ज्यामुळे ब्रह्मसाक्षात्कार होतो. उपनिषदांची रचना इ.स.पू. सुमारे १५०० ते ५०० या कालखंडात झाली असे मानले जाते. एकूण २०० पेक्षा अधिक उपनिषदे उल्लेखात आहेत; त्यांपैकी १०– १३ प्रमुख उपनिषदे अत्यंत महत्त्वाची मानली जातात.

आत्मा, ब्रह्म, जीव, माया, संसार व मोक्ष यांचा तात्त्विक विचार करणारे ग्रंथ म्हणजे उपनिषदे होत.

मुक्तीकोपनिषदानुसार एकूण १०८ उपनिषदे मानली जातात. त्यापैकी दहा मुख्य उपनिषदे आहेत ती पुढील प्रमाणे - ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडूक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक असे उपनिषदे आहेत. उपनिषदांमध्ये प्रामुख्याने तत्वज्ञान ास प्राधान्य देण्यात आले आहे. उपनिषदे हे वेदांचे उपांग मानल्या जाते.उपनिषदांचा मुख्य विषय म्हणजे ब्रह्म, आत्मा, जीव, जग, मोक्ष आणि ज्ञान. "आत्मा आणि ब्रह्म एकच आहेत" ही संकल्पना उपनिषदांचे केंद्रबिंदू आहे. अहं ब्रह्मास्मि, तत्त्वमसि, प्रज्ञानं ब्रह्म यांसारखी महावाक्ये उपनिषदांमधूनच प्राप्त झाली आहेत. या वाक्यांमुळे मानवाला स्वतःच्या अस्तित्वाचा, आत्मस्वरूपाचा आणि अंतिम सत्याचा शोध घेण्याची दिशा मिळते.

उपनिषदांमध्ये कर्मकांडापेक्षा ज्ञानमार्गाला अधिक महत्त्व दिलेले आहे. यज्ञ, विधी यांपेक्षा आत्मज्ञान, विवेक, वैराग्य आणि ध्यान यांवर भर देण्यात आला आहे. त्यामुळे उपनिषदे ही केवळ धार्मिक ग्रंथ न राहता तत्त्वज्ञान, मानसशास्त्र आणि जीवनशैलीचे मार्गदर्शन करणारी ठरतात.

भारतीय तत्त्वज्ञानातील वेदांत, अद्वैत, द्वैत, विशिष्टाद्वैत या संप्रदायांची मुळे उपनिषदांत आढळतात. शंकराचार्य, रामानुजाचार्य, माध्वाचार्य यांसारख्या महान तत्त्वज्ञांनी उपनिषदांवर भाष्ये लिहून त्यांचा अर्थ अधिक स्पष्ट केला. तसेच उपनिषदांचा प्रभाव भारतीय साहित्य, संतपरंपरा आणि अध्यात्मिक चळवळींवर खोलवर दिसून येतो.

आजच्या आधुनिक काळातही उपनिषदांचे महत्त्व कमी झालेले नाही. जीवनातील दुःख, अशांतता, ताणतणाव यांवर मात करण्यासाठी उपनिषदांतील आत्मज्ञान, समत्वभाव आणि सत्याची शिकवण उपयुक्त ठरते. म्हणूनच उपनिषदे ही कालातीत, सार्वकालिक आणि सार्वभौम अशी ज्ञानपरंपरा मानली जाते.

५.१.३ महाकाव्य

महाकाव्य हे संस्कृत आणि इतर भारतीय भाषांतील एक प्रमुख काव्यप्रकार आहे, जे विशाल कथानक, भव्य शैली आणि महान नायकावर आधारित असते. महाकाव्य म्हणजे सर्गबद्ध, प्रदीर्घ काव्य ज्यात ऐतिहासिक, पौराणिक किंवा लोकप्रसिद्ध कथानक असते आणि ते युगाचे प्रतिबिंब दाखवते.त्यात धीरोदात्त नायक, चतुर चरित्रे आणि सर्व रसांचा समावेश होतो, ज्यामुळे ते महान उद्देश्यपूर्ण आणि गरिमामय होते. संस्कृतमधील रामायण (वाल्मीकी), महाभारत (व्यास); मराठीत ज्ञानेश्वरीसारखी ग्रंथही महाकाव्य म्हणून ओळखली जातात. हे काव्य युग-चित्रण, संस्कृती आणि नैतिक मूल्ये उजागर करतात. महाकाव्याची कथा साधारणपणे राजा, नायक, देव, ऋषी किंवा महान व्यक्तिमत्त्वांभोवती फिरते. त्यामध्ये जीवनमूल्ये, धर्म-अधर्माचा संघर्ष, कर्तव्य, त्याग, शौर्य, प्रेम, करुणा, नीति आणि तत्त्वज्ञान यांचा सखोल विचार आढळतो. महाकाव्य हे केवळ मनोरंजन न करता मानवाला योग्य जीवनमार्ग दाखवणारे साहित्य असते.भारतीय साहित्यातील दोन सर्वात प्रसिद्ध महाकाव्ये म्हणजे महाभारत आणि रामायण.

महाभारतामध्ये कौरव–पांडव संघर्षाच्या माध्यमातून धर्म-अधर्माचा सखोल विचार मांडलेला आहे, तर रामायणात श्रीरामाचे आदर्श जीवन, कर्तव्यनिष्ठा आणि आदर्श राज्यव्यवस्था यांचे चित्रण आढळते.

महाकाव्यांचा प्रभाव केवळ संस्कृतपुरता मर्यादित न राहता मराठी, हिंदी, कन्नड, तमिळ अशा अनेक भाषांतील साहित्य, नाट्य, काव्य आणि लोककला यांवर पडलेला दिसतो. संतसाहित्य, भक्तीपरंपरा आणि लोकसंस्कृतीमध्येही महाकाव्यांची मूल्ये खोलवर रुजलेली आहेत.

५.१.३.१ रामायण

रामायण हा ग्रंथ हजारो वर्ष जूना असून लोक परंपरेत व लोक कलेत रामायणाला महत्वाचे स्थान आहे. रामायण हे संस्कृत भाषेतील महाकाव्य आहे ज्याची रचना महर्षी वाल्मिकी यांनी केली आहे. रामाच्या जीवनकथा, धर्म, मर्यादा आणि बुराईवर चांगलेपणाचा विजयावर आधारित आहे. रामायणात २४००० श्लोक आणि ७ कांड आहेत. बालकांड, अयोध्याकांड, अरण्यकांड, किष्किंधाकांड, सुंदरकांड, युद्धकांड आणि उत्तरकांड प्रत्येक कांडात रामाच्या वनवासापासून तर रावण वधापर्यंतची घटना वर्णन केली आहे.

५.१.३.२ महाभारत

महाभारत हे महर्षी वेदव्यासमुनीं यांनी रचना केली आहे. हे संस्कृत भाषेतील जगातील सर्वात मोठे महाकाव्य आहे, ज्यात कौरव-पांडवांमधील कुरुक्षेत्र युद्धाचे वर्णन आहे. महाभारतात

१८ पर्वे आणि सुमारे १ लाख श्लोक आहेत, ज्यात भीष्मपर्वातील भगवद्गीता हा प्रमुख भाग आहे. ते इतिहास, धर्म, नीती आणि दर्शनाचे भंडार आहे.

५.१.४ पौरणिक वाङ्मय

पौराणिक वाङ्मय हे भारतीय संस्कृतीचे, धर्माचे आणि लोकजीवनाचे अत्यंत महत्त्वाचे साहित्य आहे. वेद व उपनिषदांतील गूढ तत्त्वज्ञान सामान्य जनतेपर्यंत सोप्या, कथात्मक व रसपूर्ण भाषेत पोहोचवण्याचे कार्य पौराणिक वाङ्मयाने केले.पुराण या शब्दाचा अर्थ प्राचीन कथा किंवा पूर्वकालीन आख्याने असा होतो.

पौराणिक वाङ्मय म्हणजे देव, ऋषी, राजे, अवतार, सृष्टीनिर्मिती, वंशपरंपरा आणि धर्मकथा यांचे कथारूप साहित्य.

पुराणांमध्ये साधारणपणे पाच विषय असतात:

निसर्ग – सृष्टीनिर्मिती

प्रतिसर्ग – प्रलयानंतरची पुनर्निर्मिती

वंश – देव, ऋषी व राजवंश

मन्वंतर – मनूंचे कालखंड

वंशानुचरित – राजांची चरित्रे

परंपरेनुसार १८ महापुराणे मानली जातात. त्यांपैकी काही प्रमुख पुराणे:

- विष्णुपुराण – विष्णूभक्ती व अवतारतत्त्व
- शिवपुराण – शैव परंपरा
- भागवतपुराण – भक्ती, कृष्णलीला
- ब्रह्मपुराण
- देवीभागवतपुराण

यांशिवाय काही उपपुराणेही आहेत.

५.१.५ बौद्ध वाङ्मय

बौद्ध धर्माने भारतीय संस्कृतीला दिलेली सर्वात मोठी देणगी म्हणजे संस्कृती, पाली, पाकृत व तिबेटी भाषेतील बौद्ध साहित्य होय या बौद्ध साहित्यात केवळ बौद्ध धर्माचे तत्वज्ञान नाही तर त्या काळातील सामाजिक धार्मिक आणि अध्यात्मिक परिस्थितीचे वर्णन आढळते त्यामुळे बौद्ध साहित्य हे भारतीय इतिहास व संस्कृतीचे महत्त्वाचे साधन आहे. पाली व संस्कृत भाषेतील

महाकाव्य, जीवन चरित्र व ऐतिहासिक ग्रंथ स्वरूपात आहे. बुद्ध चरित्र, सारीपुत्र प्रकरण, मंजुश्री कुलकल्प, दिव्या अवधान, ललित विस्तार, मिलिंद पन्नू आणि सदधर्म पुंडीक याशिवाय अनेक प्रकारचे बौद्ध साहित्य भरपूर प्रमाणात तयार झाली आहे.

५.१.५.१ बौद्ध साहित्यातील त्रिपिटके

त्रिपिटक हा बौद्ध धम्म ग्रंथांचा समुह असून बौद्ध संप्रदायातील महायान, थेरवाद, वज्रयान, मुलसर्वांस्तिवाद असे सर्वच ग्रंथास प्रमाण मानतात. हे बौद्ध धम्माचे सर्वात प्राचीन ग्रंथ असून यात भगवान गौतम बुद्धांचे उपदेश संग्रहित केलेले आहेत. हे ग्रंथ मूळ पाली भाषेत लिहिले होते व नंतर अनेक भाषेत त्याचा अनुवाद केला गेला. त्रिपिटक हा शब्द मूळ पाली भाषेतील तीपिटक म्हणजे तीन पेटारे या शब्दां पासून बनलेला आहे.

भगवान गौतम बुध्दाला बोधी प्राप्त झाल्यापासून तर त्याच्या महापरिनिर्वाणा पर्यंत बुध्दाने दिलेल्या प्रवचनांचा संग्रह या ग्रंथात आहे. त्रिपिटक निर्मीतीचा काळ इ.स पहिले शतक ते तिसरे शतक मानला जातो. याचा काहीभाग सिंहल देशात म्हणजे आजच्या श्रीलंकेत लिहिला गेला होता.

बौद्ध साहित्य जाणून घेण्यासाठी तीन पिटके आहेत. यालाच त्रिपिटक असे म्हणतात. विनयपिटक, सूत्रपिटक व अभी धम्मपिठक ही त्रिपटके पाली भाषेत लिहिली गेली आहेत. या त्रिपीकावरूनच गौतम बुद्धाच्या धार्मिक उपदेशाची आपणास मदत होते या त्रिपीटक ग्रंथांचा अर्थ पेटी असा होतो. किंवा ग्रंथांचा पेटारा असे म्हणतात. त्रिपटक ग्रंथांची माहिती खालील प्रमाणे आहे.

२) विनयपिटक

विनय पिटकात भिक्कुंसाठी अनुशासनाचे नियम दिलेले आहेत. मठात निवासी असलेल्या भिक्खू आणि भिक्खुणींच्या आचरणासाठी यात सूचना दिलेल्या आहेत तसेच विनय पिटकापूर्वी भिक्खू आणि भिक्खुणी यांच्या राहणीमाना संबंधी कथा सांगितल्या आहेत. विनय पिटकात ५ संग्रह आहेत. महावग्ग, चुलवग्ग, पराजिका, पचीतीया, व परिवार असे हे पाच संग्रह आहेत.

बौद्ध साहित्यात त्रिपिटकामध्ये विनयपीटक या ग्रंथास अग्रगण्य स्थान आहे हा ग्रंथ त्रिपीटकांच्या अगोदर रचला गेला असावा असे मानले जाते.

२) सूक्तपिटक

बौध्द साहित्यामध्ये अत्यंत महत्वाचा मानला जाणारा ग्रंथ म्हणजे सुत्तपिटीका हा होय. सुत्त म्हणजे उपदेश, नीतिशास्त्र, तत्वज्ञान, विपश्यना व परिपूर्ण जीवन व्यतीत करण्यासाठी

व्यावहारिक मार्गदर्शन यावरील सामान्य प्रवचने व त्यांचे विश्लेषण या स्वरूपात सुत्त पिटकाची मांडणी केलेली आहे. एखाद्या व्यक्तीने सांसारिक जीवनात गुंतलेले असूनही प्रपंचातून कसे मुक्त होता येईल यावर सुत्त पिटकात भाष्य केलेले आहे. दीघनिकाय, मज्झीम निकाय, संयुक्त निकाय, हा मध्यम सूत्रांचा संग्रह आहे. मज्झीम म्हणजे मध्यम मज्झीम निकाय हा मध्यम सूत्रांचा संग्रह आहे. संयुक्त निकायात अष्टांग मार्गाचा उपदेश केला असून धम्म चक्र प्रवर्तन हा संयुक्त पिटकाचा एक भाग आहे. अंगुत्तर निकायात १५ पोटविभाग आहेत. प्रथम चारही निकाय बुद्धाचा उपदेश संभाषणाच्या स्वरूपात असून केवळ पाचवे खुद्दकनिकायाची रचना काव्यात्म शैलीत केलेली आहे.

३) अभीधम्मपिटक

अभिधम्मपिटकाची रचना सम्राट अशोकाच्या शासन काळात पाटलीपुत्र येथे आयोजित तिसर्या बौध्द संगीताच्या परिषदेत केली गेली. मोगलीपुत्त तिस्साने अभिधम्मपिटकाची रचना केली. यात मन, चेतना आणि इंद्रियांच्या कार्यावरील प्रवचनांचा समावेश आहे. मन आणि स्थुल पदार्थ यांचे अंतीम तत्वां सहित सूक्ष्म विशेषण यात केले आहेत. त्यामुळे मानस शास्त्रावरील प्राचीन ग्रंथ म्हणूनही अभीधम्मपिटकाचा समावेश केला जातो. मानसिक आधारावर दुःखाचे निराकरण कसे होईल व त्यातून मुक्त कसे होता येईल यावर अभिधम्मपिटकात उपदेश केला आहे. यात शिक्षणाच्या उच्च स्तरावर चर्चा केलेली आढळते." [१]

५.१.५.२ जातक कथा

जातक कथा या बौद्ध साहित्याचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहेत. या कथांमधून भगवान बुद्धांच्या पूर्वजन्मांची (पूर्वावतारांची) माहिती मिळते. या कथा केवळ धार्मिक नसून नैतिक, सामाजिक व शैक्षणिक मूल्यांनी परिपूर्ण आहेत. लोकजीवनात सदाचार, करुणा, त्याग, सत्य, संयम आणि मैत्री यांचे महत्त्व या कथांद्वारे सहजपणे पटवून दिले जाते.

जातक कथांचा अर्थ

'जातक' हा शब्द जन्म या अर्थाने वापरला जातो. भगवान बुद्धांनी ज्ञानप्राप्तीपूर्वी अनेक जन्म घेतले, असे बौद्ध परंपरेत मानले जाते. त्या प्रत्येक जन्मातील अनुभव, आचार-विचार आणि शिकवण या कथांमधून सांगितली जाते. बुद्ध कधी राजा, कधी मंत्री, कधी व्यापारी, कधी प्राणी (हत्ती, सिंह, ससा इ.) रूपात जन्मलेले दाखवले आहेत.

जातक कथांचा उगम व परंपरा

जातक कथा मूळ पाली भाषेत लिहिल्या गेल्या असून त्या त्रिपिटक या बौद्ध ग्रंथसंग्रहाचा भाग आहेत. एकूण सुमारे ५४७ जातक कथा प्रसिद्ध आहेत. या कथांचा प्रसार भारताबरोबरच श्रीलंका, थायलंड, म्यानमार, चीन, जपान आदी देशांमध्ये झाला. अजिंठा लेण्यांतील भित्तिचित्रांमध्ये अनेक जातक कथांचे सुंदर चित्रण आढळते.

जातक कथांचे स्वरूप

प्रत्येक जातक कथेत साधारणपणे तीन भाग असतात:

- **वर्तमानकथा** – बुद्धांच्या काळातील एखादी घटना
- **अतीतकथा** – बुद्धांच्या पूर्वजन्माची गोष्ट
- **नीतिशिक्षण** – त्या कथेतील बोध किंवा संदेश

या रचनेमुळे कथा समजायला सोपी आणि प्रभावी ठरते.

जातक कथांचे प्रमुख विषय

- **दया व करुणा**
- **सत्य व प्रामाणिकपणा**
- **त्याग व परोपकार**
- **मैत्री व सहकार्य**
- **लोभ, क्रोध, अहंकार यांचे दुष्परिणाम**

उदा. ससा जातक कथेत दानशीलतेचा संदेश, हत्ती जातक कथेत संयम व कर्तव्यनिष्ठा, तर सिंह-कोल्हा जातक कथेत चातुर्य व सावधपणा शिकवला जातो.

जातक कथांचे साहित्यिक व सांस्कृतिक महत्त्व

जातक कथांचा प्रभाव केवळ बौद्ध धर्मापुरता मर्यादित नाही. भारतीय लोककथा, पंचतंत्र, हितोपदेश यांवरही या कथांचा प्रभाव दिसून येतो. लहान मुलांच्या नैतिक शिक्षणासाठी या कथा आजही शालेय अभ्यासक्रमात वाचनासाठी दिल्या जातात. नाट्य, चित्रकला, शिल्पकला आणि कथाकथन परंपरेतही जातक कथांचे स्थान महत्त्वाचे आहे.

१. शोकापासून निवृत्त करण्याचा उपाय

बोधिसत्त्व एका शेतकऱ्याच्या कुळात जन्माला आला होता. तो एकुलता एक असल्यामुळे घरातील सर्व माणसांचे त्यांच्यावर अत्यंत प्रेम होते. तो सुजात या नावाने गावात प्रसिद्ध होता.

सुजात सोळा वर्षांचा झाला नाही तोच त्याचा आजा मरण पावला, त्यामुळे बापाला अत्यंत शोक झाला. आज्याचे दहन करून त्यांचे शरीरावशेष सुजाताच्या बापाने आपल्या शेतात पुरले व त्यावर एक थडगे बांधले. सकाळी-संध्याकाळी तेथे जाऊन तो शोक करीत असे व त्यामुळे त्याला आपला व्यवहार पाहण्यास सवड सापडत नसे आणि दिवसेंदिवस त्याच्या शरीरावर शोकाचा परिणाम स्पष्ट दिसू लागला. सुजाताला आपल्या पित्याच्या वर्तनाबद्दल फार वाईट वाटले आणि त्याला कसे सुधारावे या विवंचनेत तो पडला. अशा स्थितीत असताना गावाबाहेर एक बैल मरून पडलेला त्याला दिसला. तेव्हा एक पाण्याचे भांडे आणि दोन गवताच्या पेंढ्या घेऊन तो त्या बैलाजवळ गेला आणि त्याला कुरवाळून म्हणाला, "बा बैला, उठ. हे पाणी पी व हे गवत खा."

अशा रितीने बैलाशी चाललेले सुजाताचे बोलणे ऐकून तिकडून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांनी ऐकले आणि त्याला तेथे शोकाकुल होऊन बसलेला पाहून ते म्हणाले, "बा सुजाता, तू आमच्या गावातील मुलात शहाणा मुलगा आहेस अशी आमची समजूत होती; परंतु हा काय मूर्खपणा चालविला आहेस ! मेलेल्या बैलाला गवत पाणी देऊन उठावयास काय सांगतोस ! चल आमच्याबरोबर घरी."

पण सुजाताने त्याचे बोलणे न ऐकता बैलाला पाणी पी, आणि गवत खा. असे बोलून गोंजारण्याचा व तो उठत नाही याबद्दल शोक करण्याचा प्रकार तसाच चालू ठेवला. शेतकऱ्यानी जाऊन त्याच्या बापाला मुलाला वेड लागले आहे व तो मेलेल्या बैलाशी असे असे बरळत बसला आहे वगैरे सर्व वर्तमान सांगितले. ते कानी पडताच त्याचा पितृशोक मावळला व पुत्रशोकाचा उदय झाला. बाप गेला तो काही परत येत नाह परंतु जिवंत असलेल्या मुलाची अशी दशा झाली, हे ऐकून त्याची कबर पुरी खचली. बिचारा तसाच धावत धावत मुलाजवळ गेला आणि त्याला म्हणाला, "बाळा! हा प्रकार तू काय चालवला आहेस ? मेलेल्या बैलाल पाणी देऊन आणि गवत घालून जिवंत कसे करता येईल? तू एवढ शहाणा असून तुला ही अक्कल असू नये? तुझ्यावर प्रपंचाचा काहीच भार पडला नसता तू एकाएकी असा वेडा कसा झालास?"

सुजात म्हणाला, "बाबा, मी वेडा आहे की, तुम्ही वेडे आहात हे पहिल्याने सांगा."

त्यावर त्याचा पिता अत्यंत निराश होऊन म्हणाला, "अरेरे, तू अगदीच बिघडलास असे दिसते. माझा तू आजन्मात असा उपमर्द केला नाहीस. पण आज स्वतः वेडगळपणा करीत असता मलाच वेडा म्हणावयास लागलास !"

सुजात म्हणाला, "पण बाबा असे रागावू नका. या बैलाचे डोळे, पाय, शेपटी, तोंड, नाक इत्यादी सर्व अवयव जसेच्या तसे आहेत. कावळ्यांनी किंवा कुत्र्यांनी त्याला कोठेही जखम केलेली नाही. तेव्हा हा बैल पाणी वगैरे पाजले असता उठून उभा राहील अशी मला आशा वाटते; पण आमच्या

आजोबाना जाळून त्यांच्या अस्थि तुम्ही थडग्यांत पुरून ठेवल्या व त्या थडग्याजवळ जाऊन सकाळ संध्याकाळ शोक करीत असता तो का ? आजोबांच्या जळक्या अस्थीतून ते पुनः अवतरतील असे तुम्हास वाटत आहे काय ? संबंध शरीर कायम असलेल्या बैलाबद्दल शोक करणारा मी वेडा, की ज्याला केवळ जळलेल्या अस्थी शिल्लक राहिल्या आहेत अशा आमच्या आजोबांबद्दल शोक करणारे तुम्ही वेडे, हे मला प्रथमतः सांगा."

हे सुजाताचे शहाणपणाचे बोलणे ऐकून त्याचा पिता चकित झाला व म्हणाला, "बाबा रे, मीच तुझ्यापेक्षा जास्त वेडा आहे, यात शंका नाही! मृत मनुष्याबद्दल शोक करणे व्यर्थ आहे हे दाखविण्यासाठी तू जो उपाय केला तो स्तुत्य आहे; आणि आजपासून माझ्या पित्याचा शोक सोडून देऊन मी माझ्या कर्तव्याला लागेन. तुझ्यासारखा पुत्र आमच्या कुळात जन्मला याचे मला भूषण वाटते" [२]

२. शुभ्र वस्त्राला डाग शोभत नाही

एका जन्मी बोधिसत्त्व व्यक्ती होऊन वयात आल्यावर परिव्राजकवेषाने अरण्यात राहत असे. तेथे एका तलावात सुंदर कमळे होती. एके दिवशी एक जटिल तापस त्या तलावात स्नानासाठी आला होता. त्याने कमळाचे झाड मुळासकट उपटून टाकले व पुष्कळ कमळे तोडून त्याची माळ करून गळ्यात घालून निघाला. त्यावेळी बोधिसत्त्वही स्नानासाठी तेथे आला होता. तो मनात म्हणाला, "काय हा अधम तपस्वी या सुंदर कमळांचे त्याने अशी नासाडी करून टाकली बरे ! आहा ! किती तरी सुशोभित कमळे ही! आणि यांच्या शोभेला अनुरुप सुगंधही असला पाहिजे."

असे उद्‌गार काढून तो त्या सरोवरात उतरला आणि एक कमळ वाकवून हळूच त्याचा वास घेऊ लागला. हे त्याचे कृत्य पाहून तलावाच्या काठी राहणारी वनदेवता त्याला म्हणाली, "हे परिव्राजक, हे तू काय चालविले आहेस? हे कमळ तुला कोणीही न देता याचा तू वास घेत आहेस, ही एक प्रकारची चोरी नव्हे काय ? मी तर तुला सुगंधाचा चोर असे म्हणते."

बोधिसत्त्वाला देवतेचे भाषण ऐकून फारच आश्चर्य वाटले. आणि तो म्हणाला, "नुकत्याच आलेल्या जटिलाने कमळाचे झाड उपटून टाकते, कमळे तोडून नेली आणि सर्व प्रकारे या तलावाच्या शोभेची हानी केली. असे असतानाही तू त्याला एक शब्द देखील बोलली नाहीस ! परंतु मला मात्र उपदेश करावयास पुढे सरसावलीस. हे मोठे आश्चर्य नव्हे काय?"

देवता म्हणाली, "तुला त्या जटिलाचा इतिहास माहीत नाही. पापकर्मांनी याचे अंतःकरण इतके मलिन झाले आहे की, या त्याच्या यःकश्चित कृत्याने त्यावर आणखी डाग पडण्यास जागा राहिली नाही. मुलांना सांभाळणाऱ्या दाईचे लुगडे जसे घाणेरडे असते तसा तो घाणेरडा आहे. याला मी

काय सांगणार? परंतु तुला उपदेश करणे योग्य आहे असे मला वाटते. कारण तुझे वर्तन शुद्ध आहे. आणि त्यावर या अत्यल्प पापकर्माचा डाग शोभत नाही, जो मनुष्य आजन्म सदाचरण करतो त्यावर केसाएवढा देखील दुराचरणाचा डाग पडलेला एकदम लोकांच्या नजरेस येतो. म्हणून तुला सावध करण्यासाठी आणि अशा लहानसहान पापांपासून निवृत्त करण्यासाठी मी तुला उपदेश करीत आहे."

हे त्या देवतेचे भाषण ऐकून बोधिसत्त्व फारच ओशाळला आणि म्हणाला, "हे वनदेवते ! मला ओळखून माझा दोष तू वेळीच दाखवून दिला आहेस. तेव्हा तुला माझी अशी विनंती आहे की, पुन्हा माझ्या हातून असे कृत्य घडले तर मला सांगत जा."

देवता म्हणाली, "हे परिव्राजका ! मी काही तुझी दासी नाही किंवा वेतन घेऊन काम करणारी मोलकरीणही नाही, तेव्हा तुझ्या बरोबर फिरत राहून तुझे दोष दाखवण्याचे मला काय प्रयोजन बरे ? जेणेकरून सद्गतीला जाशील असा मार्ग तुझा तूच शोधून काढला पाहिजेस. दुसरा तुला उपदेश करील आणि तू सन्मार्गाला जाशील याची वाट पाहत बसू नकोस!"

बोधिसत्त्वाने देवतेचे आभार मानल्यावर ती तेथेच अंतर्धान पावली. आपल्या शुद्धाचरणावर पापाचा डाग पडू नये, याबद्दल बोधिसत्त्वाने शेवटपर्यंत फार काळजी घेतली."[३]

५.१.५.३ थेरी गाथा

'थेरी' म्हणजे स्थविरा (ज्ञानी) स्त्री, आणि 'गाथा' म्हणजे गाणे किंवा काव्य. हा पाली भाषेतील ५२२ लहान कवितांचा संग्रह आहे, ज्यात भिक्खुणींनी ध्यान आणि साधनेतून मिळवलेले ज्ञान व्यक्त केले आहे.

१) वासेट्ठी

वासेट्ठी वैशालीतील एका प्रतिष्ठित कुटुंबात वासेट्ठीचा जन्म झाला. वयात आल्यावर कुलीन तरुणाशी हिचा विवाह झाला. वैवाहिक जीवन सुखाने घालवीत असताना सुंदर पुत्राला जन्म दिला. परंतु मुलगा जास्त दिवस जगला नाही. अगदी लहान वयात मरण पावला. पुत्राच्या शोकाने ती वेडी झाली. नवरा व इतर नातलगांनी समजाविण्याचा खूप प्रयत्न केला. तिच्यावर उपचार केले. परंतु एके दिवशी ती घरातून पळून गेली. ठिकठिकाणी भटकत भटकत ती मिथिला नगरीत आली, त्यावेळी भगवान बुद्ध मिथिला नगरीत विहार करीत होते. वासेट्ठी रस्त्यात भटकत असतांना तिने इंद्रियांचे दमन केलेल्या व शांत असलेल्या भगवान बुद्धाला रस्त्याने चालतांना पाहिले. त्यांच्या व्यक्तित्वाचा वासेट्ठीवर परिणाम होऊन ती पूर्व स्थित्तीत आली. तेव्हा भगवंतांनी तिला संक्षिप्त धम्मोपदेश दिला. संघात प्रवेश मिळण्यासाठी वासेट्ठीने भगवंतांची याचना केली. ती

प्रव्रजित झाली. परिश्रमपूर्वक साधना करीत वासेट्ठीने अल्पावधीत दिव्यज्ञानाचा लाभ करून घेतला. आपला अनुभव कथन करतांना ती गाते :-

"पुत्र-शोकाने पीडित, विक्षिप्त चित्त, विमनस्क, नग्न आणि केस अस्ताव्यस्त झालेली मी इकडे तिकडे भटकत होते. ॥१३३॥

कधी रस्त्यात, कधी कचऱ्याच्या ढिगावर, कधी स्मशानात, तर कधी राजमार्गावर भूक व तहानेने व्याकुळ होऊन मी तीन वर्षे भटकत होते. ॥१३४॥

नंतर मिथिला नगरीत रस्त्याने जात असलेल्या, दमन न झालेल्यांचे दमन करणाऱ्या, निर्भय व सम्बुद्ध अशा भगवान सुगताला पाहिले. ॥१३५॥

चित्ताची मूळ प्रकृति प्राप्त होऊन व वन्दन करून मी त्यांच्याजवळ बसले. त्या भगवान गौतमाने माझ्यावर अनुकम्पा करून धम्माचा उपदेश केला. ॥१३६॥

त्यांचा धम्म ऐकून मी बेघर होऊन प्रव्रजित झाले. शास्त्याच्या वचनाप्रमाणे प्रयत्न करीत मी मंगलमयपदाचा (निव्वाणाचा) साक्षात्कार केला. ॥१३७॥

माझे सर्व शोक नष्ट झाले. (ह्या अर्हत्त्वामध्येच) त्यांचा अंत असल्याकारणाने ते सर्व सुटले. कारण जेथून शोक उत्पन्न होतो ते मूळ स्थानच मी जाणले आहे."॥१३८॥[४]

२) सुजाता

साकेत नगरीमध्ये व्यापाऱ्याच्या कुळात हिचा जन्म झाला होता. एका व्यापाऱ्याच्या मुलाबरोबर सुजाताचा विवाह झाला होता. वैवाहिक जीवन आनंदात जात होते. एके दिवशी ती उद्यानात गेली. दिवसभर उद्यानात राहून घरी परत येतांना अंजनवनात शास्त्याचे दर्शन झाले. त्यांच्या दर्शनाने चित्त प्रसन्न झाल्यामुळे ती त्यांच्याजवळ जाऊन व वंदन करून एका बाजूला बसली. शास्त्याने तिला धम्मोपदेश केला. तेथेच तिला दिव्यज्ञानाचा साक्षात्कार झाला. तेथून ती घरी परतली. पतीची व आई-वडिलांची परवानगी मागून भिक्खुणींच्या जवळ प्रव्रजित झाली. आपला अनुभव सांगतांना ती म्हणते :-

अलंकृत, सुंदर वस्त्र परिधान करून, माळा घालून, शरीराला चंदनाचा लेप लावून, सर्व दागदागिने अंगावर घालून, पुष्कळ अन्नपाणी, खाद्यपदार्थ व भोजन घेऊन दासींसह घराबाहेर पडून उद्यानात गेले. ॥१४५-१४६॥

तेथे क्रीडा करून व रममाण होऊन स्वतःच्या घरी परत येतांना एक विहार पाहिला. आणि साकेतातील त्या अंजनवनात प्रवेश केला. ॥१४७॥

तेथे लोक-प्रद्योत भगवान बुद्धाला पाहून, वंदन करून त्यांच्याजवळ बसले. त्या चक्षुमान सम्बुद्धाने माझ्यावर अनुकंपा करून मला धम्मोपदेश केला. ॥१४८॥

महर्षीचा उपदेश ऐकून मी सत्याचा साक्षात्कार केला. तेथेच मी विमल धम्म असे अमृत-पद (निब्बाण) प्राप्त केले. ॥१४९॥

त्यानंतर सद्धम्माचे ज्ञान झाल्यावर मी बेघर करणारी प्रव्रज्या घेतली. तीन विद्या प्राप्त केल्या (त्यामुळे) बुद्धशासन सफल झाले आहे. ॥१५०॥

५.१.६ जैन वाङ्मय

जैन धर्मीयांनी संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश तसेच तमिळ, कन्नड इ. प्राचीन व देशी भाषांतून विपुल साहित्यनिर्मिती करून साहित्याच्या प्रत्येक विभागात मोलाची भर घातलेली आहे. आगम, पुराणे, तत्त्वज्ञान, कर्मसिद्धांत, आचार इ. विषय तसेच कथा, काव्य, स्तुती, व्याकरण, छंद, कोश इ. वाङ्मयप्रकार त्यांनी हाताळलेले आहेत. जैनांचे मूळ आगमवाङ्मय अर्धमागधी व शौरसेनी या प्राकृत भाषांत आहे. नंतर त्यांनी आपल्या मौलिक वाङ्मयासाठी व टीका लिहिण्यासाठी संस्कृत भाषेचाही उपयोग केला. अपभ्रंश भाषेतही महापुराण, चरित्रे, कथा इ. प्रकारांतील वाङ्मय त्यांनी निर्माण केले आहे. प्राकृत भाषेतील त्यांचे कथावाङ्मय तर विपुल व विशेष समृद्ध आहे. यांशिवाय हिंदी. गुजराती, तमिळ, कन्नड या प्रादेशिक भाषांतूनही मोलाचे वाङ्मय त्यांनी निर्माण केले आहे. त्याचप्रमाणे आगमग्रंथांवरील जैनांचे विपुल टीकावाङ्मय निर्युक्ती, भाष्य, चूर्णी आणि टीका या स्वरूपात उपलब्ध आहे. महावीरांनी अर्धमागधी या लोकभाषेतून आपल्या धर्माचा उपदेश केला. त्यांच्या प्रमुख शिष्यांनी (गणधरांनी) तो उपदेश सूत्ररूपाने ग्रथित केला. गणधरांनंतर झालेल्या त्यांच्या शिष्यांनी व अनेक आचार्यांनीही मूळ धार्मिक वाङ्मयाला अनुलक्षून त्यातील विषय स्पष्ट करण्यासाठी इतर साहित्य निर्माण केले.

जैन लोक असे समजतात, की महावीरांपूर्वी एवढेच नव्हे, तर अगदी पहिल्या तीर्थकरांपासून चौदा 'पूर्वग्रंथ' व अकरा 'अंगग्रंथ' अस्तित्वात होते परंतु या म्हणण्याला काही पुरावा नाही. महावीरांच्या वेळेपासून मात्र पूर्वग्रंथ होते व महावीर ते गणधरांना शिकवीत असत, यासंबंधी उल्लेख मिळतात. शिवाय चौदा पूर्व जाणणारे जे विद्वान आचार्य होऊन गेले, त्यांना 'चउद्दसपुव्वी' (चतुर्दशपूर्विन्) म्हणत. त्यांच्या नावांची यादीही उपलब्ध आहे. महावीरांनंतर असे आठ चउद्दसपुव्वी होऊन गेले. त्यांपैकी भद्रबाहू हे शेवटचे. त्यानंतर सात आचार्यांना दहा पूर्वांचे ज्ञान होते आणि महावीरांनंतर ९८० वर्षांनी पूर्वग्रंथांचे ज्ञान लुप्त झाले.

चौदा 'पूर्व' म्हणजे जैन आगमांचा सर्वांत प्राचीन भाग होय. तो भाग अस्तित्वात असतानाच गणधरांनी अकरा अंगांची रचना केलेली होती. कालांतराने चौदा पूर्वांचा समावेश दिट्ठिवाय (दृष्टिवाद) नावाच्या बाराव्या अंगात केलेला होता. चौदा पूर्व नष्ट झालेले असले, तरी त्यांत काय विषय आले असावेत, याची कल्पना दुसऱ्या आगमग्रंथात दिलेल्या त्यांच्या विषयसूचीवरून करता येते. अंगग्रंथांचीही संख्या प्रथम बारा होती परंतु दिट्ठिवाय नावाचा बारावा अंगग्रंथ महावीरांनंतर दोन शतकांतच नाहीसा झाला.

महावीरांच्या प्रमुख शिष्यांनी आणि त्यांच्यानंतर झालेल्या अनेक आचार्यांनी जे साहित्य निर्माण केले त्याचे (१) अंगप्रविष्ट व (२) अंगबाह्य असे भाग करण्यात येतात. पहिल्या भागामध्ये बारा अंगांचा समावेश होतो व दुसऱ्या भागामध्ये सामायिक, चतुर्विंशतिस्तव इ. चौदा ग्रंथांचा समावेश होतो परंतु दिगंबर जैनांच्या मतानुसार मात्र हे सर्व ग्रंथ क्रमाक्रमाने नष्ट झालेले आहेत. निदान मूळ स्वरूपात तरी ते आता उपलब्ध नाहीत.

५.१.६.१ जैन वाङ्मयातील ग्रंथ संपदा

जैन वाङ्मयातील ग्रंथ संपदा खालील प्रमाणे

१. श्वेतांबरांचे आगमग्रंथ

श्वेतांबरांच्या अर्धमागधी वाङ्मयाविषयी माहिती देण्यापूर्वी प्रचलित वाङ्मय केव्हा निर्माण झाले, याविषयी थोडी चर्चा करणे उपयुक्त ठरेल. इ.स. पू. ३०० च्या सुमारास पाटलिपुत्र येथे व इ. स. ३१३ च्या सुमारास मथुरा येथे परिषद भरवून आगमग्रंथ एकत्रित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पुढे इ. स. पू. ४५४ मध्ये वलभी (सौराष्ट्र) येथे भरलेल्या परिषदेत देवर्धिगणी क्षमाश्रमण यांच्या अध्यक्षतेखाली श्वेतांबर सिद्धांतांचे (आगमांचे) पुस्तकारोहण करण्यात आले. आगमग्रंथांची जुळवाजुळव करणे आणि त्या ग्रंथांच्या अनेक प्रती काढणे, ही महत्त्वाची कामगिरी देवर्धिगणीने केली. उपलब्ध श्रुताला त्यांनी व्यवस्थित रूप दिले. महावीरनिर्वाणानंतर ९८० वर्षांनी हे पुस्तकारोहण झाले. या दीर्घ कालावधीत आगमग्रंथांच्या भाषेमध्ये फरक पडणे अनिवार्य होते. शिवाय आगमांतील सर्व ग्रंथांची रचना एके काळी आणि एका व्यक्तीकडून झालेली नाही. आगमांतील सर्वांत जुना भाग आणि नवीन भाग यांच्या भाषेतील फरक स्पष्टपणे दिसून येतो. वलभीपरिषदेत देवर्धिगणींच्या देखरेखीखाली पुस्तकारोहण झाल्यानंतर मात्र आगमग्रंथांच्या भाषेचे नूतनीकरण थांबले आणि ते ग्रंथ त्याच रूपात आजपर्यंत टिकून राहिले.

चंद्रगुप्त मौर्य राज्य करीत असता (कार. ३२४–३०० इ.स.पू.) मगध देशात भयंकर दुष्काळ पडला. त्या वेळी भद्रबाहू आचार्य दक्षिणेत गेले आणि स्थूलभद्र तेथे राहिलेल्या साधूंचे प्रमुख

आचार्य झाले. स्थूलभद्रांनी पाटलिपुत्र येथे एक परिषद बोलाविली (इ.स.पू.सु. ३००) आणि लुप्तप्राय झालेले अकरा अंगग्रंथ एकत्र आणण्यात आले. आज प्रचलित असलेल्या श्वेतांबर अर्धमागधी आगमांमध्ये ग्रीक खगोलशास्त्रातील कल्पना आढळून येत नाहीत. आगमग्रंथांची भाषा, वृत्ते आणि खगोलशास्त्रीय ज्ञान यांचा अभ्यास करून डॉ. याकोबीने या आगमांची (किंवा त्यांच्या प्रमुख भागांची) रचना इ. स. पू. चौथ्या शतकानंतर झालेली असावी, असा तर्क केला आहे.

श्वेतांबरांनी अर्धमागधीतील एकूण ४५ आगम किंवा सिद्धांत प्रमाण मानले आहेत. त्यांपैकी अकरा अंग्रग्रंथ असे : आयारंग (आचारांग), सूयगडंग (सूत्रकृतांग), ठाणंग (स्थानांग), समवायांग, भगवईविहायपण्णत्ति (भगवती व्याख्याप्रज्ञप्ति), णाया धम्मकहाओ (ज्ञातृधर्मकथा), उवासगदसाओ (उपासकदशा), अंतगडदसाओ (अंतकृद्दशा), अणुत्तरोववाइयदसाओ (अनुत्तरोपपातिकदशा), पण्हावागरण (प्रश्नव्याकरण) व विवायसुय (विपाकसूत्र). बारावे दिट्ठिवाय (दृष्टिवाद) हे अंग आज उपलब्ध नाही.

वरील अंगग्रंथांव्यतिरिक्त पुढील अंगबाह्य आगम असे : (१) चौदा पूर्वग्रंथ (लुप्त झालेले). (२) १२ उपांगे : उववाइय-वा ओववाइय (औपपातिक), रायपसेणइय (राजप्रश्नीय), जीवाभिगम, पन्नवणा (प्रज्ञापना), सूरियपण्णत्ति (सूर्यप्रज्ञप्ति), जंबुद्दीवपन्नत्ति (जंबुद्वीपप्रज्ञप्ति), चंदपन्नत्ति (चंद्रप्रज्ञप्ति), निरयावलियाओ (निरयावली), कप्पवडंसियाओ (कल्पावतंसिका), पुप्फिया (पुष्पिका), पुष्फचूलिआओ (पुष्पचूडा) व वण्हिदसाओ (वृष्णिदशा). (३) १० प्रकीर्णके : चउसरण (चतुःशरण), आउरपच्चक्खाण (आतुरप्रत्याख्यान), भत्तपरिण्णा (भक्तपरिज्ञा), संथार (संस्तार), तंदुलवेयालिय (तंदुलवैचारिक), गच्छायार (गच्छाचार) अथवा चंदाविज्झय (चंद्रकवेध्यक), देविंदत्थव (देवेंद्रस्तव), गणिविज्जा (गणिविद्या), महापच्चक्खाण (महाप्रत्याख्यान) व मरणसमाही (मरणसमाधि) अथवा वीरत्थव (वीरस्तव). (४) ६ छेदसूत्रे : निसीह (निशीथ), महानिसीह (महानिशीथ), ववहार (व्यवहार), दसाओ (दशाश्रुतस्कंध) अथवा आयारदसाओ (आचारदशा), बिहक्कप्प (बृहत्कल्प) आणि पंचकप्प (पंचकल्प) वा जीयकप्प (जीतकल्प). (५) ४ मूलसूत्रे : उत्तरज्झयण (उत्तराध्ययन), आवस्सय (आवश्यक), दसवेयालिय (दशवैकालिक) आणि पिंडनिज्जुत्ति (पिंडनिर्युक्ति). शेवटच्या दोन मूलसूत्रांऐवजी ओह निज्जुत्ति (ओघनिर्युक्ति) आणि पक्खियसुत्त (पाक्षिकसूत्र) ही दोन मूलसूत्रे काहींनी मानली आहेत. (६) २ चूलिकासूत्रे : नंदी आणि अणुओगदार (अनुयोगद्वार).

अकरा अंगग्रंथांपैकी तिसरे ठाणंग . त्यात दहा अध्याय असून सात निन्हवांचा (पंथांचा) उल्लेख येतो. चौथ्या समवाय अंगग्रंथांत बारा अंग व चौदा पूर्व यांचे विषय दिले आहेत. पाचव्या भगवईवियाहपण्णत्ति ह्या अंगग्रंथात गोशालाचे चरित्र येते तसेच इतर आगमांचाही उल्लेख सापडतो. त्यात महावीर व त्यांचे अनुयायी यांचीही ऐतिहासिक माहिती आहे.

बारा उपांगांपैकी चौथ्या पन्नवणा उपांगात जीवभेद, कषाय, इंद्रिये, लेश्या इ. विषय वर्णिले आहेत. जंबुद्दीवपन्नत्ति या सहाव्या उपांगात जंबुद्वीपाचे वर्णन, उत्सर्पिणी-अवसर्पिणी कालचक्र, तीर्थंकर इ. विषय आहेत. निरयावलियाओ या आठव्या उपांगात श्रेणिक-बिंबिसार राजाचा बंदिवास व आत्महत्या (वध ?) आणि कूणिक-अजातशत्रू याचे वैशालीचा राजा चेटक याच्याशी युद्ध वर्णिले आहे.

दहा प्रकीर्णकांपैकी भत्तपरिण्णा या तिसऱ्या प्रकीर्णकात भिक्षान्नाची विल्हेवाट (परिज्ञा), इंगितमरण, पादपोपगमन आणि चंचलमनसंयम हे विषय आहेत. संथार या प्रकीर्णकात गवताचे आसन (संस्तार) ग्रहण करण्याचा विधी, पंडितमरणाने सद्गती इ. गोष्टींचे विवरण येते. देविंदत्थव या प्रकीर्णकाचा कर्ता वीरभद्र असून त्यात तीर्थंकर, कल्प व कल्पातीत देव यांचे वर्णन आहे.

सहा छेदसूत्रांपैकी निसीहमध्ये व्रतभंगाबद्दलच्या प्रायश्चित्तांचे नियम दिले आहेत. आयारदसाओ या चौथ्या छेदसूत्राचा आठवा भाग भद्रबाहुकृत कल्पसूत्र म्हणून प्रसिद्ध आहे. कल्पसूत्राचे जिनचरित्र, थेरावली, सामाचारी असे तीन भाग आहेत.

चार मूलसूत्रांपैकी उत्तरज्झयणामध्ये ३६ अध्याय असून त्याचे धर्म, नीती व कथा असे तीन विभाग आहेत. हा ग्रंथ म्हणजे श्रमणकाव्याचा प्राचीन नमुना आहे. चूलिकासूत्रांपैकी अणुओगदार हा ग्रंथ आर्यरक्षिताने रचला आहे [⟶ अर्धमागधी साहित्य].

२ दिगंबरांचे आगमग्रंथ

श्वेतांबरांमध्ये प्रचलित असलेले ४५ आगम दिगंबर पंथीयांना मान्य नाहीत. त्यांच्या मतानुसार प्राचीन आगमवाङ्मयाचा लोप झालेला आहे. गुरुपरंपरेने जे ज्ञान अंशरूपाने काही दिगंबर आचार्यांना अवगत होते, ते त्यांनी शौरसेनी प्राकृतात लिपिबद्ध करून ठेवले [⟶ शौरसेनी साहित्य]. शिवाय जैन तत्त्वज्ञान, कर्मसिद्धांत, न्याय, आचार, चरित्रे इ. विषयांवर दिगंबरांचे संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश या भाषांत विपुल ग्रंथ आहेत.

पुढील दिगंबर आगमांची भाषा शौरसेनी असून त्यांवरील टीका मात्र गद्यपद्यमिश्रित तसेच संस्कृतमिश्रित प्राकृतात आहेत. संस्कृतचाही काहींनी वापर केला आहे. हे पाच आगमग्रंथ असे (१) षट्खंडागम : (दुसरे शतक). ग्रंथकार पुष्पदंत आणि भूतबली. या संप्रदायातील हा प्राचीनतम ग्रंथ आहे. याचे सहा खंड पुढीलप्रमाणे : जीवस्थान, क्षुद्रकबंध, बंधस्वामित्व, विषयवेदना, वर्गाना व महाबंध. या ग्रंथाची समाप्ती 'श्रुतपूजा' नामक उत्सवाने दरसाल ज्येष्ठ शुद्ध पंचमीला साजरी करतात.

(२) कसाय-पाहुड (कषाय-प्राभृत): (दुसरे शतक). कर्ता गुणधर. क्रोध, मान, माया, लोभ या चार कषायांचे वर्णन व ते कर्मबंधाला कसे कारणीभूत होतात, याची या ग्रंथात चर्चा येते.

(३) धवला: (नववे शतक). षट्खंडागमावरील ७२,००० प्राकृत गाथांची (श्लोकांची) ही टीका वीरसेनाने लिहिली. काही ठिकाणी संस्कृतचाही टीकाकाराने वापर केला आहे.

(४) जयधवला: (नववे शतक). कसाय-पाहुडावरील ६०,००० गाथांची ही प्राकृत टीका वीरसेन व जिनसेन यांनी रचली.

(५) महाबंध वा महाधवल: (दुसरे शतक). लेखक भूतबली. षट्खंडागमामधील सहाव्या खंडाचे हे नाव असून त्यात ४०,००० श्लोक आहेत. यात दिगंबरांचे तत्त्वज्ञान आलेले आहे.

३. दिगंबरांचे इतर प्रमाणग्रंथ : गोम्मटसार : (अकरावे शतक)

कर्ता नेमिचंद्र याचे आधार षट्खंडागम व कसाय-पाहुड आहेत. दव्वसंगह (द्रव्यसंग्रह) : हाही नेमिचंद्राचाच ग्रंथ असून यात सहा द्रव्यांचे वर्णन आलेले आहे. पंचसंगह (पंचसंग्रह) : यात पाच अधिकार (प्रकरणे) आहेत – जीवसमास, प्रकृतिसमुत्कीर्तन, कर्मस्तव, शतक व सप्ततिका. कम्मपयडि (कर्मप्रकृति) : (सु. पाचवे शतक). कर्ता शिवशर्मा. बंधन, संक्रमण, उद्वर्तन, अपवर्तन, उदीरणा, उपशमना, उदय व सत्ता या आठ अध्यायांत याची विभागणी केलेली आहे. विशेषणवती : (सहावे शतक). कर्ता जिनभद्र. ४०० गाथा. ज्ञान, दर्शन, जीव, अजीव इत्यादींचे विवेचन यात आले आहे.

४. कुंदकुंदाचार्यांचे आगमग्रंथ

दिगंबर संप्रदायातील कुंदकुंदाचार्यांचे (इ. स. सु. पहिले शतक) स्थान अद्वितीय आहे. दिगंबर जैन साधूंना आपण ⇨कुंदकुंदाचार्यांच्या शाखेतील आहोत असे सांगण्यात अभिमान वाटतो. कुंदकुंदाचार्यांचे प्रमुख ग्रंथ त्यांतील विषयांसह पुढीलप्रमाणे : (१) समयसार : जैन अध्यात्मावरील उत्कृष्ट ग्रंथ. जैनांच्या इतर संप्रदायांतील लोकांनाही हा ग्रंथ मान्य आहे. निश्चय व व्यवहारनयनाच्या दृष्टीने आत्म्याच्या गुणधर्मांचे वर्णन यात येते. (२) प्रवचनसार : ज्ञान, ज्ञेय व

चारित्र (मुनि-आचार) असे ग्रंथाचे तीन भाग. ज्ञानस्वरूपाचे सूक्ष्म वर्णन. जीवाची शुभ, अशुभ व शुद्ध प्रवृत्ती, गुणपर्याय, पुद्गलसंबंध इत्यादी. (३) पंचास्तिकाय : जीव, पुद्गल, धर्म, अधर्म व आकाश हे पाच अस्तिकाय तसेच काल, मोक्षमार्ग इत्यादी. (४) णियमसार : रत्नत्रयासंबंधी विवेचन, जीव, अजीव इ. तत्त्वे, सहा आवश्यक क्रिया इत्यादि. (५) दसभत्ति : तीर्थ, सिद्ध, श्रुत, चारित्र, अनगार, आचार्य, निर्वाण, पंचपरमेष्ठी, नंदीश्वर व शांती या दहा भक्तींचे वर्णन. (६) अट्ठपाहुड : दर्शन, चरित्र, सूत्र, बोध, भाव, मोक्ष, लिंग आणि शील या विषयांवरील ही 'पाहुड' म्हणजे छोटी प्रकरणे आहेत. काहींच्या मते हे पुस्तक कदाचित दुसऱ्या कुंदकुंदाचे असू शकेल. (७) बारस अणुवेक्खा : (द्वादशानुप्रेक्षा). यात जैन धर्मात प्रसिद्ध असलेल्या अनित्यता. अशरण, एकत्व इ. बारा अनुप्रेक्षा किंवा भावना वर्णिलेल्या आहेत.

दिगंबर संप्रदायामध्ये मुनि-आचारासंबंधीचा प्राचीन ग्रंथ मूलाचार हा असून त्याचा कर्ता स्वामी वट्टकेर मानला जातो. यात १,२४३ गाथा, १२ अधिकार (विभाग) असून मुनीच्या २८ मूलगुणांचे सविस्तर वर्णन आहे. ⇨आराधना वा भगवती आराधना हा इसवी सनाच्या सुरुवातीस शिवार्य याने रचिलेला ग्रंथ असून त्यात २,१६६ गाथा आहेत. दर्शन, ज्ञान, चारित्र व तप या चार आराधनांचे वर्णन. यावर दोन टीका : विजयोदया (अपराजितकृत, सातवे-आठवे शतक) व मूलाराधनादर्पण (आशाधरकृत, तेरावे शतक). लोकविभाग हा सर्वनंदी आचार्याने प्राकृतात लिहिलेला मूळग्रंथ उपलब्ध नाही परंतु सिंहसूरी आचार्याने केलेले त्याचे संस्कृत रूपांतर उपलब्ध आहे. लोकविभाग या ग्रंथाचा काल इ. स. पाचवे शतक असावा. तिलोयपण्णति (त्रिलोकप्रज्ञप्ति) ग्रंथाचा कर्ता यतिवृषभ (पाचव्या ते सातव्या शतकांच्या दरम्यान) असून नऊ महाधिकारांत तिन्ही लोकांचे वर्णन त्यात आले आहे. श्लोकसंख्या ८,००० असून या विषयावरील सर्व ग्रंथ या ग्रंथावर आधारलेले आहेत.

५. तत्त्वज्ञान व न्यायविषयक ग्रंथ : तत्त्वार्थाधिगमसूत्र : (पहिल्या ते चौथ्या शतकांच्या दरम्यान).

कर्ता उमास्वाती. जैन धर्मविषयक सर्व तत्त्वांचे सूत्ररूपाने प्रतिपादन करणारा प्रसिद्ध ग्रंथ. जैन ग्रंथकाराने संस्कृत भाषेत लिहिलेला हा आद्यग्रंथ. दिगंबर व श्वेतांबर या दोन्ही संप्रदायांना मान्य असलेला हा ग्रंथ जैनांचे 'बायबल' म्हणावयास हरकत नाही. दोन्ही संप्रदायांतील ग्रंथकारांनी यावर टीका लिहिल्या आहेत. श्वेतांबरटीका स्वोपज्ञ भाष्याला आधारभूत धरून लिहिलेल्या आहेत, तर दिगंबरटीका सर्वांत पहिली जी दिगंबर पूज्यपादकृत सर्वार्थसिद्धि नावाची टीका तिचा आधार

घेऊन लिहिलेल्या आहेत. या ग्रंथाचे १० अध्याय असून दिगंबरसूत्रपाठाप्रमाणे सूत्रसंख्या ३५७ व श्वेतांबरसूत्रपाठाप्रमाणे सूत्रसंख्या ३४४ आहे.

दिगंबरांचे न्यायविषयक ग्रंथ : सम्मइसुत्त किंवा सन्मतितर्क हा न्यायशास्त्रावरील प्राकृत ग्रंथ सिद्धसेन दिवाकराने (चौथे-पाचवे शतक) लिहिला. याची रचना कुंदकुंदाचार्यांच्या प्रवचनसारासारखी आहे. हा ग्रंथ दोन्ही जैन संप्रदायांना प्रमाण वाटतो. त्याचाच न्यायावतारही प्रसिद्ध आहे. देवसेना या जैन मुनीचे (दहावे शतक) दोन प्राकृत ग्रंथ लघुनयचक्र आणि बृहन्नयचक्र समंतभद्राचे (पाचवे-सहावे शतक) संस्कृत आप्तमीमांसा व युक्त्यनुशासन हे ग्रंथ अकलंकदेवाचे (आठवे शतक) लघीयस्त्रय, न्यायविनिश्चय, सिद्धिविनिश्चय व प्रमाणसंग्रह आचार्य विद्यानंदाचे (७७५-८४०) आप्तपरीक्षा, प्रमाणपरीक्षा, पत्रपरीक्षा व सत्यशासनपरीक्षा अनंतकीर्तीचे (दहावे शतक) बृहत्सर्वज्ञसिद्धि व लघुसर्वज्ञसिद्धि हे न्यायशास्त्रावरील आणखी काही महत्त्वाचे ग्रंथ होत.

श्वेतांबरांचे न्यायविषयक ग्रंथ: हरीभद्रसूरीचे (आठवे शतक) अनेकान्तजयपताका, अनेकान्तवादप्रवेश व सर्वज्ञसिद्धि आणि हेमचंद्राचे (बारावे शतक) प्रमाणमीमांसा, वेदांकुश व अन्ययोगव्यवच्छेदिका हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. यांपैकी शेवटच्या ग्रंथावर मल्लिषेणाने १२९२ मध्ये स्याद्वादमंजिरी ही अपूर्व टीका लिहिली. तीत सर्व आस्तिकनास्तिक भारतीय दर्शनांचे खंडन करून जैनांच्या स्याद्वादाचे मंडन केलेले आहे. यामुळे हा ग्रंथ जैन दर्शनात फार महत्त्वपूर्ण मानला जातो.

५.१.६.२ जैन पुराणे

विमलसूरीने पउमचरिय या प्राकृत काव्यात जैन दृष्टिकोनातून रामकथा सांगितली आहे. याचा काळ इ. स. पहिले ते चौथे शतक असा मानतात. शीलांकाचार्याने (नववे-दहावे शतक) २४ तीर्थंकर, १२ चक्रवर्ती, ९ वासुदेव व ९ बलदेव अशा ५४ महापुरुषांची चरित्रे चउपन्नमहापुरिसचरिय या प्राकृत गद्यपद्यमय ग्रंथात गायिली आहेत.

जैन पुराणांच्या संस्कृत रचना

विमलसूरीच्या पउमचरियावर आधीरित पद्मचरित (पद्मपुराण) रविषेणाने सातव्या शतकात लिहिले. ⇨जिनसेनाने (आठवे शतक) हरिवंशपुराण १२,००० श्लोकांत संपविले. शिवाय त्याने आदिपुराणात ऋषभनाथाचे चरित्र १०,३८० श्लोकांत श्रेष्ठ महाकाव्याच्या ढंगात रचले पण तो ग्रंथ अपूर्ण राहिला. त्याचा शिष्य गुणभद्र याने उत्तरपुराण ८,००० श्लोकांत रचिले आणि इतर महापुरुषांची चरित्रे कथन करून हे महापुराण पूर्ण केले. हेमचंद्राने बाराव्या शतकात ६३ शलाकापुरूषांची चरित्रे त्रिषष्टिशलाकापुरुषचरित नावाने गुंफिली आहेत. त्यात वरील ५४ महापुरुषांबरोबर त्याने ९ प्रतिवासुदेवांचाही समावेश केला आहे.

५.१.६.३ अपभ्रंश भाषेतील साहित्य

धवल यांचे (दहावे-अकरावे शतक) हरिवंशपुराण आणि स्वयंभूचे (सु. आठवे शतक) ⇨पउमचरिउ व रिट्ठणेमिचरिउ वा हरिवंशपुराण प्रख्यात आहेतच. पण अपभ्रंशाचा महाकवी, 'कविकुलतिलक' ⇨पुष्पदंत (दहावे शतक) याने ⇨तिसट्ठिमहापुरिस – गुणालंकार या महाकाव्यात उत्कृष्ट शैलीचा आदर्श निर्माण केला आहे. त्यानेच ⇨जसहरचरिउ व ⇨णायकुमारचरिउ यांची रचना केली. ⇨ धनपालाचा (दहावे शतक?) ⇨भविसयत्तकहा कनकामराचे (अकरावे शतक) करकंडचरिउ ⇨जोइंदूचा (योगींद्राचा, सहाव्या ते दहाव्या शतकांच्या दरम्यान) ⇨परमप्पपयासु हे इतर महत्त्वाचे अपभ्रंश ग्रंथ होत [⟶ अपभ्रंश साहित्य].

५.१.६.४ चंपूकाव्ये व कथा

महाराष्ट्री प्राकृतातील ⇨वसुदेवहिंडी हा गद्य कथाग्रंथ इ.स. सहाव्या शतकापूर्वी संघदास व धर्मसेनगणी यांनी लिहिला. ⇨समराइच्चकहा ही ⇨हरिभद्रसूरीची (आठवे शतक) प्रसिद्ध महाराष्ट्री प्राकृत धर्मकथा ⇨कुवलयमाल हे उद्योतनसूरीचे (आठवे शतक) सुरस महाराष्ट्री प्राकृत चंपूकाव्य हरिभद्रसूरीचे (आठवे शतक) धुत्तवखाण (धूर्ताख्यान) धनेश्वर (अकरावे शतक) याचे सुरसुंदरीचरिय महेश्वरसूरी (अकरावे शतक) याचे णाणपंचमीकहा ⇨हेमचंद्राचे (१०८८–११७२) कुमारपालचरित वा कुमारपालचरिय देवेंद्रसूरी (तेरावे शतक) याचे कण्हचरिय (कृष्णचरित्र) हरिश्चंद्र (सु. ९००) याचे जीवंधरचंपू सोमदेव (९५९) याचे यशस्तिलकचंपू सिद्धर्षी (९०६) याची उपमितिभवप्रपंचकथा इ. अनेक संस्कृत व प्राकृत ग्रंथ जैन लेखक-कवींनी लिहून साहित्यक्षेत्रात मोलाची भर घातली आहे.") (म. रा. म. विश्वकोष नोंद) [५]

५.१.६.५ जैन वाङ्मयाचा उगम

हे भारतीय प्राचीन साहित्यपरंपरेतील एक अत्यंत महत्त्वाचे आणि समृद्ध अंग आहे. अहिंसा, सत्य, अपरिग्रह, तप, संयम आणि आत्मशुद्धी हे तत्त्वज्ञान जैन वाङ्मयाच्या केंद्रस्थानी आहे. महावीर यांच्या उपदेशांवर आधारित हे वाङ्मय धार्मिक, तात्त्विक, नैतिक व साहित्यिक दृष्ट्या अत्यंत मौल्यवान आहे.

जैन धर्माची परंपरा अतिप्राचीन मानली जाते. २४ तीर्थंकरांनी दिलेले उपदेश मौखिक परंपरेने जतन केले गेले. पुढे ते लेखनरूपात आले. जैन वाङ्मयाचे मुख्य ग्रंथ प्राकृत (अर्धमागधी), संस्कृत, अपभ्रंश आणि नंतरच्या काळात प्रादेशिक भाषांमध्ये लिहिले गेले.

५.१.६.६ जैन वाङ्मयाचे प्रमुख प्रकार

१. आगम साहित्य

जैन वाङ्मयाचा पाया म्हणजे जैन आगम. हे ग्रंथ महावीरांच्या उपदेशांवर आधारित आहेत. श्वेतांबर परंपरेनुसार आगम ग्रंथांचे संकलन झाले आहे. दिगंबर पंथात मूळ आगम नष्ट झाल्याचे मानले जाते.

आगमांचे प्रमुख प्रकार:

- अंगा
- उपांगा
- मूलसूत्रे
- छेदसूत्रे
- चूलिकासूत्रे

२. तत्त्वज्ञानात्मक साहित्य

या साहित्यामध्ये जीव-अजीव, कर्मसिद्धांत, मोक्षमार्ग, स्याद्वाद आणि अनेकांतवाद यांचे सविस्तर विवेचन आहे. कुंदकुंदाचार्य, उमास्वाती यांसारख्या आचार्यांनी तात्त्विक ग्रंथ लिहिले.

३. चरित्रात्मक साहित्य

तीर्थंकर, गणधर, आचार्य आणि संतांची चरित्रे या प्रकारात येतात. कल्पसूत्र, महापुराण यांसारखे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. या ग्रंथांतून आदर्श जीवनमूल्ये मांडली आहेत.

४. काव्य व कथा साहित्य

जैन कवींनी महाकाव्ये, आख्यायिका, कथा व पद्यरचना केल्या. रामायण, महाभारत यांची जैन परंपरेतील स्वतंत्र रूपांतरे आढळतात. यात अहिंसा व नैतिकतेवर विशेष भर असतो.

५. अपभ्रंश व लोकभाषांतील साहित्य :

जैन साधूंनी अपभ्रंश भाषेचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला. त्यामुळे उत्तर भारतातील हिंदी, गुजराती, राजस्थानी व मराठी भाषांच्या विकासात जैन वाङ्मयाचा मोठा वाटा आहे.

५.१.६.७ जैन वाङ्मयाचे वैशिष्ट्ये

- ✓ अहिंसेचा सर्वोच्च आदर्श
- ✓ कर्मसिद्धांताचे सखोल विवेचन
- ✓ तर्कशुद्ध व तात्त्विक मांडणी
- ✓ नैतिक व शिस्तबद्ध जीवनदृष्टी

- ✓ साहित्य, धर्म व तत्त्वज्ञान यांचा समन्वय
- ✓ जैन वाङ्मयाचे सांस्कृतिक महत्त्व

जैन वाङ्मयामुळे भारतीय तत्त्वज्ञान अधिक समृद्ध झाले. शिक्षण, नीती, सामाजिक समता आणि सहअस्तित्व यांची शिकवण यातून मिळते. हस्तलिखित परंपरा, चित्रकला व मंदिरशिल्प यांवरही जैन वाङ्मयाचा खोल प्रभाव दिसून येतो. जैन वाङ्मय हे जैन धर्माचे प्राचीन आणि व्यापक साहित्य आहे, जे आगम, उपागम, छेदसूत्र आणि तत्त्वार्थसूत्र यांसारख्या ग्रंथांचा समावेश करते. हे प्राकृत, संस्कृत आणि अपभ्रंश भाषांमध्ये लिहिले गेले असून, तीर्थंकरांच्या उपदेशांवर आधारित आहे.

५.१.६.८ चूर्णीका

चूर्णिका म्हणजे सूत्रे किंवा गाथा समजावून सांगण्यासाठी लिहिलेली सोपी, विस्ताराने केलेली गद्य व्याख्या. अनेक जैन आगम ग्रंथ अतिशय संक्षिप्त सूत्ररूपात आहेत. त्या सूत्रांचा अर्थ, संदर्भ व आशय स्पष्ट करण्यासाठी चूर्णिका लिहिली जाते.

- **चूर्णिकेची वैशिष्ट्ये**

➢ मुख्यतः गद्य स्वरूपात असते

➢ सूत्रांचे अर्थस्पष्टीकरण करते

➢ भाषा साधी, प्रवाही व स्पष्ट

➢ विद्यार्थ्यांना व साधकांना ग्रंथ समजायला मदत करते

➢ पुढील काळातील टीका व भाष्यांची पायाभरणी करते

जैन वाङ्मयातील स्थान

जैन साहित्यामध्ये अर्थलागणेसाठी तीन पायऱ्या मानल्या जातात:

- ✓ चूर्णिका – प्राथमिक व सरळ स्पष्टीकरण
- ✓ टीका – अधिक तात्त्विक व विस्तृत विवेचन
- ✓ भाष्य – सखोल तत्त्वचर्चा व तर्क

यामुळे चूर्णिका ही स्पष्टीकरणाची पहिली आणि अत्यंत महत्त्वाची पायरी मानली जाते.

महत्त्व

- आगम साहित्याचे जतन व समज वाढवते
- अध्ययन- अध्यापनासाठी उपयुक्त
- जैन तत्त्वज्ञान सामान्य वाचकांपर्यंत पोहोचवते
- चूर्णी हे जैन आगम साहित्याचे भाष्य आणि टीका ग्रंथ आहेत, जे ४थ्या ते ७व्या शताब्दी दरम्यान रचले गेले. हे प्राकृत भाषेत लिहिले गेले असून, जैन सिद्धांत स्पष्ट करणाऱ्या कथा, किंवदंत्या आणि ऐतिहासिक परंपरा यांचा समावेश करतात.

५.१.७ अन्य भारतीय भाषेतील अभिजात साहित्य

(या मुद्द्याचा आढावा प्रकरण तीन मध्ये अभिजात मराठी भाषा या उपमुद्द्यात घेतली आहे.)

५.२ भारतीय ज्ञान परंपरा आणि मध्ययुगीन मराठी साहित्य

भारत हा जगातील सर्वांत प्राचीन संस्कृतींपैकी एक आहे. इथे वेद, उपनिषद, महाकाव्ये, स्मृतीग्रंथ, शास्त्रे, आयुर्वेद, न्याय, व्याकरण, साहित्य, संगीत, नाट्य या सर्व स्वरूपात अखंड ज्ञानपरंपरा विकसित झाली. या ज्ञानसंपदेचा मूळ पाया संस्कृत भाषा होती, पण हळूहळू ही संपदा प्रादेशिक भाषांमधून लोकांपर्यंत पोहोचली. या प्रादेशिक भाषांमध्ये मराठी भाषा अग्रगण्य ठरली. मराठी भाषेचे वैशिष्ट्य म्हणजे तिची सुबोधता, भावसमृद्धी आणि लोकसुलभता. म्हणूनच भारतीय ज्ञानपरंपरेतील गूढ तत्त्वज्ञान असो किंवा भक्तिमार्गातील भावसमृद्धी, सर्व काही मराठी भाषेत सहजरीत्या व्यक्त झाले. कोणत्याही भाषेचा नक्की जन्मकाळ सांगणे हे शक्य नाही त्याचप्रमाणे मराठी भाषेची सुरुवात कधी झाली हे देखील निश्चितपणे सांगता येण्यासारखे नाही. तरी देखील मराठी भाषा आपल्या पूर्ण वैभवाने महाराष्ट्रात नांदतांना दिसते तिची पूवपीठिका लक्षात घेतली तर आपणास असे लक्षात येते की,

साठीलक्ष देश महाराष्ट्र। तेथिचे राये शिहाणे सुभटु
वेदशास्त्र चातुर्याची पेठु। भरैली तिये देशी॥
ऐसे ते महाराष्ट्र राये सुंदरू। वरी महाराष्ट्र भाषा चतुरू।
तेही वसविले गंगातीरू। क्षेत्र त्र्यंबकवेह्ळी॥

भारतीय ज्ञानपरंपरेतील सर्वांत जुनी भाषा म्हणजे संस्कृत. वेद, उपनिषद, महाभारत, रामायण, पुराणे, न्यायशास्त्र हे सर्व संस्कृत भाषेत होते. पण सामान्य जनतेला ही भाषा समजत नसे. यावेळी मराठी भाषेने संस्कृत ज्ञानाचा वारसा आत्मसात करून तो लोकाभिमुख केला.
संत ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) लिहून भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान मराठीत मांडले.

वेद तो बहुत कृपन जाहला । तिन्ही वर्णांचे कानी लागला ।
स्त्री शुद्रादी अबोला । होवून ठेला॥

असे संत ज्ञानेश्वर आपल्या ज्ञानेश्वरी या ग्रंथात म्हणतात, वेद हा कृपन झाला आणि खरे तत्वज्ञान कुणाला कळेना कारण ते संस्कृत मध्ये आहे म्हणून संत ज्ञानेश्वरांनी भाषिक भक्ती आंदोलन केले. श्रीमद् भगवद् गीतेतील तत्वज्ञान त्यांनी मराठी भाषेत आणले व मराठी भाषा ही अमृताला देखील पैजे ने जिंकण्या सारखी आहे. असे ठाम पणे सांगून मराठीचा प्रचार व प्रसार केला.

माझा मराठाची बोलू कवतिके । परी अमृता तेही पैजा जिंके । ऐसे रसीके अक्षरे मेळवीना॥ अशी ते प्रार्थना करतात.

किंवा

इये मराठीचे नगरी । ब्रह्म विद्ये चा सुकाळू करी ।
घेणे देणे सुखची वरी होवू दे या जगा॥

संत ज्ञानेश्वरांनी केलेल्या या भाषिक जन आंदोलन
कार्यामुळे गीतेसारखा दुरापास्त ग्रंथ सामान्य माणसाला, बहुजनांना,शेतकऱ्याला वाचता व ऐकता आला.त्यामुळे मराठी भाषेने संस्कृत ज्ञानपरंपरेला लोकपरंपरेत रूपांतरित केले असे दिसते.मराठी साहित्य संसाराला बाराव्या शतकापासून आरंभ झाला या काळात मराठी साहित्यावर संस्कृत भाषेचे वर्चस्व होते त्यामुळे सर्वसामान्य नेत्या अज्ञानी लोकांना त्यांच्यातील धर्मभावनेला उच्च विचारांचे अधिष्ठान मिळवून देईल असे साहित्य निर्माण होणे गरजेचे होते हीच गरज ओळखून आद्यकवी मुकुंदराज यांनी मराठी भाषेमध्ये ग्रंथाचे लेखन केलेले दिसते ते म्हणतात,

जेया नाही शास्त्र प्रतीति
नेणती तर्कमुद्रेची स्थिती
तेया लागी मराठीया युक्ती
केली ग्रंथरचना॥

आदिनाथ, हरिनाथ, रघुनाथ, मुकुंदराज आदींनी सर्व सामान्य लोकांसाठी उपनिषदांचा परिचय विवेकसिंधू च्या रूपाने मांडला आहे.

शके अकराशे दाहोत्तर। साधारणनाम संवत्सर।' तै राजा शारंगधर। ग्रंथ उभार तैजाला॥

या ग्रंथात त्यांनी योगानुभव, सगुणोपासना, गुरुभक्ती, गुरुशिष्य लक्षणे, जीव, ब्रह्म, माया, अविद्या, प्रपंच, परमार्थ आदिंचे विवेचन केले असून यात देखील मराठी भाषेची थोरवी त्यांनी गायलेली आहे.

भारतीय ज्ञान परंपरेत मराठी भाषेचे गुणगौरव सर्वच प्राचीन ग्रंथात आले असल्याचे दिसते. महानुभाव संप्रदायातील कवयित्री महदंबा ही मराठीतील आद्य कवयित्री होय. त्यांनी धवळे व मातृकी रुक्मिणी स्वयंवर हे काव्यग्रंथ रचले. हे काव्य ११० ओव्यांचे आहे. मातृका म्हणजे मराठी भाषेतील वर्ण किंवा आद्याक्षरे घेवून तयार केलेले काव्य आहे. तसेच मूर्ति प्रकाश कार केशिराज व्यास यांनी इ.स १२ ८९ मध्ये मूर्ति प्रकाश हा ग्रंथ लिहिला असून धवळ्या नंतरचे मराठीतील दुसरे प्रदीर्घ काव्य म्हणून मूर्ति प्रकाश चा उल्लेख करण्यात येतो. महानुभवांचे सर्वच ग्रंथ जवळपास मराठी भाषेत लिहिल्या गेले आहेत तसेच त्यांनी मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार देखील मोठ्या प्रमाणावर केला असल्याचे दिसते.

मध्ययुगीन काळचा आपण अभ्यास केला तर आपणास असे लक्षात येते की, मराठी भाषेचा गुण गौरव सर्वच संतांनी तर केलाच पण त्याच बरोबर पंडितांनी व शाहिरांनी देखील केला आहे. पंडिती काव्याचा कालखंड हा यादवकाळ ते पेशवेकाळ असा आहे. यात सर्वच पंडित हे संस्कृत जाणणारे, विद्वान, असे आहेत. त्यांच्या डोळ्यासमोर संस्कृत शिक्षित वर्ग होता. मात्र अशा पस्थितीत देखील काही पंडितांनी मराठीला अग्र स्थान देवून ग्रंथांच्या रचना मराठी भाषेत केल्यात हे वाखाणण्या योग्य आहे. यात संत एकनाथांचे नातू कवी मुक्तेश्वर हा मराठीतील पहिला कला कवी होय असा उल्लेख रा. श्री. जोग करतात. त्यांनी अनेक ग्रंथ ओवीबध्द स्वरूपात लिहिले आहे. आपल्या कवित्वाचा सार्थ अभिमान बाळगतांना ते लिहितात,

व्यास, ग्रंथ गिरीचे सोने। संस्कृत खोरिये गाळुनि मना॥
देशभाषा घडिले लेणे। साहित्य रत्नी सुजडित॥

ते म्हणतात, व्यासांच्या ग्रंथातील सोने घेऊन मी देशी भाषेत अलंकार घडविला आहे. असे उद्गार ते महाभारता बाबत काढतात. पंडिती काव्यातील कवी श्रीधर हा देखील महत्वाचा कवी आहे त्यांनी देखील अनेक ग्रंथ मराठी मध्येच लिहिले आहे. 'राम विजय' हा ग्रंथ निर्माण करण्याचा हेतू स्पष्ट करतांना तो म्हणतो,

अबला न कळे संस्कृत वाणी । जैसे आडातिल निर्मळ पाणी। परि दोर पात्रा वाचोनि । अशक्त जसा केवि निघे॥

म्हणून मराठीत ग्रंथ रचना केली आहे.

पंडीती काव्यात वामन पंडित, रघुनाथ पंडित, निरंजन माधव, मोरोपंत आदींनी मराठीत रचना केली आहे. पंडिती काव्या प्रमाणेच मराठी वाङ्मय हे शाहिरीने समृद्ध केले आहे. परशराम, अनंतफंदी, रामजोशी, सगनभाऊ, प्रभाकर, होनाजी बाळा आदी शाहिरांनी कवने, पोवाडे, लावण्या मराठीत रचना करून मराठी साहित्य समृद्ध केले असल्याचे दिसून येते.

नाथ, वारकरी, दत्त, महानुभाव आदीं प्रमाणे चौदाव्या शतकात जैन धर्मीयांनी देखील मराठीत साहित्य निर्मिती केली आहे. यामध्ये ब्रह्म गुणदास हा पहिला मराठी जैन ग्रंथकार होय. याने श्रेणिक चरित्र नावाचा ग्रंथ लिहिला. पंडित मेघराज हा सोळव्या शतकातील जैन कवी होता त्याने देखिल मराठी व गुजराथी या भाषेत ग्रंथ निर्मिती केली आहे. याच धर्मातील सामराज हा कवी ब्रह्म जिनदासांच शिष्य होता. सोळव्या शतकाच्या पूर्वाधातील याचा कालखंड होता. त्याची मातृभाषा गुजराथी होती. त्याने मराठीत ग्रंथरचना केली आहे. ग्रंथरचना करतांना तो म्हणतो, नच मराठी बोलता, क्षमा करावी बुद्धिवंता अशी विनंती त्याने श्रोत्यांना केली आहे यावरून जैनधर्मियात जिनदास, गुणकिर्ती, सूरिजन आदींनी मराठी भाषेत लिखाण केले आहे. सोळव्या शतकात त्या ग्रंथ रचनांमूळे मराठी वाङ्मयात मोलाची भर पडली आहे.

मराठी भाषेत इतर धर्मियांनी केलेल्या मराठी वाङ्मय निर्मिती प्रमाणेच ख्रिस्त धर्मीयांनी देखील मराठी वाङ्मय निर्मिती केलेली आहे. फादर स्टीफन्स हा इंग्रज अधिकारी धर्मप्रचारार्थ हिंदुस्थानात आला. त्याचे गोव्यात वास्तव्य होते तेथे त्याने मराठी भाषा शिकली. त्या आधारेच कोकणी मराठीचे व्याकरण त्याने लिहिले. त्याने ज्ञानेश्वरी ग्रंथांचा सखोल अभ्यास केला असावा, असे त्याच्या ग्रंथलेखनावरून जाणवते. कारण ख्रिस्त पुराणाच्या आरंभी सर्वांना उदंड आयुष्य लाभो अशी प्रार्थना केली असून ही नाटकाची कथा आपण मराठीत लिहीत आहोत असे प्रतिपादन केले आहे. फादर स्टीफन्स यांना मराठी भाषेचा अभिमान होता मराठी भाषेविषयीचा अभिमान व्यक्त करताना ते म्हणतात,

जैसी पुष्पा माजी पुश्य मौगरी । की परिमळा माजी कस्तुरी । तैसी भासां माजी साजिरी । मराठिया॥

फादर स्टिफन्स प्रमाणेच फादर क्रुआ हा ख्रिस्ती धर्मप्रचारक होता. त्याने सेंट पीटर च्या जीवनावर जे महापुराण रचले तो त्याचा मराठी ग्रंथ होय. सर्व ख्रिस्त धर्मीयांनी मराठी भाषेत जी काव्यरचना केली त्या स्चनेमुळे मराठी वाङ्मयात भर पडली असल्याचे दिसून येते. मराठी भाषेची सेवा त्या काळात अनेक अन्य धर्मीयांनी केली. त्यामध्ये मुसलीम धर्मीय सुद्धा मागे नव्हते.काही मुसलमान कवी भागवत धर्माशी इतके समरस झाले होते की, त्यांनी आपला खाटकाचा व्यवसाय सोडून वारकरी संप्रदाय पत्करला. काहींनी तर मोहरमच्या सणांत म्हणावयाच्या 'रिवायती' नावाची कवनेही मराठी भाषेत रचली.

मुस्लीम धर्मातील सूफी संतांच्या अभंग रचना देखील मराठी भाषेतच आहेत. संत कवी शेख महमंद हे धर्माने मुस्लीम असले तरी भागवत धर्मावर त्यांची अपार श्रद्धा होती. संत शेख महमंद यांनी 'योग संग्राम', पवनणिमय, निष्कलंक प्रबोध, ज्ञानसागर आदी ग्रंथ मराठी भाषेतच निर्माण केले आहे.

भारतीय ज्ञान परंपरा आणि मराठी भाषा यांचा अन्योन्य संबंध हा अनादी काळापासूनचा असल्याचे दिसते. म्हणून मराठी भाषा ही तर समृद्ध आहेच पण बोलणार्याला देखील ती समृद्ध करते हे आपणास जाणवते. भारतीय संस्कृतीची ओळख ही तिच्या समृद्ध ज्ञानपरंपरेतून होते. वेदकाळापासून ते मध्ययुगीन काळापर्यंत ज्ञान, तत्त्वज्ञान, धर्म, साहित्य, कला व जीवनमूल्ये यांचा अखंड प्रवाह वाहत राहिला. या परंपरेचे प्रभावी प्रतिबिंब मध्ययुगीन साहित्यात स्पष्टपणे दिसून येते.

५.२.१ भारतीय ज्ञान परंपरेची संकल्पना

भारतीय ज्ञान परंपरा म्हणजे केवळ ग्रंथरचना नव्हे, तर अनुभव, चिंतन, साधना व आचार यांचा एकत्रित वारसा होय. ही परंपरा गुरु–शिष्य परंपरेतून, श्रुती–स्मृतीतून आणि लोकपरंपरेतून विकसित झाली.भारतीयभारतीय ज्ञान परंपरा आणि मराठी भाषा यांचा अन्योन्य संबंध आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही भारता मध्ये निर्माण झालेल्या विविध धर्म, पंथ, संप्रदाय आणि संत, महात्मे, महापुरुष तसेच विविध रुढी, परंपरा यांनी समृद्ध केली असल्याचे दिसते. भारतीय ज्ञान परंपरा ही विविधतेतून एकते कडे वाटचाल करतांना दिसते. भारत देशांत अनेक धर्म आणि संप्रदाय उदयाला आले प्रत्येक धर्माने मानवाच्या कल्याणाचा मार्ग त्या त्या ग्रंथाने वृद्धींगत केला.

भारतात सनातन वैदिक धर्मपरंपरा व तदअंतर्गत निर्माण झालेले विविध उपासना संप्रदाय देखील पाहावयास मिळतात. वैदिक व अवैदिक तत्वज्ञांनी जगत्, जीव व परमात्मा आणि त्यांचा परस्पर संबंध याविषयीचे तत्वज्ञान विविध पद्धतीने मांडले आहे. सनातन आस्तिक वैदिक परंपरे

बरोबरच वैदिक नास्तिक दर्शनकार तत्वज्ञानाचीही उपासना पध्दती संप्रदाय स्वरूपात प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. भौतिक, लौकिक जीवन व्यवहारा बरोबरच आध्यात्मिक जीवन व्यतित करण्यासाठी आणि अंतरंग स्वरूप सुख अनुभवण्यासाठी आमच्या पूर्व पुरुषांनी ऋत विषयाचा वैज्ञानिक दृष्टीने शोध घेतला. ऋषिमुनीनी चिंतन पूर्वक काही जीवन मूल्यांचे निर्धारीकरण केले. काही तत्वांशी ते एकनिष्ठ झाले. त्याचे प्रत्यंतरण भारतीय ज्ञान परंपरेत आले असल्याचे दिसून येते.

५.२.२ बिजकथा

i) शब्दांचे बीज

एका गावात आरव नावाचा मुलगा होता.

शाळेत त्याला मराठी भाषा कठीण वाटत असे—वाक्यरचना, अलंकार, लेखन… सगळं जडच!

तो म्हणायचा, "इंग्रजी शिकलं की पुरे. मराठी कशाला एवढी?"

एके दिवशी त्याच्या आजीने त्याला आपल्या बागेत नेले.

ती म्हणाली,

"ही फुलांची झाडं पाहिली का? प्रत्येक झाड एका छोट्याशा बीजातून उगवलं आहे."

आरव म्हणाला, "हो, पण भाषेचा त्याच्याशी काय संबंध?"

आजी हसली आणि म्हणाली,

"मराठी शब्दही बीजांसारखेच आहेत.

एक छोटा शब्द—माय, माती, मन—यातून मोठं विचारांचं झाड उगवतं.

आपली भाषा जिवंत ठेवली तरच संस्कृतीची फुलं उमलतात."

हे ऐकून आरव विचारात पडला.

शाळेत दुसऱ्या दिवशी त्याने पहिल्यांदाच मन लावून मराठीचा धडा वाचला.

त्याला कळलं—

भाषा फक्त विषय नसतो, तो स्वतःची ओळख जपणारा बीज असतो.

ii) दाणे आणि मुंगी

एक मुंगी दिवसभर धान्याचे दाणे गोळा करून आपल्या वारुळाकडे नेत असे.

तिला पाहून एक टोळ हसत म्हणाला,

"अगं मुंगीसाहेब, इतका कष्ट का करत बसलीस? उन्हाळा छान आहे—नाच, गाऊन मजा कर!"

मुंगी शांतपणे उत्तरली,

"आज केलेला परिश्रम उद्या उपयुक्त ठरेल. हाच निसर्गाचा नियम."

वेळ गेला.

उन्हाळा संपला, पावसाळा आला.

टोळाजवळ काहीच अन्न नव्हते; तो भुकेने त्रस्त होऊन मुंगीच्या वारुळाकडे आला.

मुंगीने त्याला अन्न दिले, पण हसत म्हणाली,

"उन्हाळ्यात काम केले असतेस, तर आज भुकेला राहिला नसतास."

५.२.३ आदिबंध

आदिबंध म्हणजे प्रारंभिक विषयाची मांडणी होय. हे आदिबंध प्रत्येक कथेच्या सुरुवातीस पाहावयास मिळते. कथा बिजाच्या रूपाने हे आदिबंध आपणास दिसून येते.

'कथा' या वाङ्मय प्रकाराला दीर्घ परंपरा लाभली आहे. श्रवणीयता, मनोरंजन व प्रबोधन ही 'कथा' या वाङ्मयप्रकाराची उल्लेखनीय वैशिष्ट्ये आहेत. हा वाङ्मयप्रकार समजून घेण्यासाठी कथेची पूर्वपीठिका, घटक, वैशिष्ट्ये, सादरीकरण यांची माहिती दिली आहे.

कथेच्या अभ्यासातून भाषिक कौशल्ये विकसित होतात तसेच व्यावसायिक संधीही उपलब्ध होतात. 'कथा' या साहित्यप्रकाराचा परिचय व्हावा, या हेतूने प्रस्तुत विवेचन केले आहे.

मनुष्य आपले अनुभव व कल्पना जेव्हा दुसऱ्याला सांगू लागला तेव्हाच त्यांची गोष्ट झाली आणि त्यातून कथेचा जन्म झाला. 'कथा' या शब्दाचा शब्दश: अर्थ गोष्ट, कहाणी, हकीकत, वर्णन असा आहे. लक्षवेधी, सोप्या, सुटसुटीत आणि रसाळ शब्दांत पूर्वी गोष्ट सांगितली जात असे. या श्रवण-गोष्टीतून मनोरंजन व अप्रत्यक्षपणे बोध देण्याचा प्रयत्न होत असे.

मौखिक परंपरेतून सुरू झालेल्या व लिखित स्वरूपात स्थिरावलेल्या 'कथा' या वाङ्मयप्रकाराला उत्तरोत्तर लोकप्रियता लाभत गेली. 'कथ्' म्हणजे सांगणे, निवेदन करणे. 'कथ्' या मूळ धातूपासून 'कथा' हा शब्द रूढ झाला आहे. भारतात कथा या साहित्यप्रकाराला फार मोठी परंपरा आहे.

कथन-परंपरा

"भारतात कथा-कथनाची अथवा कथा-गायनाची दीर्घकालीन परंपरा आहे. कुशीलव, ग्रांथिक, पुराणिक, पाठक, सूत, मगध, बंदी, कथाकार, आख्यानकार, भागवतार इत्यादी कथा-कथक अथवा कथा-गायकांनी ही परंपरा अक्षुण्ण ठेवली. कथा-कथनाचे भिन्न भिन्न प्रकार परंपरेने चालत आलेले आहेत. मणिपूर येथील एकाच प्रदर्शकाचे कथाकथन वारि-लिबा, उडिसा आणि

केरळमधील काष्ठ-पुतळ्यांचा खेळ, आंध्रप्रदेशातील बुर्रा कथा, गोव्यातील रणमाल्ये, कुमाऊँमधील राजुला मालुशाही, गुजरातमधील आख्यान, मध्यप्रदेशातील पांडवानी, आंध्र, कर्नाटक आणि तामिलनाडू येथील हरिकथा, हिंदी भाषकांच्या प्रदेशातील आल्हा, पश्चिम उत्तरप्रदेश आणि राजस्थान येथील ढोला मारू, तामिलनाडूमधील विल-पड्डू, राजस्थानमधील पाबूजी आणि महाराष्ट्रातील चित्रकथी. (अवस्थी, १९९४). डॉ. मांडे यांनी महाराष्ट्रातील कथा-कथन-गायन करणाऱ्या काही जमातींची माहिती दिलेली आहे. (मांडे, १९९४). डक्कलवारांचे किंगरीच्या साथीने गद्यपद्यमिश्रित पुराणकथन व चित्रे असलेले बाड उकलणे-यात चित्र, संगीत आणि साहित्य यांचा मेळ घातलेला दिसतो, त्याचबरोबर ते कथन हा सादरीकरणाचा भाग असल्याने नाट्याचाही समावेश होतो. चित्रकथी चित्रांच्या साहाय्याने कथाकथन व गायन करतात. धनगरांचे 'सुंबरान' म्हणजे कथागीतगायन व सादरीकरण असते. पोवाडा हे कथनरूप आहे. तसाच कथागायनाचा तो एक प्रकारही आहे."[६]

५.२.४ कथा

प्रारंभी एखादी शिकवण देण्यासाठी, बोध देण्यासाठी, मनोरंजन किंवा एखादा विचार, भावना, चित्ताकर्षक घटना वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कथा लिहिल्या जाऊ लागल्या.

कथेत घटना, कथानक, पात्रे,स्थळ, काळ, वेळ यांचाही उल्लेख कथेत असतो. कथेच्या विषयानुसार विशिष्ट वातावरण आणि समर्पक अशी निवेदन शैलीही असते. कथेतील पात्रांच्या परस्परसंबंधातून निर्माण झालेले ताणतणाव, संघर्ष, गुंतागुंतही कथेत असते आणि या सर्वांचा एक उत्कर्षबिंदूही असतो.

कथा म्हणजे, 'एका विशिष्ट स्थलकाली पात्रांच्या परस्परसंबंधातून घडलेल्या घटनांचे एखाद्या विशिष्ट हेतूने केलेले उत्कंठावर्धक चित्रण म्हणजे कथा.' अर्थात प्रत्येक कथेत हे सर्वच घटक असतीलच आणि त्यांचे प्रमाणही सारखे असेल असे म्हणता येणार नाही.

कथेचे घटक

(१) कथाबीज

कथाकार त्याच्या प्रतिभाशक्तीने एखाद्या घटनेत वास्तवाचे व कल्पनेचे रंग भरतो. हे करताना तो निसर्ग, समाज, सांस्कृतिक संदर्भ, वातावरण इत्यादी घटकांचे साहाय्य घेतो. या सर्व घटकांच्या मदतीने घटनामालिकेचे कथात्म साहित्यात रूपांतर होते; म्हणून कथेत 'घटना' हा महत्त्वाचा भाग ठरतो. कथेत या मूळ घटनेलाच 'कथाबीज' असे म्हणतात.

(२) कथानक

कथानकात घटना, प्रसंग, पात्रांच्या कृती, स्वभाववैशिष्ट्ये, वातावरण इत्यादींचे तपशील हळुवारपणे उलगडत जातात. कथेत कथानकातील घटकांचे एकत्रीकरण केले जाते. या एकत्रीकरणातून कथेची मांडणी आकाराला येते. हे कथानक उलगडताना त्यातील प्रवाहीपणही जपले जाते. कथाकाराच्या मनात कथेच्या अनुषंगाने निर्माण झालेला भावाशय वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कथन करणे हे कथानकाचे प्रयोजन असते.

(३) पात्रचित्रण

पात्रचित्रण हा कथेचा महत्त्वपूर्ण घटक आहे. पात्रचित्रणातून कथेचा आशय पुढे पुढे जात राहतो. कथाकार एखाद्या पात्राची वृत्ती, कृती, उक्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवनपद्धती इत्यादींच्या चित्रणातून त्या व्यक्तीची शब्दरूप प्रतिमा तयार करत असतो. या शब्दरूप प्रतिमेला 'पात्र' असे म्हणतात. कथेतील पात्रांना वास्तवातील माणसांप्रमाणे रेखाटले जाते, म्हणून वाचकांची त्या पात्रांशी जवळीक साधली जाते. ही पात्रे कथाकाराची 'स्व' निर्मिती असते.

(४) वातावरण निर्मिती

कथेला स्थळ-काळाबरोबरच सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादींनी युक्त वातावरण असते. या वातावरणाचा वाचकांवर परिणाम होऊन तो कथानकाशी एकरूप होतो. वातावरणाचा पट जितका सघन तितकी कथा सकस होते.

(५) नाट्यमयता/संघर्ष

कथेत चांगल्या-वाईटाचा संघर्ष असतो. त्यातूनच नाट्यमयता निर्माण होते. या संघर्षातूनच कथा उत्कर्षबिंदूपर्यंत पोहोचते. कथेत प्रत्येक वेळी संघर्षकिंवा नाट्य हे वाईट घटनांचेच असते असे नाही, तर आनंद आणि सुखात्मिक घटनांतूनही नाट्यमयता निर्माण होते. कथेच्या शेवटी कथेतील अनुभवांचा, घटनांचा उत्कर्षबिंदू नाट्यपूर्ण रीतीने साधता येतो; पण तरीही कथानकाच्या ओघात स्वाभाविकपणे झालेला शेवट वाचकाला आकर्षित करतो

(६) संवाद

कथेतील संवाद हे चटपटीत, आकर्षक, वाचकाच्या भावविश्वाला स्पर्श करणारे आणि कथानकाला प्रवाही ठेवणारे असतात. पात्रांच्या स्वभावधर्मानुसार व परिस्थितीजन्य घटकांनुसार संवाद लिहिले जातात. या संवादात लय व आंतरिक संगती महत्त्वाची असते. संवादातून रसनिर्मिती आणि रसपरिपोष होत असतो. अर्थपूर्ण संवाद कथेला वेगळी उंची प्राप्त करून देतात.

(७) भाषाशैली

कथानक भाषेच्या मदतीने साकार होत असते. कथेतील पात्रांच्या स्वभाववैशिष्ट्यांनुसार व कथेतील वातावरणानुसार भाषेची योजना केली जाते. कथाकार, त्याचा दृष्टिकोन, त्याची अनुभव घेण्याची पद्धत यांनुसार कथेचे भाषारूप आणि शैलीविशेष निश्चित होत जातात. कथा लिहिताना साधारणत: प्रमाण भाषा आणि बोली भाषा यांची सरमिसळ केली जाते. तसेच कथा पूर्णपणे बोलीभाषेतही लिहिली जाते.

वरील घटकांशिवाय प्रारंभ, मध्य आणि शेवट असे कथेचे सर्वसाधारणपणे तीन टप्पे मानले जातात. कथेच्या रचनाबंधाला यामुळे सौंदर्य प्राप्त होते. कथालेखनात वरील घटकांबरोबरच शीर्षकाचे महत्त्वसुद्धा अनन्यसाधारण आहे. सूचक व अर्थपूर्ण शीर्षक कथेचा आशय उलगडण्यास मदत करते.

कथा परंपरा म्हणजे एका समाजात, संस्कृतीत, किंवा भाषिक समूहात कथांची पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली सांगण्याची, जपण्याची आणि पुढे नेण्याची परंपरा होय. ही परंपरा तोंडी (वाचिक) स्वरूपात किंवा लिखित स्वरूपात असते. जगभरातल्या सर्व भाषात फार प्राचीन काळापासून गोष्ट सांगण्याची परंपरा आहे. तसेच मराठी भाषेत सुद्धा कथा सांगण्याची परंपरा आहे. आजी - आजोबा आपल्या नातवांना, लोक एकमेकांना रात्री शेकोटी भोवती बसून पशु - पक्ष्यांच्या, राजा - राणीच्या, गुराखी - शिकारी यांच्या गोष्टी सांगतात.

कथेचे प्रकार

प्राकृत साहित्यकारानी कथेचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केलेले आहे. "कोणत्याही कथनरूपामध्ये कथा असते, मात्र त्या त्या कथनरूपाच्या रचीच्या निराळेपणामुळे वेगवेगळी नावे दिलेली दिसतात. संस्कृत साहित्यकारांनी कथा आणि आख्यायिका हे भिन्त्र साहित्यप्रकार मानले होते. आख्यायिकेचा निवेदक नायक स्वतःच असतो, तर कथेमध्ये नायक किंवा अन्य कोणी कथनकर्ता असतो. कथा अथवा कथासमूहाचा निर्देश करताना कथा, आख्यायिका यांच्याप्रमाणे आख्यान, व्याख्यान, अन्वाख्यान, अनुव्याख्यान, इतिहास, पुराण, अर्थवाद हे शब्द आढळतात. अग्निपुराणात खण्डकथा, परिकथा, कथानिका अशा आणखी तीन संज्ञा आहेत. (भागवत, १९५६). 'ध्वन्यालोका'च्या सातव्या कारिकेत पदांच्या संघटनेचे नियमन करणारे कारण सांगताना काव्याचे १३ प्रकार सांगितले आहेत, ते असे: १. मुक्तक, २. संदानितक, ३. विशेषक, ४. कलापक, ५. कुलक, ६. पर्यायबंध, ७. परिकथा, ८. खंडकथा, ९. सकलकथा, १०. सर्गबंध, ११.

अभिनेयार्थ, १२. आख्यायिका, १३. कथा (वीरकर, पटवर्धन १९८७). त्यांतले पहिले सहा प्रकार सोडून उरलेले सात प्रकार हे कथनरूपाचे विविध प्रकार होते. हेमचंद्राच्या 'काव्यानुशासना'त कथेचे दहा प्रकार दिलेले आहेतः १. आख्यानम्, २. निदर्शनम्, ३. प्रवल्हिका, ४. मतल्लिका, ५. मणिकुल्या, ६. परिकथा, ७. खंडकथा, ८. सकलकथा, ९. उपकथा आणि १०. बृहत्कथा.

प्राकृत साहित्यकारांनी १. अर्थकथा, २. कामकथा, ३. धर्मकथा, आणि ४. संकीर्णकथा असे वर्गीकरण केलेले दिसते. (तगारे, १९८७). कुवलयमालाकथेचा कर्ता उद्योतनसूरी याने कथेचे वर्णन पुढीलप्रमाणे केलेले आहे 'सालंकृत, सुभग, ललित-पद असलेली, मृदू आणि मंजुळ संलाप करणारी ही कथासुंदरी सहृदय लोकांना नव-परिणीत वधूप्रमाणे आनंद देते सालंकारा, सुहया, ललियपया, मउय-मंजु-संलावा। सहियाण देइ हरिसं उव्वूढा णववहूचेव ॥'. या वर्णनात कथेच्या अथवा कथनरूपाच्या विशिष्ट प्रकाराचे वैशिष्ट्य सांगितलेले नाही. कथात्मतेविषयीचे हे विधान आहे. पाली साहित्यात 'जातक कथा' आहेत. जातक कथेची आठ अंगे असतात: १. गाधेच्या काही शब्दांचे अवतरण, २. बुद्धकालीन व्यक्तींचा उल्लेख, ३. बुद्धकालीन प्रसंगाची म्हणजे वर्तमानकथा, ४. पूर्वजन्मीची कथा सांगण्याची भूमिका, ५. पूर्वजन्मीची अथवा अतीत कथा, ६. गाथा, ७. तिच्या अर्थाचे विवरण, ८. जातकाची फोड-समोधान. (भागवत, १९७५),

वरील वर्गीकरणांमध्ये कथा या प्रकारातले उपप्रकार आणि कथनरूपांचे मित्र प्रकार आढळतात. मराठी साहित्यात कथनरूपाचे पुढील प्रकार आढळतातः कहाणी, लोककथा, नीतिकथा, लीळा, दृष्टान्त, आख्यान, चरित्र कथा, बखर, भारूड-रूपक, कथागीत. यांत आणखी काही प्रकारांचा समावेश करता येईलः गोष्ट, लघुकथा, दीर्घकथा, कादंबरी, रूपककथा, रहस्यकथा, व्यक्तिचित्रण, प्रवासकथन, आत्मकथन, आठवणी, इत्यादी. या वर्गीकरणातदेखील कथा-प्रकार आणि कथनरूप-प्रकार यांची सरमिसळ झालेली आहे. 'कथात्मता' हा या सर्व प्रकारांमधला सामान्य गुणधर्म होय.'' [७] या ठिकाणी आपण श्रमकथा व संकीर्ण कथा यांचे उदाहरणदाखल कथा पाहणार आहोत.

१) श्रम कथा

"श्रम कथा" म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या किंवा गटाच्या परिश्रम, मेहनत आणि कष्टाच्या कहाण्या. या कथांमध्ये एखाद्या कामगाराने, शेतकऱ्याने, कारागीराने, काम करणाऱ्या सामान्य माणसाने आपल्या मेहनतीने केलेल्या कार्याचा, संघर्षाचा, अडचणींचा आणि यशाचा प्रवास मांडलेला असतो. श्रम कथेचे उदाहरण खालील प्रमाणे.

१) कष्टकरी शेतकरी

गावाच्या बाहेर एक लहान शेतकरी – रामू राहत होता. त्याच्याकडे फारशी जमीन नव्हती, पण तो अत्यंत मेहनती होता. दररोज पहाटे उठून तो आपल्या शेतात राबायचा – कधी नांगरणी, कधी पेरणी, कधी पाणी आणायचं तर कधी कुंपण लावायचं.

गावातले काही लोक त्याच्यावर हसायचे – "एवढं राबून काय मिळणार तुला?" पण रामू फक्त हसायचा आणि म्हणायचा, "मेहनत कधीच वाया जात नाही."

संपूर्ण वर्षभर त्याने चिकाटीने शेती केली. पावसाने साथ दिली आणि रामूच्या शेतात सोनं पिकलं. जे लोक त्याला हसत होते, तेच त्याच्याकडे धान्य मागायला आले.

रामू म्हणाला, "हे सर्व श्रमाचं फळ आहे. मेहनत केली तर मातीही सोने होते."

२) संकीर्ण कथा

संकीर्ण कथा म्हणजे अवघ्या काही प्रसंगांमध्ये, थोडक्याच शब्दांत मांडलेली, मर्यादित व्यक्तीरेखा आणि मर्यादित कालावधीत घडणारी कथा होय.

१) ऐकावे तरी कोणाचे

एका गावात एक परीट होता. त्याचे नाव गंगाराम. त्याला एक मुलगा होता. त्याचे नाव महादेव. हे बापलेक दोघे मिळून काम करत. ओझी वाहण्यासाठी त्यांनी एक गाढव पाळले होते. गाढवावर ओझी लादून ते कधी नदीवर जात, तर कधी बाजारहाट करण्यासाठी तालुक्याच्या गावी जात.

एकदा काय झालं - बाजारहाट करण्यासाठी ते निघाले तालुक्याला. ओझं वाहून आणण्यासाठी त्यांनी गाढवालाही बरोबर घेतलं. जाताना काही ओझं नव्हतं. त्या दोघांबरोबर गाढव रिकामंच चाललं होतं. त्यांना पाहून एकजण म्हणाला, "काय गंगाराम, असे चालत काय निघालात? कोणी तरी बसा की त्या गाढवावर."

त्या माणसाचं म्हणणं गंगारामला पटले. तो आपल्या मुलाला म्हणाला, "महादू, तू बैस गाढवावर."

महादू म्हणाला, "मी चालेन. तुम्ही बसा."

यावर गंगाराम बोलला, "अरे, तू लहान आहेस; तू बैस, मी चालेन. वाटल्यास थोड्या वेळाने मी बसेन, तू चाल."

वडिलांचं ऐकून महादेव गाढवावर बसला. गंगाराम मागून चालत राहिला. वाटेत एकजण महादेवाला म्हणाला, "काय रे पोरा, तुला काही अक्कल आहे की नाही? आपल्या बापाला चालायला लावून तू आपला खुशाल बसला आहेस गाढवावर."

त्या माणसाचे हे बोल महादेवाच्या मनाला लागले. गाढवावरून खाली उतरत तो वडलांना म्हणाला, "बाबा, तो माणूस बोलला तेच बरोबर आहे. तुम्ही बसा, मी चालतो."

मुलाने आग्रह केल्यावर गंगाराम गाढवावर बसला. महादेव पायी निघाला. एवढ्यात आणखी कोणीतरी ओळखीचे भेटले. ते हसून बोलले, "काय गंगाराम! अरे, बाप आहेस का कोण? मुलाला पायी चालवतोस, आणि स्वतः खुशाल गाढवावर बसून आरामात निघाला आहेस. अरे, मुलाबद्दल काही माया?"

हे ऐकून गंगाराम चांगलाच खजील झाला. मग करावं तरी काय, असा त्याला प्रश्न पडला. एकदम त्याच्या मनात आलं आपण दोघेही बसलो तर !

तो म्हणाला, "महादू, असं कर, तूही बैस माझ्या मागे. आपण दोघेही बसलो म्हणजे मग आपल्याला कोणी बोलणार नाही, कोणी नावं ठेवणार नाही. बैस, बैस."

नाही. मग दोघेही बसले गाढवावर. त्यांना वाटलं, आता आपल्याला कोणी बोलणार

एवढ्यात त्यांना काही लोक समोरून येताना दिसले. त्यातील एक जण म्हणाला, "अरे गंगाराम, काय रे हे?"

भीत भीत गंगारामने विचारले, "काय झालं? चुकलं का काही आमचं?"

लोक हसले. त्यातील एक जण म्हणाला, "अरे, तुम्ही माणसं आहात का गाढव?"

गंगाराम म्हणाला, "असे काय केले आम्ही?"

"अरे गंगाराम, एवढ्याशा या लहान गाढवावर कुणीतरी एकाने बसायचं का दोघांनी? तुम्हाला काही दया-माया आहे की नाही?"

हे ऐकून दोघेही खाली उतरले, ऐकावं तरी कोणाचं हेच त्यांना कळेनासं झालं. मग महादेव वडलांना म्हणाला, "आपणच ह्या गाढवाला पाठीवर घेऊन जाऊ या."

कपाळाला हात लावत गंगाराम म्हणाला, "महादेवा, तरी लोक म्हणतील -अरे, तुम्ही माणसं आहात की गाढव?" ८

२) तेल गेले आणि तूपही गेले

आपला मुलगा मूर्खपणा करून अनेक वेळा आपल्याला तोंडघशी पाडतो हे अम्मीला (त्याच्या आईला) माहीत होतं. त्यामुळे ती त्याला जबाबदारीचं कसलंच काम सांगत नसे.

पण एक दिवस स्वयंपाक करताना तेल संपल्याचं तिच्या लक्षात आलं. दुकानावर जाऊन तेल घेऊन यायचं म्हटलं तर एवढा वेळ तिच्याजवळ नव्हता. म्हणून तिने शेखला हाक मारली आणि म्हणाली, “जरा दुकानावर जाऊन तेल घेऊन ये."

पैसे आणि पेला त्याच्याकडे देऊन ती म्हणाली, "तेल घेऊन ये. मात्र वाटेत कोठे सांडू नको. सांभाळून ये."

"त्याची तू चिंता करू नकोस." असे म्हणून उड्या मारीतच तो दुकानात गेला. त्याच्या मूर्खपणाच्या कथा दुकानदाराच्या पण कानावर होत्या. म्हणून दुकानदाराने विचारलं, "काय रे, काय पाहिजे?"

"तेल पाहिजे."

"पैसे आणलेस ना?"

"हे काय?" आपल्या मुठीतील पैसे दुकानदाराकडे देत तो म्हणाला. "आणि तेल कशात देऊ?"

दुकानदाराने विचारताच त्याने भांडं पुढं केलं. दुकानदाराने त्याच्यात तेल ओतलं; पण थोड्याच तेलाने पेला भरला. "अरे, हा तर भरला. पण अजून वीस पैशांचं तेल बाकी आहे. त्यासाठी दुसरं भांडं लागेल."

"दुसरे भांडे आता कुठून आणणार?"

"मग काय उरलेले पैसे परत देऊ?"

आहे." "नको नको. अम्मीने दिलेल्या सगळ्या पैशांचंच तेल आणायला सांगितलं

"मग दुसरं भांडं घेऊन ये."

परत घरी जाऊन दुसरं भांडं आणायचं त्याच्या जिवावर आलं. आता काय करावं बरं? तो विचार करू लागला. विचार करता करता त्याच्या लक्षात आलं. पेल्याचा तळ खोलगट आहे. त्याच्यात उरलेलं तेल घ्यावे, म्हणून पेला उलटा करीत तो म्हणाला, "याच्यात उरलेले तेल घाला."

पण तोपर्यंत पेल्यातील सगळं तेल जमिनीवर सांडून गेलं. जमीन खराब झाली म्हणून दुकानदार ओरडला, "मूर्खा, तेल ओतून माझी जमीन खराब केलीस. अरे अकलेच्या कांद्या, पेला उलटा केला तर तेल सांडेल एवढंही कळत नाही! आता उरलेलं तेल तरी व्यवस्थित घरी ने. आण तो पेला इकडे." दुकानदारही मूर्खच. त्याने उलट्या केलेल्या पेल्याच्या तळवटीत उरलेलं तेल दिलं.

उलटा पेला धरून शेख घरी आला. पेला उलटा धरलेला पाहून अम्मीच्या काळजात धस्स झालं. तिने विचारले, "पेला उलटा का धरला आहेस?"

"दुकानदाराने उरलेलं तेल तळवटीच्या खोलगट भागात दिलं. तीस पैशाच्या तेलाने पेला भरला. मग काय करणार? म्हणून वीस पैशांचं तेल तळवटीच्या भागात घेतलं.'

"म्हणजे तीस पैशांचं पेल्यातील तेल ओतून टाकलेस तर?" रागवून अम्मी म्हणाली.
अगदी शहाण्यासारखा शेख म्हणाला, "छे छे, तेल ओतायला मी काय मूर्ख आहे. हा बघ भरलेला पेला.'' असे म्हणून त्यानं पेला परत उलटा केला, तेव्हा तळवटीच्या भागातले तेलही जमिनीवर सांडलं.
"अरे मूर्खा, तेही तेल ओतून टाकलंस. खरंच रे तू मूर्ख पोर आहेस.
तुझ्यासारखा मूर्ख पोर जन्मात बघितला नाही मी." "अम्मी, तू कशाला रागवतेस माझ्यावर? मी काय केलं?"
"तू काहीच केलं नाहीस. मेल्या, तू धांदरट तो धांदरट."
"अगं, पण माझी चूक काय ते तरी सांग." शेखचिल्लीने विचारलं आणि अम्मी आणखी खवळली.
एवढं रामायण घडूनही तो आपली चूक काय म्हणून विचारतो. तिला वाटलं एक धपाटा घालावा पाठीत. पण त्याचा चेहरा इतका निरागस होता की, धपाटा घालण्याचा मोह तिने आवरला.
"माझी काहीच चूक नसताना तू मला का फाडफाड बोलते आहेस?" "नाही. तुझी चूक काहीच नाही. चूक माझीच. तुझ्यासारखा मूर्ख पोर जन्माला घातला ही माझीच चूक."[९]

३) खंड कथा

खंडकथा म्हणजे एका मोठ्या कथेतील (किंवा दीर्घकथानकातील) एखादा स्वतंत्र भाग किंवा विभाग, जो पूर्ण कथेत एक भाग असतो, पण तो स्वतंत्रपणेही वाचता येतो. याला इंग्रजीत "episode" किंवा "segment of a story" असे म्हणतात.

४) परिहास कथा

परिहासकथा म्हणजे विनोद, चेष्टा, चातुर्य आणि हसवणूक यांनी भरलेली कथा. विनोद, चेष्टा आणि चतुर उत्तरांवर आधारित, वाचकाला हसवणारी हलकी-फुलकी कथा म्हणजे परिहासकथा होय.

१) शहाणा न्हावी

गावातला एक न्हावी खूपच शहाणा म्हणून प्रसिद्ध होता.
एक दिवस एक ग्राहक त्याच्याकडे दाढी करून घेत होता.
दाढी करताना न्हावी म्हणाला,
“बाबा, हलू नका. मागच्या आठवड्यात एक जण हलला आणि माझा उस्तरा त्याच्या गालावर चालला.”
ग्राहक घाबरून विचारतो,

“मग त्याचं काय झालं?”

न्हावी शांतपणे म्हणतो,

“काय होणार? मी लगेच क्षमा मागितली आणि तोही शांत बसला.”

ग्राहक सुटकेचा निःश्वास टाकतो, तेव्हा न्हावी हसत म्हणतो,

“हो, पण त्याला आधी विचारलेच नाही की माझी क्षमा स्वीकारतो का!”

हे ऐकून ग्राहक दाढी सुटेल इतका थिजून बसतो.

२) गावचा भोळा माणूस

एका गावात एक भोळा माणूस रोज आरशात स्वतःकडे पाहून म्हणायचा,

“अरे देवा! हा तर रोज माझ्या घरातला दुसरा माणूसच आहे.”

एके दिवशी त्याचा मित्र म्हणाला,

“अरे, तो तूच आहेस रे!”

भोळा म्हणाला,

“असं कसं? तू माझ्यासोबत उभा राहतोस तरीही हा दुसरा माणूस मला दिसतो!”

मित्राने आरसा काढून त्याला पाठ करून धरला.

भोळा शांत होऊन म्हणाला,

“आता बरा झाला. तो माणूसही पळून गेला दिसतं!”

५) उल्लप कथा

उल्लप कथा हा महानुभव साहित्यातील दृष्टांतात्मक, बोधपर आणि संक्षिप्त कथा प्रकार आहे. या कथांमधून कोणता तरी नैतिक बोध अध्यात्मिक अर्थ किंवा जीवनातील सत्य सोप्या भाषेत सांगितले जाते. उल्लक कथा खालील प्रमाणे-

१) वेळेचे महत्त्व

एका बागेत कमळाचे फूल दररोज सूर्याकडे पाहून म्हणत असे,

“तुझ्यासारखे तेज माझ्यात का नाही?”

सूर्य शांतपणे त्याच्याकडे पाहत राहिला.

एके दिवशी दुपारी गरमी वाढली आणि सर्व फुले कोमेजू लागली.

पण कमळ पाण्यात असल्याने ताजेच राहिले.

पक्षी, मधमाशा आणि प्रवासी त्याच्याकडे आकर्षित झाले.

कमळ आश्चर्याने म्हणाले, “आज सगळे माझ्याकडे का येतात?”

सूर्य उत्तरला, "प्रत्येकाचा वेळ वेगळा असतो.
तू तुझ्या योग्य क्षणीच फुलतोस आणि चमकतोस."

५.२.५ गोष्ट

१) प्रेरणादायी गोष्ट: "छोटा दिवा"

एका शांत डोंगराच्या पायथ्याशी एक छोटंसं खेडं होतं. त्या खेड्यात वीरू नावाचा एक मुलगा राहत होता. वीरू हुशार, मेहनती पण फारच न्यूनगंडाने ग्रासलेला मुलगा होता.
"मी काही मोठं करू शकत नाही" — असं त्याला नेहमी वाटत असे.
दरवर्षी गावात दिवे बनवण्याची स्पर्धा होत असे. ज्याचा दिवा सर्वात जास्त प्रकाश देईल, त्याला इनाम मिळत असे. वीरूला दिवे बनवायला खूप आवडत होते, पण कधीही स्पर्धेत भाग घेण्याची हिंमत त्याने केली नव्हती.
एका दिवशी, गावातील वृद्ध काका—दत्ताभाऊ—त्याला म्हणाले:
"अरे वीरू, प्रत्येक मोठ्या मशालीची सुरुवातही एका छोट्याशा दिव्यापासूनच होते. तुझ्यावर तूच विश्वास ठेवला नाहीस, तर इतर कोण ठेवणार?"
त्या शब्दांनी वीरूच्या मनात काहीतरी जागं झालं.
तो घरी गेला, लाकूड, माती, तेल, वात—सगळं गोळा केलं. अनेक दिवस प्रयत्न केले. दिवा कधी मोडायचा, कधी धुराळायचा, कधी पेटणारच नाही… पण वीरूने हार मानली नाही.
स्पर्धेच्या दिवशी मोठमोठे दिवे चमकत होते. वीरूचा दिवा छोटासा दिसत होता… पण जसा सूर्य मावळला तसे चमत्कार झाला.
इतरांचे दिवे वारा, धूर, उष्णतेने थरथर कापत विझू लागले. पण वीरूचा दिवा मात्र स्थिर आणि उजळ पेटलेला राहिला.
मुख्य न्यायाधीश म्हणाले: "हा दिवा छोटा आहे… पण महत्त्वाचं त्याचं आकार नाही—त्याचा धैर्य! हा दिवा दाखवतो की स्थिर राहणं महत्त्वाचं असतं."
वीरू पहिला आला.
त्या दिवसानंतर त्याला एक गोष्ट समजली—
"तुम्ही किती मोठे आहात याने फरक पडत नाही…
तुम्ही किती धैर्याने पेटून राहता याने पडतो."

५.२.६ कायनी (कोडे)

कोडे किंवा कायनी किंवा यालाच ग्रामीण भाषेत आयना असे देखील म्हणतात. जून्या काळात मनोरंजनाची साधने अत्यंत कमी होती तेंव्हा त्या काळात सायंकाळी लोक कोडे एकमेकांना सांगत असे. आजही खेड्यापाड्यात आजी आपल्या नातवाला कोडे सांगतांना दिसतात. कोडे म्हणते ऐकायला सोपे मात्र त्याचे उत्तर हे अत्यंत तर्काने द्यावे असे होय.

कोडे किंवा कायनी यालाच कुट रचना असे देखील म्हणतात. कुट रचना या प्रामुख्याने संत साहित्यात पहावयास मिळतात. कोडे किंवा कुट रचना या दोन प्रकारच्या असतात. एक अर्थ कुट व दुसरे शब्द कुट हे दोन प्रकार प्रामुख्याने हाय. अर्थ कुटामध्ये अर्थ समजतात पण शब्द समजत नाही. तर शब्द कुटामध्ये शब्द समजतात अर्थ समजत नाही.कोडं याचे काही उदाहरणं पुढील प्रमाणे होय…

i) अशी कोणती गोष्ट आहे जे बोलताच तुटून जाते. - **मौन**

ii) अशी कोणती गोष्ट आहे जी पहिले लाल असते आणि पाणी दिल्यानंतर काळी होऊन जाते. - **आग**

iii) हिरवं छप्पर, लाल घर लपून बसलेत हजार चोर - **कलिंगड**

iv) तिरपा डोळा कोट काळा खाण्यावर त्याचा नेहमी डोळा - **कावळा**

v) असे कोणते वाक्य आहे जो गरीब ऐकून खुश होतो आणि श्रीमंत ऐकून दुःखी होतो. - **हे दिवस पण जातील**

vi) अशी कोणती गोष्ट आहे जिला माणूस लपवून चालतो पण स्त्रिया दाखवून चालतात - **पर्स**

vii) कोकणातून येतो देश-विदेशात जातो मोठेही याला बघून होतात लहान असा याचा महिमा महान पिवळा केशरी रंगाचा ओळखा कोण - **आंबा**

viii) दोन पाय मोठे दोन पाय लहान शेतात राबतो ताकद महान – **ट्रॅक्टर**

५.३ महानुभव साहित्य

मध्ययुगीन कालखंड हा महाराष्ट्राच्या व भाषेच्या सर्वांगीण इतिहासाचे एक प्रमुख अंग आहे. हा कालखंड म्हणजे सुमारे तेराव्या शतकापासून सातत्याने ग्रंथनिर्मिती होत जाऊन मराठी साहित्याची जी परंपरा निर्माण झाली ती परंपराच मराठी भाषेला समृद्ध करतांना दिसते. यामध्ये संत परंपरा, पंत परंपरा व तंत परंपरा आदी येतात.

सर्व सामान्य लोकांच्या धर्मभावनेला आध्यात्मिक अधिष्ठान मिळवून देण्याच्या प्रेरणेनेच मराठी भाषेचे वाङ्मय त्या त्या काळात निर्माण झाले. त्यामुळे मराठी भाषेला ललामभूत झालेले बहुतेक साहित्य हे मुख्यतः आध्यात्मिक स्वरूपाचे असून ते नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, समर्थ इत्यादी धर्म पंथीयांकडून लिहिले गेल्याचे दिसते. पौराणिक धर्मातील विषमतेला विरोध करून बहुजन समाजाला मानसिक गुलामगिरी विरूद्ध जागृती करण्याचे कार्य पूर्वी पासूनच अनेक संप्रदाय करीत होते. यामध्ये जैन, शैव, वैष्णव, लिंगायत, इत्यादी संप्रदायांनी संस्कृत भाषेचा अडसर दूर करून लोकांना लोकांच्या भाषेत उपदेश केला व जागृती करण्याचे कार्य केले असल्याचे दिसून येते. यात प्रामुख्याने वारकरी व महानुभाव संप्रदायातील संत मोठ्या प्रमाणात दिसतात.

इये मराठीचीया नगरी । ब्रह्म विद्येचा सुकाळू करी
घेणे देणे सुखची वरी । होवू दे या जगा॥
माझा मराठाचि बोले कवतुके । परी अमृतातेही पैजा
जिंके । ऐसे अक्षरे रसिके मेळविण॥

या स्वरूपाचे मराठी भाषेचे वर्णन संत ज्ञानेश्वर करतात. वारकरी संप्रदाया प्रमाणेच महानुभाव पंथाने देखील मराठी भाषा ही सर्वमान्य भाषा मानून त्या भाषेतच ग्रंथांचे लिखाण केले आहे.

बाराव्या शतकात उदयाला आलेला एक विचार प्रवाह म्हणजे महानुभाव पंथ होय. महानुभाव म्हणजे " महान अनु भाव स्तेजोबलं वा यस्य स महानुभावा" ज्याचा अनुभव महान आहे. ज्याच्या ठिकाणी तेज, बल यांची समृद्धी आहे, त्यालाच महानुभाव असे म्हटले जाते. पंथ म्हणजे मार्ग अर्थात मोठ्या तेजाने युक्त असलेल्या लोकांचा जो मार्ग त्यालाच महानुभाव असे म्हणतात. या महानुभाव पंथाचा स्वीकार करण्यासाठी १) द्युत २) मद्य ३) मांस ४) वेश्या ५) शिकार ६) चोरी ७) देवताभक्ती यांचा त्याग करून जो ईश्वराला अनन्यभावे शरण जाण्याची दृढ प्रतिज्ञा करतो तोच महानुभाव पंथाचा अनुयायी होऊ शकतो. महानुभाव पंथ हा प्रामुख्याने द्वैतवादी संप्रदाय आहे. श्री चक्रधर स्वामींनी द्वैतवादाची स्थापना केली. त्यांच्या मते जीव व शिव किंवा आत्मा परमात्मा या गोष्टी पूर्णतः भिन्न आहेत. श्री चक्रधरांनी चार पदार्थांचे प्रतिपादन केले आहे. जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर या चार वस्तू होत. आणि या चारही पदार्थांचे स्वरूप भिन्न भिन्न सांगितले आहे. डोळ्यांनी दिसणार्या सृष्टीच्या मागे काय रहस्य आहे किंवा या रचने मागचा ईश्वराचा उद्देश काय आहे, हे महानुभाव तत्वज्ञानात पाहावयास मिळते. महानुभावांचा उत्पतीचा व सृष्टीच्या संहाराचा सिद्धांत भारतीय दर्शनास अनोखा आहे.

मराठी भाषेचा आग्रह -

श्री चक्रधर स्वामींनी मराठी भाषेतून आपल्या द्वैत मताची सविस्तर व शास्त्र शुध्द मांडणी केली. श्री चक्रधर ज्या काळात वावरत होते त्या काळातील सामाजिक पास्थितिचा विचार केला तर असे लक्षात येते, की परमार्थाच्या नावावर सर्व सामान्यांचे शोषण चालले होते. याच काळात हेमाद्रीनी चर्तुवर्ग चिंतामणी ग्रंथ लिहिला. वर्णाश्राम धर्मामुळे सामान्यांची स्थिती अत्यंत नाजूक झाली होती. याचे अनेक पुरावे लीळा चरित्रात व समकालीन इतर वाङ्मयात पाहता येतील. या पार्श्वभूमीवर अशा गांजलेल्या समाजाला एक भावनिक दिलासा देणे, आधार देणे हे श्री चक्रधरांनी आपले कर्तव्य समजले.उपनिषद, ब्रह्मसूत्रे, श्री गीता ही हिंदूची प्रस्थानत्रयी संस्कृत मध्ये असल्याने बहुजन समाज हा ज्ञानापासून वंचित राहिलेला होता. श्री चक्रधरांना लोकदुःख निवारण्याची खरी तळमळ लागली होती व म्हणून त्यांनी देव वाणी त्वाचा दिमाख मिरवणारया संस्कृतला बाजूला सारले आणि लोक वाणीचा आग्रहपूर्वक व अभिमान पूर्वक आश्रय घेतला.या बाबत महंत कारंजेकर बाबा म्हणतात की, मराठीची भाषिक ताकद महानुभाव पंडित कवींनी ओळखली. म्हणूनच त्यांनी सारे कौशल्य मराठी भाषेतून अभिव्यक्त केले. यादवकालीन महानुभाव साहित्य मराठीचा प्राचीनतम कालखंड निश्चित करते. महानुभाव कवींनी मराठीची थोरवी तर गायिलीच पण संस्कृत पंडित असूनही आपल्या काव्यात कोठेही संस्कृतचे आक्रमण होऊ दिले नाही. यादव काळात परिपक्व स्वरूपात दिसणारी अभिजात मराठी भाषा या कालखंडातील सर्वसामान्य लोकांची व्यवहार भाषा म्हणजेच जनभाषा होती. या जनभाषेला महानुभावांनी सर्वप्रथम ज्ञानभाषेचे स्थान देऊन आपले सर्व तत्वज्ञान मराठीतून सांगितले. महानुभावांमुळे तीफक्त व्यवहार भाषाच राहिली नाही तर तिला ग्रांथिक भाषेचे स्थान मिळले. महानुभावांची परंपरा ही पंडितांची परंपरा असूनही त्यांनी मराठी भाषेचे श्रेष्ठत्व मान्य केले आहे.' रुक्मिणी स्वयंवर कर्ते कवी गोपाळमूनी लिहितात-

'संस्कृत शब्द उच्चार। सर्व जगी न घडे व्यापार
जैसे मार्गिआडीचे नीर। तृष वंतासी
तैसे नव्हे मराठी गंगा। ते मुक्त जीवन सर्व जगा
आणि पापक्षालणी प्रसंगा। पवित्रपणे'

तर संतोष मुनी देखील मराठी भाषेचा गुण गौरव करतात ते म्हणतात,

"जैसी स्नेहाळु जननी: अपत्ये वागवी करीं धरूनि:
तैसी षडुभाषा लागौनि: व्यापारवीत असे

येणे श्रोते कोपती झणी: म्हणती संस्कृत तंव देववाणी :
तियेसी उपमा कां रे साणी: दिधली तुवां॥
तरि सांधैन येकु परिहारू: आइका करूनिया विचारू
हा सहजचि शब्द उच्चारू: घटना ऐसीचि असे॥
मराठी स्त्रीलिंग वाइक (वाक्य): आणि संस्कृत तव नपुंसक:
म्हणौनि बाळकत्व आइक: तेयासीचि साजे॥

५.३.१ लिप्यांचा विकास

मराठी लेखनाच्या विकासखुणा प्राचीन काळपासून बघता येतात. आज आपण देवनागरी लिपीत लिहीतो. पूर्वी छपाईची सोय नव्हती परंतु अशा काळात देखील आपला विचार विविध हस्तलिखितांच्या माध्यमातून मठांमध्ये महानुभावानी आजही जतन केले असल्याचे दिसते. मठांमध्ये असलेल्या पोथ्या यांचा देखील अभ्यास महत्वाचा ठरतो. अभिजात भाषेच्या संदर्भात महानुभावीय ग्रंथकारांनी केलेली निर्मिती मोलाचीच आहे याबाबत डॉ. सतीश बडवे असे म्हणतात, "महानुभाव संप्रदाय हा १३ व्या शतकातला महत्वाचा संप्रदाय आहे. मुख्य म्हणजे भाषा व वाङ्मय निर्मिती या दृष्टीने झालेली कामगिरी मौलिक स्वरूपाची आहे. जैन, बौद्ध, महानुभाव, आणि शीख या संप्रदायांनी आपली बोलीभाषा, लिपी व ग्रंथांची जाणीवपूर्वक निर्मिती केलेली दिसते. सकळ लिपी हीच महानुभावांची लिपी होती. त्यातून आरंभी निर्माण केलेल्या 'सकळ ' लिपी प्रमाणे सुंदरी लिपी, अंक लिपी, वज्र लिपी, मनोहर लिपी, परिमांड लय लिपी, तळेगावकर लिपी, आरसा लिपी अशा सुमारे २५ लिप्या तयार झाल्या असल्याचे दिसते."[१०]

५.३.२ लिळाचरित्र

महानुभाव संप्रदायामध्ये ज्या ग्रंथाला अत्यंत अनन्य साधारण महत्व आहे तो ग्रंथ म्हणजे लीळा चरित्र होय. लीळा चरित्र हा ग्रंथ मराठी मधील पहिला चरित्र ग्रंथ म्हणून ओळखल्या जातो. लीळा चरित्र हा ग्रंथ म्हणजे श्री चक्रधर स्वामी यांच्या लीळा म्हणजे (आठवणी) त्यांच्या शिष्याने संकलित करून चरित्र रूपाने मांडल्या आहेत. लीळा चरित्र म्हणजे महानुभावीय वाङ्मय आणि तत्वज्ञानाचा मूलाधारच होय. या ग्रंथातील चक्रधरांच्या वचनांच्या आधारेच पुढे सूत्रपाठ, दृष्टान्त पाठ, रत्नमालास्तोत्र इत्यादी ग्रंथांची निर्मिती झाली. काही लीळा खालिल प्रमाणे

१) गाव अज्ञात

माहादाइसी पुसिलें: ''जी जी: वाचा किती जी?'' सर्वज्ञें म्हणीतलें: ''बाइ: वाचा चारि:'' ''तिया कवणी जी?'' सर्वज्ञें म्हणीतलें: ''परा: पस्यंती: मध्यमा: वैखरी:०१ परा ते इश्वरीची: पस्यंती

सीधाचां ठाइ: मध्यमा ते देवाचां ठाइ: वैखरी ते मनुष्याचा ठाइ: चैतन्योद्भाव परा यंत्रोद्भावा वैखरी:०२ तालोष्टपुट यंत्रोद्भवा वैखरी:०३ व्यापारे दंत: जिव्हा: ताळिका: एंत्र द्वारे वैखरीचा उद्भव:१ याते वैखरी बोलिजे:''२ वैखरी द्वारे परेचा व्यापार:०४ सिद्धांचा ठाइ पस्यंती: दैवाचा ठाइ मध्यमा: मनुष्याचा ठाइ वैखरी:०५ ऐसे गोसावी निरुपण केले: :॥२८॥:

अर्थ :-

वाचा किती त्याचे निरुपण - महादाईसांनी विचारले, ''जी जी, वाचा किती जी?'' सर्वज्ञ म्हणाले, ''बाई, वाचा चार आहेत.'' ''त्या कोणत्या जी?'' सर्वज्ञ म्हणाले, ''परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी. परा ते ईश्वरीची. पस्यंती सिद्धाच्या ठिकाणी असते. मध्यमा ते देवाच्या ठिकाणी असते. वैखरी मानवाची भाषा असते. चैतन्योद्भव परा, तालोष्टपुट व्यापारे दंत, जिव्हा, ताळिका यंत्रद्वारे वैखरीचा उद्भव. त्यास वैखरी म्हणावे.'' ऐसे गोसावी निरुपण केले.

लीळा याला आपण कहाणी म्हणायचे की कथागीत याबाबतचे विविध संदर्भ मराठीतील कथनरूपे या पुस्तकातून वसंत आबाजी डहाके यांनी दिलेले आहेत. " कहाणी आणि कथागीत या मौखिक कथनरूपांकडून आता लिखित कथनरूपांकडे वळायचे आहे. 'लीळाचरित्र' या मराठीतल्या आद्य उपलब्ध ग्रंथात लोककथांचे व लोकगीतांचे विविध संदर्भ आढळतात. कोणत्याही समाजाच्या लिखित साहित्यामागे मौखिक साहित्याचा वारसा असतो. त्या त्या काळात जगत असलेल्यांच्या सांस्कृतिक अवकाशपटात मौखिक साहित्याचीही वीण असते. याचे प्रत्यंतर 'लीळाचरित्रा'त येते. सारंगपंडितांच्या धानाइला चक्रधरांनी सांगितलेली 'साळेचे घर मेणाचे : काउळेयाचे घर सेणाचे' ही कहाणी प्रसिद्धच आहे. धादुलमोक्षकथन, बळिपाभक्तिकथन, पेंधेया भावोकथन इत्यादी लोककथांचा उल्लेख तुळपुळे यांनी केलेला आहे. (तुळपुळे, १९८४). लोककथांचे नुस्ते उल्लेखच नव्हे तर त्यांतील कथनशैलीचे अस्तित्व 'लीळाचरित्रा' दी ग्रंथांतून जाणवते. (कुलकर्णी१९९१). लीळाचरित्र' ही एक लिखित संहिता असली तरी मौखिक कवनाचे गुणधर्म च्या उतरलेले आहेत. व. दि. कुलकर्णी यांच्या मते 'लीळाचरित्र लेखन नमून ळाचरित्र कथन' आहे. (कुलकर्णी, १९६७).

'लीळा' हे एक कथनरूप आहे. अनेक लीळा मिळून 'लीळाचरित्र' संघटित आलेले असले तरी प्रत्येक लीळा स्वतंत्र आहे. प्रत्यक्षातल्या व्यक्तींचे बोलणे आणि त्याच्या संदर्भातल्या घटनांचे कथन लीळेमध्ये असते, तसेच त्या त्या व्यक्तींच्या बोलण्यातून, कथनातून, संभाषितातून व्यक्त होत असलेल्या कल्पित कथांचे, आख्यायिकांचे, दृष्टान्तांचे कथनही लीळेत केले जाते. लीळा हे कथनरूप आहे हे आनेराजबास यांच्या 'लक्षणरत्नाकरा' वरील 'बत्तीस लक्षणी टीपे' बरून दिसून

येतेः 'जेब गोष्टी, मात, कथा, वार्ता, आख्यायिकाते' लीळावाक्य बोलिजेः अज्ञाननिवृत्ति लागी की सदेहनिवृत्ति लागी जे वृत्तांतू सांगिजे ते गोष्टिः यथा कामाख्यानिमित्ते पुरत्यागुः आश्चर्यकारक जे गोष्टि भविष्यरूप ते मात बोलिजे एवं आदि द्वापाराचिया अबबा आपुल्या मागिलिया एकांकाचियाः लीळा सांघितिलिया तिया कथा : भक्ता विद्यमान जे वर्तले त्या बार्ताः पुराणव्यतिरिक्त कथारूप गोष्टि ते आख्यायिका'. (कुलकर्णी, १९९१), गोष्टी, मात, कथा, वार्ता आणि आख्यायिका अशी लीळेची पाच अंगे असतात. हे कथात्मकतेचे (1) घटक लक्षात घेऊन 'लीळाचरित्र' हा रूढ अथनि चरित्रग्रंथ नसून लोककथांचा तोंडवळा असलेला तो एक कथासंग्रह असल्याचे मत कुलकर्णी (१९९१) व्यक्त करतात.

'लीळाचरित्रा'चे लोककथनरूपाशी असलेले नाते आणि ते स्वतः एक कथनरूप असणे हे कोणत्याही लीळेच्या आधारे दाखवता येईल. लोककथनरूपाच्या कथनपद्धतीचा म्हाइंभटांवर संस्कार असला तरी लीळांचे लेखन करताना शब्दबंध, शब्दक्रम, वाक्यविन्यास, वाक्यांची जुळणी, परिच्छेदाची रचना या गोष्टींमध्ये त्यांची सर्जनशीलता दिसून येते. कमीत कमी पात्रे, कमीतकमी घटना अथवा प्रसंग आणि त्यांचा एकसंध परिणाम हे लीळेचे वैशिष्ट्य आहे. बोलीभाषेतल्या छोट्या छोट्या वाक्यांची चढत्या पायऱ्यांची रचना असल्यामुळे लीळा अर्थसघन होत जाते. त्यांतून घटना-प्रसंग मूर्त होतात तसे व्यक्तींचे, पात्रांचे स्वभावविशेषही प्रकट होतात.

उदाहरणार्थ, एक लीळा : वामदेवा भूतसृष्टि दाखवणे.

१. एकु दीसु २. संध्याकाळच्या वेळी गोसावी भोगावतीकडे जातात. ३. सोबत वामदेव असतात. ४. आणखी कोणी नसतं. ५. गोसावी मार्गावरच्या पिंपळाच्या पूर्वेकडच्या फांदीखाली उभे राहिले. ६. मग वामदेवाला विचारलं. ७. आपणयां काइ वश्य. ८. जी. जी. भूतसृष्टि ९. पांः एथ दाखवा १०. हो कां जी ११. मग ते मंत्रपूर्वक पाचारण करू लागले. १२. तेव्हा कोणीही येत नाही. १४. मग ते म्हणाले. १५. जी. जी. एके कोल्हापूरा गेली एके मातापूरा गेली १६. सर्वज्ञांनी म्हटले : एथौनि बोलाविजतु १७. हो कां जी

१७. आणि : गोसाव्यांनी फुटेयाचा पालव करून अशी बोलावली १८. आणि येऊ लागली १९. पहिल्यांदा दृष्टे आली २०. मग श्रुतें आली २१. मग श्रुतें नाहीत आणि दृष्टे नाहीत अशी आली २२. एकाचे नुसते मस्तक आले २३. एकाचे वाट्यांएवढे आरक्त डोळे आले २४. खाऊ की गिळू अशा विकराळ दाढा २५. ओठ चाटत असलेली २६. एकाचे डोके आकाशाला भिडलेले. २७. एक ब्रह्मांड गिळील असे. २८. अशी पाहिली २९. आणि (वामदेव) भ्यायले ३०. आता परिहरिजो जो: परिहरिजी जी : म्हणून ३१. फुटेयाच्या पालवाचा पीळा घेतला ३२. मग गोसाव्यांनी फुटेयाच्या

पालवाने परत पाठवली. ३३. मग सर्वज्ञांनी म्हटले : तुम्हां भूतसृष्टि वश्ये की ३४. ते (वामदेव) उगेच राहिले. ३५. गोसावी मढाकडे निघून गेले.

या लीळेत कालक्रमानुसार घटनेचे कथन आहे. चक्रधर आणि वामदेव या दोन व्यक्ती अथवा पात्रे आहेत. त्यांच्यातला संवाद आहे. त्यांच्या कृती आहेत. त्यांचा प्रभाव आहे. चक्रधर आणि वामदेव यांची स्वभाववैशिष्ट्येही आहेत. कमीतकमी पात्रे आणि कमीतकमी घटना, कमीतकमी कृती आणि या सगळ्यांचा एकसंध परिणाम या दृष्टीने ही लीळा परिपूर्ण आहे. घटना-कृतींचे निवेदन कालक्रमानुसारी असले तरी त्यातून चक्रघर आणि वामदेव यांच्या कृतींमधील विरोधाचा ताण सबंध लीळेत पसरलेला दिसतो.

स्वप्न, स्वप्न की भास की प्रत्यक्ष असा भ्रम. मग भटोबासांनी स्वप्नाचा लावलेला अर्थ. त्याने सर्वांची होणारी स्थिती. 'लीळाचरित्र' आणि 'स्मृतिस्थळ' या दोन्ही ग्रंथांमधील लीळांमध्ये अथवा स्मृतींमध्ये घटितांचे कथन कथात्मता निर्माण करते."[११]

२) मराठी काव्याचा मुकुटमणी "धवळे"-

मराठी भाषेला प्रथमच काव्यात्म आविष्कार प्राप्त करून देणारी महानुभाव संप्रदायातील महदंबा ही मराठीतील आद्य कवियत्री होय. जालना जिल्ह्यातील रामसगाव येथे महदंबेचा जन्म झाला.' आद्य मराठी कवयित्री महदंबा या ग्रंथात वा. ना. देशपांडे यांनी महदाइसेचा काळ अंदाजे श. ११६४ ते १२३४ (इ.स. १२४२ ते १३१२) असा दिला आहे. महदंबा या महदाइसा, रुपाइसा नावांनीही ओळखल्या जातात.

महदंबा अत्यंत प्रतिभा संपन्न होत्या व चक्रधरांच्या एकनिष्ठ शिष्य होत्या ह्या बाबत देवेंद्र भुजबळ, सकाळ च्या सर्वज्ञ अंकात लिहितात, महदाइसा जशा विरक्त तशाच चर्चिक व जिज्ञासूही होत्या. पुराण ऐकल्यानंतर स्वामींना नानातरेने प्रश्न विचारून आपली जिज्ञासा त्या तृप्त करी. स्वामींनी त्यांच्या बद्दल ' म्हातारी जिज्ञासक : म्हातारी चर्चक: म्हातारी एथ काही पुसतच असे ' असे उद्गार काढले. महदंबेच्या नावावर धवळे, मातृका रूक्मिणी स्वयंवर, गर्भकांड ओव्या, काही स्फूट पदे आदी रचना आहेत. त्यात सर्वात सहज सुंदर काव्य म्हणजे धवळे होय. श्रीकृष्ण विषयक भक्तिभाव धवळे निर्मितीची उत्स्फूर्त प्रेरक शक्ती आहे. धवळयांची परंपरा विवाह - गीतांतून आलेली आहे. एकदा श्री गोविंद प्रभूनां विवाह प्रवृती झाली. वधू हजर नसतानाही हा सोहळा थाटात पार पडला. यावेळी श्रीकृष्णास नवरदेव समजून रुक्मिणी स्वयंवर गाऊ लागली. चार दिवस तिने हे गाणे गायले व श्री गोविंद प्रभूंनी ऐकले. महदाइसेने गायलेले गीत म्हणजेच ' धवळें ' होय.

५.३.३ महानुभावीय इतर वाङ्मयीन ग्रंथ

'श्री गोविंद प्रभू चरित्र 'ह्यालाच ऋद्धिपूरलीळा, किंवा ऋद्धिपूर चरित्र असा केला जातो. ह्या ग्रंथांत चक्रधरांचे परमगुरू श्री गोविंद प्रभूंचा जीवनपट स्मृति रूपाने रंगविला आहे. 'दृष्टान्तपाठ 'महानुभावांचे तत्वज्ञान लोकजीवनात सुलभ भाषेत सांगण्यासाठी चक्रधरांनी अनेक दृष्टांत दिले आहे. हे दृष्टांत लोकजीवनातून निवडलेले असत. ह्या ग्रंथांत एकूण ११४ दृष्टांताचे संपादन असून हे दृष्टांत म्हणजे उपदेशपर कथाच आहेत असे म्हणण्यास हरकत नाही. 'सूत्रपाठ 'लीळा चरित्रात चक्रधरांच्या तोंडी जी सूत्रे आली आहेत त्यांचे क्रमवार संपादन केसोबास यांनी इ.स. १२८० शके १२०२ च्या सुमारास केले. यात एकूण १२५५ सूत्रे आहेत. 'मूर्तिप्रकाश' केसोबांसांनी ह्या ग्रंथांची रचना केली असून यात श्री चक्रधर मूर्तीचे वर्णन आले असून त्यातूनच चक्रधरांच्या तत्वज्ञानाचे निरूपण केले आहे.' स्थानपोथी ' आणि गद्यराज हे देखील उल्लेखनीय ग्रंथ आहेत. स्थानपोथी ही पंथीय दृष्टिकोणातून महत्वाची आहे. यात धार्मिक आणि भौगोलिक माहितीही तिच्यात बरीचशी मिळते. ११९ गावे आणि १५३ देवदेवतांचे उल्लेख त्यात सापडतात. श्री चक्रधर, श्री गोविंदप्रभू यांच्या स्पशाने पुनीत झालेल्या स्थळांची माहिती एकत्र मिळते. याशिवाय स्मृतिस्थळ, मातृकी रुक्मिणी स्वयंवर, सातीग्रंथ,शिशुपालवध, उद्धवगीता, वछाहरण, ज्ञानप्रबोध, सह्याद्री वर्णन, श्री ऋध्दिपूर वर्णन, आदी ग्रंथ महानुभावां संप्रदायात महत्वाची मानली जातात." [१२]

५.४ संत साहित्य

मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने मध्ययुगीन कालखंड हा मराठी भाषेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असल्याचे दिसते. हा कालखंड मराठी भाषेच्या अनुषंगाने अनेक पैलू पाडणारा होता. महानुभाव व वारकरी,शैव, दत्त, समर्थ आदी संप्रदाय महाराष्ट्रात कार्य करत होते. याच कालखंडात ह्या विविध संप्रदायीक संतांनी बहुविध अशी ग्रंथ रचना केल्याचे दिसून येते. त्यांनी त्यांच्या ग्रंथ रचना करण्यासाठी व आपला विचार मांडण्यासाठी तसेच सांप्रदायिक प्रचार व प्रसार करण्यासाठी मराठी भाषेचा पुरस्कार केला व मराठी भाषेतच ग्रंथ रचना केल्याची दिसते. प्रामुख्याने महानुभाव पंथीयांनी लीळाचरित्र, दृष्टांत पाठ,साती ग्रंथ व आदी पंथीय ग्रंथ रचना मराठीत केल्याचे आपणास दिसते. वारकरी संप्रदायिक संतांनी देखील आपली ग्रंथ रचना मराठीत केली.. यात संत नामदेवांनी तर मराठी भाषेचा झेंडा भक्ती प्रचार व प्रसाराच्या माध्यमांतून अटकेपार लावला आहे. त्यांनी तीर्थ यात्रेचे भ्रमण करत करत पंजाब मधील घुमान पर्यंत ही परंपरा नेऊन पोहचवली आहे.

नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ॥

"कीर्तन परंपरेच्या माध्यमातून महाराष्ट्र मधील भक्ती, ज्ञान, वैराग्याला झेंडा घुमान, पंजाब पर्यंत नेण्याचे कार्य संत नामदेवांनी केले आहे. इतकेच नव्हे तर शीख धर्मीया मध्ये सुद्धा गुरु ग्रंथ साहिब या ग्रंथांत देखील जवळपास २५ अभंगांचा समावेश आहे. त्यांना शीख धर्मीय भगवान नामदेव असे म्हणतात. संत नामदेवांनी मराठी भाषेचा पुरस्कार करून तो झेंडा अटकेपार नेला आहे. संत नामदेवांच्या कवित्वा बाबत प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप या ग्रंथात ह. श्री. शेणोलीकर म्हणतात, नामदेवांनी ज्ञानेश्वरांनी भावंडांचे चरित्र आधी तीर्थावळी व समाधी या तीन ओवीबद्ध प्रकरणात ग्रंथीत केले आहे ज्ञानेश्वरांचे पहिले अधिकृत चरित्रकार नामदेवच होय या चरित्राचे धाटणी पौराणिक थाटाची असली तरी प्रत्यक्षावलोकनाचा आधार या माहितीला असल्याने त्याचे ऐतिहासिक महत्त्व फार मोठे आहे ज्ञानेश्वरांबद्दल नामदेवांच्या ठिकाणी पराकष्टीची पूज्य बुद्धी असल्याने हे निवेदन अत्यंत रसाळ उतरले आहे या प्रकरणात व काही अभंगात नामदेवांनी आत्मचरित्र हे निवेदन केले आहे तेव्हा प्राचीन मराठी वाङ्मयात पहिल्या आत्मचरित्रकाराचा मान संत नामदेवांकडे जातो."[१३]

नामदेवांच्या अभंगातून त्यांच्या त्यावेळच्या प्रबळ अशा मनोवृत्तीचा स्वाभाविक अविष्कार झाला आहे या अभंगवाणीत विठ्ठल प्रीतीची अर्थता आणि उत्कटता दिसून येते शब्दा शब्दांत आत्मसर्पणाची अशी मूळ व्यक्त होते त्यांच्या करुणावर अभंगात गतजीवना बद्दलचा तीव्र अनुताप आणि आत्मविकासाची अनिवार उत्कंठा आढळते भगवत प्रेमाच्या विविध छटा निरनिराळ्या भूमिकांद्वारे सहजतेने साकार करण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे त्या दृष्टीने कारुण्य आणि वात्सल्य अचूक की आणि अवदास्य इत्यादी विविध व्यक्त करणारे विठ्ठला बरोबरच्या सुखसंवादाची त्यांची अभंग उत्कृष्ट आहेत नामदेवांचे काही अभंग उद्देश परहित आहेत भक्ती मार्गाशी विरोध असलेल्या बद्दल ते तितकारा दाखवतात त्यांच्या भाव कोमल आणि भाव मधुर अशा आत्मनिष्ठ काव्यामुळे मराठी साहित्यात भावकवितेचे नवे दालन उघडले जाऊन महाराष्ट्र शारदेला भाव संपन्नतेचे अवलोकिक ऐश्वर्य लाभले आहे..

वारकरी संप्रदायातील इतर संतांनी देखील संत नामदेवांचे उज्वल उदाहरण डोळ्यापुढे ठेवून वारकरी संप्रदायातील इतर संतांनी देखील अभंग रचना व इतर वाड्मय निर्मिती केल्याची दिसते. संत ज्ञानेश्वर, संत निवृती नाथ, संत सोपान, संत मुक्ताबाई, संत सावता, संत गोरा कुंभार, जगमित्र नागा, नरहरी सोनार, चोखामेळा, बंका महार,व संत जनाबाई या सर्वांनीच अभंग निर्मिती केली या बाबत प्रा. गं. बा. सरदार म्हणतात की, या साऱ्यांचे अभंग म्हणजे एकाच कल्पनेने भारलेल्या, एकाच अनुभूतीने हरखललेल्या भक्तांचे त प्रेमळ सुखसंवाद होत. त्यात कल्पनेच्या भराऱ्या, रचनेची खटपट, शब्दांची कसरत, वगैरे काहीही नाही., मात्र आत्मतृप्त झालेल्यांच्या उच्चतर अशा

नव्या अनुभवाच्या आविष्काराचा उन्माद प्रत्येक शब्दात भरलेला आहे. या संत मेळाव्याच्या आत्मनिष्ठ वाङ्मयात त्या त्या संतांच्या आध्यात्मिक योग्यतेनुरूप व सामाजिक दर्जानुसार काही वेगळेपणा दिसून येतोच संत मेळ्याच्या सहज स्फूर्त अभंग वाणीने या कालखंडाचे उन्मेष पर्व हे नाव सार्थ केले.. असे ते म्हणतात..

वारकरी संप्रदायामध्ये संत ज्ञानेश्वर व इतर संतांनी केलेल्या भाषिक कार्याच्या नंतर संत एकनाथांनी मोठे वाङ्मयीन कार्य केल्याचे आपणास दिसून येते.

भानुदासाच्या कुळी महाविष्णूचा अवतार ।
क्षेत्र प्रतिष्ठान वसती गोदावरी तीर ॥

असा उल्लेख ज्यांचा केला जातो ते संत एकनाथ महाराज होय. आपले पंजोबा संत भानुदास यांच्या पासून चालत आलेल्या वंश परंपरागत भागवत धर्माचा वारसा पुढे चालविला. भानुदास, चक्रपाणी, सूर्यनारायण, एकनाथ अशी नाथांची वंश परंपरा आहे.. संत एकनाथांनी विपूल ग्रंथ संपदा निर्माण केलेली आहे. अनेक टीका, कथा ग्रंथ, आख्यान, आध्यात्मिक प्रकरणे, अभंग, पदे, गौळणी व भारूडे इत्यादींचा अंतर्भाव होतो. त्यांची एकूण संख्या पाऊण लाख भरेल. ओवीबध्द ग्रंथांची ओवी संख्याच साठ हजारांवर आहे. चतुःश्लोकी भागवत, काही आध्यामिक प्रकरणे, व भक्त चरित्रे, एकनाथी भागवत, रुक्मिणी स्वयंवर, भावार्थ रामायण, आणि अभंगांचा गाथा ही नाथांची महत्वाची ग्रंथ रचना होय. या बरोबरच संत एकनाथांनी हस्तामलक, शुकाष्टकटीका, स्वात्मसुख, आनंद लहरी, गीतासार, चिरंजीव पद इत्यादी अध्यात्मपर प्रकरणे लिहिली आहेत. त्यांचा एकनाथी भागवत हा ग्रंथ मराठी भाषेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असा आहे. या बाबत ह. श्री. शेणोलीकर लिहितात, "ही भागवताच्या एकादश स्कंधावरील विस्तृत टीका विद्वता पूर्ण असून रसाळ व सुबोध उतरली आहे. नाथांच्या काशी नगरीच्या वास्तव्यातच भागवताची रचना पूर्ण झाली आहे. तेव्हा प्रारंभी आक्षेप घेणाऱ्या काशीच्या पंडितांनी ग्रंथ समाप्ती नंतर एकनाथी भागवताची पालखीतून मिरवणूक काढली. नाथांच्या पांडित्याला व मराठी भाषेच्या सामर्थ्याला मिळालेले हे एक महत्वाचे शिफारस पत्र च म्हणावयाचे असे ते म्हणतात.."[१४]

वारकरी संप्रदायामध्ये अनेक संतांचे योगदान महत्वाचे आहे. या संत परंपरेतीलच अत्यंत महत्वाचे संत म्हणजे संत तुकाराम महाराज हे होय. संत बहेणाबाई म्हणतात,

संत कृपा झाली इमारत फळा आली ।
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया॥
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश॥

यावरूनच संत तुकारामांची महती ही आकाशा एवढी होती हे आपल्या लक्षात येते. संत तुकारामांनी अभंग गाथा रचिली आहे. त्यांची भूमिका कर्त्या सुधारकाबरोबर जातिवंत साहित्यिकाचीही आहे.

आम्हां घरी धन शब्दांची रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू॥

या उद्गारा वरून त्यांची आपल्या लेखनाच्या माध्यमातून निष्ठा स्पष्ट होते त्यांची वाणी श्रावणुभवाचा अनुभवाने रंगली आहे त्यात उसनेपणा किंवा कृत्रिमता नाही तुका म्हणे झरा lआहे मुळीचाची खरा॥ मज विश्वंभर बोलवितो॥

अशा विश्वासाने त्यांनी अभंग रचना केली त्यामुळे आत्मनिष्ठ काव्याची सार त्यांच्या अभंग गाथेत उतरले आहे ही साडेचार हजार अभंगांची सारी रचना स्पॉट वप्रसंगीत आहे संत तुकारामांचे अभंग रसाळपणा ठासून भरलेला आहे कल्पनेच्या बाजूने काव्यमय असण्यापेक्षा ते अभंग विचारांच्या बाजूने अधिक उद्बोधक आहे जिव्हाळा अवचित्य आणि ओझ यांनी तुकारामांची शैली प्रभावी बनली आहे. संत तुकारामां बरोबरच संत बहेणाबाई सिवूरकर, संत निळोबाराय आदी संतांनी अभंग रचना मराठी भाषेत केल्याची दिसते व आपल्या अभंगांद्वारे त्यांनी मराठी भाषेला जणू वैभवच प्राप्त करून दिले आहे.

५.४.१ आख्यान काव्य

मध्ययुगीन मराठी वाङ्मयामध्ये संत, पंत, तंत परंपरा आपणास दिसतात त्या अनुषंगाने त्याकाळात संतांनी, पंडीतांनी आख्यान काव्य लिहिले आहे. आख्यान काव्याची ही परंपरा अत्यंत समृद्ध अशा स्वरूपाची आहे. पूर्वीच्या काळी लोकांना धर्म प्रवण करण्यासाठी कथा, कीर्तनातून आख्यान गायिली जात. त्यामध्ये आख्याता भक्ती, ज्ञान, वैराग्य, अध्यात्म, योग यांचा प्रत्यक्ष उपदेश न करता वेधक व चटकदार भाषेत आणि सहज समजाणारी अत्यंत सोपी उदाहरण देवून समजावून सांगत.

आख्यान काव्य हा मराठी साहित्यातील अत्यंत महत्वाचा प्रकार आहे. आख्यान काव्य म्हणजे कथनप्रधान किंवा कथात्मक काव्यप्रकार होय. कथा, घटना किंवा जीवनप्रसंग पद्यरूपात मांडलेला असतो तसेच कथानकाला या काव्यात प्रमुख स्थान असते. पात्रांच्या स्वभाव गुणधर्मानुसार संवाद व भावनिक प्रसंग यांचे प्रभावी चित्रण केलेले असते. घटनांची मांडणी क्रमशः केली जाते. रस, अलंकार व वृत्त यांचा समन्वय साधलेला असतो. आख्यान काव्य लघु किंवा दीर्घ स्वरूपाचे असू शकते.

आख्यान काव्याबद्दल वसंत आबाजी डहाके आपल्या मराठीतील कथनरूपे या ग्रंथात म्हणतात, "मौखिक साहित्यपरंपरेशी असलेला संबंध तुटून लिखित साहित्यपरंपरेशी अनुबंध जोडला गेला तेव्हा आख्यानकाव्यांची निर्मिती होऊ लागली. मराठीतील आख्यानकवींनी संस्कृतमधील अभिजात रचनेचे अनुकरण करून आपल्या काव्यांची सजावट केली आहे. (के.ना. वाटवे, १९७३). आख्यानकाव्य असे म्हटले असले तरी ती पद्यरूपातली कथनरूपेच होत. कथा सांगणे हाच आख्यानांचा मुख्य उद्देश असतो. त्यातही 'भक्तीपेक्षा कलाकुसर आणि पांडित्य यांचा विलास दाखविणे' हीच मुख्य प्रेरणाहोती. आख्यानकाव्यातून कवित्वशक्ती, प्रतिभा अगर कल्पनाशक्ती याची फार मोठी झेप दिसत नाही हे खरे असले तरी कथनरूपातील 'पैस' ही गोष्ट आख्यानकाव्यानीच प्रथम दाखवली असे म्हटले पाहिजे. ज्ञानेश्वरीसारखे तत्त्वज्ञानात्मक माध्यात्मक ग्रंथ मराठीत होते, लीळाचरित्रासारखी अलौकिक पुरुषाची स्मरणे होती, दृष्टान्तपाठ अगर पंचोपाख्यान यासारखी तत्त्व अथवा व्यवहारनीती सांगणारी कथात्म रचना होती. परतु सत्य अथवा कल्पित कथनयुक्त अशी विस्तारलेली कथारचना नव्हती. आख्यानकाव्यांनीच मराठीत कल्पनीयतेची (फिक्शनॅलिटीची) जाण प्रथम निर्माण केली असे म्हटले पाहिजे. कथा आणि तत्त्व, कथा आणि उपदेश अथवा बोध ही घडण नाकारून व्यक्ती आणि समूहाच्या जीवनातील प्रसंगांचे उठावदार चित्रण करणे हा आख्यानकवींचा उद्देश होता. आख्यानांसाठी या कवींनी पूर्णपणे कल्पित कथानकाचा अवलंब केलेला नाही हेही खरेच आहे. त्यामागे भरताचे नाट्यशास्त्र आणि संस्कृत काव्ये व नाटके यांचा आदर्श असणे शक्य आहे. रामायण, महाभारत आणि भागवत या तीन ग्रंथांवर आधारित अशी बहुतेक आख्यानरचना आहे. त्यातही स्वयंवरकाव्ये अधिक आढळतात. ईश्वरभक्तीखेरीज साहित्याच्या इतरही काही प्रेरणा आहेत असेच या कवींना सुचवायचे असावे. आख्यानकवितेआधी मराठीत कथा हा रूपबंध आणि त्या रूपबंधाविषयीची जाण जवळजवळ नव्हती असेच दिसून येते. आख्यानकींवर संस्कृत काव्यनाटकांचाच प्रभाव होता असे नाही. मौखिक परंपरेचा त्यांच्यावर काहीही संस्कार झालेला नव्हता असे म्हणता येत नाही.

कृष्णलीलांवर आधारित आख्यानांचा अभ्यास करताना डॉ. गउळकर यांना राधा आणि चंद्रावळ या दोन नायिका वाङ्मयात आणि लोकमानसात कशा रुजलेल्या आहेत याचा अनुभव येतो. (गउळकर, १९७९). एकनाथ, विठ्ठल कळपूरकर, वामन पंडित, आनंदतनय, कृष्णानंद, दयाळनाथ इत्यादींनी राधाविषयक आख्याने लिहिली. त्यांत बहुतेकांनी कृष्ण हा ईश्वर आणि राधा ही भक्त असे मानलेले असले तरी खी-पुरुष रतिक्रीडेला त्यांनी वर्ज्य मानलेले दिसत नाही. चंद्रावळ ही पद्मपुराणातली. राधेसारखी ऐतिहासिक विश्वसनीयता तिच्या बाबतीत नाही. राधेच्या नंतर तीच

काय ती कृष्णास प्रिय होती. या दोन्ही कथा लोकवाङ्मयातून आलेल्या असण्याची शक्यता गउळकरांनी दाखवली आहे.

प्राचीन मराठीतील प्रणयाख्यानांचेच रूपांतर पुढे हळबे, रिसबूड, फडके, काकोडकर इत्यादिकांच्या प्रणयकादंबऱ्यांत झालेले दिसते. गउळकरांनी रूपकाख्यान कवितेचाही शोध घेतला आहे. त्याची उत्तरकालीन रूपे गोविंदाग्रज, वा. म. जोशी, खांडेकर आणि जी. ए. कुलकर्णी यांच्या कथात्म वाङ्मयात आढळतात. प्राचीन कवींपैकी नामदेव, एकनाथ, तुकाराम यांनी रूपक काव्ये लिहिली, पण तीरूपकात्मक आख्याने होत असे मला वाटत नाही. त्यांतली रूपके ही तत्कालीन लोकनाट्यरूपे आहेत. तेथे 'रूपके' म्हणजे 'नाटक' हा अर्थ अभिप्रेत आहे.

आख्यान म्हणजे कथा, चरित्र, इतिहास आणि ही तीनही कथनरूपे होत. आख्यान हे गद्य-पद्यात्म असे कथनरूप असते. मराठीत महाकाव्यातून नव्हे तर आख्यानांतून कादंबरीचा घाट उदयाला आला असे दिसते. हळबेशास्त्री यांच्या 'मुक्तामाले 'वर आख्यानांचाच प्रभाव स्पष्ट दिसतो. आख्यानांचे लोकसाहित्याशी अजिबात नाते नाही असे नाही. गोपाळ रघुनाथकृत 'सीतात्यागकथा' यावर लोकसाहित्याचा प्रभाव आहे. (धनपलवार, १९९७). लोकमानसात रामायणाची, विशेषतः सीतेची एक वेगळीच प्रतिमा असते हे खेड्यापाड्यांतील स्त्रियांच्या तोंडी असलेल्या ओव्यांवरून दिसून येते. (थोरात, १९८१).

आख्यानकवितेने एका विशिष्ट काळात मराठी मनावर सद्धर्माचा संस्कार केला, हे तिचे महत्त्व नाकारता येत नाही. जनसामान्यांच्यासमोर कोदंडधारी राम आणि चक्रपाणी कृष्ण त्यांनी उभा केला. त्या काळातल्या रचनाकारांच्या समोरचे ते एक आव्हानच होते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातल्या आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातल्या मराठी कथात्म साहित्याचे नाते कहाणी, कथागीत, लीळाचरित्र, दृष्टांतपाठ किंवा पंचोपाख्यान यांच्याशी नसून आख्यानकाव्याशी आहे असे म्हणता येईल.” [१५]

५.४.२ ओवी

मध्ययुगीन मराठी वाङ्मयामध्ये अभिजात भाषा मराठीचा वापर हा अगदी पूर्वीपासूनच होत आलेला आहे. संत साहित्यामध्ये तर अगदी चक्रधर,संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, जनाबाई आदींनी आपल्या रचना या ओवी प्रबंधात केल्याचे दिसते. ओवी पुरस्कार अनेक संतांनी केलेला आहेच. ओवी ला प्रबंध स्थान कर्नाटकाचा राजा सोमेश्वर यांनी दिले आहे असे श्रीधर कुळकर्णी ओवी ते लावणी या ग्रंथांत लिहितात. त्या बद्दल ते म्हणतात, “ कर्नाटकचा राजा सोमेश्वर त्याने ओवीचा प्रबंध स्थानी अभिषेक केला आद्य ओवीबद्ध विवेक सिंधू शके अकराशे दहा इसवी सन ११८८

मधला परंतु तत्पूर्वीच शके इसवी सन ११२९मध्ये सोमेश्वराने शास्त्र ग्रंथात मराठी ओवीला प्रतिष्ठेचे स्थान दिले होते सोमेश्वर ओवीचा केवळ गौरव करून थांबला नाही त्याने तिचे लक्षण निश्चित केले आणि नऊ लौकिक प्रबंधात तिला कायम स्थानही दिले मराठी वांग्मय सुप्रतिष्ठित होण्यापूर्वीच ओवीचा सुगंध दूरवर दरवळला तिला शास्त्र ग्रंथा स्थान मिळाले ते यालौकिकामुळे या निमित्ताने प्राचीनशास्त्र ग्रंथाचा एक विशेषही लक्षात भरतो दुष्काळातही जन्मलेल्या स्त्री रत्नाचा आदर व्हावा याप्रमाणे प्राकृत भाषा आणि लोक परंपरा या क्षेत्रातील संग्रह विशेषणाची दखल संस्कृत भाषेत शास्त्र रचना करणाऱ्या पंडितांनी घेतलेली आहे माणूस उल्हास या ग्रंथात मराठी मुव्हीज इतर छंद आणि प्रबंध यांच्याबरोबरचे स्थान मिळाले ते शास्त्रकारांच्या व्यापक दृष्टिकोनामुळे ओवी ही साधीसुधी न राहता ओवी प्रबंध असे गौरवाचे स्थान शास्त्र कारणे तिला दिले माणूस उल्हास या ग्रंथात ओवीचे लक्षण आले आहे ते असे

उवि शब्देन सा चान्तो कार्यस्यादोविका बुधै:
इष्ट तालेन गातव्यं सानुप्रासं पदद्वयम
इत्योविका प्रोक्ता प्रान्ते उविए पद यदि॥

म्हैसूर प्रत,पृ. ४३

ओवीला शास्त्र ग्रंथात स्थान देणारा दुसरा ग्रंथ संगीत रत्न शारंग देवाने देवगिरी येथे रचलेला हा ग्रंथ ज्ञानेश्वरी पूर्वी पन्नास वर्षे अस्तित्वात होता या ग्रंथात ओवीचे स्वरूप लक्षण पुढील प्रमाणे आले आहे.

खण्ड त्रयं प्रा सुयुक्तं गीयते देशभाषया ओवीपदं तदन्ये
चे दोवी
तज्ञैस्तदोदिता त्रयाणां चरणानां स्युरेकाद्या वृतितो भिवा
आदि मध्या नगै:
प्रासैरेकाघश्च पदे पदे छनेभिर्ब हुभिर्गेया ओव्या जगमनोहरा:॥ ४ . ३० ४ - ३०६

यादवांच्या दरबारी असलेल्या ग्रंथकाराला ओवी जगन मनोहर वाटावी हे विशेष ओवी चे अनेक प्रकार आहेत

१. लोक गीतांतील ओवी २. ओवीची गायन परंपरा ३. ओवी प्रबंध ४. ओवी छंद

मध्यगीन काळातील संतांनी ओवी छंदातच रचना केल्याचे दिसते. नरेंद्र आणि भास्कर आपल्या कृतीस प्रबंध या नावाने संबोधतात. आपण प्रबंध रचना केली आहे. असे संत संत ज्ञानेश्वर ही सांगतात चार धातू आणि सहा अवयव यांनी निबंध असलेल्या प्रबंधाचे लक्षण पूर्वी विशद

करण्यात आले आहे मराठी कवींचा प्रबंध या कल्पनेत कसा बसतो याचा मागवा घेणे लाभोक्त ठरेल शिशुपाल वध या काव्याच्या प्रारंभी भास्कर भट्टाने पुढील उद्गार काढले आहेत.

साहित्याचे आणि परिमळे : शृंगारा चिनी मिली : प्रबंध होती मातावळे कवी जनांचे ॥

येथ नाही नवल : वर्णिता परब्रह्म हे केवळ: कैसे दिसती बोल रसाळ : ते ऐकावे ॥

मोती यांचे घोसे राविले कुंकुम रसे : तरी न येती करू सरिसे : प्रबंधेसी॥

अशा प्रकारे ओवी प्रबंधा बाबत लिखाण केले आहे. महानुभावीय संतांनी व संत ज्ञानेश्वर, एकनाथ आदी संतांनी ओवी छंदातच लिखाण केले आहे.

माझा मराठाची बोलू कौतुके।

परी अमृताचतेही पैजांसी जिंकें।

ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन - (सार्थ ज्ञानेश्वरी - ६/१४)

संत ज्ञानेश्वर म्हणतात - माझे शब्द मराठी असले तरी ते सहजपणाने, कौतुकाने अमृतालाही आव्हान देऊन जिंकतील, अशी अक्षरांची रचना मी रसिकांसाठी करीन

माय मराठीचा सर्वोच्च गौरव करणारी ही ओवी आहे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या या ओवीने मराठीला सर्वश्रेष्ठ स्थान प्राप्त करून दिले आहे त्याचबरोबर अनेक प्राचीन कवींनी मराठीचे गुणगान केले आहे फादर स्टीफन्स सुद्धा 'पुस्पामाजी जैसी मोगरी' असं मराठीचं वर्णन करतात. हाल सातवाहन गाथा सप्तशतीमध्ये 'प्राकृतकाव्य साक्षात अमृतच आहे.(अमिअं पाइय कव्वं) असं सांगतो आणि मराठीच्या माधुर्याचा, हा सर्वात प्राचीन उल्लेख म्हणता येईल.

हां हो नवल नोहे देशी। मऱ्हाटी बोलीजे तरी ऐशी।

वाणें उमटताहे आकाशीं। साहित्य रंगाची ।। - (सार्थ ज्ञानेश्वरी - ६/१३३)

संत ज्ञानेश्वर म्हणतात - अहो काय ही आश्चर्यकारक गोष्ट आहे ! इतकी सुंदर देशी मराठी बोलली जाते.? देशी भाषेच्या आकाशात रसालंकाराच्या रंगाचे नाना प्रकार स्पष्ट दाखवीत आहे. अद्वैताचे महान तत्त्वज्ञान सांगण्याइतकी ती समर्थ आहे. मराठी भाषेचा गौरव करणारी आणखीही एक ओवी आहे संस्कृत भाषा वेदवाणी असेल पण मराठी भाषा लोकवाणी आहे.

आणि तोचि हा मी आतां। व्यासाचीं पदें पाहतां पाहतां।

आणिला श्रवणपथा। मऱ्हाठिया।। - (सार्थ ज्ञानेश्वरी-१८/१७०८)

संत ज्ञानेश्वर म्हणतात - हा गीताग्रंथ मी व्यासांची श्लोकांतील प्रत्येक पदे विचाराने पाहात पाहात, त्याचा अर्थ मराठी भाषेद्वारा सामान्य लोकांच्या श्रवणमार्गी आणला आहे.

ये महाठियेचियां नगरीं । ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं ।

घेणेदेणें सुखचिवरी । हों देईं या जगा ।। - (सार्थ ज्ञानेश्वरी - १२/१६)

संत ज्ञानेश्वर म्हणतात - या मराठीच्या नगरीमध्ये अध्यात्म विद्येची, समृद्धी निर्माण कर या जगात केवळ आत्मज्ञानाच्या सुखाविषयीच देवघेव होऊ दे.

आतां आयती गीता जगीं। मी सांगें महाठिया भंगीं |

येथ कें विस्मयालागीं । ठावो आहे - (सार्थ ज्ञानेश्वरी - १८/१७२९)

संत ज्ञानेश्वर म्हणतात - ज्या श्रीमद्गीतेचे ज्ञान माझ्या सद्गुरूकडून आयते प्राप्त झाले आहे, ती गीता आता जनविश्वात मराठी भाषेद्वारा सांगतो, यात नवल कोठे आहे.

तीरें संस्कृताचीं 'गहनें । तोडोनि मऱ्हाठिया शब्दसोपानें ।

रचिलीं धर्मनिधार्ने । श्रीनिवृत्तिदेवें ।। - (सार्थ ज्ञानेश्वरी ११/९)

संत ज्ञानेश्वर म्हणतात - पूर्वी या त्रिवेणी संगमाला सस्कृत भाषेच्या भाष्य-टीका-संस्करण या स्वरूपाने अवघड दरडी होत्या, त्या उंच उंच दरडी फोडून धर्माचे अधिष्ठान असलेल्या श्रीगुरु निवृत्तिनाथांनी मराठी भाषेच्या शब्दरूपी पायऱ्या बांधल्या (घाट) आहे.

एथ अर्जुनचि काय म्हणों पातला । आजि 'आवडतयाही सुकाळु जाहला ।

जे गीतार्थु हा आला । मऱ्हाठिये - (सार्थ ज्ञानेश्वरी - ११/१४)

संत ज्ञानेश्वर म्हणतात - येथे अर्जुनच एकटा उपस्थित झाला, असे म्हणू नये आता वाटेल त्यालाही गीतेचा सुकाळ झाला आहे. कारण गीतेचा अर्थ मराठी भाषेत आला आहे.

मूळ ग्रंथीचिया संस्कृता । वरि महऱ्हाटी नीट पढतां ।

अभिप्राय मानलिया उचिता । अध्याय गीतेचे ।

परि कवण भूमी हे न चोजवे - (सार्थ ज्ञानेश्वरी - १०/४३)

संत ज्ञानेश्वर म्हणतात - संस्कृत भाषेतील मूळ संहितेवरील मराठी वाचून अर्थाचे पूर्ण आकलन झाले असता, मूळ ग्रंथ कोणता, यासंबंधी वाचकांच्या मनांत संभ्रम निर्माण होईल व त्या संबंधाने ते चकित होतील.

५.४.३ अभंग

अभंग हा मराठीतील एक भक्तिपर कविता प्रकार आहे. तो मुख्यतः विठ्ठलभक्त संतांनी रचलेला काव्यप्रकार आहे.

"आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने, शब्दांचीच शस्त्रे यत्न करू।

भक्ति, ज्ञान जसे तेज आमचे, त्यांनीच समृद्धीचे मूळ धरणे॥"

संत तुकाराम महाराज म्हणतात खरे धन म्हणजे शब्द, ज्ञानाची मोती, आणि सत्य सांगणारी भाषेची रत्ने आहेत. वाईट विचारांशी, अज्ञानाशी किंवा अन्यायाशी लढताना आम्ही योग्य शब्द, सत्य, ज्ञान आणि विवेक यांचा वापर करतो. भक्ती आणि ज्ञान या दोन गोष्टी आमच्या जीवनाला प्रकाश देतात या दोन द्वारामुळे आमची समृद्धी व उन्नती होते.

अभंग हा प्रकार प्रामुख्याने वारकरी संप्रदायातील संतांनी हाताळलेला दिसतो महानुभावांच्या देखील काही रचना या अभंग धाटणीच्या आहेत याबाबत श्रीधर रंगनाथ कुलकर्णी असे म्हणतात, " एकाच प्राकृत छंदापासून विकास पावल्यामुळे अभंग आणि ओवी यांच्या सीमारेषा एकमेकात बऱ्याच मिसळून गेलेले आहेत महानुभाव चरित्र ग्रंथातल्या ओव्या अभंगाच्या धाटणीच्या आहेत गेली सात शतके अभंग मराठी वाङ्मयात रूढ आहे ग्रामीण आणि नागर या समाजाच्या दोन्ही वर्गांच्या तो परिचयाचा आहे विशेषतः ग्रामीण जनमानसावर त्याने सखोल परिणाम केलेला आहे रचना लवचिक असल्यामुळे तो धावत्या चालीवर गाता येतो तसाच रागदारी देखील तो खुलतो विष्णुदासांप्रमाणे मेणाहून मऊ आणि वज्रापेक्षा कठोर तो प्रसंगी होऊ शकतो या प्रकृती धर्मामुळेच संतांच्या सहजगाराचा तो वाहक बनतो तसाच चरित्र आख्यानाचा प्रपंच देखील तो नीटकेपणाने सांभाळू शकतो

अभंग हे अनेक प्रकारचे असतात त्यामध्ये गवळणी पंढरपूरचे महात्म्य गुरुभक्तीपर नामपर उपदेश पर अशा विविध स्वरूपाचे अभंग संतांनी रचलेले आपल्याला दिसतात अभंगांमध्ये भाषिक दृष्ट्या किंवा शैलीच्या दृष्टीने विचार केल्यास चार चरणाचे अभंग प्रामुख्याने आपल्याला पाहायला मिळतात परंतु काही अभंग हे दीर्घ स्वरूपाचे देखील आहेत काही अभंग हे चौकडीच्या स्वरूपातील देखील आहेत म्हणून अभंग हा प्रकार संतांनी वापरलेला आपल्याला दिसून येतो.

५.४.४ भारुड

भारूड हा प्रकार मराठी वाङ्मयात प्रसिद्ध असा आहे. 'हिंदू-तुर्क संवाद' या भारूडांतून

आम्ही तुम्ही केला झगडा । तो परमार्थाचा बोध उघडा । प्रबोधावया महामूढा ।।
तुरक कहे वो बात सही । खुदा को तो जात नहीं ।।

असा आत्मबोध लोकांच्या अंतरी ठसावा म्हणून सांगितला आहे. हिंदू-तुर्क यांच्यात ऐक्य निर्माण झाल्याविना निजबोध होणार नाही हे नाथांनी अगदी परखडपणानं या ठिकाणी स्पष्ट केलं आहे. 'हिंदू-तुर्क संवाद' या भारूडांची हिंदी, मराठी मिश्र भाषा, त्यातही कधी हिंदूंच्या तोंडी तुर्काची भाषा अन् तुर्काच्या मुखी मराठी भाषा, त्यातील 'तुझे नि माझे मायबाप एक आहेत' असा एकात्मभाव मोठा लक्षणीय आहे. त्यांचा 'एडका' ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी बोलू लागतो, 'मुका'

आत्मज्ञानाची प्रतीती सांगतो. अशी 'सर्वत्र समभावा'ची शिकवण हे या भारूड रचनांतील अंतःसूत्र आहे.

आठ भाकरी बारा पोळ्या । धिरडी खादली सोळा रे ।।
पाणी पिऊनी-पिऊनी ढेकर दिली । मराठी तिचा मोळा रे ।।
बारा सोळा लुगडी नेसली । येईना पाठी-पोटी रे ।
नवखणाची चोळी शिवली । उरासी येईना गाठी रे ।।

या वासना-तृष्णा बयेनं चार शेराचा वरण-भात अन् त्यावरील भाजीचा गोळा खाऊन फस्त केला! म्हणजे धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ आणि त्यावरील भक्ती वा पाचवा पुरुषार्थ तिनं खाऊन टाकला. शिवाय त्यावरही न भागल्यानं जीवाला मोहून टाकणारा डोळाही फिरवत राहिली. त्याबरोबर आठ भाकरी आणि सोळा पोळ्याही तिनं गट्टम केल्या. म्हणजे यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, ध्यान, धारणा व समाधी या अष्टांग योगांचा घास घेऊन माणसाच्या पारमार्थिक कल्याणाचा मार्ग तिनं खलास करून टाकला. शिवाय माणसाच्या बारा गुणरूपी पोळ्या (नित्यनैमित्तिक धर्माचरण, यथार्थ भाषण, इंद्रियनिग्रह, सहनशीलता, सुपात्री दान देणं, दोष न काढणं, धैर्य, अध्ययन, तपश्चर्या, निर्मत्सरता, विषयात न फसणे व परमेश्वर उपासना असे भागवतात सांगितलेले १२ गुण) खाऊन या सद्गुणांचा लोप केला. सहज तोंडी लावणं म्हणून देवपूजेतील सोळा उपचारही विचारांतून मिटवून टाकले. बारा श्रृंगारावस्था आणि सोळा श्रृंगार तिच्या भोगलालसेला कमी पडायला लागले! नऊ इंद्रियांनी भोग घेणंही अपुरं वाटू लागलं!

नाथाच्या घरची उलटी खुण
भारताच्या घरची उलटी खूण । पाण्याला मोठी लागली तहान ।। १ ।।
आत घागर बाहेर पाणी । पाण्याला पाणी आले मिळोनी ।। २ ।।
आजी म्या एक नवल देखील । वळणीचे पाणी आढ्या लागले ।। ३ ।।
शेतकऱ्याने शेत पेरिले । राखणदाराला देणे गिळिले ।। ४ ।।
हांडी खादली भात टाकला । बकऱ्यांपुढे देव कापिला ।। ५ ।।
एका जनार्दनी मार्ग उलटा । जो जाणे तो गुरुचा बेटा ।। ६ ।।

एकनाथांच्या या भारूडाचे शीर्षक 'कोडे' असेही आहे. नाथांचे हे भारूड बहुरूढ आहे आणि सर्वप्रिय आहे. याची रचना कोड्यासारखी म्हणजे कूट' स्वरूपाची आहे. नाथांनी आपणाला घातलेले हे कोडे आपण आध्यात्मिक दृष्टीनेच सोडविले पाहिजे, तरच ते सुटेल ! व्यावहारिक दृष्ट्या उलख्या आणि आध्यात्मिक दृष्ट्या सुलट्या अशा गोष्टी इथे आहेत. म्हणजे असे की, वरवर

पाहता नेहमीच्या दिसण्यात उलट्या आणि विपरीत वाटणाऱ्या पोटी आध्यात्मिक दृष्टीने सरळ आणि सहज आहेत- हे या भारूडाच्या अंतरंगात उतरले की कळते.

नाथ सांगतात - अहो, ही नाथाच्या म्हणजे भगवंताच्या म्हणजे परमात्म्याच्या घरची तशी उलटीच खूण आहे. बघा ना, इथे पाण्यालाच मोठी तहान लागली. खरे म्हणजे तहानलेल्याची तहान पाण्याने भागते, मग पाण्यालाच तहान कशी लागेल? पण ती लागली. म्हणजे नेमके काय घडले? ता जीव हा मायामोहाने, देहतादात्म्याने आपला देह म्हणजेच सर्वस्व मानून भुलला आणि खरे तर सर्व विश्व ज्याच्या आधारे चालते त्या परमात्म्यास विसरला. त्याची दृष्टी आपल्या देहापुरतीच संकुचित झाली. पण जेव्हा या जीवाला वैराग्यभूमिका प्राप्त झाली तेव्हा तो संकुचित भाव मावळू लागला आणि जीव-चैतन्याला असे वाटू लागले की, माझी त्या विश्व-चैतन्याशी कधी भेट होईल? म्हणजेच चैतन्याला म्हणजे खुद्द पाण्याला मोठी तहान लागली, त्या तहानेची ओढ तीव्र झाली. याच तत्त्वाला अनुसरून नाथमहाराज पुढे सांगतात - खरे तर जी घागर आहे तीही पाण्याने भरलेली आणि तिच्या बाहेरही अथांग पाणीच आहे. पण पुढे या घागरीतील मर्यादित पाणी बाहेरच्या अथांग पाण्यात मिळून गेले, मिसळून गेले. म्हणजे घडले ते असे - जोपर्यंत घागरीची उपाधी घागरीतील पाण्याला चिकटलेली आहे. तोपर्यंत आपल्याच स्वरूपाचे अथांग आणि व्यापक पाणी बाहेरही भरलेले आहे, याची जाणीव घागरीतील पाण्याला

५.५ पंडिती साहित्य

मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहासात पंडिती साहित्याचाही मोलाचा वाटा आहे मध्ययुगीन मराठी वांग्मयाचा अभ्यास करताना संत पंत आणि तंत यांच्या काव्याचा अभ्यास देखील केला जातो जशी संतांची परंपरा विपुल आहे तशीच परंपरा पंडित कवींची देखील आहे संत साहित्याने जशी मराठी साहित्य ला भुरळ पाडण्याचा काम केले असेच काम पंडित साहेबानी देखील केले चे दिसते अध्यात्माच्या किंवा भक्तीच्या बैठकीवर बसून बहुजन समाजाला परमाथाची गोडी लावण्यासाठी संत कवींनी जसे कार्य केले तसेच आपल्या सर्व सालंकृत पंडिताने देखील काव्यरचना केल्याची दिसते नरेंद्र दामोदर भास्कर भट्ट बोरीकर, सामराज, मुक्तेश्वर, वामन पंडीत, रघुनाथ पंडीत,नागेश इत्यादी महानुभव कवी आणि संत एकनाथ महाराज हे देखील याच वर्गात मोडतात. मराठी भाषा ही पंडिती काव्याने बहरत गेली आहे. याबाबत डॉ. के. ना. वाटवे म्हणतात, मराठीत पंडित कवी म्हणून वामन आणि रघुनाथ यांनाच कवी ही संज्ञा द्यावी लागेल. इतरही अनेक कवींनी आख्यान काव्यांची रचना केलेली आहे. तरी पण त्यांना पंडित कवी म्हणून संबोधण्यात येत नाही तर त्यांना पंत कवी म्हणून संबोधण्यात येते. पंडिती कवींनी महाकाव्याची पद्धती

अनुसरलेली असते. विविध वृत्ते व गेय छंद यांचा वापर, शब्दार्थालंकारांचे प्राचुर्य, काल्पनिक वर्णने, आशावादी चित्रण, कल्पना पद्धती यांचा वापर मोठ्या प्रमाणात केलेला दिसून येतो.

पंडिती काव्याच्या लिखाणाबाबत डॉ. र. बा. मंचरकर म्हणतात, " सर्व साधारण श्रोत्यांपेक्षा दोन विद्वान संस्कृत तज्ज्ञ काव्य मर्मज्ञ आणि काव्यभिरुची असणारा श्रोतृवर्ग डोळ्यांपुढे ठेवून संपूर्ण रामायण महाभारत न ऐकविता त्यातील निवडक प्रसंग घेऊन ते कलाकुसरीने व पांडित्याने नटवून संस्कृत काव्या दर्शानुसार मांडण्याचा विडा पंडित कवींनी उचललेला होता. त्यांच्या डोळ्यांसमोर प्रगल्भ व प्रौढ वाचक वर्ग होता. या जाणत्या, सुशिक्षित, काव्यमर्मज्ञ व व्युत्पन्न वाचक वर्गाकरिताच पंडितांनी आपले लेखन केले. पंडितांनी प्रामुख्याने आख्यानक काव्ये लिहिली आख्यान काव्यामध्ये वामन पंडित आणि हरी रीक्षिता नंतर रघुनाथ पंडिताने या काव्याला संस्कृत काव्य पद्धतीचा साज चढवून विद्वत प्रतिष्ठा मिळवून दिली. त्याचे ' नल दमयंती स्वयंवर ' हे काव्य अत्यंत लोकप्रिय आहे.आख्यान काव्यात आध्यात्मिकतेची व भक्तीची बैठक आहे. आख्यान काव्याला विनोदाची झालर देत त्यातून उद्बोधन करण्याचे कार्य पंडितांनी केले आहे.या काव्यातून लोकाभिरूची जिज्ञासा स्वप्नरंजन धार्मिक प्रयोजन हे आख्यान काव्याचे मुख्य प्रयोजन होय तसेच आख्यान काव्याचे गुण म्हणजे कथानक व्यक्ती दर्शन कथन कौशल्य प्रसन्न भाषा वृत्ती योजना योजना आणि अक्षर सौंदर्य हे आख्यान काव्याचे विशेष गुण आहेत.

५.६ शाहिरी वाङ्मय

शाहिरी वाड्मयाचे मूळ लोकगीतात आहे. सुरुवातीच्या काळात ही रचना लोकांच्या श्रमपरिहार व मनोरंजना साठी झाली. तेंव्हा गीताच्या चाली ठेका त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार बदलत असे. जसे,

दरियांत मचवा झुलताय लाडके ।

सावला दीर तुझा येताय गो॥

ही रचना होडी वल्हवीत असतांना गायले जात होते. काळानुरूप त्यांच्या चाली व स्वरूप बदलत गेले पुढे प्राकृत परंपरेतून आलेल्या मात्रावृतात व अक्षर वृतात शाहिरी वाङ्मय निर्माण होत राहिले. शाहिरी करणारे लावणी शाहीर हे सर्व जाती धर्माचे होते. शाहिर रामजोशी, अनंत फंदी, प्रभाकर, परशराम, होनाजी, सगनभाऊ, शाहीर अमरशेख, बहिरु न्हावी, बजा रंगारी, तंजावरचा राजा सरफोजी, आदींचा उल्लेख करावा लागेल.

५.६.१ लावणी

अनेक वर्षापासून लोककला जोपासल्या गेल्या आहेत. संताच्या भक्तिभावातून गौळणी, अभंगाची निर्मिती झाली, याच भावनेतून पुढे लावणी अवतरली असावी. लावणीची निर्मितीमागची प्रेरणा भक्तीची होती. या भक्तिभावात स्त्री मनाची विविध रूपे प्रकट झालेली आहेत. पुरुषमनाला असलेली स्त्रीदेहाची आणि श्रृंगाराची अभिलाषा काही गौळणीतून व्यक्त होताना दिसते. हीच अभिलाषा लावणीला कारणीभूत ठरली असावी. लोकसंगीतात लावणी प्रकार आजही लोकप्रिय आहे. मात्र त्याचे स्वरूप बदलत गेले आणि लावणीतील लावण्यही हरपत गेले. चित्रपटांच्या गीतांवर होणारे नृत्य असे आजकालच्या लावणी फडाचे स्वरूप झाल्याने, खरीखुरी लावणी हळूहळू लुप्त होत आहे. लावणीमध्ये अध्यात्माबरोबरच श्रृंगारही अवतरतो. मराठीतील गूढगुंजनात्मक काव्याच्या कितीतरी आधीपासून लावणीने समाजात आपले स्थान पक्के केले. 'लावणी' लिहिणारे ते शाहीर अशी सुरूवात करून हा प्रकार ऋग्वेद काळापर्यंत मागे घेऊन जाण्याची ते घाई करतात. याकरिता सुरूवातीसच लावणी या शब्दाची व्युत्पत्ती शोधून त्याचा निश्चित अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

लावणी या शब्दाचा अर्थ व्युत्पत्तीकोशात "एक प्रकारचे ग्राम्यगीत म्हणजे लावणी." अशी लावणीची व्याख्या सांगितली आहे. इंग्रजी व मराठी अर्थातून ग्रामीणता, श्रृंगार व गेयता ही लावणीची तीन लक्षणे प्रामुख्याने आढळतात. त्याचबरोबर नृत्य हे लावणीचे लक्षण आहे, असे मला वाटते.

लावणीच्या व्याख्या

१) "शेतातील पीक कापणीच्या वेळी म्हणायचे गीत म्हणजेच लावणी होय."

२) अ. ब. कोल्हटकर यांच्या मते - "हृदयाला चटका लावते ती म्हणजे लावणी होय."

३) "शेतात लावगण करताना म्हटले जाणारे गीत म्हणजेच लावणी गीत होय." [१५]

उदा. लावणी

१) "माझ्यासाठी आणा पैठणी
माझ्यासाठी आणा पैठणी
अंजिरी रंगाची
धनी तुमची लाडी मी लाडाची ।।धृ।।
मला अबलख घोड्यावर मिरवा
हौस मुंबई बघायची पुरवा

हवा सोसना मला इष्काची
पीर्ती फुलांनी मन मोहरलं
चंद्र चांदणं डोळ्यांत फुललं
रंभा उर्वशी मी इंद्राघरची
तुमच्या मिठीची ऊब गुलाबी
स्पर्श सुंगधी डोळे शराबी
झाले कुर्बान, मला म्हणा तुमची" [१६]

२) "सात वाजता सकाळी। भोंगा वाजवी भूपाळी।
सुरू पहिली पाळी। मोठ्या डौलात।
चाक फिरे गरगरा। सुत निघे भरभरा।
नटवाया वसुंधरा। आमच्या घामातून...।
निर्मून धन आम्ही सारं। मालक असून झाला चोर।
धनिकांचा वाढे जोर। ऐट दावून।
पैका नाही इंधनाला। काय शिजवावं बोला।
का शिवावं पोटाला। टाके घालून....।।" [१७]

५.६.२ पोवाडा

मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात पोवाडा हा वाङ्मय प्रकार आत्यंत प्राचीन असून मराठीच्या प्रारंभीच्या साहित्यातही पोवाड्याचे उल्लेख आढळतात. पोवाडा आणि लावणी हे मराठी भाषेचे अस्सल लेणे आहेत. शिवकाळात व पेशवाईत लावणी व पोवाडा भरभराटीस आला असला तरी त्याचे उल्लेख यादव काळातील संत वाङ्मयात व महानुभाव साहित्यात देखील आढळते. आद्य कवयित्री महदंबा हिच्या धवळे गीतात पवाडा हा शब्दाचा उल्लेख येतो. तो असा, श्री चक्रधरांचे सिरी धरोनिया श्री चरणा मग धवळी गाइन गोविंदु राणा: जेये रुकमीणी हरीयेला तेणे जगी पवाडे केले अति बहुते. तसेच अनेक संतांच्या अभंगात देखील त्याचा उल्लेख आढळतो.संत निवृति नाथ देखील आपल्या एका अभंगात म्हणतात,

निवृत्ती मुक्ताबाई चांगदेव गाढा।
हरिचा पवाडा झेलिताती...
संत ज्ञानेश्वर म्हणतात,

मृत गुरुपुत्र आणिला । तो तू पवाडा देखिला॥

पोवाडा याचाच अर्थ कीर्ति काव्य असा घेतला जातो. कृ. पा. कुलकर्णी कीर्ति काव्य म्हणजे पोवाडा असेच म्हणतात.. शुर वीरांचे पराक्रमांचे गायिले गेलेले कीर्ति काव्य म्हणजे पोवाडे होय. या बाबत प्रा. बी. बी. देशमुख असे म्हणतात, स्तुतीपर आणि पराक्रमपर वर्णन करण्याची चाल प्राकृत अपभ्रंशात फार पूर्वी पासून चालत आलेली असावी असे दिसते. पोवाडा हा शिव काळात बहरलेला दिसतो. शिवकाळात पोवाड्याला समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाल्याचे दिसून येते. अज्ञान दासाचा अफझल खानाच्या वधाचा पोवाडा ही त्याची साक्ष होय. तसेच तो परिपूर्ण पोवाडा मानला जातो. शुर मर्दाचा पोवाडा शुरमर्दाने ऐकावा हे शाहीर तुळशीदासाचे पोवाड्याच्या निर्मिती मागचे उद्गार परिणामकारक ठरतात.

पोवाडा हे कथा काव्य आहे. त्याचे स्वरूप पद्यमय असून ते गद्यही असते. पोवाडा हा प्रकार चंपूकाव्य या सदरात मोडतो. पोवाड्याच्या स्वरूपा बद्दल इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात, पोवाडे पद्य असूनही गद्य ही असतात. त्यात अनेक पात्र असतात. मुख्य शाहीर व त्याचे साथीदार हे दोघे पोवाड्यातील व्यक्तींच्या सोंगाची बतावणी करतात. त्याशिवाय कथानकाचा धागा शाबूत ठेवून कथेचे तात्पर्य तिहाईत पणे नाटकातील सूत्रधाराचे कामही तो गद्यात करतो.

५.६.३ बखर गद्य

बखर हा मराठी गद्याचा असा प्रकार आहे ज्यात एखाद्या ऐतिहासिक घटना, युद्ध, प्रसंग किंवा राजांच्या कार्याचा वर्णनात्मक व नाट्यमय शैलीत आलेख मांडला जातो. या गद्यलेखनात तथ्यांबरोबरच लेखकाची कल्पनाशक्ती, अलंकार आणि भाषेची गाभा आढळते. मराठी गद्य वाङ्मयात बखर वाङ्मयाला अनन्य साधारण महत्व आहे. मराठ्यांच्या काळात बखरीचे लेखन पुष्कळ झाले. बहुतेक बखरकार राजदरबारी असून त्यांना तसे लेखन करण्याची आज्ञा होत असे व नंतर ते लेखन करत असे. इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात, बखर या शब्दाची व्युत्पती खबर या अरबी शस्मापासून झाली आहे. मूळ अरबी शब्दाचा तो वर्ण विपयीस आहे. बक = बोलणे या संस्कृत शब्दापासून झाली असून तोंडी बखरी सांगण्याचा रिवाज प्राचीन काळपासून प्रचलित आहे असे एक मत मांडले जाते. परंतु र. वि. हेरवाडकर यांना हे मत मान्य नाही. कारण मुसलमानांशी संबंध आल्यानंतरच खरे बखर लेखन झाले असे त्यांचे म्हणणे आहे. ते पुढे म्हणतात, राजकीय इतिहास ग्रंथ निविष्ट करण्याची कल्पना मुसलमान पातशहांची होती, हे ऐतिहासिक सत्य आहे. बखर हा शब्द बखैर या शब्दावरून बखैर > बखेर > बखर असा तयार झाला तो बखर.

बखर म्हणजेच बातमी, हकीकत, इतिहास असे असल्यामुळे केवळ एकाच पद्धतीची किंवा विषयाची त्यात माहिती नसते. आपल्याला आलचरित पर बखरी देखील पाहायाला मिळतात. बखरी मध्ये ऐतिहासिक व राजकीय घडामोडींना विशेष स्थान असते. बखरीचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करता येतील.

१. शिवपूर्वकालीन बखरी २. शिवकालीन बखरी ३. पेशवेकालीन बखरी ४. आंग्लकालीन बखरी

तत्कालीन ऐतिहासिक साधनांत अस्सल कागदपत्रांना विशेष महत्व असते. राजवाडे या बाबत म्हणतात,' एक अस्सल चिटोरे सर्व बखरीच्या बहुमताला हाणून पाडण्यास बस्स आहे.अस्सल कागद पत्रात नित्याच्या राज्य कारभाराची महत्वाच्या घटनांची नोंद असते. मात्र बखरीत राजकीय, सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक, इत्यादी विविध दृष्टिकोनानी माहिती भरलेली असते. शिवाय सर्व घटनांचा संगतवार इतिहास बखरीच सापडतो. बखरी मध्ये तद्रुपता, निवेदन कौशल्ये, भावसौंदर्य, विचार सौंदर्य, रसपरिपोष, व्यक्तिदर्शन, भाषा सौंदर्य, सुभाषिते, वाकपचार, म्हणी इत्यादींचा समावेश होतांना दिसतो.

लेखन प्रकाराच्या दृष्टीने बखरीचे एकूण सहा वर्ग पडतात याबाबत ह. श्री. शेणोलीकर लिहितात, "समकालीन बखर नविसांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या ऐकलेल्या राजकीय घटनांवर आधारलेल्या बखरी हा पहिला वर्ग. यामध्ये कृष्णाजी अनंत सभासदांनी लिहिलेली शिव छत्रपतींची व कृष्णाजी शामरावांची ' भाऊसाहेबांची बखर ' यांसारख्या बखरी येतात. हे बखरकार प्रत्यक्ष डोळ्यांसमोर घडल्या प्रमाणे ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने या समकालीन बखरी बऱ्याच विश्वसनीय असतात. स्मृतीवर हवाला ठेवून दंतकथा, आठवणी, आख्यायिका, परंपरागत दाखले इत्यादींनी सजविलेल्या उत्तर कालिन बखरी हा दुसरावर्ग. त्यात सोवनीकृत पेशव्यांची बखर, दाभाड्यांची हकीकत इत्यादी बयाच बखरी येतात. जुने ग्रंथ, टिपणे, ऐतिहासिक कागदपत्र यांचा उपयोग करून लिहिलेल्या बखरीच्या तिसरया वर्गात सप्त प्रकरणात्मक शिवचरित्र, रामदास स्वामींची बखर आदींचा समावेश होतो. वाका, कैफियत, हकीकत, चरित्र, आत्मचरित्र, इत्यादी बखर सदृश ऐतिहासिक लेखन हा चौथा वर्ग होय. या वर्गात पटवर्धनी वाका, आंगऱ्यांची हकीकत, भाऊसाहेबांची कैफियत इत्यादी लेखन येते. ते त्रुटीत वा स्फुट स्वरूपाचे असले तरी या लेखनात पहिल्या वर्गातील बखरीचा गाभा असतो. आंगलाईत इनाम कमिशन पुढे आपापल्या उत्पन्नाचा हक्क शाबीत करण्यासाठी अनेक इनामदार, जहागीरदार,व संस्थानिक यांनी आपापल्या घराण्याच्या हकीकती लिहवून तयार केल्या. त्यांचा एक वर्ग होईल तो पाचवावर्ग. सहाव्या वर्गात

धार्मिक स्वरूपाच्या पौराणिक व सांप्रदायिक बखरी येतात. बकासुराची बखर, समर्थाची बखर,कृष्णजन्माची बखर, ही यांची उदाहरणे होत."[१८]

इतिहास लेखनाच्या साधनां पैकीच बखरी या सुद्धा इतिहासाच्या साधनात मोडतात. तरी पण या प्रकारच्या ऐतिहासिक साधनांवर कितपत विश्वास ठेवावा हा प्रश्न इतिहास लेखका समोर आहेच. बखर हा वाङमय प्रकार सर्वसाधारण पणे ऐकीव माहितीच्या आधारे होतो. बखरी मध्ये प्रामुख्याने तीन दोष दिसतात. कालविपर्यास, स्थल विर्पयास, व व्यक्ति विपर्यास हे प्रमुख दोष बखरीत दिसतात.

ऐतिहासिक वाङमयात बखरीचे एक विशिष्ट असे मूल्य आहे. केवळ लेखनामुळे नव्हे तर त्याच्यातील विविध विषयाच्या दृष्टीनेही बखर हा एक स्वतंत्र वाङ्मय प्रकार मानला पाहिजे.या बाबत प्रा. सदाशिव सरकटे, प्रा. सुशिला सोलापुरे लिहितात., "परंपरेने आलेले हे लेखन म्हणजे पैतृक धनच होय. त्यांच्या विषयी आदर ठेवून त्यांचा इतिहासाच्या बखरींनी भाषेला एक विशिष्ट वळण लावले हे नाकारता येणार नाही. पौराणिक आख्यांनांनी सामान्य जनतेला ईश्वर भक्तीची गोडी लावली तसेच समाजाला करमणूक व ज्ञान देण्याचे काम बखरींनी उतम प्रकारे केले आहे. सर्व बखरींचे लेखन एकाच पद्धतीचे झालेले असले तरी लेखकाच्या व्यक्तित्वा प्रमाणे प्रत्येक बखरीचे स्वरूप स्वतंत्र आहे. भाऊसाहेबांच्या. बखरी सारख्या काही बखरी एखाद्या उत्कृष्ट कादंबरीलाही मागे टाकतील अशा आहेत. तत्कालीन भाषेचे प्रयोग वाक्यरचना इत्यादी व्याकरणाचे विशेष बखरींच्या अभ्यासानेच शिकणे सुलभ झाले आहे. बखर लेखनाची मूळ कलपना परकीय म्हणजे मुसलमानी असली तरी मराठीत स्वतंत्र वाङ्मय प्रकार होण्या इतका त्याचा विकास झाला होता हे बखरीच्या स्वरूपा वरून दिसून येते. शिव पूर्व कालिन बखरी १. महिकावतीची बखर २. राक्षसतागडीची बखर... शिवकालिन बखरी १. कलमी बखर २. सभासदांची बखर पेशवे कालीन बखरी १. भाऊ साहेबांची बखर २. होळकरांची कैफियत३. पानिपतची बखर आदी बखरी आपल्याला दिसून येतात.

बखर वाङ्मयाचे मूल्यमापन करतांना ह. श्री. शेणोलीकर लिहितात, " बखरकाराजवळ ऐतिहासिक दृष्टी नव्हती. त्याचप्रमाणे वाड्मयीन दृष्टीचाही संपूर्ण अभाव होता. शिवाय वाङ्मय निर्मितीची कुवतही त्यांच्या ठिकाणी नव्हती. प्राचीन पद्य वाङ्मयाला जसेउच्च दर्जाचे प्रतिभा संपन्न लोक लाभले, तसे गद्याच्या बाबतीत झाले नाही. सारे बखरकार बहुधा कारकुनी पेशाचे असल्याने पांडित्य, चिकित्सा प्रभुत्व, लेखन कौशल्ये या सर्वच बाबतीत ते दरिद्री होते. अवलोकन, अनुभव, अध्ययन या दृष्टीने त्यांची पुंजी अगदी बेताची होती. म्हणूनच लेखकाच्या मगदुराप्रमाणे

निरनिराळया बखरीत कमी अधिक साहित्य गुण आढळतात. बखरकारांपुढे लेखनाचे उच्च आदर्श जसे नव्हते, त्याचप्रमाणे त्यांची स्वतंत्र परंपराही नव्हती. शिवाय खास त्यांचा असा मोठा सुबुध्द वाचक वर्गही तेव्हा नव्हता. अक्षर घटविण्याच्या दृष्टीने मुलांना बखरींच्या नकला करण्यास सांगावयाचे. या पलीकडे जुन्या काळी वाहतमय किंवा इतिहास दोन्ही दृष्टीने बखरीची कोणी विशेष दखल घेतली असे दिसत नाही."[१९]

५.७ समारोप

भारतीय ज्ञान परंपरा ही अत्यंत समृद्ध, व्यापक आणि बहुआयामी परंपरा आहे. प्राचीन काळातील वेद, उपनिषद, महाकाव्य, पुराण तसेच बौद्ध व जैन वाङ्मय या विविध ज्ञानस्रोतांमधून भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान, नीतिमूल्ये आणि जीवनदृष्टी विकसित झाली. या ग्रंथांनी केवळ धार्मिक किंवा आध्यात्मिक विचार मांडले नाहीत, तर समाजजीवन, नैतिकता, निसर्गाशी सुसंवाद आणि मानवी मूल्यांची जपणूक यांसाठी मार्गदर्शन केले. त्यामुळे भारतीय ज्ञान परंपरेचा पाया अत्यंत दृढ आणि समृद्ध असल्याचे दिसून येते.

या प्राचीन ज्ञानपरंपरेचा प्रभाव पुढे मध्ययुगीन मराठी साहित्यावरही स्पष्टपणे दिसून येतो. महानुभव साहित्य, संत साहित्य, पंडिती साहित्य आणि शाहिरी वाङ्मय या विविध साहित्यप्रकारांमधून भारतीय ज्ञानपरंपरेतील विचार, तत्त्वज्ञान आणि सांस्कृतिक मूल्ये लोकभाषेतून जनसामान्यांपर्यंत पोहोचली. ओवी, अभंग, भारुड, आख्यानकाव्य, लावणी, पोवाडा यांसारख्या काव्यप्रकारांमधून समाजप्रबोधन, नैतिक मूल्ये, भक्तीभाव आणि सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देण्यात आली.

संत साहित्याने विशेषतः लोकभाषेचा स्वीकार करून भक्ती, समता, बंधुता आणि मानवी मूल्यांचा संदेश दिला, तर महानुभव आणि पंडिती साहित्याने ज्ञानपरंपरेतील तत्त्वज्ञानात्मक विचारांचे जतन केले. शाहिरी वाङ्मयाने इतिहास, पराक्रम आणि सामाजिक जाणीव यांचा प्रभावी आविष्कार घडवून आणला. या सर्व साहित्यप्रवाहांमधून भारतीय ज्ञानपरंपरेची सातत्यपूर्ण परंपरा जपली गेली आणि ती समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचली. एकूणच, प्राचीन भारतीय ज्ञानस्रोत आणि मध्ययुगीन मराठी साहित्य यांचा परस्परसंबंध अत्यंत निकटचा आहे. प्राचीन ग्रंथांतील तत्त्वज्ञान, मूल्ये आणि सांस्कृतिक वारसा मध्ययुगीन साहित्याद्वारे अधिक व्यापक स्वरूपात लोकांपर्यंत पोहोचला. त्यामुळे भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ भूतकाळातील वारसा नसून, ती आजही समाजाला मार्गदर्शन करणारी आणि सांस्कृतिक ओळख दृढ करणारी एक महत्त्वपूर्ण परंपरा आहे.

संदर्भ ग्रंथ

१) प्राचीन भारतीय ज्ञान प्रणाली, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

२) धर्मानंद कोसंबी ,"जातक कथासंग्रह" मुक्तांगण प्रकाशन, पुणे, २०१६, पृष्ठ क्र.१७ ते १९.

३) धर्मानंद कोसंबी ,"जातक कथासंग्रह" मुक्तांगण प्रकाशन, पुणे, २०१६, पृष्ठ क्र.३६ ते ३७.

४) शेषराव मेश्राम, "थेरी गाथा" महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९९३, पृष्ठ क्र.४०)

५) मराठी विश्वकोशातील नोंद.

६) डहाके वसंत, मराठीतील कथनरूपे, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१२. पृ. क्र. ४.

७) तत्रैव, पृ. क्र.३- ४.

८) कथन- व. द. देसाई, बालभारती, प. २ रे, १९७९, महाराष्ट्र, पृ. २०-२३.

९) वरखेडे मंगला "निवडक गोष्टींच्या गृहीत" दीपराज प्रकाशन पुणे, २०२५, पृष्ठ क्र. १७ ते १९.

१०) अभिजात मराठी भाषा विशेषांक २०२५, हेमांगी.

११) डहाके वसंत, मराठीतील कथनरूपे, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१२. पृ. क्र. १०-१३.

१२) नसिराबादकर, ल. रा, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.२००६.

१३) शेणोलीकर, ह. श्री, प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, डायमंड पब्लिकेशन, पुणे. २०११.

१४) शेणोलीकर, ह. श्री, प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, डायमंड पब्लिकेशन, पुणे. २०११.

१५) डहाके वसंत, मराठीतील कथनरूपे, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१२. पृ. क्र. १५-१७.

१६) धोंड म. वा. 'मऱ्हाठी लावणी' मौज प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती २००३ पृष्ठ क्र.१७.

१७) चरेगावकर शैलजा "ढोलकीच्या तालावर घुंगरू थरारल", लावणी संग्रह, नेहारा प्रकाशन, पुणे २०१६ पृ. क्र. ७०.

१८) पगार एकनाथ, 'लोकसाहित्य व आधुनिक साहित्य', यचममुवि, नाशिक, पृ. क्र. ३५.

१९) प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, ह.श्री. शेणोलीकर, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृ. क्र. २८३.

२०) तत्रैव, पृ. क्र.३०२.

***

प्रकरण ६

भारतीय ज्ञान परंपरा आणि आधुनिक मराठी साहित्य

प्रास्ताविक

६.१ भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्व

६.२ भारतीय ज्ञान परंपरेची वैशिष्ट्ये

६.३ भारतीय प्राचीन वेद

६.४ भारतीय ज्ञान परंपरेतील बृहतकथांचे महत्त्व

६.५ भारतीय ज्ञान परंपरेतील स्थान

- ६.५.१ कथा सरीत्सागर
- ६.५.२ वेदोक्त कथा
- ६.५.३ पंचतंत्र
- ६.५.४ वेताळ पंचविशी

६.६ आधुनिक संदर्भात भारतीय ज्ञान परंपरेची भूमिका

- ६.६.१ भारतीय ज्ञान परंपरा
- ६.६.२ आधुनिक मराठी निबंध
- ६.६.३ आधुनिक मराठी कविता
- ६.६.४ आधुनिक मराठी कथा
- ६.६.५ आधुनिक मराठी नाटक
- ६.६.६ आधुनिक मराठी कादंबरी

६.७ साठोत्तरी साहित्य प्रवाह

६.८ समारोप

संदर्भ सूची

प्रकरण ६

भारतीय ज्ञान परंपरा आणि आधुनिक मराठी साहित्य

प्रास्ताविक

भारतीय संस्कृती एक महान संस्कृती आहे. 'भारतीय ज्ञान परंपरा' ही अत्यंत समृद्ध आणि अद्वितीय अशी आहे. भारतीय ज्ञान परंपरेत ज्ञान आणि विज्ञान, लौकिक आणि पारलौकिक, कर्म आणि धर्म तसेच भोग आणि त्याग यांचा अद्भुत समन्वय आहे. प्राचीन वेद काळापासूनच भारतीय शिक्षणपद्धतीने जीवनातील नैतिक, भौतिक, आध्यात्मिक आणि बौद्धिक मूल्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. ग्रंथार्जनासोबतच शारीरिक श्रमांचे महत्त्व भारतीय ज्ञानपरंपरेतून अधोरेखित होते.

भारतीय ज्ञान परंपरेचा प्रभाव केवळ धार्मिक किंवा तात्त्विक साहित्यापुरता मर्यादित न राहता, तो आधुनिक मराठी विज्ञान साहित्य, इतिहास, आणि सामाजिक चिंतनातही दिसून येतो. त्यामुळे आधुनिक मराठी वाङ्मय भारतीय ज्ञान परंपरेचा एक समृद्ध आणि सजीव भाग आहे, जो आपल्या सांस्कृतिक ओळखीला बळकट करतो आणि नव्या पिढीला आपल्या मूळ ज्ञानाशी जोडतो. आधुनिक मराठी साहित्याने भारतीय ज्ञान परंपरेचे अनेक पैलू उलगडून दाखवले आहेत. मानवतावाद, नवीन विचार, सामाजिक न्याय ही आधुनिक मराठी साहित्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. आधुनिक मराठी साहित्याने मानवतावादाला प्राधान्य दिले आहे, ज्यामध्ये सर्व मानवांना समान मानले जाते. आधुनिक मराठी साहित्याने पारंपरिक विचारांना विरोध केला आहे आणि नवीन विचारधारेला प्रोत्साहन दिले आहे. आधुनिक मराठी साहित्याने सामाजिक न्यायाला प्राधान्य दिले आहे.

भारतात जगप्रसिद्ध ज्ञानकेंद्रे होती. या ज्ञानकेंद्रामधुन भारतीय ज्ञान परंपरा, वेद, संस्कृत साहित्य वैज्ञानिक पद्धतीनुसार अभ्यासले गेले आणि ही विद्यापीठे योग आणि आयुर्वेद विज्ञानाची प्रयोगशाळा आणि केंद्रे म्हणून प्रसिद्धीस आली. भारताने नेहमीच जगाला आध्यात्मिक बंधुता, योग आणि आयुर्वेदाचे ज्ञान दिले आहे. ज्याचे अनुकरण आजही जागतिक समुदाय करत आहे.

६.१ भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्व

प्राचीन काळी गुरुकुल शिक्षणप्रणाली होती. ब्रह्मचर्याचे पालन करीत शिष्य अठरा विद्या सहा वेदांग, चार वेद चार उपवेद मीमांसा, न्याय, पुराण आणि धर्मशास्त्र असे सर्वप्रकारचे ज्ञान प्राप्त करीत. उदरनिर्वाहासाठी कोणतीही अडचण येत नसे आणि प्रौढावस्थेत पोचेपर्यंत ते आपल्या विषयात पारंगत झालेले असत. अशा भारतीय शिक्षण व्यवस्थेत अध्यापन करणारे आचार्य हे त्यागी, संपूर्ण कुशल आणि आर्थिक मोहापासून दूर असणारे असत. तेव्हा शिक्षण हे व्यवसायाचे आणि कमाईचे साधन मानले जात नव्हते. प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा समृद्ध होती. धर्म, अर्थ,

काम, मोक्ष यांचा समावेश असलेल्या व्यक्तीचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकसित करणे हा तिचा उद्देश होता. भारतातील ऋषीमुनी सर्वोच्च ज्ञानाचा प्रसार करून उत्तम संस्कार देण्यात आले.

वैदिक कालखंडात स्त्रीशिक्षणाच्या क्षेत्रात भारताची कामगिरी उल्लेखनीय अशी होती. मैत्रेयी, ऋतंभरा, अपाला, गार्गी आणि लोपामुद्रा इत्यादी स्त्रियांची नावे त्यांच्या बुद्धिमत्तेमुळे जगप्रसिद्ध झाली होती. बौधायन, कात्यायन, आर्यभट्ट, चरक, कणाद, वराहमिहिर, नागार्जुन, अगस्त्य, भगैहरी, शंकराचार्य, स्वामी विवेकानंद इत्यादी अनेक महापुरुषांनी भारतभूमीवर जन्म घेऊन भारतीय ज्ञान परंपरा समृद्ध करण्यात अतुलनीय योगदान दिले आहे.

६.२ भारतीय ज्ञान परंपरेची वैशिष्ट्ये

भारतीय ज्ञान प्रणाली ही एक समृद्ध आणि वैविध्यपूर्ण परंपरा आहे; ज्यामध्ये तत्त्वज्ञान, अध्यात्म, विज्ञान, कला आणि संस्कृती यासह विविध विषयांचा समावेश आहे. हा हजारो वर्षांचा मोठा इतिहास आहे आणि विविध संस्कृती आणि संस्कृतींच्या प्रभावाखाली कालांतराने तो विकसित झाला आहे. भारतीय ज्ञान परंपरा अनेक कारणांसाठी महत्त्वपूर्ण आहे हे समजून घेण्यासाठी पुढील मुद्यांचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. १) समग्र दृष्टिकोन २) बहुविद्याशाखीय ३) प्राचीन विचारसरणी ४) संदर्भित प्रासंगिकता ५) आध्यात्मिक वाढ ६) सांस्कृतिक वारसा ७) जागतिक प्रभाव ८) अनुकूलता ९) सशक्तीकरण १०) सार्वत्रिक आवाहन आपण अधिक सुसंवादी आणि संतुलित अस्तित्व वाढवून, जग आणि स्वतःबद्दलची आपली समज समृद्ध करू शकतो. म्हणूनच या सर्व वैशिष्ट्यांमुळे भारतीय ज्ञान परंपरा जगातील समृद्ध ज्ञान परंपरा म्हणून ओळखली जाते.

६.३ भारतीय प्राचीन वेद

भारतीय प्राचीन वेद हे चार आहेत. हे चार वेद प्राचीन भारतीय ग्रंथ आहेत, जे हिंदू धर्माचा पाया म्हणून ओळखले जातात आणि त्यांना ज्ञान आणि बुद्धीचे व विचारसरणीचे अंतिम स्रोत मानले जातात. चार वेदांना अपौरुषेय मानले जाते, म्हणजे ते मानवाने निर्माण केलेले नसून ते प्राचीन ऋषी प्राप्त केलेले आहे. हिंदू तत्त्वज्ञान, अध्यात्म आणि संस्कृतीचा पाया आहेत आणि आजही भारतीय विचार आणि पद्धतींवर ते प्रभाव टाकत आहेत आणि टाकत राहतील. (वेदाबद्दलची सविस्तर माहिती प्रकरण दोन मध्ये घेण्यात आली आहे.)

६.४ भारतीय ज्ञान परंपरेतील बृहतकथांचे महत्त्व

भारतीय ज्ञान परंपरेत बृहतकथा यांचा खूप महत्त्वाचा वाटा आहे. या कथासंग्रहांमध्ये जीवनाचे तत्त्वज्ञान, नैतिकता, धर्म, समाजशास्त्र, आणि मानव स्वभाव यांचे सखोल विवेचन केलेले असते. बृहतकथा म्हणजे कथा, उपदेश, आणि तत्त्वज्ञान यांचा संगम असतो. या कथांमुळे लोकांना

नैतिक मूल्ये, जीवनाचे धडे, आणि सामाजिक नियम समजतात. या कथांमुळे भारतीय संस्कृती, परंपरा, आणि धार्मिक श्रद्धा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचतात. व संस्कृतीचे संवर्धन होताना दिसते. या कथांमधून धार्मिक व तात्त्विक ज्ञान मिळते. अनेक बृहतकथांमध्ये वेद, उपनिषद, पुराण यांचे तत्त्वज्ञान कथात्मक स्वरूपात दिलेले असते. ज्यामुळे ते सोप्या भाषेत समजतात. या कथांमधून मनोरंजन आणि शिक्षण यांचा संगम साधला जातो. या कथांमध्ये मनोरंजनाचा घटक असूनही त्यातून जीवनाचे महत्त्वाचे धडे दिले जातात.

उदा. पंचतंत्र: प्राचीन भारतीय नैतिक कथा संग्रह, ज्यात प्राणी आणि मानव यांच्या माध्यमातून जीवनाचे तत्त्व सांगितले आहे. हितोपदेश: पंचतंत्रासारखीच नैतिक कथा संग्रह, ज्यात शहाणपणाचे आणि नीतीचे धडे दिलेले आहेत. शतपथ ब्राह्मण: वेदांच्या समजुतीसाठी कथात्मक स्वरूपात लिहिलेले ग्रंथ. रामायण आणि महाभारत: हे महाकाव्य देखील बृहतकथांच्या स्वरूपात आहेत ज्यात धर्म, कर्तव्य, आणि जीवनाचे तत्त्वज्ञान समाविष्ट आहे. बुद्धचरित: गौतम बुद्ध यांच्या जीवनावर आधारित कथा, ज्यातून बौद्ध तत्त्वज्ञान समजते.

या बृहतकथांमुळे भारतीय ज्ञान परंपरेत तत्त्वज्ञान, नैतिकता, आणि संस्कृती यांचा समृद्ध वारसा निर्माण झाला आहे.

६.५ भारतीय ज्ञान परंपरेतील स्थान

कथा सरीत्सागर भारतीय काव्यपरंपरेतील एक महत्त्वाचा ग्रंथ आहे ज्याने कथालेखनाला नवे आयाम दिले. साहित्यिक परंपरा निर्माण केली. या काव्याद्वारे नीतिमूल्ये, जीवनतत्त्वे आणि सांस्कृतिक मूल्ये लोकांपर्यंत पोहोचली. ज्ञानाचा प्रसार केला. यात अनेक धार्मिक कथा आणि पुराणकथांचा समावेश आहे, ज्यामुळे भारतीय धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचा अभ्यास करता येतो. कथा सरीत्सागर हे भारतीय ज्ञान परंपरेतील एक अमूल्य साहित्यिक ठेवा आहे, ज्याने कथालेखनाच्या माध्यमातून जीवनाचे विविध पैलू आणि ज्ञान लोकांपर्यंत पोहोचवले. हे ग्रंथ केवळ मनोरंजनासाठी नाही तर शिक्षणासाठीही महत्त्वाचे आहे.

६.५.१ कथा सरीत्सागर

सरीत्सागर हे मध्ययुगीन संस्कृत काव्य आहे, ज्याचे लेखक सोमदेव बट्टाचार्य होते. हे काव्य सुमारे १४ व्या शतकात लिहिले गेले आहे. कथा सरीत्सागर म्हणजे "कथा सागराचा प्रवाह" किंवा "कथा सागर" याचा अर्थ होतो. हे काव्य अनेक कथा, उपकथा आणि आख्यायिका यांचा संग्रह आहे. हे एक कथासंग्रह आहे ज्यात विविध प्रकारच्या कथा आहेत जसे की नीतिकथा, प्रेमा कथा, ऐतिहासिक कथा, धार्मिक कथा इत्यादी. या काव्यात अनेक स्तरांवर कथा गुंफलेल्या

आहेत, म्हणजे एका कथेत अनेक उपकथा आहेत. हे संस्कृत भाषेत लिहिलेले असून, त्यात सुंदर अलंकार आणि छंदांचा वापर केला आहे.

६.५.२ वेदोक्त कथा

भारतीय ज्ञान परंपरेतील वेदोक्त कथांचे महत्त्व खूप मोठे आहे. वेद हे प्राचीन भारतीय धर्मग्रंथ असून त्यामध्ये जीवन, ब्रह्मांड, धर्म, तत्त्वज्ञान, आणि संस्कृती यांचे मूळ तत्त्वे सांगितली आहेत. वेदांमध्ये दिलेल्या कथांचा भारतीय ज्ञान परंपरेशी सहसंबंध आहे. या वेदोक्त कथामधुन तत्त्वज्ञान आणि धर्म, संस्कृती आणि सामाजिक मूल्ये, विज्ञान आणि तंत्रज्ञान, साहित्य आणि कला, वेदांतील मंत्र, छंद, आणि गीतांनी भारतीय साहित्य आणि कलेला समृद्धी दिली.

वेदोक्त कथांचे भारतीय ज्ञान परंपरेत खोलवर आणि सर्वांगीण सहसंबंध आहेत. हे कथन तत्त्वज्ञान, धर्म, संस्कृती, विज्ञान, कला आणि आध्यात्मिकतेच्या विविध अंगांना जोडते आणि भारतीय ज्ञानपरंपरेचा पाया मजबूत करते.

६.५.३ पंचतंत्र

पंचतंत्र हे प्राचीन भारतीय नीतिकथा संकलन आहे, ज्यामध्ये प्राणी आणि मानव यांच्या कथांद्वारे जीवनातील नीतिमूल्ये आणि शहाणपण शिकवले जाते. त्याचा उद्देश लोकांना व्यवहारिक ज्ञान देणे हा होता. पंचतंत्रातील कथा म्हणजे भारतीय संस्कृतीचा वारसा होय. आधुनिक मराठी साहित्य भारतीय ज्ञान परंपरेतील तत्त्वज्ञान, धर्म, संस्कृती यांचा साक्षात्कार करून त्याचा प्रचार करते. पंचतंत्र या परंपरेचा एक महत्त्वाचा भाग असल्याने त्याचा प्रभाव दिसून येतो.

आधुनिक मराठी साहित्यही नीतिमूल्ये आणि जीवनशिक्षा देण्याचा प्रयत्न करते. पंचतंत्रातील कथा आणि त्यातील संदेश आधुनिक लेखकांनी आपल्या कथेमध्ये वापरलेले दिसते. पंचतंत्रातील कथाकथन पद्धत म्हणजे सोप्या आणि प्रभावी कथांद्वारे शिकवण देणे, हे आधुनिक मराठी साहित्यानेही अंगीकारले आहे. त्यामुळे आधुनिक मराठी साहित्यात भारतीय ज्ञान परंपरेतील पंचतंत्राचा सहसंबंध दिसतो.

६.५.४ वेताळ पंचविशी

वेताळ पंचविशी ही कथा संकलन भारतीय ज्ञान परंपरेचा एक महत्त्वाचा भाग आहे. या कथासंग्रहात वेताळ आणि राजा विक्रम यांच्यातील संवादातून नैतिक, तत्त्वज्ञानिक, सामाजिक आणि धार्मिक विचार मांडलेले आहेत. या कथांमध्ये जीवनाचे विविध पैलू, न्याय, धर्म, कर्तव्य, आणि मानवतेचे मूल्य यांचे दर्शन होते.

आधुनिक मराठी साहित्यात वेताळ पंचविशीने विविध प्रकारे प्रभाव टाकला आहे. वेताळ पंचविशीतील संवादात्मक आणि प्रश्नोत्तरी स्वरूपाची कथा सांगण्याची पद्धत आधुनिक लेखकांनी

स्वीकारली आहे. यामुळे कथा अधिक आकर्षक आणि विचारप्रवर्तक बनतात. या कथांमधील नैतिक संदेश आणि तत्त्वज्ञान आधुनिक साहित्यिकांनी त्यांच्या कथेतील पात्रांच्या संवादांतून मांडले आहे. वेताळ पंचविशी प्रमाणेच अनेक आधुनिक मराठी लेखकांनी पारंपरिक कथा आणि लोककथांचा आधार घेऊन नवीन संदर्भात कथा लिहिल्या आहेत.

उदा. पु. ल. देशपांडे यांचे साहित्य. त्यांनी त्यांच्या कथांमध्ये वेताळ पंचविशीच्या कथाकथन शैलीचा वापर केला आहे. त्यांच्या कथांमध्ये संवादात्मक शैली आणि नैतिक प्रश्न उपस्थित करणे याचा प्रभाव दिसतो. तसेच वसंत बापट यांचे "वेताळ कथा" पुनर्लेखन- वसंत बापट यांनी वेताळ पंचविशीच्या कथांचा आधुनिक संदर्भात पुनर्लेखन केले आहे, ज्यामुळे त्या कथा आजच्या काळातही सुसंगत आणि उपयुक्त वाटतात.

वेताळ पंचविशी भारतीय ज्ञान परंपरेतील एक अमूल्य वारसा असून, त्याचा आधुनिक मराठी साहित्यातील प्रभाव कथाकथन शैली, नैतिक विचार आणि पारंपरिक विषय दिसून येतो. या कथांनी मराठीला एक समृद्ध सांस्कृतिक पाया दिला आहे.

६.६ आधुनिक साहित्य संदर्भात भारतीय ज्ञान परंपरेची भूमिका

आधुनिक युगात प्रचलित असलेले भारतीय ज्ञान आणि परदेशातून येणारे तथाकथित नवनवीन शोध ज्यांचा आपल्या धर्मग्रंथांमध्ये उल्लेख आहे, हे भारतीय ज्ञान परंपरेच्या समृद्धतेचे पुरावे आहेत. गेल्या काही शतकांपासून या भूमीला असे वाटू लागले आहे की जणू इथे ज्ञानाचा अंकुरच फुटला नाही. हजारो वर्षांच्या गुलामगिरीत आपल्या शेकडो पिढ्यांनी वेदना सहन करून हे ज्ञान जपले आहे. पण कालांतराने त्याची उपयुक्तता कमी होत गेली. त्यामुळे भारताच्या ज्ञानवृक्षाच्या सावलीत जोपासणाऱ्या या जगाला सांगण्याची वेळ आली आहे की, भारताचे गुरुत्वाकर्षण अजूनही कायम आहे आणि भारताचे ज्ञान गंगेच्या पाण्यासारखे आहे. जे शुद्ध आणि अखंड आहे.

भारताने जगाला ज्ञान व्यवस्था आणि विज्ञानाचे अनेक आयाम दिले. भारतीय ज्ञान परंपरेबद्दल विचार करण्याची वेळ आली आहे. आजच्या तरुण पिढीने पाश्चिमात्य जगाची जीवनशैली अंगीकारून या शब्दांचा आपल्या जीवनात समावेश केला आहे. या प्रकारची वृत्ती भारतीय ज्ञान परंपरेत आपल्याला दिसत नाही.

भारतीय ज्ञान परंपरांचा जगावर प्रभाव आहे. जागतिक स्तरावर राजकारण असो वा समाज, संस्कृती असो वा सभ्यता, ज्ञान असो वा कौशल्य, योग असो वा व्यवहार, भाषा असो वा विज्ञान, शोध असो वा संशोधन, तर्क असो वा विश्लेषण असो, भारतीय ज्ञान परंपरा सर्वत्र आपला प्रभाव व्यक्त करत आहेत. या ज्ञान परंपरांमधून पाश्चात्य संस्कृती कौटिल्याच्या राजकारणाची शिकवण

घेते आणि महर्षी पतंजलींच्या योग शिकवणीतून आरोग्याकडे वळते. चरकाची संहिता संशोधन क्षेत्राला यशस्वी करते, तर सामवेदाची स्तोत्रे त्याला मधुर संगीताशी जोडतात.

भारतीय ज्ञान परंपरा ही हजारो वर्षांची वैचारिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक देणगी आहे. ऋग्वैदिक काळापासून ते उपनिषद, पुराणे, धर्मशास्त्रे, नाट्यशास्त्र, आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र अशा विविध शाखांतून ज्ञानाचे पैलू या परंपरेमध्ये अंतर्भूत झालेले आहेत. भारतीय ज्ञानपरंपरेचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर आधुनिक मराठी साहित्यावर असल्याचे आपल्याला दिसून येते. मराठी साहित्यात कथा, कविता, कादंबरी, नाटत या वाङ्मय प्रकारातून आधुनिक काळात भारतीय ज्ञान परंपरा आलेली आपल्याला दिसते.

६.६.१ भारतीय ज्ञान परंपरा

भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ माहिती किंवा शिक्षणाची परंपरा नसून ती जीवन, संस्कृती, तत्त्वज्ञान, अध्यात्म आणि विज्ञान यांचा एकत्रित वारसा आहे. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, संत परंपरा, तसेच आधुनिक विचारवंतांच्या लिखाणातून भारतीय समाजात ज्ञानाचा प्रवाह सतत चालू राहिला आहे. भारतीय संस्कृती जगातील सर्वात प्राचीन आणि वैविध्यपूर्ण संस्कृतींपैकी एक मानली जाते. तिचा पाया ज्ञानावर आधारित आहे. ऋग्वेदातील 'सा विद्या या विमुक्तये' हा विचार ज्ञानाचे उद्दिष्ट केवळ उपजीविका नसून, आत्ममुक्ती आणि लोककल्याण हे असल्याचे सांगतो. भारतीय ज्ञान परंपरेत अध्यात्म आणि व्यवहार, विज्ञान आणि तत्त्वज्ञान, कला आणि साहित्य यांचा अद्वितीय संगम आहे. निबंध, कथा, कादंबरी, कविता आणि नाटक हे भारतीय ज्ञान परंपरेचे वाहक असून मानवी जीवनाचे मार्गदर्शक आहेत. जे समाजाला योग्य दिशा देतात. म्हणून आधुनिक मराठी साहित्य प्रकाराचा थोडक्यात आढावा घेणार आहोत.

६.६.२ आधुनिक मराठी निबंध

आधुनिक मराठी साहित्याचा पाया भारतीय ज्ञान परंपरेवर रचला गेला. असला तरी आधुनिक मराठी साहित्यावर इंग्रजी साहत्याचा प्रभाव आपल्याला दिसतो. या काळातील ल साहित्य सामाजिक जागृतीचे साधन ठरला. आधुनिक काळातील साहित्यिकांनी भारतीय ज्ञान परंपरेतील तत्त्वे आजच्या समाज, तंत्रज्ञान, जागतिकीकरण, पर्यावरण यांसारख्या नव्या विषयांशी जोडली.

मराठी साहित्याने भारतीय ज्ञान परंपरेतील तत्त्वज्ञानाला, विशेषतः वेद, उपनिषद, आणि भगवद्गीतेतील तत्वांना आपल्या काव्य, नाटक, आणि कथा साहित्यामध्ये स्थान दिले आहे. यामुळे वाचकांना भारतीय तत्त्वज्ञानाची सखोल समज मिळते. तसेच, आधुनिक काळातील लेखकांनी भारतीय ज्ञानपरंपरेतील नैतिक मूल्ये आणि सामाजिक विचार यांना आपल्या लेखनातून प्रस्थापित केले आहे, ज्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न केला आहे.

आधुनिक मराठी निबंध हा केवळ वैचारिक लेखनाचा प्रकार नसून तो भारतीय ज्ञान परंपरेचा आधुनिक आरसा आहे. त्यातून प्राचीन तत्त्वे आणि आधुनिक वास्तव यांचा सुंदर संगम घडतो. बदलत्या सामाजिक, राजकीय आणि तांत्रिक युगातही ही परंपरा सजीव राहावी, यासाठी निबंधकारांनी नव्या पिढीशी संवाद साधत आहे. त्यात गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ती रानडे, महात्मा ज्योतिराव फुले, विष्णुबुवा ब्रह्मचारी, शि.म. परांजपे, न.चिं. केळकर, वि. दा. सावरकर, श्री. म. माटे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पु. ग. सहस्रबुद्धे, विनोबा भावे आदी निबंधकरांचा उल्लेख करावा लागेल.

'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' या निबंधात विष्णुशास्त्री चिपळूणकर इंग्रजी विद्याविभूषित नवीन विद्वानांकडून मातृभाषेची केली जाणारी अवहेलना यावरती त्यांनी आपले विचार मांडले आहेत. इंग्रजी भाषा ही मराठीपेक्षा ज्ञानाच्या अभिव्यक्तीचे सामर्थ्य असणारी आहे, असा खोटा समज त्या काळात करून दिला जात होता. त्यावर तक्रार करून विष्णुशास्त्री चिपळूणकर म्हणतात, ''जी भाषा बोलणाऱ्यांनी दिल्ली-अटकेपर्यंत आपले झेंडे नेऊन लावले, जीत तुकाराम रामदासांसारख्या भगवत्परायण साधूनी आपले श्रुतीवंद्य अर्थ ग्रथित केले, जीस मुक्तेश्वर, वामनपंडित, मोरोपंत इत्यादी कवींनी आपल्या रसाळ व प्रासादिक वाणीने संस्कृत भाषेचीच प्रौढी आणली, त्या भाषेस आवेश, गांभीर्य व सरसता या गुणांकरता कोणत्याही अन्य भाषेच्या तोंडाकडे बघण्याची खास गरज नाही अशी आमची खात्री आहे!''[१]

आधुनिक मराठी वाड्मयात भारतीय ज्ञान परंपरेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही प्राचीन काळापासून विविध क्षेत्रांमध्ये समृद्ध आहे, ज्यात तत्त्वज्ञान, विज्ञान, धर्म, साहित्य, आणि कला यांचा समावेश होतो. मराठी साहित्यकारांनी या परंपरेचा आदर राखत तिचा वापर करून आपल्या लेखनात भारतीय तत्त्वज्ञान आणि संस्कृतीचे दर्शन घडवले आहे.

अभिजात मराठीभाषेची ताकद विष्णुशास्त्री चिपळूणकरांना त्याच वेळी समजलेली होती, त्यामुळे त्यांनी स्वभाषा, स्वधर्म आणि स्वइतिहास याना विचारात घेऊन मराठी भाषेला महत्त्व दिले. याबाबत मा.ग. बुद्धीसागर प्रस्तावनेत म्हणतात, ''चिपळूणकरांचा काळ हा इंग्रजी व मराठी यांच्या अपरिहार्य संसर्गाचा व संघर्षाचा काल होता. या काळात इंग्रजीचे आक्रमण थोपवून मराठीचे स्वत्व कायम राखणे जितके आवश्यक होते तितकेच इंग्रजीचे नवे पाणी मराठीच्या प्राचीन भूमीत जिरवून तिची समृद्धी वाढविणे हेही महत्त्वाचे कार्य होते. नवीन कल्पना व नवीन ज्ञान यांच्या अभिव्यक्तीसाठी नवीन शब्दांच्या वाटा निर्माण करावयाच्या होत्या, पण असे होत असताना मराठीचा मूळचा घाट शाबूत ठेवण्याची खबरदारी घेणे आवश्यक होते. ज्ञानप्रसारासाठी भाषांतराच्या मार्गाने इंग्रजी ज्ञानाची मराठीत आयात करणे अपरिहार्य होते. हे ज्ञान पूर्णतः आत्मसात करून ते अभिजात मराठीत वाचकांच्या पुढे ठेवणे, ही त्यापुढची पायरी होती. हे कसे

करावे हे चिपळूणकरांनी आपल्या निबंधात सांगितले व त्याचे उदाहरणही आपल्या वाङ्मयकृतीच्या द्वारे घालून दिले.''[२]

भारतीय ज्ञान परंपरेचा प्रभाव केवळ धार्मिक किंवा तात्त्विक साहित्यापुरता मर्यादित न राहता, तो आधुनिक मराठी विज्ञान साहित्य, इतिहास, आणि सामाजिक चिंतनातही दिसून येतो. त्यामुळे आधुनिक मराठी वाङ्मय भारतीय ज्ञान परंपरेचा एक समृद्ध आणि सजीव भाग आहे, जो आपल्या सांस्कृतिक ओळखीला बळकट करतो आणि नव्या पिढीला आपल्या मूळ ज्ञानाशी जोडतो. आधुनिक मराठी साहित्य आणि भारतीय ज्ञान परंपरा यांचा परस्पर संबंध खूप गहण आहे. आधुनिक मराठी साहित्याने भारतीय ज्ञान परंपरेचे अनेक पैलू उलगडून दाखवले आहेत. मानवतावाद, नवीन विचार, सामाजिक न्याय ही आधुनिक मराठी साहित्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. आधुनिक मराठी साहित्याने मानवतावादाला प्राधान्य दिले आहे, ज्यामध्ये सर्व मानवांना समान मानले जाते. आधुनिक मराठी साहित्याने पारंपरिक विचारांना विरोध केला आहे आणि नवीन विचारधारेला प्रोत्साहन दिले आहे. आधुनिक मराठी साहित्याने सामाजिक न्यायाला या ठिकाणी आपण अभ्यासाच्या सोयीसाठी काही निबंधकारांचा अभ्यास करणार आहोत.

६.६.३ आधुनिक मराठी कविता

आधुनिक कवींनीही भारतीय परंपरेतील मूल्ये जपली आहेत. परंपरा आणि आधुनिकता यांचा समन्वय आधुनिक कवितेत आढळतो. आधुनिक मराठी साहित्यात कवीता या प्रकाराला खूप महत्त्व आहे. महाकाव्य, खंडकाव्य, कथाकाव्य, चंपूकाव्य हे काव्य प्रकारात कमी लेखन होत आहे. दिसते. कविता, गीत, भावगीत व लोकगीत या प्रकारांत अर्वाचीन काळात विपुल रचना होत आहे.

प्राचीन काळापासून जगातील अनेक संस्कृतींमध्ये छंदोमयते नुसार काव्याचे गद्य आणि पद्य, अगेय आणि गेय असे प्रकार समजण्यात आले आहेत. आधुनिक मराठी साहित्यात छंदयुक्त काव्य व मुक्तछंद असा प्रकारभेद आला. उच्चारलेल्या भाषेतील काही ध्वनिगुणांचा निवडकपणे आणि प्रकर्षाने उपयोग करून त्यांच्यात छंद्व्यवस्था बांधण्यात येऊ लागली. उच्चारकाल, उच्चारित घटकांचे कालमानानुसार नियमन, अनुप्रास आणि यमकांद्वारे शब्दांमध्ये व ओळींमध्ये साम्य व साहचर्याचे संबंध प्रस्थापित करणे अशा काही प्रचलनाने छंदव्यवस्था विकसित झाली. गीतामध्ये गायन हा मुख्य भाग असतो. भारतीय ज्ञान परंपरेत कविता प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. वेदांतील ऋचा, उपनिषदांतील विचार आणि संतसाहित्य यांमधून कविता विकसित झाली आहे. त्यामुळे कवितेत ज्ञान आणि सौंदर्य यांचा संगम दिसतो.

कवितेची लय, ताल, छंद, अलंकारिक आणि प्रभावी भाषा, भावना आणि विचार यांचे एकत्रित दर्शन, व मोठा संदेश देण्याची क्षमता कवितेमधे असते.

भारतीय ज्ञान परंपरेत ऋग्वेदा मधील ऋचा ही सर्वात प्राचीन काव्यरचना आहे. संत साहित्यातून अध्यात्म आणि भक्ति व्यक्त झाली आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव यांच्या अभंगांमध्ये जीवनमूल्ये आणि भक्तीभाव दिसतो. उदा.:- तुकारामांच्या अभंगांमध्ये सत्य, नम्रता, ईश्वरभक्ती यांचा संदेश मिळतो. कवितेमधुन पुढील प्रमाणे ज्ञान व्यक्त होते. नैतिक ज्ञानातुन योग्य-अयोग्याची जाणीव होते, सामाजिक ज्ञानामधुन समाजातील विषमता लक्षात येते व अन्यायांवर भाष्य करता येते, मानवी भावनामधुन प्रेम, करुणा, शांती निर्मान होते इत्यादी स्वरुपाचे कवितेमधुन होते.

मराठी साहित्याच्या विशिष्ट कालखंडात (१८७४-१९२०) इंग्रजी भाषा, साहित्य व संस्कृती यांच्या प्रभावाने मराठी गद्य घडू लागले होते. या काळात मराठी पद्य मात्र संस्कृत इंग्रजी काव्याची रूपांतरे, भाषांतरे, अनुवाद होत होते. मराठी पद्यभाषेच्या घडणीसाठी महत्त्वाची होती. या कालखंडात मराठी कवीनी आपली भारतीय ज्ञान परंपरा काव्य लेखनाच्या माध्यमातुन जपलेली दिसते. आधुनिक मराठी कवितेतील कवीचा संक्षिप्त परिचय पुढीलप्रमाणे घेतला आहे.

महादेव मोरेश्वर कुंटे यांनी 'राजा शिवाजी' (१८६९) हा काव्य संग्रह लिहिला. केशवसुत १८६६-१९०५ यांनी १३२ कविता लेखन केले आहे. यांना आधुनिक मराठी काव्याचे जनक म्हणतात. मराठीत प्रथमच सुनीत रचना, गूढगुंजनाचा प्रवाह, प्रेमकविता व निसर्ग कविताही मराठीत यांच्याद्वारेच आली.

रेव्हरंड नारायण वामन टिळक यांचे वनवासी फूल, सृष्टीची भाऊबीज, माझी भार्या, सुशीला, बापाचे अश्रू या कविता अतिशय प्रसिध्द आहेत. हे निसर्गकवी, फुलामुलांचे कवी म्हणून प्रसिध्द आहेत. टिळकांची कविता (१९१४), अभंगांजली (१९१९) व ख्रिस्तायन ही ग्रंथरचना केलेली आहे. टिळकांनी हिंदू पध्दतीने ख्रिस्ताची कीर्तने केली. हिंदू परंपरेत वाढल्याने अभंगरचना केली. यांच्या रचनेत भागवत धर्माची परंपरा व ख्रिस्ती धर्माचा प्रभाव दिसतो.

गोविंदाग्रज यांनीही काव्यलेखन केले. कविपंचकाचे समकालीन कवी बी, दत्तात्रय कोंडो घाटे, भा. रा. तांबे गीत हा प्रकार हे तांबे यांचे वैशिष्ट्य असून यांच्या कवितेत प्रेम कविता व वात्सल्य भावाच्या रचना, नाट्यगीतेही आहेत. गिरीश, यशवंत, माधव ज्युलियन, वि. द. घाटे, ग. त्र्यं.माडखोलकर, द. ल. गोखले या रविकिरण मंडळाताल कवीनी काव्याच्या अनेकविध काव्यनिर्मिती करणे काव्याचा विकास साधणे हे कार्य या मंडळाने केले.

१) शं. के. कानेटकर यांना कवी गिरीश या नावाने वोळखतात.यांचे खंडकाव्ये: आंबराई, अभागी कमल, कळा, अनिकेत (रूपांतरीत), अमृत, काव्यसंग्रह कांचनगंगा, फलभार, मानसमेघ, चंद्रलेखा, कांचनमेघ, सोनेरी चांदणे इत्यादी लेखन प्रसिध्द आहे. २) यशवंत दिनकर पेंढारकर : मित्रप्रेमरहस्य, यशवंती, विनाझंकार, इंदूकला, यशोधन, भावमंथन, यशोगंध, यशोनिधी, यशोगिरी, ओजस्वीनी, बाकळ, कमंडलू कथाकाव्ये - खंडकाव्ये: जयमंगला, बंदीशाळा, काव्यकिरीट, तुटलेला तारा, मुठेलोकमाते, रणदुर्गा झाशीवाली इत्यादी लेखन केले आहे. ३) गोविंद त्र्यंबक दरेकर हे कवी गोविंद या नावाने प्रसिध्द आहेत. कवी गोविंद यांची कविता दुर्गाप्रसाद ही आहे. ४) केशवकुमार (प्रल्हाद केशव अत्रे,) : अकरावा अवतार, झेंडूची फुले (विडंबनकाव्य), गीतगंगा, पंचगण्य हे कवितासंग्रह आहेत. ५) साने गुरुजी (पांडुरंग सदाशिव साने) : पत्री, सत्याग्रही, खानदेश स्तोत्र ६) राजा बढे : मखमल, माझिया माहेरा जा, हसले मनी चांदणे, क्रांतिमाला ७) अनिल (आत्माराम रावजी देशपांडे) : फुलवात, पेर्ते व्हा, सांगाती, दशपदी हे काव्यसंग्रह; निर्वासित चिनी मुलास , प्रेम आणि जीवन , भग्नमूर्ती ही खडंकाव्ये लिहिली आहेत. ८) बा. सी. मर्देकर (बाळ सीताराम मर्देकर) : यांचे शिशिरागमा, आणखी काही कविता हे काव्यसंग्रह प्रसिद्ध असून कर्ण, संगम, औक्षण, बदकांचे गुपित या संगीतिका प्रसिद्ध आहेत. हे मराठी नवकाव्याचे प्रणेते म्हणून ओळखले जातात.

विष्णु वामन शिरवाडकर (१९१२-१९९८) यांना कुसुमाग्रज या टोपन नावाने लेखन केले असूनन अनेक साहित्यप्रकार यशस्वीपणे हाताळले. कुसुमाग्रज हे आधुनिक मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे साहित्यिक आहेत. ज्यांनी भारतीय ज्ञान परंपरेला त्यांच्या लेखनात प्रभावीपणे सादर केले आहे. त्यांच्या लेखनात भारतीय संस्कृती, तत्त्वज्ञान, आणि सामाजिक मूल्ये यांचा समावेश दिसून येतो. खाली काही उदाहरणे दिली आहेत ज्यातून कुसुमाग्रजांच्या लेखनातील भारतीय ज्ञान परंपरेचा प्रभाव स्पष्ट होतो.

कुसुमाग्रजांच्या लेखनात भारतीय ज्ञान परंपरेचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. त्यांच्या साहित्याने आधुनिक मराठी साहित्यात भारतीय तत्त्वज्ञान, संस्कृती, आणि सामाजिक मूल्यांची समृद्धी केली आहे. त्यामुळे ते भारतीय ज्ञान परंपरेचे एक महत्त्वाचे प्रतिनिधित्व करतात. कुसुमाग्रज हे मराठी साहित्याचे एक महान कवी होते ज्यांच्या कवितांमध्ये भारतीय ज्ञान परंपरेचा खोलवर प्रभाव दिसून येतो. भारतीय संस्कृतीतील विविध देवता, पुराणकथा, आणि लोककथा यांच्या संदर्भाने त्यांच्या कवितांना समृद्धी मिळाली आहे. भारतीय ज्ञान परंपरेतील धर्मशास्त्रीय दृष्टिकोनातून मांडले आहे. तसेच, त्यांच्या "माझा रंग" या कवितेत भारतीय तत्त्वज्ञानातील आत्म्याचा शोध आणि जीवनातील विविध रंग यांचा सुंदर संगम दिसतो.

कुसुमाग्रजांच्या कवितांमध्ये भारतीय ज्ञान परंपरेचा प्रभाव त्यांच्या तत्त्वज्ञान, धर्म, नैतिकता, आणि सांस्कृतिक संदर्भांमधून स्पष्टपणे दिसून येतो. त्यांच्या कवितांमुळे भारतीय ज्ञान परंपरेची समृद्धी आणि त्याचा आधुनिक जीवनाशी संबंध अधोरेखित होतो. हे नाटककार म्हणूनही ख्यातनाम असून यांच्या कवितेचे बाह्यांग रविकिरण मंडळाच्या काव्यासारखे; तर गाभा केशवसुती वळणाचा आहे. जीवनलहरी, विशाखा, किनारा, समीधा, मराठी माती, स्वगत, हिमरेषा, वादळवेल, छंदोमयी, मुक्तायन, पाथेय, महावृक्ष, मारवा, मेघदूत, रसयात्रा, प्रवासी पक्षी हे काव्यसंग्रह प्रसिध्द असुन १९८९ मध्ये ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला आहे.

गोविंद विनायक करंदीकर, यांना विंदा करंदीकर या नावाने ओळखतात. स्वेदगंगा, मृदगंध, जातक, धृपद, विरूपिका, अष्टदर्शने, संहिता, आदिमाया हे काव्यसंग्रह. मराठीत माधव ज्युलियन यांच्यानंतर यांनी काही गजल्या लिहिल्या; तसेच यांचे अनेक बालकविता संग्रह प्रसिद्ध आहेत. साहित्य अकादमी व ज्ञानपीठ पुरस्कार यांना प्राप्त झाला आहे.

बहिणाबाई चौधरी शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या बहिणाबाई निरक्षर होत्या पण त्यांनी प्रतिभा संपन्न कवयित्री होत्या. संतवाङ्मय, लोकगीते व अहिरणी बोली यांच्या संस्कारामुळे त्यांची कविता वैशिष्टयपूर्ण ठरलेली आहे. मराठी काव्याच्या क्षेत्रात केशवसुतपरंपरा, रविकिरणमंडळ, नवजाणिवांनी भरलेले नवकाव्य अशा घडामोडी सुरू असताना या साऱ्या घटितांपासून दूर असणारी, स्वतःच्या आणि स्वतःभोवतीच्या माणसांच्या विश्वात, जगण्यात रमलेली बहिणाबाईंची कविता लिहिली जात होती. ग्रामीण परिसरातील दैनंदिन जीवनाशी बांधलेल्या, साध्यासुध्या, कष्ट करणाऱ्या कुटुंबात व जीवनाकडे डोळसपणे पाहणाऱ्या स्त्रीचे भावविश्व बहिणाबाईंच्या कवितेत व्यक्त झाले आहे. बहिणाबाईंची कविता संतकाव्य किंवा लोकसाहित्य यांच्या परंपरेतून आलेली नाही. ती स्वयंभू आहे.

"धरित्रीच्या कुशीमंदी। बी-बियाणं निजली वन्हे पसरली माटी । जशी शाल पांघरली ऊन वाऱ्याशी खेळता । एका एका कोंबातून परगटले दोन पान । जसे हात जोडीसन"

बहिणाबाईंच्या कवितेत महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीचे संपूर्ण दर्शन घडते. कृषिजीवन, ईश्वराचे अस्तित्व त्याच्या काव्यातून दिसते.

"माझ्यासाठी पांडुरंगा । तुझं गीता भागवत पावसात सामावतं, । माटीमंधी उगवतं." इ.

गजानन दिगंबर माडगूळकर (१९१९-१९७७) : जोगीया, पूरिया हे काव्यसंग्रह, चैत्रबन, वैशाखी हे चित्रपट-गीतसंग्रह प्रसिद्ध असून यांचे 'गीतरामायण' हे काव्य महाराष्ट्राच्या घराघरांत पोहोचलेले आहे. वसंत बापट बिजली, सेतू, अकरावी दिशा, सकीना, शततारका, मानसी, प्रवासाच्या कविता, शिंग फुटले रणी, मेघहृदय, शूर मर्दाचा पोवाडा, तेजसी, राजसी, अनामिकाचे अभंग व इतर कविता. शांता शेळके वर्षा (१९४७), क्रूपसी, गोंदण, तोच चंद्रमा, कळयांचे दिवस

फुलांच्या राती, अनोळख, जन्म, जान्हवी, पाण्यावरच्या पाकळ्या, पूर्वसंध्या, असेन मी नसेन मी, श्रावण शिरवा, गणपतीची गाणी, चित्रगीते, किनारे मनाचे (निवडक कविता, १९९९). यांच्या कथा, कादंबरी, काव्य, प्रवासवर्णन इत्यादी लेखनातील निवडक लेखनाचा 'निवडक शांता' हा संग्रह (१९९४) प्रकाशित. नारायण सुर्वे ऐसा गा मी ब्रह्म, माझे विद्यापीठ, जाहीरनामा, सनद, नव्या माणसाचे आगमन, अनुराधा पोतदार आवर्त (१९६८), फॅक्टस् फ्लॉवर (१९७९).

मंगेश पाडगांवकर धारानृत्य, जिप्सी, छोरी, उत्सव, बोलगाणी,नवा दिवस, विदूषक, उदासबोध, मीरा, कबीर, वात्रटिका, मोरू, सूरदास, कविता माणसांच्या माणसांसाठी, आनंद ऋतू, सूर आनंदघन, शर्मिष्ठा, त्रिवेणी, राधा, सलाम, गझल, भटके पक्षी, तुझे गीत गाण्यासाठी हे काव्यसंग्रह. मराठीतील एक दिग्गज कवी, गीतकार व बालसाहित्यिक म्हणून ओळखले जाते. आरती प्रभू चिंतामण त्र्यंबक खानोलकर जोगवा (१९५९), दिवेलागण (१९६२), नक्षत्रांचे देणे (१९७५).

मुक्तछंद ज्या काव्याला वृत्तबद्ध रचनेचे बंधन नसते त्या काव्याला मुक्तछंदात्मक काव्य म्हणतात. वृत्तबध्द काव्यात कवीच्या अभिव्यक्तिवर अपरिहार्यपणे काही मर्यादा येतात; तर मुक्तछंदामध्ये कवीला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य लाभते. मराठीमध्ये इसवी सनाच्या बाराव्या शतकापासून काव्यनिर्मिती सुरू झाली. प्राचीन मराठी साहित्यात संत, पंत (पंडितकवी) व तंत (शाहीर) असे तीन टप्पे पडतात. रविकिरण मंडळाचे कवी, अनिल, कुसुमाग्रज, पु. शि. रेगे, वा. ना. देशपांडे, ना. ग. जोशी यांच्यामुळे मराठी कवितेत मुक्तछंदाची भरीव व व्यापक पायाभरणी झाली.

मराठी गझलगझल हा एक वृत्तप्रकार असून तो काव्यप्रकारही आहे. मराठी संतकवी आणि पंडित कवींप्रमाणेच सूफी संतांनीही ईश्वर भक्ताचे नाते प्रियकर - प्रेयसीतील नात्याच्या परिभाषेत गझलद्वारे अभिव्यक्त केले. गझलमध्ये दर दोन चरणांच्या प्रत्येक खंडास 'शेर' म्हणतात. एका गझलमध्ये सामान्यतः पाच ते सतरा शेर असतात. शेरातील दोन सारख्या चरणांना मिळून 'मिसरा' म्हणतात. शेराच्या शेवटी येणाऱ्या सारख्या शब्दांना 'रदीफ' म्हणतात. रदीफच्या अगोदर येणाऱ्या व सारखे ध्वनी असणाऱ्या शब्दांना 'काफिया' म्हणतात. रदीफचे यमकाशी तर काफियाचे अनुप्रासाशी साम्य आहे. ज्या शेराच्या दोन्ही मिसरांमध्ये रदीफ आणि काफिया हे सारखे असतात, त्या शेरास मतला म्हणतात. गझलच्या सुरुवातीला मतला असतोच. गझलच्या पहिल्या शेराला स्थायी म्हणतात व उर्वरित सर्व शेरांना अंतरे म्हणतात. मराठीत माधव ज्युलियन यांनी गझल आणली. विंदा करंदीकर, सुरेश भट, भाऊसाहेब पाटणकर, इलाही जमादार, व दिउज्जमा खावर या गझलकारांनी त्यात अप्रतिम भर टाकली.

६.६.४ आधुनिक मराठी कथा

भारतीय परंपरेत आणि जगात आई-मूल नात्याचा एक महत्त्वाचा आधार म्हणजे गोष्ट, ज्याचा विकसित रूप कथा किंवा कहाणी आहे. प्राचीन काळापासून गोष्ट, कहाणी, आणि कथा या संज्ञा वापरल्या जात असल्या तरी त्या आधुनिक काळापर्यंत सहसा समानार्थी मानल्या गेल्या. कारण, गोष्टी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सांगत-ऐकत संक्रमण होऊन त्यात सूक्ष्मतेचा अभाव राहिला. मात्र, आधुनिक साहित्यिक रचनांमुळे या तिन्ही संज्ञांमध्ये स्पष्ट भेद लक्षात येऊ लागले आहेत.

जीवनव्यवहारातील साध्या घटनेतून गोष्ट तयार होते, आणि त्यालाच 'कहाणी' असेही म्हणतात. पण मराठीत गोष्ट आणि कहाणी यामध्ये फरक आहे. ‘गोष्ट’ जर एखादी घटना आणि तिचा थेट परिणाम यावर आधारित रचना असेल, तर ती गोष्ट म्हणतात. म्हणजेच, साध्या घटनेवर आधारित थेट आणि सोपी मांडणी. ‘कहाणी’ धार्मिक भावना आणि लोककथा, तसेच व्रतवैकल्याच्या निमित्ताने सांगितल्या जाणाऱ्या गोष्टींना कहाणी म्हणतात. या कहाण्यांचा मुख्य उद्देश श्रध्देने केलेल्या व्रताची फलनिष्पत्ती सांगणे हा असतो. उदाहरणार्थ, वडिलधाऱ्या स्त्रिया सुसंस्कारासाठी आणि लेकीसुनांना संस्कार देण्यासाठी श्रावण महिन्यात अशा कहाण्या सांगतात. हा फरक पारंपरिक आणि सांस्कृतिक संदर्भात महत्त्वाचा आहे आणि त्यातून गोष्ट व कहाणी यांचे वेगळेपण स्पष्ट होते.

कहाण्यांमधील घटना सामान्यतः "आटपाट नगरात" घडतात, ज्याचा अर्थ आहे आठ पेठांचे नगर, म्हणजे जुन्या काळातील आदर्श नगर. या पारंपरिक नगराला कहाण्यांमध्ये ठराविक संदर्भ म्हणून वापरले जाते. कहाणीमध्ये चमत्कृतींचे महत्त्व असते, म्हणजे अशा गोष्टी जे वास्तवाच्या पलिकडे जाऊन अनपेक्षित किंवा अद्भुत प्रकारे घडतात. कहाणीचा शेवट बहुधा "साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण" असे पारंपरिक म्हणीप्रमाणे होतो, जेथे कथेला समाधानकारक आणि लाभदायक शेवट दिला जातो. मराठी लोककथांनाही खेडेगावांत "कहाणी" म्हणून संबोधले जाते, आणि या कहाण्यांचा कर्ता (लेखक किंवा सांगणारा) सामान्यतः ज्ञात नसतो, म्हणजे त्या लोककथांप्रमाणे प्रत्येकाने ऐकून सांगितल्या जाणाऱ्या गोष्टी असतात.हे सर्व पारंपरिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून मराठी कहाणींचे वैशिष्ट्य दर्शवते.

गोष्ट व कहाणीमध्ये पात्रे, त्यांच्या कृती आणि घडणाऱ्या घटना या तीन घटकांना महत्त्व असते. त्याचप्रमाणे शैलीचा विचार करता 'औत्सुक्या'च्या सलग अस्तित्वाला महत्त्व असते; तर

कथेत कथानक, पात्रे, भाषा, वातावरण, शैली यांच्या सूक्ष्म छटांना महत्त्व असलेले दिसते. या घटकांची संगती 'घटिताच्या' आंतरिक पातळीवर गेलेली दिसते.

अतिप्राचीन काळापासून 'कथा' हा प्रकार विविध स्वरूपांत चालत आलेला दिसतो. ऋग्वेदातील यम-यमीसारख्या कथा, महाभारताच्या कर्णपर्वातील हंसकाकीय आख्यान, सुबुन्धुची वासवदत्ता, बाणभट्टाची कादंबरी, दण्डीचे दशकुमारचरित, बौध्द वाङ्मयातील अनेक जातक कथा, प्राचीन साहित्यातील बृहत्कथासार, कथाकल्पद्रुम, इसापनीती, वेताळ पंचविशी, शुकसप्तमी (तोता-मैनाच्या गोष्टी) हे सारे साहित्य प्राचीन काळातील कथावाङ्मयाची विविधता दर्शवतात. तेराव्या शतकातील महानुभाव साहित्यात 'दृष्टांतपाठ' या चक्रधरांनी सांगितलेल्या पाठातील अनेक दृष्टांत म्हणजे लघुत्तम कथाच होत. पंडितकवी आणि शाहिरांनी निर्माण केलेले आख्यान वाङ्मय व अरेबियन नाईट्स्ची भाषांतरे यांमुळे भारतीयांचे कथावाङ्मय समृद्ध झाले.

"'कथेप्रमाणेच कादंबरीची समष्टीदेखील अनुभवाचा अर्थ, कथानक, पात्र, वातावरण, कथनपध्दती व भाषा या घटकांनीच आकारत असते. मात्र, (१) कादंबरीत जीवनाच्या साकल्याचा, समग्रतेचा (totality) वेध घेण्याचा प्रयत्न असतो. अशी समग्रता कथेला अभिप्रेत नसते. कथेत मर्यादित जीवनखंडाचे चित्रण साधलेले असते. (२) कादंबरीचा चित्रफलक व्यापक, विस्तृत स्वरूपाचा असतो. कादंबरीकाराला चित्रणासाठी विस्तीर्ण अवकाश उपलब्ध असतो. कथेचा चित्रफलक मर्यादित आकाराचा असतो. स्थलकालाचा, घटनांचा विस्तीर्ण पट कादंबरीत चित्रित होऊ शकतो. एखाद्या पात्राचा संपूर्ण जीवनप्रवास कादंबरी कवेत घेऊ शकते. याउलट, कथा ही व्यक्तिच्या जीवनातील विशिष्ट टप्प्याचे, एखाद्या विशिष्ट जीवनानुभवाचे चित्रण साधताना दिसते. (३) कथेत रचनेचे एककेंद्रियत्व असते तर कादंबरी अनेककेंद्री असते. कादंबरीत अनुगदाच्या अनेक संघटना असतात. त्यामुळे कादंबरीच्या अनुभवार्थात विशेष व्यामिश्रता येते, तसेच तिच्या संघटनेत विशिष्ट जातीचा लवचिकपणा, मोकळेपणा येतो. कथेच्या एककेंद्रीयत्वामुळे तिच्या संस्कारात ज्या जातीची एकता येते तशी कादंबरीच्या संस्कारात येत नाही. कादंबरीचा संस्कार अनेकांगी व म्हणून अधिक व्यामिश्र व भरघोस असतो." आधुनिक साहित्याच्या प्रकार म्हणून मराठी कथेला खरोखरची सुरुवात एकोणिसशतकाच्या उत्तरार्धात झाली, जेव्हा मुद्रणकलेने जन्म घेतला. या समयात नियतकालिकांचा उदय कथांच्या निर्मितीला आणि वाढीस प्रोत्साहीत करणारा ठरल्याचे दिसून येते. इंग्रजी कालखंडाच्या प्रारंभात मराठी ज्ञानप्रसारक सारख्या नियतकालिकांमधून भाषांतरित, रुपांतरित आणि स्वतंत्र रूपात मुख्यतः बोधपर व रम्य स्वरूपाचे कथासाहित्य प्रकाशित केले जात होते. त्या काळात कथेचा उपयोग सामान्यतः धार्मिक शिक्षण, नीतिबोध आणि स्वप्नरंजन यांसारख्या साधनांमध्ये केला जात होता.

आधुनिक मराठी कथालेखनाचा विचार करताना हरिभाऊंचे योगदान महत्त्वाचे मानावे लागते. हरिभाऊंनी इ.स. १८८० मध्ये सुरू केलेले 'करमणूक' मासिक इ.स. १९१७ पर्यंत चालले. या काळात त्यांनी 'आजकालच्या गोष्टी' या सदरांत कांदबऱ्या आणि स्फुट गोष्टी या नावाखाली ज्ञानवर्धक आणि उपदेशपर कथा लिहिल्या. त्यातील काही कथा, जसे की काळ तर मोठा कठीण आला, दुष्काळातील एक करुण गोष्ट, रंगी, खाशी खोड, पक्की अद्दल घडली, डिस्पेशिया, इत्यादी आजही अजरामर मानल्या जातात. त्याचप्रमाणे, का. र. मित्र यांनी १८९५ साली सुरू केलेल्या 'मनोरंजन' मासिकातून तसेच 'उद्यान', 'प्रभात', 'नवयुग', 'केरळकोकिळ', 'चित्रमय जगत' इत्यादी नियतकालिकांतून मराठी कथा पुढील तीस वर्षांत आणखी विस्तारल्या. या काळात मराठी साहित्याच्या अन्य क्षेत्रांतील नामवंत लेखकांनीही कथालेखन केले, ज्यात शि. म. परांजपे, न. चि. केळकर, श्री. कृ. कोल्हटकर, वा. म. जोशी यांचा समावेश होतो.

हरिभाऊंच्या 'स्फुट गोष्टी'ला संपूर्ण गोष्ट करण्याचे श्रेय वि. सी. गुर्जर यांना जाते; तर तिला कथा बनवण्याचे श्रेय दिवाकर कृष्णांना दिले जाते. १९२२ ते १९५५ या काळात दिवाकर कृष्णांनी अंगणातला पोपट, दंडकारण्यातील प्रणयिनी, मृणालिनीचे लावण्य, समाधी, संकष्टी चतुर्थी, महाराणी, लोकनिंदितेचा व्रतभंग इत्यादी अवघ्या एकवीस कथा लिहिल्या. या कथांमुळे दिगकर कृष्णांना मराठी कथाकार म्हणून मोठी प्रतिष्ठा मिळाली. दिवाकर कृष्णांचे समकालीन गो. ग. लिमये, त्यानंतरचे दि. बा. मोकाशी, श्री. दा. पानवलकर, वि. वि. बोकील, दत्त रघुनाथ कवठेकर यांनी प्रभावी कथालेखन केले. पुढे अनंत काणेकर व भा. वि. वरेरकार यांनीही काही कथा लिहिल्या. १९३० नंतर गोव्याच्या पार्श्वभूमीवर लक्ष्मणराव सरदेसाई, वि. स. सुखठणकर यांनी मराठीतील पहिले प्रादेशिक कथालेखन केले.

यानंतरच्या काळात कमला टिळक, कृष्णाबाई (मुक्ताबाई दीक्षित), विभावरी शिरूरकर, कुसुमावती देशपांडे, शांताबाई नाशिककर, कुमुदिनी रांगणेकर, पिरोज आनंदकर, आनंदीबाई जयवंत, कमलाबाई बंबवाले, मालती दांडेकर, क्षमा राव, गीता साने इत्यादींनी प्रभावी कथालेखन केले. यात विशेष उल्लेखनीय कामगिरी आहे ती विभावरी यांचा इ.स.१९३३ मध्ये 'कळ्यांचे निःश्वास' हा त्यांचा, प्रौढ कुमारीकांची कुचंबणा, त्यांचे दुःख, समस्या अभिव्यक्त करणारा कथासंग्रह प्रकाशित झाला, जो मराठी कथासाहित्यातील एक मैलाचा दगड समजला जातो.

ग. ल. ठोकळ ग्रामीण कथा लिहीत होते, तर र. वा. दिघे , रम्याद्भुत कथा लिहित होते. पुढील काळात य. गो. जोशी, महादेवशास्त्री जोशी आणि चिं. वि. जोशी या परस्परांहून अगदी भिन्न अशा प्रकृतीच्या लेखकांचा उदय झाला. या काळातील अन्य कथालेखक म्हणजे द. र. कवठेकर आणि बी. रघुनाथ हे होत. बी. रघुनाथ यांच्या कथांत मुसलमानी अंमलाचे संस्कार व

त्यांतील संघर्ष, दारिद्र्य, निसर्गाच्या अनिश्चिततेचे सावट इ. घटक आले व मराठी कथा अधिक विस्तारली. 'उपेक्षितांचे अंतरंग' लिहून श्री. म. माटे यांनी मराठी कथेला पुढे नेले.

१९६० नंतर ग्रामीण साहित्याचा प्रवाह अधिक जोरकस झाला. खेड्यातील शोषित, विस्थापित माणसांच्या जीवन-जाणिवा ठळकपणे व्यक्त करण्यासाठी ग्रामीण साहित्याची चळवळ जन्माला आली. ग्रामीण जीवनातून फुलणारे, ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ग्रामीण साहित्य म्हणून ओळखले जाऊ लागले. या लेखनाला प्रत्यक्ष अनुभवांचे पाठबळ लाभले. या कथेतून ग्रामीण माणसाचे, कष्टकऱ्यांचे दुःख व जीवनभोग, ग्रामजीवनातील परिवर्तने व परंपरा, ग्राम परिघाबाहेरचे जग, शोषणव्यवस्था आदींचे चित्रण होऊ लागले. रा. रं. बोराडे, रणजित देसाई, आनंद यादव, भास्कर चंदनशिव, चारुता सागर, इ. लेखकांच्या ग्रामीण कथांनी ग्रामीण कथा अधिक परिपुष्ट व समृद्ध केलेली पाहावयास मिळते. आज सदानंद देशमुख, आसाराम लोमटे, सचिन पाटील, कृष्णात खोत, किरण गुरव हे ग्रामीण साहित्य कथा लेखनातील महत्त्वाची नावे आहेत. मध्यमवर्गीय पांढरपेशा वातावरणात वावरणाऱ्या मराठी कथेत दलित उपेक्षित घटकांचे जीवन व्यक्त झाले.

१९६० नंतरची दलित कथा आत्मशोध घेणारी, मानसिक स्वातंत्र्याचा उद्‌गार व्यक्त करणारी आहे. आशय व अनुभव संपन्नता ही तिची प्रवृत्ती आहे. या कथेमागे गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय, मानवता, संघर्ष, वेदना, विद्रोह, नकार या मूल्यधारेला दलित कथेने आपलेसे केले. शोषणाचे विविध संदर्भ, धर्मांतर, दलित जीवनाचे खोल दर्शन, दाहक वास्तव, उच्च-नीचता, दलितांच्या जीवनातील संघर्ष हे विषय या कथांच्या केंद्रस्थानी आहेत. अण्णाभाऊ साठे, बंधु माधव, शंकरराव खरात, बाबुराव बागूल, केशव मेश्राम, वामन होवाळ, अर्जुन डांगळे, योगेंद्र मेश्राम, योगीराज वाघमारे इ. अनेक लेखकांच्या कथांनी दलित कथेचा परीघ विस्तारलेला दिसून येतो.

६.६.५ आधुनिक मराठी नाटक

प्राचीन व्याकरणशास्त्रज्ञ पाणिनी यांच्या मते, "नट" म्हणजे नाचणे आणि त्यातूनच "नाटक" हा शब्द तयार झाला असावा. तर वेबर आणि मोलिअर या विचारकांच्या मते, "नट" हा धातू "नृत-वर्तन" म्हणजे नृत्य आणि वर्तन यासाठी वापरला जात असल्याने त्यातून नाटकाचा अर्थ रूढ झाला असावा. मराठी नाटकाचा पाया पोवाडे, सोंगे, भारूडे, दशावतारी खेळ, कळसूत्री बाहुल्यांचा नाच, आणि कथाकीर्तन यांसारख्या कलात्मक प्रकारांमध्ये दिसतो. नाटक हा दृक-श्राव्य कलाप्रकार आहे. सामान्यतः नाटकाचा अभ्यास करताना त्याची लिखित संहिता महत्त्वाची मानली जाते, तसेच नाटकाच्या प्रयोगाला देखील महत्त्व दिले जाते. परंतु भरतमुनींनी आपल्या 'नाट्यशास्त्र' मध्ये नाटक

या साहित्यप्रकाराचा संपूर्ण आणि सर्वांगीण विचार केला असून, त्यांनी 'प्रयोगा'ला (नाटकाच्या सादरीकरणाला) विशेष महत्व दिले आहे. त्यांनी रस, भाव, अभिनय, धर्मी, वृत्ती, प्रवृत्ति, सिद्धी, स्वर, आतोद्य, वाद्य (गान) अशा नाट्यसंग्रहातील विविध घटकांचे सखोल विवेचन केले आहे. म्हणून, नाटक हा केवळ लिखित संहिता नसून, त्याचा सादरीकरणाचा अनुभव आणि विविध कलात्मक अंग यांचा समन्वय आहे, ज्याचे सखोल विश्लेषण भरतमुनींनी केले आहे.

भरतमुनींच्या मते, भाव एकोणपन्नास आहेत, तर रस आठ आहेत. नाटकांमध्ये विभाव, अनुभाव व संचारी भाव यांच्या संयोगाने रसनिष्पत्ती होते असे भरतमुनी म्हणतात. लौकिक आयुष्यात मानवी मनात असतात ते भाव आणि ती भूमिका नट साकारत असताना तो करतो ते विभाव, अनुभाव होत. या भावांचे सहचारी भाव म्हणजे संचारी वा व्याभिचारी भाव होत व या भावांद्वारे आस्वादकाच्या मनात होते. ती रसनिष्पत्ती होय. पाश्चात्त्य सौंदर्यशास्त्रानुसार यालाच सौंदर्यप्रतीती म्हटले जाते. कथावस्तूच्या काळानुसार नाट्यचे तीन प्रकार पडतात. (१) पौराणिक (२) ऐतिहासिक (३) सामाजिक . मराठी नाट्यवस्तूत १८०५ चा काळ हा ऐतिहासिक दिसतो. इ.स.१८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला व नंतर पन्नास वर्षांत महाराष्ट्राच्या संस्कृतीत आमूलाग्र बदल झाला.

विष्णुदास अमृत भावे (१८१९-१९०१) : यांचे संगीत सीतास्वयंवर (१८४३) हे मराठीतील पहिले (गद्य-पद्य मिश्रित) नाटक असून हे मराठीतील आद्य नाटककार मानले जातात. यानंतर इचलकरंजीकर नाटक मंडळीची नाटके आली. मराठीत १८४३ ते १८६२ हा आख्यानरूप नाटकांचा काळ होता.. या काळात अनेक संस्कृत नाटकांची भाषांतरे झाली. तसेच मराठी संहिता व प्रयोग या दोन्ही स्वरूपांत १८६० नंतर भरपूर बुकीश नाटके आली.

अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी सं. सौभद्र, सं. रामराज्यवियोग, विक्रमचरित्र, एलफिन्स्टन, बाजीराव फार्स, शांकर दिग्विजय, शुकरंभा संवाद, शाकुंतल. गोविंद बल्लाळ देवलांनी फाल्गुनराव अथवा तसबिरीचा घोटाळा शारदा, दुर्गा, विक्रमोर्वशीय, झुंजारराव, मृच्छकटिक, शाप संभ्रम. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी वीरतनय, मूकनायक, प्रेमशोधन, वधूपरीक्षा, गुप्तमंजुष, मतिविकार, सहचारिणी, परिवर्तन, जन्मरहस्य, श्रमसाफल्य ही नाटके लिहीली. राम गणेश गडकरी हे श्री. कृ. कोल्हटकरांना आपले गुरू मानत असत.

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर सवाई माधवरावांचा मृत्यू, कांचनगडची मोहना, कीचकवध, बायकांचे बंड, भाऊबंदकी, प्रेमध्वज, मानापमान, विद्याहरण, स्वयंवर, द्रौपदी इत्यादी. राम गणेश गडकरी एकच प्याला, प्रेमसंन्यास, राजसंन्यास (अपूर्ण), पुण्यप्रभाव, भावबंधन, वेड्यांचा बाजार, गर्वनिर्वाण. दिवाकर यांनी आय.सी.एस्., घरातून चालते व्हायचे कोणी ? ही नाटके; नाट्यछटा

महासर्प, फाटलेला पतंग, म्याऊ-म्याऊ-म्याऊ, पंत मेले राव चढले, कोकिळाबाई गोडबोले, चिंगी महिन्याची झाली नाही तोच, तेवढेच ज्ञानप्रकाशात इत्यादी. मराठी साहित्याला 'नाट्यछटा' ही दिवाकरांची देणगी आहे.

पु. ल. देशपांडे यांच्या "अयोध्या" नाटकात भारतीय ज्ञानपरंपरेचे अनेक उदाहरणे आढळतात. हे उदाहरणे भारतीय संस्कृती, धर्म, आणि तत्त्वज्ञान यांचे दर्शन घडवतात. पु. ल. देशपांडे यांच्या "अयोध्या" नाटकात भारतीय ज्ञानपरंपरेचे उदाहरणे धर्म, नैतिकता, कुटुंब, अध्यात्म, आणि संस्कृती या विविध पैलूंमध्ये दिसून येतात. हे उदाहरणे भारतीय तत्त्वज्ञान आणि जीवनशैलीचे सखोल दर्शन घडवतात. ना. सी. फडके युगांतर, संजीवन, तोतया नाटककार, काळे गोरे, जानकी, जडावाची देवी, आगलावी, क्षमेसाठी अपराध विश्राम बेडेकर ब्रह्मकुमारी, टिळक आणि आगरकर, वाजे पाऊल आपले, प्रल्हाद केशव अत्रे साष्टांग नमस्कार, भ्रमाचा भोपळा, मोरूची मावशी, लग्नाची बेडी, वंदे भारतम्, मी उभा आहे, कवडी चुंबक, उद्याचा संसार, सं. घराबाहेर, सं. पराचा कावळा, सं. पाणिग्रहण, वसंतसेना (शुद्रकाच्या मृच्छकटिकावर आधारित, बोलपटासाठी लिहीलेली संहिता), तो मी नव्हेच, मोरूची मावशी, बुवा तेथे बाया, मी मंत्री झालो, डॉक्टर लागू, सं. प्रीतिसंगम, ब्रह्मचारी, अशी बायको हवी. मो. ग. रांगणेकर यांची आशीर्वाद, कुलवधू, नंदनवन, कन्यादान, अलंकार, माझे घर, वहिनी, एक होता म्हातारा, कोणे एके काळी, माहेर, आजचे संसार, पतित एकदा पतित का सदा, रंभा, जयजयकार, लिलाव यांनी एकांकिका लेखनही केलेले असून. वि. वा. शिरवाडकरांनी दूरचे दिवे, वैजयंती, कौंतेय, दुसरा पेशवा, नटसम्राट, वीज म्हणाली धरतीला, आनंद, एक होती वाघीण, चंद्र जिथे उगवत नाही, महंत, मुख्यमंत्री, ययाती आणि देवयानी, विदूषक, कैकेयी, दिवाणी दावा, आमचं नाव बाबूराव, नाटक बसते आहे इ. नाटके लिहली.

वसंत कानेटकर : तुझा तू वाढवी राजा, रायगडाला जेव्हा जाग येते, येथे ओशाळला मृत्यू, जिथे गवतास भाले फुटतात, शहेनशहा आलमगीर ही ऐतिहासिक नाटके; मला काही सांगायचंय, अश्रूची झाली फुले ही गंभीर, सामाजिक नाटके. सूर्याची पिल्ले; सारखी हलकी-फुलकी / विनोदी नाटके व शेक्सपिअरच्या शोकांतिकांवर आधारित 'गगनभेदी'. ही यांची अतिप्रसिद्ध नाटके असून यांच्याबद्दल, 'आधीचे मराठी नाटक पुसून टाकणारा नाटककार' असे माधव मनोहर यांनी काढलेला गौरवोद्‌गार अभ्यसनीय आहे. यांनी सुमारे पस्तीस नाटके लिहीली व हे आजपर्यंतच्या मराठी व्यावसायिक रंगभूमीवरील सर्वाधिक यशस्वी नाटककार समजले जातात. विजय तेंडुलकर यांनी जवळपास तीस नाटके व अनेक एकांकिका लिहिल्या. हे मराठी प्रायोगिक रंगभूमीवरील दिग्गज नाटककार; तसेच आंतरराष्ट्रीय कीर्तिचे पहिले भारतीय नाटककार समजले जातात. एकांकिका या

प्रकाराला प्रतिष्ठा मिळवून देण्यात यांचा प्रमुख वाटा असून यांची प्रायोगिक नाटके व्यावसायिक रंगभूमीवरही यशस्वी ठरलेली आहेत. श्रीमंत, मधल्या भिंती, गिधाडे, घाशीराम कोतवाल, सखाराम बाईंडर, कमला, कन्यादान, पाहिजे जातीचे, शांतता कोर्ट चालू आहे, अशी पाखरे येती, द्वंबद्वीपचा मुकाबला, फूटपायरीचा सम्राट, भाऊ मुरारराव, मित्राची गोष्ट, सरी गं सरी, एक हट्टी मुलगी, कावळ्यांची शाळा, घरटे अमुचे छान, चिरंजीव सौभाग्यकांक्षिणी, नियतीच्या बैलाला, बेबी, मी जिंकलो ! मी हरलो !, चिमणीचं घर होतं मेणाचं, कुत्रे, पाहिजे जातीचे, झाला अनंत हनुमंत, भल्या काका, माणूस नावाचे बेट, विठ्ठला, सफर ही नाटके लिहिली आहेत. या सोबतच अनेक नाटककाराने मराठी भाषेत नाटके लिहुन भाषा साहित्य परंपरा संस्कृती जतन केली आहे.

६.६.६ आधुनिक मराठी कादंबरी

प्राचीन काळापासून भारतात प्रचलित असलेले महाकाव्य, आख्यानकाव्ये व आधुनिक काळात प्रचलित झालेला पोवाडा हे सर्व प्रकार कथनात्म आहेत; परंतु ते 'पद्य' आहेत. कादंबरी 'गद्य' असते. श्रृंखला पध्दतीने सांगितल्या जाणाऱ्या कहाण्या (शुक सप्तमी, वेताळ पंचविशी इ.), पौराणिक कथा, नीतिकथा, साहसकथा, रहस्यकथा इत्यादी गद्यप्रकार कथनात्म आहेत; परंतु ते पुरेसे दीर्घ नाहीत. यांतील कथावस्तूही एककेंद्री असते. यास्तव त्यांना कादंबरी म्हणता येत नाही. थोडक्यात, कथनात्मकता, गद्यत्व, आवश्यक दीर्घत्व व बहुस्त्रोती कथावस्तू हे कादंबरीचे अत्यावश्यक घटक आहेत. कल्पितता हा 'संभाव्य महत्त्वाचा' घटक आहे. कथनात्म, गद्य, बहुस्त्रोती कथावस्तू असलेली व पुरेशी दीर्घ साहित्यकृती म्हणजे कादंबरी. कादंबरी हा शब्द इंग्रजीतील Novel या शब्दाला पर्याय म्हणून रूढ झालेला आहे.

मराठी साहित्यविचारानुसार कादंबरीचे वर्गीकरण

१) पौराणिक कादंबरी २) ऐतिहासिक कादंबरी ३) राजकीय कादंबरी ४) प्रादेशिक कादंबरी ५) मनोविश्लेषणात्मक कादंबरी ६) संज्ञाप्रवाहात्मक कादंबरी ७) चरित्रपर / चरित्रात्मक कादंबरी ८) कल्पनारम्य कादंबरी असे वर्गीकरण करता येईल.

मराठी कादंबरीची वाटचाल

पूर्वी आपण पाहिले आहे की कादंबरी हा साहित्य प्रकार मुळचा भारतीय नाही, तर परकीय देशांचा आहे. ब्रिटिश भारतात दाखल झाल्यानंतर कादंबरी हा साहित्यप्रकार येथे आला. एकोणिसाव्या शतकात मराठीमध्ये कादंबरीचा उदय झाला. अभ्यासक एकोणिसावे शतक एक अत्यंत महत्वाचे शतक मानतात. आधुनिक काळाची सुरुवात या शतकात होते. या कालावधीत संपूर्ण देशभर इंग्रजांनी आपली चौकशी सुरू केली होती एकूणच, १९व्या शतकाला अनेक बदल घडविणारे शतक म्हणून विचारले जाऊ शकते.

अशा या सामाजिक-राजकीय-आर्थिक-सांस्कृतिकदृष्ट्या पारतंत्र्याच्या व धकाधकीच्या कालखंडातून आपला देश व समाज वाटचाल करत असताना या व्यामिश्रतेचे, गुंतागुंतीचे वास्तव साहित्यातून शब्दांकित करण्यासाठी तशाच सक्षम साहित्यप्रकाराची आवश्यकता होती व ती उणीव कादंबरीने भरून काढली, असे म्हणता येईल. काव्य, नाटक, कथा या व इतर वाङ्मयप्रकारांना त्यांच्या म्हणून एक मर्यादा आहेत. रचनेचे त्यांचे म्हणून एक बंधने आहेत. या पार्श्वभूमीवर कादंबरी हा वैशिष्ट्यपूर्ण साहित्यप्रकार आहे. कारण कादंबरीमध्ये विशाल भाषिक अवकाश सामावून घेण्याची क्षमता खूप मोठी आहे. रूपाच्या बाबतीत ती पुष्कळ लवचिक व परिवर्तनशील असते. त्यामुळे काळाचा व्यापक पट, विविध आशयसूत्रे, गुंतागुंतीची रचना, अनेक पात्रे, समूहशीलता, प्रदीर्घ भाषिक अवकाश, समाजजीवनाला कवेत घेण्याची ताकद आदींच्या दृष्टीने विचार करता 'कादंबरी' हा अतिशय योग्य पर्याय आहे. हे पाहता मराठीमध्ये कादंबरीसारखा वाङ्मयप्रकार स्थिर व्हायला वेळ लागला नाही. 'एकोणिसाव्या शतकातील एक महत्त्वाची सांस्कृतिक वस्तुस्थिती म्हणून कादंबरी या साहित्यप्रकाराच्या उगमाचा निर्देश करणे योग्य ठरेल.' असा निर्वाळा समीक्षक रोहिणी तुकदेव यांनी 'मराठी कादंबरी प्रारंभिक वळण' या पुस्तकात दिला आहे.

मराठीमध्ये कादंबरी लेखनाची सुरुवात होण्याअगोदर इंग्रजी शिक्षण आणि साहित्याच्या वाचनाने काही पुस्तकांच्या भाषांतराचे, अनुवादाचे काही प्रयत्न झाले होते. शेक्सपिअरच्या नाट्यांचे, अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी, गुलबकावली इत्यादी अशा परकी भाषेतील साहित्याचे मराठी अनुवाद प्रसिद्ध होऊ लागले होते.

मराठी कादंबरीचा इतिहास बाबा पद्मनजी यांच्या 'यमुनापर्यटन' कादंबरीपासून सुरू झाला. १८५७ मध्ये प्रकाशित झालेली ही कादंबरी मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी मानली जाते. तथापि, यापूर्वी 'यात्रेकऱ्याचा वृत्तान्त' (१८३८) नावाचे क्रमिक पुस्तक प्रकाशीत झाले होते. या पुस्तकाचे स्वरूप कथात्मतेच्या जवळ असल्याने ते क्रमिक पुस्तकापेक्षा भिन्न आहे. हरिकेशवजी यांनी 'पिलग्रीम्स प्रोग्रेस'चा 'यात्रिकक्रमण' (१८४१) म्हणून अनुवाद केला. ही भाषांतरित कादंबरी म्हणून पहिली होती. 'यात्रेकऱ्याचा वृत्तान्त' आणि 'यात्रिकक्रमण' या दोन्ही पुस्तकांना मराठी कादंबरीची प्रारंभ म्हणून मानले जाते. तरीही, 'यात्रेकऱ्याचा वृत्तान्त' हे एक पाठ्यपुस्तक असल्याने आणि 'यात्रिकक्रमण' अनुवाद असल्याने त्यांना स्वतंत्र मराठी कादंबरी म्हणून गौरवले जात नाही. त्यामुळे बाबा पद्मनजी यांची 'यमुनापर्यटन' ही कादंबरी पहिली स्वतंत्र मराठी कादंबरी म्हणून मानली जाते.

'यमुनापर्यटन' या कादंबरीने तत्कालीन विधवा स्त्रियांच्या दुःखाला वाचा फोडली. लक्ष्मण मोरेश्वरशास्त्री हळबे यांच्या 'मुक्तामाला' (१८६१) आणि 'रत्नप्रभा' (१८६६), नारो सदाशिव रिसबुड

यांच्या 'मंजुघोषा' (१८६८), 'विश्वासराव' (१८७०), 'वसंतकोकिला' (१८७६), जोरवेकर यांची 'विचित्रपुरी' (१८७०) अशा कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. या कादंबऱ्यांनी मराठीमध्ये अद्भुतरसप्रधान प्रकारच्या कादंबऱ्यांचे युग सुरू केले. पुढे रा. भि. गुंजीकर यांच्या 'मोचनगड' (१८७०) या कादंबरीने ऐतिहासिक कादंबरीचा ओनामा केला. गुंजीकरांनंतर ना. वि. बापट यांची 'छत्रपती संभाजी महाराज' (१८८४) ही ऐतिहासिक कादंबरी आली. 'विलासिनी' (१८७१), 'चंद्रप्रभाविरहवर्णन' (१८७३), 'वीरपत्नी' (१८८३), 'वीरकन्या' (१८८८), 'लंदन रहस्य' (१८९४), 'पानिपतची मोहीम' (१८९७), 'वाईकर भटजी' (१८९८), इत्यादी भिन्न प्रकृतीच्या कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या दिसतात. साधारणपणे 'मुक्तामाला'पासून (१८६१) ते १८८५ पर्यंत या अद्भुतरसप्रधान बऱ्याच कादंबऱ्या प्रसिद्ध झालेल्या दिसतात.

एकोणिसाव्या शतकात साळुबाई तांबवेकर यांनी मुख्यतः स्त्रीजीवनातील विविध पैलूंचा उल्लेख करणारे 'चंद्रप्रभाविरहवर्णन' (१८७३) आणि 'हिंदुस्थानचा तारा' (१८९४) या कादंबऱ्या तयार केल्या. काशीबाई कानिटकर यांनी 'रंगराव' (१९०३) आणि 'पालखीचा गोंडा' (१९२८) या कादंबऱ्या लिहिल्या. काशिबाईनी १८८४-८५ पासून 'मनोरंजन,' 'निबंधचंद्रिका' या नियतकालिकांमध्ये 'रंगराव' कादंबरीचे लेखन केले आणि ती १९०३ मध्ये पुस्तकाच्या स्वरूपात प्रकाशित झाली.

नारायण हरी आपटे - कपटराज्य, कल्पनाचित्र अथवा अर्वाचीन रामराज्य, भुरळ,श्री. कृ. कोल्हटकर - विधवाकुमारी, धावता धोटा, गोदू गोखले, फाटकी वाकळ, भा. वि. (मामा) वरेरकर - विधवाकुमारी, धावता धोटा, गोदू गोखले, फाटकी वाकळ, वा. म. जोशी यांच्या 'आश्रम हरिणी' (१९१६), 'इंद काळे सरला भोळे' (१९३४), 'नलिनी' (१९२०), 'सुशीलेचा देव', अशा कादंबऱ्यांचे लेखन केले. मराठीतील तात्त्विक कादंबरीचे जनक म्हणूनही वा. म. जोशी यांचे नाव घेतले जाते. विभावरी शिरूरकर - हिंदोळ्यावर विरलेले स्वप्न, बळी, जाई या त्यांच्या महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत.

प्रा. ना. सी. फडके - हे एक लोकप्रिय कादंबरीकार, कथाकार होते. १९१७ साली प्रसिद्ध झालेली 'अल्ला हो अकबर' ही फडके यांची पहिली कादंबरी होय. पुढे 'कुलाब्याची दांडी' (१९२५), 'जादुगार' (१९२८), 'दौलत' (१९२९), 'अटकेपार' (१९३१), 'निरंजन' (१९३२) . 'झंझावात' (१९४८), 'जेहलम' (१९४८), 'उजाडलं, पण सूर्य कोठे आहे?' (१९५०) इत्यादी अनेक कादंबऱ्या फडके यांनी लिहिल्या आहेत. फडके यांच्या पुष्कळ कादंबऱ्या प्रामुख्याने रंजनपर आहेत, काही कादंबऱ्या राजकीय व सामाजिक आशयाच्या आहेत. मनोवेधक कथानक, कलात्मकतेचा साज, प्रणयरम्यता, भाषेचा फुलोरा, कल्पनाशक्ती, सौंदर्यानुभव अशाप्रकारे

वाचकांना कादंबरी वाचनाचा आनंद देणे असे फडके यांच्या कादंबरीलेखनाचे वैशिष्ट्ये सांगता येईल. साने गुरुजी 'श्यामची आई' (१९३५), 'धडपडणारी मुले' (१९३७), 'आस्तिक' (१९४०), 'क्रांती' (१९४०), 'रामाचा शेला' (१९४४) देशप्रेम, जनसेवा, मानवता, समता व सामाजिकतेचा मजबूत पाया आहे. संस्कारक्षम हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्ये आहे. भारतीय ज्ञान परंपरेतील धर्म आणि नैतिकतेचे महत्त्व साने गुरुजींच्या लेखनातून स्पष्ट होते. त्यांनी सत्य, अहिंसा, करुणा यांसारख्या मूल्यांचा प्रचार केला. भारतीय ज्ञान परंपरेतील लोककथा, पुराणकथा आणि सांस्कृतिक वारसा साने गुरुजींच्या लेखनात समृद्धपणे दिसतो. त्यांनी या कथांद्वारे लोकांना जीवनाचे धडे दिले. भारतीय ज्ञान परंपरेतील गुरुकुल शिक्षण पद्धती आणि ज्ञानप्राप्तीच्या पद्धतींचा उल्लेख साने गुरुजींनी त्यांच्या लेखनात केला आहे. त्यांनी शिक्षणाला जीवनाचा अविभाज्य भाग मानले. साने गुरुजींच्या लेखनात भारतीय ज्ञान परंपरेची उदाहरणे म्हणजे प्राचीन ग्रंथांचा आदर, आत्मशोध, नैतिकता, लोककथा आणि शिक्षण या सर्वांचा समावेश आहे. हे उदाहरणे त्यांच्या लेखनाला भारतीय संस्कृतीशी जोडतात आणि त्यातून जीवनाचे मूल्य शिकवतात. विश्राम बेडेकर यांच्या 'रणांगण' (१९३९) या एकमेव कादंबरीने मराठी कादंबरीत मोलाची भर घातली.

वि. स. खांडेकर यांनी हृदयाची हाक, कांचनमृग, उल्का, दोन ध्रुव, हिरवा चाफा, दोन मने, रिकामा देव्हारा, सुखाचा शोध, पांढरे डाग, पहिले प्रेम, जळलेला मोहर, क्रौंचवध, ययाती, अश्रू, अमृतवेल मराठीला पहिला ज्ञानपीठ पुरस्कार (१९४८). वि. स. खांडेकर यांच्या लेखनात भारतीय ज्ञान परंपरेचा प्रभाव त्यांच्या कथानक, पात्रे आणि तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून दिसून येतो. त्यांनी प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान आणि संस्कृतीला आधुनिक संदर्भात मांडले आहे, ज्यामुळे त्यांच्या साहित्याला एक वेगळा आणि समृद्ध आयाम प्राप्त झाला आहे.ययातीच्या आत्मशोधाचा प्रवास आणि त्याचा अंतर्मुख होण्याचा अनुभव भारतीय तत्त्वज्ञानातील मोक्ष प्राप्तीच्या संकल्पनेशी जुळतो.

विभावरी शिरूरकर हिंदोळ्यावर विरलेले स्वप्न, बळी, जाई या त्यांच्या महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. गिरिजा कीर - पूर्ण पुरुष, चक्रवेध, स्वप्नात चंद्र ज्याच्या, आभाळमाया, आत्मभान, विजया राजाध्यक्ष - बंदिश आशा बगे - सेतू, भूमी, मनस्विनी, त्रिदल, कुरूक्षेत्र, झुंबर कमल देसाई - काळा सूर्य, हॅट घालणारी बाई, रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग.

ग्रामीण कादंबरी आनंद यादव - लोकसखा, नटरंग, कलेचे कातडे बाबा भांड - आनंदघन, पारंब्या, काजोळ, दशक्रिया, जरंगा, तंट्या, धर्मा, योगी लक्ष्मीकांत तांबोळी - दूर गेलेले घर, कृष्णकमळ, उद्धव शेळके - खंजिरीचे बोल, धग, बाई विना बुवा, मनःपूत, महामार्ग, रवींद्र शोभणे - पडघम (तीन खंड), प्रवाह, रक्तध्रुव, कोंडी, चिरेबंद, सव्वीस दिवस, उत्तरायण, पांढर, रा. रं. बोराडे - एक होतं गाव, पाचोळा, वळणाचं पाणी, आमदार सौभाग्यवती, सावट, रहाटपाळणा, चंद्रकांत

खोत - बिंब प्रतिबिंब, दोन डोळे शेजारी, संन्याशाची सावली, ना. धो. महानोर गांधारी, गौरी देशपांडे - तेरुओ काही दूरपर्यंत, दुस्तर हा घाट, थांग, निरगाठी, कारावासातून पत्रे, एकेक पान गळावया, मध्य लटपटित, चंद्रिके गं सारिके गं, मुक्काम, गोफ, उत्खनन, वसंत आबाजी डहाके अधोलोक, प्रतिबध्द, मर्त्य, सदानंद देशमुख तहान, बारोमास, कृष्णात खोत - गावठण, रौंदाळा

ग्रामीण कादंबरीच्या बरोबरीने मराठी दलित कादंबरीही जोरकसपणे आपले अस्तित्व सिद्ध करताना दिसते अण्णाभाऊ साठे यांची 'फकीरा' (१९५९) प्रकाशित झालेली कादंबरी पहिली दलित कादंबरी म्हणता येईल यांच्या कादंबऱ्या पुढील प्रमाणे सांगता येतील वारणेच्या खोऱ्यात, चित्रा, वारणेचा वाघ, माकडीचा माळ, वैजयंता, अशा अनेक कादंबऱ्या अण्णाभाऊंच्या नावावर आहेत. हिं. गो. बनसोडे यांची 'मुक्तिसंग्राम', कादंबरी हिंदू धर्म सोडून बौद्ध धर्म स्वीकारल्यावर समाजाच्या संघर्षाला सामोरे जावे लागते याचे प्रभावी चित्रण येते. नामदेव ढसाळ यांची हाडकी हाडवळा, ना. ब. जाधव यांची 'दे दाण सुटे गिऱ्हाण', सुधाकर गायकवाड यांची 'शूद्र', बाबुराव बागुल 'सूड', 'अघोरी', 'पावशा', 'कोंडी', 'जेव्हा मी जात चोरली', भि. शि. शिंदे यांची अमृतनाक, माधव कोंडविलकर यांची 'अजून उडायचे आहे', प्रेमानंद गज्वी यांची 'जागर', एकनाथ साळवे यांची 'एन्काऊंटर', योगेंद्र मेश्राम यांची 'माजलगाव कुठाय', इत्यादी
वर्गातून नव्याने लिहून पाहणाऱ्या अनेक लेखकांची पिढी उभी राहिली

कादंबरीमध्ये भारतीय पात्रांच्या संवादातून आणि त्यांच्या जीवनातील संघर्षातून भारतीय तात्त्विक विचारसरणीची झलक दिसते. कादंबरीत भारतीय संस्कृतीतील कुटुंब, नातेसंबंध, सामाजिक बंधन यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. हे मूल्ये भारतीय ज्ञानपरंपरेचा एक महत्त्वाचा भाग आहेत. पात्रांच्या निर्णयांमध्ये आणि त्यांच्या जीवनातील घटनांमध्ये धर्म आणि नैतिकतेचा प्रभाव दिसतो. कादंबरीत भारतीय कला, संगीत, आणि साहित्यपरंपरेचा उल्लेख आहे, ज्यामुळे भारतीय ज्ञानपरंपरेची समृद्धता अधोरेखित होते. भारतीय ज्ञानपरंपरेतील धार्मिक, तात्त्विक, सांस्कृतिक, नैतिक आणि निसर्गाशी संबंधित विविध पैलूंचे उदाहरण देते. या कादंबरीतून भारतीय ज्ञानपरंपरेची समृद्धता आणि त्याचा मानवी जीवनावर होणारा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. कादंबरीत नैतिक मूल्ये, कुटुंब, समाज आणि व्यक्तीच्या जबाबदाऱ्या यांचा समावेश आहे, जे भारतीय ज्ञान परंपरेचे महत्त्वाचे भाग आहेत. पारंपरिक संस्कृती, धार्मिक विधी, आणि सामाजिक नियम भारतीय ज्ञान परंपरेचे प्रतिबिंब आहेत.

६.७ साठोत्तरी साहित्य प्रवाह

साठोत्तरी साहित्यात प्रामुख्याने ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी, दलित यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. १९६० नंतरच्या दलित वाङ्मयाचे प्रेरणा स्त्रोत डॉ. बाबासाहेब आंबेडकर असून

याच्या वैचारिक क्रांतीमुळे दलित साहित्यात कथा, कविता, कादंबरी, नाटक आणि आत्मकथन या प्रकारात लेखन झालेले आहे. यात प्रमुख्याने नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे, शरणकुमार लिंबाळे, दया पवार, लक्ष्मण माने, किशोर काळे, शांताबाई कांबळे, प्रेमानंद गज्वी, लक्ष्मण गायकवाड, प्र. ई. सोनकांबळे यासोबतच अनेक लेखकांनी दलित साहित्यात लेखन करून मराठी दलित साहित्य समृध्द केले आहे.

ग्रामीण साहित्य आणि भारतीय ज्ञान परंपरेचा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे कारण भारतीय संस्कृती, परंपरा, आणि मूल्ये ग्रामीण जीवनात जिवंत स्वरूपात अनुभवायला मिळतात. भारतीय ज्ञानपरंपरा खूपशी लोकजीवनाशी निगडित असून, ग्रामीण भागातील लोकांच्या अनुभव, परंपरा आणि संस्कारातून ती पुढे चालत आलेली आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्याला भारतीय ज्ञानपरंपरेचे जिवंत प्रतिबिंब मानले जाते. ग्रामीण साहित्य म्हणजे ग्रामीण जीवन, शेती, निसर्ग, परंपरा, लोकसंस्कृती आणि ग्रामीण समाजाचे वास्तववादी चित्रण करणारे साहित्य होय. हे साहित्य निसर्गाशी जवळीक दर्शवते, जसे की शेती, पाऊस, ऋतू यांचा उल्लेख, सोपी व बोलीभाषेतली अभिव्यक्ती, लोकपरंपरा, सण-उत्सवांचे वर्णन, श्रम, संघर्ष व सहजीवनाचे चित्रण यांसह नैतिक मूल्ये आणि संस्कार यावर आधारित असते.

दलित साहित्याबरोबरच ग्रामीण साहित्यातून जीवनातील संवेदना, समस्या, संघर्ष, सण-उत्सव, चालीरीती आणि निसर्गाशी जोडल्या गेलेल्या लोकांच्या अनुभवांना व्यक्त करणारे साहित्य तोंडी परंपरेचे जतन हे भारतीय ज्ञान परंपरेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे श्रुती आणि स्मृती परंपरा जिवंत ठेवली आहे. भारतीय ज्ञान परंपरा निसर्गाशी सुसंवाद साधून जगण्याची शिकवण देते. ग्रामीण साहित्यात याचे प्रत्यंतर येते कृषी आणि पर्यावरणीय ज्ञान आपल्याला कथा कविता कादंबरी, नाटक या प्रकारातून आपल्याला मिळते. शेतीविषयक म्हणी ग्रामीण साहित्यात आल्या असून ज्यातून हवामानाचा अंदाज, पेरणीची योग्य वेळ आणि पिकांच्या निगराणीचे शास्त्रीय ज्ञान देतात.

लोकवैद्य ग्रामीण साहित्यात औषधीवनस्पती, स्थानिक वनस्पतींच्या गुणधर्मांची माहिती आलेली आहे. सापदंशापासून ते सामान्य तापापर्यंतच्या घरगुती उपचारांचे ज्ञान मिळते. आयुर्वेदाची मुळे याच लोकवैद्य परंपरेत आहेत.

ग्रामीण साहित्य, विशेषतः सण-उत्सवांची गीते, सामाजिक समता आणि सामुदायिक सहकार्याचे ज्ञान देतात. यातून जात-पातीपलीकडे जाऊन एक समान सांस्कृतिक मूल्य तयार होते. ग्रामीण भाषा आणि प्रतिमांद्वारे गूढ अध्यात्मिक ज्ञान सुलभ करतात. ग्रामीण जीवनात कलाआणि कौशल्य हे वेगळे नसून जीवनाचा अविभाज्य भाग आहे. गीतांमध्ये चरखा कातणे, मातीची भांडी बनवणे किंवा भरतकाम-विणकाम याचे ज्ञान व कौशल्यांच्या तांत्रिक आणि सौंदर्यविषयक ज्ञानाचे

वाहक ग्रामीण भागातील लोक करत असतात. त्याचे चित्रण साहित्यातून आल्याचे आपल्याला दिसते. भारतीय ज्ञानपरंपरेतील अनेक घटक ग्रामीण, दलित. आदिवासी साहित्यात दिसून येतात. निसर्गपूजा श्रमाला महत्त्व देणे, नैतिकता व संस्कार, प्रामाणिकपणा, सहकार्य ही वैशिष्ट्ये साहित्याला केवळ कलात्मक दृष्टिकोनातून नव्हे तर सांस्कृतिक, सामाजिक आणि धार्मिक दृष्टिकोनातूनही महत्त्व देतात. साठोत्तरी साहित्य भारतीय ज्ञानपरंपरेचा एक महत्त्वाचा आधार आहे.

भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन, लोकजीवनातील अनुभवा, सामाजिक जाणीव निर्माण करणे, निसर्गाशी नाते दृढ करणे , ग्रामीण साहित्य हे भारतीय ज्ञान परंपरेचे मूळ स्वरूप जपणारे साहित्य आहे. यातून जीवनाचे वास्तव, संस्कार आणि मूल्ये स्पष्टपणे दिसतात. त्यामुळे ग्रामीण साहित्य हे केवळ साहित्यप्रकार नसून भारतीय संस्कृतीचे जतन करणारे आणि समाजाला दिशा देणारे माध्यम आहे. ग्रामीण साहित्य हा याच ज्ञान-विज्ञान, जीवनदर्शन आणि सांस्कृतिक जाणीवेचा आरसा आहे.

ग्रामीण साहित्य ही भारतीय ज्ञान परंपरेची जिवंत प्रयोगशाळा आहे. भारताचे खरे ज्ञान या ग्रामीण साहित्यातून आपल्याला दिसते. भारतीय ज्ञानाच्या त्या व्यापक व समग्र स्वरूपाचा भाग आहे.ज्यात विज्ञान, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र आणि कला या साऱ्यांचा समावेश होतो. ग्रामीण साहित्याचे संवर्धन व अभ्यास म्हणजे भारतीय ज्ञान परंपरेच्या मुळांना बळकटी देण्यासारखे आहे.

आदिवासी समाजामध्ये लेखनाची परंपरा फारशी नव्हती. त्यामुळे त्यांचे ज्ञान मौखिक परंपरेच्या माध्यमातून पुढे गेले आहे. त्यांच्या परंपरेत लोककथा, दंतकथा, नृत्य, संगीत, आणि धार्मिक विधी महत्त्वाची भूमिका बजावतात. भारताची सांस्कृतिक विविधता अत्यंत समृद्ध असून, त्यामध्ये आदिवासी समाजाचे अनमोल योगदान आहे. आदिवासी संस्कृती ही निसर्गाशी अतूट नातं असलेली असून, त्यांची परंपरा, जीवनशैली आणि तत्त्वज्ञान हे त्यांच्या मौखिक साहित्य आणि ज्ञानपरंपरेतून पुढे आले आहे. लोककथा, लोकगीते, म्हणी, आख्यायिका, तोंडी इतिहास, पारंपरिक औषधशास्त्र, शेती व जलसंवर्धन तंत्रज्ञान या सर्व माध्यमांतून त्यांचे ज्ञान व्यक्त होते. आदिवासी समाजामध्ये लेखनाची परंपरा फारशी नसल्यानं त्यांचे ज्ञान मुख्यतः मौखिक परंपरेतून पुढे आले आहे. त्यांच्या सांस्कृतिक परंपरेत लोककथा, दंतकथा, नृत्य, संगीत, आणि धार्मिक विधी या घटकांना महत्त्वाचा स्थान आहे.

भारतातील सांस्कृतिक विविधतेत आदिवासी समाजाचं अनमोल योगदान असलं तरी, त्यांची संस्कृती निसर्गाशी अतूट नात्याने जोडलेली आहे. त्यांच्या परंपरा, जीवनशैली आणि तत्त्वज्ञान हे सर्व त्यांच्या मौखिक साहित्य आणि ज्ञानपरंपरेतून पुढे आले आहे. लोककथा, लोकगीते, म्हणी, आख्यायिका, तोंडी इतिहास, पारंपरिक औषधशास्त्र, शेती आणि जलसंवर्धन

तंत्रज्ञान अशा विविध माध्यमांतून आदिवासी समाजाचं ज्ञान व्यक्त होतं. या माध्यमांमुळे त्यांची सांस्कृतिक ओळख, आणि पर्यावरणीय ज्ञानाचे संवर्धन करून पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचते.

आदिवासी साहित्य हे केवळ कलात्मक अभिव्यक्तीचे साधन नसून, त्यांच्या समाजजीवनाचा आरसा आणि अस्तित्वाची ओळख आहे. पारंपरिक नृत्य-गाणी, नाट्यकला आणि चित्रशैली यांसारख्या माध्यमांमुळे आदिवासींनी आपली संस्कृती पिढ्यान्पिढ्या जपून ठेवली आहे. मात्र, आजच्या बदलत्या युगात ही परंपरा लुप्त होण्याच्या मार्गावर असून, त्यामुळे आदिवासी साहित्याचे जतन, अभ्यास आणि प्रचार करण्याची अत्यंत गरज निर्माण झाली आहे. या अभ्यासात आदिवासी साहित्याचे विविध पैलू विचारात घेतले जातील—जसे पारंपरिक ज्ञानपरंपरा, आधुनिक काळातील त्याचे स्वरूप, तसेच जतन व संवर्धनाच्या गरजा. आदिवासी साहित्य हा केवळ ऐतिहासिक वारसा नाही, तर निसर्गसंवर्धन, सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीचे प्रभावी साधन आहे. त्यामुळे हे साहित्य केवळ आदिवासी समाजापुरते मर्यादित न राहता, संपूर्ण मानवी समाजासाठी प्रेरणादायी ठरते. आदिवासी पारंपारिक नृत्य आणि नाट्यकला ही केवळ मनोरंजनासाठी नाहीत, तर ती त्यांच्या जीवनशैलीचे, संस्कृतीचे आणि संघर्षाचे प्रतिबिंब आहेत.

आदिवासी समाज हा भारताच्या सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग असून, त्यांची संस्कृती, परंपरा आणि जीवनशैली निसर्गाशी अतूटपणे जोडलेली आहे. त्यांचे ज्ञान, अनुभव व परंपरा तोंडी साहित्याच्या माध्यमातून पिढ्यान्पिढ्या हस्तांतरित होत आले आहेत. लोककथा, लोकगीते, म्हणी, आख्यायिका, धार्मिक विधी, आणि हस्तकला हे त्यांच्या ज्ञानपरंपरेचे प्रतिबिंब आहेत. आदिवासी साहित्य त्यांच्या जीवनशैलीचे दस्तऐवजीकरण करणारे आणि सामाजिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक समृद्धता अधोरेखित करणारे महत्त्वाचे माध्यम आहे.

६.८ समारोप

भारतीय ज्ञान परंपरेचा प्रभाव केवळ धार्मिक किंवा तात्त्विक साहित्यापुरता मर्यादित न राहता, तो आधुनिक मराठी विज्ञान साहित्य, इतिहास, आणि सामाजिक चिंतनातही दिसून येतो. त्यामुळे आधुनिक मराठी वाङ्मय भारतीय ज्ञान परंपरेचा एक समृद्ध आणि सजीव भाग आहे, जो आपल्या सांस्कृतिक ओळखीला बळकट करतो आणि नव्या पिढीला आपल्या मूळ ज्ञानाशी जोडतो. आधुनिक मराठी साहित्याने भारतीय ज्ञान परंपरेचे अनेक पैलू उलगडून दाखवले आहेत. मानवतावाद, नवीन विचार, सामाजिक न्याय ही आधुनिक मराठी साहित्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. आधुनिक मराठी साहित्याने मानवतावादाला प्राधान्य दिले आहे, ज्यामध्ये सर्व मानवांना समान मानले जाते. आधुनिक मराठी साहित्याने पारंपरिक विचारांना विरोध केला आहे आणि

नवीन विचारधारेला प्रोत्साहन दिले आहे. आधुनिक मराठी साहित्याने सामाजिक न्यायाला प्राधान्य दिले आहे.

भारतीय ज्ञान परंपरा ही भारतीय संस्कृतीची समृद्ध परंपरा आहे. यांमधून ज्ञान, नैतिकता, अध्यात्म आणि मानवी मूल्यांचा विचार मांडलेला आहे. भारतीय समाजाच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक विकासाला दिशा दिली आहे. भारतीय ज्ञान परंपरा आणि मराठी साहित्य यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे.आधुनिक मराठी साहित्याने या परंपरेतील विचारांना नव्या दृष्टिकोनातून व्यक्त करून समाजाला मार्गदर्शन केले आहे. त्यामुळे भारतीय ज्ञान परंपरेचे जतन आणि संवर्धन करणे हे आधुनिक समाजासाठी अत्यंत आवश्यक आहे.

भारतीय ज्ञान परंपरा ही एक समृद्ध आणि तत्त्वप्रधान परंपरा आहे जी आधुनिक मराठी साहित्यात विविध प्रकारे प्रतिबिंबित झाली आहे. आधुनिक लेखकांनी या परंपरेतील तत्त्वज्ञानाला समकालीन संदर्भात मांडून मराठी साहित्या बरोबरच मराठी भाषेला अधिक व्यापक आणि सखोल बनवले आहे.

संदर्भ सूची

१) विष्णुशास्त्री चिपळूणकर, मराठी भाषेची सांप्रतची स्थिति, मा.ग.बुद्धिसागर (संपा.), चिपळूणकर लेखसंग्रह , साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २०१३, पृ. ३८.

२) मा.ग.बुद्धिसागर (संपा.), प्रस्तावना, चिपळूणकर लेखसंग्रह, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २०१३, पृ. २४.

३) जोशी सुधा, कथा: संकल्पना आणि समीक्षा.

४) बिरादार, वसंत, आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास (१८१८-२०००), कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१४.

५) मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ ते ७, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

६) प्रा. डॉ . शैलेशकुमार वाघ, भारतीय ज्ञान प्रणाली , अथर्व पब्लिकेशन्स,प्रथमावृत्ती २०२४.

७) मध्ययुगीन मराठी वाड्मयाचा इतिहास, डॉ अतुल मधुरराव देशमुख, अकॅडमी बुक पब्लिकेशन्स जळगाव, आवृत्ती नोव्हेंबर २०२१.

८) ल. वा. नसिराबादकर - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

***

प्रकरण ७

उपसंहार

प्रस्तुत संशोधनात एकूण सात असून प्रत्येक प्रकरणांच्या स्पष्टीकरणातून आलेला गोषवारा व संशोधनाअंती हाती आलेले निष्कर्ष याची नोंद शेवटच्या उपसंहार या प्रकरणामध्ये घेतली आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही धर्म आणि विज्ञानाचा अद्भुत समन्वय साधते. जी हजारो वर्षे मौखिक आणि लिखित रूपात आपल्याला दिसते. भारतीय ज्ञान परंपरा केवळ धार्मिक नसून वैज्ञानिक आहे. त्याचे मूळ तर्क, अनुभव आणि समन्वय यात आहे.

पहिल्या प्रकरणात प्रस्तावना केलेली असून प्रत्येक घटकाचे विश्लेषण यामध्ये केले आहे. प्रामुख्याने त्यामध्ये संशोधन विषय, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती, संशोधनाची मर्यादा, संशोधन अभ्यासाची गरज, संशोधनाची पद्धती, संशोधनाची साधने, माहितीचे संकलन व विश्लेषण इत्यादी घटकांचा आढावा यामध्ये घेण्यात आलेला आहे.

या प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात भारतीय ज्ञान परंपरेची संकल्पना, स्वरूप व वाटचाल असून भारतीय ज्ञान प्रणाली ही प्राचीन काळापासून विविध क्षेत्रांमध्ये प्रगतिशील राहिलेली एक अद्वितीय परंपरा आहे. मानवी जीवनाच्या सर्व अंगांचा समावेश असलेल्या या परंपरेतील वेद, उपनिषदे, त्रिपिटक, तत्वज्ञान, आयुर्वेद, योग, ज्योतिष, वास्तुशास्त्र, काव्य आणि विज्ञान अशा अनेक विषयांचा समावेश आहे. या ज्ञान परंपरेने केवळ भारतालाच नव्हे, तर जगाला तत्त्वज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा अमूल्य ठेवा दिला आहे.

भारतीय ज्ञान परंपरेचे स्वरूप स्पष्ट करताना दर्शनशास्त्रात दोन भाग पडतात त्यातील एक भाग म्हणजेच आस्तिक दर्शन तर दुसरे नास्तिक दर्शन होय. आस्तिक दर्शनात न्याय दर्शन, वैशेषिक दर्शन, सांख्य दर्शन, योग दर्शन, मीमांसा दर्शन व वेदांत दर्शन इत्यादी दर्शनांचा समावेश होतो. बौद्ध, जैन व चार्वाक इत्यादींचा समावेश नास्तिक दर्शनात होतो. यात वेद व वेदाचे प्रकार यांचे विश्लेषण केले आहे. जैन, सांख्य मीमांसक, नैसर्गिक, काश्मिरी शैव संप्रदाय, गणित, वैदिक शास्त्रे, भौतिकशास्त्रे, नाट्यशास्त्र, सोंदर्यशास्त्र व भारतीय ज्ञान प्रणालीचे महत्त्व व वैशिष्ट्ये, पुराणे व पुराणांचे महत्त्व, इत्यादींचा आढावा या प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

तिसऱ्या प्रकरणात अभिजात भाषा संकल्पना, स्वरूप व वाटचालीचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने अभिजात मराठीचे आद्यस्त्रोत, भाषा : व्याख्या, संकल्पना व

व्याप्ती, भाषेचा अर्थ, उत्पत्ती विज्ञान, समाजभाषा विज्ञान, सामाजिक भाषा विज्ञान, बोलीभाषा विज्ञान, बोलीभाषेत पडणारा फरक, व्याकरण, स्थानिक भाषा, महाराष्ट्रातील स्थानिक भाषांची उदाहरणे, शेती, जंगल, पशु, नातेसंबंध, सण-उत्सव, बोलीभाषा, भूगोलाची क्षेत्रीय संकल्पना, सामाजिक बोली, मातृभाषा, अभिजात भाषा, भारतीय अभिजात भाषा, मराठी भाषेची जडणघडण, मराठी भाषेची उत्पत्ती - विविध मतप्रवाह, अभिजात भाषेचे निकष, भाषा शिक्षण, अनुदेशन पद्धती, बहुभाषिकता, संवाद क्षमता, सर्जनशीलता, अभिजात मराठीची वाटचाल, शिलालेख, ताम्रपट, दुर्मिळ ग्रंथ, ब्रृहन्महाराष्ट्रातील मराठीचे प्राचीन संदर्भ इत्यादींचा या प्रकरणात आढावा घेण्यात आलेला आहे.

चौथे प्रकरण भारतीय ज्ञान परंपरा आणि लोकसाहित्य हे असून यात लोकसाहित्यातून आलेली ज्ञानपरंपरा आणि मराठी अभिजात भाषा कशी आहे याची माहिती आपल्याला या प्रकराणातून होते. लोकसाहित्य हे समाजाच्या जीवनाशी, संस्कृतीशी आणि परंपरांशी घट्ट जोडलेले असते. लोकांच्या अनुभवातून, श्रद्धेतून आणि दैनंदिन जीवनातून ते निर्माण झालेले असुन पिढ्यानपिढ्या मौखिक परंपरेने चालत आलेले आहे. त्यात लोकजीवनाचे वास्तव, भावना आणि मूल्ये दिसून येतात. लोकगीते, लोककथा, उखाणे, म्हणी, लोकनाट्य इत्यादी प्रकारांमधून समाजाची जीवनपद्धती आणि सांस्कृतिक वारसा जतन केला जातो. त्यामुळे लोकसाहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन नाही तर समाजाचा इतिहास, भाषा, संस्कृती आणि ज्ञान परंपरेचे जतन करणारे महत्त्वाचे माध्यम आहे. मराठी भाषेतील लोकसाहित्य हे मौखिक असून ज्ञान परंपरेचे वाहक असल्याचे आपल्याला दिसते.

पाचव्या प्रकरणात भारतीय ज्ञान परंपरा आणि प्राचीन आणि मध्ययुगीन मराठी साहित्य असून प्रस्तुत प्रकरणात भारतीय ज्ञान परंपरा प्राचीन काळापासुन मध्ययुगीन काळापर्यंत कशी आली याचा आढावा घेवुन त्याचे विश्लेषन केले आहे. या प्रकरणात वेद, उपनिषद, बौद्ध, जैन, पुराणे, इत्यादी घटकाचे स्पष्ट वर्णन केले आहे. संत साहित्यात (ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम) ही परंपरा दिसते. त्यांनी अद्वैत वेदान्त,भक्तीमार्ग आणि कर्मयोग यांचा मेळ घातला. ज्ञानेश्वरीने गीतेचे तत्त्वज्ञान, एकनाथानी पुराणकथा, तर तुकारामांनी भक्तीचा सोपा मार्ग लोकांपर्यंत पोहोचवला. त्याच बरोबर भारतीय ज्ञान परंपरेतील तत्त्वज्ञान, नैतिक मूल्ये आणि आध्यात्मिक विचारांचा प्रभाव प्राचीन व मध्ययुगीन मराठी साहित्यात स्पष्टपणे दिसून येतो. संत साहित्य, भक्ती चळवळ आणि धार्मिक

ग्रंथांमधून हे विचार लोकभाषेत समाजापर्यंत पोहोचले. त्यामुळे मराठी साहित्याने भारतीय संस्कृती, मूल्ये आणि अध्यात्मिक परंपरेचा प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

सहाव्या प्रकरणात भारतीय ज्ञान परंपरा आणि आधुनिक मराठी साहित्य या घटकाचे वर्णन केले आहे. यानुसार आधुनिक काळातही भारतीय ज्ञान परंपरा आणि मराठी साहित्य यांचे महत्त्व कायम आहे. या परंपरेतील विचार आधुनिक समाजाला नैतिक मार्गदर्शन, सांस्कृतिक ओळख आणि मूल्याधिष्ठित जीवन जगण्याची प्रेरणा देतात. मराठी ज्ञान परंपरेत भक्ती संप्रदायाला विशेष स्थान असून संतांनी सगुण व निर्गुण भक्तीच्या माध्यमातून समाजात समता, बंधुभाव आणि आध्यात्मिक जागृतीचा संदेश मिळतो. त्यामुळे भारतीय ज्ञान परंपरा आणि मराठी साहित्य आजही समाजाच्या बौद्धिक व सांस्कृतिक समृद्धीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतात. संशोधकाच्या मर्यादा लक्षात घेऊन या प्रकरणात आधुनिक मराठी साहित्यबद्दलचा त्रोटक आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रकरण सात हे उपसंहार असून "भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात अभिजात मराठी भाषेचा अभ्यास" या संशोधन विषयाची सात प्रकरणात मांडणी करण्यात आली आहे. उपसंहार या प्रकरणात या विषयाची सारांश रूपाने मांडणी करून निष्कर्ष, शिफारशी आणि पुढील संशोधनासाठी दिशा निर्देश करण्यात आले आहेत.

७.१ संशोधनाअंती हाती आलेले निष्कर्ष

प्रस्तुत संशोधनांचे निष्कर्ष मांडताना विषयाशी संबंधित घटकांना स्पष्ट करण्यात आलेले आहे.

१) मराठी भाषेत वेगवेगळ्या ज्ञान परंपरा आहेत.

२) भारतीय ज्ञान परंपरेबरोबरच मराठी भाषेचेही प्राचीनत्व दिसून येते.

३) भारतीय ज्ञान परंपरा जीवनानुभव देणारी असल्यामुळे समाजाने आत्मसात केलेली दिसते.

४) मराठी भाषेतील ज्ञानपरंपरा जाणून घेतल्याने मराठी भाषेबद्दल प्रेम निर्माण होते.

५) भारतीय ज्ञान परंपरा जाणून घेतल्याने भारतीयत्वाचा अभिमान निर्माण होतो

६) मराठी भाषेतील लेखकांनी आपल्या जगण्याचे अनुभव, समाजाचे आत्मभान, मराठी भाषेत निर्भिडपणे मांडल्यामुळे लेखन सामाजिक दस्तऐवज आहे.

७) भारतीय ज्ञान परंपरा आणि मराठी ज्ञान परंपरेचा अभ्यास करताना परिघ आधिक विस्तारलेला आहे असे आपणास दिसते.

८) मराठी भाषेचा विस्तृत अभ्यास केल्याने मराठी भाषेबद्दल अभिमान निर्माण होऊन मराठी भाषा अभिजात भाषा असल्याचे दिसते.

९) संतानी आपल्या कार्याची, व्यक्तिमत्वाची ओळख, ज्ञान परंपरा व संस्कृतीचे संरक्षण मराठी भाषेतून केलेले आहे.

१०) मराठी साहित्य लेखनात अखंडता हे समान सूत्र पहावयास मिळते. त्यामुळे भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात मराठी भाषा अभिजात आणि समृद्ध आहे

११) लोकसाहित्य, लोककला, लोकसंस्कृती, लोककलांचे दर्शन, वेगवेगळया प्रादेशिक विभागात वेगळ्या लोककला पहावयास मिळतात. त्या सादर करण्याठीची भाषा ही लोकभाषा आहे.

१३) मराठी भाषा भारतीय ज्ञान परंपरेतील विचार आणि मूल्ये जनसामान्यांपर्यंत पोहोचवणारे प्रभावी माध्यम होती आणि आहे.

१४) ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ यांच्या साहित्यामुळे अध्यात्म, नैतिकता आणि मानवतावादी विचारांचा प्रसाराबरोबरच मराठी भाषेत भारतीय संस्कृती, परंपरा आणि तत्त्वज्ञान यांचे जतन झाले आहे.

१५) संतसाहित्य, भक्तीपरंपरा आणि लोकसाहित्यामुळे मराठी भाषेची समृद्ध परंपरा दिसून येते.

७.२ शिफारशी

प्रस्तुत संशोधन कार्यानंतर जे निष्कर्ष मांडण्यात आले त्यावरून पुढील शिफारशी करण्यात येत आहेत.

१) अभिजात भाषेच्या संदर्भ साधनाबरोबरच इतर मराठतील शिलालख व दुर्मिळ ग्रंथाचे प्रकाशन करून वाचक व अभ्यासकापर्यंत पोहोचविता येईल.

२) प्राचीन मराठी साहित्य लेखनाच्या हस्तलिखिताचा संग्रह अभ्यासकासाठी उपलब्ध करता येईल.

३) कला ही व्यक्तिच्या जीवनाला दिशा देणारी असल्यामुळे लोकसाहित्य व लोककला या विषयावर सखोल संशोधनास अधिकचा वाव आहे.

४) लोकजीवनात प्रचलित असलेल्या पुराण कथा, लोकमानसांत श्रध्दा असलेल्या देवदेवता, रूढ असलेले लोकसमज, लोकमानसांतील भावभावना असे अनेकविध पैलू त्यांच्या गीतांना लाभलेले असतात.

५) साहित्य, कला, लोककलेतील योगदान लोककलावंत व लोककला संशोधनास प्राधान्य दयावे.

६) लोककलावतांकडे असलेल्या मौखिक साहित्याचे लिखित स्वरूपात व दृश्यरूपात माहिती संचय तयार करणे.

७) मराठीतील दुर्मिळ ग्रंथाचे जतन, डिजीटायजेशन व संवर्धन करणे आवश्यक आहे.

८) मराठीतील उत्तम ग्रंथाचे अनुवाद करून इतर भाषेतील वाचकांना उपलब्ध करणे.

९) बृहन्महाराष्ट्र मंडळे यांना मराठी भाषेत काम करण्यासाठी चालना देणे.

१०) सर्व विषयाचे ज्ञान मराठीत आणण्यासाठी आवश्यक प्रयत्न करणे.

११) सण, उत्सव, जत्रा, यात्रा व मेळाव्याच्या माध्यमातून लोककला आणि लोकसंस्कृतीचे संवर्धन करणे.

७.३ पुढील संशोधनासाठी दिशा

१) जगभरातील लोकसाहित्याचा आणि भारतीय लोकसाहित्याचा तौलनिक अभ्यास करता येऊ शकतो किंवा त्या दृष्टीने प्रयत्न करणे.

२) संतसाहित्य आणि भारतीय ज्ञान परंपरेतील तत्त्वज्ञान यांचा सखोल तुलनात्मक अभ्यास करणे.

३) मराठीतील प्राचीन ग्रंथ, बखरी, अभंग आणि ओव्या यांमधील ज्ञानपरंपरेचे विश्लेषण करणे.

४) भारतीय ज्ञान परंपरेतील वेद, उपनिषद, बौद्ध-जैन ग्रंथांचा मराठीवरील प्रभाव अभ्यासणे.

५) लोकसाहित्य आणि अभिजात मराठी भाषेतील संबंधांचा अभ्यास करणे.

६) आधुनिक काळात मराठी भाषेतून भारतीय ज्ञान परंपरेचा प्रसार कसा होतो याचा अभ्यास करणे.

७) डिजिटल माध्यमांद्वारे अभिजात मराठी भाषेचे जतन व प्रसार यावर संशोधन करणे.

८) भारतीय ज्ञान परंपरा आणि मराठी संताच्या अभंगाची वैचारिक पुनर्मांडणी करता येईल हा विचार अभ्यासकाला महत्त्वाचा वाटतो.

९) प्राचीन मराठी साहित्य लेखनाची हस्तलिखिताचा संग्रह भाषिक मांडणीचा अभ्यास करता येईल.

संदर्भग्रंथ सूची

१) आंबेडकर नीलिमा देवरावजी & पाटील गीतादेवी गणेश " शैक्षणिक संशोधन पद्धती" श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २०१६.

२) वरखेडे रमेश " समाज भाषा विज्ञान", शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००१.

३) संपा. संपाळे ज्योती "भारतीय ज्ञान प्रणालीचे पुनर्जागरण" प्रभाकर पब्लिकेशन, लातूर, २०२४.

४) मराठी भाषा विभाग "अभिजीत मराठीची गौरवगाथा", महाराष्ट्र शासन, मुंबई, २०२५.

५) वाघ शैलेशकुमार, सोनवणे सिद्धार्थ, पाटील मुकेश, खैरनार सुभाष "भारतीय ज्ञान प्रणाली", अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०२४.

६) गोसावी वासुदेव,"भारुड भावार्थ", संदिपान पाटील, औरंगाबाद, २०००.

७) तुळपुळे शं. गो., "यादवकालीन मराठी भाषा", केशव ढवळे प्रकाशन, मुंबई, १९४३.

८) संपा. जोगळेकर स आ., "हाल सातवाहनांची गाथा सप्तशती", पद्मगंगा प्रकाशन, पुणे, २०२३.

९) संपा. वरखेडे रमेश, "भाषावार प्रांतरचना आणि मराठी", साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २०१४.

१०) संपा. दडकर जया, गणोरकर प्रभा, डहाके वसंत, भटकर सदानंद " संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश", (आरंभापासून १९२० पर्यंतचा कालखंड) भटकळ फाउंडेशन, मुंबई, २०१३.

११) कांबळे शशिकला, "सामाजिक भाषाविज्ञान आणि बोली", स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०११.

१२) शेनोलीकर ह. श्री., "प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप", डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०११.

१३) संपा. वरखेडे मंगला, "निवडक गोष्टीच्या गुहेत", दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०२५.

१४) संपा. तुळपुळे शं. गो., "मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला", महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, २००५.

१५) शेंडे एन बी., "भारतीय पुराभिलेखागाराचा व पुरातत्त्वविद्येचा परिचय", अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०१९.

१६) कुलकर्णी कृ. पा., "मराठी उत्पत्ती कोश", निराली प्रकाशन, पुणे, २०२४.

१७) पाटील वसंत निवृत्तीराव, "महानुभव वांग्मय स्मृतीस्थळ - भाषिक अभ्यास", अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०१२.

१८) सोनवणी संजय, "जैनांचे मराठी भाषेतील योगदान", चिनार पब्लिशर्स, पुणे,२०२४.

१९) कन्नोर सतीलाल, पाटील दीपक, "प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा", अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०२४.
२०) बेंडखळे अशोक, मेहेंदळे उज्वला, "इये मराठीचीये नगरी", मराठी साहित्य संघ, मुंबई, २०१५.
२१) अकोलकर ग. वी., पाटणकर ना. वी.,"मराठीचे अध्यापन", व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७०.
२२) देखणे रामचंद्र, "भारुड वाङ्मयातील तत्त्वज्ञान", पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००२.
२३) भावे ह. अ., "म्हणी, वाक्संप्रदाय व शब्दविचार" सरिता प्रकाशन, पुणे, १९९५.
२४) लामखडे मा. रा. "तमाशा आणि लावणी" नवीन उद्योग, पुणे, २०१४.
२५) मनोहर यशवंत, "मराठी कविता आणि आधुनिकता" आंबेडकरधम्म प्रकाशन, नागपूर. १९९३.
२६) भोसले द. ता., "संस्कृतीच्या पाऊलखुणा", पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००८.
२७) शेवडे इंदुमती, "स्त्रीमुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा", पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९८९.
२८) ढेरे रा. ची., "लोकसाहित्य शोध आणि समीसकाळक्षा", पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००९.
२९) डहाके वसंत आबाजी, "मराठीतील कथन रूपे", पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१२.
३०) मोरे सदानंद, "महाराष्ट्राची लोक यात्रा" प्रकाशन, पुणे, २०२२.
३१) खांडगे प्रकाश, "महाराष्ट्राच्या प्रयोगात्म लोककला", महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०१७.
३२) बऱ्हाटे काशिनाथ, "कोरकू बोली", देवयानी प्रकाशन, मुंबई, २०१२.
३३) बापट शैलजा, "महानुभाव वांग्मय भाग १", राजहंस प्रकाशन, पुणे, २०२२.
३४) बापट शैलजा, "महानुभाव वांग्मय भाग २", राजहंस प्रकाशन, पुणे, २०२२.
३५) शहा मृणालिणी, टिळक विद्यागौरी, "आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता", पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००७.
३६) रंगदळ अजित, "भारतीय ज्ञान प्रणाली", प्रभाकर पब्लिकेशन, लातूर, २०२४.
३७) लोखंडे भाऊ, "मराठी संत साहित्यावर बौद्ध धर्माचा प्रभाव", सुगावा प्रकाशन, पुणे, २०१२.
३८) कोसंबी धर्मानंद, "जातक कथासंग्रह", मुक्तांगण प्रकाशन, पुणे, २०१६.
३९) पाटील म.सु., "आदिबंधात्मक समीक्षा", निहारा प्रकाशन, पुणे, १९८९.
४०) दातार मुकुंद, "संतांची सार्थ भारुडे", स्नेहल प्रकाशन, पुणे, २०२२.
४१) सखाराम शंकर, "शब्दानुबंध", मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, २००५.
४२) जोशी ना. गो., "मराठी छंदोरचना", स्नेहसुधा प्रकाशन, बडोदें

४३) गोसावी र. रा.,"मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र", स्नेहवर्धन पब्लिकेशन, पुणे, २००४.
४४) कानडे मु. श्री., "मराठीचा भाषिक अभ्यास", स्नेहवर्धन पब्लिकेशन, पुणे, २००४.
४५) तुळपुळे शं. गो., " मराठी वाङ्मयाचा इतिहास", महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८४.
४६) हळबे ललिता श्रीकांत, "मराठी वाक्प्रचार व म्हणी", श्री. ललित प्रकाशन, मुंबई, १९९०.
४७) जोशी प्र. न., "मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास", स्नेहवर्धन प्रकाशन, २०००.
४८) तुळपुळे शं. गो., "भाषाप्रकाश", पुणे विद्यापीठ, पुणे,१९६२.
४९) देशमुख उषा माधव, "मराठी साहित्याचे आदिबंध", लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९८२.
५०) इंगोले कृष्णा, "लोकवाणीतील अमृत धन", कृष्णा संशोधन व विकास अकादमी, सोलापूर, २०२१.
५१) भावे हे. अ., "कथासरित्सागर खंड - ३", वरदा बुक्स, पुणे, १९८०.
५२) देखणे रामचंद्र, "गौळण वांग्मय आणि स्वरूप", विश्वकर्मा पब्लिकेशन, पुणे, २०२१.
५३) कुलकर्णी श्रीधर रंगनाथ, "ओवी ते लावणी", कासवाणी मराठी प्रगत दिन संस्था, धुळे, १९९२.
५४) वरखेडे रमेश, "मराठी लोकगीते : संस्कृती अभ्यासाची साधने", साहित्य अकॅडमी, नवी दिल्ली, २०१२.
५५) दामले श. प्र., "दासबोधातील निवडक ओव्या", ४ आकाश दर्शन, पुणे, १९९४.
५६) डहाके वसंत आबाजी, " मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती", पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०२४.
५७) राणे सदानंद, "महाराष्ट्राच्या लोककला आणि लोकनृत्य", डिंपल पब्लिकेशन, ठाणे, २०१२.
५८) चौधरी सुधाकर, " समाज भाषा विज्ञान : बोलींचा अभ्यास", अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०१४
५९) पिंजारी साजिद, पाटील विनोद, पाटील दीपक, " मराठी अशी युक्त अध्यापन पद्धती", अथर्व पब्लिकेशन धुळे, २०१४.
६०) धोंगडे रमेश, " सामाजिक भाषाविज्ञान", दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१२.
६१) तुळपुळे शं. गो., "यादवकालीन मराठी भाषा", व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७३.
६२) गोसावी र. रा.," मराठीचे ऐतिहासिक भाषाशास्त्र", स्नेहवर्धन पब्लिकेशन, पुणे, २००४.
६३) घोलप दत्ता, गायकवाड संग्राम, "मराठी भाषा धोरण आणि अंमलबजावणी", सेंटर फॉर पॉलिसी अँड गव्हर्नन्स, पुणे,२०२५.
६४) बोरकर हरिश्चंद्र, "झाडी बोली : भाषा आणि अभ्यास", विजय प्रकाशन, नागपूर, १९९८.

६५) जोशी वसंत, "भाषा व साहित्य संशोधन" महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, २००६.
६६) संपा. आतकर रामदास, झगडे राजाराम, "मराठी मौखिक वांङ्मय", श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २०२३.
६७) गणोरकर प्रभा, टाकळकर उषा, डहाके वसंत, दडकर जया, भटकळ सदानंद, "मराठी वाङ्मयकोश", ग. रा. भटकळ फाउंडेशन, मुंबई, २०१३.
६८) संपा. जाखडे अरुण, देवी गणेश, "भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण", पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०२३.
६९) गोरे दादा, "आधुनिक भाषाविज्ञान आणि मराठी भाषा", कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २००५.
७०) संपा. पाटणकर जयश्री, "सामाजिक भाषा विज्ञान", स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०१३.
७१) कुलकर्णी कृ. पा., "मराठी भाषा उगम व विकास", मेहता पब्लिकेशन, पुणे, २०१७.
७२) रायरीकर कल्पना, भालेराव मंजिरी, "महाराष्ट्राच्या इतिहासाचे साक्षीदार शिलालेख आणि ताम्रपट", डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०२४.
७३) वाळिंबे रामचंद्र, "ज्ञानेश्वरीतील विदग्ध रसवृत्ति", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८८.
७४) धोंगडे दिलीप, "तुकोबांच्या अभंगांची शैलीमीमांसा" राजहंस प्रकाशन, पुणे, २०१४.
७५) बोंगाळे रमाकांत, "तुका झालासे कळस", गवळी प्रकाशन, इस्लामपूर, २०१३.
७६) संपा. निकते प्र. द., "संत नामदेव अभंग चिंतनिका", परम मित्र पब्लिकेशन, ठाणे, २०१७.
७७) पटवर्धन वासुदेव, केळकर गणेश, " तुकारामांच्या अभंगाची चर्चा खंड एक", साहित्य अॅकॅडमी पब्लिकेशन, दिल्ली, २०१४.
७८) शरणार्थी नागप्पा, "क्रांतिकारी महात्मा बसवेश्वर आणि १२ वे शतक : महिलांचा सुवर्णकाळ", सुविधा वितरण, सोलापूर, २०१५.
७९) पटवर्धन वासुदेव, केळकर गणेश, " तुकारामांच्या अभंगाची चर्चा खंड दोन", साहित्य अॅकॅडमी पब्लिकेशन, दिल्ली, २०१४.
८०) कारंजकर प्रवीण, "महात्मा बसवेश्वर व्यक्तिमत्व - विचार आणि तुलना", सुधीर प्रकाशन, वर्धा, २०१४.
८१) रक्षक ज्ञानेश्वर, "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज", संकेत प्रकाशन, नागपूर, २०१५.
८२) संपा. देशमुख भगवंत, "एकनाथ वांग्मयदर्शन", साहित्य अकादमी, नवी दिल्ली, २०१४.

८३) दांडेकर श. वा., "वारकरी पंथांचा इतिहास", प्राचार्य दांडेकर धार्मिक वाङ्मय प्रकाशन, पुणे, १९९५.
८४) संपा. देऊळगावकर चंद्रकांत, मातेकर हरिहर, मोहोळकर एम.जी., "दासोपंतकृत गीतार्णव", महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००७.
८५) बडवे सतीश, "संतसाहित्य समीक्षेचे बीजप्रवाह", गुरुकुल प्रतिष्ठान, पुणे, २०११.
८६) पठाण यू. म., "महानुभाव साहित्य शोध आणि समीक्षा", दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१४.
८७) संपा. शेवाळकर अनिल, "महानुभाव आद्य साहित्य : एक चळवळ", दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१६.
८८) पाटील विनायक, " महानुभाव सांकेतिक सुंदर लिपीचा अभ्यास", राऊळ प्रकाशन, संभाजीनगर, २०१६.
८९) आवलगावकर समीक्षा, "महानुभावांची स्थान महात्म्ये", यशोदीप पब्लिकेशन्स, पुणे, २०१५.
९०) चौधरी सुधाकर, "समाजभाषाविज्ञान : बोलींचा अभ्यास", अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०१४.
९१) देसाई बापूराव, म्हसकर संगीता, "भारतातील पंचवीस लोकबोलीचे ग्रामीण साहित्य व लोकसाहित्यशास्त्र", पद्मश्री प्रकाशन, जळगाव, २०२२.
९२) गुंडी नीलिमा, "भाषा प्रकाश", मॅजेस्टिक पब्लिकेशन हाऊस, ठाणे, २०१५.
९३) महाजन पुरुषोत्तम प्रल्हाद, "मराठीचा भाषिक अभ्यास", अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०२१.
९४) माहुलकर दिनेश, "भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन", राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, २०२४.
९५) संपा. जोशी वसंत, पुंड द. दि., "दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास", राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, २००१.
९६) देशपांडे प्रवीण, "प्राचीन आणि मध्ययुगीन भारतीय धातुशास्त्राचा संक्षिप्त इतिहास", राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, २०१४.
९७) भागवत गीता, "राजभाषा मराठीच्या पायाशी", डिंपल पब्लिकेशन, पालघर, २०१६.
९८) भागवत वामनशास्त्री, "पाणिनीय व्याकरण आणि भाषा तत्वज्ञान", महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २०१७.
९९) देव सदाशिव, "कोशवाङ्मय विचार आणि व्यवहार", डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१४.

१००) केसकर भीमराव, "दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास", राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, १९९७.
१०१) चौधरी बहिणाबाई, "बहिणाबाईंची गाणी", साहित्य प्रसार केंद्र, नागपूर, २०१४.
१०२) मस्करेन्हस अंजली, "आदिवासी लोकगीते व लोकनृत्ये : एक अभ्यास", अभिव्यक्ती प्रकाशन, नाशिक, २०२१.
१०३) गावीत पुष्पा, "आदिवासी संस्कृती भाषा आणि साहित्य", अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०१४.
१०४) खरात शंकरराव, "गावचे आलूचे अलुतेदार आणि बलुतेदार", इंद्रायणी साहित्य, पुणे, २०१४.
१०५) व्यवहारे शरद, "लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप", कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९९.
१०६) मांडे प्रभाकर, "लोकसाहित्याचे स्वरूप", सविता प्रकाशन, औरंगाबाद, १९८९.
१०७) मांडे प्रभाकर, "लोकपरंपरेतील स्त्रीप्रतिमा", गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, २०१४.
१०८) व्यवहारे विद्या, "स्त्री गीतांची सामाजिक - सांस्कृतिक पार्श्वभूमी", कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९९.
१०९) इंगोले कृष्णा, "लोकसंस्कृतीतील स्त्रीरूपे", महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०२१.
११०) मिना आर. एन., "भारतीय संस्कृती आणि वारसा", राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली, २०१३.
१११) मांडे प्रभाकर, "लोकरंग आणि अभिजात रंगभूमी", गोदावरी प्रकाशन, अहमदनगर, २०१६.
११२) शिंदे विश्वनाथ, "पारंपारिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य", शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१५.
११३) लोहकरे संजय, "लोकसाहित्य आणि लोकजीवन", सुगावा प्रकाशन, पुणे, २०१५.
११४) मांडी प्रभाकर, "लोकसंस्कृतीचे मूलतत्त्व", गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, २०१५
११५) महाडिक नलिनी, " लोकसाहित्य आणि ग्रामीण साहित्य यांचे स्वरूप", स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०१६.
११६) ढेरे रा. ची., "लोकसाहित्य शोध आणि समीक्षा", श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९०.
११७) महाजन लता, "लोकसाहित्यातील कुटुंब चित्रण", स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०१३.

११८) मोकाशी मधुकर, "मराठी लोकसंस्कृतीच्या पाऊल खुणा, "स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २०१०.
११९) निमजे योगेश, "शिक्षणातील भारतीय व पाश्चात्य विचारवंत", सेवा प्रकाशन, अमरावती, २०१४.
१२०) दवे दिव्यांशुभाई, प्रजापती वासुदेव, धोकायी भरतभाई, भट पार्वती, "पंचपदी अधिगम पद्धती : तत्व एवं व्यवहार", विद्याभारती संस्कृती शिक्षा संस्थान, कुरुक्षेत्र,२०२४.
१२१) वरखेडे रमेश, वरखेडे मंगला, "संशोधनाचे पद्धतीशास्त्र", ग्रामण्य इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनल एक्सलन्स, पुणे,२०१९.
१२२) नाईकवाडे राजेंद्र, पाखमोडे गुरुप्रसाद, चिकाटे अजय, कटरे अरविंद, "संस्कृती आणि साहित्य", विजय प्रकाशन, नागपूर, २०१८.
१२३) तोमर लज्जाराम, "भारतीय शिक्षणाची मूलतत्वे", विद्याभारती संस्कृती शिक्षा संस्थान, कुरुक्षेत्र, २०२२.
१२४) हरदास बाल शास्त्री, "वैदिक राष्ट्र दर्शन", सर्वची प्रकाशन, नवी दिल्ली, २०१५.
१२५) पाटील बी. एम., शिखरे व्ही. पी., "शैक्षणिक तंत्रविज्ञान व माहिती तंत्रज्ञान", फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०११.
१२६) भागवत विद्युत, "समकालीन भारतीय समाज", डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१६.
१२७) बोकील मिलिंद, "साहित्य भाषा आणि समाज", मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०१६.
१२८) नेमाडे भालचंद्र, "साहित्याची भाषा", साकेत प्रकाशन, पुणे, २०१५.
१२९) मराठी भाषा विभाग, "महाराष्ट्र मराठीचीये कौतुके", शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई, ऑक्टो. २०२५.
१३०) शेंडे निशांत बी., "वस्तुसंग्रहालये", अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०२२.
१३१) मस्कर संगीता, महाजन कविता, माळी संगीता, "बाल साहित्य आकलन आणि समीक्षा", अथर्व पब्लिकेशन, धुळे, (२०१६)
१३२) जोशी सु. ह., महाराष्ट्रातील लेणी, डायमंड पब्लिकेशन, पुणे (२००८)
१३३) गावित पुष्पा यशवंत, "आदिवासी संस्कृती भाषा आणि साहित्य", अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०१४.
१३४) जवरास रत्न, "ओवी गीतातील बदलते मूल्य", अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०२२.
१३४) पाटील वसंत निवृत्तीराव, "धनगरी बोली", अथर्व पब्लिकेशन, धुळे, २०१२.

१३५) मोरे सदानंद, "गर्जा महाराष्ट्र", सकाळ प्रकाशन, पुणे (२०२५)
१३६) ढवळीकर मधुकर केशव, "महाराष्ट्राची कुळकथा", राजहंस प्रकाशन, पुणे, २०२४.
१३७) फडके य. दी., "विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड ४", श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २०२३.
१३८) जोशी वि. कृ., "लोकनाट्याची परंपरा", १९६१.
१३९) गाडगीळ विद्या, "तंजावरचे मराठी राज्य आणि संस्कृती", पापुलर प्रकाशन, मुंबई, २००३.
१३९) लाल रमण बिहारी, "शिक्षा के दार्शनिक एवं समाजशास्त्रीय सिद्धांत", रस्तोगी पब्लिकेशन, मेरठ, २०२२.
१४०) चोथे रामचंद्र, चोथे शशांक, "रसिक महाराष्ट्र नंदिनी", पब्लिकेशन हाऊस, पुणे, २०२१.
१४१) ढेरे अरुणा, "लोक आणि अभिजात", पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१९.
१४२) संपा. भास्कर भोळे भास्कर लक्ष्मण," एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य (खंड एक)", साहित्य अकादेमी, नवी दिल्ली,२०१२.
१४३) संपा. भास्कर भोळे भास्कर लक्ष्मण," एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य (खंड दोन)", साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, २०१२.
१४४) संपा. पांडे अविनाश, हरी विनया, "बहुभाषिकता गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया", युनिक अकॅडमी पब्लिकेशन्स, पुणे, २०१८.
१४५) जाधव मधु, "भारतीय सण आणि उत्सव", मनोविकास प्रकाशन, मुंबई, २०००.
१४६) वाघे सुरेश, " संकल्पनाकोश खंड एक,"ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१३.
१४७) वाघे सुरेश, " संकल्पनाकोश खंड, दुसरा "ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१३.

नियतकालिक

१) वृत्तभाषा, पुणे श्रमिक पत्रकार संघ, पुणे, २०२५.
२) हेमांगी, अभिजात मराठी भाषा विशेषांक, मुंबई, २०२५.
३) नवभारत, मराठी अभिजात दर्जा वर्षपूर्ती विशेषांक, ऑक्टोंबर, २०२५.
४) लोकराज्य, महाराष्ट्र शासन, माहिती आणि जनसंपर्क संचालनालय, मुंबई, फेब्रुवारी २०२१. फेब्रुवारी २०२२, फेब्रुवारी २०२३, फेब्रुवारी २०२४ व जानेवारी फेब्रुवारी २०२५.
५) युगप्रवर्तक, लोककला विशेषांक, दिवाळी अंक, उस्मानाबाद. २०२३ व २०२४.
६) भाषा आणि जीवन", त्रैमासिक, मराठी अभ्यास परिषद पत्रिका, पुणे, दिवाळी २०१६.

संकेतस्थळ

१) https://marathi.gov.in/

२) https://marathivishwakosh.org/

३) https://sahitya.marathi.gov.in/

४) https://rmvs.marathi.gov.in/


५) https://dgipr.maharashtra.gov.in/

***

परिशिष्ट – १ शिलालेख

लेख क्र. १. प्रतिमा, पृ. १.

शिलाहार केशिदेव (प्रथम) याचा अक्षी शिलालेख : शके ९३४.




(प्रमाण ·६१)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ४८१.

लेख क्र.

प्रतिमा, पृ. २.

दिवें- आगर ताम्रपट : शके ९८२



ठसा : डॉ. दीक्षित.

(समप्रमाण)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ४८२.

लेख क्र. ३.

प्रतिमा, पृ. ३.

शिलाहार अनंतदेव याचा विहार शिलालेख : शके १००३



ठसा : डॉ. दीक्षित.

(प्रमाण ·३५)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ४८३.

लेख क्र. ४. प्रतिमा, पृ. ४.

चावुंडराज व गंगराज यांचा श्रवणबेळगोळ शिलालेख : शके १०३८–३९




ठसा : डॉ. हुल्ट्झ. (प्रमाण ·०६६)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ४८४.

क्र. ५. प्रतिमा, पृ. ५.


गंग (?) उदयादित्यदेव याचा आंबें शिलालेख : शके १०६६



(प्रमाण ·२८)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ४८५

लेख क्र. ६. भांदक येथील नागनाथाच्या देवळांतील शिलालेख : शके १०६८ प्रतिमा, पृ. ६.




(प्रमाण ·३८)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ४८६.

लेख क्र. ७. प्रतिमा, पृ. ७.

शिलाहार हरिपालदेव याचा रांजली शिलालेख : शके १०७०




ठसा : डॉ. दीक्षित (प्रमाण ·५२)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ४८७.

लेख क्र. ८. प्रतिमा, पृ. ८.

शिलाहार हरिपालदेव याचा आगाशी शिलालेख : शके १०७२




ठसा : डॉ दीक्षित. (प्रमाण ·३६)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ४८८.

लेख क्र. ११. प्रतिमा, पृ. ११.

पळसदेव येथील सरडेश्वराचा शिलालेख : शके १०७९




ठसा : डॉ. दीक्षित. (प्रमाण ·४)

(टीप : मूळ लेख दोन ओळींचा असून मुद्रणाच्या सोयीसाठी येथे तो चार ओळींत विभागला आहे.)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ४९०.

लेख क्र. १५. प्रतिमा, पृ. १५.

शिलाहार अपरादित्यदेव (द्वितीय) याचा ठाणें शिलालेख : शके ११०७




ठसा : प्रि. ऑ. वे. म्यूझियम्. (प्रमाण ·३७)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ४९२.

लेख क्र. १७. प्रतिमा, पृ. १७.

पंढरपूर येथील विठ्ठलदेवाचा शिलालेख : (पहिला भाग)



(५४. ठसा)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ४९५.

लेख क्र. २२. प्रतिमा, पृ. २३.

आळंदी येथील स्मारक शिलालेख




(प्रमाण ·४५)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ४९८.

लेख क्र. २४. प्रतिमा, पृ. २५.

नेवासें येथील कर्णेश्वराचा शिलालेख




२
४
६

ठसा : भा. इ. सं. मंडळ, पुणें. (प्रमाण ·२०)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ५०१.

लेख क्र. ५२ प्रतिमा, पृ. ६०

खिलजी कुतुबुद्दीन याच्या वेळचा विजापूर शिलालेख



२
४
६


ठसा : अर्केऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया (प्रमाण ·१६)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ५०१.


लेख क्र. ५४ प्रतिमा, पृ. ६२

सामंत नागदेव याचा पल्लिका ताम्रपट

(पत्रा पहिला)




(पत्रा दुसरा, पहिली बाजू)



ठसा : श्री. रावराजे देशप्रभ

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ५०८.


कोंकणाधिपति हंबिरराव याचा नागांव शिलालेख



(प्रमाण '१२)


तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ५१०.

मठगांव येथील स्मारक शिलालेख



७ ठसा : वा. अ. बांबर्डेकर ६ (प्रमाण •१६)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ५११.



तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ५१५.

कलचुरि सिंघणदेव याचा आंबें शिलालेख



(प्रमाण ·१५)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ५१०




(प्रमाण ·५)

तुळपुळे, शं. गो., प्राचीन मराठी कोरीव लेख, पुणे विद्यापीठ प्रकाशन, ऑगस्ट १९६३, पृष्ठ, ५१०.



नाणेघाट शिलालेख



काव्यमाला. २१.

हालोपनामकमहाकविश्रीसातवाहनसंकलिता

गाथासप्तशती ।

छायारूपा

जयपुरमहाराजाश्रित-राज्यान्तर्गतसकलसंस्कृतविद्यालयनिरीक्षक-
साहित्याचार्यभट्टश्रीमथुरानाथशास्त्रिसंग्रथिता

संस्कृतगाथासप्तशती

स्वनिर्मितया व्यङ्गसर्वङ्कषाख्यव्याख्यया संवलिता ।

तृतीयावृत्तिः ।


मुम्बय्यां

पाण्डुरङ्ग जावजीश्रेष्ठिभिः

स्वीये निर्णयसागराख्यमुद्रणालये मुद्रयित्वा प्राकाश्यं नीता ।

सनाब्दाः १९३३

मूल्यं २ रूप्यकाः ।



दाक्षिण्यचिह्नाङ्क-श्रीमद्-उद्द्योतनसूरिविरचिता

कुवलयमाला

(प्राकृतभाषानिबद्धा चम्पूस्वरूपा महाकथा)

Vidya Bhavan K...
Acc No...26.
Date ...3/65
...Jammu...

अतिदुर्लभ्यप्राचीनपुस्तकद्वयाधारेण सुपरिशोध्य बहुविधपाठभेदादियुक्तं
परिष्कृत्य च संपादनकर्ता

डॉ. आदिनाथ नेमिनाथ उपाध्ये, एम्. ए., डी. लिट्.
प्राध्यापक, राजाराम कॉलेज, कोल्हापुर (दक्षिण)

प्रथम भाग — मूल कथाग्रन्थ

प्रकाशनकर्ता
अधिष्ठाता, सिंघी जैन शास्त्र शिक्षापीठ
भारतीय विद्याभवन, बम्बई

विक्रमाब्द २०१५] प्रथमावृत्ति [खिस्ताब्द १९५९

ग्रन्थांक ४९] सर्वाधिकार सुरक्षित [मूल्य रु० १५-००



कुडल शिलालेख

परिशिष्ट – २ अहवाल

भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात अभिजात मराठी भाषेचा अभ्यास

(भारतीय ज्ञान परंपरा के संदर्भ में अभिजात मराठी भाषा का अध्ययन)

(PAC: 23.16)

संशोधन अहवाल

वर्ष : 2025-26

पहिली कार्यशाळा अहवाल

दिनांक: १८ ऑगस्ट २०२५ ते २२ ऑगस्ट २०२५

क्षेत्रीय शिक्षा संस्थान, भोपाळ येथे संशोधनाच्या अनुषंगाने पाच दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळचे समन्वयक डॉ. व्यंकट बाबूराव सूर्यवंशी असुन या कार्यशाळेसाठी विषयतज्ञ म्हणून महाराष्ट्रातील मराठी विषयाचे अभ्यासक व प्राध्यापक संसाधन व्यक्तींना संस्थेत आमंत्रित करण्यात आले होते.

विषयतज्ञ म्हणून डॉ. रमेश वरखेडे, डॉ.मंगला वरखेडे, प्रो. नंदकुमार मोरे, प्रो.राजेंद्र नाईकवाडे, डॉ. नितीन रिंढे, डॉ. सुधीर मोरे, मुकुंद कुळे तर अंतर्गत विषय तज्ञ डॉ. सुरेश मकवाना, डॉ. संजयकुमार पंडागले, डॉ. अरूणाभ सौरभ व डॉ. कुलवीर सिंह चौहान यांनी कार्यशाळेत उपस्थित राहून मार्गदर्शन केले आहे.

या पाच दिवशीय कार्यशाळेत आलेल्या तज्ञानी "भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात आभिजात मराठी भाषेचा अभ्यास" या विषयावर संशोधन करताना कोणत्या घटकाचा विचार करावा या विषयीची चर्चा केली. सर्व तज्ञांनी आपआपली मते मांडली. तज्ञांनी आपल्या विषयाबरोबरच लिखित पेपर ही वाचून दाखविला. याचा संशोधनाच्या अनुषंगाने कसा वापर करता येईल या साठीचे मार्गदर्शन केले. इतिहास, संस्कृती आणि सभ्यता तसेच वर्तमानातील भाषेचा संदर्भ तपासताना मराठी भाषा अभिजाच कशी आहे यांचे उदाहरण देण्यात आले. आपण कुटुंबात पारंपारिक कथा, मौखिक परंपरेनुसार पिढ्यानपिढ्या कथा ऐकल्या त्या आपल्या मातृभाषेतून होत्या.

भारतीय वारसा, कला, संस्कृती जपणाऱ्या कलाकारांचे योगदान याला राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये महत्त्वाचे स्थान देणयात आले आहे. या सोबतच संशोधन आराखडा तयार करण्यात आला. जो की आम्हाल संशोधन करण्यासाठी उपयुक्त एक दिशा या आराखड्यातून मिळाली. शिक्षक आणि विद्वानांनी इतिहास, सांस्कृतिक आणि साहित्यिक संदर्भ, विविधता, विविध प्रकार, लुप्त झालेल्या परंपरा, अध्यापन-अध्यापनातील उपयोग, सध्या सराव करणाऱ्या पारंपारिक कला, आणि खेळणी मार्गदर्शन, यासारख्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. कार्यशाळेसाठी एक चौकट देखील तयार केली. कार्यशाळेच्या शेवटच्या दिवशी संशोधन आराखडा अंतिम करण्यात आला.. विशेष करून अशा पध्दतीचे संशोधन एनसीईआरटी करत आहे. या संशोधनाबद्दल रमेश वरखेडे आण प्रो. नंदकुमार मोरे या तज्ज्ञानी भरभरून कौतूक केले. प्राध्यापक रमेश वरखेडे "प्रत्येक विषयात कला, ज्ञान भाषाअसते. कोणताही विषय समजून घेण्यासाठी फक्त ज्ञान असणे आवश्यक नसते. त्या विषयाचा पोत समजून घेणे महत्त्वाचे आहे.

आलेल्या तज्ज्ञ व्यक्तींनी "भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात अभिजात मराठी भाषेचा अभ्यास" या विषयावर संशोधन होत आहे याबद्दल आनंद व्यक्त केला. त्यांनी क्षेत्रीय शिक्षा संस्थान भोपाळ येथील कार्यशाळेतील पाच दिवसाचे अनुभव सांगितले. समारोप समारंभात प्रमाणपत्रे वाटून कार्यशाळेचा समारोप झाला. ज्यांनी संसाधन व्यक्तींबद्दल आणि नवीन शिक्षणात कार्यशाळेच्या उपयुक्ततेबद्दल त्यांच्या भावना सहजपणे व्यक्त केल्या.

संशोधन आराखडा

भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात अभिजात मराठी भाषेचा अभ्यास

प्रकरण १. प्रस्तावना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा- शालेय शिक्षण-२०२३

प्रकरण २. पूर्व संशोधनाचे आढावे

भारतीय ज्ञान परंपरा

अभिजात मराठी भाषा

प्रकरण ३. भारतीय ज्ञान परंपरा संकल्पना, स्वरूप व वाटचाल

प्रास्ताविक

ज्ञान लिखित, मौखिक

अ दर्शनशास्त्र: वेद, उपनिषद, बौद्ध, जैन, मीमांसक सांख्य, नैसर्गिक ,काश्मिरी शैव संप्रदाय

आ. गणित, वैदिकशास्त्र , नाट्यशास्त्र व सौंदर्यशास्त्र

भारतीय आणि महाराष्ट्रीय संकल्पना व परंपरा

भारतात अनेक भाषा स्वण प्रज्ञा स्वमान

भारतीय संस्कृतीचा संबोध

चारित्र्य निर्मितीसाठी भारतीय ज्ञान परंपरेचे उपयोजन

भारतीय ज्ञान परंपरेत मराठीचा वाटा

भारतीय ज्ञान परंपरा आणि महाराष्ट्राचे अनुबंध

संतांची तीर्थस्थळे आश्रम आणि पाठशाळा

प्रकरण ४. अभिजात भाषा संकल्पना स्वरूप व वाटचाल

प्रास्ताविक

भाषा : व्याख्या, संकल्पना व व्याप्ती

भाषा शास्त्रीय अभ्यासाची बैठक

व्युत्पत्ती विज्ञान, समाजभाषा विज्ञान ,बोलीभाषा विज्ञान, व्याकरण

स्थानिक भाषा- नाणेवाचक शब्द, शेती - जंगल – पशु, सण - उत्सव

भूमीची स्वतःची स्वतंत्र भाषा असते, भूमीची चिन्ह व्यवस्था

कोकण, मराठवाडी, वऱ्हाडी, चित्राची भाषा, संगीताची भाषा, नृत्याची भाषा

बोलीभाषा

बोली भूगोलाची संकल्पना , क्षेत्रिय बोली

सामाजिक / वर्ग बोली-, सूतार, चांभार, लोहार

लोकोक्ती - उखाणे

स्त्रियांची भाषा- उखाणे, गीत, प्रमुख वाक्प्रचार / एकमेकांवर प्रभाव,

मातृभाषा, अभिजात भाषा, भारतीय अभिजात भाषा,मराठी भाषेची जडणघडण

उत्पत्ती विषयक सिद्धांताची पुनर्मांडणी

भाषिक ऋणग्रहण- शब्दसंग्रहाचा स्त्रोत उद्भव

अन्य भारतीय भाषांशी अनुबंध

अभिजात भाषेचे निकष

वैश्विक निकष- ग्रीक, लॅटीन

भारत सरकारचे निकष

भाषा शिक्षण आणि अनुदेशन पद्धती

- बहुभाषिकता ,संवाद क्षमता, सर्जनशीलता
- तार्किक युक्तिवाद कौशल्य

(व्याख्या, परिभाषा, पूर्वपक्ष - उत्तर पक्ष, खंडन - मंडन, मध्यवर्ती कल्पना, सारकथन)

भाषिक क्षमता, भाषिक संवर्धनाचे विविध आयाम,भाषाभिवृद्धीचे उपक्रम, कार्मिक कौशल्य आणि भाषेचे उपयोजन वास्तुकला, क्रिडा, पाककला इ.

प्रकरण ५. भारतीय ज्ञान परंपरा आणि प्राचीन साहित्य

प्रास्ताविक

वेद, उपनिषदे, महाकाव्य अर्ष, पौरणिक वाङ्मय (१८ पुराणे), बौद्ध वाङ्मय जातक कथा, थेरी गाथा), जैन वाङ्मय (चूर्णीका), अन्य भारतीय भाषेतील अभिजात साहित्य (संगम साहित्य, वचन साहित्य, सुफी, भारुड, गीते)

प्रकरण ६. भारतीय ज्ञान परंपरा आणि मध्ययुगीन मराठी साहित्य

प्रास्ताविक

छंदोरचनेची साम्य स्थळे, आर्ष महाकाव्य, पुरणांचे ऋणवाद, रूपांतरे , बीज कथा -आदिबंध , कल्पना बंध, मिथके - दिव्यकथा

कथा परंपरा व प्रकार, गोष्ट , आख्यात, लिळा, वार्ता , कहानी, कथेचे प्रकार ,अर्थकथा, कामकथा, श्रम कथा, संकीर्ण कथा, खंड कथा, परिहास कथा, उल्लाप कथा.

महानुभव साहित्य- दृष्टांत पाठ, लीळा,

संत साहित्य अभंगातील कथनरूपे

लोक छंदाचा जोरदार पुरस्कार

हमामा, विटीदांडू, ओवी, अभंग, भारुड, वैदिक छंदाशी नाते

दक्षिणोत्तर भक्तीपरंपरेचे संबंध, संगम स्थान, बंडखोरी, भक्तीतत्व

पंडिती साहित्य ,आर्या - खंडकाव्य

शाहिरी वाङ्मय, लावणी, पोवाडा, फटका, सट्टक, रंजन व स्तुती, अस्मिता, संस्कृती टीका, भूपाळी- प्रार्थना, स्तवन

बखर गद्य, इतिहास, राज्यशास्त्र, गद्याच्या माध्यमातून मांडणी, आज्ञापत्र, भाऊसाहेबाची बखर

प्रकरण ७. भारतीय ज्ञान परंपरा आणि आधुनिक मराठी साहित्य

प्रास्ताविक

बृहतकथा ,कथा सरीत्सागर , वेदोक्त कथा, पंचतंत्र

आधुनिक मराठी गद्य ,नाटक - मेघदुताची भाषांतरे,कालीदासाची नाटके

कथा कादंबरी, रामायण महाभारताचे प्रभावक्षेत्र, आंतरसंहितात्मकता

आधुनिक मराठी पद्य व आधुनिक मराठी नाट्य वाङ्मय

प्रकरण - ८. भारतीय ज्ञान परंपरा आणि मराठी लोकसाहित्य

प्रस्ताविक

भोवतालच्या भौगोलिकतेशी जोडून घेऊन भाषिक व्यवहार

दारिद्र्याची समायोजन, कसोटी गीते, कथा

लोकसाहित्य, लोककथा (कहानी, चातुर्य कथा, हास्यकथा, बोधकथा)

लोककला, लोकनृत्य, लोकगीते

प्रादेशिक म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, सण, उत्सव

प्रकरण ९. उपसहार

भाषा समृद्धीच्या दिशा

निष्कर्ष व शिफारशी

नमुना अभ्यासक्रम आराखडा

शिक्षक प्रशिक्षण

परिशिष्टे

१. संदर्भसूची

२. परिभाषिक संज्ञा

३. विषय सूची

४. व्यक्तिनाम सूची

५. संकेतस्थळ

६. छायाचित्रे

क्षेत्रभेट

संशोधन विषयाच्या अनुषंगाने क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कार्यक्रम समन्वयक डॉ. व्यंकट बाबराव सूर्यवंशी व कनिष्ठ संशोधन सहायक अविनाश गोपनारायण सहभागी होते. संशोधनासाठी आवश्यक असणारी संदर्भ साधने मिळविण्यासाठी महाराष्ट्रातील पुणे, जुन्नर, सासवड, अहिल्यानगर, नेवासा, सोलापूर, कुडल, कोरवली, पंढरपूर, धाराशिव, तेर, काटी सावरगाव, पैठण, याबरोबरच संदर्भ ग्रंथ शोधणे आणि झेरॉक्स काढण्यासाठी ग्रंथालयाना भेटी देण्यात आल्या आहेत. त्याची यादी पुढीलप्रमाणे आहे.

ग्रंथालय व संग्रहालय

१. जयकर ग्रंथालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. डेक्कन कॉलेज, पुणे.
३. पश्चिम विभागीय भाषा केंद्र, (भारतीय भाषा संस्थान) पुणे.
४. फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे.
५. भांडारकर प्राच्य-विद्या संशोधन मंदिर, पुणे.
६. पुणे नगर वाचन मंदिर, पुणे.
७. भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.
८. राजा दिनकर कळकर संग्रहालय, पुणे.
९. कै. रामलिंगप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालय, तेर जि. धाराशिव.
१०. सर्वज्ञ श्री. दासोपंत पासोडी मंदीर, अंबाजोगाई.

क्षेत्र भेटी

१. कोरवली २. कुडल, सोलापूर.
३. सावरगाव, तुळजापूर.
४. नेवासा, अहिल्यानगर.
५. आपेगाव.
६. पंढरपूर.
७. हतनूर.
८. जून्नर.
९. अंबाजोगाई.

द्वितीय कार्यशाळा

दिनांक ३० जानेवारी २०२५ ते ३ फेब्रुवारी २०२६

क्षेत्रीय शिक्षा संस्थान, भोपाळ येथे "भारतीय ज्ञान परंपरेच्या संदर्भात अभिजात मराठी अभ्यास" या विषयावर पाच दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत, महाराष्ट्रातून पाच विषय तज्ज्ञाना आमंत्रित करण्यात आले होते. जे मराठी भाषेत अध्यापनाबरोबरच भारतीय ज्ञान परंपरा आणि भाषा, कला संस्कृती जतन करण्याचे काम करत असून या विषयाच्या संदर्भात मराठी भाषेतील संशोधन काम केले आहेत.

संशोधन विषयाच्या संदर्भात इतिहास, दुर्मिळ ग्रंथ, शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखिते, लोककला, साहित्य, संत परंपरा याची सांगड आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० कलांचे जतन आणि संवर्धन, आधुनिक काळातील नवोपक्रम आणि शिक्षणाचे महत्त्व यावर प्रकाश टाकणे. तसेच या कार्यशाळेदरम्यान आम्ही पहिल्या कार्यशाळेत जो आराखडा तयार करण्यात आला होता. त्यानुसार केलेले काम परिक्षण करुन अंतिम करण्यासाठी तसेच योग्य ठिकाणी तज्ञाच्या सूचनेनुसार बदल करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य प्रो. शिवकुमार गुप्ता, विस्तार शिक्षा विभाग प्रमुख प्रो. रत्नमाला आर्या आणि सामाजिक विज्ञान आणि भाषा विभाग प्रमुख डॉ. सुरेश मकवाना, कार्यक्रम समन्वयक डॉ. व्यंकट बाबूराव सूर्यवंशी यांच्यासह इतर प्राध्यापकांच्या उपस्थितीत झाले.

विषयतज्ञ म्हणून प्रो. आनंद काटीकर, डॉ. नागनाथ बळते, डॉ. ऋषीबाबा शिंदे, डॉ. प्रविण सोलनकर, डॉ, सचिन आहेर तर अंतर्गत विषय तज्ञ डॉ. सुरेश मकवाना, डॉ. संजयकुमार पंडागले, डॉ. अरूणाभ सौरभ, डॉ. कुलवीर सिंह चौहान, डॉ. गंगा महतो व डॉ. श्रुती त्रिपाठी यांनी कार्यशाळेत उपस्थित राहून मार्गदर्शन केले आहे.

या कार्यशाळेमध्ये पहिल्या कार्यशाळेत जो आराखडा तयार करण्यात आला होता. त्यानुसार चर्चा करून योग्य ठिकाणी बदल करून अंतिम करून विषयतज्ञानी सूचविलेल्या सूचनेनुसार काम करण्यात आले.

कार्यशाळेचा समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. शिवकुमार गुप्ता, प्रो. रत्नमाला आर्या डॉ. सुरेश मकवाना डॉ. अरूणाभ सौरभजी उपस्थित होते. विषयतज्ज्ञ डॉ. आनंद काटीकर आणि ऋषीबाबा शिंदे यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या आणि संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त करून भविष्यात असे काम क्षेत्रीय शिक्षा संस्थानकडून व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

परिशिष्ट -३

संशोधन विषयतज्ञ

मुख्य संशोधक	
डॉ. व्यंकट बाबूराव सूर्यवंशी	
अंतर्गत विषय तज्ञ	
१	डॉ. सुरेश मकवाना
२	डॉ. संजयकुमार पंडागले
३	डॉ. विशाल पाजणकर
४	डॉ. साईनाथ कबाडे
५	डॉ. कुलवीर सिंह चौहान
६	डॉ. श्रुती त्रिपाठी
७	डॉ. गंगा महतो
८	डॉ. अरूणाभ सौरभ
बाह्य विषयतज्ञ	
१	डॉ. रमेश वरखेडे
२	डॉ. मंगला वरखेडे
३	डॉ. नंदकुमार मोरे
४	डॉ. राजेंद्र नाईकवाडे
५	डॉ. नीतिन रिंढे
६	डॉ. सुधीर मोरे
७	डॉ. मुकुंद कुळे
८	डॉ. आनंद काटीकर
९	डॉ. नागनाथ बळते
१०	डॉ. ऋषीबाबा शिंदे
११	डॉ. प्रविण सोलनकर
१२	डॉ. सचिन आहेर
कनिष्ठ संशोधन सहायक	
१	अविनाश गोपनारायण

परिशिष्ट -४

कार्यशाळा छायाचित्र












एन सी ई आर टी
क्षेत्रीय शिक्षा संस्थान
भोपाल

क्षेत्रभेट छायाचित्र














Solapur, Maharashtra, India
Google


Hattarsang, Maharashtra, India
Google


Koravali, Maharashtra, India
Google


Pune, Maharashtra, India


Pune, Maharashtra, India
Google


Hattarsang, Maharashtra, India
Google




Ter, Maharashtra, India


Ter, Maharashtra, India


Paithan, Maharashtra, India


पुणे नगर वाचन मंदिर
स्थापना - ७ फेब्रुवारी १८४८


KNOWLEDGE RESOURCE CENTR

कार्यशाळा छायाचित्र












24th
MEETING OF






REGIONAL INSTITUTE
OF EDUCATION
BHOPAL
क्षेत्रीय शिक्षा संस्थान, भोपाल
शिक्षार्थ आइए सेवार्थ जाइए

मायबोली

लाभले अम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी

आमुच्या मनामनांत दंगते मराठी
आमुच्या रगारगात रंगते मराठी
आमुच्या उराउरांत स्पंदते मराठी
आमुच्या नसानसांत नाचते मराठी

आमुच्या पिलापिलांत जन्मते मराठी
आमुच्या लहानग्यांत रांगते मराठी
आमुच्या मुलांमुलीत खेळते मराठी
आमुच्या घराघरांत वाढते मराठी

आमुच्या कुलाकुलात नांदते मराठी
येथल्या फुलाफुलांत हासते मराठी
येथल्या दिशादिशांत दाटते मराठी
येथल्या नगानगात गर्जते मराठी

येथल्या दरीदरीत हिंडते मराठी
येथल्या वनावनात गुंजते मराठी
येथल्या तरुलतात साजते मराठी
येथल्या कळीकळीत लाजते मराठी

येथल्या नभामधून वर्षते मराठी
येथल्या पिकांमधून डोलते मराठी
येथल्या नद्यांमधून डोलते मराठी
येथल्या चराचरांत राहते मराठी

– सुरेश भट

विद्यया ऽ मृतमश्नुते

एन सी ई आर टी
NCERT



क्षेत्रीय शिक्षा संस्थान, भोपाल

(राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान एवं प्रशिक्षण परिषद, एनसीईआरटी, नई दिल्ली)

श्यामला हिल्स भोपाल- 462002 (म.प्र.)

क्षेत्रीय शिक्षा संस्थान भोपाल